विश्वनाथ काशिनाथ राजवाडे-कृत

# ज्ञानेश्वरीची प्रस्तावना

आणि

# ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण

संपादक

डॉ. शं. गो. तुळपुळे

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे कृत

# ज्ञानेश्वरीची प्रस्तावना

# आणि

# ज्ञानेश्वरीतील
# मराठी भाषेचे व्याकरण


संपादक

डॉ. शं. गो. तुळपुळे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई



अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती : १९७९
व्दितीय आवृत्ती : २००२

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई- ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन :

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
५, फोटोझिंको पथ पुणे-४११ ००१.

किंमत : रू. ९०/-

## अनुक्रमणिका

# SYNOPSIS

V. K. Rājavāḍe published his text of the Jñāneśvarī in 1909 as based on a manuscript which he found at Bīḍa and which he claimed as written almost immediately after the passing away of Jñānadeva in 1296. It was thus from his point of view an invaluable document on which to base a study of Old Marāṭhī. Accordingly, he wrote a long Introduction to his edition of the Jñāneśvarī taking a survey of the history of the Marāṭhī language on the basis of the source-material consisting of inscriptional and other records. Though the Vārakarī cult which regards the Jñāneśvarī as its book of religion did not give its recognition to Rājavāḍe's edition of the same, the world of scholars did appreciate his work which gave an impetus to the linguistic study of this monumental work in Marāṭhī. For along with his edition of the Jñāneśvarī Rājavāḍe also published his "Grammar of the Marāṭhī language of the Jñāneśvarī" (1909) which could claim to be the first Historical Grammar of Marāṭhī. Together these two works, namely Rājavāḍe's Introduction to the Jñāneśvarī and his Grammar of the language of the Jñāneśvarī, have proved to be the starting point for any serious study of the Marāṭhī language particularly from the historical point of view. Granting the shortcomings in his work which were due mainly to his rather obstinate nature, it must be said that it is a landmark in the history of linguistic studies not only in Mahārāṣṭra but in India.

The Government of Mahārāṣṭra brought out a revised reprint of Rājavāḍe's edition of the Jñāneśvarī in 1960 but unfortunately without his Introduction being included in it. His Grammar of the Marāṭhī language of the Jñāneśvarī was also out of print for the past several years. It is with the intention, therefore, to make available these two valuable works of Rājavāḍe to the scholars of the Marāṭhī language that the present edition of the same is being published. While doing so care has been taken to provide Rājavāḍe's writings with necessary foot-notes, indices and other aids of study in which they miserably lack. An Introduction bringing out the salient features of Rājavāḍe's present works is prefixed.

अनुक्रमणिका

# संपादकीय निवेदन

इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची 'ज्ञानेश्वरी' व 'ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचे व्याकरण' हे दोन ग्रंथ इ. स. १९०९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर इ. स. १९६० साली महाराष्ट्र राज्यशासनाने त्यांच्या 'ज्ञानेश्वरी'चे पुनर्मुद्रण केले; पण ते करताना त्यांनी लिहिलेली विस्तृत प्रस्तावना वगळली. वरील दोन्ही प्रकरणे, म्हणजे प्रस्तावना व व्याकरण, मराठी भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाला बहुमोल असून ती दुर्मिळ झाल्याने त्यांची एक संपादित आवृत्ती काढावी या हेतूने प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. राजवाड्यांच्या मूळ प्रबंधांना तळटीपा, विषयसूची किंवा शब्दसूची यांची जोड नाही. ती येथे देऊन त्यांचे प्रबंध अधिक उपयुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांच्या प्रस्तावनेची व व्याकरणाची वैशिष्ट्ये सांगणारा एक विवेचक प्रस्तावही या जोडग्रंथास जोडला आहे. या कामीं 'साहित्य संस्कृती मंडळ'ने पुढाकार घेऊन हा ग्रंथ स्वतःचे प्रकाशन म्हणून प्रसिद्ध केला यासाठी मी 'मंडळा'चा आभारी आहे.

पुणें
ता. ६ जून १९७८ } शं. गो. तुळपुळे

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

## संपादकीय प्रस्तावना

राजवाडे-ज्ञानेश्वरी १; अनुकूल-प्रतिकूल टीका १; ‘माझी ज्ञानेश्वरी व कित्येक शंकाकार’ ३; राजवाडे यांची ज्ञानेश्वरीची प्रस्तावना ५; पूर्ववैदिक भाषा आणि मराठी ७; ज्ञानेश्वरीचा संस्कृत नवमाध्याय ८; मराठी भाषेंचा जन्मकाळ ११; आद्य मराठी ऐतिहासिक व्याकरणकार १२; पूर्वप्रयत्न १३; राजवाडेकृत व्याकरणाची पार्श्वभूमिका १४; ऐतिहासिक व्युत्पत्तिकार १५; भाषेची कालकृत अवस्थान्तरे आणि ऐतिहासिक व्याकरण १७; प्रस्तुत व्याकरणाचे स्वरूप व त्याच्या मर्यादा १८; विश्वसनीय साधन १९; भाषेच्या जुनेपणाची काही गमके २१; आर्य-भारतीय पद्धतीने रचिलेले व्याकरण २३; मराठीचे ‘संस्कृत’ व्याकरण २५; आग्रह आणि दुराग्रह २६; परस्परविरुद्ध विधानें २८; अ-शास्त्रपूत टीका ३०; राजवाडे यांचे भाषाविषयक कर्तृत्व ३१; देशभक्तीचा बाणा ३४; भाषाशैली ३५; थोडे गुणदोष-विवेचन ३६; समारोप ३९.

# निवेदन

मराठी भाषा व साहित्य यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना समृद्ध करणे व साहित्य, इतिहास व कला या क्षेत्रांतील महाराष्ट्राचा थोर वारसा जतन करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे उद्दिष्ट आहे. ज्यांच्या साहित्य कृतीमुळे मराठी इतिहास, संस्कृती व वाङ्मय यामध्ये फार मोठी मोलाची भर पडली आहे, अशा प्रख्यात साहित्यिकांची एकोणिसाव्या शतकांतील व विसाव्या शतकातील पहिल्या जागतिक युद्धाच्या काळापर्यंतची मराठी साहित्यात झालेली उच्च वाङ्मयीन साहित्यिक व सांस्कृतिक मूल्ये असलेली पुस्तके व त्या वेळेचे साहित्यिक या विषयीचे ज्ञान मराठी वाचकांस उपलब्ध व्हावे म्हणून त्यांचे साहित्य प्रकाशित करावयाचे धोरण महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ठरविले आहे. अशा तऱ्हेचे साहित्य मंडळ एकतर स्वतः प्रकाशित करते अथवा खाजगी प्रकाशक व साहित्य संस्था यांनी प्रकाशित करावयाचे ठरविले तर मंडळ त्यांना अनुदान देण्याचा विचार करते.

२. मराठी साहित्यिक तसेच साहित्य यांची शैली कालपरत्वे बदलत व विकसित होत गेली आहे. कविता, कथा, लघुकथा यांचा आशय व आकृतिबंध कालाप्रमाणे बदलत गेला आहे. वर्णनात्मक बदल फार मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वैचारिक निबंध व प्रबंध यांच्यातील ध्येयवाद व तत्त्वप्रतिपादन यांमध्ये नवीन भर पडली आहे. तसेच जीवनमूल्ये व सामाजिक परिस्थितीतील बदलही प्रकर्षाने जाणवत आहेत. निरनिराळ्या काळातील साहित्यिकांचा त्या त्यावेळच्या परिस्थित्यनुरूप आपल्या साहित्यावर ठसा उमटलेला दिसून येतो.

३. मंडळाने हा हेतू साध्य करण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू व मंडळाचे माजी सदस्य, डॉ. वि. भि. कोलते यांजकडे संपादनासाठी सोपविली आहे. लोकमान्य टिळकांच्या केसरीतील निवडक लेखांचा संग्रह इंग्रजी व मराठीत संपादन करण्याचे आणि कै. गोपाळ गणेश आगरकरांचे केसरीतील व सुधारकातील निवडक व दुर्मिळ लेखांचे संपादनाचे काम मंडळातर्फे चालू आहे. लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांच्या समग्र वाङ्मयाचे संपादन झाले आहे. कै. राजारामशास्त्री भागवत यांचे विविधज्ञान विस्तार सुबोध पत्रिका, हिंदुधर्मविवेचक, दिनबंधू, इत्यादी नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले व आज सहजपणे उपलब्ध नसलेले व महत्त्वपूर्ण निबंधाचे संपादन कार्य मंडळातर्फे चालू आहे. सिस्टर जेराल्डिन यांनी संकलित केलेला "Letters & Correspondence of Pandita Ramabai" हा १८८३ ते १९१७ या काळातील आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा पत्रव्यवहार मंडळाने इंग्रजी भाषेत प्रकाशित केला असून त्याच्या मराठी अनुवादाचे काम प्रा. सौ. सरोजिनी वैद्य यांजकडे सोपविले आहे. डॉ. के. सी. कऱ्हाडकर यांनी संपादिलेला "बाबा पदमनजी काल व कर्तृत्व" हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

मंडळाच्या या योजनेत आजवर "महात्मा फुले समग्र वाङ्मय", "धर्मरहस्य," या ग्रंथांच्या द्वितीयावृत्ती प्रसिद्ध झाल्या आहेत. "महाराष्ट्र मंहोदयाचा पूर्वरंग", "सेनापती बापट समग्र वाङ्मय," कै. आचार्य धर्मानंद कोसंबी लिखित "जातककथा भाग" १, २ व ३ या ग्रंथांचे प्रकाशनही झाले आहे. तसेच कै. आचार्य धर्मानंद कोसंबी लिखित "बुद्धलीला सारसंग्रह", "बुद्ध धर्म आणि संघ, बुद्ध संघाचा परिचय, समाधीमार्ग" इत्यादी ग्रंथांच्या पुनर्मुद्रित आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.

अनुक्रमणिका

वरील योजनेत प्रस्तुत पुस्तक आम्ही समाविष्ट केले आहे. इतिहाससंशोधक कै. वि. का. राजवाडे यांनी मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण तयार व्हावे, या उद्देशाने "ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण" हा निबंध लिहिला. त्याचप्रमाणे मराठी भाषेचा इतिहास उपलब्ध व्हावा म्हणून बीड-पाटांगण येथे सापडलेल्या ज्ञानेश्वरीचे मुद्रण-प्रकाशन केले व त्यात निबंधवजा विस्तृत "प्रस्तावना" लिहून त्यात मराठी भाषेचा ऐतिहासिक मागोवा घेतला. हे दोन्ही निबंध आता पुस्तकांच्या बाजारात मिळत नाहीत. ते दोन्ही निबंध पुनः जिज्ञासू वाचकांच्या हाती पडावे म्हणून डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी सविस्तर समीक्षात्मक प्रस्तावना लिहून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या स्वाधीन केले.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाच्या अनेक प्रकल्पांमध्ये मराठीचे पायाशुद्ध अध्ययन व्हावे म्हणून मराठी शब्दकोश, मराठी वाङ्मयकोश व मराठी विश्वकोश हे अत्यंत महत्त्वाचे कोश समाविष्ट केले आहेत. भाषेच्या शास्त्रशुद्ध अध्ययनाचा व्याकरण हा पाया आहे. हा पाया मजबूत होण्यास हे पुस्तक सहायभूत होईल यात शंका नाही. डॉ. तुळपुळे हे प्राचीन मराठीचे नामवंत पंडित आहेत. त्यांनी राजवाडेप्रणीत या दोन निबंधांना उत्कृष्ट प्रस्तावना लिहिली व आवश्यक तेथे संक्षिप्त वा विस्तृत टीपा दिल्या. याबद्दल आम्ही त्यांचे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो.

वाई
दिनांक ३१ जुलै, १९७९.
९ श्रावण शके १९०१

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

SYNOPSIS ........ ४

संपादकीय निवेदन ........ ५

संपादकीय प्रस्तावना ........ ६

निवेदन ........ ७

संपादकीय प्रस्तावना ........ १८

व्याकरणाची व्याख्या; प्रांतकृत भाषाभेद; जातिकृत भाषाभेद; लिंगकृत भाषाभेद; कालकृत भाषाभेद;... ५०

प्रांतिक भाषा; अपभ्रंश; किरिस्तानी अपभ्रंश; मानभावी अपभ्रंश........ ५१

कालकृत भाषेचीं अवस्थान्तरें........ ५२

नागर अथवा शिष्ट मराठी; प्रांतिक भाषांत वाङ्मयाभाव;........ ५३

शिष्ट व अशिष्ट मराठी ........ ५४

शिष्ट मराठी कृत्रिम नाहीं, सहज आहे. ........ ५४

शिष्ट मराठीची ऐतिहासिक व्याकरण क्षमता........ ५५

शिष्ट मराठीची सर्वलोकप्रियता. ........ ५५

वर्तमान शिष्ट मराठीचें साधें व्याकरण ........ ५६

पोटभाषांचें अथवा बोलींचें तौलनिक व्याकरण ........ ५६

आधुनिक सगोत्र समकालीन भाषांचे तौलनिक व्याकरण........ ५६

शिष्ट मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण ........ ५७

मराठी भाषेचा इतिहास; मराठी सारस्वताचा इतिहास; मराठी वाङ्मयाचा इतिहास; सारस्वत शास्त्रींय व कलात्मक ग्रंथसमूह; साहित्य; पद्धतिग्रंथ. ........ ५८

शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या रचनेची सामग्री ........ ६०

मराठी भाषेचा मूलारंभ : शक सुमारे ४००; यूरोपियनांचे मात्सर्य व करंटलक्षण; बीम्स ........ ६२

मराठी भाषेची गर्भावस्था— शक १५०-शक ४०० पर्यंतचें अराजक........ ६२

१८. मगध—सुरसेन पिसाचपुर ........ ७१

ऐतिहासिक दृष्ट्या अथवा कालावच्छेदानें महाराष्ट्रींचें अर्वाचीनत्व. पहिली प्राकृत-सौरसनी; देव कोण ? दुसऱ्या प्राकृत मागधी व पैसाची तिसरी प्राकृत : महाराष्ट्री........ ७२

देव कोण ? ........ ७३

महाराष्ट्रीचें उच्चारदृष्ट्या अर्वाचीनत्व ........ ७४

व्याकरणदृष्ट्या महाराष्ट्रीचें अग्रमान्यत्व. ........ ७५

पाली—मागधी—सौरसेनी—पैसाची यांचा जन्मकाल ........ ७५

पाणिनीच्या वेळीं (शकपूर्व १५००) महाराष्ट्रदेश नव्हता व महाराष्ट्री भाषा नव्हती; दंडकारण्य होतें....... ७६

आर्य पश्चिमेकडून कोंकणांत उतरले व तेथून घाटांनीं दंडकारंण्यांत शिरले. शकपूर्व १५००—१०००; वार्तिककार कात्यायन १०००-६०० शकपूर्व; अशोक शकपूर्व ३५०; वररुचि कात्यायन शकपूर्व ३००; पतंजलि शकपूर्व ३०० ........ ७७

महाराष्ट्री भाषेचा प्रारंभ शकपूर्व १०००—७०० ........ ७९

मौर्य ४००-२५०; शुंग व काण्वायन २ ०-१५०; विक्रमादित्य शकपूर्व १३५; शातवाहन उर्फ शालिवाहन शक०; जिवंत महाराष्ट्री व मेलेली संस्कृत भाषा; पहिला कालिदास संवत् २० - संवत् ११५; तत्कृत ग्रंथ; गाथासप्तशतींत कालिदासाचा उल्लेख; काश्मीरचा प्रवरसेन विक्रम संवत् ११५-१४५ ........ ७९

शकसंवत् शक, यवन, पारद, खश, खरोष्ट वगैरे म्लेछांनीं स्थापलेला नाहीं; शकसंवत् धर्मकृत्यांत योजतात, तस्मात् तो म्लेछ नाहीं; शक शब्दाचे दोन अर्थ; सात=साफ ........ ८३

सातवाहनांच्या साम्राज्याबरोबर महाराष्ट्रीचें साम्राज्य ........ ८७

शातवाहनांच्या साम्राज्याची धूळधाणतत्समवेत महाराष्ट्री भाषेचा पडित काळ; शक १५०-४५० पर्येतचे महाराष्टांतील कित्येक संस्थानिक;महाराष्ट्रीचा ऱ्हास व अंत. ........ ८७

अपभ्रंश........ ८८

मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश, व पैशाची-अपभ्रंश ........ ८९

महाराष्ट्री-अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास मूत झाला. ........ ९०

(मराठी भाषा सुरू होईतावत्कालपर्यंत भाषांची परंपरा); पूर्वभाषा असतांनाच उत्तर भाषा अपभ्रंश म्हणून सुरूं होते; उत्तर भाषा लोकमान्य होत असतांना, पूर्वभाषा कांही काल टिकाव धरून रहाते........ ९१

मराठी उर्फ देशी ........ ९४

शक ९०० पर्येत मराठींत सारस्वताभाव. ........ ९४

शक ९०० नंतर नागर मराठी........ ९४

मराठीला फारशीचा संसर्ग शक १२००-१५००........ ९५

स्वराज्य शक १५०० पासून शक १७३९ पर्यंत........ ९५

इंग्रजीचा संसर्ग शक १७३९-१८३० ........ ९५

(येथवरच्या विवेचनाचा आढावा)........ ९५

(प्रस्तुत ज्ञानेश्वरी-विषयक तपशील) ........................................................................ ९५
पोथीचें मूलस्थान........................................................................ ९५
पोथीचें रूप........................................................................ ९६
लेखनशुद्धि........................................................................ ९६
विद्वच्छुद्धि. ........................................................................ ९६
भाषाशुद्धि........................................................................ ९६
विद्वन्मंन्यशुद्धि किंवा अशुद्धि........................................................................ ९७
पोथीचे आद्यन्त. ........................................................................ ९७
पोथीचा काळनिर्णय........................................................................ ९९
पोथीचें स्थलान्तर........................................................................ ९९
पोथींतील शक १२१२ तली निर्भेळ नागर मराठी भाषा........................................................................१००
तंजावर येथें असलेली भारद्वाजी प्रत शक १५१५........................................................................१००
मुकुंदराजाच्या प्रतींतील ओंवीसंख्या. ........................................................................१०२
उद्‌बोधनाथी प्रतींतील ओंवीसंख्या. ........................................................................१०३
माडगांवकरी छापील प्रतींतील ओंवीसंख्या ........................................................................१०३
निळोबाच्या मतें ओंवीसंख्या........................................................................१०४
चिद्धनमतें ओंवीसंख्या; भारद्यांच्या प्रतींतील ओंवीसंख्याच; क्षपक; (सोनारी प्रतींतींल क्षेपक ओव्या); एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती; केवळ बिनअस्सल म्हणज नक्कल पोथ्या ताडून ग्रंथांचें मूळ निर्भेळ स्वरूप सिद्ध होत नाहीं........................................................................१०४
नकलकारांनीं मूळ ज्ञानेश्वरीची छाटाछाट केलेली नाहीं; प्रक्षेपांनीं भरती केली आहे........................................................................१०७
(प्रस्तुत मुकुंदराजी प्रत व माडगावकर-प्रत यांतील काही पाठांची तुलना); तौलनिक पद्धतीनें मूळाचा थांग नक्की लागतोच असें नाही. ........................................................................११४
ज्ञानेश्वरीचे अपभ्रष्ट पाठ व त्या पाठांचीं भ्रामक भाषान्तरें; आठल्यांचें भाषान्तर; व्याकरणदृष्ट्या भाषान्तरांची दुष्टता ........................................................................११४
प्रस्तुत मुकुंदराजी प्रतींतील संस्कृत श्लोक देण्याची पद्धती) ................Error! Bookmark not defined.
(प्रस्तुत प्रतींतील मूळ संस्कृत श्लोकांचे पाठभेद) ..............................Error! Bookmark not defined.
ज्ञानेश्वरींत फारसी शब्द नाहींत........................................................................ ११८
(मराठी भाषेच्या ऐतिहासिक व्याकरणाचे सूतोवाच)........................................................................११९

## अनुक्रमणिका

(प्रस्तुत ग्रंथाची दुखंडी योजना) ........ १२०
(पुढील अभ्यासाच्या दिशा) ........ १२०
ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण ........ १२२
ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण ........ १२२
प्रस्तुंत व्याकरणांतील प्रकरणें ........ १२२
प्रथमान्हिक ........ १२३
३. वर्णेतिहास ........ १२३
४. स्वर ........ १२३
५. व्यंजनें. ........ १२४
६. नामविभक्तिप्रत्ययेतिहास ........ १२७
७. पुल्लिंगी नामें ........ १२७
८. अकारान्त पुल्लिंगी नामांचें द्विवचन ........ १३७
अकारान्त पुल्लिंगी नामांचे अनेकवचन ........ १३८
तृतीयान्हिक ........ १४६
१०. अँकारान्त पुल्लिंगी नामें ........ १४६
११. आकारान्त पुल्लिंगी नामें ........ १४६
१२. इकारान्त पुल्लिंगी नामें ........ १४९
१३. ईकारान्त पुल्लिंगी नामें ........ १५१
१४. उकारान्त पुल्लिंगी नामें ........ १५२
१५. ऊकारान्त पुल्लिंगी नामें ........ १५२
१६. ऐकारान्त व औकारान्त व पुल्लिंगी नामें ........ १५३
चतुर्थान्हिक ........ १५४
१८. अकारान्त नपुसकलिंगी नामें ........ १५४
१९. ॅ ईकारान्त नपुंसकलिंगी नामें ........ १५४
२०. उकारान्त नपुंसकलिंगी नामें ........ १५५
२१. एँकारान्त नपुंसकलिंगी नामें ........ १५६
पंचमान्हिक ........ १५८

२२. आकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १५८
२३. इकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १५९
२४. ईकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १६०
२५. उकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १६१
२६. ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १६१
२७. एकारान्त व ऐकारान्त स्त्रीलिंगी शब्द ........ १६२
२८. (स्त्रीलिंगी नामांचे कांही विशिष्ट स्वरान्त) ........ १६२
२९. टीका (नामविभक्तिरूपांवरील) ........ १६४
षष्ठमान्हिक ........ १६६
३०. सर्वनामें: मी ........ १६६
३१. तूँ ........ १६७
३२. अ व इ ........ १६८
३३. ए ........ १६९
३४. त ........ १७२
३५. ज ........ १७३
३६. क (अपभ्रंश) ........ १७४
३७. कवण (अपभ्रंश) ........ १७४
३८. काह (अपभ्रंश) ........ १७४
३९. एक, इत्यादि ........ १७५
४०. एर, सर्व, सकल ........ १७५
४१. ऐस, कैस, जैस, तैस, इतक, इ. ........ १७६
४२. जेती, तेती, केती, एती ........ १७७
४३. संख्यावाचक ........ १७७
४४. क्रमवाचक ........ १८१
४५. अंशवाचक ........ १८१
४६. (१) (संकीर्ण संख्यावाचकें) ........ १८२
४७. आत्मन् ........ १८३

४८. विशेषणविशेष्यविभक्ति ........ १८४
४९. वचन ........ १८४
५०. सामान्यरूप (नामांचें) ........ १८५
५१. सर्वनामांचें सामान्यरूप ........ १८६
५२. अनेकवचनाचा अनुनासिक ........ १८७
५३. लिंग ........ १८७
सप्तमान्हिक ........ १८९
क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास ........ १८९
५४. कर्तरि स्वार्थे ........ १८९
५६. आज्ञायां लोट् ........ १९२
५७. अनद्यतनभूते लङ् (सेट् व अनिट्) ........ १९३
५८. लुङ् ........ १९४
५९. लिट् ........ १९५
६०. प्रायोभते निष्ठान्तप्रयोग एव प्राकृते दृश्यते ........ १९५
६१. अनद्यतनभविष्यति लुट् § ........ १९६
६२. भविष्यति लृट् (अनिट्) ........ १९६
६३. हेतुहेतुमद्भावे लृङ् ........ १९७
६४. आठ लकार ........ १९७
६५. कर्मणि व भावे : पहिला प्रकार ........ १९८
६६. कर्मणि व भावे : दुसरा प्रकार ........ २००
६७. णिच् प्रयोजनायां (सेट्) ........ २०३
६८. सन् प्रक्रिया ........ २०५
६९. यङ् प्रक्रिया ........ २०५
७०. नामधातू ........ २०५
अष्टमान्हिक ........ २०७
७१. कृदन्तें ........ २०७
७२. वर्तमान कृदन्तें ........ २०७

७३. भूत कृदन्तें ................ २०८
७४. सता तृतीया, सति सप्तमी व सते चतुर्थी ................ २१३
७५. कर्त्तरि क्तवतु ................ २१४
७६. भविष्य कृदन्तें : कर्तरि ................ २१५
७७. भविष्य कृदन्तें : कर्मणि व भावे ................ २१६
७८. अव्ययी कृदन्तें : भूतार्थी ................ २१८
७९. भविष्य अव्ययी कृदन्त ................ २२१
८०. संयुक्त क्रियापदें ................ २२१
८१. वर्तमान कृदन्ताचीं संयुक्त रूपें ................ २२३
८२. भूत व्ययी कृदन्ताचीं संयुक्त रूपें ................ २२६
८३. इतर सहायधातू ................ २२७
८४. कांहीं धातूंचीं एकटींदुकटीं रूपें ................ २२८
८५. अकरणरूप ................ २२९
८६. कांहीं मराठी धातू ................ २२९
८७. ज्ञानेश्वरीच्या आठव्या अध्यायांतील मराठी धातू ................ २३३
नवमान्हिक ................ २३७
८८. तद्धितप्रक्रिया ................ २३७
८९. स्वार्थे ल ................ २३९
९०. कृत्प्रत्यय ................ २४२
९२. पादपूरक निपात ................ २४३
९३. उद्‌गारवाची ................ २४३
९४. उभयान्वयी ................ २४५
९५. (आणखी कांहीं निपात) ................ २५१
९६. विशेषणविशेष्य ................ २५२
९७. संधि ................ २५२
९८. समास ................ २५३
९९. उपसर्ग ................ २५३

१००. प्रयोग ....................................................................................................२५४
(समारोप) .........................................................................................................२५७
विषयसूचि ....................................................................................................... २५८
शब्दसूचि............................................................................................................२७१

# ज्ञानेश्वरीची प्रस्तावना
# आणि
# ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण

अनुक्रमणिका

# संपादकीय प्रस्तावना

## राजवाडे–ज्ञानेश्वरी

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी त्यांना मराठवाड्यात बीड–पाटांगण येथे मिळालेली ज्ञानेश्वरीची पोथी तिला एक विस्तृत प्रस्तावना लिहून इ. स. १९०९ (शके १८३१) मध्ये प्रसिद्ध केली. त्याबरोबरच 'ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण' हा आपला प्रबंधही त्यांनी त्याच वर्षी प्रसिद्ध केला. राजवाड्यांची ही ज्ञानेश्वरीची 'प्रस्तावना' व तिचे 'व्याकरण' त्यांच्या बुद्धिमत्तेची व व्यासंगाची साक्ष देत असून मराठी भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाला त्यांचे वरील दोन्ही प्रबंध अमोल ठरले आहेत. ते प्रसिद्ध झाल्याला आता सत्तर वर्षे होत आली असून खुद्द राजवाड्यांना जाऊनही पन्नास वर्षे झाली आहेत. या कालावधीत मराठी भाषेचा अभ्यास पुष्कळच पुढे गेलेला असला तरी अजूनही राजवाड्यांची 'ज्ञानेश्वरीची प्रस्तावना' व त्यांचे 'व्याकरण' या जोडसाधनांचा उपयोग केल्यावाचून अभ्यासकाचे व संशोधकाचे पाऊल पुढे पडत नाही, इतके या दोन प्रबंधांचे महत्त्व आहे. आधुनिक भाषाभ्यासकांचा एक वर्ग राजवाड्यांच्या वरील कृतींकडे काहीशा उपेक्षेने पहात असतो हे खरे असले तरी ही परिस्थिती फार काळ टिकेल असे वाटत नाही. वर्णनात्मक (Descriptive) भाषाशास्त्राबरोबर ऐतिहासिक (Historical) भाषाशास्त्र म्हणून काही असते याची जाणीव जेव्हा आधुनिक अभ्यासकांना होईल– आणि ती हळूहळू होत आहे– तेव्हा या क्षेत्रात राजवाड्यांनी करून दाखविलेल्या कर्तृत्वाची यथार्थ कल्पना येऊन त्यांच्या ग्रंथाचे महत्त्व विद्वानांस अधिकाधिक पटत जाईल यात मुळीच शंका नाही. सध्या आपल्या या 'जुन्या ठेवण्या' वर काहीसे उपेक्षेचे सावट आले आहे, ही गोष्ट मात्र खरी. हे सावट दूर व्हावे व या प्रतिभावान् भाषाशास्त्रज्ञाचे तेज पुन्हा उठून दिसावे हा प्रस्तुत संपादनामागील एक हेतू आहे.

## अनुकूल–प्रतिकूल टीका

राजवाडे यांनी आपली 'ज्ञानेश्वरी' प्रसिद्ध केल्यानंतर तिच्यावर अनुकूल–प्रतिकूल टीका बरीच झाली. ती सर्वच येथे विचारात घेण्याचे कारण नसले तरी त्यांपैकी एकदोन नमुने पहाणे मनोरंजक ठरेल. अनुकूल टीकाकारांत 'लोकमान्य केसरीकार' (लो. टिळक?) होते. त्यांनी आपल्या अभिप्रायात या ग्रंथाचा 'अपूर्व व अमूल्य' या विशेषणांनी गौरव करून पुढे म्हटले होते :

"प्रस्तुतची ज्ञानेश्वरी म्हणजे खुद्द ज्ञानेश्वरांनी नेवाशास भाषेच्या ज्या स्वरूपात ती सांगितली त्याच स्वरूपात तंतोतंत छापलेला हा महाराष्ट्र वाङ्मयातील बहुमोल ग्रंथ होय. आधीच एकनाथी ज्ञानेश्वरीने ज्या महाराष्ट्रीय समाजास आज अनेक शतके आपल्या गुणांनी मोहित करून सोडले आहे, त्यांस खुद्द ज्ञानेश्वरांच्या तोंडची ज्ञानेश्वरी मिळणे म्हणजे अपूर्व लाभ होय यात शंका नाही. भगवद्‌गीतेवरील उत्कृष्ट मराठी टीका, वारकरी पंथाची जननी, मनोहर उपमादृष्टान्तांनी गजबजलेले उत्तम काव्य, आणि सहाशे वर्षांपूर्वीच्या नागर मराठीचा नमुना व मराठीत कागदावर लिहिलेला सर्वांत जुना उपलब्ध लेख, या सर्व दृष्टींनी ज्ञानेश्वरांच्याच अस्सल भाषेत छापलेला हा ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या आदरास, कौतुकास व आश्रयास पात्र होईल यात संदेह नाही." (केसरी, ता. २५-८-१९०८)

पण अनुकूल टीकेपेक्षा प्रतिकूल टीकेचे महत्त्व अधिक असते. ती करण्यात बडोद्याचे डॉ. विष्णू गोविंद चिपळोणकर प्रमुख होते. त्यांनी 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' या दोन वृत्तपत्रांतून अनेक लेख लिहून

अनुक्रमणिका

राजवाडी ज्ञानेश्वरीवर टीकेची झोड उठवली. या टीकेत युक्तिवादापेक्षा राळ उडवण्यावरच अधिक भर होता. या चिपळोकरी टीकेची थोडी कल्पना पुढील उताऱ्यावरून येईल. आपल्या पहिल्याच लेखात ते म्हणतात—

"भाषेच्या तंगड्या इतिहासाच्या गळ्यात व इतिहासाचे पाय व्याकरणाच्या गळ्यात, तसेच संस्कृत शब्दांस प्राकृत व्याकरणाचे नियम व प्राकृत-मराठी शब्दांस संस्कृत व्याकरणातील सूत्रे लावून, एखाद्या विषयाची चिवडाचिवड करून, चिंचेच्या पानावर देऊळ रचण्याची हातोटी म्हणा, कला म्हणा, जी. रा. राजवाडे यांस साधली आहे.…त्यांची ज्ञानेश्वरी ही या व्याकरणाची जननी असून हे व्याकरण म्हणजे तिचे एक शेंबडे, कुरूप पोर आहे. व या पोराच्या अंगास कोणा भटाभिक्षुकांनी अथवा ग्रामजोशी—कुळकर्ण्यांनी रचिलेल्या व पाथरवट—शिलाटांसारख्या 'अनाडी' कामकऱ्यांनी कोरिलेल्या एकदोन शिलालेखांतील दहापाच प्राचीन शब्दरूपी—अशुद्ध शब्दरूपी—चिंध्या चिकटवून व या चिंध्या अमुक प्रकारच्या कापडाच्या व तसे कापड अमुक प्रांतात तयार होत असे, असे म्हणून राजवाडे हे त्याच्या आईचे माहेर व आजोळ कोणते हे ठरवीत व ती कोणत्या साली कोणत्या नक्षत्रावर जन्मली ही माहिती सांगत आहेत."

या चिपळोणकरी टीकेत राजवाड्यांची प्रस्तावना व त्यांचे व्याकरण यातील विधानांचे तपशीलवार खंडन करण्याच्या प्रयत्न असला तरी टीकेची एकंदर पद्धती वरीलप्रमाणेच, म्हणजे पूर्वग्रहदूषित व उथळपणाची दिसते. त्या मानाने श्री. शंकर बळवंत सहस्रबुद्धे यांनी मॅन्चेस्टर येथून केलेली टीका [विविधज्ञानविस्तार, ४२-१ (जानेवारी १९११)] पुष्कळच समतोल आहे. ज्ञानेश्वरीच्या मुद्रित प्रतींमध्ये राजवाड्यांचीच प्रत सर्वांत प्राचीन आहे हे मान्य करून ती ज्ञानेश्वरकालीन आहे हा त्यांचा सिद्धान्त मात्र श्री. सहस्रबुद्ध्यांनी आपल्या समर्पक युक्तिवादाने खोडून काढला आहे. या कामी त्यांना श्री. माडगावकर यांना बीड—पाटांगण येथेच मिळालेल्या ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या प्रतीचा विशेष उपयोग झाला व या दोहींत तीच अधिक जुनी आणि विश्वसनीय होय हे सांगण्यासाठी त्यांनी उपर्युक्त लेख लिहिला.

याप्रमाणे राजवाड्यांच्या प्रतीवर उलटसुलट टीका बरीच झाली. तिला उत्तर देण्यासाठी म्हणून त्यांनी 'केसरी' त १९११ साली एक लेख लिहिला. त्याचा विचार पुढील परिच्छेदात केला आहे.

**'माझी ज्ञानेश्वरी व कित्येक शंकाकार'** [राजवाडे लेखसंग्रह, भाग ३ रा, लेख क्र. ४, पृ. २४-३६.]

प्रथम 'केसरी' त प्रसिद्ध झालेल्या या लेखात राजवाडे म्हणतात :—

"….सबंध ग्रंथ (ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरीचे व्याकरण) बाहेर पडून पंधरा महिने लोटले असतील नसतील. त्या अवधीत या ग्रंथावर कित्येकांनी शंका व आशंका यांचा इषद्वर्षाव केला. प्रथम डॉ. चिपळूणकर यांचे 'ज्ञानप्रकाशात'त व 'इंदुप्रकाशा'त पाच-पंचवीस लेख प्रसिद्ध झाले. नंतर केसरीत या ग्रंथाचे मार्मिक परीक्षण आले. त्यापुढे हरिभक्तपरायण साखरेबुवा यांनी आपल्या ज्ञानेश्वरीच्या आवृत्तीत काही शंका प्रदर्शित केल्या; आणि आता 'विविधज्ञानविस्तारा'च्या गेल्या जानेवारीच्या (१९११) अंकात मांचेस्टर येथे गेलेले रा. सहस्रबुद्धे यांची शंकापंचशती नुकतीच प्रकाशित झाली." (पृ. २४)

वरील सर्वच शंकाकारांविषयी राजवाड्यांच्या मनात एक प्रकारची उपेक्षाबुद्धी असल्याने ते त्यांच्या शंकांचे निरसन करण्याच्या भरीस विशेष पडले नाहीत. नाही म्हणावयास श्री. सहस्रबुद्धे यांनी उपस्थित

केलेल्या आक्षेपांना तेवढी त्यांनी उपर्युक्त लेखात थोडक्यात उत्तरे दिलेली आढळतात. पण ती देताना सुद्धा राजवाड्यांचा 'अहं' जागृत आहेच, असे त्यांच्या पुढील प्रस्तावनेवरून दिसते. ते म्हणतात,

"....राहता राहिले तिसरे शंकाकार रा. सहस्रबुद्धे. या गृहस्थांनी आपल्या शंका व्यवस्थित रीतीने मांडण्याचा आव घातला आहे, अद्वातद्वा वाचाटपणा केलेला नाही आणि नवीजुनी भाषा म्हणजे काय ते समजण्याची लायकी ह्यांच्यात येण्यासारखी आहे; सबब त्यांच्या शंकांचे परीक्षण करणे सोयीचे व श्रेयस्कर दिसते. वस्तुतः पाहाता ह्यांच्याही शंकांत म्हणण्यासारखा तथ्यांश नाही. ज्ञानेश्वरी भाषेचे व्याकरण ह्यांनाही बिलकूल कळलेले नाही. तेव्हा ह्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा खटाटोप न केला तर म्हणजे काही मोठी विपत्ति ओढवेल अशांतला प्रकार नाही. तथापि हे नवशिके आहेत, व्याकरणदृष्ट्या ज्ञानेश्वरीचा तौलनिक अभ्यास करावा अशी यांची प्रवृत्ति दिसते, आणि यांनी आपल्या शंका व्यवस्थित रीतीने व आटोपशीर मांडण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून.... सदर शंकांचे निरसन करण्यात मी आपला वेळ बऱ्याच नाखुषीने खर्च करतो." (पृ. २४-२५)

याप्रमाणे प्रस्तावना करून राजवाडे यांनी सहस्रबुद्धे यांच्या एकूण नऊ आक्षेपांना उत्तरे दिली आहेत. खरोखर पाहिले तर त्यांनी निरसन असे त्यांच्या तीनच शंकांचे केले आहे. पैकी एक व्याकरणदुष्ट प्रयोगविषयक, दुसरी समासदुष्ट प्रयोगविषयक व तिसरी छंदोदुष्ट प्रयोगविषयक आहे. परंतु या तांत्रिक बाबी आहेत. त्या व सोडल्या तर इतरत्रं त्यांचा केवळ वावदूकपणा दिसून येतो. उदाहरणार्थ, आक्षेपखंडन करीत असताना राजवाड्यांनी केलेली पुढील विधाने पहावी :—

(१)"अशी विपरीत परीक्षा साखरे व भिडे कशामुळे करतात? तर....ऐतिहासिक व्याकरण म्हणजे काय, निरुक्त कशाशीं तोंडीं लावतात व ज्ञानेश्वर कोणती भाषा बोलत असे या बाबींचे अज्ञान साखऱ्यादि मंडळीत पूर्णपणें बसत असल्यामुळें ही मंडळी गारगोटीला हिरा व हिऱ्याला गारगोटी म्हणून आपला गाजरपारखेपणा जगजाहीर करीत आहेत." (पृ. २७)

(२) "व्याकरणाचे, समासाचे व छंदाचे दुष्ट व गांवढळ प्रयोग प्राचीनत्वाचे निदर्शक असतात हा सिद्धान्त.... महाराष्ट्र वाङ्मयाला लागू पडणार नाही. का म्हणाल तर आपले हे महाराष्ट्र एक प्राचीन व फार उच्च कोटीला गेलेल्या अशा संस्कृतीचे व वाङ्मयाचे वंशज आहे. आपण वाङ्मयदृष्टीने सुधारलेल्या स्थितीतून सध्या रानटी स्थितीत येत आहो. ज्ञानेश्वर काही निग्रो, रेड इंडियन, नॉर्स नावाडी, किंवा ज्यूट आंग्ल नव्हता. त्याच्यापुढे वैदिक, संस्कृत, महाराष्ट्रीय, अपभ्रंश असे सारस्वत होते. व्यास, वाल्मिकी, कालिदास असे नामांकित कवि त्याने वाचलेले होते. अभिजात सारस्वत म्हणजे काय हे तो जाणत होता. छंदःशास्त्र तो पढला होता....तात्पर्य, दुष्टप्रयोगत्वात् प्राचीनत्व, हा सिद्धान्त ज्ञानेश्वराला लागू पडत नाही. कोणी कदाचित् लावण्यास गेलाच तर तो सहस्रबुद्धयांच्याप्रमाणे उपहासास नितान्त पात्र होईल." (पृ. ३३)

वरील उताऱ्यातील मतभेद व कल्पनाविलास ही बाजूस ठेवली तरी हे शंकानिरसन नव्हे हे स्पष्ट आहे. हाच प्रकार लेखभर दिसतो व त्यामुळे या लेखाचे स्वरूप बरेच गढूळ झाले आहे. त्यात मुख्य गोष्ट ही आहे की, इतरांच्या शंकांचे निरसन करण्याच्या प्रयत्नाच्या निमित्ताने राजवाड्यांनी त्यांना स्वतःलाच वाटत असलेल्या एका मूलभूत शंकेचे निरसन करण्याची संधी या लेखाने साधून घेतली आहे. ती शंका म्हणजे आपल्या ज्ञानेश्वरीस विद्वन्मान्यता व सांप्रदायिक मान्यता मिळेल की नाही, ही होय. याबाबत राजवाडे

अनुक्रमणिका

स्वतः फार साशंक होते व ही आपली व्यथा त्यांनी या लेखात बोलूनही दाखवली आहे. तेथे ते म्हणतात की आपली ज्ञानेश्वरी सर्वात जुनी आहे हे "सहस्रबुद्धे यांचे सार्वत्रिक आश्वासन एकट्यादुकट्या सहस्रबुद्धयांनाच तेवढे लागू पडते. मोठ्या दुःखाने सांगावे लागते की, (ते) इतरांना लागू पडत नाही. का की, साखरे, विष्णुबोवा जोग, पांगारकर वगैरे सांप्रदायिकांना सहस्रबुद्धे यांचे हे आश्वासन कबूल नाही. त्यांना सांप्रदायिक अशी जी एकनाथी संहिता ती तेवढी मान्य आहे; माझी संहिता मान्य नाही. ह्या अमान्यतेस्तव गेल्या वर्षी पंढरीस यात्रा जमली असता वरील त्रिमूर्तींनी तेथे जमलेल्या फडकऱ्यांस असा नामी उपदेश केला की, राजवाड्यांची संहिता संप्रदायबाह्य आहे, खोटी आहे, सबब ती कोणाही सांप्रदायिकानें घेऊ नये." (पृ. २६). म्हणून "माझी ज्ञानेश्वरीची प्रत जुनी आहे असे विधान करणारा रा. सहस्रबुद्धयांसारखा एकतरी मनुष्य वर्षसहा महिन्यांत पैदा झाला ही गोष्ट" राजवाड्यांना समाधानकारक वाटते, व त्यातच आपल्या पोथीतील पाठांशी व रूपांशी जुळेल अशी ज्ञानेश्वरीची आणखी एक प्रत माडगावकराना मिळाली या गोष्टीने त्यांचे वरील समाधान दुणावले आहे. ते व्यक्त करताना राजवाडे म्हणतात,

"....ज्ञानेश्वरीची खरी संहिता मी जेव्हां प्रसिद्ध केली, तेव्हां मला अशी भीती पडली कीं, माझी संहिता खरी मानण्याला प्रत्यंतर प्रमाण कसे सांपडेल? मला सांपडलेली पोथी एकच जर जगांत असेल व तिला दुसऱ्या कोणत्याही पोथीचा प्रत्यंतर पुरावा नसेल, तर सामान्य लोकांची व कदाचित् विद्वानांची खात्री करावी कशी? तत्कालीन व तत्पूर्व शिलालेख, ताम्रपट व त्रोटक लेख यांजवरून ज्ञानेश्वरी भाषा काय असावी तिचा अंदाजच मला चांगला झाला होता व विद्वानांनाही तो पुढेंमागें मान्य झाला असता. परंतु माझ्या पोथींतल्यासारखे पाठ, रूपें वगैरे जींत आहेत तशी पोथी दुसऱ्या कोणास सांपडली असतां, माझ्या संहितेची प्रस्थापना चांगली होईल, असें मला वारंवार वाटे. तो सुप्रसंग सध्या आलेला आहे. माझ्या पोथीसारखीच एक पोथी रा. माडगांवकरांना सांपडलेली आहे....मुख्य बाब जी सुप्तिङ्रूपांची ती माडगांवकरांच्या पोथींत बहुतेक माझ्या पोथींतल्यासारखीच आहे. त्यामुळें झाले काय कीं, माझी पोथी सर्व छापील पोथींहून....जुनी आहे, अशी साक्ष रा. सहस्रबुद्धयांना, म्हणजे रा. माडगांवकरांना मोकळ्या मनानें देतां आली. अशा तिऱ्हाईत साक्षीची वाट मी फार दिवस पहात बसलों होतों. ती माडगांवकरांनी रा. सहस्रबुद्धयांच्या द्वारां 'विविधज्ञानविस्तारां' तून दिली ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारीं आहें."(पृ. ३५-३६).

सारांश, प्रस्तुत लेखात राजवाड्यांनी आक्षेपकांच्या शंकांना समर्पक उत्तरे विशेष कोठे न देता, आपल्या ज्ञानेश्वरीची जुळी बहीण गवसल्यामुळे तिचे खरेपण सिद्ध झाल्याचा आपला आनंदच अधिक व्यक्त केलेला दिसतो, असे म्हणावे लागते.

**राजवाडे यांची ज्ञानेश्वरीची प्रस्तावना**

राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीला लिहिलेली प्रस्तावना मराठी भाषेच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची असून त्याशिवाय इतरही विषय तीत आले असल्याने तिचा आशय थोडक्यात समजून घेणे अवश्य आहे. सुमारे शंभर पृष्ठांची ही प्रस्तावना एकूण ७१ परिच्छेदांत विभागली असून या परिच्छेदांना क्रमांक दिलेले आहेत. यांपैकी काही परिच्छेदांतून एकाहून अधिक विषय आलेले असून त्यांचा तसा निर्देश पृष्ठाच्या डाव्या बाजूस ठळक अक्षरात केला आहे. मुळातील ही छपाईची योजना प्रस्तुत आवृत्तीत कायम ठेवली असून पुढील विवेचनात कंसातील आकडे परिच्छेदांचे आहेत.

अनुक्रमणिका

या 'प्रस्तावने'ला प्रारंभ व्याकरणाच्या व्याख्येने झाला असून व्याकरणाच्या निरनिराळ्या प्रकारांना कारणीभूत होणारे भाषेचे जे निरनिराळे भेद—प्रांतकृत, जातिकृत, लिंगकृत व कालकृत त्यांची चर्चा प्रारंभी केली आहे. (१). त्यानंतर प्रांतिक पोटभाषा व जातिपरत्वे होणारे मुख्य भाषेचे अपभ्रंश यांच्यातील फरक स्पष्ट केला असून मराठीचा किरिस्तानी अपभ्रंश व मानभावी अपभ्रंश यांची चर्चा केली आहे (२). यापुढील परिच्छेदात भाषेची कालकृत अवस्थान्तरे सांगितली असून (३), त्यानंतर नागर अथवा शिष्ट मराठीची व्याख्या केली आहे. "अपभ्रष्ट किंवा प्रांतिक जी नव्हे ती नागर किंवा मराठी समजावी;" ती कृत्रिम नाही, तर सहज व सर्वलोकप्रिय आहे आणि ऐतिहासिक व्याकरण असे तिचेच शक्य आहे इत्यादी (४-८). यानंतर वर्तमान शिष्ट मराठीचे साधे व्याकरण, पोटभाषांचे अथवा बोलींचे तौलनिक व्याकरण, आधुनिक सगोत्र समकालीन भाषांचे (म्ह. मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली, इ. चे) तौलनिक व्याकरण व मराठीचे ऐतिहासिक व्याकरण यांचे स्वरूप सांगून (९-१२), राजवाडे मराठी भाषेच्या इतिहासाकडे वळले आहेत. प्रथम त्यांनी वाङ्मय, सारस्वत व साहित्य यांमधील भेद स्पष्ट केला असून मराठी सारस्वताच्या शोधामुळे मराठी भाषेचा इतिहात व तिचे ऐतिहासिक व्याकरण लिहिणे शक्य झाले आहे असे सांगितले आहे. मात्र मराठी सारस्वताच्या शोधाप्रमाणे मराठी वाङ्मयाचा (म्ह. लोककथा, लोकगीते, इ.) शोध अद्याप मुळीच झालेला नसल्याने प्रांतिक अथवा अपभ्रष्ट मराठीचा इतिहास समजणे कठीण आहे असेही त्यांनी सूचित केले आहे (१३). यानंतर मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाची सामग्री किंवा साधने यादीच्या रूपाने दिली असून (१४), त्या आधारे मराठी भाषेचा मूलारंभ शके ४०० च्या सुमारास मानला आहे (१५-१६). यापुढील काही परिच्छेद पाली भाषेच्या विवेचनाला दिलेले असून त्यांत 'पाली' या शब्दाची व्युत्पत्ती, पाली भाषेची परंपरा व तिचा आणि संस्कृतचा संबंध, पालीचा मूळदेश, अशिष्ट पालीचा दुतोंडेपणा, युरोपियनांचे पालीवरील सहेतुक प्रेम इत्यादी विषय आले आहेत (१७). पालीनंतर राजवाडे प्राकृताकडे वळले असून प्राकृत भाषांचे उगम, त्यांचे पौर्वापर्यत्व, त्यांतील माहाराष्ट्रीचे स्थान व तिचे व्याकरणदृष्ट्या अग्रमान्यत्व इत्यादी विषय त्यांनी चर्चिले आहेत (१८-२३). महाराष्ट्रदेशाची वसाहत हा राजवाड्यांचा एक आवडता विषय असून त्याची चर्चा यापुढे आली आहे. प्रारंभीचे दंडकारण्य, त्यात पश्चिमेकडून कोकणात उतरलेल्या आर्यांचा झालेला प्रवेश, या उत्तरणात त्यांच्या भाषेवर झालेले परिणाम, वार्तिककार कात्यायनाच्या वेळेपासून आढळणारे माहाराष्ट्री भाषेचे नामोल्लेख, शातवाहनांच्या राजवटीतील व विशेषतः 'गाथासप्तशती' मधील माहाराष्ट्री, त्यांनी स्थापिलेला शकसंवत् व त्याचे अ—म्लेछत्व, 'शक' शब्दाचे दोन अर्थ, 'क्षत्रप' शब्दाचे संस्कृतत्व इत्यादी अनेक विषयांना या ठिकाणी स्पर्श झालेला दिसेल (२४-२९). शातवाहनांची राजवट शके १५० पर्यंत चालली व त्यांच्या पश्चात माहाराष्ट्री भाषेचाही पडित काळ आला. उत्तरोत्तर तिचा ऱ्हास होत जाऊन शके १५० ते शके ४५० यामधील तीनशे वर्षांच्या काळात तिचा जो एक अपभ्रंश महाराष्ट्रात नांदू लागला त्यातूनच पुढे मराठी भाषा जन्मली. मंगळवेढे येथील एका (बनावट व म्हणून त्याज्य) ताम्रपटाच्या आधारे राजवाड्यांनी शकवर्ष ४०० हा माहाराष्ट्री—अपभ्रंशाचा अंतकाल व मराठीचा जन्मकाल मानला आहे (३०-३४). यापुढील परिच्छेदात मराठी भाषा सुरू होई तावत्कालपर्यंत भाषांची परंपरा कोष्टकाच्या रूपाने दिली असून अनुषंगाने, कोणत्याही भाषेचा अपभ्रंश होतांना काय परिस्थिती असते या प्रश्नाचाही विचार केला आहे (३५). यानंतर मराठी भाषेच्या स्थित्यंतरांचे एक स्थूल टिपण दिले असून (३८-४१), मराठीच्या भावी अभ्यासाच्या दिशा दाखविल्या आहेत (४२).

राजवाड्यांच्या 'प्रस्तावने' चा मुख्य तात्त्विक भाग येथे संपला. यापुढील भागात त्यांनी प्रस्तुत छापलेल्या ज्ञानेश्वरीच्या मूळ पोथीचा इतिहास, स्वरूप व तपशील दिला असून तिची अपूर्वाई परोपरींनी गायिली आहे (४३-५०). त्यांच्या दृष्टीने ही 'अमूल्य' पोथी शक १२१२ ते १२४० च्या दरम्यान लिहिलेली असून तिची भाषा ही ज्ञानेश्वरांची निर्भेळ मराठी भाषा आहे (५१-५३). वरील मुकुंदराजी पोथीची

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरीच्या एकनाथी व एकनाथोत्तरकालीन प्रतींशी तुलना हा या 'प्रस्तावने'च्या उर्वरित भागाचा विषय असून ही तुलना करताना एकनाथी संशोधनाचे स्वरूप, कोणत्याही ग्रंथाच्या मूलस्वरूपसिद्धीची पद्धती, क्षेपक-विचार या सारखे काही विषय येऊन गेले आहेत (५४-६३). शेवटी, प्रस्तुत मुकुंदराजी प्रतीची माडगावकरी प्रतीतील काही पाठातरांशी पहिल्या अध्यायापुरती स—टीक तुलना करून (६४), व आठल्ये आणि भिडे यांची ज्ञानेश्वरीची भाषान्तरे कशी सदोष आहेत ते दाखवून (६५) हे तौलनिक विवेचन संपविले आहे. अखेरीस प्रस्तुत प्रतीतील मूळ गीताश्लोकांचे पाठ गीतेच्या प्रचलित पाठांहून कोठे कोठे भिन्न सापडतात त्यांची एक यादी देऊन व यांपैकी बहुतेक सर्व पाठभेद केवळ उच्चाराचे आहेत हे दाखवून (६७), आणि ज्ञानेश्वरीत फारसी शब्द नाहीत असा निर्वाळा देऊन (६८-६९) राजवाड्यांनी ही प्रदीर्घ प्रस्तावना आटोपती घेतली आहे.

## पूर्ववैदिक भाषा आणि मराठी

वरील प्रस्तावना बारकाईने वाचली असता असे दिसून येते की, राजवाड्यांनी आपल्या व्याकरणासाठी पाणिनीय व्याकरणाची चौकट घेतली असली तरी प्रत्यक्ष भाषेचा विचार करताना ते पाणिनीच्याही मागे जाऊ पहातात. 'ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावने'त त्यांनी भाषेच्या परंपरेचा जो तक्ता दिला आहे (परि.●३५) त्यावरून ते पाणिनिपूर्व आर्ष भाषा व त्यापूर्वीचीहि पूर्ववैदिक भाषा गृहीत धरून मराठीचा या पूर्ववैदिक भाषेशी सांधा जोडू पहातात असे दिसते. अर्थात् हा सांधा जोडताना त्यांनी प्राकृतिकोद्‌भव व प्रांतिक भाषांच्या मधल्या अवस्था लक्षात घेतलेल्या आहेत हे खरे; तथापि त्यांचे लक्ष्य पूर्ववैदिक भाषेवर, की जिची चाहूल पाणिनीय व्याकरणात किंवा ग्रांथिक संस्कृतात लागत नाही अशा एका प्राचीनतम लौकिक स्वरूपाच्या बोलीवर आहे यात शंका नाही. त्यांच्या मते "ग्रांथिक भाषा, प्रांतिक भाषा, जातिक किंवा गोत्रिक भाषा, व अपभ्रंश असा चतुर्विध भाषाभेद वैदिक काली होता" (परि.●१७), व ज्ञानेश्वरी—मराठीत या चारही भाषांचे दूरतः उमटलेले पडसाद ऐकू येतात. राजवाडे यांचे हे मत त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तुत प्रस्तावनेत व व्याकरणात तितके स्पष्टपणे मांडले गेलेले नसले तरी त्याची थोडीफार चाहूल येथे लागतेच. "प्राकृत भाषांचे प्रकृतिविकृतिभावाचे नाते लौकिक संस्कृताशी नसून संस्कृतच्या पूर्वरूपाशी आहे" या सिद्धान्ताचे प्रणयन त्यांच्या मते प्रथम राजारामशास्त्री भागवत यांनी 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' या आपल्या निबंधात केले (परि.●२७). त्या परंपरेने मागे जात जात राजवाडे मराठीचे सर्व 'प्रकृतिविकृतिभाव' या पूर्ववैदिक बोलीभाषेत शोधू पहातात. या दृष्टीने शशिसूर्या (ज्ञा. ७.३२, राजवाडे—पाठ), हातांपायां, दोनप्रहरां, यांसारख्या (त्यांच्या मते) द्विवचनाच्या आ किंवा आँ प्रत्ययाचा छडा लावताना 'पादयोः पतति' या शीर्षकाच्या आपल्या एका लेखात ते म्हणतात—[राजवाडे—लेखसंग्रह, भाग ३, पृ. २६१.]

"....त्याची परंपरा संस्कृताच्या पूर्वरूपाशीं, म्हणजे वैदिक भाषेशीं किंवा पूर्ववैदिक भाषेंशीं नेऊन भिडविली पाहिजे. पाणिनीय लौकिक संस्कृतांत 'आं' प्रत्ययाची परंपरा सांपडली तरी वाहवा, न सांपडली तरी वाहवा. कां कीं, मराठीचीं जुनाट मूळें वैदिक भाषेंत व पूर्ववैदिक भाषेंत जितकीं सांपडण्याचा संभव आहे तितकीं तीं लौकिक संस्कृतांत किंवा महाराष्ट्रीत सांपडण्याचा संभव नाहीं.... वैदिकी प्रक्रियेंत पाणिनि सामान्य प्रत्ययांखेरीज दुसरे कांही विभक्तिप्रत्यय देतो. या अवान्तर विभक्तिप्रत्ययांचा अर्थ असा कीं, छांदस भाषा एक नसून एकाहून जास्त होत्या, किंवा दोनचार प्रांतिक भाषांचा मिलाफ होऊन एक छांदस भाषा बनली होती. उदाहरणार्थ, पंथानः व पंथाः (प्रथमेचें अनेकवचन); व्योमन् व व्योमनि (सप्तमीचें एकवचन) इ. अशीं सामान्य प्रत्ययांहून निराळे प्रत्यय लागलेलीं रूपें वैदिक भाषेंत आढळून आल्याकारणाने पाणिनीला 'सुपां सुलुक्' इत्यादि सूत्र (७. १. ३९) रचावें लागलें." (पृ. २६१).

अनुक्रमणिका

**ज्ञानेश्वरीचा संस्कृत नवमाध्याय**

पण यापेक्षा राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे जे संस्कृत भाषान्तर केले त्याला त्यांनी लिहिलेल्या टीकेत वरील मत पदोपदी स्पष्ट होते. या दृष्टीने त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाला त्यांनी संस्कृतात प्रतिशब्दशः भाषान्तर केलेला हा नवमाध्याय पूरक व उपोद्बलक ठरतो. त्यातून त्यांच्या वरील मताला पोषक अशी काही उदाहरणे पुढे दिली आहेत :—

(१) 'जाल' या भूतकालवाचक धातुसाधिताचे निर्वचन करताना ते त्या ठिकाणी म्हणतात— "अस् चें वर्त. वाचक सात म्हणून होते. उदा., 'होत सात'. ह्या सात—चें अर्वाचीन रूप 'जात.' होत जात (तो—ती—तें). अस् चे भूत. वाचक 'अस्त' असें रूप पुरातन पूर्ववैदिक कालीं होतें. अर्वाचीन पूर्ववैदिक कालीं अस्त—चें स्त असे रूप झाले. नंतर वैदिक व पाणिनीय कालीं ते रूप शिष्ट भाषेंतून लोप पावलें. परंतु पाणिनीय व वैदिक कालीन प्रांतिक किंवा जातिक भाषांत स्त हें रूप विद्यमान होतें. त्या प्रांतिक, म्हणजे महाराष्ट्री व मराठी यांच्या पूर्वज संस्कृतकालीन भाषेंतील स्त-चें प्राकृतांत सत असे निष्ठारूप जालें. सत + ल = जअ + ल = जाल." (ज्ञानेश्वरी अ. ९ वा, ओ. ३३, पृ. २७-२८) वरील व्युत्पादन काल्पनिक व अवास्तव आहे, हे सांगणे नकोच.

(२) याप्रमाणेच 'परि भोगाचिये अइलीकडे मेरे' या चरणातील (ज्ञा. ९—५१) अइल या शब्दाविषयी ते लिहितात —"आर—आरात्, आरे. आर म्हणजे समीप (विशेषण). पाणिनीय संस्कृतात आरात् व आरे हीं दोनच रूपे ह्या शब्दाची उपलब्ध आहेत. ज्ञानेश्वर तर आर—पासून झालेला आयल (आर + ल = आयल) शब्द विशेषणासारखा योजतो. तेव्हा उघड आहे की, पूर्व—वैदिक भाषेंत आर शब्द विशेषणासारखा योजीत व त्याला सर्व विभक्तींचे विकरण होत असे. तें विकरण पाणिनीय संस्कृतांत लोपून हा शब्द अव्ययत्वाप्रत पावला. परंतु प्रांतिक भाषांत विकरणशीलच राहिला. आणि तसाच तो अपभ्रंशरूपाने ज्ञानेश्वरापर्यंत व आपल्यापर्यंत पोहोंचला" (ज्ञानेश्वरी, अ. ९ वा, ओ, ५१, पृ. ३७)

(३) 'नां' हा निषेधार्थक निपात (उदा., 'वरि विटे हिं नां' ज्ञा. ९. ५२). त्यांनी सं. नञ्—पासून व्युत्पादून हा 'नञ्' ग्रांथिक संस्कृतांत आढळत नसला तरी बोलण्याच्या संस्कृतात व प्रांतिक भाषांत नित्याच्या वापरात होता असे म्हटले आहे (ज्ञानेश्वरी, अ. ९ वा, ओ. ५२, पृ. ३८).

(४) 'केवि' हे अव्यय कद्वत्—पासून (जसे, जेवि< यद्वत्) व्युत्पादून राजवाडे म्हणतात, "कद्वत्—कसे—हा शब्द पाणिनीय संस्कृतांत नाही. पूर्ववैदिक भाषेंत व प्रांतिक भाषेंत होता. कत् या सर्व नामापासून कद्वत्. कत् हे सर्वनाम व अव्यय कच्चित् या अव्ययांत राहिलें आहे." (ज्ञानेश्वरी, अ. ९ वा, ओ. ५३, पृ. ३९)

(५) ज्ञानेश्वरीत 'वस्तु' हे नाम स्त्रीलिंगी आहे. (उदा; ज्ञा ९—५३). याविषयी राजवाडे म्हणतात— "वस्तु शब्द पाणिनीय संस्कृतात नपुंसकलिंगी आढळतो. परंतु छंदसि दिवस ह्या अर्थी स्त्रीलिंगी योजिलेला सांपडतो. तें च लिंग ज्ञानेश्वर व त्याचे वंशज आपण हि सहजच योजतो. ह्यावरून एवढें निश्चित आहे कीं पाणिनीय संस्कृताच्या परंपरेपेक्षा वैदिक भाषेची व प्रांतिक भाषेची परंपरा मराठीनें उचललेली दिसते." (ज्ञा. आ. ९ वा, ओ. ५३, पृ. ३९). हीच गोष्ट 'स्वप्न' या संस्कृतांत पुलिंगी व मराठींत नपुंसकलिंगी असलेल्या नामाची आहे असें ते सांगतात. (ज्ञा. ९—९३).

अनुक्रमणिका

(६) 'पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासिं चि त्वचेचिया पदरासि आड । परि तें अव्हेरूनि ते **मूड** । अशुद्ध काइ न घेति ॥' (ज्ञा. ९.५६) या ओवीतील स्थूलाक्षरांकित पाठ वास्तविक 'मूढ' असा असणार. यमकासाठी तो 'मूड' असा झाला. येथे मूढ म्हणजे गोचिड, हे स्पष्ट आहे; पण हा सरलार्थ न स्वीकारता राजवाडे 'मूत' (म्हणजे चिकटलेले, किडे, इ., अर्थात् गोचिड, माशा, वगैरे ) असा कोशात नसलेला पण त्यांच्या मते 'बोलत्या संस्कृतांत' असलेला शब्द व त्याचा वरील अर्थ ज्ञानेश्वरीच्या आधारे सुचवितात. अर्थात् ही सर्व कविकल्पना होय.

(७) आहाति (वर्त. तृ. पु. अ. व.) व असौनि (भूत कृदन्त) ही दोन रूपे त्यांनी अनुक्रमे असंति व असित्वा किंवा अस्त्वा या 'पूर्ववैदिक व प्रांतिक रूपां'च्या पासून निर्वचिली आहेत (ज्ञा. ९.५८, टीका पृ. ४२).

(८) 'तव' हे पंचमीचे शब्दयोगी अव्यय राजवाडे पूर्वी सं. स्तव (स्तु – स्तव् = प्रारंभ करणें) पासून व्युत्पादीत असत. परंतु आता त्यांना ते तात् या 'फक्त अव्ययात राहिलेल्या पंचमीच्या पूर्ववैदिक प्रत्ययापासून व्युत्पादिणे' अधिक युक्त दिसते. (ज्ञा. ९. २६८, टीका पृ. ११४).

(९) 'डावलणे' या क्रियापदाची व्युत्पत्ती 'डाव' या विशेषणापासून सरळ असताना राजवाडे त्याचा शोध पूर्ववैदिक व प्रांतिक भाषांत घेऊ पहातात. त्यांचे भाष्य असे :–– "दवय् = To Place at a distance. दीर्घ व दूर याबद्दल तर–तम–भावीं दवीयस् व दविष्ट शब्द येतात. ह्या दवीयस् व दविष्ट शब्दांत मूळ 'दव' शब्द आहें. तो मराठी डाव (वा-वी-वें) या शब्दाचा मूळ आहे यांत संशय नाहीं. शिष्ट संस्कृतांत 'दव' शब्द आतां व पाणिनीकाळीं हि नव्हता; परंतु पूर्ववैदिक व प्रांतिक भाषांत हा शब्द होता." (ज्ञा. ९·४३३; टीका पृ. १५८). राजवाडे यांचे वरील म्हणणे क्षणभर मान्य केले तरी 'डाव'चा संबंध दीर्घ व दूर या कल्पनांशी कसा पोचतो ते सांगणे कठिच आहे.

(१०) 'विणावणी' (ज्ञा. ९.१०५) या शब्दाचे व्युत्पादन त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे:–– "मराठींत ऊर्ण्चें जसें विण होतें, तसेंच पाणिनीय काळीं प्रांतिक संस्कृतांत ऊर्ण् चें विर्ण् होत असे, व त्या विण् पासून वेणि–णी हा शब्द झालेला आहे. वे, वी, ऊय् ह्या धातूंपासून मराठींत ओवणें, वोवणें हा धातु झाला आहे, व ऊर्ण् या धातूपासून विणणें हा धातु झाला आहे." (टीका, पृ. ६३)

राजवाड्यांच्या निर्वचनाच्या वरील उदाहरणांतून त्यांच्या कल्पनाशक्तीचा प्रत्यय आला तरी ही कल्पनाशक्ती पुष्कळदा वास्तवाला सोडून स्वैर भराऱ्या मारण्यात आनंद मानते हेहि दिसून येते. त्यांनी आपल्या मनाशी एक पूर्ववैदिक भाषा कल्पिली व तिचा धागा ते ज्ञानेश्वरीच्या मराठीत शोधू लागले. या धाग्याला पाणिनीच्या व्याकरणात व ग्रांथिक संस्कृतात आधार नाहीं हे त्यांना ठाऊक होते व म्हणूनच त्यात नसला तरी कोशनिविष्ट व ग्रंथनिविष्ट न झालेल्या 'बोलत्या संस्कृतात' तो आहे अशी कल्पना करून त्यांनी हे सर्व व्युत्पादन केले व मराठीची परंपरा थेट पूर्ववैदिक भाषेपर्यंत नेऊन भिडवली. यात कल्पनेबरोबर एक प्रकारचा दुरभिमानहि आला व त्यामुळेच त्यांचे वरील मत विद्वन्मान्य होणे कठिण झाले. [यातच भर राजवाड्यांच्या 'हठात् व्युत्पादना'ची पडली. उदा; आरोगणें–णा हे शब्द एकदा सं. अ–रोगणम्–पासून (ज्ञा. ९·१०२), तर एकदा सं. आरोचनम्–पासून (ज्ञा. ९·३८२) व्युत्पादून या शब्दाचा 'भक्षणे' असा 'काही तरी' अर्थ अलीकडील लोक करतात अशी त्यांनी टीका केली. पण हाच अर्थ बरोबर आहे याची साक्ष महानुभावीय ग्रंथांतून पदोपदी मिळते.]

अनुक्रमणिका

**मराठी भाषेचा जन्मकाळ**

ज्ञानेश्वरीच्या आपल्या 'प्रस्तावनें' त 'शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या रचनेची सामग्री' या मथळ्याखाली राजवाड्यांनी प्राचीन लेखांची जी यादी परि. ●१४ वर दिली आहे त्या यादीच्या अग्रभागी शक ४१० तील मंगळवेढे—ताम्रपट व शक ६५८ तील चिकुर्डे—ताम्रपट हे दोन लेख आहेत. त्यांपैकी पहिल्या, म्हणजे मंगळवेढे—ताम्रपटाच्या आधारे, त्यांनी शक ४०० (सुमारे) हा मराठी भाषेचा जन्मकाळ म्हणून निश्चित केला आहे व त्याप्रमाणे या ताम्रपटाचा आणि त्यावरून सिद्ध होणाऱ्या मराठीच्या जन्मकाळाचा उल्लेख ते आपल्या 'प्रस्तावनें' त वारंवार करतात. परंतु वरील दोन्ही ताम्रपट आज उपलब्ध नसून शिवाय ते संपूर्णतः बनावट आहेत हे आता बहुतेक सर्वांना मान्य आहे. त्यांतील भाषेचे नवीन वळण डॉ. गुणे [मराठी भाषेचा कालनिर्णय (भा. इ. सं. मं. षष्ठसंमेलनवृत्त, पृ. २८—४०).] यांनी निर्विवादपणे सिद्ध केले असल्याने हे लेख भाषेचा जन्मकाळ ठरविण्याच्या दृष्टीने प्रमाण मानता येत नाहीत. त्यामुळे प्राकृताचा अपभ्रंश शके ४५० पर्यंत चालून पुढे नष्ट झाला आणि त्याच सुमारास मराठी भाषा उदय पावली हे राजवाड्यांचे मतही निराधार ठरते. आज तरी वस्तुस्थिती अशी आहे, की मराठीचा जन्मकाळ इसवीसनाच्या आठव्या शतकामागे नेता येत नाही. 'मरहट्टे', म्हणजे मराठे, व त्यांची भाषा यांचा पहिला उल्लेख आठव्या शतकाच्या अखेरीस उद्योतन सूरीने लिहिलेल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात सापडतो, [पाटण येथील शक ११२८ चा मराठी शिलालेख, (प्रभात १.५)] हे प्रसिद्ध आहे. त्यात मरहट्ट्यांचे वर्णन "दिण्णले गहिल्ले उल्लविरे", म्हणजे 'दिण्णले गहिल्ले' अशी भाषा बोलणारे असे केले आहे. हा मराठी भाषिकांचा व त्यांच्या भाषेचा प्राचीनतम उल्लेख होय, आणि तो आठव्या शतकाच्या अखेरचा आहे. राजवाड्यांनी विक्रमादित्य सत्याश्रयाच्या ज्या ताम्रपटाचा उल्लेख केला आहे *[पाटण येथील शक ११२८ चा मराठी शिलालेख, (प्रभात १·५)] तो ताम्रपट [Indian Antiquary, Vol. VI, p. 77.] सुद्धा शक ६०२ चा, म्हणजे इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या अखेरचा आहे. त्यात 'पन्नास' हे शुद्ध मराठी वळणाचे संख्याविशेषण आले आहे. सारांश, मराठी भाषेचा उगमकाल जास्तीत जास्त सातव्या शतकापर्यंत मागे नेता येईल. तो त्याच्याहि मागे नेण्यास आधार नाही. राजवाड्यांनी सुद्धा तो पाचव्या शतकापर्यंत मागे नेण्याचा प्रयत्न केला याचे कारण त्यांनी शक ४५० हा अपभ्रंशाचा अंतकाल मानला हे होय. त्यामुळे त्यांना मराठीचा जन्मकाळ मागे ओढणे क्रमप्राप्त झाले. तसा तो ओढूनसुद्धा थोडी पोकळी राहिलीच. ती मग त्यांना "पूर्वभाषा असतानाच उत्तरभाषा अपभ्रंश म्हणून सुरू होते" असा न्याय सांगून त्यानुसार "महाराष्ट्री—अपभ्रंश चालूं असतांच मराठी सुरू झाली व तो मेल्यावर त्याची जागा मराठीने व्यापिली" असे म्हणून भरावी लागली (ज्ञा. प्रस्तावना, पृ. ५८). एकूण, थोडा कच्चा आधार आणि थोडा दुराग्रह यांचा मिलाफ होऊन त्यामुळे मुख्य सिद्धान्त खचला. परंतु त्यामुळे या एकूण विवेचनास विशेष बाध येत नाही. असो. ज्ञानेश्वरीच्या 'प्रस्तावने' चा इतका विचार करून आपण तिच्या व्याकरणाकडे वळू.

**आद्य मराठी ऐतिहासिक व्याकरणकार**

मराठी भाषेचे 'पंचवार्तिक' या नावाचे पहिले व्याकरण महानुभाव पंथातील पं. भीष्माचार्य यांनी इसवी सनाच्या चौदाव्या शतकात रचिले. मराठीच्या एका बोलीचे, गोमंतकाचे, फा. स्टीफन्स यांनी लिहिलेले व त्यांच्यानंतर आणखी काही पाद्री मंडळींनी त्यात भर घालून वाढविलेले 'Arte da Lingua Canarim' हे व्याकरण इ. स. १६४० मध्ये प्रसिद्ध झाले. आणि मराठी भाषेचे पाणिनी म्हणून ज्यांचा गौरव होतो त्या दादोबांनी आपले मराठी व्याकरण इ. स. १८३६ मध्ये रचून पूर्ण केले. मराठी भाषेची वरील तीन व्याकरणे व्याकरणाच्या त्या त्या क्षेत्रात पहिली आहेत यात काही शंका नाही. पं. भीष्माचार्यांचे तात्त्विक म्हणून, फा. स्टीफन्स यांचे प्रादेशिक बोलीचे म्हणून, व दादोबांचे वर्णनात्मक म्हणून या तीन व्याकरणांना

अनुक्रमणिका

पहिलेपणाचा मान मिळतो हे साहजिकच आहे. हा मान मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या शाखेत इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्याकडे जातो. त्यांचे 'ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचे व्याकरण' हे मराठी भाषेचे ऐतिहासिक पद्धतीने रचिलेले पहिले व्याकरण असून ते त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीबरोबरच शके १८३१ (इ. स. १९०९) मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच्या प्रारंभी 'प्रकाशकाची सूचना' या मथळ्याखाली जो दीडपानी मजकूर आहे त्यात म्हटले आहे की, "प्रस्तुत व्याकरण ज्ञानेश्वरीचा व्याकरणशुद्ध अर्थ करण्याचे एक साधन होईल. कित्येक लोक (ज्ञानेश्वरीचा) सध्या जो अर्थ करीत असतात तो कसा अशुद्ध असतो, हे या व्याकरणाचे साहाय्याने स्पष्ट होणार आहे." (पृ. १) वरील अपेक्षा किती प्रमाणात सफल झाली ते सांगणे कठिण असले तरी इतके खरे की हे व्याकरण म्हणजे राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीविषयक व्यासंगाचे व संशोधनाचे एक परिपक्व फळ असून वरील 'सूचने'च्या शेवटी म्हटल्याप्रमाणे ते "भाविक व शास्त्रप्रवण महाराष्ट्रास अर्पण" करून त्यांनी एक महत्कार्य साधले. चिं. वि. वैद्य आपल्या परीक्षणाच्या प्रारंभीच म्हणतात त्याप्रमाणे, राजवाडे यांचे हे व्याकरण "मराठी भाषेच्या वाङ्मयाच्या (?) इतिहासांत एक क्रांतिकारक व अत्यंत महत्त्वाचें केंद्रस्थान होईल, असें म्हणावयास हरकत नाहीं." [चिं. वि. वैद्य यांचे "निबंध आणि भाषणें", पृ. ९७.]

## पूर्वप्रयत्न

अशा प्रकारचा प्रयत्न यापूर्वी बीम्स व होर्न्ले यांनी काही प्रमाणात केला होता असे सांगून राजवाडे यांनी आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत त्या दोघांवरही काहीशी कडक टीका केली आहे. तेथे ते म्हणतात :

"बीम्स [A Comparative Grammar of the Modern Aryan Languages of India, Vols. I, II and III.] व होर्न्ले [A Grammar of Gaudian Languages, 1880.] ह्यांनीं आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें तौलानिक व्याकरण लिहिताना ऐतिहासिक व्याकरणाच्या प्रांतांतही अतिक्रमण करण्याचा आव घातलेला आहे. म्हणजे ह्या दोघां वैय्याकरणांनीं रचलेलीं व्याकरणें तौलनिक व ऐतिहासिक अशीं मिश्र आहेत. तौलनिक व्याकरण व ऐतिहासिक व्याकरण असा दिक्कालावछिन्न द्विधाभेद त्यांच्या ध्यानांत आलेला नाहीं, हें खरें आहे. परंतु त्यांच्या हातून असा मिश्र प्रकार झालेला आहे, हें सहज ओळखतां येतें. बीम्स व होर्न्ले ह्यांचा मुख्य गुरु जो बॉप्प त्यानेंहि आपल्या व्याकरणाला तौलनिक म्हटलें आहे....मराठी, बंगाली, हिंदी, आवढी, पंजाबी, सिंधी, गुजराथी वगैरे भाषांतील पुराणग्रंथसंग्रह त्यांच्या कालीं अनुपलब्ध असल्यामुळें, बीम्स व होर्न्ले ह्यांच्या व्युत्पत्तीचा भाग बराच अपुरा व काल्पनिक राहिलेला आहे. आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें मूळ ज्या प्राकृत भाषा त्यांची भेट मंडुकप्लुतीनें घेण्याशिवाय दुसरें गत्यंतर ह्या दोन्ही वैय्याकरणांना राहिलें नाहीं. मराठींतील एखाद्या आधुनिक शब्दाची किंवा प्रत्ययाची पूर्वपरंपरा पहाण्याची इच्छा झाल्यास, त्यांना एकदम प्राकृताच्या घाटावर जावें लागतें, मध्यें विसावा घेण्यास जागा सांपडत नाहीं. म्हणजे महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अपभ्रंश वगैरे प्राकृत भाषा व मराठी, बंगाली वगैरे प्राकृतिकोद्भव भाषा ह्यांची वस्तुतः ते तुलना करीत असतात. प्राकृत भाषांचा अंत व सध्यांचा काल ह्या दोहोंमधील हजार-बाराशें वर्षांत रूपांची कशी घडामोड झाली, हें त्यांना माहीत नसतें. त्यामुळें, संशयस्थानीं अशी व्युत्पत्ति असेल किंवा असावी, असें संशयित समाधान करून घेतल्याशिवाय त्यांना दुसरी तोड राहिली नाहीं." (ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, पृ. १२).

राजवाडे यांची वरील टीका सर्वच समर्थनीय आहे असे नाही. कारण बीम्स व होर्न्ले यांच्या व्युत्पादनात कल्पनेचा अंश बराच आहे हे मान्य करूनसुद्धा त्यांना ऐतिहासिक दृष्टिच नव्हती असें म्हणतां येत नाही. शिवाय राजवाडे यांनी त्या दोघांविरुद्ध घेतलेला जो मुख्य आक्षेप की ते प्राकृतावरून थेट मराठीवर उतरतात, त्यामधील भाषेच्या अवस्था लक्षात घेत नाहीत, तोच आक्षेप थोड्या अधिकच प्रमाणात

राजवाड्यांच्यावरही घेता येईल; कारण राजवाडे तर कित्येकदा मधली प्राकृताचीही पायरी गाळून संस्कृतावरून थेट मराठीवर येतात. परंतु समग्र मराठी भाषेचे नसले तरी तिच्या प्रारंभीच्या अवस्थेचे विश्वसनीय साधनांच्या आधारे ऐतिहासिक व्याकरण रचण्याचा मान राजवाड्यांकडे जातो हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल.

महाराष्ट्रातील विद्वानांनी केलेल्या अशा प्रकारच्या प्रयत्नांत त्यांनी कृष्णशास्त्री गोडबोले व डॉ. भांडारकर या दोघांचा निर्देश केला असून तोहि सौम्यपणाने केला आहे. पैकी कृष्णशास्त्र्यांचा प्रयत्न, राजवाड्यांच्या मते, प्राचीन ग्रंथसंग्रहाच्या अभावी लंगडा पडलेला असून डॉक्टर भांडारकरांनी बीम्स वगैरेंच्या काही क्लृप्त्या नामी खोडल्या असल्या तरी त्यांनी स्वतंत्र 'ऐतिहासिक' व्याकरण रचण्याचा आव घातलेला नसल्यामुळे त्यांची विद्वत्ताप्रचुर व्याख्याने राजवाड्यांच्या दृष्टीने टीकेचा विषय होऊ शकत नाहीत. याप्रमाणे या क्षेत्रातील पूर्वप्रयत्नांचा धावता आढावा घेऊन ते म्हणतात,

"तात्पर्य, सांगण्याचा मुद्दा एवढाच की, मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण अद्याप रचावयाचे आहे" (ज्ञा. .ची प्रस्तावना, परि.●१२)

## राजवाडे–कृत व्याकरणाची पार्श्वभूमिका

प्राचीन मराठीचा विचार राजवाडे यांच्या मनात अनेक वर्षे घोळत होता व त्याविषयी ते अधूनमधून टिपणवजा लेख लिहीतही होते. पण त्याला खरी चालना त्यांच्या हाती ज्ञानेश्वरीची मुकुंदराजी प्रत आली तेव्हा मिळाली. या प्रतीच्या अभ्यासाचे फलित म्हणजेच त्यांचे 'ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण.' त्याचा इतिहास सांगताना 'सुबन्तविचार' या निबंधाच्या समारोपात ते म्हणतात—

"गेलीं वीस वर्षे मराठी भाषेचे उगम मी शोधीत आहें. जसजसे जुने लेख सांपडत गेले तसतसे त्या लेखांतील भाषेचें पृथःकरण मी करीत असें. [(उदा., "पाटण येथील शक ११२८ तला मराठी शिलालेख." प्रभात, वर्ष १, अं. ५).] कांहीं वर्षे लोटल्यावर असे आढळून आलें कीं वर्तमान मराठींतील बरींच रूपें जुन्या मराठींतून निघालेलीं आहेत. इतक्यांत मुकुंदराजी ज्ञानेश्वरीचा मला शोध लागला. त्या ज्ञानेश्वरींतील भाषेचा व इतर त्या कालीं सांपडलेल्या जुन्या लेखांचा अभ्यास करतां असें आढळून आलें कीं वर्तमान मराठी भाषा ज्ञानेश्वरी मराठी भाषेपासून सर्वस्वी निघालेली आहे. त्यावरून असा एक कामचलाऊ सिद्धान्त बांधला कीं वर्तमान मराठी भाषा तत्पूर्वकालीन ज्ञानेश्वरी मराठी, अपभ्रंश, महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक ह्या भाषांपासून परंपरेने निघालेली आहे. नंतर ह्या कामचलाऊ सिद्धान्ताची परीक्षा करूं लागलों. ही परीक्षा करतांना पिशेल ह्या जर्मन गृहस्थाच्या प्राकृत व्याकरणाचा [Grammatik der Prakrit Sprachen, इ. स. १९००.] मला बराच उपयोग झाला. ह्या गृहस्थानें त्याच्या वाचनांत आलेलीं एकोन एक प्राकृत रूपें सशास्त्र पद्धतीनें एका ठिकाणीं संकलित केलीं आहेत. ह्या ग्रंथांत दोन ठिकाणीं मला दोष दिसून आला... ... बाकी ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण लिहितांना, पिशेलच्या ग्रंथाचा मला चांगला उपयोग झाला.... जर पिशेलचा ग्रंथ उपलब्ध नसता, तर वररुचि, कात्यायन, हेमचंद्र वगैरे प्राकृत वैयाकरणांच्या ग्रंथांचें व इतर उपलब्ध प्राकृत ग्रंथांचें व शिलालेखांचें पृथक्करण व संकलन करून पिशेलचेंच काम मला करावें लागतें. असा प्रयत्न करण्याचा प्रारंभहि मी केला होता. इतक्यांत पिशेलचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथावरून जुन्या मराठीची आणि अपभ्रंश व महाराष्ट्री यांची सांगड उत्तमोत्तम लागते, असें दिसून आलें. तथापि ज्ञानेश्वरी मराठी भाषेचें व्याकरण लिहिल्यावर मला असें आढळून येऊ लागलें कीं केवळ पिशेलने दिलेल्या अपभ्रंशांतील व

अनुक्रमणिका

महाराष्ट्र्यादि प्राकृत भाषांतील रूपांवरून मराठींतील सर्व रूपांची सांगड लागत नाहीं. तेव्हां, वर्तमान मराठी रूपांची व जुन्या मराठी रूपांची तुलना मी पाणिनीय संस्कृताशीं करून काय निष्पन्न होतें तें पाहूं लागलों. तें पाहतांना असे प्रत्ययास आलें कीं मराठींतील एकोनएक लहान व मोठ्या लकबा भगवान पाणिनीच्या अष्टाध्यायींत नमूद आहेत, व पिशेलचें प्राकृत व्याकरण अनेक बाजूंनीं दोषग्रस्त आहे. पिशेलनें प्राकृत रूपें एका ठिकाणी संकलित केली; परंतु पाणिनीय शास्त्र त्याला अवगत नसल्यामुळें, त्याच्या हातून प्राकृत रूपांचें वर्गीकरण यथास्थित झालें नाहीं....ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण लिहितांना मीं फक्त प्राकृत भाषांच्याकडे लक्ष दिलें. त्यानें एवढेंच झालें कीं मराठी व्याकरणांतील अत्यंत स्थूल अशा शेंकडों बाबींचे उगम कळले. परंतु शेंकडों स्थूल व सूक्ष्म बाबी तशा च अशोधित राहिल्या. त्यांचे उगम पाणिनीय शास्त्राच्या साहाय्याने प्रस्तुत प्रबंधांत शोधून काढून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.” (पृ. ८६–८७)

वरील प्रदीर्घ उतारा राजवाडे यांनी दामल्यांच्या ‘शास्त्रीय मराठी व्याकरण’ या ग्रंथावर केलेल्या संशोधनात्मक टीकेतून उद्धृत केला आहे. त्यांच्या मनांतून हे विवेचन एकदा करावयाचेच होते. ते करण्यास दामल्यांचे व्याकरण निमित्तमात्र झाले, इतकेच. राजवाडे यांच्या वरील निवेदनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण सिद्ध करताना त्यांची दृष्टी पाणिनीपर्यंत पोचलेली नसून अजून ती प्राकृतापर्यंतच मर्यादित होती. पुढे दामल्यांच्या व्याकरणाचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने वर्तमान व प्राचीन मराठी रूपांची तुलना पाणिनीय संस्कृताशी करताना मराठीतील प्रत्येक बाबीचा धागा पाणिनीपर्यंत जाऊन पोचतो हे ध्यानात आल्यावर त्यांनी “मराठीतील एकोनएक लकबा भगवान पाणिनीच्या अष्टाध्यायींत नमूद आहेत” हा आपला आवडता सिद्धान्त बांधला.

**ऐतिहासिक व्युत्पत्तिकार**

राजवाडे यांची वरील भूमिका लक्षात घेता त्यांना, त्यांच्याच भाषेत बोलावयाचे तर, ऐतिहासिक व्युत्पत्तिकार म्हणता येईल. ऐतिहासिक व्युत्पत्ती आणि काल्पनिक व्युत्पत्ती यांमधील फरक स्पष्ट करताना एका ठिकाणी ते म्हणतात :

“ऐतिहासिक व्युत्पत्तीची गति भूतावरून वर्तमानावर अनुलोम असते. यास्काच्या निरुक्तातील काल्पनिक व्युत्पत्तीप्रमाणे वर्तमानावरून भूतावर, अशी असेल, अशीहि असेल व अशीदेखील असेल, अशा प्रकारची धरसोडीची, प्रतिलोम, अनिश्चित व अकिंचित्कर नसते.... यास्काच्या कालीं वेदभाषा (व) पूर्ववैदिक भाषा....यांचा मागमूसही राहिला नव्हता. तेव्हा वैदिक शब्दांची अनुलोम व निश्चित व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास देण्याला यास्काचार्यांना साधनच नव्हते. अशा कचाट्यात व्युत्पत्ति करण्याचे काम यास्काला करावयाचे असल्यामुळे एका च शब्दाच्या दहा दहा प्रतिलोम व्युत्पत्त्या करून असमाहित समाधान मानून स्वस्थ बसणे त्याला अपरिहार्य झाले, किंवा असाहि विकल्प करता येईल की, ज्या पूर्ववैदिक भाषेपासून वैदिकभाषा निघाली तीतून वैदिक शब्दांची व्युत्पत्ति लावण्याचे साधे व सरळ कृत्य यास्काला इतिहासपद्धतीच्या अज्ञानास्तव माहीत नव्हते. काहीहि असो, मराठी व्युत्पत्तिकाराला ही यास्कीय दुरवस्था ग्राशीत नाही. कारण मऱ्हाठीच्या पूर्वीच्या अपभ्रंश व महाराष्ट्री या दोन भाषा मराठी व्युत्पत्तिकाराला ऊर्फ शब्देतिहासकाराला ऊर्फ भाषेतिहासकाराला साहाय्य करण्यास अद्यापहि अवशिष्ट आहेत. शिवाय संस्कृत व वैदिक या सख्ख्या किंवा चुलत भाषाहि उपलब्ध आहेत. सबब प्रतिलोम अनिश्चित व्युत्पत्ति करण्याचे संकट मराठी भाषेच्या व्युत्पत्तिकारावर कोसळण्याचा संभवसुद्धा नाही. सुदैवानें ह्या बाबतीत यास्कापेक्षा मराठी भाषेच्या इतिहासकाराचा रस्ता सरळ आहे.... तत्रापि दुसऱ्या एका बाबीत मराठी निरुक्तकाराचा

रस्ता अडचणींच्या घोर व निबिड अरण्यातून जातो. पूर्ववैदिक वाङ्मय बिलकुल नसल्यामुळे यास्काला ग्रंथवाचनाचे व वैदिक शब्दांचे पूर्ववैदिक पूर्वशब्द धुंडण्याचे श्रम नव्हते. मराठी निरुक्तकाराला महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक ह्या तीन-चार भाषांतील अफाट वाङ्मयाच्या निबिड अरण्यांतील कोणत्या महाराष्ट्री, संस्कृत किंवा वैदिक झुडुपापासून आपल्याजवळील कोणत्या मराठी धलप्या कातलेल्या आहेत याचा बिनचूक पत्ता लावावयाचा असतो. भलती धलपी भलत्याच झाडाची असावी, किंवा एकच धलपी अनेक झाडांची असावी, किंवा अनेक धलप्या एकच झाडाच्या असाव्यात, अशी त्रिविध शंका मराठी निरुक्तकाराला गांगरवून सोडते. यास्काप्रमाणे असेहि असेल, तसेहि असेल, असे धरसोडीचे उत्तर देऊन भागत नाही. उत्तर निश्चित हवे असते, कारण ते शक्य आहे हे माहीत असते.… तात्पर्य, मराठी निरुक्ति यास्कीय निरुक्तीसारखी स्याद्वादी नाही, अद्वैतवादी आहे.” (राजवाडे लेखसंग्रह, पृ. ९७-१००).

याच लेखात पुढे पाणिनीनेही कालाकडे म्हणजे इतिहासाकडे दुर्लक्ष केले होते, किंबहुना ‘ऐतिहासिक दृष्टीला त्याने मुद्दाम मारून टाकिली होती’ अशी विधाने राजवाड्यांनी केली आहेत. आता यास्काचे व्युत्पादन अनुलोम पद्धतीचे नसून प्रतिलोम पद्धतीचे आहे व यास्क काय किंवा पाणिनी काय, या दोघांनाही ऐतिहासिक दृष्टी नव्हती किंवा असली तरी त्यांनी तिचा उपयोग केला नाही, हे राजवाड्यांचे म्हणणे जरी विवाद्य असले तरी त्यांना स्वतःला ती दृष्टी होती व तिचा त्यांनी सर्वत्र अवलंब केला यात मात्र शंका नाही. किंबहुना यास्क व पाणिनी यांच्याहून स्वतःचे निराळेपण (आणि मोठेपणही) दाखविण्याच्या हेतूने राजवाडे वरील विवेचन करीत आहेत असे वाटते.

### भाषेची कालकृत अवस्थान्तरे व ऐतिहासिक व्याकरण

भाषेची कालकृत अवस्थान्तरे कशी होतात ते सांगताना राजवाडे म्हणतात—

“जातिपरत्वानें भाषेंत अपभ्रंश उत्पन्न होतो आणि प्रांतपरत्वानें प्रांतिक भाषाभेद झालेले असतात. परंतु कालाचा भाषेवर जो संस्कार किंवा विकार होतो त्यानें अपभ्रंश किंवा भाषाभेद यांतून एकहि कार्य होत नाहीं. कालपरत्वें भाषेला वृद्धत्व, तारुण्य, बाल्य अशा भिन्न अवस्था येतात; परंतु तिचें स्वत्व कांहीं नाहींसें होत नाहीं. भाषा तीच; अवस्थान्तरें मात्र, निरनिराळीं. शक ९०५ तील चामुंडरायाची [श्रवणबेळगोळ शिलालेख. (हा लेख शके ९०५ चा नसून त्यानंतर सुमारे सवाशे वर्षांनी कोरलेला असावा असे डॉ. हुल्ट्झ इ. चे मत आहे.)] मराठी भाषा, शक १०५१ तील सोमेश्वराची [‘अभिलषितार्थचिंतामणि’ किंवा ‘मानसोल्लास’ ग्रंथातील मराठी पदे.] मराठी भाषा, शक ११२८ तील चंगदेवाची [पळसदेव शिलालेख, शके १०७९.] मराठी भाषा, शक १२१२ तील ज्ञानदेवाची मराठी भाषा, शक १५०० तील एकनाथाची मराठी भाषा किंवा शक १८०० तील विष्णुशास्त्र्यांची भाषा पाहिली असतां भाषा मराठीच आहे हें अशिक्षित मनुष्यहि ओळखूं शकतो. इतकेंच कीं, कांही रूपें बरींच जुनीं आहेत, असें त्याच्या दृष्ट्युत्पत्तीस येतें. व्यक्ति तीच; वस्त्रें तेवढीं निराळीं. पुरुष एकच; बाल्यतारुण्यवार्द्धक्यादि अवस्थान्तरें मात्र अनेक.... हीं अवस्थान्तरें व त्यांचें ज्ञान वर्तमान नागर मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला वैशद्य आणण्यास अत्यंत उपयुक्त आहेत.” (ज्ञा. प्रस्तावना, परि.●३)

भाषेची ही कालकृत अवस्थान्तरे म्हणजे तिचे ऐतिहासिक व्याकरण रचण्याची मुख्य साधने होत. या साधनांच्या आधाराने व त्यांच्या अभ्यासाने भाषेचे ऐतिहासिक व्याकरण कसे सिद्ध करता येते ते त्यांनी पुढे सांगितले आहे.

अनुक्रमणिका

राजवाड्यांच्या मते “शिष्ट मराठी भाषेतील स्वर, वर्ण, शब्द, प्रत्यय, व अव्ययें ह्यांची आदिपासून, म्हणजे मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून, आतांपर्यंत रूपें कसकशीं होत आहेत, ह्याचें उद्घाटन शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणांत केलेलें असतें. ह्या व्याकरणालाच मराठी भाषेची व्युत्पत्ति, शब्दसिद्धि, निरुक्ति वगैरे नामान्तरें आहेत.” (ज्ञा. प्रस्तावना, परि.●१२). अशा व्याकरणाच्या साधनांविषयी ते पुढे म्हणतात :

“कोणत्याहि भाषेचें ऐतिहासिक व्याकरण तयार व्हावयाला, त्या भाषेंतील आदिपासून आतांपर्यंत बराच, निदान कामापुरता तरी, ग्रंथसमूह किंवा लेखसोपान सांपडला पाहिजे त्याच्या अभावीं व्युत्पत्तीचें काम केवळ कल्पनेवर चालेल. तसेंच, नुसती लेखपरंपरा सांपडून म्हणण्यासारखें कार्य होत नाहीं; तर, ती लेखपरंपरा त्या त्या कालची अस्सल पाहिजे. अशी लेखपरंपरा व ग्रंथसंपत्ति ज्या भाषेची उपलब्ध होते, तिची निरुक्ति, किंवा व्युत्पत्ति, किंवा ऐतिहासिक व्याकृति सुकर व निश्चित होते.” (ज्ञा. प्रस्तावना, परि.●१२)

अशा प्रकारे अस्सल साधनांच्या आधारे तयार केलेले मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण अद्याप रचावयाचे आहे असे म्हणून, ‘त्या रचनेच्या साहाय्यार्थ’ ज्ञानेश्वरीची प्रस्तुत आवृत्ति आपण काढीत आहो असे राजवाडे यांनी म्हटले आहे. अशा प्रकारचे प्रयत्न यापूर्वी बीम्स [Comparative Grammar of Modern Indo-Aryan Languages, Vols. I, II, III; 1872-79.] व होर्न्ले [Grammar of Gaudian Languages, 1880.] आणि अल्पस्वल्प प्रमाणात कृष्णशास्त्री गोडबोले यांनी करून पाहिले, परंतु ‘प्राचीन ग्रंथसंग्रहाच्या अभावी ते लंगडे पडले’ असाही आपला अभिप्राय त्यांनी दिला आहे.

## प्रस्तुत व्याकरणाचे स्वरूप व त्याच्या मर्यादा

मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण लिहिण्याचा विचार राजवाडे यांच्या मनात पूर्वीपासून होताच. ती प्रत्यक्षात उतरविण्याची संधी त्यांना बीड-पाटांगण येथे मिळालेल्या ‘ज्ञानेश्वरी’च्या प्राचीन पोथीने आणून दिली. अर्थात् त्यांचे प्रस्तुत व्याकरण ‘ज्ञानेश्वरी’च्या त्या पोथीवर आधारलेले आहे. तसेच ते ऐतिहासिक व्याकरण असले तरी ते समग्र मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण नसून ज्ञानेश्वरीपुरते मर्यादित आहे. तत्कालीन ताम्र–शिला–लेखांचा त्यांनी क्वचित् आधार घेतला असला तरी तो तितक्यापुरताच आहे. तसेच त्या काळातील इतर ग्रांथिक साहित्यही त्यांनी विचारात घेतलेले नाही. महानुभावपंथीय साहित्याचा तर त्यात कोठे उल्लेखही नाही. अर्थात् त्यावेळी ते विशेष ज्ञातही नव्हते. सारांश, राजवाडे यांच्या प्रस्तुत व्याकरणाचे ऐतिहासिक स्वरूप व महत्त्व मान्य करून सुद्धा त्याच्या मर्यादा लक्षात ठेवल्या पाहिजेत. ते यादवकालातील एका विशिष्ट ग्रंथातील भाषेचे व तेही त्याच्या एका विशिष्ट हस्तलिखित पोथीवर आधारलेले व्याकरण आहे. साहजिकच त्याचा व त्याच्या या आधारभूत पोथीचा संबंध पाहणे अवश्य आहे; कारण ज्ञानेश्वरीची ही पोथी म्हणजे त्या व्याकरणाचा प्राण असल्याप्रमाणे आहे. तिचे संपादन करताना राजवाडे यांनी जी शताधिक पृष्ठांची सविस्तर ‘प्रस्तावना’ लिहिली ती या दृष्टीने अभ्यसनीय आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी प्रारंभी व्याकरणाची व्याख्या [“विवक्षित लोक, विवक्षित भाषा, विवक्षित स्थलीं व विवक्षित कालीं कोणत्या पद्धतीनें बोलतात व (लिहिणें माहित असल्यास) लिहितात, हें ज्या नियमसरणीनें म्हणजे शास्त्राने स्पष्ट केलेलें असतें, त्यास त्या भाषेचें तत्स्थलीन, तत्कालीन व तल्लोकीय व्याकरण म्हणतात.” (ज्ञा. प्रस्तावना. परि. ●१)] करून कोणत्याही भाषेचे व्याकरण स्थल, काल व लोक या उपाधींनी कसे व्याप्त असते ते दाखवून त्यापैकी ‘शिष्ट मराठीची ऐतिहासिक व्याकरणक्षमता’ स्पष्ट केली आहे. [(ज्ञानेश्वरी-प्रस्तावना परि. ●१-८). “कारण, गेल्या सातशे वर्षांत प्रौढ व ललित ग्रंथरचना जेवढी म्हणून झाली तेवढी सर्व शिष्ट मराठींत झाली आहे.” परि. ●७] अशा प्रकारच्या व्याकरणासाठी लागणारे एक जुने व अस्सल साधन ज्ञानेश्वरीच्या

पाटांगणप्रतीच्या रूपाने शके १८२५ त (म्हणजे इ. स. १९०३) राजवाड्यांच्या हाती आले व ते त्यांनी इ.स. १९०९ मध्ये ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. त्यांच्या मते ज्ञानेश्वरीची ही पोथी इ. स. १२९० पासून १३१८ पर्यंतच्या काळात लिहिलेली असून तिच्यातील भाषा इ.स. १२९० तील, म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या वेळची , निर्भेळ नागरी मराठी भाषा आहे. या पोथीचे वर्णन करून राजवाडे म्हणतात:

"ह्या पोथींतील भाषा–जी ज्ञानेश्वर बोलला, जी ज्ञानेश्वरानें नेवाशांतील शिलेवर लिहिली व जी शके १२१२ त नागर मराठे बोलत–तीच साक्षात् आहे. (पोथीचा) कागद भिकार असता, अक्षर गिचमीड असतें,... आणि भाषा जर ह्या पोथींतल्याप्रमाणें साक्षात् शक १२१२ तील नागर मराठी असती, तरी देखील, ह्या एकाच असामान्य गुणाच्या बळावर, अशा पोथीचा सकौतुक आदर करणें भाग पडलें असतें... पंढरपूर [पंढरपूर येथील चौऱ्यायशीचा लेख ('प्राचीन मराठी कोरीव लेख', सं. तुळपुळे, क्रं. ३४)] येथील शक ११९५ तील शिलालेखांतल्यासारखी किंवा पाटण [पाटण येथील यादव सिंघणाचा शिलालेख (उपर्युक्त, क्र. २१)] येथील शक ११२८ तील शिलालेखांतल्यासारखी भाषा ह्या पोथीची आहे. तेव्हां....निव्वळ भाषेच्या स्वरूपावरून ही पोथी थेट ज्ञानेश्वरांच्या वेळची आहे, असें तज्ज्ञांना सहज ताडतां आलें असतें.... ही पोथी म्हणजे मराठी भाषेंतील कागदावर लिहिलेला अत्यंत जुना असा पहिला लेख होय. सुदैव कीं, हा लेख पाठपोट ६४४ पृष्ठें आहे व सबंध शाबूत आहे." (ज्ञा.ची प्रस्तावना, परि.●५३)

याप्रमाणे कमीत कमी ओवीसंख्या असलेली, प्रक्षिप्त ओव्या नसलेली, शुद्ध पाठ देणारी व फारसी शब्दांचा वापर चुकूनही न करणारी अशी ही ज्ञानेश्वरीची प्राचीनतम उपलब्ध प्रत 'मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला, व्याकृतीला व इतिहासाला अत्यंत उपयोगी पडेल असा भरंवसा' वाटल्याने राजवाडे यांनी तिचे संपादन-प्रकाशन मोठ्या उत्साहाने केले व तिला आधारभूत करून ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरणही रचले.

### विश्वसनीय साधन

या व्याकरणासाठी राजवाडे यांनी स्वीकारलेले स्व-संशोधित साधन, म्हणजेच त्यांना बीड–पाटांगण येथे मिळालेली ज्ञानेश्वरीची हस्तलिखित प्रत, पुष्कळच विश्वसनीय आहे. ही प्रत राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या निर्मितीनंतर-पांचपंचवीस वर्षांत लिहिलेली असेल वा नसेल; पण ती एकनाथ–पूर्व आहे हे निश्चित, व ज्ञानेश्वरांनंतर लौकरच, म्हणजे शकवर्षाच्या तेराव्या शतकात केव्हातरी तयार झालेली असणे संभवनीय आहे. या पोथीवर असे म्हणण्यापेक्षा [कारण मूळ पोथी राजवाड्यांव्यतिरिक्त फार थोड्या जणांनी पाहिली होती व पुढे तर ती राजवाड्यांनी उद्वेगाच्या भरात नष्ट केली असा प्रवाद आहे.] तिच्या मुद्रित प्रतीवर आक्षेप पुष्कळ घेतले गेले व त्यांपैकी काहींचे निरसनही राजवाड्यांनी एक स्वतंत्र लेख ["माझी ज्ञानेश्वरी व कित्येक शंकाकार" (राजवाडे लेखसंग्रह, भाग ३, पृ. २४-३६).] लिहून केले. त्याबरोबर काही विद्वानांनी राजवाडी ज्ञानेश्वरीचे प्राचीनत्व मान्य केले इतकेच नव्हे तर ते भाषादृष्ट्या सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला. अशा विद्वानांत प्रसिद्ध संस्कृतज्ञ कै. गो. कृ. मोडकशास्त्री [भाइसंमं. त्रैमासिक, १५.१; १६.१.] व महानुभाव-साहित्य-संशोधक कै. ह. ना. नेने [भाइसंमं. त्रैमासिक, १६.१; संशोधनलेखसंग्रह, भा. १.] हे दोघेजण प्रमुख होते. त्यांनी स्वतंत्र लेख लिहून राजवाडी ज्ञानेश्वरीचे पुराणत्व तिच्यात आढळणाऱ्या प्राचीन शब्दरूपांच्या आधारे सप्रमाण सिद्ध केले. त्यातही नेने यांनी त्या रूपांची ज्ञानेश्वरीच्या समकालीन महानुभावीय ग्रंथांतील रूपांशी तुलना करून त्या दोहींचे प्राचीनत्व तौलनिक अभ्यासाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, तो विशेष महत्त्वाचा म्हटला पाहिजे. उदाहरणार्थ, राजवाडी ज्ञानेश्वरीतील उनि किंवा औनि प्रत्ययान्त धातुसाधितांचा [उदा., "आम्ही पूर्णकाम **होउनि**।

अनुक्रमणिका

जरि आत्मस्थिती **राहुनि**" (ज्ञा. ३.६४). यांतील पहिले रूप भूतकालाचे व दुसरे भविष्यकालाचे वाचक आहे.] उलगडा महानुभावांच्या आद्य चरित्रग्रंथातील तशा प्रकारच्या रूपांवरून [उदा., "आम्ही बांधौनि (=बांधूं) : आम्ही दोहौनि (=दोहूं)" लीळाचरित्र एकाक, ३८.] झाला व ही रूपे भूतकालाप्रमाणे कधीकधी भविष्यकालही दर्शवितात हे कळले. मूळ राजवाडी प्रत उपलब्ध नसल्यामुळे तिच्या अस्तित्वाविषयीही लोक शका घेऊ लागले होते व ही शंका इतक्या थराला गेली होती की मुळात काहीही नसताना राजवाड्यांनी ज्ञानेंश्वरीच्या मुकुंदराजी प्रतीची ही सृष्टी शृन्यातून, आपल्या प्रतिमेच्या बळावर उभी केली व तिचा अखेरपर्यंत पाठपुरावा केला असेही कोणी म्हणू लागले. संपूर्ण ज्ञानेश्वरी अथपासून इतिपर्यंत स्वतःच्या कल्पनाशक्तीने भाषेच्या तत्कालीन स्वरूपात नव्याने लिहून काढणे हा राजवाड्यांच्या असामान्य प्रतिभेचा एका दृष्टीने गौरव होता व हे अशक्यप्राय कार्य करण्याची धमकही त्यांच्यात होती, हे खरे; परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. ज्ञानेश्वरीची एक फार जुनी अशी प्रत त्यांच्या हाती खरोखरच आली होती याचा प्रत्यंतर पुरावा कालान्तराने उपलब्ध झाल्यावर वरील सर्व शंका आपोआपच दूर झाल्या. हा प्रत्यंतर पुरावा म्हणजे कै. माडगावकर यांना त्यांची 'ज्ञानदेवी' प्रसिद्ध झाल्यानंतर मिळालेली ज्ञानेश्वरीची प्रत. या प्रतीचे राजवाडी प्रतीशी (अर्थात् मुद्रित प्रतीशी) विलक्षण साम्य असून ती त्या प्रतीच्या उपलब्धिस्थानी, म्हणजे बीड–पाटांगण येथेच मिळाली. तिची माडगावकर यांनी तेलकागदावर करून ठेवलेली अस्सल प्रत प्रा. न. र. फाटक यांच्या संग्रही होती व ती पाहिल्यावर तिची 'जुळी बहीण' जी राजवाडे-प्रत तिच्या अस्तित्वाविषयी शंका उरली नाही. म्हणूनच महाराष्ट्रराज्यशासनाने इ. स. १९५६ मध्ये नेमलेल्या ज्ञानेश्वरी–संपादन समितीनेही राजवाडे–प्रत प्रमाण समजून तिचीच सुधारलेली आवृत्ती काढण्याचे अंगीकारले व त्याप्रमाणे ती सिद्ध करून इ. स. १९६१ मध्ये प्रसिद्ध केली. तात्पर्य, राजवाडे यांनी आपल्या व्याकरणासाठी आधारभूत केलेली ज्ञानेश्वरीची प्रत विश्वसनीय असून मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण सिद्ध करण्याच्या कामी ती विशेष उपयुक्त आहे याविषयी आता सर्वसाधारणपणे मतैक्य दिसते.

### भाषेच्या जुनेपणाची काही गमके

राजवाडे-संपादित ज्ञानेश्वरीच्या प्रतीत ती भाषादृष्ट्या जुनी, म्हणजे एकनाथपूर्वकालीन, असल्याची काही गमके आढळतात ती अशी :

(१) ज्यांतील पूरक नाम, सर्वनाम किंवा विशेषण आँ-प्रत्ययसाधित तृतीयान्त असते असा विशिष्ट भावे प्रयोग; उदाहरणार्थ,

जेणें **कृतकार्यां** होइजे (ज्ञा. १.२५); तुवां **शरीरपरां** नोहावें (३.१८५); अमरीं **भाटां** होइजे (६.४५४); तेणें भलतिये **जातिचेयां** होइजे (८.९); तिहिं **मनुष्यां** होइजे। मृत्युलोकिं (१४.२७०); इ.

वरील प्रकारच्या रचनेसंबंधी राजवाडे यांचे म्हणणे असे, की 'जेणें कृतकार्यां होइजे' ही ज्ञानेश्वरीतील रचना 'येन कृतकार्येण भूयेत' या संस्कृत रचनेचा अनुवाद असून भावे प्रयोगाच्या मूळ संस्कृत रचनेला धरून मराठीतही उद्देश्य व पूरक ही दोन्ही तृतीयान्त आहेत याविरुद्ध मोडकशास्त्री यांचे म्हणणे असे, की ज्ञानेश्वरी–मराठीत भावे प्रयोगातील पूरक आँ–प्रत्ययान्त प्रथमा असते व अशा रूपांना तृतीया गणणे हे चिंत्य होय. मोडकशास्त्र्यांना उत्तर श्री. नेने यांनी दिले असून त्यांनी ज्ञानेश्वरीतील वरील रूपांचे तृतीयाऽत्व त्यांची समकालीन अशा महानुभावीय काव्यांतील रूपांशी तुलना करून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन मराठीत एँ किंवा एनि या प्रत्ययांनी सिद्ध होणाऱ्या तृतीयेच्या रूपांबरोबर आँ–

अनुक्रमणिका

प्रत्ययान्त तृतीयाही आढळते (उदा; डोळाँ, वेगाँ, श्रोताँ, नवरसाँ, इ०) हे दाखवून त्यांनी त्यांचे आँ–कारान्त क्रियाविशेषणां (उदा; अवचितां, निवान्तां; उगेयां; इ०) पासून भिन्नत्व स्पष्ट केले आहे. सारांश, मोडक–नेने [हा वाद 'राजवाडे—ज्ञानेश्वरोचे पुराणत्व' या मथळ्याखाली भा. इ. सं. मं. च्या त्रैमासिकात (१५.१; १६.१) आला आहे.] वादाचा विषय वरील भावे प्रयोगरचनेतील पूरक शब्दाची रूपे प्रथमान्त मानावी की तृतींयान्त मानावी इतकाच आहे. ही रूपे सदा आँ–कारान्त असतात व भाषेच्या जुनेपणाची ती एक अचूक खूण होय याविषयी त्या दोघांचे राजवाड्यांशी मतैक्य आहे. (उत्तरकालीन मराठीत ही रूपे अ–कारान्त झाली; उदा०, 'तिहिं मनुष्यां होइजे' १४.२७०, या राजवाडे–प्रतीतील पाठाच्या जागी बंकटीयादि प्रतींत 'मनुष्य' असे रूप आढळते. हे भाषेचे अर्वाचीकरण होय.)

(२) **काही विभक्तिरूपें** :— प्रथमपुरुषी सर्वनामाची तृतीयेची मियाँ व म्याँ अशीं दोन्ही रूपे मराठींत कालभेदाने आढळतात. पैकी राजबाडे–प्रतींत 'मियाँ' व बंकट–प्रतींत 'म्याँ' रूप येतें. अर्थात् भाषेचे जुनेपण 'मियाँ' या रूपात दिसते; कारण सं. मया या रूपाला तेच अधिक जवळ आहे. तसेच तृतीयेचा 'ने' हा आधुनिक प्रत्यय बंकट वगैरेंच्या प्रतींत असला तरी राजवाडे–प्रतीत तो नाही. (उदा., 'मनू आपण अनुष्ठिली। मग इक्ष्वाकूसी उपदेशिली', ४.१७, यातील 'मनू' हे तृतीयेचेच पण जुने रूप आहे.)

(३) **सामान्यरूपाचा अभाव** :— ज्ञानेश्वरीच्या काळातील मराठीत नामाच्या किंवा सर्वनामाच्या सामान्यरूपाविषयी अनियमितपणा बराच होता. नामाला विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी कधी त्याचे सामान्यरूप होई, कधी ते होत नसे, तर कधी विभक्तिरूपालाच शब्दयोगी लागे. हे तिन्ही प्रकार, विशेषतः तिसरा, ज्ञानेश्वरीत आढळतात व आढळले पाहिजेत. त्यांतील एखादा न आढळला तर तेवढ्यापुरती ती प्रत विश्वसनीय नव्हे. या दृष्टीने मोडकांनी दिलेले 'तुआंविण' हे राजवाडे–प्रतीतील उदाहरण (१.२३४) लक्षणीय आहे. येथे 'विण' या शब्दयोगी अव्ययाचे पूर्वी 'तुआँ' हे तृतीयेचे रूप आहे. पण तेच माडगांवकर, बंकट वगैरेंच्या प्रतीतून 'तुजविण' असे सामान्यरूपयुक्त रूप येते. म्हणजे येथेही भाषेचे अर्वाचीकरण झाले.

(४) **'मी बोलिंलाँ'** (२.५२) यासारखी आँ–प्रत्ययान्त प्रथमपुरुषी कर्तरिरूपे. उत्तरकालीन प्रतींतून ती 'मी बोलिलों' अशी अर्वाचीन होतात. ज्ञानेश्वरकालीन महानुभाव ग्रंथांतूनही वरीलप्रमाणे आँकारान्त रूपें आहेत (उदा., 'मी हाटवटीए होउनि **आलां :**' गो. चरित्र, २७).

(५) 'आकाशा होउनि वाड' (१३.११३५) याचे पाठान्तर बंकट इ. च्या प्रतींत 'आकाशाहूनि वाड' असे होते. यावरून मोडकशास्त्री म्हणतात की राजवाडे–प्रतीच्या काळी 'हून' हा पंचमीचा प्रत्यय घडला जात होता. त्यांच्या या म्हणण्यास ज्ञानेश्वरकालीन महानुभावीय ग्रंथांतून आधार मिळतो (उदा., 'गुंडोचां माथां होउनि प्रकासु नीगतु असे :' गो. चरित्र, ४).

(६) तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें। **शोभते** भलीं ॥' (१.१८), 'इयें अशेषेंही भूतें। पैं माझा ठाइं **बिंबते**।' (९.६६), 'आता दुःखकल्लोळीं **झळंबते**। तिन्हीं भुवनें।'(११.३१४) यांसारख्या रूपांचे अस्तित्व. वरील जाड ठशातील शोभते, बिंबते व झळंबते ही रूपे राजवाड्यांच्या मते वर्तमाने लट्ची आत्मनेपदी आहेत. त्यांचे व्युत्पादन राजवाडे पुढीलप्रमाणे करतात :—

१. (सं.) रत्नं शोभते = (महा.) रअणँ सोभए = (ज्ञा. म.) रत्न शोभे.

अनुक्रमणिका

२. (सं.) रत्नानि शोभन्ते = (महा.) रअणाइँ शोभन्ते = (ज्ञा. म.) रत्नें शोभते/तें.

ही रूपे प्रस्तुत काळी, म्हणजे सध्या, वर्तमान कृदन्ताची 'शोभते' वगैरे जी एकवचनी रूपे होतात त्यांसारखी दिसतात व त्यामुळेच राजवाडे-ज्ञानेश्वरीचे एक टीकाकार शं. ब. सहस्रबुद्धे [विविधज्ञानविस्तार, जानेवारी १९११.] यांनी "नपुंसकलिंगी बहुवचनी कर्त्याला एकवचनी क्रियापद ज्ञानेश्वर लावी" असे म्हणून ज्ञानेश्वरीच्या भाषेवर धेडगुजरीपणाचा आक्षेप घेतला होता. त्याला सविस्तर उत्तर राजवाड्यांनी एक स्वतंत्र लेख [माझी ज्ञानेश्वरी व कित्येक शंकाकार, पृ. २८-३०. (राजवाडे लेखसंग्रह, भा. ३).] लिहून दिले. त्यात त्यांनी वरील रूपांचे प्राचीनत्व दाखवून ती आत्मनेपदी रूपे होत असे स्पष्टपणे म्हटले आहे. पण अशोकाच्या शिलालेखात अंशतः दिसून त्यानंतर लुप्त झालेले आत्मनेपद एकदम ज्ञानेश्वरीत कसे उपटले याचे उत्तर राजवाड्यांनी दिलेले नाही. त्यामुळे वरील रूपे आत्मनेपदी न मानता ती अनियमित मानावी लागतात.

(७) राजवाडे—प्रतीतील पुढील शब्दांची कंसात दिलेली रूपे एकनाथोत्तरकालीन प्रतींतून आढळता :—

कलभा< सं. कलह (कळंभा, ६.१६); एकएकातें (एकमेकांतें, १.१६३); धूमरजाची पिंजरी (धुम्ररजाची—, ९.१२४) ; घरणी (गृहिणी, १४.८६); पांचाखरी (पंचाक्षरी, २.८५); अवस्वरीं (अवसरीं, ६.१५२); इ. शब्दरूपांचे हे जुनेपण राजवाडे—प्रतीच्या विश्वसनीयतेचे एक प्रमाण आहे.

**आर्य—भारतीय पद्धतीने रचिलेले व्याकरण**

राजवाडे आपल्या व्याकरणाच्या नवमान्हिकाच्या शेवटीं म्हणतात :

"दादोबानें आपलें व्याकरण इंग्रजी व्याकरणावरून रचिलें आहे. संस्कृत, महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या व्याकरणावरूनच मराठी व्याकरण रचिलें पाहिजे. इंग्रजी डेली प्रेयर्मधील प्रयोग संध्येंतील न्यासांना लावण्यासारखेंच दादोबाचें कृत्य होतें. पाणिनीसारखा सूर्य सोडन, इंग्रजी कंदील घेतल्यामुळें दादोबा जागोजागीं उपहसनीय झाला आहे."

राजवाड्यांची वरील टीका प्रखर असली तरी ती पूर्णतः समुचित नाही. कारण ते म्हणतात त्याप्रमाणे दादोबाने आपले व्याकरण इंग्रजी व्याकरणावरून रचिले हे खरे असले तरी त्यामागे तशीच सबळ कारणे होती. एक तर दादोबांची ही कृती इ. स. १८३६ मधील, म्हणजे अव्वल इंग्रजीच्या काळातील असून त्यावेळी मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या साधनांचा अभावच होता म्हटल्यास चालेल. त्यावेळी भाषेचे वर्णनात्मक व्याकरणच शक्य होते व ते रचण्याचे काम दादोबांनी पुष्कळ बरे केले. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनी इंग्रजीच्या व्याकरणपद्धतीचे अंधानुकरण केले नसून अवश्य तेथेच तिच वापर केला आहे. नामविभक्तिप्रकरणी त्यांना नामाच्या आठ विभक्त्यांची नांवे इंग्रजीं तीलप्रमाणे Nominative, Accusative, Instrumental इ. अशी अर्थसूचक ठेवता आली असती; पण तसे न करता त्यांनी ती पाणिनीय पद्धतीप्रमाणे प्रथमा, द्वितीया, तृतीया इ. अशी क्रमवाचकच ठेवलीं आहेत. त्यांनी फरक केला व परिभाषा इंग्रजी व्याकरणाच्या वळणा. वर नेली ती आख्यातविभक्तीच्या बाबतीत नेली. तेथे मात्र पाणिनीय लकारांची नावे न वापरता त्यांनी वर्तमान, भूत, भविष्य इ. इंग्रजी परिभाषाच वापरली. पण चिं. वि. वैद्य [निबंध आणि भाषणे, पृ. १३४.] यांनी दाखविल्याप्रमाणे मराठीतील क्रियापद—प्रक्रिया संस्कृताहून इतकी भिन्न व इंग्रजीशी इतकी

जुळती आहे की ती स्पष्ट करण्यासाठी दादोबांनी संस्कृत परिभाषा सोडून इंग्रजी व्याकरणाचा आधार घेतला हे सरळच झाले. त्याबद्दल त्यांना बोल लावणे योग्य नाहीं. उलट राजवाड्यांनीं मात्र आख्यातप्रकरणी पाणिनीय दशविध लकारांच्या चौकटीचा अवलंब करून त्या चौकटीत ज्ञानेश्वरीतील क्रियापदरूपांना हट्टाने बसविण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हा प्रयत्न अनेक ठिकाणी फसल्याचे आपणास दिसून येईल. उदाहरणार्थ, लङ् सारखा भूतकाळ किंवा लुट् किंवा लृट् सारखे भविष्यकाळ ते ज्ञानेश्वरी–मराठीवर लादूं पाहतात, पण प्रत्यक्षात ते तसे नसल्याने त्यांनी स्वीकारलेली ही चौकट त्या ठिकाणी ढिली पडते. शिवाय, वैद्यांनी दाखविल्याप्रमाणे, दादोबा व डॉ. भांडारकर यांनी रूढ केलेल्या काही प्रघातांस स्वतः राजवाडेही प्रसंगी बळी पडले आहेत. आख्यातविभक्तीतील प्रथम पुरुष, द्वितीया पुरुष व उत्तम पुरुष ही संस्कृतातील पुरुषांची नावे व क्रम सोडून उलटा क्रम व निराळी नावे दादोबांनी प्रथम इंग्रजी धर्तीवर दिली आणि डॉ. भांडारकरांनीं आपल्या संस्कृतच्या पाठ्यपुस्तकांत तीच पद्धत स्वीकारली. यामुळे ती इतकी रूढ झाली की पाणिनीय पद्धतीचा आग्रहाने अवलंब करणाऱ्या राजवाड्यांनी सुद्धा पुरुषांची नावे जरी जुनीच वापरली तरी त्यांचा जुना क्रम त्यानी सोडला व सप्तमान्हिकात सर्वत्र उत्तम पुरुष, मध्यम पुरुष व प्रथम पुरुष या दादोबा–प्रणीत इंग्रजी क्रमानें ज्ञानेश्वरी–मराठीच्या आख्यातविभक्तीची पाहणी केली. त्यांचे हे करणे गैर झाले असे नव्हे; पण रूढीचा किंवा सवयीचा प्रभाव किती असतो त्याचे हे एक गमक आहे, इतकेच. व्याकरणाची पद्धती किंवा परिभाषा यांना तसेच पाहिल्यास विशेष महत्त्व नाही. हा व्यावहारिक सोयीचा भाग आहे व ती सोय जी चांगल्या रीतीने पाहील ती पद्धती, ती परिभाषा चांगली. अर्थात् राजवाड्यांनी पाणिनीय परिभाषेचा किंवा संस्कृत व्याकरणपद्धतीचा अवलंब केला एवढ्यामुळे त्यांचे ज्ञानेश्वरीचे व्याकरण श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाहीं.

**मराठीचे ‘संस्कृत’ व्याकरण**

मराठी भाषा अपभ्रंशोत्पन्न आहे असे राजवाडे म्हणत असले तरी ज्ञानेश्वरीचे प्रस्तुत व्याकरण सिद्ध करताना त्यांचे मुख्य लक्ष प्राकृत–अपभ्रंशावर नसून ते संस्कृतावर, अर्थात् पाणिनीय संस्कृतावर व वैदिक भाषेवर आहे हे पदोपदीं दिसते. त्यांच्या या सांस्कृतिकतेला, म्हणजे संस्कृताकडील प्रवृत्तीला, प्रारंभ प्रकरणांच्या नामकरणापासूनच होतो. व्याकरणशास्त्राच्या संस्कृत पद्धतीस अनुसरून त्यांनी आपल्या ग्रंथातील प्रत्येक प्रकरणाला ‘आन्हिक’ म्हटले आहे. ‘आदेशेतिहास’ (वर्णविकार) व निपातेतिहास (अव्यये) ही प्रकरणांची नावेही त्यांचे संस्कृतपरिभाषाप्रेमच दाखवितात. ‘अजन्त’ (म्ह. स्वरान्त) शब्द व ‘हलन्त’ (म्हणजे ह्कारान्त) शब्द ही परिभाषाही त्याच नमुन्याची आहे. ती विशेष जाणवते ती क्रियापदांचे भिन्न काळ व अर्थ यांच्या नामकरणात. तेथे त्यांनी दादोबांनी रूढ केलेली परिभाषा न वापरता लट्, लिट्, लोट् इ. दशविध ल–कारांची पाणिनीय परिभाषा निरपवादरीत्या वापरली आहे. त्यामुळे त्यांचे हे व्याकरण पाणिनीय परिभाषेशी परिचय नसणाऱ्या वाचकाला दुर्गम होते. ऐतिहासिक दृष्ट्या पहाता पाणिनीय परिभाषाच योग्य आहे यात शंका नाही; कारण चिं. वि. वैद्य [निबंध आणि भाषणें, पृ. १३४.] म्हणतात त्याप्रमाणे ‘या परिभाषेने ऐतिहासिक संबंध कायम राहून तो आपल्या डोळ्यांसमोर सदोदित असतो.’ पण तेवढ्यामुळे क्रियापदांचे काळ व अर्थ यांची वाचक परिभाषा इंग्रजीच्या व्याकरणावरून घेतल्याबद्दल राजवाड्यांनी दादोबांना दोष दिला आहे ते मात्र बरोबर नाही. कारण वैद्यांनी म्हटल्याप्रमाणे ‘मराठीतील क्रियापदाची वाढ संस्कृत, म्हणजे मूलभूत रूपापासून इतकी भिन्न झाली आहे की, तिचा स्वतंत्र विचार केल्यास हरकत पडणार नाहीं.’ ही वाढ पुष्कळ अंशीं इंग्रजी भाषेतील क्रियापदांच्या प्रकियेशी जुळणारी असल्याने तिचे स्वरूप विशद करताना दादोबांनी इंग्रजीतील परिभाषेचा अवलंब केला हे साहजिकच झाले. राजवाडे मात्र त्यांच्या स्वभावानुसार पाणिनीय परिभाषा कटाक्षाने योजतात व तिचा पुरस्कारही करतात.

अनुक्रमणिका

परंतु राजवाड्यांची ही संस्कृत-प्रवृत्ती परिभाषेपुरती मर्यादित राहिलेली नाही. तिने त्यांच्या या व्याकरणाचा गाभाच व्यापला आहे. ज्ञानेश्वरीच्या भाषेची प्रत्येक बाब थेट संस्कृतापर्यंतच नव्हे तर त्याही पूर्वीच्या, म्हणजे पूर्ववैदिक भाषेपर्यंत नेऊन भिडविण्याचा त्यांचा अट्टाहास आहे. "ज्ञानेश्वरी-मराठीपर्यंत सर्व बाबींची परंपरा अव्याहत लागली आहे" असे ते समारोपात म्हणतातही. या आग्रहामुळे किंवा दुराग्रहामुळे, प्राकृतकाळी लोप पावलेल्या द्विवचनाचे व प्रत्ययी चतुर्थी विभक्तीचे ज्ञानेश्वरीपुरते त्यांनी पुनरुज्जीवन केले आहे. तसेच, धातूंची सिद्धी विशद करताना त्यांचे परस्मैपद व आत्मनेपद आणि सेट् व अनिट् हे संस्कृतातील भेद त्यांनी ज्ञानेश्वरीच्या मराठीतही कल्पिले आहेत. त्याप्रमाणेच, प्राकृतात लुप्त झालेले लुट् व लृट् हे अनुक्रमे प्रथम व द्वितीय भविष्यकाळ, लङ् हा भूतकाळ, लिङ् हा विध्यर्थ आणि लृङ् हा संकेतार्थ यांचा त्यांनी ज्ञानेश्वरीत जीर्णोद्धार केला आहे. परंतु तसे करण्याला सबळ आधार नाही.

याचे एक उदाहरण ग्रंथाच्या प्रारंभीच दिसते. तेथे 'वर्णेतिहास' प्रकरणी स्वरांचे वर्गीकरण करताना राजवाड्यांनी प्लुत अथवा त्रिमात्रक, उदात्त, अनुदात्त व स्वरित हे वैदिक भाषेतील स्वरप्रकार ज्ञानेश्वरीच्या भाषेतही आहेत असे सूचित केले आहे. (परिच्छेद क्र. ४). यावर चिं. वि. वैद्यांची रास्त टीका [निबंध आणि भाषणें, पृ. ११२.] अशी, की "हे स्वर वैदिक भाषेच्या वाढीच्या वेळेसच नाहीसे होत चालले होते. वैदिक ब्राह्मणग्रंथांत—विशेषतः गद्यात—हे स्वर नाहीत, पाणिनीय किंवा पातञ्जल संस्कृतात तर ते नाहीतच; प्राकृतातही ते नाहीत. मराठीने ही जुनी तऱ्हा पुन्हा चालू केली नसावी असा आमचा समज आहे." अशी टीका होणार या अपेक्षेनेच जणू राजवाड्यांनी आपल्या विवेचनात "ज्ञानेश्वरी स्वरात वाचीत व वाचतात" असे समर्थनपर कारण देऊन "आर्षभाषेप्रमाणे ज्ञानेश्वरी भाषेलाही स्वर आहेत व आर्षकालापासून आतापर्यंत उदात्त, अनुदात्त व स्वरित अशा स्वरांत बोलण्याची परंपरा कायम आहे" असे आपले मत निःशंकपणे मांडले आहे. विसर्गाविषयीही ते असेच म्हणतात : "विसर्ग अपभ्रंशात नाही; ज्ञानेश्वरीत आहे." पण ज्ञानेश्वरीत आहे म्हणजे सर्वत्र आहे असे नव्हे, तर केवळ तत्सम शब्दांत आहे; तद्भवांत विसर्ग नाही. अर्थात् ज्ञानेश्वरींत विसर्ग आहे हे राजवाड्यांचे म्हणणे अतिव्याप्त असून ते त्यांच्या सांस्कृतिक बुद्धीचे, म्हणजे ज्ञानेश्वरीभाषेचा संबंध साक्षात् संस्कृताशी जोडण्याच्या प्रवृत्तीचे द्योतक मानावे लागते. त्यांची ही प्रवृत्तिच त्यांना चतुर्थीच्या तें किंवा थें या प्रत्ययावरील वैकल्पिक अनुस्वाराच्या शोधार्थ पाणिनीच्या 'अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः ।' या सूत्रापर्यंत जाण्यास लावते. वास्तविक पहाता, वैद्य म्हणतात त्याप्रमाणे, प्राकृतात अनेक स्वर विकल्पाने अनुनासिक होतात हा राजवाड्यांनींच दिलेला आधार या बाबतीत पुरेसा होता.

**आग्रह—आणि दुराग्रह**

राजवाड्यांच्या स्वभावात जो आग्रह आणि क्वचित् दुराग्रहही होता त्याचे प्रतिबिंब त्यांच्या प्रस्तुत कृतीतही पडलेले पुढील काही उदाहरणांवरून दिसेल.

'तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें । शोभतें भलीं' (१.१८) यातील 'शोभतें' यांसारखीं रूपें वास्तविक पहाता अ—नियमित म्हटली पाहिजेत. राजवाडे—ज्ञानेश्वरीचे एक टीकाकार श्री. सहस्त्रबुद्धे यांनी त्यांना 'चमत्कारिक' म्हटले, कारण त्यांना त्यांत अनेकवचनी कर्ता व एकवचनी क्रियापद असा प्रकार दिसला. त्यांना उत्तर देऊन राजवाड्यांनी ही रूपे 'चमत्कारिक' वाटलीं तरी तीं तशीं नसून तीं आत्मनेपदीं, व्युत्पत्तिसिद्ध रूपे आहेत असे आग्रहपूर्वक प्रतिपादिले. परंतु हें इतक्यावरच थांबले नाही. ज्ञानेश्वरीच्या भाषेत अनियमितपणा येईल ही कल्पनाही त्यांना असह्य वाटली व त्यांनी तळमळीने लिहिले—[राजवाडे-

लेखसंग्रह, भाग ३, पृ. ३१.] “ज्ञानेश्वर म्हणजे काही वैदू नव्हे किंवा पारशी नव्हे. ज्ञानेश्वर हे विद्वान् ब्राह्मणांच्या कुळांत जन्मले असून व्याकरणादि शास्त्रें, संस्कृतादि भाषा व वेदादि ग्रंथ मार्मिकपणे पढलेले होते. त्यांच्या माथीं असले वैदूचे प्रयोग मारणें शुद्ध वेडगळपणा आहे....ज्ञानेश्वरांच्या सबंध ज्ञानेश्वरींत वैदूला शोभेल असा एकही व्याकरणदुष्ट प्रयोग नाहीं. आणि ज्या ज्ञानेश्वरीच्या पोथींत असले प्रयोग असतील ती पोथी चुकलेली व धेडगुजरी आहे.”

‘शशिसूर्यां जो प्रकाशु’ (७.३२) असा पाठ घेऊन त्यातील ‘शशिसूर्यां’ या पदातील द्विवचनाचा पुरस्कार राजवाड्यांनी या व्याकरणात केलाच आहे (परिच्छेद क्र. ८). त्याचा पाठपुरावा त्यांनी अन्यत्रही केला. या दृष्टीने त्यांचा ‘पादयोः पतति’ या मथळ्याचा लेख [राजवाडे-लेखसंग्रह, भाग ३, पृ. २५९-२६३.] उल्लेखनीय आहे. त्यात त्यांनी ‘हातांपायां’ (पडणे), ‘दोन प्रहरां’, ‘दुपारां’ आणि ‘बे’ (बे एकें बे; बे दुणें चार., इ०), < सं. द्वे, या चार उदाहरणांनी मराठीतील द्विवचनाच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली आहे. वरील चार रूपे एकवचनाची वा अनेकवचनाची नसून ती द्विवचनाची आहेत असे प्रतिपादन करून ती तशी न मानणांरे डॉ. गुणे व रा. भि. जोशी यांच्यासारख्यांना उद्देशून राजवाडे वरील लेखात म्हणतात—

“....जोशी हो कीं गुणे हो, जर्मनी (त) शिकलेला असो कीं कोंकणांत पढलेला असो, त्याने मराठींत भाषेच्या निरुक्तीसंबंधानें जीं काहीं विधानें करावयाचीं तीं जरा जपून केलीं पाहिजेत. जोशी, गुणे, भारदे वगैरे इसमांचें होतें काय कीं, ज्या विषयासंबंधीं ते लिहावयाला निघतात त्याचा आगापिच्छा त्यांना बिलकुल माहीत नसतो. बाब कोणती, तिचें स्वरूप काय, तिचा विस्तार केवढा, तिची परंपरा कशी, इत्यादि तपशिलाचें स्वप्नही या लोकांना नसतें. जीभ उचलावी आणि टाळ्याला लावावी किंवा लेखणी घ्यावी आणि यदृच्छेने वेळीं सुचेल तें खरडावें, अश्यांतला मासला या लोकांचा दिसतो....” (पृ. २६२).

राजवाडे यांची वरील टीका अनर्गल व पूर्वग्रहदूषित तर आहेच, पण शिवाय ती निराधारही आहे. विशेषतः डॉ. गुणे यांच्या ‘भाषाशास्त्रप्रवेशिका’ (An Introduction to Comparative Philology) या ग्रंथाविषयीं “जर्मन पंडितांचा आश्रय सोडून मराठी भाषेच्या प्रांतांत जेव्हा सारांशकार (डॉ. गुणे) प्रवेश करतो, तेव्हा त्याचे अज्ञान तात्काल उघडकीस येतें” हा त्यांचा अभिप्राय (पृ. २६२) अत्यंत अनुदारपणाचा आहे. शिवाय त्यात विशेष तथ्यही नाहीं. कारण डॉ. गुणे यांनी केलेले मराठी भाषेचे विश्लेषण अशास्त्रीय आहे असे म्हणणे धाडसाचें होईल. पण लिहिण्याच्या अभिनिवेशात राजवाडे हे सर्व विसरतात व स्वमताचाच आग्रह धरतात. हा त्यांचा स्वभाव आहे, हेच खरे. पण हाच स्वभाव त्यांना क्वचित् अस्वाभाविकपणे वागावयास लावतो. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे प्राकृतातील चतुर्थी विभक्तीच्या प्रकरणी त्यांनी केलेला वररुचीसारख्या प्राकृत वैय्याकरणांचा उपहास व पिशेलसारख्या पाश्चात्य वैय्याकरणाचा पुरस्कार. राजवाड्यांच्याकडून तरी हे सर्वस्वी अनपेक्षित होते. पण प्रांकृतात चतुर्थी होती या स्वमताच्या पुष्ट्यर्थ त्यांना या ठिकाणी पिशेलचा आधार घ्यावा लागला आहे खरा. ते म्हणतात, “प्राकृतात चतुर्थी नाहीं, असा दडपेबाजीचा नियम प्राकृत वैय्याकरण देतात. परंतु चतुर्थीच्या एकवचनाचीं रूपे पिशेलनें दहावीस दिलीं आहेत. त्यावरून....प्राकृत वैय्याकरणांची दृष्टि पाणिनीप्रमाणें सर्वंकष नव्हती असें म्हणावें लागतें....” (परि. ●८). राजवाड्यांचे हे पिशेल—पिसे पाहून चिं. वि. वैद्यांना सुद्धा आश्चर्य वाटले आहे. पण ते स्पष्टपणे म्हणतात [निबंध आणि भाषणे, पृ. ११७.] की “आद्य प्राकृत व्याकरणकार वररुची ‘द्विवचनस्य बहुवचनम्’, ‘चतुर्थ्याः षष्ठी’ अशी सूत्रें देतो, त्यांचा अनादर करून पिशेलच्या दहावीस उदाहरणांवर आमचा भरवसा बसावयाचा नाहीं.”

**परस्परविरुद्ध विधाने**

विवेचनाच्या ओघात क्वचित् काही परस्परविरोधी विधाने राजवाड्यांनी केली आहेत. त्यांच्या हयातीत त्यांच्या ज्ञानेश्वरीची व व्याकरणाची द्वितीय आवृत्ती निघती तर कदाचित त्यांनी ती दुरुस्त केलीही असती. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही व त्यांच्या पुढील विधानांतील परस्परविरोध तसाच राहून गेला :—

(१) 'ज्ञानेश्वरींत द्विवचन नाहीं' असें परि. ६ त वर म्हणून पुढें परि. २० त 'ज्ञानेश्वरींत दहापांच स्थलीं अकारान्त पुल्लिंगी नामांच्या द्विवचनाचीं रूपें येतात' असें सांगून त्यांचे सोदाहरण विवेचनही केले आहे.

(२) अशीच धरसोड चतुर्थी विभक्तीविषयी झाली आहे. 'चतुर्थी महाराष्ट्रीत व अपभ्रंशांत क्वचित् आढळते' असे परि. ४ मध्ये म्हणून पुढे परि. ८ त 'प्राकृतांत चतुर्थी नाही असा दडपेबाजीचा नियम प्राकृत वैय्याकरण देतात; परंतु चतुर्थीच्या एकवचनाची रूपे पिशेलने दहावीस दिली आहेत, त्यांवरून प्राकृत वैय्याकरणांचीं दृष्टि पाणिनीप्रमाणें संर्वकष नव्हती' अशी टीका केली आहे. राजवाड्यांची ही टीका त्यांच्या पहिल्या विधानाला तर विरोधी आहेच; पण शिवाय ती त्यांच्या स्व—भावालाही विरोधी आहे. कारण ती करताना त्यांनी स्वकीयांचा पक्ष सोडून पिशेलसारख्या परकीयांचा पक्ष व तोही चुकीने स्वीकारला आहे. याच पिशेलविषयी त्यांनी अन्यत्र "पर्वती आणि प्रचंड गड यांच्यामध्ये जे अंतर ते पिशेल व पाणिनि यांच्यामध्ये आहे" असे म्हटले आहे. [सुबन्तविचार (भाइसंमं. शके १८३४, पृ. ८७.)]

(३) विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या नामाच्या सामान्यरूपाचा आरंभ द्वितीयेपासून होतो हे स्वमत मांडताना राजवाडे परि. ९ मध्ये म्हणतात :— "आधुनिक वैय्याकरण....सामान्यरूपाचा आरंभ तृतीयेपासून करतात तो चुकीचा होता." पण तेच राजवाडे पुढे इकारादि तिन्ही लिंगी नामांची रूपे म्हणून जी देतात ती पाहता त्यांच्या सामान्यीकरणाला आरंभ द्वितीयेपासून नव्हे तर तृतीयेपासून झालेला दिसतो. (उदा., डोला, विंचू, पाणी. इ.) सारांश, वैद्य [निबंध आणि भाषणे, पृ. १२७.] म्हणतात त्याप्रमाणे, द्वितीयेपासून सामान्यरूप होते ही राजवाड्यांची समजूत त्यांनीच दिलेल्या इतर नामांच्या रूपांना विरोधी आहे.

(४) नामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवरील अनुस्वाराचा शोध घेताना राजवाड्यांनी अशीच धरसोड केली आहे. एकदा ते म्हणतात की, "हा अनुनासिक आगंतुक, म्हणजे प्राकृतेतर आर्यभाषांतून किंवा भाषांच्या संसर्गानें, मराठींत आला असला पाहिजे." असे म्हणून या ठिकाणी त्यांनी पल्हवी किंवा जुने फारसी या भाषेतील 'आन्' या अनेकवचनी प्रत्ययाचा आधार व्युत्पत्तीदाखल घेतला आहे (परि. ●९). परंतु पुढे परि. ४२ त "हा अनुनासिक फारसीचा संसर्ग होण्याच्या पूर्वी मराठीत आला; अर्थात् संस्कृतांतील षष्ठीच्या व द्वितीयेच्या आन्-पासून याची उत्पत्ति आहे" अशी विधाने करताना त्यांनी आपल्या पूर्वीच्या विधानांतील फारसी 'आन्' प्रत्ययाचा आधार सोडून दिलेला दिसतो.

(५) प्रथमेप्रमाणे द्वितीयेची रूपे बनविण्याची लकब मराठीने अपभ्रंशापासून उचलली, माहाराष्ट्रीपासून नाही, असे सांगून राजवाडे पुढील व्यापक विधान करतात :— "अपभ्रंशाने ज्या ज्या पद्धति सुरू केल्या त्या त्या मराठीने चालू ठेविल्या" (परि. ●५). पुढे वर्तमाने लट्च्या, म्हणजे वर्तमानकाळाच्या संदर्भात मात्र"लट्मध्यें मराठीनें अपभ्रंशाला सोडून महाराष्ट्रीचें जास्त अनुकरण केले आहे. लिङ्, लोट् व

लङ् मध्येंहि महाराष्ट्रीचेंच मराठीनें अनुकरण केलेले आढळतें” असे ते म्हणतात (परि. ●४४). यातील विरोध स्पष्ट आहे.

(६)याशिवाय, आपले व्याकरण इंग्रजी व्याकरणावरून रचल्याबद्दल दादोबांना दोष देऊन (परि. ●७८) स्वत: क्रियापदाच्या पुरुषांच्या नावांचा क्रम १. उत्तम पुरुष, २. मध्यम पुरुष, व ३. प्रथम पुरुष असा इंग्रजी व्याकरणपद्धतीप्रमाणे ठेवण्यात राजवाडेही काही प्रमाणात त्या दोषाचे धनी झाले आहेत.

वरील सर्व विसंगतींचें एक समर्थन शक्य आहे. ते म्हणजे, राजवाड्यांनी हे व्याकरण लिहून हातावेगळे केल्यावर त्यानंतर त्यांचा हात त्यावरून फिरला नसावा. तसा तो फिरता तर वरील विसंगती त्यात कदाचित् राहिल्या नसत्या.

**अशास्त्रपूत टीका**

वैय्याकरण हा भाषेचे शास्त्र सिद्ध करणारा शास्त्रकार असतो. शास्त्रकाराने आपल्यापुढील वस्तूकडे स्वच्छ दृष्टीने पहावे. त्यात पूर्वग्रह, अतिरिक्त स्वाभिमान, मदमत्सर, वैयक्तिक निंदा किंवा अवहेलना यासारखे मनोविकार आड येऊ नयेत. राजवाड्यांना या गोष्टीची जाणीव नाही असे नाही. त्यांनी स्वतःच एका ठिकाणी शास्त्रविवेचनात दिसून येणाऱ्या पूर्वग्रहदूषित व अश्लाघ्य टीकेचा निषेध केला आहे. बीम्सच्या व्याकरणाविषयी लिहिताना ते ज्ञानेश्वरीच्या ‘प्रस्तावने’त म्हणतात :—“बीम्सच्या ग्रंथांत दुसरा एक अपूर्व व अक्षम्य अथवा गांवढळ दोष आहे. तो हा कीं, ठांई ठांई रागद्वेषादि विकारांचें अप्रस्तुत प्रदर्शन हा ग्राम्य ग्रंथकार करतो.” (परि.●११) पण राजवाड्यांनीही नेमके हेच केले आहे. त्यांच्या स्वभावाची घडणच अशी होती की, लिहिण्याच्या भरात त्यांना वरील तत्त्वाचा विसर पडे व मग त्यांच्या हातून वरील सर्व दोषांनी युक्त अशी कडक जहरी टीका प्रतिपक्षावर केली जाई. याची उदाहरणे त्यांच्या सर्वच लिखाणात सापडतात. प्रस्तुत ग्रंथांतील त्यांच्या टीकेचे काही मासले पुढे दिले आहेत:—

(१) ज्ञानेश्वरीच्या ‘प्रस्तावने’त मराठीच्या स्वकल्पित किरिस्तानी व मानभावी अपभ्रंशावर केलेली टीका (परि. ●२) अशिष्ट असून शिवाय अयोग्य आहे. कारण गोव्यातील किरिस्तॉंव ग्रंथकार किंवा देशावरील मानभाव ग्रंथकार आपापल्या अपभ्रंश (?) भाषेला पोटभाषेच्या योग्यतेला आणण्याच्या हेतूने ग्रंथरचना करीत होते हे राजवाड्यांचे म्हणणे बरोबर नाही. ते त्या त्या ठिकाणी रूढ असलेल्या ‘देशी’ भाषेत लिहीत होते हेच खरे. शिवाय, ‘मानभावी अपभ्रंश’ असा निराळा आहेच कोठे? ज्ञानेश्वरीची मराठी आणि मानभावांच्या ‘साती ग्रंथां’ची मराठी एकच नाही काय? तात्पर्य, राजवाड्यांची वरील टीका सर्वस्वी अनुचित आहे.

(२) “बीम्स म्हणतो त्याप्रमाणे ‘च’ चीं चिया, चिये, चेनि ही रूपे वृत्तसुखार्थ बनविलेली नाहीत….हव्या त्या सिद्धीला वाटतील ती मनःकल्पित कारणे देण्यात बीम्स व होर्न्ले ह्यांचा हातखंडा आहे!!! Philology म्हणजे भाषेच्या शरीराचे शास्त्र होय. जुने मराठी ग्रंथ न शोधल्यामुळे त्या भाषेचे इंद्रियविज्ञान, शारीरज्ञान त्यांना पारखे झाले, आणि अनेक बाबींत खऱ्याला सोडून कुड्याला जाण्याचा पंथ त्यांनी स्वीकारला.” (ज्ञा. व्या; परि. ●७)

अनुक्रमणिका

(२) "प्राकृतांत चतुर्थी नाही, असा दडपेबाजीचा नियम प्राकृत वैय्याकरण देतात." (ज्ञा. व्या; परि ●८)

(३) "अपभ्रंशांत 'घोडअहे गणु' असें षष्ठीचें एकवचन (अनेकवचन?) होतें, त्यावरून प्रथमेचें अनेकवचन 'घोडे' असें झालें असें तो (होर्न्ले) म्हणतो. परंतु, हे सर्व गप्पाष्टक आहे." (ज्ञा. व्या; परि. ●४२).

(४) "पाणिनीसारखा सूर्य सोडून, इंग्रजी कंदील घेतल्यामुळे दादोबा जागोजागीं उपहसनीय झाला आहे." (ज्ञा. व्या; परि. ●७८)

राजवाड्यांची वरील टीका शास्त्रीय ग्रंथात न शोभणारी तर आहेच; पण शिवाय काही ठिकाणी ती असत्यावर आधारलेली आहे. उदाहरणार्थ, 'अनेकवचनविषयक अनुनासिकाचा छडा बीम्स किंवा होर्न्ले ह्या दोघांतून एकानेहि लाविला नाही; इतकेच नव्हे तर हा प्रश्नच त्यांनी काढला नाहीं' असे राजवाडे म्हणतात (परि.●९), तेव्हा त्यांना 'Anuswara which evidently points back to the ण of the Prakrit genitive' या बीम्सच्या विधानाचा विसर पडलेला दिसतो. इतकेच नव्हे तर तो छडा लावताना त्याने णाम्, आन् व आनि या तिन्ही प्रत्ययांकडे बोट दाखविले आहे व त्यात फारसीचा आन् प्रत्यय निष्कारण ओढण्याची चूक केलेली नाही हेही राजवाडे सांगत नाहीत. तसेच, होर्न्लेच्या अनेकवचनविषयक विवेचनाला ते 'गप्पाष्टक' म्हणतात तेव्हा 'भक्तजन', 'बायकामंडळी' यांसारखे मराठी प्रयोग पाहून त्या गप्पाष्टकातील सत्यांशाची जाणीव होते. दादोबांप्रमाणे आपणही काही वेळ पाणिनीसारख्या सूर्याला सोडून इंग्रजी कंदील हाती घेतला याची जाणीव टीकेच्या भरात राजवाड्यांना राहात नाही. षष्ठीच्या 'च' प्रत्ययाची बीम्सची मीमांसा ते त्याज्य ठरवितात हे ठीकच आहे; पण तसे करताना त्याने प्रथम या 'च' चे व्युत्पादन सं. 'त्य' पासून केले असल्याने त्याचे ऋण सांगण्यास मात्र ते विसरतात.

राजवाड्यांच्या टीकेचा भर बीम्स, होर्न्ले व थोड्या प्रमाणात दादोबा यांच्यावर आहे. त्या मानाने डॉ. भांडारकरांविषयी ते संभाळून लिहितात. वरील तिघांच्या कृतींचे येथे समर्थन करावयाचे नाही; पण त्यांनी आपापली व्याकरणे केव्हा व कोणत्या परिस्थितीत लिहिली ते पाहिल्यावाचून त्यांना दोषार्ह ठरविता येणार नाही. पैकी बीम्सचे तौलनिक (ऐतिहासिक नव्हे) व्याकरण इ. स. १८७२ ते ७९ या काळातील असून त्यात विवेचिलेल्या सातही आर्यभाषा त्याला पूर्णपणे अवगत होत्या असे म्हणणे धाडसाचे होईल. त्याच्या प्रस्तावनेत "while awaiting for some Bopp or Grimm to arise' असे म्हणून त्याने आपल्या अभ्यासाच्या व प्रयत्नाच्या मर्यादा मान्यही केल्या आहेत. तीच गोष्ट काही प्रमाणात होर्न्ले व ग्रियरसन यांचीही आहे. त्यांपैकी कोणीच निर्दोषत्वाची बढाई मारलेली नाही. दादोबांचे व्याकरण तर त्याही पूर्वीचे, म्हणजे इ. स. १८३६ तील असून त्यांची झेपही फार मर्यादित आहे. वास्तविक पाहता राजवाड्यांनी त्यांची मराठी भाषेचे पहिले व्याकरणकार म्हणून पाठ थोपटावयास पाहिजे होती. पण स्व-भाव आड आला आणि तसे न करता उलट त्यांनी दादोबांना धारेवर धरले.

**राजवाडे यांचे भाषाविषयक कर्तृत्व**

डॉ. केतकरांनी राजवाड्यांवरील आपल्या लेखात त्यांच्या भाषाविषयक कामगिरीचा गौरव करताना म्हटले आहे : "राजवाड्यांच्या अनेक कामगिऱ्यांपैकी सर्वात अधिक मोठी कामगिरी कोणती हे

ठरवून त्यांचे वर्णन करावयाचे झाले तर त्यांस भाषाशास्त्रज्ञ म्हणावे लागेल आणि त्यांची गणना अत्यंत मोठ्या वैय्याकरणात करावी लागेल. हेमचंद्र आणि वररुची यांचे प्रयत्न राजवाड्यांच्या प्रयत्नाच्या दृष्टीने काहीच नाहीत. इतिहासाचार्य किंवा इतिहाससंशोधक हे नाव राजवाड्यांस देण्यात आपण त्यांच्या कार्याचे अज्ञान दाखवू. त्यांच्या बौद्धिक कार्याचे गुरुलघुत्व माझ्या मते (१) भाषाशास्त्रज्ञ (२) वैयाकरण, (३) शब्दसंग्राहक व (४) इतिहाससंशोधक या अनुक्रमाने आहे." डॉ. केतकरांचा वरील अभिप्राय यथार्थ आहे असे राजवाड्यांचे भाषाविषयक लेखन पाहून वाटते. या क्षेत्रातील त्यांच्या अभ्यासाचा परिपाक म्हणजे त्यांची ज्ञानेश्वरीची 'प्रस्तावना', ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण व तिङन्त विचार आणि सुबन्त विचार यांसारखे शोधनिबंध. त्यांतून, विशेषतः त्यांच्या शोधनिबंधांतून, त्यांचे काही व्याकरणविषयक विचार उद्धृत करण्यासारखे आहेत. त्यावरून त्यांच्या दृष्टिकोनाची कल्पना येईल :—

"व्याकरणशास्त्र हे समाजशास्त्राचे व इतिहासशास्त्राचे व मानववंशशास्त्राचे मोठे उपकारक आहे. समाजशास्त्रात, इतिहासशास्त्रात व मानववंशशास्त्रात तौलनिक व ऐतिहासिक व्याकरणशास्त्राच्या साहाय्याने अनेक गोष्टींचा उलगडा होत असतो व तो इतर कोणत्याहि शास्त्रांच्या साहाय्याने जसा व्हावा तसा समर्पक होत नाही." (सुबन्तविचार, पृ. ९०).

"व्याकरण हे प्रायोगिक शास्त्र नाही; आवलोकनिक शास्त्र आहे." (लेखसंग्रह, भा. २, पृ. १२).

"व्याकरण म्हणजे बोलूनचालून फोड. या फोडीचे शास्त्र, फोड होणे शक्य नाही तेथपर्यंत न्यावयाचे असते. जेथे अन्वय लागत नाही, जेथे लिंगवचनविभक्ति कळत नाही, तेथे व्याकरणशास्त्र इतर शास्त्रांप्रमाणे थांबते." (लेखसंग्रह, भा. २, पृ. २७).

व्याकरणक्षेत्रातील राजवाड्यांचे कार्य बहुविध आहे. विशेषतः वर्गण आणि निरुक्त या दोन शाखांत ते विशेष प्रभावी आणि प्रज्ञायुक्त वाटते. राजवाडे जसे व्याचिकीर्षु तसेच नैरुक्तही होते. तसेच मराठी भाषेच्या सीमान्त धातूंचे संशोधन व संकलन करून त्यांनी जो धातुपाठ सिद्ध केला तोही त्यांच्या बुद्धिवैभवाची साक्ष देतो. मराठी भाषेचे पाणिनी दादोबांना म्हणतात, राजवाड्यांना म्हणत नाहीत. अर्थात् पाणिनी व दादोबा यांत महदंतर असून त्यांच्यातील साम्य त्यांच्या त्या त्या भाषेतील प्रथमकर्तत्वापुरतेच आहे. जसे पाणिनीने संस्कृताचे तसे दादोबांनी मराठीचे व्यवस्थापन करण्याचा पहिला मान मिळविला. राजवाड्यांचे कर्तृत्व वरील दोघांच्याहून निराळे आहे व एका दृष्टीने सरसही आहे. त्यांच्याच शब्दांत [राजवाडे—लेखसंग्रह, भा. २, पृ. २८.] सांगावयाचे तर "पाणिनि वेदभाषेचें व प्रचलित संस्कृत लोकभाषेचें व्याकरण रचीत होता; लोकभाषेचें ऐतिहासिक व्याकरण रचीत नव्हता." राजवाड्यांचा दृष्टिकोण अधिक व्यापक आहे. ते भाषेच्या केवळ वर्णनात्मक विवेचनावर संतुष्ट नाहीत. त्यापलीकडे किंवा मागे जाऊन भाषेचा इतिहास शोधावा ही त्यांची खरी भूक आहे. भाषेच्या इतिहासाची त्यांची कल्पनाही व्यापक आहे. 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास' या आपल्या निबंधात ते म्हणतात :—

"मराठी भाषेचा इतिहास म्हणजे काय? हा इतिहास म्हणजे एक बंडच आहे. त्याचे अनेक भाग व उपकरणे आहेत....भाषा म्हटली म्हणजे तिचे खालील अवयव सर्वमान्य असतातः (१) उच्चार, (२) उच्चाराच्या खुणा ऊर्फ अक्षरे, (३) शब्द, (४) वाक्य, (५) आगम, आदेश, प्रत्यय इत्यादी, (६) स्वर व आघात. हे सहा अवयव मातृभाषेतून अपत्यभाषेत कोणत्या रूपान्तरांनी उतरले व अपत्यभाषेच्या जन्मापासून अद्यतन हयातीपर्यंत त्या रूपान्तरांत कोणकोणते फेरफार झाले या बाबींची नियमबद्ध हकीकत

अनुक्रमणिका

सांगणे म्हणजे मराठी भाषेचा इतिहास लिहिणे. मातृभाषेला दुसरी अपत्ये व चुलतेमामे असल्यास त्या सोदरांच्या व चुलत्यामामांच्या रूपांहून विवक्षित अपत्याचे रूप कोणत्या बाबीत समविषम आहे व का आहे याचाही ऊहापोह भाषेच्या इतिहासात करण्यापासून त्या भाषेचे रूप ठळकपणे व वैशिष्ट्याने ध्यानात येण्यास मार्ग होतो. तसेच ज्या समाजात, संस्कृतीत व हवापाण्यात मातृभाषा जन्मली व वाढली त्या समाजाहून, संस्कृतीहून किंवा हवापाण्याहून निराळ्या परिस्थितीत अपत्यभाषा जन्मल्यामुळे व वाढल्यामुळे अपत्याचे रूप कसे व किती बदलले वगैरे प्रश्नही याच इतिहासात पडतात." (राजवाडे लेखसंग्रह, पृ. १०१).

वरील उतारा स्पष्टपणे सांगतो की इतर युरोपीय भाषाशास्त्रज्ञांप्रमाणे राजवाड्यांच्या मतेही भाषेचे ऐतिहासिक व्याकरण व भाषेचा इतिहास या एकाच अर्थाच्या संज्ञा होत. भाषेचे पृथक्करण आणि भाषेचा इतिहास यांपैकी पाणिनीने पृथःकरण अनुपम केले असले तरी "वैदिक भाषेतून संस्कृत भाषेत शब्द येताना त्यांच्यांत फेरबदल कोणत्या नियमांनी झाले हे सांगण्याचे स्वप्नसुद्धा त्याच्या ग्रंथात नाहीं" असे पुढे राजवाडे म्हणतात. तसेच "हे कालदुर्लक्ष्य त्याने मुद्दाम केले.... व कालाकडे म्हणजे इतिहासाकडे दुर्लक्ष्य केल्यामुळे पाणिनीच्या निरुपम कृतीत मोठाच दोष घुसला आहे" असेंही त्यांचे स्पष्ट मत आहे (उपर्युक्त, पृ. १०२–१०३). येणेप्रमाणे मराठी भाषेचा इतिहास रचावयाचा म्हणजे (१) कोश ऊर्फ निघंटू, (२) निरुक्त, (३) व्याकरण, (४) आदेशपत्रिका, व (५) वाक्येतिहास ऊर्फ साहित्याचा इतिहास असे पाच ग्रंथ सिद्ध करण्याची आवश्यकता त्यांनी सांगितली आहे. यांपैकी राजवाड्यांनी ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण तर रचिलेच, पण एकूण मराठी लोकभाषेच्या ऐतिहासिक व्याकरणाची त्यांनी पूर्वतयारी करून ठेवली. त्यांची भाषाविषयक स्फुट टिपणे म्हणजे या पूर्वतयारीचाच भाग होत. आणि हे सर्व कार्य त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केले. सरकार, संस्थानिक किंवा विद्यापीठे यांपैकी कोणाचाही आधार नसताना, विद्वान त्याविषयी उदासीन असताना, विरोधक टपून बसलेले असताना आणि सर्वसामान्य वाचकवर्ग विन्मुख असताना राजवाड्यांनी मराठी भाषेचे जे शास्त्रकार्य केले त्याला इतिहासात तोड नाही. परिस्थितीपुढे वाकणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. 'सुबन्तविचार' या निबंधात सद्यःकालीन परिस्थितीविषयी ते म्हणतात : "ही स्थिती काही उत्साहविघातक नाही. संकट यावे तर असेच यावे. ह्या संकटातच आपल्या कर्तबगारीची खरी परीक्षा आहे." (पृ. ८८) उपर्युक्त परीक्षेला राजवाडे उतरले व त्यांनी महाराष्ट्राच्या हाती अस्सल ज्ञानेश्वरीबरोबर तिचे व्याकरणही दिले हे त्यांचे मोठेपण.

**देशभक्तीचा बाणा**

राजवाडे हे देशासाठी फकिरी पतकरून इतिहास व भाषासंशोधन करणारे राष्ट्रभक्त होते. त्यांची देशभक्ती आणि संशोधनप्रेम यांत अधिक उत्कट काय होते ते सांगणे कठिण आहे. त्यामुळेच त्यांच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या लिखाणात त्यांच्यातील संशोधक जागा असलेला दिसतो, आणि संशोधनपर लेखनातही त्यांचा राष्ट्रीय बाणा उठून दिसतो. येथे या दुसऱ्या प्रकाराची थोडी उदाहरणे पाहावयाची आहेत.

वास्तविक पाहाता ज्ञानेश्वरीची प्रस्तावना काय किंवा तिचे व्याकरण काय, हे दोन्ही विषय केवळ संशोधनाचे किंवा विद्वत्तेचे. त्यांच्या विवेचनात देशभक्तीच्या भावनेला विशेष अवसर नाही. परंतु राजवाड्यांचा मनःपिंडच देशभक्ताचा असल्यामुळे त्यांच्या संशोधनपर लिखाणातही वरील भावना नकळत प्रकट होते. या दृष्टीने त्यांनी बीम्सच्या व्याकरणातील उतारा देऊन त्यावर केलेले एकवाक्यी भाष्य

अनुक्रमणिका

("भोसल्यांच्या वेळी आंवढ्यातले लोक पोटे बांधून कामे करीत होते!!!" परि. ●११), युरोपियन विद्वानांचे मात्सर्य व करंटलक्षण यांवर उठविलेली झोड (परि. ●१५), त्यांच्या पालीवरील मतलबी प्रेमाचा केलेला दंभस्फोट (परि. ●१७), 'बाटेगिरीच्या कल्पना पसरविण्यात भूषण मानणाऱ्या शोधकां' चा केलेला उपहास (परि. ●२९) इत्यादि 'प्रस्तावने'तील स्थळे उल्लेखनीय आहेत. व्याकरणात तर प्रतिपक्षाचा आणि विशेषतः युरोपियन वैयाकरणांचा व दादोबांचा समाचार घेताना त्यांच्या लेखणीला विलक्षण धार येते आणि त्या भरात ते लिहू नये ते लिहून जातात. शास्त्रीय लेखनात रागद्वेषादि विकारांचे प्रदर्शन नको असे आवर्जून सांगून ते स्वतःच अशा प्रकारचे प्रदर्शन करण्यात रमून जातात. मग त्यांना ज्ञानेश्वरीच्या कोणा संपादकाने दर प्रतीकाच्या व पदाच्या नंतर ज्ञानेश्वरी टीका ओव्यांचे तुकडे पाडून दिली तर ते 'आधुनिक चोचले' वाटतात (ज्ञा. प्रस्ता., परि. ●६६) आणि कोणी मराठीच्या लेखनपद्धतीत सुधारणा सुचविली तर त्यांच्या दृष्टीने तो 'वैयाकरणंमन्य' ठरतो (ज्ञा. व्या., परि. ●४५). परंतु हा राजवाड्यांचा स्वभाव आहे. तेवढा वगळल्यास त्यांच्या सर्वच लिखाणात जी राष्ट्रभक्तीची प्रखर भावना आढळते तींच येथेही दिसून येईल. त्यांच्या मनातून मराठी भाषेची उज्ज्वल पूर्वपरंपरा सांगून तिचा साद्यन्त इतिहास कथन करावयाचा होता व तिच्याभोवती बसू पाहणारी इंग्रजी व्याकरणपद्धतीची चौकट दूर सारून तिला तिचेच 'जुने ठेवणे' असलेल्या पाणिनीय व्याकरणाच्या आकृतिबंधात बसवावयाची होती. 'परस्थ' होत असलेल्या आपल्या मायभाषेला ते 'स्व-स्थ' करू पाहात होते. त्यासाठी त्यांचा हा सारा आटापिटा होता. म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या आपल्या पोथीची एक जुळी बहीण माडगावकरांना गवसली हे कळल्यावर त्यांना परमानंद झाला व तो त्यांनी बोलूनही दाखविला. त्यांचे नाणे खरेच होते; पण नाणे नुसते खरे असून चालत नाही, त्याचे खरेपण जगाच्या बाजारात सिद्ध व्हावे लागते. तसे ते व्हावे एवढ्यासाठी राजवाड्यांनी या प्रदीर्घ 'प्रस्तावने'चा प्रपंच केला आणि नंतर त्या खऱ्या ठरलेल्या नाण्याचे पैलू जगाला दाखवले. साहजिकच एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या या भाषाशास्त्रज्ञाचे काही रागलोभ त्याच्या लिखाणात दिसून आले तर त्यात आश्चर्य नाही. पण त्या रागलोभांच्या मागे एक प्रकारची पोटतिडीक आहे हे विसरून चालणार नाही. ही पोटतिडीक स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा या तिहींविषयी आहे. तसेच ती व्यक्त होताना कोठे तडजोडीची भाषा नाही. सारे काम रोखठोक आहे. त्यांचा प्रतिपक्षी साधा 'चुकत' नाही, तर 'तोंडघशी पडतो!' पण राजवाड्यांसारख्यांच्याकडून असा पराभव व्हावयाला सुद्धा काही पूर्वपुण्याई लागत असणारच!

**भाषाशैली**

भाषाशास्त्रीय लेखनात शैलीची अपेक्षा किंवा चर्चा करणे हे केव्हाही अयोग्यच. कारण जे बोलूनचालून शास्त्रीय लिखाण आहे त्यात शैलीचे गुण कोठून सापडणार? पण राजवाडे यांची स्वतःची अशी एक खास शैली होती आणि ते काहीहि लिहोत, त्यांची ही शैली त्या लेखनात अचूकपणे प्रगट होई. त्यांच्या मनातील आवेश लेखनात ओजोगुणाच्या रूपाने अवतरे व त्यासरशी ते अतिशय धारदार आणि भेदक असे काही लिहून जात. भाषेच्या इतिहासासारखा, व्याकरणासारखा विषय त्यांनी वैयाकरणाला योग्य अशा मितव्ययानेच हाताळला आहे व त्यांची विवेचने वाचताना वैयाकरणाला प्रिय असणाऱ्या 'अर्धमात्रालाघवा' चा वरचेवर प्रत्यय येतो. पण त्यातसुद्धा त्यांची मार्मिकता दिसून येते. आपल्या विवेचनाच्या शेवटी कित्येकदा ते एखादा सार्वत्रिक सिद्धान्त सहज सांगून जातात; उदाहरणार्थ,

(भाषेच्या कालकृत अवस्थान्तरांविषयी) "व्यक्ति तीच; वस्त्रें तेवढीं निराळीं. पुरुष एकच, बाल्यतारुण्यवार्द्धक्यादि अवस्थान्तरें मात्र अनेक." (ज्ञा. प्रस्ता., परि. ●३)

अनुक्रमणिका

“उदार, ललित, अभिजात व नागर गद्यपद्यबंध जो निर्माण होतो त्याला सारस्वत अशी अनन्यसामान्य संज्ञा आहे.” (ज्ञा. प्रस्ता., परि.●१३)

“अशिष्ट लोकांच्या ठायी जुन्याला चिकटण्याचा व नव्याला धरण्याचा परस्परविरोधी दुतोंडी गुण असतो.” (ज्ञा. प्रस्ता., परि. ●१७)

“पूर्वभाषा असतांनाच उत्तरभाषा अपभ्रंश म्हणून सुरू होते,” व “उत्तरभाषा लोकमान्य होत असतांना पूर्वभाषा काही काल टिकाव धरून रहाते.” (ज्ञा. प्रस्ता., परि. ●३५)

“अपभ्रष्ट भाषा या शब्दाऐवजीं सुलभोच्चारप्रवण भाषा अशी परिभाषा योजल्यास, हा वादच मिटतो.” (ज्ञा. व्या., परि. ●३)

“परंपरा व इतिहास हे निरुक्तीचे दोन नेत्र होत. तद्व्यतिरिक्त ही आंधळी होय.” (ज्ञा. व्या., परि. ●५)

“Philology म्हणजे भाषेच्या शरीराचे शास्त्र होय.” (ज्ञा. व्या., परि. ●१७)

क्वचित् मधूनच राजवाड्यांच्या कल्पनेला पंख फुटतात आणि मग तिला मराठी व्याकरणातील ‘चान्त षष्ठी’ चे विवेचन चालू असताना, या ‘च’ ने वैय्याकरणांना दिलेले नाना प्रकारचे गोते पाहून, मी मी म्हणणाऱ्या नावाड्यांना वादळात भिंगरीसारखे गरगर फिरविणाऱ्या एरियलची आठवण होते. (ज्ञा. व्या., परि. ●१६) अत्युक्ती हाही राजवाडी शैलीचा एक विशेष असून तो “मराठीतील शब्दप्राचुर्याची बरोबरी पृथ्वीवरील इतर कोणत्याही भाषेला करतां यावयाची नाही.” (ज्ञा. प्रस्ता., परि. ●८) यासारख्या विधानातून जाणवतो. उपहास व उपरोध यांचा रंग तर पदोपदी उधळलेला आहे. त्याचे ‘व्याकरणा’ तील काही मासले यापूर्वी पाहिलेच आहेत. पुढे ‘प्रस्तावने’ तून एकदोन देतो :—

“युरोपियन लोक वनस्पतिशास्त्र जितक्या बारकाईने रचतात, तितक्याच बारकाईने हिंदू लोकांनी व्याकरणशास्त्राची रचना केलेली आहे. त्यामुळे पृथक्करणान्ती त्यांना जे असंख्य व सूक्ष्म भेद सहज दिसतात ते युरोपियनांच्या अश्रद्धेचे विषय होतात. बाब अज्ञानोजृंभित हेकाडपणाची असल्यामुळे लक्ष्य देण्यासारखी नसून, नितान्त तिरस्करणीय आहे.” (परि. ●६)

“युरोपातील तीनचारशे वर्षांतल्या उपटसुंभ राष्ट्रांना भारतवर्षाच्या थोर, प्रौढ व संभावित पुरातनत्वाचा हेवा वाटतो, हे त्यांच्या लघुमनाचे द्योतक आहे. बकाल करंट्यांना गर्भश्रीमंतीचा हेवा वाटावा, ह्यात काही नवल नाही! शास्त्रीय शोधात मात्सर्याचा आवेश आणणे मायावी असुरांनाही लज्जास्पद होय.” (परि. ●१५)

राजवाड्यांची शब्दयोजनाही पाहण्यासारखी आहे. सध्याचे भक्तिमार्गी लोक त्यांना ‘गचाळ’ वाटतात, ओव्यांचे पदच्छेद करून ज्ञानेश्वरी छापणे हे त्यांच्या दृष्टीने आधुनिक ‘चोचले’ ठरतात, आणि एखादा सिद्धान्त त्यांच्या मताने ‘कमजोर’ न होता उलट ‘शिरजोर’ च होतो. राजवाड्यांची भाषा खास मऱ्हाठी वळणाची आहे. तिला स्वकीय शब्दांचे प्रेम असले तरी परकीय शब्दांचे वावडेही नाही. त्यामुळे ते

हाताशी येणारा शब्द वापरून मोकळे होतात; तो शब्द वाङ्मयीन आहे की नाही हा विचार ते करीत बसत नाहीत. साहजिकच त्यांच्या भाषेत एक प्रकारचा आवेश किंवा रोखठोकपणा आला आहे. थोडक्यात, त्यांची भाषा त्यांच्याप्रमाणे आहे.

**थोडे गुणदोषविवेचन**

राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेचे व व्याकरणाचे एकूण स्वरूप वरीलप्रमाणे आहे. ही दोन्ही प्रकरणे स्थूलमानाने ज्ञानेश्वरीसंबंधीच असली तरी त्यांचे विषय भिन्न आहेत. पहिले इतिहासवजा असून दुसरे उघडच वैयाकरणिक आहे. असे असले तरी काही गुणदोष या दोन्ही प्रकरणांना समान आहेत. त्याशिवाय प्रत्येकाचे काही स्वतंत्र गुणदोष आहेत ते निराळेच. या दोन्ही प्रकारांची थोडक्यात चर्चा करून या प्रस्तावनेचा समारोप करावयाचा आहे.

गुणांच्या बाजूस सर्वप्रथम म्हणजे राजवाड्यांची असामान्य प्रतिभा. ज्ञानेश्वरीच्या एका जुन्या पोथीचे निमित्त करून मराठी भाषेची पूर्वपरंपरा शोधण्याचे व त्या भाषेचे ऐतिहासिक व्याकरण रचण्याचे जे त्यांनी योजिले त्यातच त्यांची प्रतिभाशक्ती दिसून येते. हे विषय त्यांच्या मनात बरेच दिवस घोळत होते व ज्ञानेश्वरीच्या पाटांगणी प्रतीचे निमित्त करून त्यांच्या प्रतिभेने त्यांना आकार दिला. संशोधनविषयाच्या निवडीत प्रतिभेचा भाग जरूर असतो व त्याचा उपयोग करूनच राजवाड्यांनी आपल्या मनातील अनेक वर्षांच्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिले. ही प्रतिभा जशी विषयाच्या निवडीत तशीच त्याच्या उद्घाटनातही दिसून येते. प्रतिपाद्य विषयाचे संपूर्ण स्वरूप साकल्याने डोळ्यापुढे असल्याशिवाय त्याचे उद्घाटन इतक्या व्यवस्थितपणे व अचूकपणे झाले नसते. तपशिलाबाबत बोलावयाचे तर पूर्ववैदिक भाषेपासून ज्ञानेश्वरीच्या भाषेपर्यंत जुळवून दाखविलेली साखळी, मराठीतील षष्ठी विभक्तीच्या चान्त विशेषणांचा व नामांच्या ‘सामान्यरूपा’चा केलेला उकल, पाणिनीच्या दशविध ‘ल’ कारांचा मराठीच्या आख्यातविभक्तीत घेतलेला शोध, मराठी निपातांचे केलेले निरुक्त इत्यादि गोष्टी केवळ प्रतिभासाध्य म्हणून दाखविता येतील. हे डॉ. भांडारकरांनासुद्धा साधले नाही; मग इतरांविषयी बोलावयासच नको. अनेक वर्षांच्या तपश्चर्येने व त्याहीपेक्षा एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेने राजवाड्यांना जणू दिव्य दृष्टी लाभली होती आणि तिच्या प्रकाशात त्यांनी ही अवघड वाट चोखाळली. ती वाट रुळलेली नव्हती; नवीनच होती. ती किती अवघड आहे ते त्यांनी ‘प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास’ या आपल्या लेखात पुढील शब्दांमध्ये सांगितले आहे :“निरुक्तीचें हें कृत्य हुकमी नाहीं. वैदिक,संस्कृत, महाराष्ट्री, अर्धमागधी वगैरे ग्रंथ वाचता वाचता पूर्वभाषांतील शब्दांची पश्चात्कभाषांतील म्हणजे मराठीतील शब्दांशी सांगड घालून द्यावयाची असते. ही हातोटी केवळ अनुभवानें येणारी आहे. हजारो चुका कराव्या, शेकडोंदा भलत्या पूर्वशब्दाची भलत्याच मराठी शब्दांशी लग्ने लावून द्यावीं व नंतर खरीं वधूवरें सापडली असता खोटीं लग्ने निर्लज्जपणें मोडून टाकावीं, असे टक्केटोणपे खाता खाता शब्दशास्त्राचे जोसपण आंगी बाणत असते, एऱ्हवी नाही. यद्यपि जोसपण आंगी बाणले तत्रापि मराठीतील वाटेल त्या शब्दाचे महाराष्ट्री किंवा संस्कृत गणगोत कोणीही जोशी ताडकन् बिनचूक सांगू शकत नाही. पूर्वभाषेतील ग्रंथ वाचीत असताना स्मृति, उपस्थिति व कल्पकता या त्रयींची ज्या मानाने कृपा होईल त्या मानाने मराठी शब्दांच्या संस्कृत गणगोताचे टिपण करून ठेवावयाचे असते. अशी टिपणे ज्याने दोन-चार तपे केली त्याला निरुक्ताचार्यांच्या पदवीवर न्यायानें हक्क सांगता येतो.” (रा. लेखसंग्रह, पृ. १००–१०१). या पदवीवर स्वतः राजवाड्यांचा हक्क कितपत पोचतो हा प्रश्न बाजूस ठेवला तरी वरील अ-हलित व म्हणून अवघड वाट चोखाळताना ते क्वचित कोठे चुकलेमाकले असतील; परंतु तेवढ्यामुळे त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी होत नाही. उलट, धडपडत, ठेचाळत का होईना,

अनुक्रमणिका

पण त्यांनी मुक्काम गाठला व मराठी भाषेच्या ऐतिहासिक व्याकरणाचा पाया रचला हे त्यांचे खरे कर्तृत्व आहे त्यांचा दुसरा गुण म्हणजे दीर्घोद्योग. त्याच्या अभावी नुसती प्रतिभा खुरटून गेली असती प्रतिभेला व्यासंगाचे खतपाणी मिळाले तरच ती फोफावते, एरव्ही अल्पकाळ फुलून सुकून जाते हे खतपाणी राजवाड्यांनी तिला भरपूर दिले. ते जन्माचे व्यासंगी होते; नव्हे, व्यासंग हे त्यांचे वेडच होते. त्यांची ज्ञानेश्वरीची प्रस्तावना वाचताना त्यांचा चौफेर व्यासंग पदोपदी जाणवतो. संस्कृत–प्राकृत–मराठी तर त्यांना करतलामलकवत् होत्याच; पण त्यांचे इंग्रजीखेरीज इतर युरोपीय भाषांतून झालेले अभ्यासही त्यांना परिचित होते, याची साक्ष त्यांच्या 'प्रस्तावने'त मिळते. त्यांच्या व्यासंगाचा एक विशेष हा की दुधाची साय त्यातच मुरून जावी त्याप्रमाणे तो त्यांच्या ठिकाणी मुरून गेला असल्याने ते आपल्या पांडित्याचे ओझे कोठे वागवताना दिसत नाहीत. त्यांच्या या 'प्रस्तावने'ला काय किंवा व्याकरणाला काय, विशेष कोठे तळटीपा वगैरे नाहीत. हे त्यांच्या 'सहज' व्यासंगाचेच लक्षण आहे. तर्कशुद्ध मांडणी हा त्यांच्या या दोन्ही कृतींत दिसून येणारा तिसरा गुण. त्यांचे सिद्धांत कोणास पटोत वा न पटोत, ते ज्या पद्धतीने त्यांनी मांडले ती पद्धती निर्दोष आहे. याचे एक उदाहरण द्यावयाचे तर पाली भाषा ही युरोपीय वैयाकरण म्हणतात त्याप्रमाणे वैदिक भाषेच्या बरोबरीची नसून ती पाणिनीय भाषेची छाया आहे या सिद्धान्ताची राजवाडे यांनी केलेली उभारणी पाहावी (ज्ञा. प्रस्ता., परि. ●१७). ती आग्रही वाटेल, पण ती तर्कशुद्ध आहे. भाषेचा इतिहास किंवा तिचे ऐतिहासिक व्याकरण रचण्याला बुद्धीची आणि तर्काची जी एक शिस्त लागते ती राजवाड्यांपाशी असल्यामुळे त्यांची एतद्विषयक विवेचने नीटस व नितळ उतरली आहेत. त्यांत कोठे भोंगळपणा किंवा गलथानपणा आढळणार नाही. त्यांच्या लेखनातील काटेकोरपणाचे मूळ लेखकाच्या तर्कशुद्ध बुद्धिमत्तेत आहे.

याप्रमाणे अनेक दुर्मिळ गुणांचा संगम राजवाड्यांच्या ठिकाणी झालेला असून त्यामुळे त्यांच्या लिहिण्याला एक निराळेच तेज चढले आहे. याचा अर्थ त्यांचे लिहिणे निर्दोष आहे असा मात्र नव्हे. त्यातील दोषांची किंवा उणिवांची यादी देण्यात काही अर्थ नाही. प्रथम भाषेचा 'आदेशेतिहास' न सांगता एकदम ऐतिहासिक व्याकरणाला हात घालणे यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाचा पायाच अशास्त्रीय झाला आहे. कारण कोणत्याही भाषेचे ऐतिहासिक व्याकरण तिच्या आदेशेतिहासावर उभारले जाते, किंबहुना त्याचा एक भाग असते. पण राजवाड्यांनी आधी कळस व मग पाया (की जो शेवटपर्यंत रचला गेलाच नाही) कल्पून प्रथमग्रासेच मक्षिकापात केला आहे. पण अशा प्रकारे त्यांच्या प्रस्तुत कृतीतील दोषदर्शन करण्याचे कारण नाही. त्यांच्या गुणांप्रमाणे त्यांचे दोषही उघड आहेत, ते कोणीही टिपू शकेल. हे सर्व दोष ज्या एका मूलप्रवृत्तीतून निर्माण झाले ती म्हणजे राजवाड्यांचा आग्रह किंवा दुराग्रह. त्यांच्या स्वभावाची काही उदाहरणे मागे दिलीच आहेत. मुख्य म्हणजे, "मराठीतील एकोनएक लहान व मोठ्या लकबा भगवान पाणिनीच्या अष्टाध्यायीत नमूद आहेत" या आपल्या आवडत्या सिद्धान्ताच्या पोषणार्थ त्यांची लेखणी सदैव सिद्ध असलेली दिसते. इतकेच नव्हे तर पाणिनीच्याही मागे जाऊन पूर्ववैदिक बोली भाषेत मराठीचे सर्व 'प्रकृतिविकृतिभाव' ते शोध पाहातात. याप्रमाणे मराठी भाषेचे बीज दहा हजार वर्षांपूर्वीच्या एका बोलीत शोधण्याची कल्पना प्रतिभासंपन्न वाटली तरी ती धाडसीच म्हटली पाहिजे. शिवाय, ती व्यवहार्यही नाही. पण राजवाडे, आपल्या दुराग्रही स्वभावानुसार, तिला हट्टाने व्यवहारात आणू पाहातात आणि येथेच नेमके त्यांचे शास्त्र लटके पडते. मग पिशेलादि पाश्चात्य वैयाकरणांचा उद्धार करून त्यांना 'शेषं कोपेन पूरयेत्' या सुभाषिताचा आश्रय करावा लागतो. जे मराठी भाषेचे तेच प्रस्तुतच्या ज्ञानेश्वरीचे. आपणास बीड-पाटांगण येथे मिळालेली ज्ञानेश्वरीची पोथी म्हणजे 'विवेकसिंधु'कार मुकुंदराज याने स्वतःसाठी लिहवून घेतलेली प्रत होय असा आग्रह न धरता, उपलब्ध प्रतींमध्ये सर्वांत अधिक प्राचीन पाठ देणारी ही प्रत आहे इतकेच त्यांनी म्हटले असते तर पुढील सर्व वाद कदाचित् टळले असते, आणि आपले

अनुक्रमणिका

म्हणणे लोकांना न पटल्यामुळे संतापाच्या भरात मूळ पोथीच नाहीशी करून टाकण्याचा प्रसंगही त्यांच्यावर आला नसता. पण येथेही पुन्हा राजवाड्यांचा स्वभाव आड आला आणि त्यामुळे त्यांनी प्राणपणाने मिळविलेल्या, जोपासलेल्या व पुरस्कारलेल्या 'ज्ञानेश्वरी' चे त्यांच्या टीकाकारांनी अक्षरशः वाभाडे काढले. खरोखर पाहिले असता, एवढा एक दुराग्रह बाजूस ठेवला तर त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत आणि व्याकरणात वावगे असे काय होते? उलट, जे काही होते ते बावनकशी सोनेच होते. त्याला सोनाराचा थोडा गुण लागला होता, इतकेच. पण तो बाजूला काढून पाहिल्यास मूळचे सोने आपल्या शुद्ध स्वरूपात प्रगट होईल यात काही शंका नाही.

**समारोप**

या प्रस्तावनेचा समारोप कै. गो. कृ. मोडकशास्त्री यांच्या शब्दांत करणे उचित होईल. 'राजवाडे—ज्ञानेश्वरीचें पुराणत्व' या आपल्या उपर्युक्त लेखाच्या शेवटी त्यांनी म्हटले आहे,

"एखाद्या विषयाचा अभ्यास यथावत् होण्यास 'बाबावाक्यं प्रमाणम्' ही दृष्टि न ठेवितां अभ्यासकाने दोषैकदृक् अवश्य बनलें पाहिजे. पूर्वाचार्यांनीं केलेले प्रबंध त्यानें जरूर वाचावे; पण त्यांतील प्रत्येक विधान तर्ककर्कश पद्धतीनें पारखूनच घेतलें पाहिजे. अशाच दृष्टीनें राजवाड्यांचे ग्रंथ भक्तीनें पण चिकित्सेनें यथालब्ध मी वाचितों. त्यांच्या ग्रंथांतील गुणांप्रमाणें दोषही मी पाहतों. गुणाबरोबर दोषाकडे दृष्टि प्रत्येक अभ्यासकानें ठेवावी; म्हणजे मराठी भाषेचें अध्ययन पायाशुद्ध होईल. अमुक एक गोष्ट सूरि म्हणतात म्हणूनच खरी, ही मुग्ध दृष्टि टाकून द्यावी. एखाद्या विषयावरील आद्य लेखकाच्या हातून चुका होणें मनुजशीलानुसार साहजिक आहे. पण चुका त्या चुका. त्या करणारा मनुष्य आद्यलेखक असो वा इतर कोणी असो. त्या चुका ज्यास आढळतील त्यानें, इतर लोकांच्या हिताकरितां, चवाठ्यावर आणिल्याच पाहिजेत. अशा शंकेखोर व डोळस भक्ताची किंमत केवळ चिकित्साहीन व अंधश्रद्ध भक्ताहून केव्हांही अधिक आहे."

***

अनुक्रमणिका

राजवाडे यांची

ज्ञानेश्वरीची प्रस्तावना

अनुक्रमणिका

श्री

# प्रस्तावना

## परिच्छेद क्र.

### व्याकरणाची व्याख्या;प्रांतकृत भाषाभेद; जातिकृत भाषाभेद; लिंगकृत भाषाभेद; कालकृत भाषाभेद.

**व्याकरणाची व्याख्या**

**●१.** विवक्षित लोक विवक्षित भाषा विवक्षित स्थलीं व विवक्षित कालीं कोणत्या पद्धतीनें बोलतात व (लिहिणें माहित असल्यास) लिहितात, हें ज्या नियमसरणीनें, ह्मणजे शास्त्रानें स्पष्ट केलेलें असतें त्यास त्या भाषेचें तत्स्थलीन, तत्कालीन व तल्लोकीय **व्याकरण** ह्मणतात. ह्या वाक्यांत व्याकरण ह्या शब्दाला स्थल, काल व लोक या उपाधींनी मुद्दाम विशिष्ट केलें आहे. कां कीं, ह्या तीन उपाधींचा स्पर्श जिला नाहीं अशी भाषा मागें झाली नाहीं व पुढें होणार नाहीं.

**प्रांतकृत भाषाभेद**

प्रस्तुतकालची, म्हणजे शक १८२९ तली मराठी भाषा घेतली, तर असें आढळून येईल कीं, प्रांतपरत्वें ही भाषा किंचित् किंचित् बदलत जात सरहद्दींवर इतर भाषांशीं मिसळून जात आहे. म्हणजे निव्वळ प्रांतपरत्वें मराठी भाषेचे पांचपंचवीस पोटभेद होत आहेत. तसें च, प्रांतपरत्वाप्रमाणें च जातिपरत्वानें हि भाषा बदलत असते, ह्याचा हि अनुभव सर्वत्र आहे. ब्राह्मणाची मराठी भाषा कुणब्याच्या मराठी भाषेहून किंचित् भिन्न असते, हें स्पष्ट आहे. त्याप्रमाणेंच, पारशाची गुजराथी

**जातिकृत भाषाभेद**

अमदाबादी वाण्याच्या गुजराथीहून निराळी आहे, हें एखादा सामान्य मनुष्य हि ओळखूं शकेल. कोकणांतील कोळ्याची मराठी कोकणांतील भंडाऱ्याच्या किंवा पाताण्या प्रभूच्या मराठीहून भिन्न असते इतकें च नव्हे, तर बंदरी कोळ्याची मराठी भाषा डोंगरी कोळ्याच्या मराठी भाषेहून भिन्न असते. मराठींत हा भाषाभेद स्थल व जाति या दोन उपाधींनी च तेवढा अवछिन्न झाला आहे, असें समजू नये. स्त्री-पुरुषभेद हि मराठींत भाषाभेदाला कारण होतो. हा भेद स्थल किंवा जाति ह्यांनीं

**लिंगकृत भाषाभेद**

केलेल्या भेदांइतका उत्कट नसतो. तत्रापि, असा भेद इंग्रजी, कानडी वगैरे भाषांत नाहीं व मराठींत आहे, ही बाब केवळ क्षुल्लक च समजतां येत नाही. स्थल, जाति, लिंग ह्यांच्याप्रमाणें च कालानें हि भाषेंत फेरफार होतो. उदाहरणार्थ, १८२९ तील वर्तमान मराठी, १५२९ तील एकनाथी मराठी, १२१२ तील ज्ञानेश्वरी मराठी व ६५८ तील धनगरी मराठी, [हा उल्लेख चिकुर्डे ताम्रपटाचा (ग्रंथमाला, वर्ष १, अं. १०) आहे. परंतु हा ताम्रपट बनावट असल्याने तो विचारात घेता येत नाही.] परस्परांहून भिन्नावस्था आहेत, हें जुनी बाडें वाचणारा मनुष्य सहज सांगूं शकतो. त्यांत पुन्हां हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, शक १२१२ त ज्ञानेश्वराच्या वेळीं, देवगिरि, नागपूर, मावळ, कोंकण व कारवार या ठिकाणीं बोलली जाणारी मराठी भिन्न होती. शक १२१२ त चोखामेळ्याचें मराठी ज्ञानोबाच्या मराठीहून भिन्न होतें, हें हि विसरतां कामा नये.

अनुक्रमणिका

तात्पर्य, स्थल, काल व जाति ह्यांनीं मराठी भाषा अवछिन्न व भिन्नावस्थ झालेली आहे. लिंगभेद विशेष उत्कट नसल्यामुळें जमेस न धरणें सोयस्कर पडतें इतकेंच. नाहीं तर, तो हि जमेस धरणें जरूर होतें; कारण, मराठी भाषा बोलणाऱ्या कित्येक जातींत स्त्रिया पुल्लिंगी प्रयोग करतात; आणि ह्या जातीं प्रायः कानडी मुलखाच्या जवळील मिरज, कोल्हापूर, सोलापूर वगैरे प्रांतांत आढळतात. पुल्लिंगी प्रयोग करणाऱ्या महाराष्ट्रांतील ह्या जाती पूर्वी भाषावंशानें मराठ्या ['मराठी' याचे अनेकवचनी रूप.] नसाव्या, असा सिद्धान्त बिनहरकत बांधावा.

**कालकृत भाषाभेद**

## प्रांतिक भाषा; अपभ्रंश; किरिस्तानी अपभ्रंश; मानभावी अपभ्रंश.

**प्रांतिक भाषा**

●२. कोणत्या हि भाषेचे प्रांतपरत्वें जे भेद होतात त्यांना प्रांतिक पोटभेद अथवा पोटभाषा म्हणतात. ह्या प्रांतिक पोटभाषा त्या त्या प्रांतांतील ब्राह्मणादि सर्व जाति बोलतात. शुद्धाशुद्ध किंवा भ्रष्टाभ्रष्ट हीं विशेषणें ह्या प्रांतिक पोटभाषांना लावतां येत नाहींत. कारण, नमुनेवजा जी मुख्य भाषा तिच्या इतकी च थोर परंपरा ह्या प्रांतिक भाषांची बहुतेक असते. इतकें च कीं, ह्या प्रांतिक भाषांना नमुनेवजा मुख्य भाषेचें सर्वराष्ट्रमान्यत्व नसतें. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरानें खानदेशी मराठींत कांहीं अभंग रचलेले आहेत, [हे अभंग गाथ्यांतून ज्ञानेश्वरांच्या नावावर दिलेले असले तरी ते त्यांचे वाटत नाहीत.] ते तत्कालीन देवगिरि येथील मराठी भाषेहून भिन्न असून विनोदार्थ रचलेले आहेत. कोणत्या हि पोटभाषेचा विनोदार्थ जेथें उपयोग झाला तेथें त्या पोटभाषेचें गौणत्व प्रस्थापित झालें, हें उघड आहे. परंतु, ह्या गौणत्वावरून खानदेशी मराठी भाषेला अपभ्रष्ट किंवा अशुद्ध म्हणून चालावयाचें नाहीं. अपभ्रंश हा प्रकार निराळा च आहे; व तो नमुनेवजा मुख्य भाषेतल्याप्रमाणें प्रांतिक पोटभाषांत हि सांपडतो. प्रायः जातिपरत्वें भाषेचे जे पोटभेद होतात त्यांना मुख्यभाषेचे अपभ्रंश म्हणतात. कोणत्या हि समाजांत भाषेचा अपभ्रंश बालांच्या ठायीं सहज संभवतो. तदनंतर, अशिक्षित स्त्रिया, शूद्र वगैरे लोक अपभ्रष्ट उच्चार व प्रयोग करतांना फार आढळतात. सर्वांत अत्यंत अपभ्रंश हिंदूसमाजांत येऊन राहिलेले दैत्य, असुर, शक पल्हव, यवन, मुसलमान, यहुदी, वगैरे जातिबाह्य लोक ह्यांच्या हातून पराकाष्टेचा होतो. उच्चार, प्रत्यय, प्रयोग, लिंग, वचन, ह्या सर्वांचा हे म्लेच्छ लोक दुरुपयोग करतात. पारशी, यहुदी, अरब, इंग्रज, फ्रेंच, मोगल, जपानी, वगैरे म्लेच्छ लोक संस्कृत, गुजराथी, मराठी वगैरे भाषांचा उच्चार व प्रयोग किती अशुद्ध व अपभ्रष्ट करतात, तें पाहिलें म्हणजे अपभ्रंशोत्पत्तीचें खरें कारण ध्यानांत येऊ लागतें. ह्या लोकांच्या उच्चार करण्याच्या नाड्या च तिरके उच्चार करण्याला लायक अशा जन्मसिद्ध असतात. 'अ' चा 'ॲ', 'ए' चा 'ॲ', 'त' चा 'ट' वगैरे उच्चार

**अपभ्रंश**

अनुक्रमणिका

**किरिस्तानी अपभ्रंश** म्लेच्छ लोकांच्या बोलण्यांत फार येतात. असले तोंड वाकडें वासून झालेले उच्चार शूद्रादि वर्गांच्या अपभ्रंशांत आढळत नाहींत. जोडाक्षरांची द्वित्त व्यंजनें व कठोर व्यंजनांचीं मृदु व्यंजनें करण्याकडे बालशूद्रादींची प्रवृत्ति विशेष असते. बालशूद्रादिकृत अपभ्रंश लोकमान्य नसल्यामुळें भिन्नभाषात्वाला कारण समजला जाणें सर्वथा अयुक्त होय. हाच नियम म्लेच्छादिकृत अपभ्रंशाला लागूं करणें सशास्त्र आहे. अपभ्रंशोत्पत्ति कशी होते, हें नीट ध्यानांत न आल्यामुळें, Linguistic Survey of India, Vol. VII मध्यें, मराठी भाषेसंबंधानें लिहितांना ग्रीयरसन्नें अपभ्रंशाची प्रांतिक पोटमाषांशीं भेसळ केलेली आहे. गोव्याच्या किरिस्तावांची मराठी भाषा किंवा ठाण्याच्या किरिस्तांव कोळ्यांची मराठी भाषा निव्वळ कोकणांतील प्रांतिक मराठी पोटभाषेचे अपभ्रंश होत. ह्या अपभ्रष्ट भाषेंत पोर्तुगीज मिशनऱ्यांनीं बायबलपुराण [फा. स्टीफन्स-कृत ‘क्रिस्तपुराण’ (इ. स. १६१४). हे पुराण अपभ्रष्ट भाषेत नव्हे, तर नागर मराठी भाषेत लिहिलेले आहे असे स्वतः ग्रंथकार म्हणतो (“हें सर्व मराठीय भासेन लिहिलें आहे.”—प्रस्तावना, पृ. ९४).] लिहिलें आहे. तेवढ्यानें अपभ्रष्टत्व जाऊन, स्वतंत्र प्रांतिक भाषेच्या प्रौढ पदवीस ती येते, असें वाटत नाहीं. कोकणांतील किरिस्तावांच्या अपभ्रंशांत दहापांच चोपडी [हीं ‘चोपडी’ नसून चांगले ग्रंथ आहेत व तेही अनेक आहेत.] फार तर छापलेलीं आढळतील. परंतु, महाराष्ट्रांत मानभाव म्हणून जे लोक आहेत, त्यांनी अतिशूद्रांच्या मराठी अपभ्रंशांत पाचचारशे ग्रंथ लिहिलेले आहेत [वरील विधान चूक आहे. मानभावांचे ग्रंथ अतिशूद्रांच्या मराठी अपभ्रंशात नव्हे, तर चांगल्या प्रौढ व सुसंस्कृत मराठी भाषेत आहेत.]

**मानभावी अपभ्रंश** त्यांचा ग्रीयरसन्ला पत्ता सुद्धा नाहीं. केवळ ग्रंथत्वामुळे मानभावी अपभ्रंश ज्याप्रमाणें पोटभाषेच्या योग्यतेला येत नाहीं, त्याप्रमाणें च गोमांतक किंवा साष्टी येथील किरिस्तावांचा क्षुद्र अपभ्रंश हि पोटभाषेच्या पदवीला पोहोचत नाहीं. यद्यपि अपभ्रंश स्वतंत्र भाषाभेद उत्पन्न करीत नाही, तत्रापि पोटभाषेंत निरनिराळे प्रकार उत्पन्न करतो, हें उघड आहे. पोटभाषेंतील ह्या उपभेदांत कोणत्या हि कारणानें जर ग्रंथसंपत्ति निर्माण झाली, तर तो उपभेद स्वतंत्र पोटभाषेच्या मानाला पात्र होण्याची चिन्हें दाखवितो. गोव्यांतील किरिस्तावी भाषेचा व देशावरील मानभावी भाषेचा असा च मासला उडालेला आहे. इतर जबरदस्त कारणांच्यापुढें त्यांच्या ह्या महत्त्वाकांक्षेची डाळ शिजली नाहीं, ही बाब अलाहिदा. पोर्तुगीज भाषेच्या जुलमापुढें किरिस्तावी मराठी अपभ्रंश फिका पडला; आणि नागर मराठीखालीं मानभावी अपभ्रंश चिरडून गेला. कालांतरानें हे दोन्ही अपभ्रंश नष्ट होऊन नागर मराठी त्या त्या प्रांतांत व जातींत प्रचलित होईल, हें सांगावयाला नकोच. [महानुभावांच्या भाषेविषयीचे वरील सर्वच विवेचन निखालस चूक आहे. ‘मानभावी अपभ्रंश’ असा निराळा नसून त्यांच्या ‘साती ग्रंथां’ची व ज्ञानेश्वरीची भाषा एकच आहे. तसेच मानभावांना आपली भाषा स्वतंत्र पोटभाषेच्या मानाला पात्र करावयाची होती हे म्हणणेहि बरोबर नाही.]

## कालकृत भाषेचीं अवस्थान्तरें.

●३. जातिपरत्वानें भाषेंत अपभ्रंश उत्पन्न होतो आणि प्रांतपरत्वानें प्रांतिक भाषाभेद झालेले असतात. परंतु कालाचा भाषेवर जो संस्कार किंवा विकार होतो त्यानें अपभ्रंश किंवा भाषाभेद यांतून एक हि कार्य होत नाहीं. कालपरत्वें भाषेला वृद्धत्व, तारुण्य, बाल्य अशा भिन्न अवस्था येतात; परंतु तिचें स्वत्व कांहीं नाहीसें होत नाहीं. भाषा तीच; अवस्थान्तरें, मात्र, निरनिराळीं. शक ९०५ तील चामुंडरायाची [श्रवणबेळगोळ शिलालेख, शके ९०५ (?);] मराठी भाषा, शक १०५१ तील सोमेश्वराची [मानसोल्लास किंवा

अनुक्रमणिका

अभिलाषितार्थचिंतामणि, शके १०५१;] मराठी भाषा, शक ११२८ तील चंगदेवाची [पळसदेव शिलालेख, शके ११२८;] मराठी भाषा, शक १२१२ तील ज्ञानदेवाची मराठी भाषा, शक १५०० तील एकनाथाची मराठी भाषा किंवा शक १८०० तील विष्णुशास्त्र्याची [चिपळूणकर : निबंधमाला.] भाषा पाहिली असतां भाषा मराठी च आहे हें अशिक्षित मनुष्य हि ओळखूं शकतो; इतकें च कीं, कांहीं रूपें बरींच जुनीं आहेत, असें त्याच्या दृष्ट्युत्पत्तीस येतें. व्यक्ति ती च; वस्त्रें तेवढीं निराळीं. पुरुष एक च, बाल्यतारुण्यवार्द्धक्यादि अवस्थान्तरें, मात्र, अनेक. मुख्य नागर भाषेप्रमाणें च, हीं अवस्थान्तरें प्रांतिकभाषांच्या ठायीं दृश्यमान होतात; परंतु, अपभ्रंशाच्या ठायीं होत नाहींत. कारण अपभ्रंश हा अवस्थान्तरांच्या वरचा तात्पुरता मल ऊर्फ विकार होय. तो भाषेच्या कोणत्या हि अवस्थेंत जातिधर्माप्रमाणें विशिष्टनियमानुसार भासमान होतो. **मुख्य किंवा प्रांतिक** भाषेच्या विशिष्ट अवस्थेचा कनिष्ठ जातींत अपभ्रंश होतो. त्या अपभ्रंशाची प्रगति शतकेंच्या शतकें प्रायः चालत नाहीं. चालली च, तर, कालान्तरानें मूळभाषेहून अत्यंत विलक्षण असें रूप धारण करते. इंग्रजी, लातीन, जर्मन, रशियन, पोलिश वगैरे भाषा मूळ आर्यभाषेचे परंपरित अपभ्रंश होत. ह्या अपभ्रंशांशीं सध्यां आपल्याला कर्तव्य नाहीं. कालानें भाषेचीं अवस्थान्तरें होतात, हा मुख्य मुद्दा आहे. हीं अवस्थान्तरें व त्यांचें ज्ञान वर्तमान नागर मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला वैशद्य आणण्यास अत्यंत उपयुक्त आहेत.

## नागर अथवा शिष्ट मराठी; प्रांतिक भाषांत वाङ्मयाभाव.

**नागर अथवा शिष्ट मराठी**

●४. प्रांतिक पोटभाषा, अपभ्रंश, अवस्थान्तरें, वगैरे शब्द ज्या मुख्य मराठी भाषेच्या अपेक्षेनें योजिले तिला नागर अथवा शिष्ट मराठी अशी संज्ञा आहे. अपभ्रष्ट किंवा प्रांतिक जी नव्हे ती नागर किंवा शिष्ट मराठी समजावी. नागर अथवा शिष्ट मराठी वर्तमानकालीं पुणें प्रांतांतील ब्राह्मण व उच्च मराठे बोलतात. तीनशें वर्षांपूर्वी नागर मराठी पैठणचे ब्राह्मण बोलत व लिहीत. आणि सातशें वर्षांपूर्वी नागर मराठी देवगिरीच्या भोवतालील प्रांतांत ब्राह्मणादि उच्च वर्ण वापरीत. म्हणजे प्रायः सर्वमान्य ग्रंथकर्ते व पुढारी राज्यकर्ते जी भाषा वापरतात ती भाषा नागर म्हणजे शिष्ट मराठी भाषा होय. मग, स्वतः ग्रंथकर्ता प्रसंगवशें पुणें प्रांतांत राहो किंवा नागपूर प्रांतांत राहो. येथें एक मोठा चमत्कार लक्षांत घेण्यासारखा आहे. ग्रंथकर्ता गोव्यांतला असो, कोल्हापूरचा असो, पुण्यांतला असो, पैठणचा असो किंवा नागपूरचा असो, त्याची लिहिण्याची भाषा एकसारखी असते. गोव्यांतला ग्रंथकर्ता घरीं गेंगाणें बोलेल; परंतु ग्रंथांत एकनाथी, रामदासी किंवा चिपळोणकरी च मराठी लिहील. ही च ग्रंथाची भाषा, नियमानें दरबारची भाषा असते. इंदूरास धनगराचें राज्य [इंदूरचे होळकर राजघराणे मूळचे धनगरजातीचे होय.] आहे व तंजावरास तामिल भाषा आहे; तत्रापि दरबारी [वरील विधान तंजावरी भाषेला मात्र लागू पडत नाही. कारण तिचे वळण खरेखुरे अपभ्रष्ट आहे.] लिहिण्याची व

**प्रांतिक भाषांत वाङ्मयाभाव**

बोलण्याची भाषा ग्रंथकारांची मराठी च असते. म्हणजे अंतःसंमतीनें ज्ञानेश्वर—चिपळोणकरादि प्रासादिक ग्रंथकारांची मराठी भाषा महाराष्ट्रानें नागर ठरविलेली आहे. ह्या नागर अथवा ग्रांथिक मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण देण्याचें प्रस्तुत स्थलीं योजिलें आहे. कोंकणी, कोल्हापुरी, गंगेरी ['गंगेरी' म्हणजे गंगानीरची किंवा गोदाकाठची भाषा. गंगेरी विड्याची पाने प्रसिद्ध आहेत.], खानदेशी, वऱ्हाडी वगैरे प्रांतिक पोटभाषांचें हि ऐतिहासिक व्याकरण देतां येतें तर उत्तम होतें. परंतु, त्या भाषांत ग्रंथरचना म्हणण्यासारखी अथवा

बहुतेक बिलकुल न झाल्यामुळें व गोमांतकी अपभ्रंशांत जी थोडीशी झाली आहे ती अलीकडील दोन-अडीचशें वर्षांतील असल्यामुळें, त्या पोटभाषांचा पूर्वेतिहास अज्ञात राहिला आहे. अर्थात् त्यांचें ऐतिहासिक व्याकरण रचण्याचीं साधनें अस्तित्वांत नाहींत. असतीं तर, नागर मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणरचनेला कांहींसें साहाय्य होण्याचा संभव होता. मानभावी अपभ्रंशांत जुना ग्रंथसंग्रह निदान पांचशें वर्षांचा तरी आहे. परंतु, त्या लोकांच्या हेकटपणामुळें त्यांचे अत्यंत जुने मराठी गद्यपद्य ग्रंथ अद्याप अप्रसिद्ध राहिले आहेत. [वरील परिस्थिती आता बदलली असून महानुभावांचे अनेक जुने ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत] तेव्हां त्यांचा हि नागर मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाला फारसा उपयोग होण्याचा संभव नाहीं. मानभावांचे दहावीस गद्यपद्य ग्रंथ यद्यपि छापलेले आहेत, तत्रापि ते सर्व अलीकडील तीनशें वर्षांतील आहेत—अर्थात्, मानभावी अपभ्रंशाचें, पूर्वचरित्र कांहीं काल अज्ञात राहणार, असा रंग दिसतो.

## शिष्ट व अशिष्ट मराठी

●५. नागर ऊर्फ ग्रांथिक ऊर्फ संस्कृत मराठी प्रांतिक ऊर्फ लौकिक ऊर्फ प्राकृत मराठीहून भिन्न असते. तर्खडकर, गोडबोले व जोशी यांनीं जीं व्याकरणें रचिलीं आहेत तीं नागर ऊर्फ संस्कृत ऊर्फ शिष्ट मराठीचीं आहेत; प्रांतिक, लौकिक, प्राकृत, किंवा अपभ्रष्ट मराठीचीं नाहींत. तसेंच हीं तिन्हीं व्याकरणें वर्तमान शिष्ट मराठीचीं आहेत; दोनशें, तीनशें, पांचशें, सातशें किंवा हजार वर्षांपलीकडील शिष्ट मराठीचीं नाहींत. विद्यमानकालीं शिष्ट मराठीचें रूप काय आहे, तें तर्खडकरादि वैय्याकरणांच्या ग्रंथांवरून कळतें; शिष्ट मराठीच्या विद्यमान रूपाचीं आदिपासून आतापर्यंतची परंपरा कळत नाहीं. ती कळण्याचा राजमार्ग म्हटला म्हणजे शिष्ट मराठीचें ऐतिहासिक व्याकरण होय.

## शिष्ट मराठी कृत्रिम नाहीं, सहज आहे.

●६. नागर अथवा ग्रांथिक अथवा संस्कृत अथवा शिष्ट मराठी मुद्दाम कोणीं बनविलीं, अशांतला प्रकार नाहीं, हें सर्वांना माहीत च आहे. ती आपोआप बनत आली आहे व शिष्ट ग्रंथकारांच्या ग्रंथांत व उच्च ब्राह्मणांदि जातींच्या मुखांत सांप्रत तिचें वास्तव्य आहे. प्रांतिक, प्राकृत किंवा अपभ्रष्ट मराठी अशिक्षित, गांवढळ, व विद्याहीन लोक बोलत असतात, हें आपण पहातों आणि शिष्टांचें ग्रांथिक बोलणें त्यांना सहज अथवा विशेष श्रम न पडतां कळतें, ही हि रोजच्या अनुभवाची गोष्ट आहे. ग्रांथिक मराठींत कोणत्या हि सकर्मक धातूचीं कमींत कमीं सुमारें १५०० रूपें होतात व तीं ग्रंथांत शुद्ध म्हणून योजण्यास कोणती च हरकत नाहीं. परंतु, ह्या १५०० रूपांपैकीं फार च थोडीं रूपें प्राकृत लोक योजतात. तेवढ्यावरून हीं १५०० रूपें व्याकरणकारांनी कृत्रिम तऱ्हेनें बनविली, असें म्हणणें वेडगळपणाचें होईल. हीं सर्व १५०० रूपें भाषेंत शिष्टमान्य आहेत, व ग्रंथांत आढळण्याचा संभव असतो. ही कशीं बनतात, त्याचे विशिष्ट नियम व्याकरणकार शोधून काढून बसवितात. त्यामुळें, शंकाखोर व अशास्त्रज्ञ तिऱ्हाइतांना तीं कृत्रिम असावीं, असें अज्ञलीलेनें म्हणावेंसें वाटतें. वैय्याकरणांच्या स्तुत्य व दीर्घ उद्योगाचें अवडंबर पाहून, हे शंकाखोर लोक गांगरून जातात व अवडंबराचे ठायीं कृत्रिमत्वाचा आरोप करण्याचें धाष्ट्र्य करतात. हा प्रंकार इतर शास्त्रांसंबंधानें असा च आढळण्यांत येतो. वनस्पतिशास्त्रांत तांदुळाच्या २००० जाति सांगितलेल्या पाहिल्या, म्हणजे

अनुक्रमणिका

अतज्ज्ञ इसम आश्चर्यानें गांगरून जाऊन, त्या भयंकर आंकड्यावर विश्वास ठेवीत नाहीं. असली गांवढळ अतज्ज्ञता कित्येक यूरोपियन विद्वानांच्या ठायीं आढळण्यांत आली आहे. यूरोपियन लोक वनस्पतिशास्त्र जितक्या बारकाईनें रचतात, तितक्या च बारकाईनें हिंदू लोकांनीं व्याकरणशास्त्राची रचना केलेली आहे. त्यामुळे पृथक्करणान्तीं त्यांना जे असंख्य व सूक्ष्म भेद सहज दिसतात ते यूरोपियनांच्या अश्रद्धेचे विषय होतात. बाब अज्ञानोजृंभित हेकाडपणाची असल्यामुळें, लक्ष्य देण्यासारखी नसून, नितांत तिरस्करणीय आहे.

## शिष्ट मराठीची ऐतिहासिक व्याकरणक्षमता.

●७. शिष्ट मराठीचें च तेवढें ऐतिहासिक व्याकरण शक्य आहे. कारण असें कीं, गेल्या सातशें वर्षांत प्रौढ व ललित ग्रंथरचना जेवढी म्हणून झाली तेवढी सर्व शिष्ट मराठींत झाली आहे. गोमांतकी अपभ्रंशांत कांहीं किरिस्तावी धर्मपुस्तकें व पांचचार व्याकरणें झालीं आहेत. परंतु त्यांत एक विचित्रपणा आहे. व्याकरणें म्हणून जेवढीं झालीं आहेत तेवढीं पोर्तुगीज किंवा इंग्लिश भाषेंत आहेत आणि इतर पुस्तकांची लिपि प्रायः रोमन आहे. त्यामुळें संभावितपणा येण्याला जी बद्धमूलता लागते ती या अपभ्रंशाला मिळाली नाहीं. शिवाय, ह्या अपभ्रंशांत झालेली क्षुद्र ग्रंथरचना अगदीं अलीकडली आहे. तशांत, हा अपभ्रंश बोलणारे बाट्ये दहा हजारांहून जास्त नसून, त्यांनीं आक्रमिलेला प्रांत अर्ध्या पाऊण तालुक्याएवढा हि नाहीं. क्याथोलिक मिशनऱ्यांच्या उपद्व्यापानें हा अपभ्रंश लिपिनिविष्ट आणि तो हि रोमनलिपिनिविष्ट झाला इतकें च. ह्याहून ह्याला जास्त किंमत नाहीं. कोंकणी पोटभाषेचा हा किरिस्तावी अपभ्रंश आहे. ह्यांतील धर्मपुस्तकें कोंकणांतील हिंदूच्या वाचण्यांत येत नाहींत, हें सांगावयाला नको च. त्यामुळें कोंकणांतील पोटभाषेवर किंवा शिष्ट मराठीवर ह्या अपभ्रंशाचा कांहीं च परिणाम झालेला नाहीं. पोर्तुगीज राज्य हिंदुस्थानांतून नष्ट झालें तर ह्या अपभ्रंशाचा मागमूस हि रहाणार नाहीं. [आज पोर्तुगिजांचे राज्य नष्ट झाले आहे; पण मराठीचा किरिस्तावी अपभ्रंश पूर्वी होता तसाच आहे.]

## शिष्ट मराठीची सर्वलोकप्रियता.

●८. शिष्ट मराठींत सातआठशें वर्षांपासूनची ग्रंथरचना असून, ती महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतल्या व बडोदें, इंदूर, ग्वालेर, बुंदेलखंड, तंजावर, गुत्ती, बल्लारी वगैरे सर्व संस्थानांतल्या मराठी लोकांना आदरणीय झालेली आहे. ज्या भाषेंत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, सूर्यज्योतिषी, [हा सूर्यज्योतिषी कोण? 'ज्योतिषरत्नमाला' कार तर नव्हे?] एकनाथ, रामदास, तुकाराम, मोरोपंत, चिपळोणकर वगैरे प्रासादिक ग्रंथकारांनीं ग्रंथरचना केली ती शिष्ट भाषा महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतील व जातींतील लोकांस सारखी च मान्य व्हावी, ह्यांत कांही आश्चर्य नाहीं. प्रांतिक बोलणे प्रांतापुरतें व जातिक बोलणें जातीपुरतें; परंतु ग्रांथिक बोलणें व लिहिणें सर्व महाराष्ट्राकरतां आहे. प्रांतिक पोटभाषांच्या लहानसहान लकबा आणि जातिक भाषणांतले (भाषांतले?) बालिश अपभ्रंश ग्रांथिक राजभाषेच्या शिष्ट दरबारांत लुप्त होतात व एक च एक निर्भेळ अशी मराठ्यांची मायभाषा देशांतील सर्व लोकांच्या अभिमानाचा, कौतुकाचा व सहज प्रेमाचा विषय होते. मराठ्यांना स्वभाषेचा इतका अभिमान जो वाटतो तो उगा च फुकाचा नाहीं. मराठी भाषेंतल्या शब्दप्राचुर्याची बरोबरी पृथ्वीवरील इतर कोणत्या हि भाषेला करतां यावयाची नाहीं. तसें च, कोणता हि गूढ किंवा सूक्ष्म अर्थ नाना तऱ्हांनीं यथेष्ट व्यक्त करण्याची तिची शक्ति अप्रतिम आहे. शिवाय अनेक थोर प्रासादिक ग्रंथकारांनीं तिला आपल्या उदात्त, गंभीर, ललित व रम्य विचारांचें निवेदन केलें असल्यामुळें तिच्यावरील महाराष्ट्रीयांची भक्ति शुक्लेंदुवत् उत्तरोत्तर वर्धमान स्थितींत आहे.

अनुक्रमणिका

## वर्तमान शिष्ट मराठीचें साधें व्याकरण

●९. शिष्ट मराठीच्या सद्यःकालीन रूपाचें वैशद्य करणारी जी नियमसरणी तिला शिष्ट मराठीचें **साधें व्याकरण** म्हणतात. साध्या व्याकरणाचा शुद्ध मासला म्हटला म्हणजे दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचे मराठी व्याकरण होय. गोडबोल्यांच्या मराठी व्याकरणांत क्वचित् मराठी भाषेचा महाराष्ट्री भाषेशीं व संस्कृत भाषेशीं संबंध दाखविण्याचा स्थूल प्रयत्न केला आहे. रामचंद्र भिकाजी जोशी यांचें Higher Marathi Grammer इंग्रजींत असल्यामुळें व केवळ शालोपयोगी असल्यामुळें, त्याचा नामनिर्देश न केला तरी चालण्यासारखा आहे. जोशी यांच्या व्याकरणांत व्युत्पत्तीचा पूर्ण अभाव आहे. अनेक संस्कृतोत्पन्न व महाराष्ट्रयुत्पन्न शब्दांना ते देश्य समजतात, इतकें च नव्हें तर, कित्येक अरबी व फारसी शब्दांना हि ते ह्या च मालिकेंत गोंवतात. इतकें अज्ञान ज्या ग्रंथांत आढळतें त्या ग्रंथाला विशेष मान देण्याचें कारण दिसत नाहीं. जोश्यांच्या व्याकरणांत मराठी भाषेच्या इतिहासासंबंधानें प्रास्ताविक जो छोटा भाग आहे त्याचें सर्व श्रेय भांडारकरांच्या वुइल्सन लेक्चरांना [Wilson Philological Lectures, Bombay, 1914.] आहे. भांडारकरांच्या वुइल्सन लेक्चरांत जीं व्यंगें आहेत तीं जोश्यांच्या प्रास्ताविक भागांत उतरलीं आहेत, हें सांगावयाला नकोच.

## पोटभाषांचें अथवा बोलींचें तौलनिक व्याकरण

●१०. प्रांतिक पोटभाषा व अपभ्रंश (वर्तमान व भूत) ह्यांच्या व्याकरणाशीं शिष्ट मराठी भाषेच्या व्याकरणाची तुलना केली असतां, मराठ्यांच्या **पोटभाषांचें** अथवा **बोलींचे तौलनिक व्याकरण** सिद्ध होतें. असलें औपभाषिक तौलनिक व्याकरण मराठी भाषेंत नाहीं. इंग्रजींत १९०५ पर्यंत नव्हतें. Linguistic Survey of India नामक ग्रंथमालेच्या सातव्या खंडांत असलें व्याकरण रचण्याचीं साधनें मिस्टर ग्रीयरसन् यांनीं नॉर्वेतील डाक्टर स्टेन् कोनौ यांच्या हस्तें १९०५ त Specimens of the Marathi Language ह्या नांवाखालीं सरकारच्या खर्चानें प्रसिद्ध केलीं आहेत. प्रांतिक पोटभाषा, जातिक पोटभाषा ऊर्फ बोली व अपभ्रंश, असे तीन भाग करून, मासले दिले असते, म्हणजे ह्या ग्रंथाला जास्त वैशद्य आलें असतें. हें च ह्या ग्रंथाचें मुख्य व्यंग आहे. दर बारा कोसांवर व प्रत्येक जातींत बोली बदलते. ह्या बोलींत कित्येक रूपें व शब्द इतके पुरातन व चमत्कारिक असण्याचा संभव असतो कीं त्यांच्या साहाय्यानें मुख्य मराठी भाषेंतील कित्येक रूपांची व शब्दांची परंपरा ओळखतां येते.

## आधुनिक सगोत्र समकालीन भाषांचे तौलनिक व्याकरण

●११. बंगाली, हिंदी, आवढी, पंजाबी, सिंधी, गुजराथी वगैरे आधुनिक सगोत्र प्राकृतिकोद्‌भव शिष्ट भाषांच्या व्याकरणांशीं शिष्ट मराठी भाषेच्या व्याकरणाची तुलना केली असतां, **आधुनिक प्राकृतिकोद्‌भव समकालीन भाषांचें तौलनिक व्याकरण** सिद्ध होतें. प्रत्येक भाषेंतील गूढें इतर सगोत्र भाषांच्या तुलनेनें सहज उकलतात, हा तौलनिक व्याकरणापासून पहिला फायदा आहे. शिवाय, आर्यभाषा कोणत्या, अनार्य कोणत्या, हे वर्गीकरण तौलनिक व्याकरणानें सुलभ होतें. आधुनिक प्राकृतिकोद्‌भव भाषांचें तौलनिक व्याकरण मराठी भाषेंत अद्याप रचलें गेलें नाहीं. इंग्रजींत असलीं दोन व्याकरणें आहेत:— (१) Beames' Comparative Grammar of the Modern Aryan Languages of India (1872-1879); आणि (२) Hoernle's Grammar of the Gaudian Languages (1880). दोन्हीं व्याकरणें व्युत्पत्तीच्या कामांत ऐतिहासिक बाजूनें लंगडीं आहेत. कां की, इ. स. १८८० पर्यंत आधुनिक प्राकृतिकोद्‌भव [मराठी वगैरे]

भाषांतील जुना ग्रंथसंग्रह व्हावा तितका प्रसिद्ध झाला नव्हता व जो झाला होता तो यथास्थित समजण्याची ऐपत दोघांची हि नव्हती. ह्याप्रमाणेंच, १८८० पुढील पंचवीस वर्षांत प्राकृत भाषांची [महाराष्ट्री, मागधी वगैरे] जी बारीक छान व पृथक्कृति जर्मनींत झाली ती बीम्स व होर्न्ले यांच्या कालीं झाली नसल्यामुळें आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें वर्गीकरण करण्यांत दोघे हि तोंडघशीं पडलेले आहेत. शिवाय, बीम्स्‌ला संस्कृत व प्राकृत भाषांचें व्याकरण यथातथा च माहीत होतें, असें दिसतें. होर्न्लेचा बहुतेक सगळा भर पुरभई भाषेवर असून, इतर भाषांकडे तो ओझरतें लक्ष देतो. बीम्स्‌च्या ग्रंथांत दुसरा एक अपूर्व व अक्षम्य अथवा गांवढळ दोष आहे. तो हा कीं, ठाईं ठाईं रागद्वेषादि विकारांचें अप्रस्तुत प्रदर्शन हा ग्राम्य ग्रंथकार करतो. मराठे लोक व मराठी भाषा यांच्यावर त्याचा कटाक्ष विशेष आहे. एक मासलेवाईक उतारा ह्या ग्रंथकाराचें मनोगत कळण्यास पुरें आहे. आपल्या व्याकरणाच्या पहिल्या खंडाच्या ११० व्या पृष्ठावर हा ग्रंथकार येणेप्रमाणें लिहितो :—

"Even after seventy years of British rule, the country (Orissa) still bears the traces of the rapacity and oppression of the Marathas. The Oriyas had to learn the language of their conquerors and a few Marathi words have passed into their language. The Bhosla's tanks, roads, bridges and dykes are still in existence and are constructed on a princely scale, as they were not hampered with any scruple about paying their workpeople. This *little* point should be remembered by those who reproach the English for the inferiority of their public works. Whatever we (English) do is *paid* for."

भोसल्यांच्या वेळीं आंवढ्यातले लोक पोटें बांधून कामें करीत होते!!! ह्या दोन ग्रंथकारांखेरीज, भागवती बोलीवर वेबर, सिंधी भाषेवर ट्रंप, वगैरेनीं कांहीं निबंध लिहिलेले आहेत.

## शिष्ट मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण

●१२. शिष्ट मराठी भाषेंतील स्वर, वर्ण, शब्द, प्रत्यय, व अव्ययें ह्यांचीं आदिपासून म्हणजे मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून आतांपर्यंत रूपें कसकशीं होत आहेत, ह्यांचे उद्घाटन शिष्ट मराठीच्या **ऐतिहासिक व्याकरणांत** केलेलें असतें. ह्या व्याकरणाला च मराठी भाषेची **व्युत्पत्ति, शब्दसिद्धि, निरुक्ति** वगैरे नामान्तरें आहेत. कोणत्या हि भाषेचें ऐतिहासिक व्याकरण तयार व्हावयाला, त्या भाषेंतील आदिपासून आतांपर्यंत बरा च, निदान कामापुरता तरी, ग्रंथसमूह किंवा लेखसोपान सांपडला पाहिजे. त्याच्या अभावीं व्युत्पत्तीचें काम केवळ कल्पनेवर चालेल. तसें च, नुसती लेखपरंपरा सांपडून म्हणण्यासारखें कार्य होत नाहीं? तर, ती लेखपरंपरा त्या त्या कालची अस्सल पाहिजे. अशी लेखपरंपरा व ग्रंथसंपत्ति ज्या भाषेची उपलब्ध होते, किंवा व्युत्पत्ति किंवा ऐतिहासिक व्याकृति सुकर व निश्चित होते. बीम्स व होर्न्ले ह्यांनीं आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषेंचें तौलनिक व्याकरण लिहितांना ऐतिहासिक व्याकरणाच्या प्रांतांत हि अतिक्रम करण्याचा आव घातलेला आहे. म्हणजे ह्या दोघां वैय्याकरणांनीं रचलेलीं व्याकरणें तौलनिक व ऐतिहासिक अशीं मिश्र आहेत. तौलनिक व्याकरण व ऐतिहासिक व्याकरण असा दिक्कालावछिन्न द्विधा भेद त्यांच्या ध्यानांत आलेला नाहीं, हें खरें आहे. परंतु त्यांच्या हातून असा मिश्र प्रकार झालेला आहे, हें सहज ओळखतां येतें. बीम्स व होर्न्ले ह्यांचा मुख्य गुरु जो बॉप्प [फ्रान्झ बॉप्प (Franz Bopp)(इ. स. १७९१—१८६७) प्रसिद्ध जर्मन भाषाशास्त्रज्ञ.] त्यानें हि आपल्या व्यांकरणाला तौलनिक म्हटलें आहे. कालदृष्ट्या अर्वाचीन व प्राचीन आणि दिग्दृष्ट्या राष्ट्रीय, प्रांतिक व अपभ्रष्ट अशा सर्व भाषांचा परामर्श घेण्याचा बॉप्पचा मनोदय होता. म्हणजे

समकालीन व भिन्नकालीन भाषांची तुलना करण्याचा त्याचा विचार होता. मराठी, बंगाली, हिंदी, आवढी, पंजाबी, सिंधी, गुजराथी वगैरे भाषांतील पुराण ग्रंथसंग्रह त्यांच्या कालीं अनुपलब्ध असल्यामुळें, बीम्स व होर्न्ले ह्यांचा व्युत्पत्तीचा भाग बरा च अपुरा व काल्पनिक राहिलेला आहे. आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें मूळ ज्या प्राकृत भाषा त्यांची भेट मंडुकप्लुतीनें घेण्याशिवाय दुसरें गत्यंतर ह्या दोन्ही वैय्याकरणांना राहिलें नाहीं. मराठींतील एखाद्या आधुनिक शब्दाची किंवा प्रत्ययाची पूर्वपरंपरा पहाण्याची इच्छा झाल्यास, त्यांना एकदम प्राकृताच्या घाटावर जावें लागतें, मध्यें विसावा घेण्यास जागा सांपडत नाहीं. म्हणजे महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अपभ्रंश वगैरे प्राकृत भाषा व मराठी, बंगाली वगैरे प्राकृतिकोद्भव भाषा ह्यांची वस्तुतः ते तुलना करीत असतात. प्राकृत भाषांचा अंत व सध्यांचा काल ह्या दोहोंमधील हजारबाराशें वर्षांत रूपांची कशी घडामोड झाली, हें त्यांना माहीत नसतें. त्यामुळें, संशयस्थानीं अशी व्युत्पत्ति असेल किंवा असावी, असें संशयित समाधान करून घेण्याशिवाय त्यांना दुसरी तोड राहिली नाहीं.

कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं रचलेल्या मराठीच्या साध्या व्याकरणांत मराठीच्या रूपांचा महाराष्ट्रीच्या रूपांशीं संबंध दाखविण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न केलेला आहे; आणि बीम्स व होर्न्ले यांच्याप्रमाणें च त्यांचा प्रयत्न प्राचीन ग्रंथसंग्रहाच्या अभावीं लंगडा पडलेला आहे. डाक्टर भांडारकर यांनीं वूइल्सन लेक्चरांत आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषा व प्राकृत भाषा ह्यांच्या संबंधासंबंधानें कांहीं विवेचन केलें आहे. त्यांत बीम्स वगैरे सारख्यांच्या कांहीं क्लृप्त्या नामी खोडल्या आहेत. डाक्टरांनीं स्वतंत्र **ऐतिहासिक** व्याकरण रचण्याचा आव घातलेला नसल्यामुळें त्यांचीं विद्वत्ताप्रधुर व्याख्यानें प्रस्तुत स्थलीं टीकेचा विषय होऊं शकत नाहींत. तात्पर्य, सांगण्याचा मुद्दा एवढा च कीं, मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण अद्याप रचावयाचें आहे. कोणत्या हि युरोपियन भाषेंत किंवा आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषेंत तें अद्याप रचलेलें नाहीं. त्या रचनेच्या साहाय्यार्थ ज्ञानेश्वरीची प्रस्तुत आवृत्ति काढिली आहे.

## मराठी भाषेचा इतिहास; मराठी सारस्वताचा इतिहास; मराठी वाङ्मयाचा इतिहास; सारस्वत शास्त्रीय व कलात्मक ग्रंथसमूह; साहित्य; पद्धतिग्रंथ.

**मराठी भाषेचा इतिहास**

**मराठी सारस्वताचा इतिहास**

●१३. गेल्या पंचवीस वर्षांत आणि विशेषतः गेल्या दहा वर्षांत मराठी भाषेंतील पुरातन वाङ्मयाचा व सारस्वताचा संग्रह व प्रकाश इतका विलक्षण झाला, कीं **शिष्ट मराठी भाषेचा इतिहास व शिष्ट मराठी सारस्वताचा इतिहास** रचतां येणें सध्यां बरें च सुगम झालें आहे. त्यांत विशेष महत्त्वाची बाब ही कीं शक ४०० पासून शक १८०० पर्यंतचे मराठी ताम्रपट व शिलालेख सांपडून प्रसिद्ध झालेले आहेत. ताम्रपट व शिलालेख यांच्याप्रमाणें च जुन्या अस्सल हस्तलिखित पोथ्या हि शेंकडोनें सांपडल्या आहेत. त्यामुळें मराठी ग्रंथकारांची कालनिर्णिति व पूर्वापरता ठरविण्याचें काम बरें च सुकर झालें असून, मराठी

**मराठी वाङ्मयाचा इतिहास**

सारस्वताचें स्वरूप यथास्थित कळण्यास हि उत्तम मार्ग झाला आहे. मराठी भाषेचें व प्रयोगांचें गद्यपद्य रूप आदिपासून आतांपर्यंत कसकसें होतें त्याचा परंपरित प्रपंच **मराठी भाषेच्या इतिहासांत** केलेला असतो. आणि मराठी भाषेंतील आद्य ग्रंथापासून आधुनिक ग्रंथापर्यंतच्या ग्रंथसंग्रहाच्या आंतर व बाह्य स्वरूपाचें कालानुक्रमिक व विषयानुक्रमिक जें विवेचन व वर्णन त्याला **मराठी सारस्वताचा इतिहास म्हणतात.** मराठी **भाषेच्या** इतिहासाला मराठी वाङ्मयाचा इतिहास म्हटलें असतां हि अंशतः शोभण्यासारखें आहे. कारण, **भाषेंत** जें जें म्हणून बोललें जातें किंवा लिहिलें जातें तें तें सर्व **वाङ्मय** होय. [सध्या ज्याला लोकवाङ्मय म्हणतात त्यालाच राजवाडे, 'वाङ्मय' म्हणत आहेत. साहित्य व सारस्वत त्याहून निराळे.]

**सारस्वत शास्त्रीय व कलात्मक ग्रंथसमूह.**

वाङ्मयांत सारस्वताचा समावेश होतो. बरीवाईट ही छान वाङ्मयांत नसते. ती निवड **सारस्वत** करतें. उदार, ललित, अभिजात व नागर गद्यपद्य बंध जो निर्मण होतो त्याला **सारस्वत** अशी अनुव्यसामान्य संज्ञा आहे. गणित, ज्योतिष, रसायण, वानस्पत्य, प्राणिजात, तर्क, न्याय, वेदान्त, कृषि, शिल्प वगैरे शास्त्रांवर व कलांवर जो ग्रंथसमूह निर्माण होतो, त्याला **सारस्वत** ही संज्ञा नाहीं, त्याला त्या त्या विषयावरील शास्त्रीय किंवा कलात्मक **ग्रंथसमूह** म्हणून साधें च नांव देतात. गद्यपद्य सारस्वत प्रबंध ज्यांच्या साहाय्यानें तयार होतात त्या छंद, अलंकार, व्याकरण, कोश वगैरे ग्रंथांना **साहित्य** असें नामाभिधान आहे. साहित्य हें सारस्वत नव्हे; सारस्वताचें तें उपकरण आहे. शास्त्रग्रंथांशीं तर्कादिपद्धतिग्रंथांचा जो संबंध तोच सारस्वताशीं साहित्याचा आहे. साहित्या सारस्वताची पद्धति होय.

**साहित्य पद्धतिग्रंथ**

गोडबोले (१८६६), बीम्स (१८७२), होर्न्ले (१८८०), ग्रियर्सन (१९०५) वगैरे मराठी भाषेचे मराठी व इंग्रजी वैय्याकरण गेल्या दहा वर्षांत झालेल्या शोधांमुळें इतके मागें पडले आहेत कीं मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधानें, ग्रंथसंग्रहासंबंधानें, वृद्धिसंबंधानें व स्वभावासंबंधानें त्यांचीं मतें तज्ज्ञांना फार च मागासलेलीं वाटण्याची निश्चिति आहे. ह्याचा तपशील पुढें त्या त्या स्थलीं दिला आहे.

**मराठी सारस्वताच्या** शोधामुळें, **मराठी सारस्वताचा इतिहास** तर सुकर झाला च; परंतु त्याबोबर **मराठी भाषेचा इतिहास** व **मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण** हीं सहजासहजीं सुकर झालीं. तिन्हीं प्रांत अन्योन्यव्याप्त असल्यामुळें, एकाच्या शोधाबरोबर इतरांचा हि इतिहास व स्वरूप कळणें अपरिहार्य होतें.

अनुक्रमणिका

**मराठी सारस्वताचा** जसा जारीनें शोध झाला तसा **मराठी वाङ्मयाचा** अद्याप मुळीं च झाला नाहीं. प्रांतिक, जातिक, अपभ्रष्ट अशा लोककथा, दंतकथा, गाणीं, पवाडे, लावण्या, ह्मणी, वगैरे वाङ्मय अस्सल रूपानें शोधून काढावयाचें अद्याप राहिलें च आहे.

## शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या रचनेची सामग्री

●**१४.** मराठी भाषेचें सारस्वत व विशेषतः ताम्रपटीय व शिलालेखीय वाङ्मय अलीकडे जसजसें सांपडूं लागलें तसतशी मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाची शक्यता उत्तरोत्तर संभाव्य होऊं लागली. आजपर्यंत ऐतिहासिक व्याकरणाला उपयुक्त असे जेवढे जुने लेख उपलब्ध व प्रकाशित झाले आहेत त्या सर्वांची याद खालीं देतो :—

(१) शक ४१० तील मंगळवेढें येथील मराठी ताम्रपट [प्रभात, धुळें.] [मंगळवेढें व चिकुर्डे हे दोन्ही ताम्रपट बनावट व म्हणून अविश्वसनीय होत.]
(२) शक ६५८ तील **चिकुर्डे** येथील मराठी ताम्रपट [विश्ववृत्त, कोल्हापुर] [मंगळवेढें व चिकुर्डे हे दोन्ही ताम्रपट बनावट व म्हणून अविश्वसनीय होते.]
(३) शक ६०२ पासून शक १२०० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील व कोंकणांतील ताम्रपट व शिलालेख यांतील मराठी शब्द [इंडियन आंटिक्करी, एपिग्राफिया इंडिका, एपिग्राफिया कर्नाटिका, वगैरे]
(४) शक ९०५ तील **चामुंडरायाचा** मराठी शिलालेख [विश्ववृत्त.] [श्रवणबेळगोळचा लेख शेक १०३८—३९ मधील असावा.]
(५) शक १०५१ तील **अभिलषितार्थचिंतामणीं**तील मराठी पदें [अभिलषितार्थचिंतामणीच्या दोन पोथ्या डेक्कन कालेजांतील संग्रहांत आहेत; व एक पोथी तंजावरांतील सरस्वतीमहालांत आहे.विश्ववृत्त.]
(६) शक १०३७—१०४० तील लेख [Epi. Ind., Vol. 1., pp. 343 and f.]
(७) शक ११०९ तील परळ येथील मराठी शिलालेख [इंग्रज सरकारी बंगल्यांतील]
(८) शक ११२८ तील पाटण येथील मराठी शिलालेख [प्रभात]
(८अ) शक ११३०—११५० चंदकृत पृथिराजरासउ [ब्रज. नागरीप्रचारणी सभेची छापील प्रत अविश्वसनीय]
(९) शक ११९५—९८ तील पंढरपूर येथील चौऱ्यायशीचा मराठी शिलालेख (ग्रंथमाला)
(१०) शक ११८२ तील कालिदासाच्या रघुवंशावरील हेमाद्रीच्या टीकेंत आलेले मराठी शब्द (नंदर्गीकरांचा रघुवंश)
(११) शक १२१२ तील ज्ञानेश्वरी (मजजवळील प्रस्तुत पोथी मुकुंदराजाची आहे.)
(१२) शक १२७८ तील परशुरामोपदेशांतील मराठी उतारा (मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८, प्रस्तावना).
(१३) शक १३१९ तील वेंगुर्ल्याजवळील मठ येथील मराठी शिलालेख (म. इ. सा.. खं. ८. प्र.)
(१४) शक १२३३ तील पंढरपूर येथील चोखामेळ्याचा शिलालेख (ग्रंथमाला)
(१५) शक १२८९ तील नागावें येथील मराठी शिलालेख (ग्रंथमाला)
(१६) शक (सुमारें) १३०० मधील पंचतंत्र (महाराष्ट्रकवि)
(१७) शक १३०० मधील मराठी कोकशास्त्र (प्रभात)
(१७अ) शक १३१६ तील मुग्धावबोधमौक्तिक (गुजराथी) ध्रुवसंपादित.

अनुक्रमणिका

(१८) शक १४११ तील मिरजेच्या किल्ल्याचा मराठी मोडी ताम्रपट (ग्रंथमाला)
(१९) शक १४५२ व शक १४६३ तील वाई येथील दोन मराठी मोडी ताम्रपट (विश्ववृत्त)
(२०) शक १४९४ तील मंगळवेढें येथील मराठी शिलालेख (ग्रंथमाला)
(२१) शक १५२५ तील(सुमारें) दासोपंताचीं पदें व गीता (महाराष्ट्रसारस्वत व महाराष्ट्रकवि)
(२२) शक १४९७ तील खानदेशांतील सोनगीरच्या किल्यावरील शिलालेख (ग्रंथमाला)
(२३) मराठींतील अनुनासिकाची पूर्वपरंपरा (निबंध, ग्रंथमाला)
(२४) मराठींतील 'ल' प्रत्यय (निबंध, विश्ववृत्त)
(२५) मराठी छंद (निबंध, सरस्वतीमंदिर द्वैमासिक पुस्तक)
(२६) शक १३९६ तील दुर्गादेवीच्या दुष्काळाचा मराठी फर्मान (सरस्वतीमंदिर)
(२७) मराठी शब्दांची व्युत्पत्ति (ग्रंथमाला व सरस्वतीमंदिर)
(२८) स्टेफेन्सकृत इ. स. १६४९ तील कोंकणी अपभ्रंशांत उच्चारलेलें व रोमन लिपींत लिहिलेलें (छापलेलें नव्हे) ख्रिस्तपुराण (मंगलोर येथें इ. स. १९०७ त रोमन लिपींत छापलेलें.)
(२९) इ. स. १५७२ तील मराठी–फारशी (म. इ. सा., खं १, लेखांक १) लेख.
(३०) शक १४६३ व १४७९ तील लिंब येथील दोन मराठी पत्रें (म. इ. सा., खं. ८, प्रस्तावना)

गेल्या पांच वर्षांत इतके जुने मराठी लेख उदयास आलेले आहेत. त्यांत **अपभ्रष्ट मराठी, कोंकणी मराठी, खानदेशी मराठी व शिष्ट मराठी,** ह्या चारींचें लहानमोठे मासले आलेले आहेत. शिवाय, दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या फर्मानांत **मुसलमानी–मराठी अपभ्रंश** अथवा **मराठी–पिशाचभाषा** इचा मासला पहावयास सांपडतो. स्टेफेन्सच्या ख्रिस्तपुराणांत **कोंकणी–पिशाची**चा मासला आढळतो. स्टेफेन्सनें **दासोपंत** व **जनार्दन** यांचे प्रौढ शब्द गोव्याच्या **कोकणी–पिशाचींत** गोविले आहेत. इ. स. १६४९ तील स्टेफेन्स इ. स. १५०० तील किंवा त्याहून हि जुनी भाषा लिहितो. असें होणें साहजिक च होतें. **ज्ञानेश्वर, मुकुंदराज, नामदेव, दासोपंत, गंगाधरसरस्वती,** वगैरे शिष्ट ग्रंथकारांचे ग्रंथ वाचून, स्टेफेन्स शिष्ट मराठी शिकला व तिच्यांच **कोंकणी–पिशाचीची** भेसळ करून त्यानें आपलें पुराण निर्मिलें. अर्थात्, इ. स. १५०० तील ग्रांथिक शिष्ट मराठी भाषा त्याच्या आंगवळणीं पडली. परभाषेसंबंधानें असा चमत्कार होणें अपरिहार्य आहे. इ. स. १८८० तील **कुंटे** इ. स. १७४० तील **पोपची** इंग्रजी भाषा **ऋषि**नामक काव्यांत वापरतो; आणि १७२० तील **आडिसनचें** इंग्रजी **विष्णुशास्त्री चिपळूणकर** १८८० त **ज्ञानप्रकाशां**त लिहितो.कोणती हि शिष्ट भाषा परदेशस्थाला ग्रंथावरून शिकावी लागते; आणि ज्या कालचे ग्रंथ त्याच्या हातांत पडतील त्या कालची शिष्ट भाषा तो सहज नक्कलण्याचा प्रयत्न करतो.

## मराठी भाषेचा मूलारंभ : शक सुमारे ४००; यूरोपियनांचे मात्सर्य व करंटलक्षण; बीम्स.

**मराठी भाषेचा मूलारंभ : शक सुमारे ४००**

●१५. वरील सर्व लेखांत अत्यंत जुना मराठी लेख शक ४१० तील आहे. [शके ४१० चा मंगळवेढें—ताम्रपट अस्सल नसल्याने तो प्राचीनतम नाही हे यापूर्वी टीपांतून सांगितलेच आहे.] अर्थात्, **शक ४१० त मराठी भाषा बनून कांहीं काल गेला होता.** आजपर्यंत इ. स. १३००, इ. स. १०००, इ. स. ९००, इ. स. ७०० वगैरे सन मराठीच्या मूळारंभाचे यूरोपियन लोक देत असत. परंतु, ते मराठीला इतकी अलीकडे ओढण्यांत मोठी भयंकर चूक करीत हें आतां सिद्ध आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक वस्तु वस्तुतः असेल त्याहून बरी च अर्वाचीन भासविण्याची खोड बहुतेक सर्व यूरोपियनांना सारखी च आहे. खोडीचें कारण उघड आहे. हिंदुस्थानांतील अनेक वस्तूंचा इतिहास, परंपरा,पुरातन निर्देश यांची माहिती ह्या लोकांना प्रायः तुटपुंजी व वरवर असते. शिवाय, यूरोपीयन वस्तूपेक्षां एखादी प्राचीन भारतीय वस्तु अर्वाचीन आहे, असें ठरवितां आलें तर स्वपितरांना पाहिल्याचा आनंद ह्या लोकांना होतो.

**यूरोपियनांचे मात्सर्य व करंटलक्षण.**

निदान, भारतीय वस्तु यूरोपियन वस्तूहून फार प्राचीन नाहीं, इतकें तरी ह्मटल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नाहीं. ह्या मात्सर्याला काय म्हणावें? यूरोपांतील तीनचारशें वर्षातल्या उपटसुंभ राष्ट्रांना भारतवर्षाच्या थोर, प्रौढ व संभावित पुरातनत्वाचा हेवा वाटतो, हें त्यांच्या लघुमनाचें द्योतक आहे. बकाल करंट्यांना गर्भश्रीमंताचा हेवा वाटावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं! शास्त्रीय शोधांत मात्सर्याचा आवेश आणणें मायावी असुरांना हि लज्जास्पद होय. **भांडारकर, तेलंग** व **नाना पावगी** ह्यांचें हि मत एतत्प्रकरणीं माझ्यासारखें च आहे.

**बीम्स**

बीम्सनें हिंदी, गुजराथी व पंजाबी यांचा प्रारंभ इसवीच्या ११ व्या शतकांत, मराठीचा प्रारंभ १३ व्या शतकांत, आवढींचा प्रारंभ चौदाव्या शतकांत व बंगालीचा प्रारंभ सतराव्या किंवा अठराव्या शतकांत घातला आहे! शक १०५१ त रचलेल्या **अभिलषितार्थचिंतामणीं**त, हिंदी, लाटी, बंगाली व मराठी पदें दिलेलीं **विश्ववृत्ता**त मीं छापिलीं आहेत.

## मराठी भाषेची गर्भावस्था— शक १५०-शक ४०० पर्यंतचें अराजक.

अनुक्रमणिका

●१६. सुमारें शक १५० पासून शक ४०० पर्यंत महाराष्ट्रांत भयंकर अराजक माजलें [Bhandarkar's 'Dekkan,' Section IX]. ह्या अराजकाच्या अमदानींत शिष्ट महाराष्ट्री भाषा लोपत जाऊन, शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा बनलीं गेली. शातवाहन राजांच्या तीनशें वर्षांच्या राजवटींत (शकपूर्व १५०_शक १५०) महाराष्ट्री भाषेंत विपुल सारस्वत झालें. शातवाहन राजांना संस्कृतापेक्षां महाराष्ट्री प्राकृत जास्त परिचित होती. "मोदकैः परिताडय मां" वगैरे कोट्या शातवाहनांच्या संबंधानें प्रसिद्ध आहेत. शातवाहनांच्या अमलांत शिलालेखांची भाषा हि प्राकृत च असे. शातवाहनांच्या राशियतीनंतर तीनशें वर्षें जें अराजक माजलें त्यांत महाराष्ट्रीचा लोप झाला; म्हणजे महाराष्ट्री भाषेचा पुरस्कर्ता असा कोणी सम्राट् राहिला नाहीं. शक ४०० च्या सुमाराला मराठी भाषा देशांत प्रचलित होऊं लागली. परंतु, महाराष्ट्रीची मान्यता मराठीला, अर्थात् च नावीन्यामुळें, मिळाली नाहीं. त्यामुळें, शिलालेख व ताम्रलेख बहुतेक सर्व संस्कृत भाषेंत होऊं लागले. अशोकाच्या कालापासून शातवाहनांच्या अंतापर्यंत (शकपूर्व ३००-शक १५०) महाराष्ट्री, पाली, वगैरे प्राकृतांत लेख लिहिले जात ते शक ४०० नंतर संस्कृतांत लिहिले जाऊ लागले (Bhandarkar's 'Dekkan,' Section IX) अशी टीका डा. भांडारकरांनीं केलेली आहे. ह्या फरकाचें कारण, मात्र, त्यांनीं दिलेलें नाहीं. जुनी महाराष्ट्री बुडाली होती व नवी मराठी शिष्ट गणली जात नव्हती; सबब, संस्कृताचा उपयोग शक ४०० नंतर जास्त होऊ लागला. मराठीचा अगदीं च उपयोग होत नव्हता, असें नाहीं. कांहीं उपयोग होत होता, हें शक ४१० तील मराठी ताम्रपटावरून [मंगळवेढें ताम्रपट (पूर्वोल्लिखित व बनावट).] स्पष्ट आहे. ज्यांना संस्कृत समजे त्यांच्याकरितां संस्कृत भाषा वापरीत आणि इतरांकरितां तत्कालीन लौकिक भाषा जी मराठी ती वापरीत.

## पाली वगैरे प्राकृत भाषा शकपूर्व १५०० पासून शकोत्तर १५० पर्यंत चालल्या; पाली शब्दाची व्युत्पत्ति;

**पाली वगैरे प्राकृत भाषा शकपूर्व १५०० पासून शकोत्तर १५० पर्यंत चालल्या.**

●**१७.** शक १५० पासून तत्पूर्वी १५०० वर्षे प्राकृत भाषा (पाली-महाराष्ट्री-शौरसेनी-मागधी-पैशाची) आर्यावर्तांत प्रथम (B. C. 1500-700) अशिक्षित लोकांत व नंतर (B. C. 700-A. D. 200) शिष्ट लोकांत चालू होत्या असें दिसतें. कारण, शकापूर्वी एक हजार वर्षांचे प्राकृत किंवा पाली लेख नुकते च सांपडलेले आहेत. सर्वांत आपल्याला माहीत असलेली अशी अत्यंत जुनी प्राकृत भाषा म्हटली म्हणजे जीस पालि, पाळि किंवा पाली, पाळी म्हणतात ती होय. पालि प्राकृत भाषा आहे, असें सार्वत्रिक मत आहे. उदाहरणार्थ, मोझे व्हिक्टोर आन्री (Henry) आपल्या पाली व्याकरणांत असें च मत प्रतिपादितो. (Le Palie est une langue pracritique Grammaire Palie, p. 2, 1904 A. D.) पाली ह्या शब्दाची व्युत्पत्ति अनिश्चित आहे, असें व्हिक्टोर आन्री म्हणतो (Grammaire Palie, p. 1). ड व ल ह्यांच्या अभेदासंबंधानें लिहितांना, आपल्या व्याकरणाच्या ५६ व्या कलमांत पठ्, वाचणें, या धातूपासून **पालि** शब्द निघाला असल्यास, पठित = पढिअ = पडिअ = पलिअ = पालिअ = पालि अशा परंपरेनें तो निष्पन्न व्हावा, अशी सूचना आन्री करतो. ह्या परंपरेंत प चा पा कसा झाला व अंत्य अ चा लोप काय कारणानें झाला, ते सांगणें दुरापास्त आहे. ह्या च व्याकरणाच्या १७४ व्या पृष्ठावर, पालि म्हणजे लिहिण्याची ओळ, पंक्ति, पाठ असा अर्थ तो देतो व त्यावरून भाषेला **पालि** हें नांव पडलें असावें, असें सुचवितो. परंतु, एकदरींत **पालि** या विशिष्टभाषार्थक शब्दाची व्युत्पत्ति आपल्याला निःसंदेह माहीत नाहीं, असें हा वैय्याकरण प्रांजलपणें नमूद करतो. हिब्रू भाषेला बायबल भाषा असें नांव देणें जितपत योग्य आहे तितपत च बौद्धांच्या पवित्र ग्रंथांच्या भाषेला **पालि** भाषा हें नांव देणें योय आहे, अशी हि टीका ह्या वैय्याकरणानें केली आहे. (Dire "le palie", c'est done exactement comme si l'on disait "la Bible" pour "l'he'breu". Grammaire Palie, page1). सारांश, पालि शब्दाची खात्रीलायक व्युत्पत्ति आपल्याला माहीत नाहीं, असें आन्री म्हणतो. मोझे आन्रीचा विशेष उल्लेख करण्याचें कारण असें कीं, ह्या फ्रेंच वैय्याकरणानें आपलें पालि भाषेचें व्याकरण इ. स. १९०४ त लिहिलें आहे. म्हणजे १९०४ पर्यंत पालि या शब्दाची व्युत्पत्ति यूरोपांत माहीत नाहीं, हें उघड आहे. माझ्या मतें, पाली शब्दाची व्युत्पत्ति येणेंप्रमाणें:—

**पाली शब्दाची व्यत्पत्ति**

प्रकट = पाअड = पाअल = पाल.

अनुक्रमणिका

पाल शब्दाचें स्त्रीलिंग पाली अथवा पाळी. प्रकट अथवा पाली भाषा म्हणजे ती कीं जी सामान्य लोकांत प्रचलित असते. डलयोरभेदः। आडविकं = आलविकं, आळविकं. पाली तीच पालि; जसें मती-मति. इ. इ. इ.

एवंच, पाली, पालि, पाळी किंवा पाळि भासा म्हणजे **सहज येणारी** किंवा प्रकट भाषा होय. प्रकट भाषा म्हणजे मूळ जन्मभाषा. बौद्धांचे ग्रंथ ज्या मूळ भाषेंत लिहिले तिला सिंव्हलद्वीपांतील लोक पाली भाषा किंवा मूळ भाषा म्हणूं लागले. ह्याहून ह्या शब्दांत जास्त गूढ नाहीं. बुद्ध जी भाषा बोलला त्या भाषेला सिंहली लोक भक्तीनें व अभिमानानें पाली अथवा मूळ भाषा म्हणतात. [पाली भाषेच्या संबंधात झुल् ब्लोक यांचे पुढील विचार या ठिकाणी नमूद करण्यासारखे आहेत:—]

"पालि ही बौद्ध धर्मग्रंथांची एकटीच भाषा आहे असे नाही. आजतागायत अप्रसिद्ध अशा एका भाषेत इ. स. नंतर दुसरे शतक संपण्याच्यापूर्वी लिहिलेले धर्मपदाचे काही त्रुटित भाग खोतानच्या आसपास सापडले आहेत (संपादक: सनार, JAS., 1898, II, 193_). (तिच्या) स्वरूपावरून काव्यनाटकांतील प्राकृतांपेक्षा या भाषेचे स्वरूप अलीकडले वाटते.... काही बौद्धग्रंथ, विशेषतः महावस्तु व ललितविस्तर, हे ज्या एका विलक्षण भाषेत लिहिले आहेत तिच्यामध्ये संस्कृत, पालि व प्राकृत या तीन भाषांची वाटेल तशी मिसळ केलेली दिसते....तात्पर्यार्थ, कोणत्या खरोखरीच्या भाषास्थितीचे हे ग्रंथ निदर्शक होतील ते ठरविणे सर्व तऱ्हेने अशक्य आहे. तुलनात्मक व्याकरणाने या ग्रंथांचा अर्थ लावण्यास मदत होईल, परंतु खुद्द त्याला त्यांचा काही उपयोग नाही."

(झुल ब्लोक: मराठी भाषेचा विकास: वा. गो. परांजपेकृत
मराठी भाषांतर: पृ. ८—९)

परंतु, पाली ही मूळ भाषा नसून, ती जिच्यापासून निघाली अशी तिच्याहून हि जुनी भाषा दाखवून देतां येते. ब्राह्मणांतील जी संस्कृत भाषा ती ही भाषा होय. हिला च डा. भांडारकर Middle Sanskrit किंवा पाणिनीय संस्कृत भाषा म्हणतात. Weber, Victor Henry वगैरे लोक हिला च "ancetre inconnu" म्हणजे "अज्ञान पूर्वज" म्हणतात. डा. भांडारकर जिला Classic संस्कृत म्हणतात तिला Weber वगैरे यूरोपियन लोक पाणिनीय संस्कृत चुकीनें समजतात, इतकें च. पाली भाषा Classic संस्कृताची म्हणजे शिष्ट संस्कृताची पुत्री नसून भगिनी आहे, असें हे लोक वस्तुतः म्हणतात; परंतु पाली Middle संस्कृताची म्हणजें पाणिनीय संस्कृताची छाया व Vedic संस्कृताची म्हणजे आर्ष संस्कृताची स्नुषा आहे, हें (१) आर्ष भाषा, (२) पाणिनीय भाषा, व (३) संस्कृत भाषा अशा तीन पायऱ्या त्यांच्या लक्षांत आणूंन दिल्या म्हणजे, त्यांना तेव्हां च पटेल, असें वाटतें. पालीची परंपरा अशी आहे:—

अनुक्रमणिका




वरील वृक्षावरून डा. भांडारकरांचें म्हणणें स्पष्ट व्हावेंसें वाटतें.

**पाली भासा पाणिनीय भाषेची छाया आहे, आणि महाराष्ट्री भाषा संस्कृत भाषेची छाया आहे.**

यूरोपीयन लोक daughter, grand-daughter, mother, sister, वगैरे शब्द योजून व्यर्थ घोटाळ्यांत पडतात व अभिमानाला किंवा दुरभिमानाला पेटतात. ते जर "छाया" हा शब्द योजतील तर पुष्कळ गैरसमज दूर होईल. पाणिनीय भाषेची पाली भासा ही छाया आहे आणि संस्कृत भाषेची महाराष्ट्री भाषा छाया आहे, असें भांडारकरांचें म्हणणें आहे, आणि तें अगदीं बरोबर आहे. पाणिनीय भाषा शिष्ट लोक बोलत आणि पाली भासा शिष्टेतर लोक बोलत. त्याप्रमाणें च संस्कृत भाषा शिष्ट बोलत आणि महाराष्ट्री भाषा शिष्टेतर लोक बोलत.

कालान्तरानें पाली भासा एका धर्माची पूज्य भाषा झाली. तो शाक्यमुनीनें काढलेला बौद्धधर्म होय. बुद्धाचा धार्मिक अवतार कीकट देशांत झाला, असें भागवत पुराणांत म्हटलें आहे (१-३-२४); आणि

टीकाकारानें कीकट म्हणजे गयाप्रदेश असा खुलासा केला आहे. म्हणजे पाली भासा बुद्धाच्या वेळीं गयाप्रदेशांत शिष्टेतर लोक शेंकडों वर्षे बोलत असत. चातुर्वर्ण्याचा व कर्ममार्गाचा आश्रय करणारे जे ब्राह्मण त्यांची भाषा पाणिनीय संस्कृत असे; आणि एकजातीचा व यानमार्गाचा आश्रय करणारा जो गौतमबुद्ध त्याची भाषा प्राकृतजनांची पाली असे.

ततः कलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषां ।
बुद्धो नामांजनसुतः कीकटेषु भविष्यति ॥ (भागवत पुराण १-३-२४)
टीका:—कीकटे मध्ये गयाप्रदेशे.

ऋग्वेदांत हि ह्या कीकट देशाचा उल्लेख आला आहे :—

किं ते ऋण्वन्ति कीकटेषु गावो.

यास्क :— कीकटो नाम देशो अनार्यनिवासः। निरुक्त, ६-३२.

## पालीचा मूळदेश

ऋग्वेदकालीं कीकट देशांत अनार्य रहात असत. सध्यां आपण ज्यांना कैकाडी म्हणतों व यूरोपियन लोक ज्यांना Gypsy [Gypsy(जिप्सी)म्हणजे अ-निकेत, भटकी जमात.] म्हणतात त्यांचा हा मूळदेश असावा. ह्या प्रांतांत आर्यांनीं वसाहत केल्यावर कैकाडी लोकांचे अपभ्रष्ट उच्चार आर्यांच्या कनिष्ठ जातींत व शिष्टेतर लोकांत शिरले आणि प्रकटी ऊर्फ पाअडी ऊर्फ पाअली ऊर्फ पाली उर्फ पाळी ऊर्फ पाळि भासा प्रचलित झाली. भाषा अशिष्ट लोकांच्या तोंडीं जाऊन जो अपभ्रंश झाला, त्या अपभ्रंशालां च प्राकृत भाषा म्हणतात, असें जें डा. भांडारकर म्हणतात, तें वरील हकीकतीवरून खरें आहे असें दिसतें. डाक्टरांचें विधान प्राकृत भाषासंबंधानें आहे व वरील हकीकत पाली भाषेसंबंधानें आहे. परंतु, तेवढ्यानें डाक्टरांचा सिद्धान्त कांहीं कमजोर होत नाहीं; उलट शिरजोरच होतो. कारण पाली भासा ह्या शब्दाचा अर्थ प्राकृत भाषा असा च आहे.

पाणिनीचा काल डा. भांडारकर सुमारे शकपूर्व ८०० धरतात. परंतु ब्राह्मणांचा अगदीं शेवटला काल शकपूर्व १५०० जर त्यांना मान्य असेल तर, पाणिनीचा हि काल त्यांनी तो च धरल्यास, त्यांच्या उपपत्तीला ज्यास्त सामर्थ्य येईल.

## पाणिनीय भाषा व पाली भासा यांच्या संबंधासंबंधानें यूरोपियन विद्वानांचा गैरसमज

पाणिनीय भाषेची म्हणजे ब्राह्मणकालीन शिष्ट भाषेची छाया ज्याअर्थी पाली भासा आहे, त्या अर्थी ती पाणिनीय भाषेइतकी च वेदभाषेशीं संबद्ध आहे. इतकें च कीं ब्राह्मणकालीन भाषा पाणिन्यादि शिष्ट वैय्याकरणांच्या उपदेशानें नियमबद्ध होत आहे; आणि शिष्टेत्तर लोकांची जी पाली भासा ती होत नाहीं. त्यामुळें वेदभाषेंतील कांहीं आर्षरूपें व लकबा पाली भाषेंत सांपडाव्या, हें साहजिक आहे. (१) ळ, ळ्ह हे उच्चार; (२) ऱ्हस्वदीर्घाकडे दुर्लक्ष्य, जसें छंदस्सुखार्थ, रमती, चेत्वा; (३) वैकल्पिक स्वरसंधित्व; (४) तृतीयेचा वैदिक प्रत्यय एभिः अथवा येभिः; (५) विशेषणविशेष्यांपैकीं एखाद्याला च विभक्तिप्रत्यय लावण्यांत धरसोड; (६) कर्मणि प्रयोगापेक्षां कर्तरि प्रयोगाचें बाहुल्य; (७) धातुसाधिताच्या वैदिक त्वान प्रत्ययाचें आधिक्य; ह्या सात लकबांवरून यूरोपीयन लोकांनीं असें ठरविलें आहे कीं पाणिनीय भाषेहून पालि भासा जुनी आहे. पालि भासेहून पाणिनीय भाषा जास्त शिष्ट, नियमबद्ध व सुधारलेली आहे, असें जर हे लोक म्हणतील, तर त्यांना पालि व पाणिनीय भाषा यांच्यामधील भेद उत्तम कळला असें म्हणतां येईल. कोणत्या

अनुक्रमणिका

हि भाषेच्या बाल्यावस्थेंत कर्मणि प्रयोगापेक्षां कर्तरि प्रयोगाचा उपयोग जास्त होतो. शिष्ट व सुधारलेल्या लोकांना कर्मणि प्रयोग पेलण्याचें सामर्थ्य येतें. तें सामर्थ्य गांवढ्यांना नसतें. पाणिनीय भाषेंत शब्दांच्या आत स्वरसंधि अगदीं नियमानें होतो च. हा नियम शिष्ट लोक पाळूं शकतात; शिष्टेतरांना इतकी नियमनशक्ति नसते. येभिः = एभिः = एहिः = ऐः अशा परंपरेनें शिष्टांनीं तृतीयेचें अनेकवचन ऐः प्रत्ययानें करण्याचा कित्येक स्थलीं प्रघात पाडला. शिष्टेतर जुना येभिः च प्रत्यय घेऊन बसले. शिष्टेतर ऱ्हस्वदीर्घाकडे दुर्लक्ष्य करतात; असलें दुर्लक्ष्य शिष्टांना व सभ्यांना खपत नाहीं. करोती, रमती, चराति असलीं रूपें अशिष्ट पालींत व वैदिक भाषेंत सांपडतात; परंतु पाणिनीय शिष्ट व सभ्य भाषेंत ही धरसोड अजीबात बंद केलेली आहे. पाली भाषेच्या ह्या सात हि लकबा आधुनिक अशिष्ट मराठींत आढळतात. छंदःसौकर्यार्थ ऱ्हस्वदीर्घाकडे कुकवींच्या मराठींत हमेश दुर्लक्ष्य होतें. शिष्टेतर मराठी वक्ते कर्मणि प्रयोगाचा कर्तरिपेक्षां कमी उपयोग करतात. ळ, ळ्हचा उच्चार अशिष्ट मराठींत फार आहे. सारांश, ह्या सात हि लकबा अशिष्टत्वाच्या द्योतक आहेत; श्रेष्ठत्वाच्या द्योतक नाहींत. त्यांना मिठी मारून, पाणिनीय भाषेला अर्वाचीन व कृत्रिम ठरविण्याच्या वृथा खटपटींत यूरोपियन लोक पडेल आहेत, ह्यांत बिलकुल संशय नाहीं.

## अशिष्ट पालीचा दुतोंडेपणा.

अशिष्ट लोक शिष्ट भाषेचा अपभ्रंश करण्यांत जितके चपळ असतात, तितकेच जुन्यापुराण्या आर्ष शब्दांना व प्रत्ययांना चिकटून बसण्यांत पटाईत असतात. अशिष्ट लोकांचे हे परस्परविरुद्ध चाळे आजपर्यंत अनेक यूरोपीयन लोकांना फसवीत आले आहेत. त्यांच्या भाषेंत ज्या अर्थी अत्यंत जुनेपुराणें शब्द सांपडतात, त्या अर्थी त्यांची भाषा तत्कालीन शिष्ट भाषेहून जुनी असावी, असें जों क्षणभर मानावें, तों वर्तमान शिष्ट भाषेचे अपभ्रंश करण्यांत हे लोक गुंतलेले पाहून, नवी भाषा बनविण्याच्या खटपटींत हे आहेत, असें दृष्ट्युत्पत्तीस येतें. 'कत्त्वान' शब्दांत वैदिक 'त्वान' प्रत्यय पाहून पाली भासा वैदिक भाषेच्या जोडीला नेऊन जों बसवावी, तो 'दत्तवत्' शब्दाचा 'दिन्नवा' अपभ्रंश पाहून पाणिनीय संस्कृतापासून ही पतित होत चालली आहे, असें म्हणणें भाग पडतें. मराठींत हि हाच चमत्कार दृष्टीस पडतो. "जात्याती" हें जुनें रूप अशिष्ट लोकांच्या तोंडीं जों ऐकावें, तो "घराप" हें अपभ्रष्ट रूप त्याच वाक्यांत आढळून येतें.

यान्तः असन्ति = जाँत आहाति = जाँताहाति = जाँत्याति = जाँत्याती ; अशी जात्याती व जाँत्याती ह्या जुन्या रूपांचीं परंपरा आहे. 'जात्याती.' बद्दल आधुनिक शिष्ट लोक "जातात" असें रूप योजतात :

जाताहाति = जाताति = जातात.

परंतु, अशिष्ट लोक जाँत्यायी किंवा जात्याती हें जुनें अपभ्रष्ट रूप च धरून बसले आहेत. पण एवढ्यानें ते जुनी भाषा बोलतात, असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. कारण,

घरापासोनियां = घरापासौनि = घरापासौन = घरापास = घराप

ह्या परंपरेनें अशिष्ट लोकांनी 'घराप' हें अपभ्रष्ट रूप बनविलेलें पाहून, ते नवी भाषा तयार करीत आहेत, असा सिद्धान्त बसवावा लागतो. तात्पर्य, अशिष्ट लोकांच्या ठायीं जुन्याला चिकटण्याचा व नव्याला धरण्याचा परस्परविरोधी दुतोंडी गुण असतो, हा सिद्धान्त आहे. ह्या दुतोंडी गुणाच्या कोणत्या हि एका च तोंडाला पाहून, पालीसारख्या अशिष्ट भाषांचे गुणधर्म व जातगोत ठरवूं जाणें अशास्त्र आहे.

अनुक्रमणिका

## सारस्वतामुळें पाली आज आहे असें समजतें.

गौतमबुद्ध जर न जन्मता आणि पाली भासेंत न बोलता व लिहिता, तर पाली भासेची आठवण आज न रहाती. पाली ऊर्फ प्राकृत गौतम बुद्धाच्या पूर्वी हजार वर्षे होती. परंतु, तींत सारस्वत किंवा वाङ्मय नसल्यामुळें, तिची माहिती हि कोणास नाहीं. बुद्धानंतर तींत धार्मिक सारस्वंत होऊ लागलें व बौद्ध लोकांची ती धार्मिक भाषा बनली. त्यामुळें, ती आज उपलब्ध व माहीत होत आहे.

## युरोपियन लोकांचें पालीवरील प्रेम सहेतुक आहे.

यूरोपियन लोकांना पालीची जी इतकी बेसुमार गोडी लागलेली दिसत आहे, तिला कारण आहे. पाली भासा ज्या बौद्ध लोकांची धर्मभाषा आहे ते लोक यूरोपीयन लोकांप्रमाणें च चातुर्वर्ण्यविहीन व आचारहीन आहेत. ह्या समानधर्माशिवाय, पाली ग्रंथांवर यूरोपीयन विद्वानांचा इतका भर असण्याचें दुसरें असें कारण आहे कीं, ख्रिस्ती धर्माचा एकोनएक स्वभाव बौद्ध धर्मात सांपडतो, व ख्रिस्ती धर्म बौद्ध धर्माची नक्कल आहे, अशी खात्री होतें. अशी ज्या अर्थी वस्तुस्थिति आहे, त्या अर्थी पाली भासा संस्कृत भाषेहून, पाणिनीय भाषेहून व वैदिक भाषेहूनहि पुरातन आहे, अतएव ब्राह्मणांच्या वेदभाषेहून श्रेष्ठ आहे, अशी सिद्धि करण्याकडे युरोपियनांच्या मनाचा फार ओढा असतो. ब्राह्मणांपासून किंवा ब्राह्मणांच्या वडलांपासून उसनें घेतल्याची लाज ह्या लोकांना फार वाटते; इतकी कीं, ज्यांच्याशीं केवळ धर्माच्या नकलेचा बादरायण संबंध, त्या बौद्ध लोकांच्या पालीला हि पाणिनीय भाषेची नक्कल म्हटलेलें ह्यांना खपत नाहीं. इतकें च नव्हे, तर, पाली भासा वैदिक भाषेहून हिं पुरातन आहे, असें निराधार मत प्रस्थापिल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नाहीं.

## पाली भासा पाणिनीय भाषेची छाया आहे हें ठरविण्यास तोडगा

पाली भासा वैदिक भाषेच्या बराबरची नाहीं, हें ठरविण्याला तोडगा आहे. पालीचें छायारूप भाषान्तर यूरोपीयन लोक पाणिनीय भाषेंत देतात, वैदिक भाषेंत किंवा संस्कृत भाषेंत देत नाहींत. ह्याचा अर्थ इतका च कीं पाली भासेची छाया पाणिनीय भाषेंत साधर्म्यामुळें देणें जितकें सोयीचें आहे, तितकें वैदिक किंवा संस्कृत भाषेंत देणें सोयीचें नाहीं.

## वेदांत अपभ्रष्ट उच्चार असुर लोक इसवीपूर्वी ६०००—२०००

अनुक्रमणिका

**वेदांत अपभ्रष्ट उच्चार**

**असुर लोक**

**इसवीपूर्वी ६०००—२०००**

पाणिनीय भाषेची छाया जशा पाली ऊर्फ प्रकटी ऊर्फ प्राकृत भाषा, तशा वैदिक आर्ष भाषेची छाया असलेली उपलब्ध नाहीं. कारण, आर्षकालीं अनार्य लोकांवर आर्षभाषा लादण्याचा प्रसंग उद्भवण्यास म्हणण्यासारखें कारण झालें नाहीं. तत्रापि, असुर्या देशांतील असुर लोकांशीं संबंध आला असतां, दुष्ट उच्चार आर्यांच्या कानावर येऊं लागले, असें म्हणण्यास आधार आहे. “तेऽसुरा ‘हेऽलयो हेलय’ इति कुर्वन्तः पराबभूवुः । तस्मात् ब्राह्मणेन न म्लेच्छितवै नापभाषितवै । म्लेच्छो ह वा एष यदपशब्दः । तस्मान्न ब्राह्मणो म्लेच्छेत् ।” अशी शतपथश्रुति आहे. ही श्रुति ब्राह्मणकालीं रचली आहे, हें तिच्या भाषेवरून उघड दिसत आहे. परंतु, हींत पुरातन काळीं अपभ्रष्ट उच्चार करणाऱ्या असुरांचा पराभव झाला, असें वर्णन आहे. म्हणजे आर्षकालीं आर्ष शब्दांचा असुर लोक अपोच्चार अथवा अपभ्रंश करीत. हे असुर म्हणजे असूर्या किंवा असुर्या देशांतील लोक. असुर्या देश इराणच्या पश्चिमेस यूफ्रेटीस व टैग्रीस या नद्यांच्या भोंवती आहे. असुर्या देशांत असुरांनीं मोठी पातशाहत इसवीसनापूर्वी ६००० पासून २००० पर्यंत केली. अर्थात आर्ष ‘अरयः’ शब्दाचा ‘अलयः’ असा अपभ्रंश असुरांच्या तोंडून इसवीपूर्वी ३००० वर्षांच्या सुमारास झाला असला पाहिजे. “पिक”, “नेम”, “तामरस” वगैरे शब्द असुर भाषेंतून आर्षभाषेंत जे आले म्हणून शबरस्वामी म्हणतो, ते ह्याच कालांत आले. बायबलांत Molochians [Molochians : ज्याला लहान मुलें बळी देतात अशा मोलक नावाच्या सेमिटिक देवाचे भक्त.] म्हणून एका लोकांचें नांव येतें ते च हे म्लेच्छ असावेत आणि म्लेंच्छ हे असुरांपैकीं होते, हें वरील श्रुतीवरून सिद्ध होत च आहे. अव्यक्त उच्चार करणें हा असुरांचा मुख्य उच्चारदोष होता. ‘म्लेच्छ अव्यक्ते शब्दे।’ धातुपाठ २०५.

## प्रांतिक, जागतिक किंवा गोत्रीय आर्ष भाषा

ज्या अर्थी आर्ष शब्दांचा असुर लोक अपभ्रंश करीत, त्या अर्थी आर्ष भाषेचा अपभ्रंश होता, असें म्हणावें लागतें. अपभ्रंशाखेरीज, आर्षभाषेच्या प्रांतिक किंवा गोत्रीय विभाषा हि असाव्या, असें दिसतें. कारण, देवाः—देवासः,देवैः—देवेभिः, त्वानं—त्वीनं—त्वाः अशीं अनेक रूप एकाच विभक्तीचीं व वचनाचीं ज्या भाषेंत सांपडतात त्या भाषेंत प्रांतिक किंवा गोत्रीय किंवा जातिक पोटभेद असले पाहिजेत, ह्यांत संशय नाहीं. तसेंच कृत बद्दल कुट, कर्त बद्दल काट, गृह बद्दल गेह, वगैरे कठिण व सोपे उच्चार ज्या भाषेंत एका च वेळीं आढळतात त्या भाषेंत पोटभेद असले पाहिजेत, असें मानिल्यावांचून गत्यंतर नाहीं. तात्पर्य, ग्रांथिक भाषा, प्रांतिक भाषा, जातिक किंवा गोत्रिक भाषा, व अपभ्रंश, असा चतुर्विध भाषाभेद वैदिक कालीं होता. पैकीं, म्लेच्छ व असुर लोकांनीं केलेला अपभ्रंश वैदिक आर्यांना बिलकुल खपत नसे व तो त्यांच्या तिरस्काराचा विषय होत असे. प्रांतिक व गोत्रिक भाषाविकार किंवा भेद प्रबल व सर्वमान्य झाल्यास शिष्ट व ग्रांथिक भाषेंत समावेशिला जाई, आणि दुर्बल झाल्यास लुप्त होई. प्रांतिक किंवा गोत्रिक पोटभाषा बोलणारे आर्य पडल्यामुळें तिरस्काराचें कारण नसे.

अनुक्रमणिका

## युरोपियन विद्वान विरुद्ध डॉ. भांडारकर

ह्या ज्या प्रांतिक किंवा जातिक किंवा गोत्रिक वेदकालीन पोटभाषा त्यांच्यापैकीं एकीपासून किंवा सर्वांपासून पाली भासा उद्‌भवली, असें यूरोपियनांचें ह्मणणे आहे. पाली पाणिनीय ऊर्फ ब्राह्मण भाषेची प्राकृत छाया आहे, असें डा. भांडारकरांचें मत आहे. पैकी खरें कोणतें, ह्याचा निर्णय मागें झाला च आहे. पालीचा अक्षरशः व रूपशः तर्जुमा किंवा विपरिणाम जसा पाणिनीय भाषेंत तंतोतंत होतो तसा वैदिक भाषेंत किंवा वैदिक भाषेच्या कोणत्या हि पोटभेदांत [माहीत असल्यास] होत नाहीं. त्या अर्थी पाली भासा वेदकालीन भाषेच्या कोणत्या हि पोटभेदांपासून निघाली नसून, पाणिनीय भाषेची छाया ऊर्फ प्राकृत प्रतिकृति आहे. पाणिन्यादि शिष्टांच्या भाषणांतून व ग्रंथांतून लुप्त झालेलीं कांहीं वैदिक रूपें व शब्द अशिष्टांच्या प्राकृत, प्रकट, ऊर्फ पाली भाषेंत सांपडतात इतकें च. तेवढ्यानें युरोपियनांचा सिद्धान्त प्रस्थापित होणें अवघड आहे.

## अनार्यांच्या नुसत्या संसर्गानें झालेला अपभ्रंश

कीकटनामक गयाप्रदेशांत ब्राह्मणेतर आर्यांना अनार्य कीकटांच्या संसर्गानें अपभ्रष्ट उच्चार करण्याचा वाण लागला आणि कालान्तरानें हा वाण बळावून, पाली ऊर्फ प्रकट ऊर्फ प्राकृत भासा जन्मास आली. अनार्याच्या संसर्गानें ब्राह्मणांना देखील अपोच्चार व अपभाषण करण्याची संवय लागण्याची भीति होती. एतदर्थ ब्राह्मणानें अनार्य म्लेंच्छासारखे अपभ्रष्ट उच्चार करू नये, असा इशारा त्याकालीं उच्छृंखल ब्राह्मणांना तत्कालीन शिष्टांनीं दिला सारांश, शिष्ट भाषेचा अपभ्रंश अनार्याच्या संसर्गानें हि होणें शक्य असतो.

## अनार्यांनी केलेला आंतर अपभ्रंश

आर्यभाषा अनार्य उच्चारूं व योजूं लागले असतां जो अपभ्रंश होतो, तो उच्चारापुरता च थांबत नाहीं, तर, लिंग, वचन, प्रत्यय, वगैरे भाषेच्या आंतर रचनेंत हि त्या त्या अनार्यांच्या भाषेच्या स्वभावानुरूप फेरफार करतो. असला आंतर अपभ्रंश होऊन, पाली भासा बनलेली नाहीं. फक्त संसर्गाचा अथवा सांसर्गिक अपभ्रंश होऊन पाली भासा पाणिनीय भाषेची छाया बनली. संसर्गानें श्यापर्ण इत्यादि कित्येक ब्राह्मणजाति अपूत ह्मणजे असंस्कृत भाषा बोलत असें विस्तृत वर्णन ऐतरेय ब्राह्मणाच्या प्रथम खंडाच्या ३५ व्या अध्यायांत आलें आहे. ती च ही पाली असावी. [वैदिक भाषा(शकपूर्व ६०००—३०००) आणि ब्राह्मणभाषा ऊर्फ पाणिनीय भाषा (शकपूर्व ३०००—१५००) ह्यांच्या वेळीं अपभ्रष्ट भाषा होती, हें वरील मुद्यांवरून स्पष्ट आहे. युरोपीयनांच्या एतत्संबंधानें कल्पना अद्याप फार अस्पष्ट आहेत. इ. स. १९०४ त राप्सन येणेंप्रमाणें लिहितो :—These Prakrits cannot be traced back to Vedik Sanskrit, or to the period of the Brahmanas or even to the date of the earliest Sanskrit of the Epics! (In what degree was संस्कृत a spoken language?) A. D. 1904, J. R. A.S.

रास्पन पाणिनीला शकपूर्व ३०० ला आणून ठेवतो! कालाचा असा गोंधळ केल्यामुळें, युरोपियनांच्या संस्कृतप्राकृतभाषाविषयक बहुतेक सर्व कल्पना हि विचित्र व असंभाव्य होतात; मग सिद्धन्त तर होतील च!!! (राजवाडे—टीप).

## १८. मगध—सुरसेन पिसाचपुर

पाली भासा गौतमबुद्धाच्या पुढें पन्नासशंभर वर्षे चालून, नंतर तिचें प्रयाण सिंहलद्वीपांत झालें. सिंव्हलद्वीपांत गेल्यापासून, ती बौद्ध लोकांची धार्मिक भाषा बनली व मातृभाषेची स्थिर कळा तिला आली. पाली भासा म्हणजे मगधांतील किंवा कोसलांतील प्राकृत भाषेचा बुद्धाच्या वेळचा पोटभेद. तो पोटभेद

अनुक्रमणिका

बौद्धधर्मीयांनीं यद्यपि स्थिर व मृत बनविला, तत्रापि मगध देशांतील मागधी प्राकृत तत्कालीन संस्कृताची मगधदेशांतील छाया म्हणून नांदत होती च. मथुरादेशांत जी संस्कृताची छाया होती तिला शौरसेनी असें नांव पडलें. आणि पिशाच लोक जी छायारूप संस्कृत बोलत तिला पैशाची असें अभिधान होतें. मागधी, सौरसेनी व पैसाची हीं विशेषणें व विशेष्यें मगध, सूरसेन व पैसाच ह्या देशवाचक शब्दांवरून पडलीं आहेत. वर्तमान बहार म्हणजे मगध; मथुरेभोंवतालील जो प्रांत तो सूरसेन; आणि प्रस्तुतच्या पिसावर प्रांताच्या उत्तरेकडील जो प्रांत तो पिसाच. मगधदेश कोणता ह्यासंबंधानें वाद नाहीं. सूरसेनदेशाचा उल्लेख मनुस्मृतींत येणेंप्रमाणें आला आहे.

कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पंचालाः शूरसेनकाः ॥ [मनु. अ. २, श्लो. १९]
हा शब्द भारत व हरिवंश ह्यांत येतो.

पेशावर = पिसावर = पिसाउर = पिसाचपुर, अशा परंपरेनें आधुनिक पेशावर शब्द साधला असल्यानें, पेशावरच्या उत्तरेकडील काफरिस्थान, कोहिस्तान, चित्रळ व अंशतः काश्मीर वगैरे प्रांतांतील पुराण भाषा पिसाचांची होय, ह्यांत संशय नाहीं. अलीकडे [इ. स. १९०४, Journal, R. A. S., pp. 725-731] ग्रियरसन्चें हि मत असें च झालेलें आहे.

**पौण्ड्रकाश्चौड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ।**
**पारदा पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ।।**

[मनु, अ.१०, श्लोक ४४].

ह्या श्लोकांत उल्लेखिलेले जे दरद ते च Dard होत. त्यांची भाषा पैसाची वर्गांतील होय, असें वरील भाषागणकांचें मत आहे.

अपक्रामतु भूतानि पिशाचाः सर्वतो दिशं ।

संध्येतील ह्या श्लोकार्धांत ह्या पिसाचांचा निर्देश आहे. तैत्तिरीय संहितेंत देखील यांचें नांव येतें. पैशाच विवाहाचा उल्लेख स्मृतिकारांनीं केलेला प्रसिद्ध आहे. मुळीं, हे लोक अनार्य होते व आर्यांचे शत्रु होते. ह्यांच्या संसर्गानें कित्येक आर्य क्षत्रिय क्रियालोपानें आर्यत्वापासून च्युत होऊन दरद झाले; व मूळ आर्यभाषा अपभ्रष्ट उच्चारानें बोलूं लागले.

शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥

(मनु, अ.१०; श्लोक ४३)

## ऐतिहासिक दृष्ट्या अथवा कालावच्छेदानें महाराष्ट्रींचें अर्वाचीनत्व. पहिली प्राकृत-सौरसनी; देव कोण? दुसऱ्या प्राकृतमागधी व पैसाची; तिसरी प्राकृत : महाराष्ट्री

अनुक्रमणिका

● १९ सूरसेन, मगध व पिसाउर ह्या प्रांतांत पाणिनीय भाषेच्या प्रांतपरत्वें तीन निरनिराळ्या छाया झाल्या. त्यांतल्या त्यांत पहिली छाया सूरसेनदेशांत झाली. कारण आर्यांचें भरतखडांतील पहिलें नागर वसतिस्थान ह्मटलें म्हणजे सरस्वती व दृषद्वती या दोन पवित्र नद्यांमधील जो ब्रह्मावर्त प्रांत तो होय.

सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥

( मनु, अ. २, श्लोक १७ )

## देव कोण ?

सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील प्रदेश देवांनीं प्रथम वसाहत करून तयार केला आणि त्याला ब्रह्मावर्त्त असें नांव पडलें, असा ह्या श्लोकाचा अर्थ आहे. देव म्हणजे आपणा हिंदुस्थानांतील आर्यांचे मूळ पूर्वज. देव म्हणजे ईश्वर, gods नव्हे. असुरांशीं, म्हणजे इंग्रज लोक ज्या देशाला Assyria म्हणतात त्या देशांतील पुरातन रहिवाशांशीं, ज्यांचें हाडवैर असलेलें वेदांत वर्णिलें आहे ते हे देव होत. हे देव कोण तें नीट न उलगडल्यामुळें रा. रा. ऱ्हीस डेव्हिस ह्या श्लोकांवर अशी अज्ञ व पोरकट टीका करतो:——

"That, according to the ब्राह्मणs, is the land created by the gods—as if, other lands were not. (Here), the priestly authors of that famous manual (मनुस्मृति) have thrown off all disguise."

(Journal R. A. Society, for 1904., p. 93 )

देव ह्या शब्दाचा नीट अर्थ उलगडला असता, म्हणजे ब्राह्मण सत्य व इतिहाससिद्ध जें होतें तें च लिहीत आहेत, असें ऱ्हीस डेव्हिस्च्या लक्ष्यांत आलें असतें. असो. ब्रह्मावर्त्ताशेजारील जो मथुराप्रांत त्या प्रांतांत आर्यांची कालान्तरानें वसाहत पसरून भाषेंत प्रथम अपभ्रंश सुरू झाला. त्याला च प्रौढदशेंत सौरसेनी असें नांव पडलें.

कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पंचालाः शूरसेनकाः ।
एष ब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्त्तादनन्तरः ।

(मनु, अध्याय २, श्लोक २०)

**दुसऱ्या प्राकृत मागधी व पैसाची**

कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, पंचाल व सूरसेन ह्या देशांत आर्यांचा प्रसार झाल्यानंतर, त्यांच्या वसाहती पूर्वेस मगध व पश्चिमेस पिसाउर प्रांतांत कायम झाल्या किंवा त्या प्रांतांना स्पर्श करूं लागल्या. अशा स्थितींत मागधी व पैसाची ह्या दोन प्राकृत भाषा तत्तद्देशस्थ मूळ लोकांच्या संसर्गानें उच्चारापभ्रंश होऊन अस्तित्वांत आल्या. पूर्वेस व पश्चिमेस वसाहती झाल्यानंतर आर्यांची दृष्टि दक्षणदिशेकडे वळली आणि दंडकारण्यांत त्यांनीं प्रवेश केला. दंडकारण्यांत वसाहत व कायमची वसति झाल्यावर, महाराष्ट्री नांवाची प्राकृत भाषा

अनुक्रमणिका

**तिसरी प्राकृत : महाराष्ट्री**

तेथे जन्मास आली. दंडकारण्यांत जे आर्य वसाहत करण्यास गेले त्यांनीं आपल्या वसाहतीस महाराष्ट्रदेश, आपल्यास महाराष्ट्रीय लोक व आपल्या भाषेस महाराष्ट्री भाषा अशीं अभिमानाचीं नांवें दिलीं. ऋग्वेद, ब्राह्मण, रामायण, भारत, ह्या ग्रंथांतील उल्लेखांवरून आर्यांच्या वसाहतींचें पूर्वापरत्व व ऐतिहासिक क्रम ठरलेले प्रसिद्ध आहेत. सबब, त्यांचा येथें तपशिल देत नाहीं.

## महाराष्ट्रीचें उच्चारदृष्ट्या अर्वाचीनत्व

● **२०.** ऐतिहासिकदृष्ट्या म्हणजे कालदृष्ट्या (१) सौरसेनी (२) मागधी व पैसाची (३) महाराष्ट्री, असा क्रम लागतो. उच्चारदृष्ट्या हि हा च क्रम असलेला आढळून येतो.

उदाहरणार्थ, एक पाणिनीय क्रियापद घेतों :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | | पाणिनीय भाषा | :— | वर्तते |
| २ | | पाली | :— | वट्टति |
| ३ | { | सौरसेनी | :— | वट्टदि |
| | | मागधी | :— | वट्टडि |
| | | पैसाची | :— | वट्टति |
| ४ | | महाराष्ट्री | :— | वट्टइ |

पाणिनीय भाषेंत वृत् धातूचें वर्तमानकालीं तृतीयपुरुषीं एकवचनीं आत्मनेपदीं वर्तते असें रूप होतें. प्राकृतांत प्रायः परस्मैपद सार्वत्रिक आहे. 'र्त्त' चा ट्ट सर्व प्राकृतांत सामान्य आहे. 'ति' ची 'दि' सौरसेनींत होते. पैसाचींत मृदु व्यंजनें नसल्याकारणानें 'ति' ची 'ति' च कायम रहाते. मागधींत सौरसेनी 'दि' ची 'डि' होते. महाराष्ट्रांत 'ति' ची 'इ' होते. 'ति' ची 'दि' होणें जितकें सजातीय व सुलभ आहे तितकें 'इ' होणें सजातीय व सुलभ नाहीं. 'ति' ची 'दि' पहिल्या पायरीचा अपभ्रंश झालेला दिसतो. 'ति' ची 'इ' व्हावयाची म्हणजे ति, दि, डि, ढि, हि, इ अशा परंपरेनें होईल. म्हणजे 'इ' होणें पहिल्या पायरीचा अपभ्रंश नसून, पहिल्या अपभ्रंशाच्या अपभ्रंशाचा अपभ्रंश आहे. अर्थात्, उच्चारदृष्ट्या पाणिनीय भाषेपासून, सौरसेनीहून महाराष्ट्री दूरतर आहे.

दुसरें उदाहरण भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांचे घेतों :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | | पाणिनीय भाषा | :— | कृत |
| २ | | पाली | :— | कत |
| ३ | { | सौरसेनी | :— | कद |
| | | मागधी | :— | कड |
| | | पैसाची | :— | कत |

अनुक्रमणिका

येथें पाली व पैसाची पाणिनीय भाषेच्या जवळ, नंतर सौरसेनी, नंतर मागधी व नंतर महाराष्ट्री असा उच्चारापभ्रंश दिसतो. तस्मात्, उच्चारदृष्ट्या हि महाराष्ट्री भाषा सौरसेनी, मागधी, पैसाची व पाली ह्यांच्या अलीकडची ठरते.

## व्याकरणदृष्ट्या महाराष्ट्रीचें अग्रमान्यत्व.

●**२१.** इतिहासदृष्ट्या व उच्चारदृष्ट्या महाराष्ट्री जर पाली, सौरसेनी, मागधी व पैसाची ह्या चार भाषांहून अर्वाचीन ठरते, तर वररुचीसारख्या वैय्याकरणानें “शेषं महाराष्ट्रीवत्” हें सूत्र उच्चारून सौरसेनी, मागधी व पैसाची ह्या भाषांना गौणत्व कां दिलें, असा प्रश्न उद्‌भवतो. ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं, वररुचीनें जेव्हां आपलें व्याकरण रचलें तेव्हां ह्या तिन्ही भाषांतल्या पेक्षां महाराष्ट्रींत उत्कृष्ट सारस्वत निर्माण झालें होतें व ती राजभाषा या नात्यानें नांदत होती. उत्कृष्ट सारस्वत मिळाल्यानें व दरबारीं प्रवेश झाल्यानें महाराष्ट्रीला नागरत्व, व राजमान्यत्व व शिष्टमान्यत्व येऊन, ती विद्वानांच्या व रसिकांच्या आदरास पात्र झाली. ह्या च बलवत्तर कारणाच्या जोरावर दंडीनें आपल्या काव्यादर्शांत महाराष्ट्रीला सर्व प्राकृत भाषांत उत्कृष्ट ठरविलें.

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ॥

ह्याच शिष्टगुणसंपन्नत्वामुळें ती वैय्याकरणांच्या निरीक्षणाचा विषय झाली व व्याकरणदृष्ट्या तिच्याहून प्राचीन परंतु सारस्वताभावामुळें तिच्याहून हीन अशा इतर भाषांना उपमान झाली. शिष्ट महाराष्ट्रीचें व्याकरण रचलें ह्मणजे इतर प्राकृत भाषांचें व्याकरण बव्हंशानें त्यांत आलें च, असा सिद्धान्त झाला. इतर प्राकृत भाषांच्या ठोकळ ठोकळ दहा पांच लकबा दाखवून दिल्या, ह्मणजे झालें. महाराष्ट्रीच्या हवाल्यावर सर्व काम भागलें. अशा दृष्टीनें, ह्मणजे वैय्याकरणांच्या दृष्टीनें महाराष्ट्री भाषेला अग्रमान्यत्व आलेलें आहे. बाकी, कालदृष्ट्या, इतिहासदृष्ट्या, जन्मदृष्ट्या व उच्चारदृष्ट्या महाराष्ट्री भाषा ह्या तिन्ही भाषांहून अर्वाचीन आहे.

पालींत बौद्ध लोकांचें फक्त धार्मिक वाङ्मय आहे. आख्यायिका नांवाच्या कहाण्या आहेत; परंतु त्यांना कादंबरीच्या तोडीला आणून बसवितां येत नाहीं. सौरसेनींत व अर्धमागधींत जैनांचें धार्मिक वाङ्मय—स्तोत्रें वगैरे आहे. पैसाचींत एकटी बृहत्कथा तेवढी झालेली प्रसिद्ध आहे. परंतु, ती लुप्त होऊन, आतां त्या भाषेंतील एखाददुसरें वाक्य नाटकांतून जेवढें सांपडतें तेवढें च. इतर भाषांतील सारस्वताची अशी दुर्दशा असल्यामुळें, महाराष्ट्रींतील विविध सारस्वतांचे तेज सापेक्षतेनें फार च चमकूं लागलें व तिच्या पाठीमागून व्याकरणप्रदेशांत दास्यवृत्तीनें जाणें त्यांच्या कपाळीं आलें.

## पाली—मागधी—सौरसेनी—पैसाची यांचा जन्मकाल

● **२२.** मथुरा अथवा सौरसेन (नंतरचें नांव) प्रांतांत वसाहत झाली, तेव्हां सौरसेनी प्राकृत उत्पन्न झाली; मगध देशांत वसाहत झाली, तेव्हां मागधी झाली; पिसाउरांत पैसाची निघाली; आणि महाराष्ट्रांत

अनुक्रमणिका

वसाहत झाल्यावर महाराष्ट्री अवतीर्ण झाली. मागधी प्राकृताचें पूर्व रूप जी पाली ती शकपूर्व १५०० च्या सुमारास मगधांत सुरू झाली. त्यांच्या हि पूर्वी सौरसेनीचा प्रारंभ झाला असावा; कारण तो प्रांत ब्रह्मावर्ताच्या जवळ आहे. परंतु, सौरसेनींत सारस्वत नसल्यामुळें तिचा आदि व मध्य स्पष्टपणें निर्देशितां येत नाहींत. पाली व सौरसेनी ह्यांच्यानंतर पैसाची पिसाउरांत उदयास आली असावी. बृहत्कथेखेरीज हींत सारस्वत असल्याचें प्रसिद्ध नसल्यामुळें व खुद्द बृहत्कथा लुप्त झाल्यामुळें, ह्या हि प्राकृताचा आदिमध्य नक्की ठरवितां येत नाहीं. शहाबाजगढी ऊर्फ कपूर्दगिरी येथील अशोकाच्या शिलालेखांत पैसाची भाषेचा एक पोटभेद दृष्टीस पडतो. तसें च नाटकांत कोठें एखादें दुसरें वाक्य पैसाचींत येतें. कृष्णयजुर्वेद संहितेवर पैसाची भाषेंत [आधुनिक पैसाची?] टीका आहे; परंतु, ती हि अद्याप प्रसिद्ध झालेली नाहीं. ह्यापलीकडे पैसाचीच्या ज्ञाताज्ञात सारस्वताची जास्त माहिती उपलब्ध नाहीं.

## महाराष्ट्रीचें निराळेपण

● **२३.** महाराष्ट्रभाषेची गोष्ट ह्या दोन्ही तिन्ही भाषांहून निराळी आहे. तिचा जन्मकाल बरा च नक्की ठरवितां येण्यासारखा आहे. कारण, दक्षिणारण्यांत आर्यांची वसाहत केव्हां झाली व सारस्वताचा उदय महाराष्ट्रींत कितपत झाला, ह्यांची हकीकत इतर भाषांच्यापेक्षां महाराष्ट्री भाषेसंबंधानें जास्त खुलासेवार व विश्वसनीय मिळण्याची शक्यता आहे.

## पाणिनीच्या वेळीं (शकपूर्व १५००) महाराष्ट्रदेश नव्हता व महाराष्ट्री भाषा नव्हती; दंडकारण्य होतें.

●**२४.** पाणिनि आपल्या व्याकरणांत प्राकृत भाषांचा उल्लेख बिलकुल करीत नाहीं. त्या अर्थी प्राकृत भाषा ब्राह्मण भाषेपासून विलग होऊन स्पष्टपणें भिन्न भासण्याच्या पूर्वी पाणिनि झाला असला पाहिजे हें उघड आहे. मागें १७ व्या रकान्यांत पाणिनीचा काल सुमारें शकपूर्व १५०० असावा असें ह्मटलें आहे. आणि, एकंदर गोळाबेरीज पहातां, हा च काल प्रायः बरोबर असावा असें वाटतें. आतां, पाणिनि शाल्व, पांचाल, कंबोज वगैरे देशांचीं नांवें देतो. परंतु दक्षिणेंतील पांड्य, चोल इत्यादि देशांचीं नावें देत नाहीं. त्या अर्थी, तीं त्याला व त्याच्या समाजाला माहीत नव्हतीं. माहीत असतीं तर तो तीं द्यावयाला चुकता ना. कारण तो अत्यंत आस्थेवाईक वैय्याकरण होता. पाणिनि विंध्यपर्वताच्या उत्तर बाजूचे कुमुद्वत्, नड्वत् व वेतस्वत् ह्या तीन देशांचा उल्लेख करतो; परंतु, विंध्यपर्वताच्या दक्षिणबाजूच्या प्रांतांचें नांव सुद्धा काढीत नाहीं. पाणिनि ज्याला वेतस्वत् ह्मणतो त्या च देशांतील मोठ्या नदीला पुढें संस्कृत भाषेंत वेत्रवती (वेतस् = वेत्र) ह्मणूं लागले. वेत्रवतीला च सध्यां बेटवा म्हणतात आणि ह्या नदीवरील मुख्य शहराला भिलसा, भेळसा, भेळसें (वेतस् = वेडस = बेळस = बेळसें = भळसें) असें अभिधान आहे. ह्मणजे विंध्यपर्वताच्या उत्तरबाजूचे जे देश ते पाणिनीला माहीत होते, दक्षिणेकडील नव्हते, ही सिद्ध गोष्ट आहे. विंध्यपर्वताच्या दक्षिणेस घोर अरण्य आहे, हें त्याला माहीत होतें. परंतु, तेथें लोकवस्ति झालेली त्याला माहीत नव्हती. असती तर, तेथील लोकांच्या व देशांच्या नांवांत कांहीं वैय्याकरणिक विशेष असलेला तो अवश्य सांगता. ज्या अर्थी सांगत नाहीं, त्या अर्थी पाणिनीच्या कालीं ह्मणजे शकपूर्व १५०० च्या सुमारास दंडकारण्यांत विंध्याच्या दक्षिणेस आर्यांची वस्ती झालीं नव्हती, अथवा, होत असल्यास, ती इतक्या मुग्धावस्थेंत होती कीं तिच्यावरून देश व प्रांत व तत्रस्थ लोक यांना विशिष्ट नांवें पडलीं नव्हतीं.

अनुक्रमणिका

**आर्य पश्चिमेकडून कोंकणांत उतरले व तेथून घाटांनीं दंडकारण्यांत शिरले. शकपूर्व १५००—१०००; वार्तिककार कात्यायन १०००-६०० शकपूर्व; अशोक शकपूर्व ३५०; वररुचि कात्यायन शकपूर्व ३००; पतंजलि शकपूर्व २२५.**

● **२५.** पाणिनीच्या कालीं पश्चिमेस सध्यांच्या गुजराथेंतून व पूर्वेस कलिंगांतून दक्षिणेकडे जाण्याचा आर्यांचा उपक्रम चालला होता. एक दोन शतकांत पूर्वपश्चिम किनारा व बहुतेक सर्व द्रविडदेश त्यांनीं आक्रमण केला. ह्मणजे दंडकारण्याला चाऱ्ही दिशांनीं गराडा घातला. नंतर, दंडकारण्यावर हल्ला करण्यास सुरवात केली. भाषेवरून जर ग्रंथांचा कालानुक्रम लाविला तर असें दिसतें कीं भारताचा कांहीं भाग ब्राह्मणकालाच्या ह्मणजे पाणिनीय कालाच्या अगदीं शेवटल्या पादांतील आहे आणि बराच भाग पाणिनीय कालाच्या नंतरचा आहे. भारतीय सभापर्वाची भाषा ह्या दुसऱ्या भागापैकीं दिसते तेव्हां त्यांतील मजकूर पाणिनीच्या नंतरच्या कालाला अनुलक्षून असावा, हें साहजिक च आहे. सहदेवानें पश्चिम किनाऱ्याचे जे देश जिंकले त्यांत शूर्पारक, दंडक आणि करहाटक ह्या तीन देशांचीं नांवें आहेत. पैकीं शूर्पारक ह्मणजे सध्यांचें सुपारें असून, प्राचीन कालीं उत्तर कोंकणाचा बरा च भाग त्यांत समाविष्ट होत असे. दंडक म्हणजे दंडकारण्य नव्हे; तर शूर्पारकाच्या दक्षणेचें जें कोकण तें. हा सब्द सध्यां डंडाराजापुरी किंवा दंडाराजापुरी ह्या शब्दांत राहिलेला आहे. दंडक या संस्कृत शब्दाचें दंडअ हें महाराष्ट्री प्राकृत असून डंडअ हें सौरसेनी प्राकृत आहे. आणि ह्या दोहोंचीं डंडा व दंडा अशी गुजराथी व मराठी रूपें सध्यां विद्यमान आहेत. दंडा किंवा डंडा हा शब्द कोंकणांतील व सह्यपर्वतांतील मूळच्या लोकांचा असून त्याचा अर्थ डोंगरांचा उतरता लांब फांटा असा आहे. दांड, डांड, डांग, डंग, डुंग, डोंगर, डोंगरी, वगैरे शब्द सह्याद्रींतील कोळी लोकांत अद्याप हि प्रचलित आहेत. हे कोळ उर्फ कोल लोक सह्यपवर्तावरील मूळचे रहिवासी असावे. दंडाराजापूर प्रांतांतून घाटानें वर चढलें ह्मणजे करहाटक प्रांत लागतो. ह्मणजे दंडकारण्यावर पश्चिमेकडून हल्ला आर्यांनीं समुद्रकिनाऱ्यानें कोंकणांतील घाटांनीं केला, हें स्पष्ट आहे. आणि हा च मार्ग सोपा, सुलभ व स्वल्पिष्ट घर्षणाचा होता. आर्य पश्चिमेकडून दक्षिणेंत कसे उतरले, त्याचा हा तपशील येथें मुद्दाम दिला आहे. कारण, कोंकणांतील भाषेवर ह्या उत्तरणाचा परिणाम घडलेला आहे. कऱ्हाडाकडून कृष्णेच्या खोऱ्यांतून, नाशकाकडून गोदावरीच्या खोऱ्यांतून आणि विदर्भाकडून पाइनगंगेच्या खोऱ्यांतून, थोड्याच शतकांत आर्यांच्या दंडकारण्यांत कायमच्या व भरभराटीच्या वसाहती झाल्या आणि शकपूर्व १००० च्या सुमारास दंडकारण्याचें दंडकारण्यत्व स्नानमंत्रविधींत तेवढें राहिलें.

## वार्तिककार कात्यायन १०००-६०० शकपूर्व

बुद्धाच्या पूर्वी कांहीं शतकें व त्याच्यावेळीं दंडकारण्य कृष्णा व गोदावरी ह्यांच्या खोऱ्यांनीं लोकांनीं अगदीं गजबजून गेलें होतें, अशीं वर्णनें बौद्ध जातकांतून आहेत. [Foulkes, in Indian Antiquary, Vol. XVI] तीं स्थूळ मानानें विश्वसनीय मानण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं. महरट्ट, महाराष्ट्र हें नांवसुद्धां त्याकालीं सिद्ध झालेलें असावें, असा संशय येतो. शकपूर्व सहाशेंच्या सुमारास कात्यायननामक वैय्याकरण झाला, त्यानें विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील महिष्मत् प्रदेशाचा व नाशिक शहराचा उल्लेख केला आहे. ह्मशींची उत्पत्ति पुष्कळ ज्या देशांत होते तो देश महिष्मत्. महिष्मती ही त्या देशाची राजधानी. अर्वाचीन कालीं, महू, महेश्वर, वगैरे नांवांत ह्या देशाचें नांव ओळखूं येण्याजोगें आहे. सध्या ह्या प्राचीन महिष्मत् प्रांताला नेमाड अशी संज्ञा असून अद्याप हि ह्या प्रांताची उत्तम ह्मशींबद्दल व हल्यांबद्दल ख्याति आहे. इतकी कीं दहापांच हजार जनावर ह्या प्रांतांतून दरवर्षी बाहेरदेशांत रवाना होतें.

अनुक्रमणिका

**अशोक शकपूर्व ३५०**

बौद्ध जातकें व कात्यायन वैय्याकरण ह्यांच्या नंतर दंडकारण्यांतील आर्यलोकांचा व अर्थात् त्यांच्या वसाहतींचा, प्रांतांचा, व स्थलांचा उल्लेख मगध देशाचा व आर्यावर्ताचा चक्रवर्ती राजा जो अशोक मौर्य त्याच्या शिलाशासनांत झाला आहे [शकपूर्व ३५०]. त्यानंतर थोड्या च अवधीनें [शकपूर्व ३००] वररुचिनामक प्राकृत वैय्याकरण झाला. ह्यानें महाराष्ट्रीभाषेचें व्याकरण लिहून तिच्या नांवाचा उल्लेख हि केला आहे [शेषं महाराष्ट्रीवत्]. अर्थात्, महाराष्ट्रदेश त्याला माहीत होता हें उघड आहे [शर्कपूर्व ३००]. वररुचीचें गोत्र यद्यपि कात्यायन होतें तत्रापि तेवढ्यावरून तो व वार्तिककार कात्यायन एकच होते, असें ह्मणतां येत नाहीं. कारण, अशोकाच्या शिलालेखांत निरनिराळ्या दिशांकडील ज्या पांच-चार प्रकारच्या प्राकृत भाषा येतात त्या वररुचीच्या व्याकरणांतील पैसाची वगैरे भाषांहून किंचित् जुन्या भासतात. अर्थात् वररुचीच्या व्याकरणांतील प्राकृत भाषांच्या रूपांहून ज्या अर्थी अशोकाच्या शिलालेखांतील प्राकृत भाषा पुरातन आहेत, त्या अर्थी वार्तिककार कात्यायन जर वररुचि असता तर त्याच्या प्राकृत व्याकरणांतील भाषांचें रूप अशोकाच्या शिलालेखांतील प्राकृत भाषांच्या रूपाहून जुनें, निदान त्यांच्या सारखें तरी, असलें पाहिजे होतें. तसा ज्या अर्थी प्रकार नाहीं त्या अर्थी प्राकृत भाषांचा वैय्याकरण जो वररुचि तो कात्यायन वार्तिककाराहून निराळा असून अशोकानंतरचा असावा असें ह्मणणें भाग पडतें. **बुद्धाच्या** निर्वाणानंतर ३०० शें वर्षांनीं पालीवैय्याकरण जो **कच्चा'-यनो** तो झाला, असें **व्हानसंग** म्हणतो. बुद्ध शकपूर्व ५६१ त ८० व्या वर्षी वारला व ६०५ त निर्वाणांत त्यानें आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षी प्रवेश केला. ह्मणजे पालीवैय्याकरण जो **कच्चायनो** तो शकपूर्व ३०५ च्या सुमारास हयात होता. पालीवैय्याकरण व प्राकृतवैय्याकरण जर एक च व्यक्ति असेल, तर **महाराष्ट्र्यादि** प्राकृत भाषांचें व्याकरण रचणारा **वररुचि कात्यायन** किंवा **कच्चायनो** शकपूर्व ३०० त होता व तो अशोकानंतर (शकपूर्व ३५०) झाला. **वार्तिककार कात्यायना** (शकपूर्व ६००) ला **विंध्य** पर्वताजवळील **महिष्मत** देशाच्या व नाशिक शहराच्या पलीकडे **दक्षिणापथांतील** देशांची माहिती नव्हती. **वार्तिककार कात्यायन** जर **अशोका**नंतर झाला असता तर दक्षिणेंतील पांड्य वगैरे देश त्यानें उल्लेखिले असते; कारण **अशोकानें** ते उल्लेखिले आहेत. तेव्हां **कात्यायन वार्तिककार कात्यायन** (शकपूर्व ६००-७००) व पाली व इतर प्राकृत **शकपूर्व ३००** भाषांचा वैय्याकरण जो **वररुचि कात्यायन** किंवा **कच्चायनो** (शकपूर्व ३००) तो, हे दोन भिन्न व्यक्ति भिन्न काळीं झाले, हें

**वररुचि कात्यायन शकपूर्व ३००**

उघड आहे. पतंजलि “वाररुचं काव्यं” ह्मणून जो उल्लेख करतो तो ह्या प्राकृत वैय्याकरणाच्या नांवाचा करतो किंवा वार्तिककार कात्यायनाचा करतो, तें स्पष्ट करण्यास सध्यां साधन नाहीं.

**पतंजलि शकपूर्व २२५**

बौद्धधर्माभिमानी अशोक (शकपूर्व ३५०) व प्राकृतवैय्याकरण वररुचि कात्यायन [शकपूर्व ३००], ह्यांच्यानंतर भाष्यकार पतंजलि [शकपूर्व २२५] झाला. **पतंजलि** ह्यानें विदर्भ, अपरान्त, आंध्र, पांड्य, केरल, वगैरे दक्षिणेंतील अनेक प्रांतांचीं **शकपूर्व** व लोकांचीं नांवें निर्देशिलीं आहेत. ह्याचा काल लक्ष्यांत घेतां, असा निर्देश होणें अपरिहार्य होतें. परंतु, त्याच्या ग्रंथांत महाराष्ट्राचा नामनिर्देश आलेला आढळला नाहीं. तत्रापि, तत्पूर्व जो वररुचि त्यानें आपल्या प्राकृत व्याकरणांत महाराष्ट्री भाषेचा उल्लेख केला असल्यामुळें, महाराष्ट्रदेशाचा उल्लेख त्या शब्दांत गर्भित आहे. अशोकानें रास्टिक किंवा रट्रक असा उल्लेख रट्टांचा, पेटेनिक असा उल्लेख पैठणच्या लोकांचा, अपरान्त असा उल्लेख उत्तर कोंकणांतील लोकांचा, भोज असा उल्लेख अर्वाचीन वैदर्भातील लोकांचा, व सतिय असा उल्लेख कृष्णातीरीय लोकांचा केला आहे.

## महाराष्ट्री भाषेचा प्रारंभ शकपूर्व १०००—७००

● २६. येणेंप्रमाणें वररुचि कात्यायनाच्या वेळेपासून [शकपूर्व ३००] महाराष्ट्री भाषेचा उल्लेख नामनिर्देशानें झालेला साधार सांपडतो. वररुचीनें महाराष्ट्री भाषेचें व्याकरण रचलें, ह्मणजे ती भाषा त्याच्यापूर्वी व्याकरणरचनेच्या योग्य होण्यास दोनचार शतकांचा तरी अवधि पाहिजे. ह्मणजे शकपूर्व ७०० च्या सुमारास, अथवा साक्यमुनि बुद्धाच्या वेळेपर्यंत आपण येऊन ठेपलों. त्या सुमारास महाराष्ट्री भाषेचा प्रारंभ झाला असावा. भाषेच्या नांवांत देशाच्या व लोकांच्या नांवांचा समावेश प्रायः होतो च होतो. दंडकारण्यांत आर्यांनीं शकपूर्व १५०० पासून १००० पर्यंत वसाहत केली आणि वसाहत करतांना व नंतर स्वास्थ्य मिळाल्यावर शकपूर्व ७०० च्या सुमारास महाराष्ट्री भाषा विशिष्ट रूपानें भासूं लागली. पुढें शकपूर्व ३०० च्या सुमारास तिला वररुचि हा व्याकरणकार मिळाला. येथपासून ह्मणजे शकपूर्व ३०० पासून शकोत्तर २०० पर्यंत ह्मणजे ५०० वर्षे महाराष्ट्रीचीं अत्यंत भरभराटीचीं गेलीं. त्यांचा तपशिल खालीं देतों.

**मौर्य ४००-२५०. शुंग व काण्वायन २ ०-१५०; विक्रमादित्य शकपूर्व १३५; शातवाहन उर्फ शालिवाहन शक०; जिवंत महाराष्ट्री व मेलेली संस्कृत भाषा; पहिला कालिदास संवत् २० - संवत् ११५; तत्कृत ग्रंथ; गाथासप्तशतींत कालिदासाचा उल्लेख; काश्मीरचा प्रवरसेन विक्रम संवत् ११५-१४५**

अनुक्रमणिका

**मौर्य ४००-२५०. शुंग व काण्वायन २ ०-१५०.**

● २७. चंद्रगुप्तमौर्याचा किंवा अशोकमौर्याचा वंश शकपूर्व २५० च्या सुमारास समाप्त झाला. तदनंतर, शुंगांचे राज्य सुरू झालें. त्यांना एकीकडे सारून काण्वायन नामक ब्राह्मण राजांनीं साम्राज्याची पेशवाई केली.(शक-पूर्व २००). ह्या काण्वायनांचा पराभव सिमुख शातवाहनानें केला (शकपूर्व १५०); व साम्राज्य चालविण्याचा आव घातला. ह्या सुमारास कलिंगांनीं कलिंगांत व शकांनीं पंजाबांत राज्यें स्थापिलीं. कालान्तरानें शकांनीं आपल्या राज्याचा विस्तार माळव्यांत उज्जनीपर्यंत नेऊन, सर्व आर्यावर्त शकमय करण्याचा प्रसंग आणिला. तेव्हां, शकपूर्व १३५ च्या सुमारास उज्जनीस विक्रमादित्य नामेंकरून एक अलौकिक वीरराजा उत्पन्न झाला आणि त्यानें शकांचा मोठा पराभव केला. तेव्हांपासून विक्रमसंवत् सुरू झाला. शकांची उचलबांगडी यद्यपि माळव्यांतून झाली, तत्रापि अपरान्तांत (नास्ति परः अंतः प्रांतः यस्मात् [सेतुबंध, उच्छ्वासक ७, श्लोक ४३, रामदासकृत टीका:—"अन्तः प्रान्तेऽन्तिके नाशे स्वरूपे च मनोहरे॥"] = ज्याच्यापलीकडे प्रांत नाहीं, समुद्र आहे तो देश) व अपरान्ताजवळील जुन्नर वगैरे घाटावरील प्रांतांत त्यांची चिकाटी कांहीं काल (सुमारें पन्नास वर्षे) होती. ती चिकाटी विक्रमसंवत् १३५ त व इ. स. ७८ त एका शातवाहन राजानें शकांचा पूर्ण पराभव करून कायमची सोडविली. ह्या वेळेपासून शातवाहनसंवत् सुरूं झाला. शकांचा प्रचंड व प्राणघेण्या पराभव करणाऱ्या ह्या दोन्ही पराक्रमी वीरराजांचा गाथासप्तशतींत उल्लेख आला आहे. तो असा:-

**विक्रमादित्य शकपूर्व १३५**

**शातवाहन उर्फ शालिवाहन शक०**

[महाराष्ट्री]

संवाहणसुहरसतोसिएण देन्तेण तुह करे लक्खम् ।
चलणेण विक्कमाइत्तचरिअँ अणुसिक्खिअं तिस्सा ॥६४॥

गाथासप्तशती-शतक ५.

[संस्कृत]
संवाहनसुखरसतोषिसेन ददता तव करे लाक्षाम्(अथवा लक्षम्) ।
चरणेन (अथवा चलनेन) विक्रमादित्यचरितं अनुशिक्षितं तस्याः ॥

[महाराष्ट्री]
आवण्णाइँ कुलाइं दी व्विअ जाणन्ति उण्णइं णेउम् ।
गोरीअ हिअअदइओ अहवा सालाहण णरिन्दो ॥६७॥

गाथासप्तशती—शतक ५.

[संस्कृत]

आपन्नानि (किंवा आपर्णानि) कुलानि द्वावेव जानीत उन्नतिं नेतुम् ।
गौर्या हृदयदयितोऽथवा शातवाहननरेन्द्रः ॥६७॥

अनुक्रमणिका

गाथासप्तशती ऊर्फ ७०० गाथांचा संग्रह हाल सातवाहनानें केला, असें सप्तशतीच्या पहिल्या शतकाच्या तिसऱ्या गाथेंत हाल स्वतः च लिहितो. अर्थात्, हाल सातवाहनाच्या पूर्वी झालेले हे विक्रमादित्य व सातवाहननरेंद्र असले पाहिजेत. पैकीं, शकपूर्व १३५ व्या वर्षी शकादि म्लेच्छांचा ज्यानें कोरुर येथें पराभव केला आणि ज्याच्या नांवानें विक्रमसंवत् नर्मदेच्या उत्तरेस प्रचलित झाला, तो च हा विक्रमादित्य असावा. आणि शकयवनपल्हवादि म्लेछांचा पराभव करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करणाऱ्या अशा कोण्या तरी शातवाहनकुलोत्पन्न राजाचा उल्लेख सातवाहननरेंद्र या नांवानें गाथेंत केलेला असावा. शातवाहन आणि शातकर्णि हे दोन शब्द एका च अर्थाचे वाचक असल्यामुळें, वायुपुराणांत तिसरें ज्याचें नांव येतें तो शातकर्णि हा सातवाहननरेंद्र असेल. नाणेघाटांत ह्यांचे चित्र दिलेलें आहे. ह्मणजे शक ० नंतर हाल झाला व त्याच्यापूर्वीच्या विक्रमादित्य व शातवाहन ह्या दोन पराक्रमी वीरपुरुषांचा उल्लेख त्यानें संग्रह केलेल्या गाथांतून येतो. हा हाल प्राकृत भाषांचा मोठा भोक्ता होता. पिटर्सननें बुंदीहून आणिलेल्या गाथासप्तशतीच्या प्रतीची समाप्ति येणेंप्रमाणें दिली आहे (Peterson's 3rd Report):—

"राएण विरइआए कुन्तलजणवअइणेण हालेण ।
सत्तसई अ समत्तं सत्तममज्झासअं एअम् ।।

इति सप्तम शतकम् । इति श्रीमत्कुन्तलजनपदेश्वर प्रतिष्ठानपत्तनाधीश शतकर्णोपनामक द्वीपिकर्णात्मज मलयवतीप्राणप्रिय कालापप्रवर्तकशर्ववर्मधीसख मलयवत्युपदेशपण्डितीभूत त्यक्तभाषा. त्रयस्वीकृतपैशाचिकपण्डितराजगुणाढ्यनिर्मितभस्मीभवद्बृहत्कथावशिष्टसप्तमांशावलोकनप्राकृतादिवाक्यं -चकप्रीत कविवत्सल हालाद्युपनामक श्रीसातवाहननरेंद्रनिर्मिता विविधान्योक्तिमयप्राकृतगीर्गुंफिता शुचिरसप्रधाना काव्योत्तमा सप्तशत्यवसानमगात् ।।"

ह्या समाप्तींतील हकीकत पूर्वपरंपरागत (कथासरित्सागरसदृश) आलेली असून विश्वसनीय दिसते. हींत महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी, पैशाची व अपभ्रंश अशा पांच भाषांवर प्रेम ठेवणारा हाल राजा होता, असें ह्मटलें आहे. कातंत्रव्याकरणाचा प्रवर्तक **शर्ववर्म** व बृहत्कथा पैशाचींत लिहिणारा **गुणाढ्य** ह्याच्या पदरीं होते असें हि ह्मटले आहे. परंतु, ह्या बाहेरच्या शिफारसी झाल्या. खुद्द गाथासप्तशतींत प्राकृत भाषांवरचें आपलें प्रेम हालानें येणेंप्रमाणें कटाक्षानें व्यक्त केलें आहे :—

(महाराष्ट्री)
अमिअं पाअडकव्वं पढिउं सोउं अ जे ण आणन्ति ।
कामस्स तत्ततन्तिं कुणन्ति ते कहँ ण लज्जन्ति ।।२।।

गाथासप्तशती — शतक १

(संस्कृत)
अमृतं प्राकृतकाव्यं पठितुं श्रोतुं च ये न जानन्ति ।
कामस्य तत्त्वचिंतां कुर्वन्ति ते कथं न लज्जन्ते ।।

## जिवंत महाराष्ट्री व मेलेली संस्कृत भाषा

ह्या गाथेंत प्राकृतकाव्याला हाल अमृत ह्मणजे जिवंत ह्मणतो. अर्थात्, संस्कृतकाव्याला तो मृत किंवा मेलेलें समजतो हें उघड आहे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रींत कोट्यवधि गाथा आमच्यापूर्वी झाल्या होत्या असें हि हा राजा नमूद करतो :-

[महाराष्ट्री]

सत्त सताइं कइवच्छलेण कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं सालंकाराणँ गाहाणम् ॥३॥

गाथासप्तशती—शतक १

[संस्कृत]

सप्तशतानि कविवत्सलेन कोटेर्मध्ये ।
हालेन विरचितानि सालंकाराणं गाथानाम् ॥:

ह्मणजे शकपूर्व ७०० पासून शक ० पर्यंत महाराष्ट्रींत विस्तृत सारस्वत निर्माण झालें होतें, असें हाल ह्मणतो. गाथासप्तशतींत (निर्णयसागरी) दिलेल्या कवींची यादी पाहिली ह्मणजे हालाचें विधान अतिशयोक्तीचें नसून निव्वळ यथार्थ होतें, असें दिसून येतें.

गाथासप्तशतींत हालानें स्वतःच्या बऱ्या च गाथा व **विक्रमराजाची** एक गाथा (२/३४) दिली आहे. हा विक्रमराजा बहुशः प्रसिद्ध विक्रमादित्य असावा. ह्या च सुमाराला "सेतुबंध" नामक सर्वोत्कृष्ट प्राकृत काव्याचा कर्ता जो **कालिदास** तो झाला. प्रवरसेन राजानें काव्य रचलें व कालिदासानें तें सुधारलें, असें ह्या काव्याच्या पहिल्या उच्छ्वासकाच्या नवव्या गाथेंत ह्मटलें आहे.

[महाराष्ट्री]
अभिणवराआरद्धा चुक्कक्खलिएषु विहडिअपरिट्ठविआ ।
मेत्ति व्व पमुहरसिआ णिव्वोढुं होइ दुक्करं कव्वकहा ॥९॥

[संस्कृत]
अभिनवराजारब्धा च्युतस्खलितेषु विघटितपरिस्थापिता ।
मैत्रीव प्रमुखरसिका निर्वोढुं भवति दुष्करं काव्यकथा ॥

**पहिला कालिदास संवत् २० - संवत् ११५**

राजतरंगिणींत लिहिल्याप्रमाणें प्रवरसेन कलिवर्ष ३१५९ त राज्यावर आला. त्यावेळीं तो अभिनवराजा ह्मणजे गादीवर नवीन आलेला राजा असतांना, त्याने सेतुबंधनामक प्राकृतकाव्य आरंभिलें आणि कालिदासाकडे सुधारण्यास दिलें. असलें श्रीमंतांचें काव्य सुधारून आद्यन्त सारख्या योग्यतेचें करणें जन्मापासून मरेपर्यंत मित्रत्व अबाधित ठेवण्याप्रमाणें च अवघड आहे, अशी कालिदासानें उत्कृष्ट उपमा योजिली आहे. कलिवर्ष ३१५९ म्हणजे विक्रमसंवत् ११५ येतो.

**तत्कृत ग्रंथ**

अनुक्रमणिका

१ अभिज्ञानशाकुंतल, २ विक्रमोर्वशी व ३ मालविकाग्निमित्र, हीं तीन संस्कृतप्राकृत नाटकें ह्या कालिदासाचीं होत. पैकीं, भेळशाचा राजा अग्निमित्र आणि मालविका ह्यांचें ऐतिहासिक वृत्त ह्या कालिदासाला समीपतर असून, तें त्याच्या नाट्यकलेचा विषय होण्याजोगें होते. विक्रमोर्वशींतील राजा विक्रम ऐतिहासिक विक्रमादित्याचें काव्यरूपक असण्याचा संभव आहे. अभिज्ञानशाकुंतल हि ह्या च कालिदासाचें असावें, असें त्यांतील शुद्ध सौरसेनीवरून वाटतें, मेघदूत जर ह्याचें च असेल तर एतत्समकालीन जो अश्वघोष त्यानें त्याची नक्कल केली असेल. मग, एवढें मात्र कबूल करावें लागेल कीं,

दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूल हस्तावलेपान्।

ह्या ओळींतील दिङ्नाग शब्द बुद्धधर्मानुयायी पांचव्या शतकांतला जो दिङ्नाग त्याचा वाचक नसून, इतर शब्दांप्रमाणें सहज तेथें पडला आहे आणि दिङ्नाग बौद्धाशीं त्या शब्दाचा संबंध जोडण्यांत टीकाकरांनीं केवळ पदरची मखलाशी केलेली आहे. परंतु, मल्लिनाथाची माहिती इतिहाससमर्थित आहे असें मानलें तर, हें मेंघदूत काव्य दिङ्नागाचा समकालीन जो दुसरा कालिदास त्याच्या पदरीं बांधावें लागेल व अश्वघोषाचा नक्कल्या त्याला ठरवावा लागेल. कनिष्कानें जमविलेल्या बुद्धमंडळांत असणारा हा अश्वघोष कनिष्काच्या [संवत् ० (Fleet) पासून संवत् ३४० (भांडारकर)] कोणत्या हि काळांत असला, तत्रापि ह्या पहिल्या कालिदासाच्या काळाला अवरोध होत नाहीं.

**गाथासप्तशतींत कालिदासाचा उल्लेख**

**काश्मीरचा प्रवरसेन विक्रम संवत् ११५-१४५**

गाथासप्तशतींत १-२१, १-६८ ह्या दोन गाथा कालिराअ व कालइव ह्या प्राकृत नांवांवर आहेत. त्या कालिदासाच्या असाव्या, असा बळकट संशय येतो. इतकें च कीं कालिदास असें नांव नाहीं. परंतु, ‘ज्ञानदेव’ बद्दल ‘ज्ञानराज’ असा पर्याय योजण्याची चाल फार पुरातन आहे, हें लक्ष्यांत घेतलें असतां, कालिराज ह्मणजे कालिदास असण्याचा संभव आहे. कालिदासाचा आश्रयदाता जो प्रवरसेन त्याच्या हि कांहीं गाथा सप्तशतींत दिल्या आहेत.

इतर अनेक कवींचा उद्धार गाथासप्तशतींत झालेला मागें सांगितला च आहे.

## शकसंवत् शक, यवन, पारद, खश, खरोष्ट वगैरे म्लेछांनीं स्थापलेला नाहीं; शकसंवत् धर्मकृत्यांत योजतात, तस्मात् तो म्लेछ नाहीं; शक शब्दाचे दोन अर्थ; सात=साफ

● २८. शकपूर्व १५० पासून शकोत्तर १५० पर्यंत ३०० वर्षे राज्य करणाऱ्या ह्या शातवाहनांच्या अमदानींत महाराष्ट्री भाषेचा अत्यंत उत्कर्ष झाला. उत्कर्षाचें कारण शातवाहनांचा पराक्रम व राज्यविस्तार होय. पराक्रमाचें चिन्ह शातवाहनांनीं स्थापिलेला शाकसंवत्सर असून, राज्यविस्ताराचें स्मारक महाराष्ट्री भाषेचा उपयोग इतर भाषांना मागें सारून सर्व भारतवर्षांत ग्रंथलेखनांत होऊं लागला, हें होय. शाकसंवत्सर शक नांवाच्या म्लेछ लोकांनीं स्थापिला, असा भांडारकरादि विद्वानांचा समज आहे. परंतु, तो निराधार आहे, असें खत्रीनें म्हणतां येण्यास प्रमाणें आहेत.

अनुक्रमणिका

(१) प्रथम, धर्मकृत्यांत म्लेछांनीं स्थापिलेला काल भारतवर्षांत कधीं हि मान्य झाला नाहीं व होणार नाहीं. फसली, अरबी, हिजरी, जलाली, इसवी वगैरे अनेक सन येथें आगंतुकांनीं सुरू केले, परंतु, धर्मकृत्यांत त्यांपैकीं एकाचा हि प्रवेश झाला नाहीं. शाकसंवत्सराचा ज्याअर्थी धर्मकृत्यांत प्रवेश झालेला आहे, त्याअर्थी हा संवत्सर म्लेछांनीं सुरू केलेला नसला पाहिजे, हा निश्चय. (२) शककालाचा Vonones मूलोत्पादक धरला असतां, कनिष्काला इसवी २८३-३०६ त ढकलावा लागतो. कनिष्काला इसवी ३०० त आणिला ह्मणजे इसवीच्या पहिल्या शतकांतील अश्वघोषाला इसवी ३०० त ओढावा लागतो. परंतु, व्हानसंग, चिनी संयुक्तरत्नाकार, Record of Indian Patriarchs, वगैरे चिनी ग्रंथांत कनिष्काचें अश्वघोषाशीं समकालीनत्व प्रख्यापिलेलें आहे (Takakusu on वसुबंधु, in J. R. A. S. for 1906). तेव्हां, कनिष्काला इसवीच्या प्रारंभाच्या जवळ नेणें जरूर आंहे, अर्थात्. व्होनोनिस शककालोत्पादक होऊं शकत नाहीं. (३) Maues व Gondophares हे समकालीन होते. पैकीं, Maues शक होता व Gondophares पारद (Parthian) होता. ह्या दोघांनीं कालगणना शककालानें केली, असें भांडारकरांचें ह्मणणें आहे. येथें असा विरोध येतो कीं, पारद शकांचा नायनाट करणारा असून शकांचा च काल कसा चालवील ? आपला काल सुरू करील. तेव्हां Maues व Gondophares ज्या कालानें गणना करतात, तो भारतवासी तिसऱ्या च कोणातरी चक्रवर्ती व पराक्रमी राजाचा असला पाहिजे. तो बहुशः विक्रमसंवत् असावा (Fleet, J. R. A. S. for 1906). (४) शकसंवत् नर्मदेच्या दक्षिणेस प्रचलित आहे व उत्तरेस विक्रमसंवत् आहे. असें असून उत्तर हिंदुस्थानांत मथुरा, साकेत वगैरे स्थलीं राज्य करणारे म्लेछ शकसंवताचा उपयोग करीत, असें ह्मणणें वस्तुस्थितिविरोधक होतें. प्रायः म्लेछ लोक ज्या प्रांतांत जात त्या प्रांतांत प्रचलित असलेला काल प्रथम योजीत. जसें, इंग्रज तीसचाळीस वर्षांपूर्वी फसली किंवा हिजरी सनानें हिंदुस्थानांत कालगणना करीत. शक, पारद, यवन, वगैरेंचीं राज्यें हिंदुस्थानांत फार वर्षे न टिकल्यामुळें, त्यांना आपले सन (असलेच तर) इकडे प्रचलित करण्याला प्रायः अवधि व स्वास्थ्य सांपडलें नाहीं. म्लेछ लोकांनीं शक काल स्थापिला नसावा, असें म्हणण्यास हीं इतकीं विरोधी कारणें आहेत. आतां शककाल शातवाहन राजांनीं नर्मदेच्या दक्षणेस स्थापिला, ह्या विधानाला पोषक अशीं कारणें देतों :-

**शकसंवत् धर्मकृत्यांत योजतात, तस्मात् तो म्लेछ नाहीं.**

**शक शब्दाचे दोन अर्थ**
**सात = साक**

(१) अत्यंत बलवत्तर कारण हें कीं, म्लेछांनीं सुरू केलेला कोणता हि काल हिंदू लोकांच्या धर्मकृत्यांत ग्राह्य धरला जाणें केवळ अशक्य आहे. अर्थात्, शककाल ज्याअर्थी धर्मकृत्यांत ग्राह्य धरला जातो, त्याअर्थी तो कोणा तरी हिंदू राजानें स्थापिलेला काल आहे. (२) युरोपियन व आशियाटिक विद्वान लोक शक ह्या द्वयर्थी शब्दानें चकलेले आहेत. शक ह्मणजे म्लेछ असा एक अर्थ सर्वत्र मान्य आहे. परंतु शक या शब्दाच्या दुसऱ्या अर्थाकडे बहुतेकांनीं कानाडोळा केला आहे. दुसरा अर्थ हा. शक ह्मणजे शातवाहन अथवा शालवाहन राजे, अथवा त्या राजांपैकीं कोणी तरी एक प्रख्यात शककर्ती किंवा कालकर्ती व्यक्ति. नाणेघाटांतील पांडवलेण्यांत जीं सहा सनाम चित्रें कोरलेली आहेत त्यांत "कुमारो हकु सिरि" हें एका राजपुत्राचें नांव आहे. हा हकु शब्द सकु शब्दाचें च (स चा ह होऊन) दुसरें रूप आहे. असा स चा ह आंध्रभृत्यांच्या दुसऱ्या एका नांवांत झालेला आहे. वायुपुराणांतल्या यादींतील सातवें नांव "हाला" चें आहे. हें नांव 'साल' असें हि प्रसिद्ध आहे. ह्या "साला" चें च संस्कृत "शाल" होऊन, "शालो हालनृपेपिच," असें त्रिकांडशेषांत रूप आलेलें आहे. देशीनाममालेंत "सालाहणम्मि हलो" असें सादि रूप येतें. तात्पर्य, स व ह

अनुक्रमणिका

या उच्चारांची अदलाबदल आंध्रभृत्यांच्या लेखांत होते. हा सकु किंवा हकु राजपुत्र मोठा पराक्रमी असल्यामुळें, त्याची मूर्ति इतर पराक्रमी स्त्रीपुरुषांबरोबर नाणेघाटांत कोरलेली आहे. ह्या सातकर्णिपुत्र सकु राजपुत्रावरून सकुसंवत्सर सुरू झाला. सकु हें रूप (१) शक १०४९ तील शिलारांचे ताम्रपट (JBBRAS for 1904), (२) शक ११९५ तील पंढरपुरच्या चौऱ्याशीच्या शिलालेखांत सहासातदां (ग्रंथमाला), (३) शक १२३३ तील चोख्यामेळ्याच्या शिलालेखांत (ग्रंथमाला), (४) शक १२८९ तील नागांव येथील शिलालेखांत (ग्रंथमाला), शक १३१९ तील मठ येथील शिलालेखांत (म. इ. सा. खंड ८, प्रस्तावना, पृष्ठ ३३), व इतर अनेक स्थलीं आलेला(लें) आहें. (३) अशोकाच्या वेळीं दक्षिणेंत रट्ट, सत्त, आंध्र व भोज असे पश्चिम, दक्षिण, पूर्व व उत्तर दिशेस क्षत्रिय वसाहत करून व अनार्य लोकांना जिंकून होते. त्यांपैकीं, सतिय किंवा सत्त किंवा सलिय म्हणून जे क्षत्रिय होते त्यांचेंच नांव सातवाहन या शब्दांतील 'सात' या अवयवांत दृष्टीस पडतें. ह्या 'सात' शब्दाचीं दोन रूपें असत; एक साल व दुसरें साक. साक (किंवा सक) रूप मढरीपुत सकसेन (संस्कृत शकसेन) ह्या नांवांत गोचर होतें. नाणेघाटांतील सहा चित्रांत एका चित्राचें नांव "महारठी" आहे. ह्या रठी किंवा रट्टाची मदत घेऊन सत्त किंवा सात किंवा साल किंवा साक यांनी म्लेछांचा पराभव केलेला आहे. हा 'सत्तिअ' शब्द शक्तिक, सत्तिअ अशा परंपरेनें उद्‌भवलेला आहे.

(१) शक्त = सत्त = सात = साल ( संस्कृत शाल, संस्कृत अपभ्रंश शालि )

(२) शक्त = सक्क = साक { संस्कृत शाक, शाक हें विशेषण समजून त्याचें मूळ प्रकृति शक, अशीं अज्ञ संस्कृतज्ञांची व्युत्पत्ति.

मुक्त =मुक्क, मुत्त

रक्त = रत्त, रग्ग

वगैरे क्त ची त्त किंवा, क्क अशा अंताचीं दुहेरीं रूपें महाराष्ट्रींत व महाराष्ट्रींच्या अपभ्रंशांत होतात.

(३) साल (वृक्षविशेष) वृक्षाला महाराष्ट्रांत साक, साग म्हणण्याचा परिपाठ पुरातन आहे. डोंगरावरील लोक तर साक असा च उच्चार करतात. ह्मणजे ल चा क महाराष्ट्रींत व मराठींत होतो. शातपर्ण किंवा सप्तपर्ण = सातवण्ण किंवा सत्तवण्ण = सातवाण = साअवाण = साकवाण = सागवाण.

(४) पुराणांत हि परंपरा अशी च सांगितली आहे.

शातवाहन राज्याच्या जन्मापासून शालिवाहन शककाल सुरू झाला अशी पौराणिक परंपरित माहिती आहे. ज्योतिषांची हि परंपरित माहिती अशी च आहे. मुहूर्तमार्तंडाच्या शेवटीं

त्र्यंकेंद्रपरिमिते वर्षे शालिवाहनजन्मतः ॥

असा उल्लेख आहे. अच्युतरायाच्या हरिहर येथील शक १४६० तील शिलालेखांत "शालिवाहननिर्णीतशकवरुषक्रमागते" असे शब्द आहेत. "शालिवाहनापासून ह्मणजे शालिवाहन राजाच्या जन्मापासून निघणाऱ्या" असा "शालिवाहननिर्णीत" ह्या समस्तपदाचा अर्थ आहे. मजजवळ शत ४१० तील ताम्रपटांत "साळीवान सक" असे शब्द आहेत. गुर्जरराजा दुसरा दड्ड याच्या लेखांत ३८० ही शकसंवत्सरानें च गणना केलेली आहे. तात्पर्य, शक हें हिंदुराजाचें नांव आहे, अशी भावना व स्पष्ट माहिती परंपरेनें ह्या

देशांत आहे. ज्याच्या जन्मापासून ही कालगणना सुरू झाली, तो बहुशः कुमार हकु अथवा सकु सातवाहन असावा. सातवाहनसकवरुस महणजे शातवाहनवंशांतील शक अथवा सक अथवा सकु अथवा हकु राजपुत्राच्या किंवा राजाच्या जन्मापासून धरलेलें वर्ष.

## क्षत्रप शब्द फारसी नाही; क्षत्रपति शब्द ब्राह्मणांत व संहितेंत येतो; क्षत्रपति शब्द सी-यू-कीं त येतो.

● २९. शककाल, शाककाल, शकनृपकाल, शातवाहनशककाल, शालिवाहन शक, सकु, संके, शाके, साळीवान सके अशा नाना रूपांनी हा काल उल्लेखिलेला सांपडतो व ही सर्व रूपें शक्त ह्या मूळ शब्दाचे अपभ्रंश आहेत. दक्षिणेकडील लोक कृष्णेंत किंवा गोदेंत स्नान करतांना परम श्रद्धेनें “शालिवाहनशका” चा जो उच्चार करतात, तो पवित्र व अम्लेच्छ आहे, अशा समजुतीनें करतात. सोंवळ्यांत व धर्मकृत्यांत म्लेच्छ शब्द उच्चारण्याची किळस हिंदुलोकांना फार प्राचीन काळापासूनची आहे. [तस्मात् ब्राह्मणेन न म्लेछितैव] ती चाल शकनामक म्लेछांच्या क्षणिक अमदानींत त्यांनी सोडली असेल, हें कालत्रयी हि संभक्त नाही. शकसाल म्लेंछस्थापित नाही, हिंदुस्थापित आहे, एवढें गृहीत धरून पुढें चालण्यास, हें एक च कारण बस आहे. परंतु, आर्यांचा व म्लेछांचा बेटीव्यवहार होत असे, आर्य धर्मकृत्यांत म्लेछकाल योजीत, वगैरे बाटेगिरीच्या कल्पना पसरविण्यांत भूषण मानणाऱ्या शोधकांना असले विपरीत अपसिद्धान्त फार च गोड वाटतात, असें दिसतें. अपसिद्धान्तांना पोषक असा दुसरा एक असाःच शब्द आहे. तो शब्द “क्षत्रप” हा होय. डा. भांडारकर हा शब्द Persian [?]

**क्षत्रप शब्द फारसी नाही**

‘Satrap’ शब्दापासून संस्कृतांत ‘क्षत्रप’ या रूपानें आला, असें स्वच्छ सांगतात. (History of Dekkan, Section V). Persian म्हणजे Modern Persian तर नव्हेच. तेव्हां Persian म्हणजे Old Persian असा डाक्टरांचा गर्भितार्थ असावा. Modern Persian इसवीच्या १० व्या शतकापासून आतापर्यंतची समजण्याची चाल आहे; व Old Persian चवथ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंतची फारसी भाषा, असा संकेत आहे. त्यापूर्वी पाल्हवी, आवेस्ती वगैरे भाषा होत्या. त्यांत हा शब्द ‘षोइत्रपैति’ अशा रूपानें येतो. परंतु, हा

**क्षत्रपति शब्द ब्राह्मणांत व संहितेंत येतो.**

शब्द तैत्तिरीय संहितेंत व ब्राह्मणांत (तैत्तिरीय संहिता, प्रथमकांड, अष्टमप्रपाठक, अनुवाक १४ व तैत्तिरींय ब्राह्मण प्रथमकांड, षष्टः प्रपाठकः) “क्षत्रणां क्षत्रपतिरसि”, “क्षत्राणां क्षत्रपतिरसीत्याह । क्षत्राणामेवैनं क्षत्रपतिं करोति ।” वगैरे स्थलीं आवेस्त्याच्या पूर्वीपासून येत आहे. तेव्हां हा शब्द फारशींतून किंवा आवेस्तींतून उसना घेतलेला नाही; मूळ संस्कृतांतला च आहे. संस्कृतांतून आवेस्तींत उसना घेतला असण्याचा संभव मात्र जास्त आहे. क्षत्रपति शब्द पंजाब व अफगाणिस्थान ह्या प्रान्तांत बोलल्या जाणाऱ्या पैशाची उच्चारांत सत्रप, सत्रपति, असा होऊन “सत्रप” अशा रूपानें ग्रीक, पल्हव वगैरे लोकांत प्रचलित झाला. क्षत्रप व महाक्षत्रप या शब्दांची

**क्षत्रपति शब्द सी-यू-कीं त येतो.**

अशी परंपरा असल्यामुळें, एखाद्या शातवाहनाची बायको एखाद्या हिंदू क्षत्रपाची किंवा महा क्षत्रपाची मुलगी असून, म्लेच्छ नसूं शकेल.

अनुक्रमणिका

**क्षत्रपति-छत्रपति ही पश्चिम हिंदुस्थानचा राजा जो शिवाजी त्याची पदवी होते.**

क्षत्रप, महाक्षत्रप, ह्या हिंदुस्थानांत, विशेषतः पश्चिम हिंदुस्थानांत त्या कालीं प्रचलित असलेल्या पदव्या म्लेच्छ उडाणटप्पूंनीं घेतलेल्या आहेत. क्षत्रपति ह्याचा अपभ्रंश होऊन छत्रपति असा शब्द पश्चिम हिंदुस्थानांत हजारो वर्षे प्रचलित होता व तो तीनशें वर्षामागें शिवाजीच्या बिरुदावलींत प्रविष्ट होऊन, अद्याप हि अजरामर आहे. ह्या क्षत्रपति, छत्रपति शब्दाचा उल्लेख सी-यू-कींत (Beals' Translation) आला आहे. नरपति, हयपति, गजपति व क्षत्रपति, असे चार प्रकारचे राजे हिंदुस्थानांत असून, पश्चिम हिंदुस्थानांतील राजांना क्षत्रपति-छत्रपति, ही पदवी लावतात, असें सी-यू-कींत (A. D. 600) ह्मटलें आहे. शिवाजी पश्चिम हिंदुस्थानांत झाला, तेव्हां त्याला क्षत्रपति-छत्रपति ही पदवी इतिहासोक्त, शास्त्रोक्त व रूढियुक्त मिळाली, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. व्युत्पत्तीची चूक झाल्यामुळें, डाक्टरांनीं म्लेछांचीं आर्यांशीं लग्नें लावून दिलीं आहेत!

## सातवाहनांच्या साम्राज्याबरोबर महाराष्ट्रीचें साम्राज्य

● ३०. विद्वज्जनचकोरचंद्र अशा ह्या महाराष्ट्री प्राकृत भाषेला शिरसा प्रमाण करणाऱ्या शातवाहनांची ऊर्फ शाकराजांची रियासत शक १५० पर्यंत चालली. शकपूर्व १५० त सीमुख शातवाहनानें सुंग व काण्वायन वंशांचा नाश करून मगधाचें सिंव्हासन स्वतःच बळकाविलें. तेव्हांपासून शकोत्तर १५० पर्यंत शातवाहनांची छाप उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत चांगली बसलेली होती, ती इतकी कीं, त्यांच्या राज्याला तीन समुद्रांचा—पूर्व, पश्चिम, दक्षिण—स्पर्श होतो, अशी ह्मण च पडून गेली. ह्या राजकीय छापीबरोबर त्यांच्या भाषेची म्हणजे महाराष्ट्रीची हि छाप भारतवर्षात सर्वत्र बसली. कालिदास माळव्यांत व काश्मीरांत राहत असे, परंतु त्यांच्या नाटकांतील प्राकृत भाषा अंशतः महाराष्ट्री आहे. गाथासप्तशतींत दिलेली विक्रमराजाची गाथा किंवा काश्मीरच्या प्रवरसेनाची गाथा किंवा काश्मीरस्थ प्रवरसेन-विरचित सेतुबंधाची भाषा महाराष्ट्री च आहे. राजकीय साम्राज्याबरोबर व वजनाबरोबर भाषेचें हि साम्राज्य व वजन वाढतें. इसवीच्या १७ व्या व १८ व्या शतकांत युरोपांत सर्वत्र फ्रेंच भाषेचें जसें साम्राज्य झालें किंवा एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत हिंदुस्थानांत जसें परक्या इंग्रेजीचें साम्राज्य झालेलें आहे, तो च प्रकार शकपूर्व १५० पासून शकोत्तर १५० पर्यंत व पुढें हिं कांहीं काल महाराष्ट्रीचा झाला. पेशव्यांच्या अमदानींत खुद्द दिल्लीचे पातशाहा मराठी लिहूं व बोलूं लागले आणि कायस्थ लोक व रजपूत राजे मराठी मायने घोकूं लागले किंवा ह्यैसूरचे कानडीअप्पा मराठींत हिसाब ठेवूं लागले. हा सर्व प्रभाव राजकीय साम्राज्याचा व सामर्थ्याचा होय.

## शातवाहनांच्या साम्राज्याची धूळधाणतत्समवेत महाराष्ट्री भाषेचा पडित काळ; शक १५०-४५० पर्यंतचे महाराष्ट्रांतील कित्येक संस्थानिक;महाराष्ट्रीचा ऱ्हास व अंत.

● **३१.** शक १५० नंतर शातवाहनांचें साम्राज्य नष्ट झालें. विशिष्ट कारण काय तें माहित नाहीं. नित्याप्रमाणें अंतस्थ दौर्बल्य व बहिःस्थ अनार्यांचें प्राबल्य हींच कारणें असावीं. शातवाहनांच्या आपूर्वपश्चिमसमुद्र राज्यांत लहानमोठे संस्थानिक होते. त्यांपैकीं महाराष्ट्राच्या उत्तरेस व पश्चिमेस कांहीं राष्ट्रकूट होते त्यांनीं बंड केलें. चेदिदेशांत कलचूरींनीं आपला शक सुरू केला (शक १७०). दक्षिणेंत कदंबांनीं व म्लेछ पल्लवांनीं आपापलीं स्वतंत्र संस्थानें स्थापिलीं. अभीर, पिंडार, पुलिंद, शक, वगैरेनीं हि

अनुक्रमणिका

दंगे माजवले. अशी शातवाहनांच्या राज्याची शोचनीय वाताहत झाली. त्याबरोबर महाराष्ट्री भाषेला हि पडितकळा लागली. शक १५० पासून शक ४५० पर्यंत सुमारें तीनशें वर्षे महाराष्ट्रांत कोणी चक्रवर्ती राजा नव्हता; लहान लहान संस्थानें व मवास होते. नर्मदेच्या उत्तरेस शक २५० च्या सुमारास गुप्तांचें साम्राज्य सुरू झालें. समुद्रगुप्ताच्या जयस्तंभांत (शक २४६-२९६) दक्षिणेंतील कांहीं संस्थानिकांचीं नांवें येणेंप्रमाणें दृष्टीस पडतात (Fleet's गुप्त Inscriptions)

| | | राजा | देश |
|---|---|---|---|
| **शक १५०-४५० पर्यंतचे** | १ | महेंद्र | कोसल (रायपूर-संबळपूर) |
| **महाराष्ट्रांतील कित्येक संस्थानिक** | २ | व्याध्रराज | महाकांतार (विंध्याद्रीच्या आसपासचा डोंगराळ मुलूख) |
| | ३ | मंटराज | केरल (मलबार) |
| | ४ | महेंद्र | पिष्टपुर (पिठापूर-मद्रास) |
| | ५ | स्वामिदत्त | कोट्टूर (नाशिक, कोटरें) |
| | ६ | दमन | एरण्डपल्ल (एरंडोल-खानदेश) |
| | ७ | विष्णुगोप | कांची (कांचीवरम्) |
| | ८ | नीलराज | अवमुक्त (अनभिज्ञात) |
| | ९ | हस्तिवर्म | वेंगी (वारंगल-मछलीपट्टम्) |
| | १० | उग्रसेन | पालक्क (अनभिज्ञात) |
| | ११ | कुबेर | देवराष्ट्र (कऱ्हाड-सातारा जिल्हा, सध्याचें देवराष्ट्रें, येथें जुने अवशेष फार आहेत.) |
| | १२ | १२ धनंजय | कुस्थलपुर (कोठलूर) |

**महाराष्ट्रीचा ऱ्हास व अंत.**

पैकीं व्याघ्रराज, स्वामिदत्त, दमन व कुबेर हे संस्थानिक विंध्याद्रि, नाशिक, खानदेश, व कऱ्हाड या प्रांतांभोवतीं शक २५०-३०० च्या सुमारास राज्य करीत होते, आणि गुप्तांना कदाचित् करभार देत होते. ह्या संस्थानिकांची वजनदारी बेताची च पडल्यामुळें, महाराष्ट्री भाषेचा बोज रहावा तसा राहिला नाहीं व ती भाषा उत्तरोत्तर मागसत चालली. शातवाहनांच्या कारकीर्दीत पैठण हें प्राकृत विद्वानांचें व सरस्वतीभक्तांचें माहेरघर बनलें होतें. तें ह्या तीनशें वर्षांत मोडून, शक ४५० च्या सुमारास महाराष्ट्री भाषा व सारस्वत ह्यांचा अंत झाला.

## अपभ्रंश

● **३२.** शक १५० पासून शक ४५० पर्यंतच्या अवधींत महाराष्ट्री भाषा अपभ्रष्ट झाली. नागर महाराष्ट्राचे पुरस्कर्ते जे शातवाहन राजे आणि तदाश्रित विद्वान व प्रतिभासंपन्न ग्रंथकार त्यांचें नियमन नाहींसें झाल्याबरोबर महाराष्ट्री भाषा सर्वस्वीं अनागर लोकांच्या हातांत गेली आणि अपभ्रष्ट झाली. नागर

अनुक्रमणिका

महाराष्ट्रीं ऐन रंगांत असतां, अनागर अपभ्रंश केवळ खालच्या प्रतीच्या अनागर लोकांत होता. ह्या अपभ्रंशाची परंपरा फार पुरातन आहे. म्लेच्छो ह वा एष यदपशब्दः, तस्मान्नब्राह्मणो म्लेच्छेत्, वगैरे इशारे शतपथश्रुतींतून सांपडतात. ह्मणजे ब्राह्मणकालीं संस्कृत उच्चारांचे अपभ्रष्ट उच्चार म्लेच्छादि अनार्य लोक व त्यांच्या संसर्गानें खालच्या प्रतीचे आर्य लोक करूं लागले होते, असा अर्थ होतो. हा म्लेच्छकृत व अनागरार्यकृत अपभ्रंश स्वतंत्र भाषेच्या योग्यतेला ब्राह्मणकालीं आला नव्हता. परंतु कालान्तरानें त्याची व्याप्ति समाजांत अतोनात होऊन, ती प्रकट-पअड-पअल-पाल-पाली (स्त्रीलिंग) भाषेच्या रूपानें प्रसिद्ध झाली. ह्याच सुमारास सौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री, ह्या हि प्रकट ऊर्फ अपभ्रष्ट भाषा निरनिराळ्या प्रांतांत सुरू झाल्या. ह्या प्रकट भाषा बहुजनमान्य झाल्यावर त्यांना अपभ्रंशाच्या वर्गातून काढून स्वतंत्र भाषांच्या मान्य वर्गांत घालणें वैय्याकरणांना इष्ट दिसलें, व त्यांना प्राकृत भाषा असें अभिधान प्राप्त झालें. संस्कृत व प्राकृत असे आर्यभाषेचे दोन मान्य पोटभेद झाले; आणि ह्यांच्या खेरीज जें अपभाषण त्याला अपभ्रंश ह्मणूं लागले. सारांश, अपभ्रंश व्याप्तिमान् झाला ह्मणजे त्याला स्वतंत्र भाषा ह्मणावयाचें व त्या नव्या झालेल्या स्वतंत्र भाषेचा जो दुसरा अपभ्रंश त्याला अपभ्रंश ह्मणावयाचें, असा वैय्याकरणी प्रघात प्रचलित झाला.

प्राकृतं संस्कृतं चैतदपभ्रंश इति त्रिधा॥

## मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश, व पैशाची-अपभ्रंश

● **३३.** कांहीं काल संस्कृत, आणि मागधी, शौरसेनी, पैशाची व महाराष्ट्री ह्या पांच मुख्य भाषा असून, अपभ्रंश हा स्वतंत्र भाषाभेद ह्मणून गणला जात नव्हता. परंतु कालान्तरानें संस्कृत व ह्या चारी प्राकृत मागसत जाऊन, अपभ्रंशांचें व प्राकृत पोटभाषांचें राज्य सुरू झालें. मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश, पैशाची-अपभ्रंश व महाराष्ट्री-अपभ्रंश, असे चार मुख्य अपभ्रंश प्रचलित झाले. शक १५० च्या सुमारास शालिवाहनांचें महाराष्ट्रांतील साम्राज्य नष्ट झाल्यापासून शक ४५० त चालुक्यांचें साम्राज्य सुरू होईतोंपर्यंत महाराष्ट्री-अपभ्रंश महाराष्ट्रांत प्रचलित होता. नर्मदेच्या उत्तरेस मौर्यांचें साम्राज्य शकसंवतापूर्वी सुमारें दीडशें वर्षांच्या सुमारास नष्ट झालें. तेव्हांपासून शक २०० च्या सुमारास गुप्तांचें साम्राज्य सुरू होईपर्यंत मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश व पैशाची-अपभ्रंश नर्मदेच्या उत्तरेस प्रचलित झाले. अपभ्रंशाचे हे चार भाषापरत्वें भेद झाले; प्रांतपरत्वें व जातिपरत्वें जे भेद झाले त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें येणेंप्रमाणें :—१ शाकारी, २ ढक्की, ३ दाक्षिणात्य, ४ चूलिकापैशाची, ५ चांडाली, ६ आभीरी, ७ अवंतिजा, ८ प्राच्या, ९ पांचाली, १० मालवी, ११ गोडी, १२ ओड्री, १३ कालिंगी, १४ कर्नाटकी, १५ द्राविडी, १६ गुर्जरी, १७ अर्धमागधी. **व महाराष्ट्री-अपभ्रंश.** शक, यवन, किरात, दर्द, खश, पल्लव, वगैरे पिशाच लोक शकपूर्व १५० पासून सुमारें शक ४५० पर्यंत भरतखंडांतील निरनिराळ्या भागांत राज्यकर्ते या नात्यानें पसरले होते. तत्संबंधानें पैशाची भाषेचे ११ भेद प्राकृत वैय्याकरणांनीं उल्लेखिलेले आहेत.

कांचीदेशीयपांड्ये च पांचालगौडमागधम् ।
व्राचडं दाक्षिणात्यं च शौरसेनं च कैकयम् ।
शाबरं द्राविडं चैव एकादश पिशाचकाः ।

सारांश, सुमारें शक ४५० पर्यंत पांचपंचवीस अपभ्रंश भरतखंडांत उत्पन्न झाले. पैकीं, अवंतिज अपभ्रंशासंबंधानें एक बाब येथें नमूद करतों. प्रो. परशुरामपंत पाटणकर, बनारस, यांनीं गेल्या वर्षी उज्ञनी

अनुक्रमणिका

प्रांतांतील रांगडी बोलीच्या व्युत्पत्तीवर एक लहानसा निबंध लिहून, त्यांत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, मराठी व रांगडी ह्यांचा कांहीं तरी संबंध आहे. कोणता विशिष्ट संबंध आहे तें, मात्र, त्यांनीं नीट उलगडून दाखविलें नाहीं. अवंतिजा भाषेची नात सध्याची रांगडी भाषा आहे. त्या अवंतिजा भाषेची उत्पत्ति येणेंप्रमाणें :—

**आवंती स्थान्माहाराष्ट्री-शौरसेन्यास्तु संकरात् ।।**

(मार्कंडेय in Pischel's Grammatik)

तेव्हां, महाराष्ट्रीचे कांहीं गुण रांगडींत दिसावे, हें रास्तच आहे.

## महाराष्ट्री-अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास मृत झाला.

● **३४.** ह्या पाचपंचवीस अपभ्रंशांतून महाराष्ट्री-अपभ्रंशाशीं प्रस्तुत स्थळीं विशेष कर्तव्य आहे. हा अपभ्रंश शातवाहनसाम्राज्याच्या अंतापासून ह्मणजे सुमारें शक १५० पासून चालुक्यांच्या साम्राज्याच्या प्रारंभापर्यंतच्या ह्मणजे शक ४५० च्या पर्यंतच्या काळामध्यें उदयास आला. ह्याचें स्वरूप कसें होतें, तें मुख्यतः हेमचंद्राच्या सिद्धहेमचंद्रम् नांवाच्या व्याकरणाच्या ३२९ पासून ४४६ पर्यंतच्या सूत्रांवरून कळतें. हेमचंद्राची हयात शक १०१० पासून शक १०९४ पर्यंत होती. ह्या वेळीं महाराष्ट्री-अपभ्रंश महाराष्ट्रांतील लोक बोलत असत कीं काय ? ह्या प्रश्नाला, नाहीं, असें स्वच्छ उत्तर देतां येण्याला साधनें आहेत. तीं हीं :— शक १०५१ तील अभिलषितार्थ चिंतामणींतील पदें जिला मराठी भाषा ह्मणतात व जी ज्ञानेश्वर बोलत व लिहीत असे तींत आहेत. शक ९०५ तील चामुंडरायाचा शिलालेख हि मराठी भाषेंत च आहे. शक ६५८ तील चिकुर्डे येथील लेखाची भाषा हि मराठी आहे. इतकें च नव्हे तर, शक ४१० तील मंगळवेढें येथील ताम्रपट हि मराठी भाषेंतला आहे. [हे ताम्रपट बनावट असल्याचे मागे सांगितलेच आहे.] ह्मणजे मराठी भाषा ह्मणून ज्या भाषेला आपण ह्मणतों, तिच्यांतील अत्यंत जुना लेख शक ४१० पर्यंत गेलेला आहे. [हे ताम्रपट बनावट असल्याचे मागे सांगितलेच आहे.] आतां, इतकें उघड आहे कीं. शक १०५१ तल्या मराठी भाषेच्या रूपाहून तत्तत्पूर्वीच्या लेखांची भाषा उत्तरोत्तर जास्त जास्त जुनाट आहे. परंतु ह्या सर्व लेखांतील भाषा मराठी आहे, अपभ्रंश नाहीं. ह्याचा अर्थकाय होतो? ह्याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्री-अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास संपून, मराठी भाषेला प्रारंभ झाला व हेमचंद्रानें ज्या अपभ्रंशाचें व्याकरण रचिलें तो अपभ्रंश त्याच्या कालीं मृत होता. मराठी भाषा शक ६०२ पासून शक ११२८ पर्यंत महाराष्ट्रांत चालू होती, ह्या बाबीला दुसरा हि अवांतर पुरावा आहे. ह्या अवधींतील चालुक्य, राष्ट्रकूट, शिलार, यादव वगैरे महाराष्ट्रांतील राजांचे जे संस्कृत ताम्रपट आहेत त्यांतून स्थळोस्थळीं अस्सल मराठी शब्द सांपडतात. शक ६०२ तील विक्रमादित्य सत्याश्रयाच्या ताम्रपटांत "पन्नास" हा शब्द आलेला आहे. हा शब्द महाराष्ट्रीप्राकृतांतील किंवा महाराष्ट्री-अपभ्रंशांतील नाहीं. महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत पण्णासं, पण्णासा, पन्ना, अशीं रूपें येतात. शक ६०२ पासून शक ११२८ पर्यंत ताम्रपटांतून आलेल्या अस्सल मराठी शब्दांची यादी प्रभात मासिकांतील पाटण येथील शक ११२८ तील शिलालेखांत दिली आहे (पृ. १४-१७). तात्पर्य, मराठी शक ४०० च्या सुमारास सुरू झाली, हें अस्सल पुराव्यानें सिद्ध आहे व हेमचंद्रानें ज्या अपभ्रंशाचें व्याकरण रचलें तो अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास मृत झाला होता, असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

अनुक्रमणिका

**(मराठी भाषा सुरू होईतावत्कालपर्यंत भाषांची परंपरा); पूर्वभाषा असतांनाच उत्तर भाषा अपभ्रंश म्हणून सुरूं होते; उत्तर भाषा लोकमान्य होत असतांना, पूर्वभाषा कांही काल टिकाव धरून रहाते.**

● **३५**. मराठी भाषा शक ४०० च्या सुमारास सुरूं होईतावत्कालपर्यंत भाषांची परंपरा माझ्या मतें येणेंप्रमाणें दिसते :—

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्कृत. | ऋषि :- | वैदिक भाषा :- | शकपूर्व | १०,००० | पासून शकपूर्व | ३०००. |
| | पाणिनि :- | ब्राह्मण भाषा :- | शकपूर्व | ३००० | पासून शकपूर्व | १५००. |
| | पतंजलि :- | संस्कृत भाषा :- | शकपूर्व | १५०० | पासून शकपूर्व | २००. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राकृत. | पाली भाषा :- | शकपूर्व | १५०० | पासून शकपूर्व | ४०० |
| | सौरसेनी भाषा :- | शकपूर्व | १५०० | पासून शकोत्तर | १५० |
| | मागधी भाषा :- | शकपूर्व | १५०० | पासून शकोत्तर | १५० |
| | पैशाची भाषा :- | शकपूर्व | १५०० | पासून शकोत्तर | १५० |
| | महाराष्ट्री भाषा :- | शकपूर्व | १००० | पासून शकोत्तर | १५० |

| | | |
|---|---|---|
| प्राकृतिक. | सौरसेनी-अपभ्रंश<br>मागधी-अपभ्रंश<br>पैशाची- ,, वगैरे<br>महाराष्ट्री- ,, | शक ० पासून<br>शकोत्तर ४५०<br>पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| प्राकृतिकोद्‌भव | ब्रज<br>मैथिल<br>बंगाली<br>ओढी<br>काश्मिरी<br><br>नेपाली वगैरे<br>पंजाबी<br>सिंधी<br>गुजराथी<br>रांगडी<br>मरांठी | शक ४०० पासून आतांपर्यंत<br>ह्मणजे शक १८३० पर्यंत. |

अनुक्रमणिका

**पूर्वभाषा असतांनाच उत्तर भाषा अपभ्रंश म्हणून सुरू होते.**

कालाचे आंकडे कित्येक स्थलीं शंभर दोनशें वर्षे अलीकडे पलीकडे होऊं शकतील, हें सांगावयास नको. एक बाब, मात्र, पूर्णपणें निश्चित आहे. ती ही कीं, मराठी भाषा शक ४०० च्या सुमारास सुरू झाली. येथें एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. पूर्वभाषा प्रचलित असतांना च उत्तरभाषा अपभ्रंश ह्या नात्यानें सुरू झाल्या होत्या. ह्मणजे ब्राह्मण-संस्कृत प्रचलित असतांना पाली भाषा अपभ्रंश ह्मणून सुरू झाली व ब्राह्मण-संस्कृत प्रचारांतून गेल्यावर तत्स्थानीं अधिष्ठापित झाली. पालीभाषा प्रचलित असतांना, मागधीभाषा अपभ्रंशरूपानें सुरू झाली व पालीभाषा आटोपल्यावर तत्स्थानापन्न झाली. तसें च, महाराष्ट्री भाषा चालू असतां च महाराष्ट्री-अपभ्रंश सुरू झाला व महाराष्ट्री नष्ट झाल्यावर तिची जागा त्यानें पटकाविली. महाराष्ट्री-अपभ्रंश चालू असतां च मराठी सुरू झाली व तो मेल्यावर त्याची जागा मराठीनें व्यापिली. [मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी राजवाड्यांनी अन्यत्र थोडे निराळे मत व्यक्त केले आहे. 'मराठींतील ल प्रत्यय' या आपल्या निबंधात ते ह्मणतात,

"महाराष्ट्रीपासून मराठी इ. स. १००० च्या सुमारास विलग झाली असे डॉ. भांडारकरांचे ह्मणणे आहे. ती इ. स. ५०० च्या सुमारास महाराष्ट्रीपासून भिन्न झाली असे मी ह्मणतों. ....इ. स. ५०० च्या पलीकडे मराठी जाणे अशक्य आहे. तत्पूर्वी महाराष्ट्री होती स्वार्थी 'ल' प्रत्ययाची व्याप्ति जितकी मराठीत आहे तितकी महाराष्ट्रींत नव्हती. निव्वळ क्रियापदांच्या रूपांना मराठीत 'ल' प्रत्यय लागत नाहीं. हा च मराठींत महाराष्ट्रींत मुख्य व्यावर्तक विशेष आहे. (राजवाडे-लेखसंग्रह, भा. ३, पृ. २०९)]

**उत्तर भाषा लोकमान्य होत असतांना, पूर्वभाषा कांही काल टिकाव धरून रहाते.**

एका भाषेच्या स्थलीं दुसरी भाषा येत असतांना, आणीक एक चमत्कार दृष्ट्युत्पत्तीस येतो. नवी अपभ्रष्ट भाषा आस्ते आस्ते लोकमान्य होत असतांना, जुनी मुमूर्ष भाषा कांहीं काल प्रतिष्ठित ग्रंथकार व लोक लिहीत व बोलत असतात. पाली, शौरसेनी, महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषा लोकमान्य होत असतांना, ब्राह्मण-संस्कृत व पातंजल-संस्कृत प्रतिष्ठत लोकांत प्राचलित होतें च. अपभ्रंश सुरू होत असतां, महाराष्ट्री-प्राकृत प्रतिष्ठित ग्रंथकार लिहीत च असत. आणि मराठी उदयास येत असतांना शतक-दोन शतक अपभ्रंशाला प्रतिष्ठित ग्रंथकार विसरले नव्हते. संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश, ह्यांचा लोप झाला असतां हि, शक ४०० च्या नंतरचे नाटककार ह्या तिन्ही भाषा प्रतिष्ठित ह्मणून आपल्या नाटकांत योजीत असत, व अप्रतिष्ठित ज्या मराठी वगैरे भाषा त्यांचें नांव हि काढीत नसत. प्रतिष्ठित ग्रंथकार जुन्या मेलेल्या भाषांना चिकटून राहतात, ह्या विधानाला पोषक अशीं दोन प्रमाणें देतों. प्रथम : पतंजलीचें जें संस्कृत तें च भवभूति, हर्ष, हेमाद्रि, वगैरेंचें संस्कृत आहे. तसेंच कालीदासाचें जें प्राकृत तेंच हेमचंद्राचें प्राकृत आहे. ह्मणजे हे प्रतिष्ठित उत्तरकालीन ग्रंथकार मेलेल्या भाषा योजीत आहेत, हें स्पष्ट आहे. द्वितीय : शूद्रक, विशाखदत्त, बाण, श्रीहर्ष, नारायणभट्ट, जयदेव, भवभूति, इत्यादि नाटककार, महाराष्ट्र, माळवा, काश्मीर, ओढिया, प्रयाग इत्यादि निरनिराळ्या प्रांतांत राहणारे असून, सर्वच महाराष्ट्री, शौरसेनी, अपभ्रंश, वगैरे भाषा योजतात. शिवाय, प्राकृतांत काव्य रचतांना महाराष्ट्रीचा उपयोग करावा व गद्य बोलतांना शौरसेनी वापरावी, वगैरे नियम साहित्यग्रंथकार देतात; मग नाटककार कोणत्या हि प्रांतांतला असो व श्रोतृवर्ग वाटेल त्या प्रदेशांतला असो. ह्याचा अर्थ काय? उदाहरणार्थ, मथुराप्रांतांतील लोक श्रीहर्षाच्या वेळीं काय दोन भाषा बोलत होते, काव्याकरितां महाराष्ट्री व गद्याकरितां शौरसेनी ? तसें च, नाटकांवरून असें दिसतें कीं, नायक संस्कृत बोलतो, नायिका महाराष्ट्रींत गाते व शौरसेनींत बोलते, सेवक मागधींत विनंती करतो, मेव्हणा शाकारींत बकतो, चोर ढक्की बोलतात व चांडाल चांडाली वापरतात, आणि ह्या सर्व भाषा एका च घरांत चालतात. तेव्हां, हा प्रकार काय आहे? शकसंवताच्या प्रारंभीं होऊन गेलेला कालीदास एका च पात्राच्या तोंडून महाराष्ट्री व शौरसेनी अशा दोन भाषा वदवतो, हें देखील जरा चमत्कारिक च आहे. परंतु त्या कालीं महाराष्ट्री भाषा उन्नत व नागर स्थितीप्रत पावून शातवाहनराजांच्या पाठिंब्यामुळें भरतखंडांत

सर्वत्र मान्य व ग्राह्य झालेली होती. तेव्हां, महाराष्ट्रबाह्य प्रांतांत हि तिचा प्रचार स्त्रीपुरुषांत अव्याहत होता, असें समजून चालतां येईल. परंतु शकाच्या पांचव्या शतकाच्या पुढें झालेले जे बाण, श्रीहर्ष, इत्यादि नाटककार ते हि महाराष्ट्री, शौरसेनी वगैरे एकाहून जास्त भाषा एका च पात्राच्या तोंडीं घालतात, हा चमत्कार कोठला? शकाच्या पांचव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्री भाषा मरून दोनतीनशें वर्षे झालीं होतीं व अपभ्रंश मुमूर्षुदशेंत होता, हें तर शक ४१० तील मराठी शिलालेखावरून स्पष्ट आहे. तेव्हां बाण, श्रीहर्ष वगैरे कवी गतानुगतिकन्यायानें मृतसंस्कृताप्रमाणें च, मृत महाराष्ट्री, मृत शौरसेनी व मुमूर्ष अपभ्रंश योजीत होते, यांत संशय नाहीं. जयदेवाच्या कालीं महाराष्ट्री मेली होती, अपभ्रंश मेला होता व मराठी भाषा चांगली नावांरूपाला येत चालली होती; तसें च, शौरसेनी मरून तिच्या जागीं जुनी व्रज भाषा आलेली होती. तत्रापि प्रसन्नराघवांत महाराष्ट्री व शौरसेनी– कालिदासाची व वररुचीची महाराष्ट्री व शौरसेनी – जयदेव योजतो. त्यांत दुसरी एक नकलेची गोष्ट अशी कीं जयदेव राहणारा ओढिया प्रांतांतला. जुन्या ओढियेचा मागधीकडे संबंध. असें असून, ओढीया, किंवा तत्पूर्वकालीन मागधी भाषा न योजतां, जयदेव ज्याअर्थी महाराष्ट्री व शौरसेनी भाषा योजतो, त्याअर्थी तो साहित्यशास्त्रकारांच्या उपदेशाला अनुसरून गतानुगतिकन्यायानें मृत व मुमूर्ष भाषांत लिहीत आहे, हें उघड आहे. हा अचरटपणा कृष्णाजीपंत शेषे वगैरे नुकत्या तीनशें वर्षापलीकडील नाटककारांनीं हि केलेला आहे. असो, गतानुगतिकास्तव व पुराणप्रियतेस्तव मृत व मुमूर्ष भाषांत नाटकें लिहिण्याच्या ह्या लकबीनें कित्येक युरोपियन टीकाकारांना चकविलें आहे. कालदृष्ट्या पहावें तर लोकांत एक भाषा प्रचलित आहे असें दिसतें व नाटककारांच्या ग्रंथांत पहावें तर मृत व मुमूर्ष भाषा योजलेल्या दृष्टीस पडतात. त्यावरून ह्या टीकाकारांना अशी शंका आली कीं, संस्कृत, प्राकृत व प्राकृतिक अपभ्रंश, ह्या कृत्रिम भाषा तर नसाव्या? कित्येक उतावळे व दुष्टबुद्धि टीकाकार, तर इतक्या हि थराला गेले कीं, ही सर्व ब्राह्मणांची फसवेगिरी असावी! ह्या दुसऱ्या बालिश टीकाकारांकडे लक्ष्य देण्यांत हांशील नाहीं. कृत्रिमभाषावाद्यांची शंका, मात्र, सकारण होती. तिचा परिहार वर झाला च आहे. जैनमहाराष्ट्री, जैनशौरसेनी वगैरे भाषांचा हि प्रकार वरच्याप्रमाणें च आहे. जुनी मृत महाराष्ट्री भाषा आपली धर्मग्रंथभाषा ह्मणून जैन ग्रंथकार समजत. आपले धर्मशास्त्रग्रंथ जसे मृत संस्कृतांत अद्याप हि रचले जातात, तो च प्रकार जैनधर्मग्रंथांचा आहे. तात्पर्य, भारतखंडांतील ग्रंथकारांचा मृतभाषांत लिहिण्याचा ओढा विशेष असतो, हें उघड आहे.

"A Peep into the early history of India" (J. B. B. R. A. S. 1901, Vol. XX) ह्या चटकदार निबंधांत डॉक्टर भांडारकर यांनीं खालील विधानें केलीं आहेत. (1) Another peculiarity of this period (from about the beginning of the second century before Christ to about the end of the fourth century after) was the use of the Pali or the current Prakrit language in Inscriptions. (2) But now (from about the end of the fourth century after Christ) we find that Sanskrit rose in importance and the vernaculars were driven out of the field. ख्रिस्तपूर्व २०० पासून ख्रिस्तनंतर ४०० पर्यंत प्राकृतांचें साम्राज्य होतें; परंतु ४०० नंतर प्राकृतांना गचांडी मिळून संस्कृत तत्स्थानापन्न कां झाली, ह्याचें कारण, डाक्टरांनीं असें दिलें आहे कीं, Brahmanism चा उदय झाला, त्यामुळें प्राकृत मागें पडल्या व संस्कृत पुनः उदयास आली. ह्या चमत्काराचें खरें कारण मी जे वर दिलें आहे तें आहे. महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषा शक २०० च्या सुमारास मेल्या. पुढें दोन-अडीचशें वर्षे अपभ्रंश प्रचलित होता. तो हि शक ४०० च्या सुमारास मरून, आधुनिक मराठी वगैरे प्राकृतिकोद्भव भाषा जन्मास आल्या. परंतु, त्यांना विद्वन्मान्यता नसल्यामुळें, त्यांचा उपयोग ह्मणावा तसा होत नसे. डाक्टर भांडारकरांनीं वृत्तनिरूपण बराबर केलेलें आहे; परंतु वृत्ताचें कारण, मात्र, जें द्यावें तें दिलें नाहीं. संस्कृत भाषेचा पुनरुदय व Brahmanism चा पुनरुदय हीं एका च कारणाचीं कार्यें आहेत. बौद्धधर्म व प्राकृत भाषा मेल्यामुळें संस्कृत भाषा व

अनुक्रमणिका

Brahmanism उदयास आलीं. बौद्धधर्माचा अस्त व प्राकृत भाषांचा मृत्यु हीं कारणें असून, Brahmanism व संस्कृत भाषा यांचा उदय हीं सोदर कार्ये आहेत. संस्कृत भाषेच्या पुनरुदयाचें Brahmanism हें कारण नाहीं, प्राकृत भाषांचा मृत्यु हें कारण आहे.

## मराठी उर्फ देशी

●३६. शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा सुरू झाली, तेव्हां, अपभ्रंश नष्ट होत चालला होता व महाराष्ट्री भाषा मृत झाली होती, ह्याला दुसरें एक प्रमाण आहे. शक ४५० च्या सुमारास महाराष्ट्रांत चालुक्यांचें राज्य सुरू झालें. चालुक्यांच्या अमदानींत जे ताम्रपट व शिलालेख खोदले गेले ते प्रायः सर्व संस्कृत भाषेंत आहेत, शातवाहनांच्या कारकीर्दीतल्या प्रमाणें प्राकृतांत किंवा अपभ्रंशांत नाहींत. ह्याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्री व अपभ्रंश मृत व मुमूर्ष स्थितींत चालुक्यांच्या वेळीं होते. तेव्हां, सहज च त्यांनीं त्या मृत व मुमूर्ष भाषांचा उपयोग केला नाहीं. मराठीचा उपयोग करावा ह्मटलें तर ती भाषा राजमान्य झाली नव्हती, नुकती च उदयास येत चालली होती. तत्रापि, शक ४१० तील मंगळवेढच्या ताम्रपटावरून व शक ६५८ तील चिकुड्यांच्या ताम्रपटावरून असें दिसतें कीं, सामान्य लोकांचें सर्व लिखाण मराठी भाषेंत च चाललें होतें. शिवाय हा हि एक प्रश्न उभा रहातो कीं, चालुक्यराजांचें दफ्तर, राज्याचे हिशोब वगैरे, कोणत्या भाषेंत लिहिले जात असे? संस्कृत भाषा दफ्तरांतील कारकुनांस येत असेल हें संभवत नाहीं. तसेंच सामान्य लोकांस ह्मणजे पाटीलकुळकर्ण्यांस उद्देशून जीं सरकारी आज्ञापत्रें जात असतील तीं संस्कृतांत लिहिलीं जात असत, हे हि विधान असंभाव्य च दिसतें. **मराठी ऊर्फ देशी.** तेव्हा असें ह्मणणें प्राप्त होते कीं, चालुक्यराजे राज्यांतील सामान्य व्यवहार तत्कालीन देशभाषेंत च करीत असले पाहिजेत. असामान्य व्यवहार ह्मणजे विशिष्ट देणग्या वगैरे संबंधीचे आज्ञालेख किंवा दानलेख विद्वान व शिष्ट ब्राह्मणांना उद्देशून लिहिल्यामुळें, ते तेवढे संस्कृतभाषेंत कोरले जात. इतर सर्व व्यवहार त्या त्या देशभाषेंत च होत होते. चालुक्यांच्या साम्राज्यांत मुख्यतः दोन भाषा सामान्य लोकांत प्रचलित असत :— १ मराठी व २ कानडी. ह्या दोन भाषांत सामान्य लिखाण होत असे. पैकीं मराठी भाषेला देश्य, देशी अशी संज्ञा असे. ज्ञानेश्वर मराठीला देशी ह्मणतो. हेमचंद्राच्या देशीनाममालेंतील देशी शब्द प्रायः तत्कालीन मराठी च आहेत. इतकेंच कीं, वृत्तसुखार्थ व संस्कृतभाषारूपार्थ बहुतेक देशी शब्दांना त्यानें संस्कृत पेहराव थोडाबहुत दिला आहे.

## शक ९०० पर्यंत मराठींत सारस्वताभाव.

● ३७. आतांपर्यंत जे जुने मराठी लेख उपलब्ध झाले आहेत त्यांत अत्यंत जुना लेख ह्मटला ह्मणजे शक ४१० तील मंगळवेढें येथील ताम्रपट होय. हा लेख व ह्याच्यानंतरचे जुने मराठी लेख ह्यांची समग्र यादी मागें चवदाव्या रकान्यांत दिली आहे. त्यावरून पहातां, असें दिसतें कीं, शक ४०० पासून शक ९०० पर्यंत मराठी भाषा केवळ बोलण्यांत येत होती, तिच्यांत सारस्वत उत्पन्न झालें नव्हतें. अभंग, पदें, भूपाळ्या, कहाण्या वगैरे वाङ्मय ह्या हि काळीं उत्पन्न झालें असण्याचा पूर्ण संभव आहे. परंतु शक ९०० पर्यंतचें हें वाङ्मय अद्याप उपलब्ध नाहीं. तेव्हां, सध्यांपुरतें तरी असें च ह्मणणें भाग आहे कीं, शक ९०० पर्यंत मराठींत सारस्वत नव्हतें.

## शक ९०० नंतर नागर मराठी.

अनुक्रमणिका

● ३८. शक ९०० पासून पुढें मराठी सारस्वताला प्रारंभ झाला. ["ज्ञानेश्वरांच्या अगोदर निवृत्ति, मुकुंदराज, सहदेव भाडळी, अभि ० चिंतामणीतील पद्यकार यांनीं ग्रंथरचना केलेली आहे." (राजवाडे : भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३४, पृ. १३२; शके १८३६, पृ. १७८)] सारस्वताचें अगदीं पहिलें उदाहरण ह्मटलें ह्मणजे अभिलषितार्थचिंतामणींतील पदांचें होय. तदनंतर निवृत्ति, ज्ञानेश्वर, वगैरे नागर ग्रंथकार उदयास आले व त्यांनीं मराठीला नागर केली. हेमाडपंताच्या वेळीं दरबारचें सर्व लिखाण मोडी मराठींत होत असे.

## मराठीला फारशीचा संसर्ग शक १२००-१५००.

●३९. ज्ञानेश्वरानंतर मुसलमानांचें राज्य महाराष्ट्रांत झालें. त्यामुळें मराठीला फारसी व अरबी भाषांचा संसर्ग घडला. ह्यासंबंधीं विवेचन **मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या आठव्या** खंडाच्या प्रस्तावनेंत साद्यन्त केलेलें आहे. सबब, त्या तपशिलांत येथें पडत नाहीं. मुसलमानी रियासतींत जनार्दन, दासोपंत, एकनाथ वगैरे नामांकित ग्रंथकार मराठींत झाले.

## स्वराज्य शक १५०० पासून शक १७३९ पर्यंत.

● ४०. नंतर स्वराज्याचा काळ आला. त्यांत रामदास- मोरोपंतादि ग्रंथकार व सभासदादि बखरकार झाले.

## इंग्रजीचा संसर्ग शक १७३९-१८३०

● ४१. शक १७३९ नंतर मराठीला इंग्रजीचा संसर्ग झाला. तो सध्यां आपण पहात च आहों.

## (येथवरच्या विवेचनाचा आढावा)

●४२. मराठी भाषेच्या स्थित्यंतरांचें स्थूळ टिपण हें असें आहे. आजपर्यंत मिळालेल्या लेखांवरून १ मराठी भाषेचा इतिहास, २ मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण, ३ मराठी भाषेचें निरुक्त व, ४ मराठी भाषेंतील सारस्वताचा इतिहास, अशीं चार प्रकरणें नामी रीतीनें सजवतां येण्यासारखीं आहेत. ह्या एकेक विषयाला एकएक स्वतंत्र ग्रंथ च अर्पण केला पाहिजे.

## (प्रस्तुत ज्ञानेश्वरी-विषयक तपशील)

●४३ शक १८१८ त मराठी भाषेतील जुने लेख व ग्रंथ शोधण्यास मी प्रारंभ केला तेव्हांपासूनच्या बारा वर्षांत जी महत्त्वाची लेखप्राप्ति झाली तिच्यावरून ही त्रोटक हकीकत येथपर्यंत दिली. आतां, प्रस्तुत छापलेल्या ज्ञानेश्वरी-संबंधानें तपशील देऊन, ही प्रस्तावना संपवितों.

## पोथीचें मूलस्थान

●४४. बालेघाटीं बीडशहरीं पाटांगण नांवाचें एक देवस्थान आहे. तेथें शके १८२५ त ही ज्ञानेश्वरीची प्रत सांपडली. इतर दहावीस ज्ञानेश्वऱ्या तेथें पडल्या होत्या त्यांत ही प्रत एका कोनाड्यांत पोथ्यांच्या ढिगांत लोळत पडली होती. मठाधिपति जे मथुरानाथ गोसावी त्यांनीं मला ही प्रत नजर केली व हिचा योग्य उपयोग करण्यास कळकळीनें सांगितलें.

## पोथीचें रूप.

[राजवाडे यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तुत आवृत्तीचे एक निरीक्षण Journal Asiatique च्या प्रथम वर्षाच्या (इ. स. १९०९) खंडात पृ. ५६४ पासून पुढे आले आहे.]

●४५. ही प्रत सबंध शाबूत आहे. पानें ३२२ असून, पाठपोट मिळून पृष्ठं, अर्थात्, ६४४ आहेत. पानाची लांबी ९ इंच व रुंदी ४ $^3/_4$ इंच आहे. दर पृष्ठास बारापासून चौदापर्यंत ओळी आहेत. अक्षर उत्कृष्ट वळणदार असून, येथूनतेथून एकहातचें आहे. प्रायः प्रत्येक पान कागदाची दुहेरी घडी गोंदानें चिकटवून एकजीव केलेलें आहे. ह्मणजे गोंद काढून पान उघडलें असतां, आंत पोट कोरें आहे आणि पाठीवरील क्षेत्रफळाचीं दोन पृष्ठें करून वर लिहिलेलें आहे. तात्पर्य, कागद आंतून गोंदानें चिकटवून दुहेरी जाड केलेला आहे. शाई लाखी असून, अद्याप अक्षरें पूर्ण शाबूत आहेत. अक्षराचें वळण तत्कालीन मराठी आहे. सोबत जोडलेल्या फोटोवरून पानाचें व अक्षराचें स्वरूप ध्यानांत येईल. प्रत्येक पानाचे चारी कोपरे मुद्दाम वाटोळे केलेले आहेत. कागद तुरटीच्या पाण्यानें धुतला असल्यामुळें, तो जलनिर्भय झाला आहे. विरामाच्या उभ्या रेघा व ओव्यांचे अंक तांबड्या शाईनें लिहिले आहेत; आणि संस्कृत श्लोकांवर तांबडी काव फासली आहे. लांकडाच्या फळीवर सुतळी बांधून, ती आंखणी कागदावर दाबून रेघा पाडलेल्या आहेत. अक्षर वेळूच्या लेखणीनें लिहिलें आहे. पहिल्यापासून अखेरच्या पानापर्यंत अक्षरांची लांबीरुंदी एकसारखी आहे. ह्मणजे एकाच टोकाच्या पांचपन्नास लेखण्या लेखकानें जवळ तयार करून ठेविल्या असल्या पाहिजेत. लेखक लिहण्याचा धंदा जन्मभर करणारा असून स्वकर्मकुशल होता. असें दिसतें.

## लेखनशुद्धि

● ४६. लेखनशुद्धीकडे पहातां, ती प्रायः केवळ निर्दोष आहे. क्वचित् एखादें अक्षर गळालेलें आढळतें. परंतु अशीं स्थलें सबंद पोथींत फार च थोडीं सांपडतात. गळलेलीं अक्षरें, गळल्या ठिकाणीं काकपद V देऊन, समासांत दाखविलीं आहेत. ह्मणजे पोथी संपल्यावर मुळाशीं कसोशीनें ताडून बघितलेली आहे.

## विद्वच्छुद्धि.

● ४७. पोथी वाचणाऱ्या मालक विद्वानानें कोठें कोठें समासावर शोध घातलेले आढळतात. मालकाचे अक्षर लेखकाच्या अक्षराहून भिन्न आहे.

## भाषाशुद्धि

● ४८. व्याकरणदृष्ट्या पोथींतील रूपें अत्यन्त शुद्ध लिहिलेलीं आहेत. ह्मणजे ज्ञानेश्वराच्या वेळीं नागर मराठी भाषेचें जें रूप होतें तें अक्षरद्वारा जसेचेंतसे ह्या पोथींत दाखविलेलें आहे. ऱ्हस्व, दीर्घ,

अनुक्रमणिका

अनुस्वार, अनुनासिक, कान्हा, मात्रा, उकार, इकार, येथूनतेथून सबंद पोथींत, प्रायः, तत्कालीनव्याकरणदृष्ट्या शुद्ध लिहिलेले आहेत. ज्या शब्दाचा व रूपाचा जो उच्चार तो तशाचा तसा च अक्षरांनीं वठवलेला आहे. अगदीं एक सुद्धां अपवाद नाहीं. इतकी शुद्ध पोथी संस्कृतांत हि सांपडणें कठिण. प्राकृतांत, तर, ती केवळ अनुपमेय आहे. ह्या पोथीचें मराठी भाषाशास्त्राला व निरुक्ताला फार च साहाय्य होईल.

## विद्वन्मंन्यशुद्धि किंवा अशुद्धि

● **४९.** ही पोथी कोण्या विद्वन्मंन्यानें पुनः एकदां शुद्ध केलेली आहे. ज्ञानेश्वरकालीन रूपें एकनाथाच्या किंचित् पूर्वी बदलून आधुनिक होत होतीं. अशा काळीं, ही पोथी कोणा गृहस्थाच्या हातीं पडून, त्यानें हजारों स्थलीं गंधाचा व गेरूचा उपयोग करून मूळ पाठ बुजवून टाकिले आहेत. गंध व गेरू हलक्या हातानें खरडून काढून मूळ पाठ मीं प्रस्तुत छापील प्रतींत दिले आहेत. [राजवाडे यांच्या वरील कृत्याविषयी "त्यांनी ते (पाठ) **छापविण्या**ऐवजी **छपविले** हे अत्यंत गैर केले" अशी टीका डॉ. चिपळोणकर यांनी केली होती (ज्ञानप्रकाश, ले. ७).] गंध व गेरू ह्यांच्या लेपाखालील मूळ पाठ ज्ञानेश्वरकालीन व्याकरणदृष्ट्या शुद्ध होते, ते ह्या गृहस्थाला अशुद्ध वाटून, त्यानें ही मखलाशी केली आहे. परंतु, ती मखलाशी हि फार च काळजीनें व सफाईनें केली आहे. सारांश, ही पोथी, लेखक, मालक, व मखलाशीकार, ह्या तिन्ही उत्कृष्ट लोकांच्या हातून जातजात मथुरानाथ गोसाव्यांच्या द्वारा माझ्या हातांत आली. ती जशीची तशी महाराष्ट्रांतील विद्वानांच्या सेवेस छापून सादर केली आहे.

## पोथीचे आद्यन्त.

● **५०.** श्रीमहागणपतयेनमः ॥, असा पोथीचा प्रारंभ आहे. पोथीची समाप्ति येणें प्रमाणेः—

ऐसें युगीं वरि कली । आणि महाराष्ट्रमंडलीं ।
श्री गोदावरिचां कुलीं । दक्षिणिलीं ॥८४॥
तेथ भुवनैकपवित्र । अनादिपंचक्रोशक्षेत्र ।
जगाचें जीवनसूत्र । जेथ श्रीमहालसा ॥८५॥
तेथ इंदुवंशविलासु । जो सकलकलां निवासु ।
न्यायातें पोखीत क्षितीशु । श्रीरामचंद्रु ॥८६॥
तैं माहेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ।
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥८७॥
ऐवं भारताचां गावीं । भीष्मनामीं प्रसिद्धपर्वी ।
श्रीकृष्णांर्जुनीं बरवी । जे गोष्टि केली ॥८८॥
जें उपनिषदाचें सार । सर्वशास्त्राचें माहिएर ।
परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥८९॥
तिये गीतेचा कलशु । संपूर्ण हा अष्ठादशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥९०॥
पुडुती पुडुतीं पुडुतीं । इया ग्रंथा पुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजो ॥९१॥

अनुक्रमणिका

ॐ तत्सदितिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षयोगो नाम अष्टादशोध्यायः ॥ हिरण्य । श्रीकृष्णार्पणमस्तु ॥१८॥ लेखनं श्रीकृष्णार्पणमस्तु । श्री ++++ साम्राज्यलक्ष्मीस्वरूपीश्वरा गुरुकृपालु नारायण पातु मां ॥

येथें ज्ञानेश्वरीचा अखेर झाला. ९० व्या ओवीच्या "दासु ॥ ज्ञानदेवो" पासून "पातु मां" पर्यंतच्या सर्व ओळी आळित्याच्या तांबड्या शाईनें मूळलेखकानें लिहिल्या होत्या. त्यांपैकी ९१ वा अभंग संपेतोंपर्यंतचीं तांबडीं अक्षरें एका गृहस्थानें काळ्या शाईनें गिरविलीं आहेत. आंतून तांबडी शाई दिसते व वरून काळ्या शाईचीं ओबडधोबड गिरवणी डोळ्यांत सलते. ह्या गृहस्थानें ८४ व्या ओवीपासून ९१ व्या ओवीपर्यंतचीं काळीं व तांबडीं अशीं सर्व च अक्षरें काळ्या शाईनें गिरविलीं आहेत. कारण, ह्या गृहस्थाच्या हातांत ही पोथी आली, तेव्हां पोथीच्या ह्या शेवटल्या पृष्ठावरचीं अक्षरें घासटून अगदीं पुसटून गेलीं होतीं. तेव्हा स्पष्टतेकरतां तीं काळ्या शाईनें गिरवणें त्याला भाग पडलें. परंतु, गिरवणाऱ्याला मूळ लेखका इतकें सुंदर लिहितां येत नसल्यामुळें वळवलेलें प्रत्येक अक्षर बेढब बनलें आहे. मूळ अक्षराची सफाई, ह्या गिरवणाऱ्याच्या धसाड्या हातानें, अगदीं निघून गेली आहे. आतां इतकें खरें आहे कीं गिरविणाऱ्यानें जर घासटून पुसटून जात चाललेलीं अक्षरें गिरवून शाबूत राखलीं नसतीं, तर ह्या पोथीच्या समाप्तीचीं हीं अक्षरें व ओव्या आपणांस पहावयास न सांपडत्या. ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे, ह्या गृहस्थानें अक्षरें गिरवून बचावण्यांत जगावर मोठा उपकार केला आहे, त्यांत संशय नाहीं. ह्या शेवटल्या पानाचे दोन्ही बाजूचे समास व समासांच्या मधील बोट अर्धबोट जागा फाटून गेली होती ती हि ह्या मनुष्यानें स्वकालीन कागदाच्या तुकड्यांनीं डागडूज केली आहे. मूळलेखकानें लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या पोथीच्या समाप्तीच्या ओव्यांचा व अक्षरांचा हा तपशील झाला. समाप्तीच्या शेवटल्या ओळीवरून असें दिसतें कीं, लेखकाला संस्कृत भाषा येत नव्हती.

“पातु मां” नंतर दुसऱ्या एका मनुष्यानें लिहिलेली व निराळेंच वळण असलेली एक ओवी येणेंप्रमाणें आहे:—

(१) शके बारा शतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें । लेखक जाला ॥९२॥

ह्या ओंवीच्या अक्षरांचें वळण उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या वळणासारखें नाहीं. शिवाय अक्षरांची शाई उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या शाईहून जुनी आहे. ह्मणजे ही ओंवी उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या आधीं कोणी तरी लिहिलेली आहे, व तिच्यावर ९२ चा आंकडा टाकिला आहे.

ह्या ९२ व्या ओवीच्या खालीं एक संस्कृत श्लोक ९२ व्या ओंवीच्या वळणाहून निराळ्या वळणांत लिहिलेला आहे. त्याची शाई ९२ व्या ओवीच्या शाईहून निराळी व जुनी दिसते. हा श्लोक येणेंप्रमाणें:—

(३) श्रीसद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ॥
विद्याधराय शिष्याय स्वीए स्वत्वं न शोभते ॥१॥छ॥

९२ वी ओवी व हा श्लोक ह्यांच्या मध्यें खालील खरडलेली ह्मणजे प्रथम लिहून नंतर लेखणीनें खरडून व पुसून टाकिलेली एक ओळ आहे. हें अक्षर वरल्या तिन्ही अक्षरांहून अगदीं निराळें व किरटें आहे. ओळ येणेंप्रमाणें:—

अनुक्रमणिका

(२) हें पुस्तक विश्वनाथु कोनेर धोलर देवनुरकर

ह्या तीन लेखांपैकीं तिसरा लेख कालदृष्ट्या सर्वांच्या आधींचा, पहिला लेख तदनंतरचा आणि दुसरा लेख शेवटचा आहे.

## पोथीचा काळनिर्णय

● **५१.** समाप्तीच्या ह्या तीन लेखांवरून खालील निगमनें प्राप्त होतात. [१] मूळलेखकानें ज्या प्रतीवरून आपली प्रत उतरून घेतली त्या प्रतींत व अर्थात् उताऱ्यांत "शके बारा शतें" इत्यादि ओवी नव्हती. [२] ती ओवी ज्ञानदेवानंतर कोणी तरी रचिलेली आहे. ती ओवी सच्चिदानंदबावानें हि रचिलेली नाही. कारण, ज्ञानदेव व सच्चिदानंदबावा यांच्या कालीं बाबा असें रूप प्रचलित नसून बावा असें रूप प्रचलित होतें. वप्ता = बप्पा = बापा = बावा =बाबा, अशी उच्चारपरंपरा आहे. सच्चिदानंदबावानें ही ओंवी लिहिली असती, तर बावा असा पाठ आला असता. मजजवळ ज्ञानेश्वरीच्या इतर सुमारें पन्नास पोथ्या आहेत, त्यांपैकीं एकींत हि बावा असा पाठ नाहीं, बाबा असाच पाठ आहे. ह्मणजे सच्चिदानंदबावा वारल्यावर त्याच्या कोण्या चाहत्यानें तत्स्मरणार्थ ही ओंवी रचिलेली आहे. अर्थात्, प्रस्तुत छापिली गेलेली प्रत ज्या मूळ प्रतीवरून केली, ती मूळ प्रत सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या आधीं लिहिलेली होती. [३] ही मूळ प्रत सद्गुरु मुकुंदानें विद्याधर नामक शिष्याला दिली. सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या अगोदर असणारा हा मुकुंद मुकुंदराज ज्याला ह्मणतात तो च होय. दुसरा कोणी मुकुंद शक १२१२ पासून शक १२४० पर्यंत हयात नव्हता. मुकुंदराजाची हयात शक ११५८ पासून १२५८ पर्यंत होती, (ग्रंथमाला, मुकुंदराज). तात्पर्य, मुकुंदराजानें आपला शिष्य जो विद्याधर त्याला आपल्याजवळील ज्ञानेश्वरीची प्रत बक्षीस दिली. तीच ही मजजवळ असलेली प्रत होय. ही प्रत सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या अगोदर ह्मणजे शक १२४० च्या अगोदर व शक १२१२ च्या नंतर केव्हां तरी लिहिलेली आहे. ह्या प्रतीचा उत्तम, मजबूत, तलम व कमावलेला कागद; उत्तमोत्तम शाई; कसलेल्या लेखनकुशल लेखकाचें येथूनतेथून एकवळणी अक्षर, पाहिलें ह्मणजे असें कबूल करणें भाग पडतें कीं, ही प्रत तयार करण्यास पुष्कळ द्रव्य लागलें असावें व ज्या धन्याकरितां ही प्रत तयार केली तो धनी श्रीमान असावा. मुकुंदराज होयसळवंशीय जयंतपाळाचा गुरु होता, व त्याला अर्थात् उत्तम द्रव्य व उत्तम राजदरबारी लेखक मिळवण्यासारखे होते. दरिद्र्याच्या हातून अशी प्रत तयार होणें अशक्य आहे. ही प्रत लिहून काढण्यास, इतक्या काळजीनें, सुबकपणानें व सफाईनें उतरून घेण्यास व मुळाबरहुकूम तपासण्यास वर्ष दोन वर्षे लागलीं असावीं. ह्मणजे सुमारें हजारपांचशें रुपयांच्या खालीं ह्या प्रतीला खर्च पडला नसावा. तेव्हां, असली ही द्रव्यसाध्य प्रत तयार करविणारा राजगुरु मुकुंदराज च असला पाहिजे. सारांश, ही प्रत मुकुंदराजाची आहे व ही शक १२१२ पासून शक १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे. एका च शब्दानें सांगावयाचें ह्मटलें, तर असें ह्मणणें प्राप्त होतें की, महाराष्ट्रग्रंथसंग्रहांत ही ज्ञानदेवीची प्रत केवळ **"अमूल्य"** आहे.

## पोथीचें स्थलान्तर

●**५२.** मुकुंदराजाचा शिष्य जो विद्याधर-आपल्याला ही देणगी शोभत नाहीं, आपण हिचे मालक होण्यास योग्य नाहीं, असें उद्गार काढणारा जो विद्याधर-त्याच्या हातून ही पोथी विश्वनाथु कोनेर धोलर देवनुरकर याच्या ताब्यांत गेली व त्याच्या द्वारा परंपरेनें बीड येथील पाटांगणांत येऊन दाखल झाली.

अनुक्रमणिका

## पोथींतील शक १२१२ तली निर्भेळ नागर मराठी भाषा

●५३. तलम कागदाची मजबुती, बारीक पण घोसदार अक्षराची एकवळणी सफाई, मालकाची द्रव्यसंपन्नता, वगैरे पोथीच्या गुणांचें अनुवादन केलें. परंतु, ह्या सामान्य गुणांहून दुसरा एक असामान्य गुण ह्या पोथींत आहे. तो हा. ह्या पोथींतील भाषा-जी ज्ञानेश्वर बोलला, जी ज्ञानेश्वरानें नेवाशांतील शिलेवर लिहिली, ब जी शक १२१२ त नागर मराठे बोलत-ती च साक्षात् आहे. कागद भिकार असता, अक्षर गिचमीड असतें, व मालक शतदरिद्री असता, आणि भाषा जर ह्या पोथीतल्याप्रमाणें साक्षात् शक १२१२ तील नागर मराठी असती, तरी देखील, ह्या एकाच असामान्य गुणाच्या बळावर, अशा पोथीचा सकौतुक आदर करणें भाग पडलें असतें. ज्ञानेश्वरांच्या पुण्याईनें व मुकुंदराजांच्या श्रीमंतीनें उत्तम कागद व उत्तम अक्षर ह्यांच्या जोडीला शक १२१२ तील निर्भेळ नागर मराठी भाषा आपल्याला उपलब्ध झाली आहे. तेव्हां, ह्या प्रतीचें कौतुक करावें तेवढे थोडेंच आहे. पंढरपूनर येथील शक ११९५ तील शिलाखेखांतल्यासारखी किंवा पाटण येथील शक ११२८ तील शिलालेखांतल्यासारखी भाषा ह्या पोथीची आहे. तेव्हां, मुकुंदराजाचा उल्लेख ज्यांत केला आहे असा श्लोक यद्यपि ह्या पोथीच्या समाप्तींस नसता, तत्रापि देखील निव्वळ भाषेच्या स्वरूपावरून ही पोथी थेट ज्ञानेश्वराच्या वेळची आहे, असें तज्ज्ञांना सहज ताडतां आलें असतें. प्रथम मीं जेव्हां ही पोथी पाटांगणांत अधूनमधून वाचून पाहिली, तेव्हां भाषेवरून प्रथमदर्शनींच लक्ष्यांत आलें कीं, ही प्रत एखाद्या ज्ञानेश्वरकालीन प्रतीची नक्कल आहे. पुढें अक्षराच्या वळणाचा जेव्हां विचार करूं लागलों, तेव्हां असें हि दृष्ट्युत्पत्तीस आले कीं, ह्या पोथींतील अक्षरें पंढरपूर येथील शक ११९५ तील शिलालेखांतल्या अक्षरांसारखीं आहेत. आणि समाप्तीतील मुकुंदराजाच्या श्लोकाचें जेव्हां मनन केलें, तेव्हां तर अशी पक्की खात्री झाली कीं, ही पोथी खुद्द मुकुंदराजाची आहे, व ती त्यानें आपला नम्र व श्रद्धाळू शिष्य जो विद्याधर त्याला बक्षीस दिली होती. शेवटीं, सच्चिदानंदबावा संबंधीची ओवी मूळप्रतींत नाहीं, हें जेव्हां पाहिलें, तेव्हां शक १२४० च्या पूर्वीची ह्मणजे सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या पूर्वीची ही पोथी आहे, असें ठाम मत झालें. आणि मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला व व्याकृतीला व इतिहासाला ही प्रत अत्यंत उपयोगी पडेल असा भरंवसा वाटला. पंढरपूर येथें पोलीस चावडींत व पंढरपूर जिल्ह्यांत जेवढे ह्मणून यादवकालीन शिलालेख आहेत तेवढ्यांतील अक्षरांचें वळण या पोथीतील अक्षरांच्या वळणासारखें आहे. ही पोथी ह्मणजे मराठी भाषेंतील कागदावर लिहिलेला अत्यंत जुना असा पहिला लेख होय. सुदैव कीं हा लेख पाठपोट ६४४ पृष्ठें आहे व सबंध शाबूत आहे. कागदावर लिहिलेला इतका जुना लेख किंवा इतकी जुनी पोथी डेक्कन कालेजांतील संग्रहांत किंवा आनंदाश्रमांतील संग्रहांत नाहीं. अर्थात्, ह्या पोथीवरून हें हि सिद्ध होतें कीं ज्ञानेश्वरकालीं कागद हा पदार्थ प्रचारांत होता. डेक्कन कालेजांत एक कागदाची पोथी शक १२०० च्या पूर्वीची आहे, ह्मणून तेथील संग्रहालयाच्या लायब्ररीयनच्या सांगण्यांत आलें. परंतु, ती पोथी साक्षात् पाहिल्याशिवाय व तिला कसास लावल्याशिवाय तिच्यासंबंधानें निश्चयानें कोणतें च विधान ग्राह्य करतां येत नाहीं.

## तंजावर येथें असलेली भारद्वाजी प्रत शक १५१५.

●५४. एकनाथानें शुद्ध केलेल्या प्रतींत तद्विषयक उल्लेखाच्या कांहीं एकनाथी ओंव्या येत असतात. ज्ञानेश्वरीच्या शोधाची लेखनकामासाठी एकनाथानें शक १५०६ तारणसंवत्सरीं संपूर्ण केली. त्या ओव्या अर्थात् च प्रस्तुत छापल्या गेलेल्या मुकुंदराजाच्या प्रतींत नाहींत. ह्मणजे, ह्या पोथीवर शुद्धाशुद्धाची जी मखलाशी केली आहे ती हि एकनाथाच्या पूर्वीची आहे; नंतरची असती तर एकनाथी ओव्यांचा समावेश मखलाशीकारानें अवश्यमेव केला असता. कारण, शुद्धाशद्ध करणारा मखलाशीकार मोठा साक्षेपी गृहस्थ

दिसतो. एकनाथानें आपली शुद्ध प्रत शक १५०६ तारणांत तयार केली. त्याच्या पुढें ९ वर्षांनीं शक १५१५ तील एक पोथी तंजावरांतील ग्रंथसंग्रहांत माझ्या पहाण्यांत आली. हिची समाप्ति अशी :—

“शके पंधरा शतें सावोत्तरिं । तारणनाम संवत्सरिं ।
एका जनार्दनें अत्यादरिं । गीता-ज्ञानेश्वरी-प्रती शुद्ध केली ॥१॥
ग्रंथु पूर्वी च अतिशुद्ध । परि पाठांतरें शुद्धाबद्ध ।
ते शोधुनियां येवंविध । प्रति शुद्ध सिद्धज्ञानेश्वरी ॥२॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । ज्याचे गीतेची वाचितां टीका ।
ज्ञान होय लोकां । अतिभाविका ग्रंथार्थियां ॥३॥

श्रीशके पंधरा शतें पंधरा, विजयसंवत्सर, उत्तरायणे, फाल्गुनमासे, शुक्लपक्षे, सप्तमी, रविवासरे, गीता संपूर्ण । श्रीकृष्णार्पणमस्तु । गोदादक्षिणभागे राजधानि अहमदानगरस्थाने फरशरामात्मज-नृसिंह-भारद्वाजगोत्रोत्पन्नेन । ग्रंथो लिखितः संपूर्णमस्तु ॥.”

शके १५१५ च्या फाल्गुन शुक्ल सप्तमीला रविवार येतो, तेव्हां, ही प्रत शक १५१५ तील आहे, ह्यांत संशय नाहीं. एकनाथानें शुद्ध केलेल्या प्रतीवरून ही प्रत उतरून घेतलेली आहे. अर्थात् एकनाथी प्रत कशी असेल तें हिच्यावरून ताडतां येतें. पैठणपासून जवळ असलेल्या अहमदनगर शहरीं फरशरामात्मज नृसिंह भारद्वाज यानें ही प्रत उतरली. भारद्वाज ह्मणजे भारदे. नगर येथील ज्या भारद्यांनीं ऊर्फ भारद्वाजानें कांहीं वर्षांपूर्वी एकाचे दोनचार ज्ञानेश्वर केले होते त्यांचा च कोणी पूर्वज हा नृसिंह भारद्वाज असावा. यावरून असें दिसतें कीं, ज्ञानेश्वरीचें पठण ह्या भारद्यांच्या कुळांत वंशपरंपरेनें आहे. ह्या प्रतींत (१) भाद्रपदमास कपिलाषष्ठी, इत्यादि व (२) या ज्ञानेश्वरी पाठीं, इत्यादि, दोन ओंव्या नाहींत. तंजावर येथील प्रतीतील अध्यायवार ओंवीसंख्या येणेंप्रमाणें आहे.

| अध्याय | | | ओंव्या | अध्याय | | | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | .... | .... | २७५ | २ | .... | .... | ३७२ |
| ३ | .... | .... | २७६ | ४ | .... | .... | २२५ |
| ५ | .... | .... | १८० | ६ | .... | .... | ५०८ |
| ७ | .... | .... | २१० | ८ | .... | .... | २७१ |
| ९ | .... | .... | ५३६ | १० | .... | .... | ३३६ |
| ११ | .... | .... | ७१२ | १२ | .... | .... | २४७ |
| १३ | .... | .... | ११६९ | १४ | .... | .... | ४१५ |
| १५ | .... | .... | ५९९ | १६ | .... | .... | ४७३ |
| १७ | .... | .... | ४३३ | १८ | .... | .... | १८१० |

९०४७

कुंटे आपल्या प्रतीला एकनाथी प्रत ह्मणतात. कुंट्यांच्या प्रतींत ९०३७ ओंव्या आहेत. त्यपेक्षां

अनुक्रमणिका

**कुंट्यांची प्रत.** कुंटे आपल्या प्रतीला एकनाथी प्रत ह्मणतात. कुंट्यांच्या प्रतींत ९०३७ ओंव्या आहेत. त्यापेक्षां ह्या तंजावरी प्रतींत १० ओंव्या जास्त आहेत.

## मुकुंदराजाच्या प्रतींतील ओंवीसंख्या.

● **५५.** तंजावरांतील भारद्वाजी प्रत व कुंट्यांची एकनाथी ह्मणून ह्मटलेली प्रत ह्यांत प्रत्येकीं ९०४७ व ९०३७ ओंव्या आहेत. प्रस्तुत छापलेल्या मुकुंदराजाच्या प्रतींत अध्यायवार ओंवीसंख्या अशी आहे:—

| अध्याय | | | ओंव्या | अध्याय | | | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | .... | .... | २७३ | २ | .... | .... | ३७४ |
| ३ | .... | .... | २७१ | ४ | .... | .... | २२२ |
| ५ | .... | .... | १७८ | ६ | .... | .... | ४९४ |
| ७ | .... | .... | २०५ | ८ | .... | .... | २६९ |
| ९ | .... | .... | ५३० | १० | .... | .... | ३१० |
| ११ | .... | .... | ६९८ | १२ | .... | .... | २४४ |
| १३ | .... | .... | ११६३ | १४ | .... | .... | ३७१ |
| १५ | .... | .... | ५९३ | १६ | .... | .... | ४७२ |
| १७ | .... | .... | ४३१ | १८ | .... | .... | १७९१ |

८८९२

## सोनारी प्रतींतील ओवीसंख्या

● **५६.** वाईस एका सोनाराच्या येथें सांपडलेली ज्ञानेश्वरीची एक प्रत आहे तींत ओंव्या **सोनारी प्रतींतील** अध्यायवार येणेंप्रमाणें आहेत :-

**ओवीसंख्या.**

| अध्याय | | | ओंव्या | अध्याय | | | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | .... | .... | २९९ | २ | .... | .... | ४३६ |
| ३ | .... | .... | ३५१ | ४ | .... | .... | २५४ |
| ५ | .... | .... | २२० | ६ | .... | .... | ५३९ |
| ७ | .... | .... | २३६ | ८ | .... | .... | २९३ |
| ९ | .... | .... | ६१७ | १० | .... | .... | ४७१ |
| ११ | .... | .... | ७५९ | १२ | .... | .... | २७२ |
| १३ | .... | .... | ११८६ | १४ | .... | .... | ४६४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | .... | .... | ६१४ | १६ | .... | .... | ५२९ |
| १७ | .... | .... | ४६८ | १८ | .... | .... | १८६३ |

९८५१

## भराड्याच्या प्रतींतील ओंवीसंख्या

● ५७. अकलूज येथील एका भराड्यापाशीं एक ज्ञानेश्वरीची पोथी होती तींत ओंवींसंख्या येणेंप्रमाणें होती :-

**ओंवीसंख्या.**

| अध्याय | | | ओंव्या | अध्याय | | | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | .... | .... | ३२२ | २ | .... | .... | ४८८ |
| ३ | .... | .... | ३१८ | ४ | .... | .... | २६७ |
| ५ | .... | .... | २०९ | ६ | .... | .... | ५४४ |
| ७ | .... | .... | २३९ | ८ | .... | .... | २९८ |
| ९ | .... | .... | ५६९ | १० | .... | .... | ३७९ |
| ११ | .... | .... | ७६२ | १२ | .... | .... | २६६ |
| १३ | .... | .... | १२०५ | १४ | .... | .... | ४१३ |
| १५ | .... | .... | ६२० | १६ | .... | .... | ४९७ |
| १७ | .... | .... | ४६१ | १८ | .... | .... | १८८७ |

९७३४

## उद्‌बोधनाथी प्रतींतील ओंवीसंख्या.

● **५८.** वाई येथें उद्‌बोधनाथसंप्रदायी खेडकर हरिदास आहेत त्यांच्याजवळील प्रतीकांच्या पोथींत ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांची संख्या ९०३४ आहे. ही प्रत संप्रदायपरंपरेनें आलेली आहे, असें हरिदास ह्मणतात.

## माडगांवकरी छापील प्रतींतील ओंवीसंख्या

● **५९.** रा. रा. माडगांवकर यांनीं एक पाठांतरें देऊन ज्ञानेश्वरी छापिली आहे; परंतु जशीं प्रसिद्ध करावी तशी जाहीररीतीनें प्रसिद्ध केली नाहीं. तिची एका प्रत कै. काशीनाथपंत परब यांनीं मला दिली. ही प्रत तयार करतांना माडगांवकर यांनीं क, ख, ग, घ, च, छ, ज, झ, ट, ठ, ड, अशा एकंदर ११ निरनिराळ्या प्रती पाठान्तरांकरितां जमविल्या होत्या. पैकीं नव्याजुन्या किती, वगैरेंचा तपशील त्यांनीं दिला नाहीं. त्यांनीं आपल्या प्रतीला उपोद्घात वगैरे कांहीं च माहिती दिली नाहीं. त्यामुळें अकरा हि प्रतींत सारख्या च ओंव्या होत्या किंव प्रत्येक प्रतींतील ओंवीसंख्या निरनिराळी होती, यासंबंधानें कांहीं च सांगता

अनुक्रमणिका

येत नाहीं. प्रायः ओंवीसंख्या निरनिराळ्या पोथ्यांत भिन्नभिन्न असली च पाहिजे, असें मजजवळील पन्नास पोथ्यांवरून मी खात्रीनें सांगूं शकतों. माडगांवकरांनीं हा प्रपंच केला नसल्यामुळें त्यांनी छापिलेल्या प्रतींतील च तेवढ्या ओंव्यांची संख्या येथें देतों.

| अध्याय | | | ओंव्या | अध्याय | | | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | .... | .... | २७५ | २ | .... | .... | ३७५ |
| ३ | .... | .... | २७६ | ४ | .... | .... | २२५ |
| ५ | .... | .... | १८० | ६ | .... | .... | ४९७ |
| ७ | .... | .... | २१० | ८ | .... | .... | २७१ |
| ९ | .... | .... | ५३५ | १० | .... | .... | ३३५ |
| ११ | .... | .... | ७०८ | १२ | .... | .... | २४७ |
| १३ | .... | .... | ११७० | १४ | .... | .... | ४१५ |
| १५ | .... | .... | ५९८ | १६ | .... | .... | ४७३ |
| १७ | .... | .... | ४३३ | १८ | .... | .... | १८११ |

९०३४

## निळोबाच्या मतें ओंवीसंख्या.

● **६०.** निळोबाच्या गाथेंतील ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांची संख्या दहा हजार आहे.

तया स्थळीं केला भगवद्‌गीताअर्थ ।
दहासहस्त्र ग्रंथ पूर्ण झाला ॥९७॥
ज्ञानेश्वरचरित्र, निळोबाकृत ॥

## चिद्धनमतें ओंवीसंख्या; भारद्यांच्या प्रतींतील ओंवीसंख्या; क्षपक; (सोनारी प्रतीतींल क्षेपक ओव्या); एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती; केवळ बिनअस्सल म्हणज नक्कल पोथ्या ताडून ग्रंथांचें मूळ निर्भेळ स्वरूप सिद्ध होत नाहीं.

● **६१.** चिद्धनस्वामी भक्तकथामृतसारांत

करी नवसहस्त्र पन्नास (९०५०) ।
ओंवी गीतार्थ ज्ञानेश्वरी ॥ १४६,

अध्याय ९ (भिंगारकर)

**भारद्यांच्या प्रतींतील ओंवीसंख्या**

अनुक्रमणिका

भारद्यांच्या पोथीतील ओवीसंख्या ९००९ आहे.

**क्षपक**

● **६२.** येणेंप्रमाणें निळोबाच्या १०००० पासून मुकुंदराजाच्या ८८९२ पर्यंत निरनिराळ्या पोथ्यांत ओंवीसंख्या आहे. पैकीं, मुकंदराजाच्या पोथीतील ८८९२ चा आंकडा मूळ धरणें कालदृष्ट्या व भाषादृष्ट्या प्रशस्त च नव्हे, तर आवश्यक आहे. ह्या ८८९२ हून जेवढ्या ओंव्या जास्त सांपडतील तेवढ्या सर्व क्षेपक होत. परीक्षेकरितां प्रस्तुत प्रतींतील पहिला अध्याय घेतों व सोनारी प्रतींतील पहिला अध्याय घेतों, आणि, सोनारीं प्रतींतील क्षेपक ओंव्या संस्कृत श्लोकांच्या व मराठी ओंव्यांच्या अनुक्रमानें देतों. निळोबाची दहाहजार ओंव्यांची प्रत मला उपलब्ध झाली नाहीं. सबब, तिच्या खालोखाल ओंव्यांची संख्या मजजवळील सोनारी प्रतींत असल्याकारणानें तुलनेकरितां सोनारी प्रत च घेतली आहे.

| मुकुंदराजाच्या प्रतींतील कोणत्या ओंवीनंतर | | सोनारी प्रतींतील क्षेपक ओंवी किंवा ओंव्या आंकड्यासह. |
|---|---|---|
| | | **क्षेपक :–** |
| **२८ व्या ओंवी नंतर** | (१) | कीं ज्ञानामृताची सरीता ।<br>मुमुक्षसाधकां तृषितां ।<br>अज्ञानदारिद्रें पीडतां ।<br>कामधेनु हे ॥२९॥ |
| **१०० व्या ओंवी नंतर** | (२) | जो विक्रमें महामेरु ।<br>तेजस्वी प्रतापें भास्करु ।<br>जयाचीया बळा नेणवे पारु ।<br>ऐसा वीर ॥१०२॥ |
| **१४८ व्या ओंवी नंतर** | (३) | आधीं च बळाचा महामेरु ।<br>वरि अवलंबीला अवसरु ।<br>येणें काळासीं ही हीमज्वरु ।<br>प्रगटों पाहे ॥१५०॥ |
| **२७३ व्या ओंवी नंतर** | (२५) | जे उत्तरमीमांसा उपनिषदें ।<br>तीयें मथुनीयां मुकुंदें ।<br>निरुपिजैल आनंदें ।<br>पार्थु जेणें उमजे ॥२८७॥ |
| **२७३ व्या ओंवी नंतर** | (२६) | वेदीं त्रिकांडनिरोपण ।<br>कर्म उपासना ज्ञान ।<br>तें स्वयें ची कृष्ण आपण ।<br>बोधिति पार्थासी ॥२८८॥ |

माडगांवकरांच्या प्रतींत खालील दोन ओंव्या क्षेपक आहेत.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **२४१ व्या ओंवी नंतर** | ऐसें पार्थ तिये अवसरीं ।<br>ह्मणे देवा अवधारीं ।<br>या कल्मषाची थोरी ।<br>सांगैन तुज ॥२४२॥ |
| **२६५ व्या ओंवी नंतर** | ऐसें देखोनि सकल ।<br>अर्जुनें आपुलें कुळ ।<br>मग ह्मणे राज्य तें केवळ ।<br>निरयभोग ॥२६७॥ |

सोनारी प्रतींतल्या शेवटल्या तीन ओंव्या कुंट्यांनीं पहिल्या अध्यायांत क्षेपक ह्मणून नमूद केल्या आहेत.

माडगांवकरांच्या प्रतीच्या पहिल्या अध्यायांतल्या दोन्ही क्षेपक ओंव्या सोनारी प्रतींत पाठभेदानें आल्या आहेत.

**एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती.**

मजजवळील इतर सर्व पोथ्यांच्या पहिल्या अध्यायांतील क्षेपक सोनारी प्रतींतील क्षेपकांत आले आहेत. ज्याअर्थी सोनारी प्रतींत ओवीसंख्या ९८५१ आहे व निळोबाच्या प्रतींत १०००० ओंव्या होत्या, त्याअर्थी निळोबाच्या प्रतींत सोनारी प्रतींतल्याहून १४९ क्षेपक जास्त होते, हें उघड आहे. तंजावरी प्रतींत ओंव्या ९०४७ आहेत, तेव्हां तींत १५५ क्षेपक मुकुंदराजाच्या प्रतीहून जास्त आहेत. तंजावरची प्रत एकनाथाच्या प्रतीनंतर ९ वर्षांनीं ह्मणजे शक १५१५ त तयार केली असल्यामुळें, एकनाथाच्या प्रतींत सुमारें ९०४७ ओंव्या असाव्या, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. भारद्यांच्या प्रतीप्रमाणें एकनाथी प्रतींत ९००९ ओंव्या होत्या असें जरी धरलें, तरीं हि एकनाथाच्या प्रतींत ११७ क्षेपक राहिले च होते, असें ह्मणावें लागतें. ह्मणजे एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. क्षेपक असलेल्या पोथ्या एकनाथाच्या हातांत पडल्या, व भाषा, औचित्य, पुनरुक्ति, असंभव, वगैरे प्रमाणांनीं त्यानें आपली प्रत आपल्या समजुतीप्रमाणें शुद्ध करून घेतली. परंतु, इतकें हिं करून आपल्या शुद्ध केलेल्या प्रतींत क्षेपक राहिले नसतील च, अशी खात्री त्याची त्याला च पटली नाहीं. सबब, उद्विग्न होऊन त्यानें खालील शापोक्ति प्रकट केली:—

> या ज्ञानेश्वरीपाठीं । जो टीका करील मऱ्हाटी ।
> तेणें रत्नखचिताच्या ताटीं । जाण नरोटी ठेविली! ॥१॥

पाठीं ह्मणजे नंतर, असा अर्थ कित्येक अप्रबुद्ध करतात! पाठीं ह्मणजे पाठांत, ओंव्यांत. ज्ञानेश्वरीच्या मूळ ओंव्यांत जो कोणी आपल्या टीकारूप ओंव्या करून समासावर लिहून ठेवील, त्यानें रत्नखचित ताटाच्या भोंवतीं नरोट्या ठेविल्यासारखें होईल, असा एकनाथाचा शाप आहे. आणि हा शाप अक्षरशः खरा होता. ज्ञानेश्वरीनंतर कोणी ओंव्या करूं नयें, असा नाथांचा आशय नाहीं. तर, ज्ञानेश्वरीच्या पोथीच्या पानांच्या समासांवर ज्ञानेश्वरी वाचतांना तल्लीन होऊन कित्येक लोक ज्यास्त विशदीकरणार्थ

अनुक्रमणिका

स्फूर्तीनें टीकारूप ओंव्या भाविकपणानें व प्रेमानें लिहून ठेवीत. ह्या ओव्या नकल करणारे लेखकलोक मूळांत अज्ञानानें घुसडून देत. त्यामुळें, मूळ कोणतें व प्रक्षिप्त कोणतें, तें हिं कळण्याची मारामारी क्वचित् प्रसंगीं पडे. ह्या घोंटाळ्याला अनुलक्षून नाथांनीं ही शापोक्ति प्रगट केली आहे. मजजवळील ज्ञानेश्वरीच्या पोथ्यांवरून प्रक्षेपांचा समावेश निरनिराळ्या प्रतींत कसा झाला, तें उत्तम कळतें. एका पोथीच्या समासावर टीका ह्मणून जी ओंवी लिहिली असते, ती च दुसऱ्या एखाद्या तत्पश्चात्क पोथींत मूळांत प्रविष्ट केलेली आढळते. तशांत, हुबेहूब ज्ञानेश्वराच्या धर्तीवर जर ओंवी बनली गेली असेल, तर ती मूळ ओंव्यांतून निवडून काढण्यास पंचाईत पडते. सुप्तिङंतरूपें, शब्द, औचित्य, वगैरे साधनांनीं प्रक्षेप निवडून काढितां येतील. परंतु, हीं साधनें शोधक संपादकाच्या हातीं समग्र असलीं पाहिजेत. अशीं साधनें एकनाथाच्या कालीं उपलब्ध नव्हतीं, हें तर काय, परंतु, तीं सध्यां हि असावीं तशीं उपलब्ध नाहींत. आतां इतकें खरें आहे कीं, ज्ञानेश्वराच्या पूर्वीचे व वेळचे मराठी शिलालेख व ताम्रपत्रें सध्यां उपलब्ध झालीं आहेत. त्यांवरून ज्ञानेश्वरीची भाषा कशी असली पाहिजे हें सूक्ष्म रीतीनें सांगतां येईल. परंतु, ज्ञानेश्वरकालीन शब्दकोश अद्याप मराठींत तयार व्हावयाचा आहे. त्यामुळें, अमूक शब्द ज्ञानेश्वरींत येऊं शकेल किंवा शकणार नाहीं, हें सांगण्यास साधन नाहीं. तसें च, धर्मकोश, दृष्टान्तकोश, इतिहासकोश, वगैरे कोशांचा आपल्याकडे अभाव असल्यामुळें, ज्ञानेश्वरोत्तरकालीन पोथ्यांतील प्रक्षेप निवडून काढणें सध्यां देखील प्रायः दुर्घट आहे. एकनाथाच्या वेळीं, तर सर्वस्वीं च दुर्घट होतें. तशांत, फक्त १००-१५० च क्षेपक त्यानें आपल्या प्रतींत येऊं दिलें ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. साक्षात्, मुकुंदराजाची पोथी मला न मिळती, तर भाषा, शब्द, औचित्य, पुनरुक्ति वगैरेंच्या जोरावर एकनाथाच्या इतकी हि शुद्ध प्रत मला तयार करतां आली नसती. आली असती कीं नसती, ह्या शंकेची केवळ कल्पना च करावयाला नको.

**केवळ बिनअस्सल म्हणज नक्कल पोथ्या ताडून ग्रंथांचें मूळ निर्भेळ स्वरूप सिद्ध होत नाहीं.**

मूळ अस्सल प्रत उपलब्ध नसतां, अकरा पोथ्यांची तुलना करून, माडगांवकरांनीं जी ओंवीसंख्या दिली आहे, तींत १४२ क्षेपक राहिले च आहेत. मूळ अस्सल प्रत किंवा प्रतीची प्रत उपलब्ध नसतां, कोणत्या हि ग्रंथाचा मूळ मजकूर नक्की अमुक होता, हें अगदीं बिनचुक ठरवितां येणें केवळ अशक्य आहे. जुन्या ग्रंथकारांच्या Variorum editions यूरोपियन विद्वान लोक काढतात, त्यांच्या शुद्धाशुद्धतेची परीक्षा ह्या न्यायानें च केली पाहिजे. भारतासारख्या ग्रंथांना हि हा च दंडक लागू आहे. अस्सल प्रतीच्या अभावी, वाटेल त्यानें वाटेल तो भाग प्रक्षिप्त समजावा व त्याच्या मरतुकड्या बलावर वाटतील तीं अनुमानें काढावीं. शास्त्रदृष्ट्या दोहोंची हि किंमत शून्य आहे. स्यात्पक्ष सदा डळमळित च असतो.

## नकलकारांनीं मूळ ज्ञानेश्वरीची छाटाछाट केलेली नाहीं; प्रक्षेपांनीं भरती केली आहे.

● **६३.** सच्चिदानन्दबावानें लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रतींत क्षेपकांची उत्तरोत्तर जास्त भरती झाली; परंतु मूळ ओंव्या काढून टाकून कमती मात्र कोणत्या हि पोथींत झालेली दिसत नाहीं. चुकून एखाददुसरी मूळ ओंवी लेखकानें गाळलेली पोथ्यांतून आढळते. पण, जाणूनबुजून ज्ञानेश्वरी ओंवी मूळ ग्रंथांतून काढून टाकण्याचें धार्ष्ट्य कोण्या हि लेखकानें केलेलें आढळत नाहीं, कारण, भक्तिमार्गी लोक ज्ञानेश्वराच्या शब्दाला केवळ ईश्वरीवचन समजत आणि विद्वान जे असत त्यांना मुळाची सहृदयता असे. त्यामुळें, मूळ ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांत कटाई झालेली नाहीं. झालें काय? तर, टीकाकारांच्या समासावर लिहिण्याच्या खोडीनें, मूळग्रंथांत क्षेपकांची खोगीरभरती मात्र जास्त झाली. ओंव्यांचा अनुक्रम एखाद्या

पोथींत बदललेला आढळतो. ह्मणजे मागची पुढें व पुढची मागें, असा व्युत्क्रम दृष्टीस पडतो. परंतु, सबंद ओंवी किंवा ओंव्या गाळलेल्या कोणत्या हि सबंद पोथींत आढळत नाहींत.

ज्ञानेश्वरीच्या पाठांत क्षेपक ओंव्या कोणी नवीन करून घालूं नये, असा निर्बंध ज्यानें केला त्या एकनाथानें स्वतः क्षेपक ओंव्या रचून ज्ञानेश्वरींत घातल्या नाहींत, हें उघड च आहे. परंतु, कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, "एकनाथानें ज्ञानेश्वरीच्या बऱ्याच ओंव्यांतील चरणांची फिरवाफिरव केली आहे" (भिंगारकर, ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय, पृष्ट ७२-७३). भिंगारकरांनीं अशा चरणांची फिरवाफिरव केलेल्या ह्मणून चार ओंव्या दिलेल्या आहेत. त्या चाऱ्ही मुकुंदराजी प्रतींत नाहींत व त्यांची त्या त्या स्थलीं आवश्यकता हि नाहीं. पांचव्या अध्यायांतील "बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान" इत्यादिक ओंवीसंबंधानें भिंगारकर असा प्रश्न करतात कीं, ही ओंवी प्रक्षिप्त समजली तर श्लोकाच्या टीकेची ज्ञानेश्वरकृत मूळ ओवी कोणती ती दाखवून दिल्याशिवाय ही ओंवी नवी किंवा जुनी याचा नीटसा खुलासा होणार नाहीं (भिंगारकर, पृष्ठ ७२-७३). परंतु, मुकुंदराजी प्रतीवरून पहातां, प्रत्येक श्लोकांतील, प्रत्येक पदाची टीका ज्ञानेश्वर हटकून करतो च, असें ह्मणतां येत नाहीं. उदाहरणार्थ, दुसऱ्या अध्यायांतील १८ व २० या श्लोकांवरील ज्ञानेश्वरी टीका पहा. १८ व्या श्लोकांतील अनाशिनः व अप्रमेयस्य ह्या दोन पदांचें भाषान्तर ज्ञानेश्वरानें दिलें नाहीं. २० व्या श्लोकांतील एका हि पदाचें भाषान्तर ज्ञानेश्वरी टीकेंत नाहीं. २१ व्या श्लोकाची हि ही च दशा आहे. ह्मणजे, जेथें, विशेष कांहीं भानगड नाहीं, प्रायः पुनरुक्ति व गौरव आहे तेथें ज्ञानेश्वर प्लुति करतो. तो च प्रकार पांचव्या अध्यायांतील तद्बुद्धयः इत्यादि श्लोकाचा झाला आहे. मूळ श्लोकांतील प्रत्येक पदाचा अर्थ ज्ञानश्वरानें दिला नाहीं. सर्व टीका दृष्टान्तांनीं च भरून काढिली आहे. प्रत्येक श्लोकांतील प्रत्येक पदाचें भाषांतर ज्ञानेश्वर नियमानें देतो च, अशी जर गोष्ट असती, तर भिंगारकरांचें ह्मणणें सयुक्तिक दिसलें असतें. तशी गोष्ट नाहीं, त्याअर्थी ही “बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान” इत्यादिक ओंवी प्रक्षिप्त आहे व ती एकनाथांनीं केली आहे, असें हि ह्मणवत नाहीं. मजजवळ कोंकणांतील मालवण शहरीं सांपडलेली एक पोथी आहे, तींत ह्या प्रक्षिप्त ओवीचा पाठ असा आहे:—

> बुद्धिनिश्चये आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावि आपणाआपण।
> ब्रह्मनिष्ठा राखे पुर्ण। अहिर्णिशि ॥८८॥

तत्परायण हें पद ह्या पाठांत नाहीं. तेव्हां, ह्या अशा पाठाच्या ओंवीवर एकनाथित्व हि आरोपितां येत नाहीं.

माहित असलेले सर्व क्षेपक मूळांत घालण्याचा सोनारी प्रतीचा तर बाणा च आहे. त्या प्रतींत ही ओवी नाहीं. हिच्या ऐवजीं.

> अनुभवें बुद्धि भरुनी। भोगवीती मना करुनी।
> मग तें चि इंद्रियभुवनीं। वर्षाव करीती ॥११६॥

अशी ओंवी आहे. सोनारी प्रत एकनाथाच्या नंतरची आहे. तिच्यांत ज्या अर्थी "बुद्धिनिश्चयें" ही ओंवी नाहीं त्याअर्थी ही ओंवी एकनाथाची तर नव्हे च, परंतु, एकनाथकालीन हि नाहीं. कोणी नंतर रचिलेली आहे. ह्या ओवीचा पाठ दोन तऱ्हांचा सांपडतो. एकनाथी चार चरणांचा व चार यमकांचा एक पाठ; आणि साडेतीन

अनुक्रमणिका

चरणांचा दुसरा पाठ. तस्मात्, एकनाथानें हा प्रक्षेप घातलेला नाहीं, ह्यानिषयीं शंका नको. इतकें च नव्हे, तर एकनाथानें ज्ञानेश्वरींत एक हि प्रक्षेप घातलेला नाहीं, हा नियम समजावा.

## (प्रस्तुत मुकुंदराजी प्रत व माडगावकर-प्रत यांतील काही पाठांची तुलना); तौलनिक पध्दतीनें मूळाचा थांग नक्की लागतोच असे नाही.

● **६४.** अस्सल प्रतीच्या अभावीं, निव्वळ दहा पांच पोथ्या घेऊन प्रक्षिप्ताप्रक्षिप्त निवडण्यांत जसें फारसें ह्मणण्याजोगें यश येत नाहीं, तसें च ह्या पद्धतीनें मूळप्रतींची मूळ अस्सल भाषा हि नक्की ठरविणें दूरापास्त होतें. माडगांवकरांनीं अकरा निरनिराळ्या प्रती घेऊन जे पाठ ठरविले आहेत, ते मुकुंदराजाच्या प्रतींतील मूळपाठांशीं ताडून पाहिले असतां, वरील विधानाची सत्यता प्रतीत होईल. सबब, कांहीं पाठ दोन्ही प्रतींतीलं घेऊन तुलना करतों.

| **अध्याय पहिला** ओवी | **मुकुंदराज** | **माडगांवकर** | **माडगांवकरांच्या टिपांतील पाठान्तरें** | |
|---|---|---|---|---|
| ४ | रेखा | देखा | देखां | (१) |
| ४ | टेव | ठेव | ० | (२) |
| ५ | तिये | तें | तियें-तीं | (३) |
| ६ | पद्यबंध | पदबंध | ० | (४) |
| ७ | तिया | त्या | ० | (५) |
| ९ | व्यासादिकांचिया | व्यासादिकांची | व्यासादिकांचिया | (६) |
| ९ | तिया | ते | ० | (७) |
| १० | विसंवादें | विसंवाद | विसंवादें | (८) |
| १३ | सत्तर्कवादु | सत्कारवादु | ० | (८ अ) |
| २४ | जालेयां | जालियां | जालेयां | (९) |
| २५ | कृतकार्या | कृतकार्या | कृतकार्य | (१०) |
| २८ | कलाकौतुकां | सकळां कौतुकां | सकळकौतुका | (११) |
| ३० | वसैठ | वसौठ | विशिष्ट | (१२) |
| ३२ | आविष्करौनि | आविष्करोनि | आदिकरूनि | (१३) |
| ३३ | महाकाव्या रा | हा ॐकाव्यां रावो | शास्त्रां | (१४) |
| ३५ | सिहाणें | शाहणें | ० | (१५) |
| ३५ | प्रेम | प्रमेय | ० | (१६) |
| ४० | सुखाडलें | सुरवाडलें | ० | (१७) |
| ४१ | नागरां | नागरा | नागरां | (१८) |
| ४२ | आगली | आगळी | ० | (१९) |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२ | देआवें | द्यावें | परिसणेया | (२०) |
| १०९ | काज | कां जें | ० | (२१) |
| ११३ | जूझती | जुंझती | ० | (२२) |
| ११५ | तेया | तया | ० | (२३) |
| ११९ | ॐइचिलें | वरचिलेनि | ० | (२४) |
| १२५ | रायाचेयाबोला | राजयाचिया बोला | राजाचेया | (२५) |
| १५६ | रासौभा | सडा | ० | (२६) |
| १६६ | बाणवारि | बाणवरि | ० | (२७) |
| १७० | सकलै | सकळ | ० | (२८) |
| १७१ | आपणपेयां | आपणयां | आपणयांतें | (२९) |
| २६४ | आतां इया वेन्हिं जें जिआवें ।<br>तेयापासौनि हें बरवें<br>जे शस्त्रें संडौनु साहावे ।<br>बाण एयांचे ॥२६४॥ | | आतां यावरी जें ज्यावें । जिआवें ।<br>तयापासौनि हें बरवें ।<br>जें शस्त्रें सांडूनि साहावे ।<br>बाण यांचे ॥२६५॥ | (३०) |

स्पष्टीकरण :—

(१) माडगांवकर, कुंटे, साखरे, वगैरेंच्या प्रतींत देखा, देखां असा पाठ आहे. ह्या पाठानें बरोबर अर्थ लागत नाहीं. अंगिकभाव हें नाम आहे. तें अवयव किंवा स्मृति या शब्दांशीं जोडतां येत नाहीं. व्याकरण आड येतें. साखऱ्यांच्या प्रतींत कांहीं तरी गडबडगुंडा केला आहे. २ ऱ्या ओंवीपासून १९ व्या ओंवीपर्यंत रूपक आहे. त्यांत,

१ देव=गणेश
२ शब्दब्रह्म=गणेशमूर्ति
३ वर्ण=वपु
४ स्मृति=अवयव
५ रेखा=अंगिकभाव
६ अर्थशोभा=लावण्याची टेव
७ पुराणें=मणिभूषणें
८ पदपद्धति=खेवणें
९ पद्यबंध=अंबर
१० साहित्य=वाणें
११ काव्यनाटकें=क्षुद्रघंटिका
१२ पदें=रत्नें
१३ मती=पल्लवसडका
१४ षड्दर्शनें=साहाभुजा
१५ तर्क=परशु (१ भुजा )
१६ न्याय=अंकुश (२ ” )
१७ वेदान्त=मोदक (३ ” )
१८ भग्नदंत=बौद्धमतसंकेतु (४ ” )
१९ वरदहस्त=सत्तर्कवाद (५ ” )
२० अभयहस्त=धर्मप्रतिष्ठा (६ ” )
२१ शृंडादंड=विवेक
२२ समग्रदंत=संवाद

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | सूक्ष्मेक्षणु=उन्मेष | २७ | उपनिषदें=कुसुमें |
| २४ | दोन्ही-मिमांसा=दोनी कान | २८ | अकार=चरणयुगुल |
| २५ | मुनि=अलि | २९ | उकार=उदर |
| २६ | द्वैताद्वैत=दोनीं गंडस्थलें | ३० | मकार=मस्तक |

असें हें गणेशदेवाचें रूपक आहे. त्यांत नंतर उपमानांना जशीं उपमेयें आहेत, तसें, देखा हा पाठ ३ ऱ्या ओंवींत घेतला असतां, अंगिकभाव ह्या उपमानाला उपमेय उपलब्ध होत नाहीं. तेव्हां, रेखा हा च मुकुंदराजाच्या प्रतींतील पाठ प्रशस्त आहे. रेखा ह्मणजे काव्यरचना. अंगिक ह्मणजे इंद्रियांसंबंधीं, अवयवांसंबंधीं. भाव ह्मणजे अवयवांच्या द्वारा विकारांचें प्रदर्शन. हां रेखा शब्द चवथ्या अध्यायाच्या २१५ व्या ओंवींत व सहाव्या अध्यायाच्या १८ व्या ओंवींत आला आहे.

जें साहित्य आणि शांती । हे रेखा दिसे बोलती ॥ अध्याय ५, ओवी २१५ ॥
नवल बोलतिये रेखेची वाहाणी । अध्याय ६, ओवी १८॥

ह्या दोन्ही स्थलीं रेखा ह्या शब्दाचा अर्थ काव्यरचना असा आहे. रेखा हा पाठ घेऊन, पहिल्या अध्यायांतील ह्या चौथ्या ओवीच्या प्रथमार्धाचा अर्थ असा:—

गणेशा! स्मृती ह्या तुझे अवयव आहेत व काव्यरचना ही तुझ्या मनांतील विकारांची व विचारांची अवयवद्वारा प्रदर्शक आहे.

माडगांवकरांच्या टीपांत हि हा पाठ नाहीं. मजजवळील सोनारी प्रतींत रेखा असा च पाठ आहे.

(२) माडगांवकरादि प्रतींत ठेव असा पाठ आहे. तो पाठ घेऊन अर्थ असा होतो. तेथ ह्मणजे अवयवरूप ज्या स्मृती त्यांच्या ठायीं, अर्थशोभा ही लावण्याचा साठा आहे. स्मृतींचा जो अर्थ तो लावण्याचा साठा कसा समजावयाचा?आतां मुकुंदराजाच्या प्रतींतील टेव पाठ घेऊन काय अर्थ होतो तो पहा. टेव ह्मणजे नखरा. तेथ ह्मणजे आंगिकभावरूप जी काव्यरचना तिच्या ठायीं, अर्थशोभा ही सौंदर्याच्या नखऱ्याप्रमाणें आहे. काव्य ह्मणजे प्रतिभोत्पदित ग्रंथरचना.

(३) माडगांवकरांचा तें हा पाठ व्याकरणदृष्ट्या दुष्ट आहे. 'त' ह्या सर्वनामाचें नपुंसकलिंगीं प्रथमेचें एकवचन तें. 'तें' हें 'मणिभूषणें' ह्या नपुंसकलिंगीं प्रथमेच्या अनेकवचनाचें विशेषण होऊं शकणार नाहीं. 'त' ह्या सर्वनामाचें नपुंसकलिंगीं प्रथमेचें अनेकवचन ज्ञानेश्वरकालीं 'तियें' असें होत असे. तेव्हा 'तियें' हा पाठ शुद्ध आहे व तो च मुकुंदराजाच्या प्रतींत आहे. माडगांवकरांनीं टीपेंत पाठभेदांत 'तियें' हा शुद्ध पाठ दिला आहे व 'तें' हा अशुद्ध पाठ मूळांत स्वीकारला आहे.

(४) पद्यबंध व गद्यबंध असे दोन प्रकारचे बंध साहित्यशास्त्रांत सांगितले आहेत. पैकीं पद्यबंधांना रंगीत छताची उपमा ज्ञानेश्वरांनीं दिली आहे. पदबंध ह्या सामाजिक शब्दाला कांहीं अर्थ च नाहीं. पदबंध हा जर एकप्रकारचा बंध ह्मणजे प्रबंध समजला, तर दुसऱ्या प्रकारचा बंध कोणता? प्रत्ययबंधाचा! तात्पर्य, पदबंध हा अपपाठ आहे. माडगांवकरांच्या टिपांत हि हा किंवा इतर कोणता हि पाठभेद दिलेला नाहीं.

अनुक्रमणिका

(५) ‘त’ ह्या सर्वनामाचें स्त्रीलिंगी प्रथमेच्या अनेकवचनाचें रूप ‘तिया’ असें ज्ञानेश्वरकालीं होत असे. सबब, ‘त्या’ हा अपपाठ आहे, कारण व्याकरणदुष्ट आहे.

(६) व्यासादिकांच ह्या विशेषणाचीं प्रथमेचीं रूपें अशीं होत:—

पु. प्र. ए. व्यासादिकांचा
न. प्र. ए. व्यासादिकांचें
स्त्री. प्र. ए. व्यासादिकांची
पु. प्र. अ. व्यासादिकांचे
न. प्र. अ. व्यासादिकांचीं
स्त्री. प्र. अ. व्यासादिकांचिया

मती ह्या अनेकवचनी रूपाचें विशेषण व्यासादिकांचिया हें अनेकवचनी रूप आहे. “व्यासादिकांची” हें एकवचनी रूप व्याकरणदुष्ट आहे. माडगांवकरांच्या प्रतींत ही सबंद ओंवी वाकडीतिकडी व अशुद्ध छापिली आहे.

(७) ‘तिया’ हें पल्लवसडका या अनेकवचनी स्त्रीलिंगी शब्दाचें विशेषण आहे. सबब, ‘ते’ हें रूप दुष्ट.

(८) तृतीया एकवचन हवें. हात विसंवाद धरीत नाहींत, तर विसंवादानें शस्त्रें धरतात. विसंवादें ह्मणजे एकमेकाच्या विरुद्ध. षड्दर्शनांपैकीं प्रत्येक दर्शन इतर दर्शनाच्या विसंवादी ह्मणजे विरुद्ध आहे, असा ज्ञानेश्वरांचा आशय.

(८ अ) सत्कारवाद कोणता? विसंवादी तर्क वर उल्लेखिला च आहे. येथें सत्तर्कांचें मंडण आहे.

(९) जालियां हें रूप व्याकरणदुष्ट आहे. जालेयां हें रूप येथें शुद्ध आहे.

(१०) कृतकार्यवान्= कृतकार्यां. [‘कृतकार्यवान्= कृतकार्यां’ हें समीकरण बरोबर नाहीं. याविषयीं मोडकशास्त्री म्हणतात, “त्यांचे (म्ह. राजवाडे यांचे) मतें आँ-चें मूळ वान् हा प्रत्यय आहे. पण हें म्हणणें मुळींच ठरत नाहीं. मूळ संस्कृताच्या दृष्टीनेंच कृतकार्यवान् हें रूप गचाळ व त्याज्य आहे. कर्मधारयानंतर वान्-प्रत्ययाचा निषेध संस्कृत व्याकरण करितें.” [भाइसंमं. त्रै; १५.१.१५]] कृतकार्यां हें रूप व्याकरणदुष्ट. वान् प्रत्ययान्त सर्व संस्कृतरूपें ज्ञानेश्वरींत प्रथमेच्या एकवचनीं पुलिंगी आँकारान्त होतात.

(११) मुकुंदराजी पाठ स्पष्ट व चांगला आहे, हें दिसलें च आहे.

(१२) वसति + स्थ = वसइ + ठ्ठ = वसैठ (विशेषण), वसैठा-ठी-ठें. वसैठा असें पुल्लिंगी रूप ह्या च अध्यायाच्या २२८ व्या ओंवींत आलें आहे. वसौठ हें रूप व्युत्पत्तिदुष्ट आहे.

(१३) करउन-नि-नियां-नु अशीं अपभ्रंशांतील रूपें. त्यांचीं करुन-नियां-नु, अथवा करौन-नि-नियां-नु अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीं होत. करोन-नि-नियां-हीं ओयुक्त रूपें ज्ञानेश्वरकालीं अस्थानक होत. ओयुक्त रूपें पुढें तीनशें वर्षांनीं प्रचारांत आलीं.

अनुक्रमणिका

(१४) मुकुंदराजी पाठ प्रशस्त आहे, हें उघड आहे.

(१५) जीव्=जीवाण (वर्तमानकालवाचक धातुसाधित)
शिक्ष्=शिखाण=सिहाण, णा-णी-णें.
शहाणें हें रूप ज्ञानेश्वरोत्तरकालीन आहे, ज्ञानेश्वरकालीन नाहीं.

(१६) मुकुंदराजी पाठ प्रशस्त दिसतो च आहे.

(१७) सुखाडलें ['सुरवाडलें' हाच पाठ बरोबर आहे. ज्ञानेश्वरींत व तत्कालीन इतर वाङ्मयांत 'सुरवाड' हा शब्द नेहमीं येतो. त्याचा अर्थ समृद्धि, उत्कर्ष, ऐश्वर्य, सुकाळ असा असून तो सु-वृद्धि किंवा सुर्वृद्धि (सं. दुर्वृद्धि या शब्दाच्या अनुकरणाने) या संस्कृत शब्दापासून व्युत्पादिता येतो. हा शब्द 'सुरवाड' आहे, 'सुखाड' नाहीं, हे श्री. नेने यांनीं यमकांच्या पुराव्यानें व तौलनिक पहाणींने स्पष्ट केलें आहे. (संशोधनलेखसंग्रह, भा. २, पृ. ३९-४०).] हा पाठ मुकुंदराजी असून, मजजवळील ज्ञानेश्वरीच्या प्राचीन कोशांत आहे. ख मधील र आणि व हीं दोन अक्षरें निराळीं करून सुरवाडलें असा अपपाठ बनला आहे. सुख पासून क्रियापद सुखाडणें.

(१८) नगरवान्=नागरवां=नागरां.

(१९) अग्र=अग्ग=आग+ल (स्वार्थक), ला, ली, लें. ल चा ळ हा उच्चार ज्ञानेश्वरोत्तरकालीन आहे. मुकुंदराजाच्या सबंद पोथींत ळ हा उच्चार बिलकुल नाहीं.

(२०) द्यावें हें रूप व्युत्पत्तिदुष्ट आहे.
घेयावें, देआवें, नेआवें, अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीं होत.

(२१) काज हें प्रश्नार्थकसर्वनाम ज्ञानेश्वरकालीं होतें. त्याच्या दोन्ही अक्षरांचा विभाग करून 'कां जें' असा अपपाठ बनला. अर्थात् अर्थ हि अनर्थावह झाला.

(२२) युद्ध=जुज्झ=जूझ. जू वर अनुनासिक किंवा अनुस्वार ज्ञानेश्वरकालीं नव्हता.

(२३) तया हें रूप ज्ञानेश्वरकालीन व्याकरणाच्या दृष्टीनें दुष्ट आहे. तेहाचा, तेआचा तेयाचा, हीं रूपें ज्ञानेश्वरकालीं व चांगदेवकालीं प्रचलित होतीं.

(२४) अव+ईषत्=ओइच; ओइच+इल्ल=ओइचिल्ल=ओइचिल,
ला-ली-लें. ओइचिलें ह्मणजे अत्यंत थोडें.

(२५) रायाचा (पु.) = रायाचेया (पु. च. ए.) बोला (पु. च. ए.) रायाची (स्त्री.) =रायाचिया (स्त्री. सप्तमी एकवचन)

तेव्हां बोला ह्या पुल्लिंगी चतुर्थीच्या एकवचनी रूपापाठीमागें स्त्रीलिंगी रायाचिआ हें विशेषणरूप येणें व्याकरणदृष्ट्या दुष्ट आहे.

अनुक्रमणिका

(२६) राशि - उद्भ्रम = रासि – उष्भवं = रास + उष्भा = रासौभां = रासौभा. रास मोडून वाऱ्यानें पखलण जी होते तिला रासौभा ह्मणतात. रासौभा हा शब्द कळतनासा होऊन समासावर सडा असा जो त्या शब्दाचा अर्थ दिला होता, तो च मूळांत लेखकांनीं प्रविष्ट केला.

(२७) बाणरूप पाण्याचा पाऊस पाडूं लागले, तेव्हां, 'बाणवारि' हा पाठ योग्य आहे. 'बाणवरि' हा पाठ सर्वथा अशुद्ध आहे.

(२८) सर्वै, सकलै, दोघै, अशीं, रूपें ज्ञानेश्वरकालीं होतीं.

(२९) आपण ह्याचें भाववाचक नाम आपणपें, त्याचें चतुर्थीचें एकवचन आपणपेंयां.

आपण ह्याचें चतुर्थीचे नपुंसकलिंगीं एकवचन आपणआं, आपणयां. पैकीं मुकुंदराजी पाठ आपणपेयां हा अर्थाला उचित आहे.
[३०] माडगांवकरांची ही सबंद ओंवी व्याकरणदुष्ट आहे व अशा व्याकरणदुष्ट ओंव्या त्यांच्या प्रतींत शेकडों आहेत.

## (प्रस्तुत मुकुंदराजी प्रत व माडगावकर-प्रत यांतील काही पाठांची तुलना); तौलनिक पद्धतीनें मूळाचा थांग नक्की लागतोच असें नाही.

येणेंप्रमाणें माडगांवकरांच्या तौलानिक प्रतींत हजारों अपपाठ आहेत. इतकेंच नव्हे, तर व्याकरणदृष्ट्या एथून तेथून सर्व प्रत दुष्ट आहे. कुंटे, साखरे, वगैरेंच्या प्रतींसंबंधानें, तर बोलावयाला च नको. जसा एखादा पारशी किंवा युरोपीयन मराठी भाषा लिंग, वचन, विभक्ति वगैरेंचा चुथडा करून बोलतो, त्याच धर्तीवर, कुंटे, साखरे, माडगांवकर वगैरेंच्या आधुनिक प्रतींत अपभ्रष्ट मराठी भाषा योजिलेली आहे. हे ज्ञानेश्वरकालीन व्याकरण ज्याला समजलें त्याच्या प्रतीतीस सहज येईल. ती प्रतीती यावी व ज्ञानेश्वरकालीन शुद्ध मराठी भाषा कशी होती, हें कळावें, एतदर्थ ही मुकुंदराजी प्रत छापिली आहे.

मूळ प्रत उपलब्ध नसतां, इतर किती हि प्रतींची तुलना करून मूळ पाठ ठरविण्याचा प्रयत्न केला. तत्रापि मूळपाठ अमुक च असेल, हे निश्चयानें सांगतां येत नाहीं, हें वरील यादीवरून स्पष्ट आहे. प्रायः असें हि होऊं शकतें कीं, मूळपाठ टिपांत रहातो व अपपाठ मुख्य ग्रंथांत विराजमान होतो. Variorum edition काढण्यांत हा चमत्कार अपरिहार्य असतो. कालिदासादि संस्कृतप्राकृत नाटककारांच्या नाटकांच्या अनिश्चितकालीन दहा पांच पोथ्या घेऊन तौलनिक प्रती बनविल्या असतां, मूळग्रंथकाराच्या मूळप्रतीपासून त्या किती अपभ्रष्ट असूं शकतील तें माडगांवकरांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीवरून चांगलें ध्यानांत येतें.

## ज्ञानेश्वरीचे अपभ्रष्ट पाठ व त्या पाठांचीं भ्रामक भाषान्तरें; आठल्यांचें भाषान्तर; व्याकरणदृष्ट्या भाषान्तरांची दुष्टता

● **६५.** सारांश, आजपर्यंत जेवढ्या ह्मणून ज्ञानेश्वरीच्या प्रती छापिल्या गेल्या आहेत, त्या सर्व अशुद्ध व अविश्वसनीय आहेत. तत्रापि, त्या लोकांत प्रचलित आहेत. सध्यां भक्तिमार्गी लोक इतके गचाळ झाले आहेत कीं व्याकरण, व्युत्पत्ति, इतिहास, शास्त्र यांची त्यांना बिलकुल पर्वा राहिलेली नाहीं. वाटेल तें

चिताड त्यांच्या हातीं दिलें व तें ज्ञानेश्वराचें, नामदेवाचें किंवा तुकारामाचें आहे असें सांगितलें ह्मणजे तें त्यांना शिरसामान्य होतें. खरें, खोंटें, विश्वास्य, अविश्वास्य हा भेदभाव ते करीत नाहींत त्यामुळें झालें आहे काय कीं, त्यांना ज्ञानेश्वरीचा खरा अर्थ हि कळतनासा झाला आहे. कोल्हापूरचे भावे, पनवेलचे आठल्ये, व पुण्याचे भिडे ह्यांनीं ज्ञानेश्वरीचा अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु स्पष्टपणें सांगावयास कांही हरकत दिसत नाहीं कीं, हे सर्व व्याख्याते अथपासून इतिपर्यंत अपव्याख्यान करीत गेलेले आहेत. पैकीं, आठल्यांचें भाषान्तर अगदीं कुचकामाचें व कवडीमोल आहे. त्यापेक्षां भावे यांचे भाषांतर किंचित् बरें ह्मणतां येईल. आणि साखरेबावांच्या तोंडचें ह्मणून ज्यास रा. भिडे नामाभिधान देतात तें ह्या दोहींपेक्षां शुद्ध आहे. परंतु, तिन्ही भाषान्तरांसंबंधानें असें ह्मणावें लागतें कीं, ह्या तिही गृहस्थांना घेतलेली कामगिरी बिनचुक बजावण्याचा अधिकार आलेला नव्हता. ह्या विधानाची सत्यता भासमान होण्याकरितां, ज्ञानेश्वरीची अगदी पहिली ओंवी घेतों, तिचा ह्यांनीं काय अर्थ केला आहे तो देतों व ह्यांच्या चुका कोठें झालेल्या आहेत तें दाखवितों. भावें यांचें भाषान्तर आतां मागसलें असल्यामुळें, त्याची परीक्षा येथें करीत नाहीं.

**आठल्यांचें भाषान्तरः—** हे मूळ, अनादि, वेदप्रतिपादित, ओंकाररूप परमेश्वरा! तुला नमस्कार असो. हे आपल्या आपण जाणणाऱ्या आत्मस्वरूपा! तुझा जयजयकार असो.

**भिड्यांचें भाषान्तरः—** हे निर्गुणब्रह्मा आत्मरूपा, तूं सर्वांचा आदि असून तुझें वेदांनीं वर्णन केलेलें आहे व तुझ्या स्वरूपास जाणणारा तूं स्वतः च आहेस. तुला माझा नमस्कार असो; आणि तुझा जयजयकार होवो.

**आठल्यांचें भाषान्तर**

पैकीं, आठल्ये यांच्या भाषान्तरांतील प्रत्येक शब्द चुकलेला आहे. (१) प्रथम, ते नामरूपरहित जें परब्रह्म त्याला परमेश्वर ह्या नांवानें संबोधतात. (२) दुसरें, परब्रह्माला ते अनादि ह्मणतात. (३) तिसरें, तें वेंदांनीं प्रतिपादित आहे, असा भ्रम त्यांनीं करून घेतला आहे. आणि (४) चौथें, परब्रह्म आपल्याआपण जाणणारें आहे, असा दुर्ग्रह त्यांच्या ठायीं झालेला आहे. आतां, ह्या चारी विधानांपैकीं एक हि विधान सशास्त्र नाहीं. (१) परमेश्वर ही कोटी परब्रह्माहून निराळी, खालच्या दर्जाची व तत्पश्चात्क आहे, हें सर्वश्रुत च आहे. ह्या ओंवींत परमेश्वराचें नांव नाहीं, इतकेंच नव्हे, तर परब्रह्माचें हि नांव नाहीं. कारण, परब्रह्माचें जर नांव घ्यावें तर तें सगुण ह्मणजे नामरूपसहित होतें. सबब, ज्ञानेश्वरांनीं ह्या सबंद ओंवींत त्याचा नामनिर्देश केला नाहीं. एवढेंच नव्हे, तर तत् ह्या सर्वनामानें हि त्याचा उल्लेख केला नाहीं. ज्ञानेश्वरांचीं हीं सर्व धोरणें आठल्यांनीं झुगारून दिलीं आहेत व आपले गाढ अज्ञान प्रकट केलेलें आहे. (२) प्रपंच, माया, परमेश्वर, ह्या कोटींना अनादि हें विशेषण लावतात. कारण प्रपंच हा अनादि व अनंत असून, केवळ व्यक्तमध्य आहे. तत् ही वस्तु सर्वत्र व सर्वदा आद्य च असणार. तिला अनादि हें विशेषण लावणें अयुक्त आहे. (३) ही निर्गुण वस्तु आजपर्यंत कोणाला हि संपूर्ण कळलेली नाहीं. कळण्याचा प्रयत्न पुष्कळांनीं केलेला आहे. त्या प्रयत्न करणाऱ्यांपैकी च वेद होत. त्यांना हि ती आकळलेली नाहीं. सबब, ज्ञानेश्वरांनीं वेदप्रतिपाद्य असा शब्द योजलेला आहे. वेदप्रतिपादित असा शब्द मुद्दाम योजला नाहीं. परब्रह्म जर वेदांनीं प्रतिपादित केलें असेल, तर तें वेदांहून गौण ठरूं लागेल. वेदांनीं एवढें च केलें आहे कीं, परब्रह्माचें प्रतिपादन करण्याचा प्रयत्म केलेला आहे. ह्या पलीकडे त्यांनीं कांहीं केलेलें नाहीं. एवढ्या च करितां, ज्ञानेश्वरांनीं प्रतिपादित हा शब्द टाळलेला आहे. तो दुष्ट शब्द आठल्यांनीं अंधदृष्टीनें मुद्दाम कवटाळला आहे. सद्वस्तूचें आकलन करतां करतां वेद टेंकीस आले, असे उद्गार ज्ञानेश्वरींत व अमृतानुभवांत अनेक स्थलीं आहेत. (४) स्वसंवेद्या या

पदाचा तर शब्दार्थ हि आठल्यांस झाला नाहीं. स्वसंवेद्या ह्मणजे आपल्याआपण जाणणाऱ्या, असा अनर्थ आठल्ये च करूं जाणोत. सत् चित् च आहे. त्याला आपलें संवेदन आपण च करण्याची कोणती अपेक्षा आहे? काय त्याचें संवेदन कधीं लोप पावलें होतें कीं तें पुनरपि करून घेण्याचें त्याला कारण पडावें? काय साखर कधीं कडू झाली होती कीं तिनें आपली गोडी आपण च चाखून पहाण्याचें मनांत आणावें? तर, असें विपरीत कदापि होणें नाहीं. संवेद्य कोणाला? इतरांना, स्वतःला नव्हे. स्व ह्मणजे जीवात्मा, त्याला संवेदन होण्याचा विषय. तें संवेदन हि संपूर्ण होईल च असा भाग नाहीं. ज्याचें संवेदन, ज्या सद्वस्तूचें संवेदन करून घेण्याचा प्रयत्न जीवात्म्यानें करणें संभाव्य आहे, अशा तद्वस्तूला, असा स्वसंवेद्या ह्या पदाचा अर्थ आहे. चित् संबंधानें नाना कोट्या ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवांत केलेल्या आहेत. त्यांचा जर परिचय आठल्यांनीं करून घेतला असता, तर ते असे बरळते ना. स्व आणि पर असे दोन प्रकारचे आत्मे कल्पिलेले आहेत. ह्यांना च जीवात्मा व परमात्मा अशा संज्ञा आहेत. संवित् ही दोघांना सामान्य आहे. ह्या संविद्द्वारा जीवात्म्याला परमात्म्याशीं ऐक्य होण्याचा संभव असतो. संवित्प्रतीति न झाली, तर ऐक्य होण्याचा ह्मणजे परमात्मसंवेदन होण्याचा मार्ग खुंटतो. हें सर्व लक्ष्यांत घेऊन ज्ञानेश्वरांनीं स्वसंवेद्य हें पद योजिलेलें आहे; आणि त्याला पोषक ह्मणून आत्मरूपा असें पद घातलें आहे. जीवात्म्यानें संवेद्य कां, तर जीवात्मा व परमात्मा हे दोन्ही हि आत्मरूप ह्मणजे आत्मा च आहेत. आत्मा एव आत्मरूपः। जीवात्मा व परमात्मा हा भेद भ्रांतिमूलक आहे. ती भ्रांति उडून गेली म्हणजे दोन्ही एक च आहेत, अशी प्रतीति होते. सारांश, ह्या ओवींत एक कारणपरंपरा गोविली आहे. सद्वस्तु आद्य आहे; कारण, अनादि जे वेद त्यांनीं तिची प्रतिपत्ति करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु, तो प्रयत्न सफल झालेला नाहीं. कां कीं ही सद्वस्तु जीवात्म्याला च संवेद्य आहे, इतरांना नाहीं. कां तर, जीवात्मा व परमात्मा आत्मरूप आहेत.

**भिड्यांचें भाषान्तर**

आठल्यांच्या इतका घोटाळा भिड्यांनीं केलेला नाहीं. त्याला कारण सद्गुरुमुख. नानाबोवा साखरे यांच्यासारख्यांच्या व्याख्यानाच्या श्रवणानें भिडे किंचित् ताळ्यावर राहिलेले दिसतात मात्र. परंतु, अनधिकारित्वास्तव ते हि ह्या ओंवीचा अर्थ करतांना भ्रांत झालेले आहेत. "तुझें वेदांनीं वर्णन केलेलें आहे", असें संपूर्ण-क्रिया-द्योतक वाक्य भिड्यांनीं योजिलें असून, "तुझ्या स्वरूपास जाणणारा तूं स्वतः च आहेस" असें हि वाक्य योजून स्वमुखदर्शनदोष ते आठल्यांच्या प्रमाणें च करतात. आठल्यांच्याप्रमाणें अनादि, परमेश्वर, वगैरे बाष्कळ शब्द मात्र ते योजीत नाहींत. हा सद्गुरुसंगतीच्या सातत्याचा परिणाम. ह्या ओंवींत कारणपरंपरा आहे, ह्याची प्रतीति भिड्यांना हि झालेली दिसत नाहीं.

**व्याकरणदृष्ट्या भाषान्तरांची दुष्टता**

वेदान्तशास्त्रानभिज्ञतेच्या मुळें ओंवीचा अर्थ भाषान्तरकारांना कसा लागला नाहीं, त्याचा हा तपशिल झाला. आतां व्याकरणानभिज्ञतेस्तव त्यांच्या चुक्या कशा झाल्या आहेत तें दाखवितों.

ॐ नमो आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय स्वसंवेद्या। आत्मरूपा ॥१॥

अशी ओवी आहे. अन्वय :— आद्या वेदप्रतिपाद्या नमो; स्वसंवेद्या आत्मारूपा जय. येथें नमो व जय हीं रूपें आज्ञार्थी द्वितीयपुरुषाचीं अनेकवचनाचीं आहेत.

अनुक्रमणिका

| संस्कृत | प्राकृत | अपभ्रंश | मराठी |
| --- | --- | --- | --- |
| नमत | नमह | नमहु | नमूँ, नमो |
| जयत | जयह | जयहु | जयूँ, जयो, जय |

नम् व जी ह्या धातूंचीं रूपें ग्रंथारंभीं नांदींत आणण्याचा परिपाठ प्राकृत व संस्कृत ग्रंथांत अनेक स्थलीं आढळतो. गाथासप्तशतींत, सेतुबंधांत व कर्पूरमंजरींत नांदींत नमह व जअइ हीं रूपें आलीं आहेत. नमह-नमहु-नमो ह्मणजे तुह्मीं नमस्कार करा. जय ह्या धातूचा अर्थ मराठींत “कोणासाठीं तरी जयशब्द उच्चारणें” असा झाला आहे. उदाहरणार्थ, जय शंकरा (शंकराचा जयकार करा). तेव्हां, पहिल्या ओवीचा व्याकरणदृष्ट्या अर्थ असा :—

“आद्या वेदप्रतिपाद्या नमस्कार करा; स्वसंवेद्या आत्मरूपाचा जयकार करा;” ज्ञानेश्वर श्रोत्यांना स्वहितार्थ आद्याला नमस्कार व प्रणाम करावयाला सांगतात व त्याचा जयकार करावयास सांगतात.नांदींत श्रोत्यांना इष्टदेवतेला नमस्कार करण्यास सांगण्याची चाल संस्कृत व प्राकृत नाटकांत व काव्यांत आहे. ती च परंपरागत चाल ज्ञानेश्वरांनीं उचललेली आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी श्रोत्यांना उद्देशून मुद्दाम लिहिलेली आहे; स्वतःला उद्देशून लिहिलेली नाहीं. एतद्विषयक उल्लेख ज्ञानेश्वरींत अनेक आहेत; बहुतेक प्रत्येक अध्यायांत आहेत. तेव्हां, ह्या ओंवींतील क्रियापदें द्वितीयपुरुषीं अनेकवचनीं आज्ञार्थी आहेत, हें ठीक च आहे.

आठल्ये व भिडे परब्रह्माला सांगतात कीं, तुझा जयजयकार असो! परब्रह्माचा जयजयकार नव्हता कधीं, कीं तुझा जयजयकार असो, असा आशीर्वाद कवीनें त्यास देण्याचें धार्ष्ट्य व औद्धत्य करावें. “तुला नमस्कार असो” (आठल्ये), “तुला माझा नमस्कार असो.” (भिडे), ह्या हि भाषान्तराला हा च दोष लागतो. शिवाय ग्रंथकर्त्यानें आपण एकट्यानें च नमस्कार करण्यापेक्षां, श्रोत्यांसह नमस्कार करणें जास्त सौजन्याचें आहे. ज्ञानेश्वर, तर, सौजन्याचे केवळ पुतळे च होते. तेव्हां त्यांच्या तोंडून, तुला माझा नमस्कार असो, अशी उद्धत वाणी कदापि हि निघावयाची नाहीं.

वेदान्तशास्त्रदृष्ट्या व व्याकरणदृष्ट्या आठल्ये, भिडे, कुंटे व माडगांवकर ह्यांच्या प्रतींत असे हजारो दोष आहेत. मासल्याकरितां, एका च ओंवींतील दोष दाखविले. जास्त दाखविण्यास प्रकृत स्थलीं अवकाश नाहीं. शिवाय, हे दोष दाखविण्याचें काम हरिभक्तिपरायण भिंगारकरबुवा याणीं केसरींत अनेक वेळां केलेलें आहे. भारदे उर्फ भारद्वाज ह्यांच्या चर्पटपंजरीचा, तर, त्यांनीं “ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षिप्त चरित्र” या टीकाप्रबंधांत चांगला च धुव्वा उडविला आहे. आठल्यांच्या चुक्या हि त्यांनीं अन्यत्र चांगल्या दाखविलेल्या आहेत. ह्या गृहस्थांनीं जर ज्ञानेश्वरीच्या अर्थाचें पुस्तक छापलें, तर, ज्ञानेश्वरीच्या नांवावर चिताड व गचाळ बाडें भक्तिमार्गी लोकांत जो खोट्या वेदान्ताचा व भोळेपणाचा प्रसार करतात त्याला कांहीं आळा पडून ऐतिहासिक व प्रागतिक मार्गाला भक्तिमार्गी लोक लागतील.

● **६६.** प्रस्तुत मुकुंदराजी प्रतींत प्रत्येक श्लोक त्या श्लोकावरील ओंव्यांच्या मध्यें कोठें तरी लिहिला आहे. आधुनिक प्रतींत मूळ संस्कृत श्लोक प्रथम देऊन, नंतर त्याच्यावरील टीकाओव्या देण्याचा जो प्रघात दिसतो, तो मूळचा ज्ञानेश्वराचा नाहीं. ज्ञानेश्वरांनीं ओवीबंधांत ज्ञानेश्वरी अशी रचिली कीं मूळ संकृत श्लोक मुळीं च न दिला, तत्रापि व्याख्यानाच्या ओघाला तुटकपणा येऊं नये. अलीकडील कित्येक

अनुक्रमणिका

पोथ्यांत दर प्रतीकाच्या व पदाच्या नंतर ज्ञानेश्वरी टीका ओव्यांचे तुकडे पाडून सुद्धां दिलेली असते. हा हि प्रकार मूळ ज्ञानेश्वराचा नव्हे. हे सर्व चोचले आधुनिक आहेत.

● **६७.** प्रस्तुत प्रतींत मूळ संस्कृत श्लोकांचे पाठ प्रचलित गीतेच्या पाठांहून कोठें कोठें भिन्न सांपडतात. त्यांची याद खालीं देतों. [ही यादी येथें वगळली आहे. त्याची कारणे राजवाडे यांच्या विवेचनात च अंतर्भूत आहेत.]

ज्यांच्या पाठीमागें नक्षत्राचें चिन्ह काढलें आहे त्यांखेरीज बाकीचे सर्व पाठभेद उच्चाराचे आहेत. सनक्षत्र पाठभेदांपैकीं हि बरे च पाठभेद उच्चाराचे च पाठभेद असावे, असें ह्मणतां येईल. उदाहरणार्थ, शी बद्दल शि, ये बद्दल ए, च्य बद्दल च. काशिराजः, एषां, चवंति, हे पाठभेद उच्चाराचे पाठभेद न समजले, तर ते स्वतंत्र पाठभेदांत गणले जातील. लेखकाला उच्चार करण्याची ती स्वभावसिद्ध व देशसिद्ध सवंय होती तिच्या अनुरोधानें त्यानें हे उच्चारपाठ दिले आहेत. ह्या उच्चारपाठांचें वर्गीकरण येणेंप्रमाणें करतां येतें.

(१) ऋ बद्दल रु. जसें, ऋते बद्दल रुते
(२) ए बद्दल ऐं.जसें, वेत्ति बद्दल वैत्ति
(३) निरनुनासिकाबद्दल सानुनासिक. जसें, इव बद्दल इवँ आणि मे बद्दल में
(४) स, श व क्ष ह्यांच्या पूर्वी विसर्गलोप. जसें, एभिसर्वं, भक्त श्रद्धया, उच्चैश्रवस
(५) रेफानंतर द्वित्त. जसें, कीर्त्ति, धर्म्म, कर्म्म, तैर्द्दत्तान्.
(६) च्य बद्दल च. जसें, चवंति
(७) च्छ बद्दल छ. जसें, गछति
(८) द्ध बद्दल त्ध. जसें, योगात्धनंजय
(९) द्धय बद्दल ध्य. जसें, युध्य
(१०) ध्य बद्दल द्धय. जसें युद्धयस्व
(११) ब बद्दल व. जसें, किल्विषं
(१२) श बद्दल ष. जसें, गुडाकेषः
(१३) श बद्दल स. जसें, अशक्तः बद्दल असक्तः
(१४) रु बद्दल ऋ.जसें, अशृ
(१५) ष बद्दल जसें दुःपूर
(१६) स बद्दल श. जसें, सृष्टं बद्दल शृष्टं
(१७) त्त्व बद्दल त्व. जसें, तत्त्व बद्दल तत्व
(१८) श्च बद्दल स्य. जसें, पूज्यश्च बद्दल पूज्यस्य.

हे पाठभेद किंवा उच्चारभेद लेखकानें चुकून केले आहेत, असें नाहीं. त्याच्या वेळची व प्रांतांतली सामान्य मंडळी जे उच्चार करीत, ते ह्या लेखकानें नमूद केले आहेत. मुकुंदराजी ज्ञानेश्वरींतील संस्कृत श्लोकांतल्या अक्षरांचे जे उच्चार वर नमूद केले आहेत, त्यावरून संस्कृत उच्चारांचा अपभ्रंश गोदावरीतीरीं शक १२०० च्या सुमारास कसा होत असे, तें कळण्याचें एक उत्कृष्ट साधन उपलब्ध झालें आहे.

## ज्ञानेश्वरींत फारसी शब्द नाहींत

अनुक्रमणिका

●६८. मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत ह्मणजे कोणत्या हि ज्ञानेश्वरीच्या विश्वसनीय व अप्रक्षिप्त प्रतींत फारसी शब्द आढळत नाहींत. [वरील विधान अगदी शंभर टक्के बरोबर नाही. कारण यादवकालातील कोरीव लेखांतून काही फारसी शब्द आढळत असल्याने ज्ञानेश्वरींतही एखाददुसरा फारसी शब्द असणे शक्य आहे.] ज्ञानेश्वरी शक १२१२ त रचली गेली व त्यानंतर मुसलमानांचा महाराष्ट्राला स्पर्श झाला. तत्पूर्वी यद्यपि शंभर वर्षे ह्मणजे शक ११०० पासून नर्मदेपलीकडे मुसुलमानांचें राज्य सुरू झालें होतें. तत्रापि महाराष्ट्राला व मराठी भाषेला मुसुलमानी व फारसी शब्दांचा स्पर्श झाला नाहीं. तो शक १२०० नंतर पांच पन्नास वर्षांनीं मुसुलमानी अंमल जारी झाल्यावर झाला. अर्थात्, ज्ञानेश्वरींत फारसी शब्द साहजिक च आढळत नाहींत. इंग्रजी भाषेच्या स्पर्शासंबंधानें असा च प्रकार झालेला आढळतो. बंगाल, मद्रास वगैरे देशांत यद्यपि इंग्रजांचा अंमल बसून पन्नास शंभर वर्षे लोटलीं, तत्रापि इंग्रजी शब्द मराठींत शक १७३९ नंतर येऊं लागले. तत्पूर्वी गोलंदाज, कडाबीन, पलटण, वगैरे कांहीं डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे लष्करी शब्द मराठींत आले, परंतु इंग्रजी शब्द आले नाहींत. कारण उघड आहे. मराठ्यांच्या लष्करांत ज्या खालच्या प्रतीच्या यूरोपियन शिपायांचा संबंध आला ते प्रथम प्रथम प्रायः पोर्तुगीज, डच, फ्रेंच वगेरे असत, इंग्रज नसत. शक १२०० पूर्वी मुसुलमानी शिपायांचा प्रवेश कल्याणी येथील चालुक्यांच्या व देवगिरीच्या यादवांच्या सैन्यांत झाला असावा, असें ह्मणण्यास पुरावा आहे. शक १०५१ त लिहिलेल्या अभिलषितार्थचिंतामणींत आठ प्रकारचें सैन्य वर्णिलेलें आहे; त्यांत म्लेच्छ सैन्याचा उल्लेख आहे. म्लेच्छ ह्मणजे मुसुलमान. अर्थात्, कदाचित् कांहीं लष्करी शब्द मराठी भाषेंत शक १०५१ च्या सुमारास आले असण्याचा संभव आहे. खुद्द अभिलषितार्थचिंतामणींत च तेजी (घोडा) हा फारसी शब्द आला आहे. हिंगु, पोतास वगैरे यावनी शब्द ह्याच्या हि पूर्वी हिंदुस्थानांतील प्राकृत व अर्थात् संस्कृत भाषांत व्यापारसंबंधानें प्रचलित झाले होते. हा पोतास शब्द यावनी आहे, फारसी नाही; व हा फार प्राचीन कालापासून संस्कृत भाषेंत प्रविष्ट झाला आहे. तेव्हां हा पोतास शब्द ज्ञानेश्वरींत सांपडला असतां, तो फारसी ह्मणून गणण्यांत हाशील नाहीं. निशाण, दादर, वखार मोहरें, हेवा वगैरे शब्द भिंगारकर यवनी ह्मणजे फारसी समजतात. परंतु, ते अस्सल मराठी आहेत. संस्कृत निःसाण ह्मणजे नगारा. ह्याचा मराठी अपभ्रंग निसाण, निशाण. हा पटहार्थक निशाण शब्द फारसी निशान (ध्वजपताका) शब्दासारखा च उच्चारांत आहे. परंतु, ह्या दोहोंत अर्थभेद आहे. मराठी निशाण ह्मणजे नगारा व फारसी निशान [ण] ह्मणजे ध्वजपताका. संस्कृत दरदर=प्राकृत दादर. दर = विवर. संस्कृत वर्षागृह = प्राकृत वर्खाअर = मराठी वखार. संस्कृत मुखहर = प्राकृत मुहअर = मराठी मोहर (रा, री, रें). संस्कृत ह्वयन् = हिअवा = मराठी हेवा. हेवा = मनींची उत्कट ओढ. सारांश, ज्ञानेश्वरींत फारसी किंवा अरबी शब्द नाहींत.

## (मराठी भाषेच्या ऐतिहासिक व्याकरणाचे सूतोवाच)

● ६९. ज्याअर्थी मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत फारसी शब्द नाहींत त्याअर्थी ज्ञानेश्वरकालीन ह्मणून नांवाजलेल्या कोणत्या हि अस्सल लेखांत प्रायः फारसी शब्द येणें दुर्मीळ आहे. तशांत, फारसी उभयान्वयी अव्ययें ज्या ज्ञानेश्वरकालीन ह्मणविणाऱ्या लेखांत येतील तो लेख अर्वाचीन ह्मणजे मुसुलमानी रियासतीतला बिनधोक समजावा. उदाहरणार्थ, भिंगारकरकृत "श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व चरित्र" ह्या निबंधाच्या ६० व ६१ या पृष्ठांवर दिलेलीं शक ११२९ व शक ११३५ सालचीं दोन्हीं पत्रें अस्सल नसून बनावट आहेत. कारण त्या दोन्हीं लेखांत फारसी 'कीं' हें उभयान्वयी अव्यय आलें आहे. फारसींत के असें उभयान्वयी अव्यय आहे त्याचें मराठी की, कीँ. हें कीँ अव्यय रामदास व शिवाजी यांच्यानंतर मराठींत रूढ झालें. ज्ञानेश्वरकालीं व ज्ञानेश्वराच्या पूर्वी फारसी 'कीं' किंवा इंग्रजी that या उभयान्वयी अव्ययाच्याबदला जे, जैं असें उभयान्वयी अव्यय नियमानें योजीत. ह्या 'कीं' खेरीज, भिंगारकरांच्या ह्या दोन्ही पत्रांत इतर आणीक अशीं शेकडों रूपें आहेत कीं त्यांच्यावरून ह्या पत्रांचा बनावटपणा स्पष्ट करून

अनुक्रमणिका

दाखवितां येईल. भिंगारकरच्या पत्रांतील हीं शेकडों रूपें आधुनिक व बनावट कां, हें नीट लक्ष्यांत येण्यास, मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण अथवा नुसतें ज्ञानेश्वरीचें व्याकरण चिकित्सक वाचकांपुढें मांडलें पाहिजे. मराठी भाषेचें हें ऐतिहासिक व्याकरण येथें च द्यावयाचें.परंतु, मराठी भाषेच्या स्थित्यंतरांची त्रोटक हकीकत व मुकंदराजी पोथीचा तपशील देतां देतां च फार विस्तार झाला. सबब, ऐतिहासिक व्याकरण पुढील भागावर टाकणें अपरिहार्य आहे. तोंपर्यंत सरस्वतीमंदिरादि मासिक पुस्तकांतील मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणावरील माझे निबंध जिज्ञासूंना एतत्प्रकरणीं बरे च उपयोगाचे होतील असें वाटतें.

## (प्रस्तुत ग्रंथाची दुखंडी योजना)

● **७०.** ज्ञानेश्वरींत एकंदर जी ओवीसंख्या आहे तिचा सरासरीनें निम्मा भाग पहिल्या बारा अध्यायांत येतो; आणि बाकीचा निम्मा भाग राहिलेल्या सहा अध्यायांत येतो. प्रस्तुत पहिला खंड ह्या पहिल्या बारा अध्यायांचा आहे. ह्या खंडाला दुर्बोध शब्दांच्या अर्थांची याद दिली आहे.

## (पुढील अभ्यासाच्या दिशा)

● **७१.** ज्ञानेश्वराचें चरित्र, नाथपंथाची हकीकत, ज्ञानेश्वराचा वेदान्त, भक्तिमार्गाच्या अनादिसिद्ध व ऐतिहासिक परंपरेचें वर्णन, वगैरे अनेक विषयांवर बहुत विवेचन करण्यासारखें आहे. तें, ज्ञानेश्वरांचे इतर अस्सल जुने ग्रंथ मिळून छापण्याचा योग आल्यास, यथावकाश करतां येईल.

**॥ नटकृततांडवविकटाः पंडितटीकाः स्फुरंति गीतायां ॥**
**॥ रंभालास्यविलासा जयति ज्ञानेश्वरी तासु ॥**

* * *

अनुक्रमणिका

राजवाडे यांचे

ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण

अनुक्रमणिका

# ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण

[राजवाडें यांचे वरील व्याकरण "हा एक मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाचा पूर्वप्रयत्न आहे, पण माहिती अपुरी आहे," असा अभिप्राय झुल् ब्लोक यांनी व्यक्त केला होता (मराठी भाषेचा विकास-परांजपेकृत भाषान्तर, पृ. ५६).]

## ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण

१. ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेला स्थूल इतिहास सांगितला. येथें ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण देतों.

## प्रस्तुंत व्याकरणांतील प्रकरणें

२. व्याकरणांत खालील प्रकरणें येतील :—

१. वर्णेतिहास
२. आदेशेतिहास
३. नामविभक्तिप्रत्ययेतिहास
४. क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास
५. निपातेतिहास.

पैकी दुसऱ्या प्रकरणाचा, ह्मणजे आदेशेतिहासाचा प्रपंच शेवटीं करण्याचा विचार आहे. [हा विचार कल्पनेतच राहून गेला. प्रत्यक्षात राजवाडे यांनी आदेशेतिहासाचा विचार केलेला नाही. तो पुढे स्वतंत्र पुस्तकरूपाने करण्याचा विचार त्यांनी या व्याकरणाच्या अखेरीस बोलून दाखविला आहे.] शब्दांतील कोणत्या हि वर्णाचा किंवा वर्णसमुदायाचा नाश करून त्याच्या स्थानीं जो नवा वर्ण येतो त्याला आदेश ह्मणतात. आर्यभाषा, पाणिनीय भाषा, प्राकृत भाषा, अपभ्रंश भाषा व मराठी भाषा, अशी परंपरा आहे. तेव्हा अपभ्रंशांतून मराठींत येत असतां, शब्दांतील कोणत्या वर्णाचा किंवा वर्णसमुदायाचा नाश होऊन तत्स्थानीं कोणत्या नव्या वर्णाचा आदेश होतो, त्याचा प्रपंच ह्या प्रकरणांत व्हावयाचा आहे. मराठी अपभ्रंशोत्पन्न असल्यामुळें, दृष्टि प्रायः अपभ्रंशापर्यंत पोहोंचवावयाची आहे. प्राकृत किंवा संस्कृत शब्दांशीं मराठी शब्दांतील वर्णांची तुलना करण्याचें मुख्य प्रयोजन नाहीं. ह्या आदेशप्रकरणाला च युरोपियन वैय्याकरण Phonology किंवा Phonetics ह्मणतात. [Phonology व Phonetics हे शब्द भिन्नार्थी आहेत. Phonology ह्मणजे कोणत्याहि भाषेच्या इतिहासात दिसून येणारे वर्णविकार, तर Phonetics ह्मणजे ध्वनिशास्त्र किंवा भाषेतील ध्वनींच्या निर्मितीचा व श्रुतीचा अभ्यास आणि त्यांचे विश्लेषण. परंतु पुष्कळदा हे दोन शब्द त्यांत भेद न करतां परस्परार्थी वापरले जातात. Phonetics, Phonology व Phoneme यांच्या ब्लूमफील्ड—कृत व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत :—]

**Phonetics:** The science, study, analysis and classification of sounds.

**Phonology:** The study of the changes & etc. of speech-sound during the history of a language or a dialect.

**Phoneme:** "A minimum unit of distinctive sound-feature."

अनुक्रमणिका

# प्रथमान्हिक

## ३. वर्णेतिहास

### वर्ण

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, [राजवाडे-मतानुसार दीर्घ ॠ-प्रमाणे दीर्घ ॡ- ही ज्ञानेश्वरीत नाही.] ए, ऐ, ओ, औ,— [सानुनासिक स्वर.] क्, ख्, ग्, घ्, ङ्, च्, छ्, ज्, झ्, ञ्, च्̂, छ्̂, ज्̂, झ्̂ ञ्̂, [या पाच दंत्यतालव्य व्यंजनांचे निराळेपण त्यांच्यावर ^ अशी खूण देऊन दाखविले आहे.] ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, त्, थ्, द्, ध्, न्, प्, फ्, ब्, भ्, म्, य्, र्, ल्, व्, श्, ष्,स्, ह्, :, [विसर्ग. (हा स्वतंत्र वर्ण आहे काय?)] असे ५२ वर्ण ज्ञानेश्वरींत आहेत.

## ४. स्वर

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, असे १२ स्वर आहेत.

(१) ऱ्हस्व अथवा एकमात्रक :— अ, इ, उ, ऋ, ऌ.

(२) दीर्घ अथवा द्विमात्रकः— आ, ई, ऊ, ए, ऐ,* ओ, औ [ ऐ (अ+इ) आणि औ (अ+उ) हे संयुक्त स्वर आहेत. त्यांचा समावेश इतर दीर्घ किंवा द्विमात्रक स्वरांत करतां येणार नाही. येथून पुढील स्वरप्रकारांची केवळ शक्यता सूचित केली आहे. हे स्वरांचे वर्गीकरण नव्हे.]

(३) प्लुत [ज्ञानेश्वरींत प्लुत स्वर आहेत व ज्ञानेश्वरींतील सर्व स्वर उदात्त, अनुदात्त व स्वरित असतात हीं राजवाड्यांचीं विधानें अ—वास्तव वाटतात. वरील स्वरप्रकार वैदिक भाषेंत असले तरी त्यानंतर लौकरच ते नाहीसे झाले.] अथवा त्रिमात्रक :— सर्व स्वर.

(४) उदात्त [ज्ञानेश्वरींत प्लुत स्वर आहेत व ज्ञानेश्वरींतील सर्व स्वर उदात्त, अनुदात्त व स्वरित असतात हीं राजवाड्यांचीं विधानें अ—वास्तव वाटतात. वरील स्वरप्रकार वैदिक भाषेंत असले तरी त्यानंतर लौकरच ते नाहीसे झाले.] :— सर्व स्वर.

(५) अनुदात्त [ज्ञानेश्वरींत प्लुत स्वर आहेत व ज्ञानेश्वरींतील सर्व स्वर उदात्त, अनुदात्त व स्वरित असतात हीं राजवाड्यांचीं विधानें अ—वास्तव वाटतात. वरील स्वरप्रकार वैदिक भाषेंत असले तरी त्यानंतर लौकरच ते नाहीसे झाले.] :—सर्व स्वर.

(६) स्वरित [ज्ञानेश्वरींत प्लुत स्वर आहेत व ज्ञानेश्वरींतील सर्व स्वर उदात्त, अनुदात्त व स्वरित असतात हीं राजवाड्यांचीं विधानें अ—वास्तव वाटतात. वरील स्वरप्रकार वैदिक भाषेंत असले तरी त्यानंतर लौकरच ते नाहीसे झाले.] :— सर्व स्वर.

(७) सानुनासिक :— सर्व स्वर.

(८) निरनुनासिक :— सर्व स्वर.

### इतिहास

(१) जसे आर्ष भाषेला स्वर आहेत, तसे च ज्ञानेश्वरी भाषेला आहेत. ज्ञानेश्वरी स्वरांत वाचीत व वाचतात. [या दृष्टीने ज्ञानेश्वरीतील पुढील ओवी सूचक आहे :— "तैसी गाणीव तें मिरवी । गीतेंविण रंगु दावी । ते लोभाचां बंधु ओवी । केली मियां ॥" (ज्ञा. १८.१७२०).] सध्यां हि पुराणिक पुराण, हरिदास कथा, आणि बायका वटसावित्री वगैरे कहाण्या स्वरांत सांगतात. सारांश, आर्षकालापासून आतांपर्यंत उदात्त, अनुदात्त व स्वरित अशा स्वरांत बोलण्याची परंपरा कायम आहे. इतकें च कीं वर्तमान मराठींत व्यवहारांतील गद्य बोलण्यांत स्वर फार माफक योजतात.

(२) संस्कृतांतील दीर्घ ॠ ज्ञानेश्वरी मराठींत नाहीं.

अनुक्रमणिका

(३) मराठींतील अनुनासिकाची परंपरा आर्षकालापासूनची आहे. एतत्संबंधीं विवेचन ग्रंथमाला मासिकपुस्तकांत साद्यन्त केलें आहे. [राजवाडे लेखसंग्रह, भा. २ (संकीर्ण निबंध), पृ. १८१. अनुनासिकविषयक या विवेचनाचे तात्पर्य राजवाडे पुढीलप्रमाणे सांगतात :– "पाणिनिकालीन संस्कृत, तदुत्तरकालीन महाराष्ट्री व महाराष्ट्रीच्या पुढें अर्वाचीन मराठी अशी ही जागती परंपरा आज तीन हजार वर्षे चालत आली आहे. दधिँ या शब्दांतील वैकल्पिक अनुस्वार पाणिनीच्या कालीं जसा संस्कृत भाषेंत होता, तसा च तो तदुत्तरकालीन महाराष्टींतील दहिँ ह्या शब्दांत होता, व तसा च तो अर्वाचीन दहीं ह्या मराठी शब्दांत आहे." (पृ. १९१)]

(४) ऋ, ॠ, ऌ, ऐ आणि औ हे पांच स्वर अपभ्रंशांत नव्हते. ज्ञानेश्वरी-मराठींत आहेत. अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास नष्ट झाला व त्या च सुमारास मराठी सुरू झाली.

मराठीच्या सुरवातीस भारतवर्षांत संस्कृताचें पुनरुज्जीवन झालें, आणि मराठींत संस्कृत वर्ण व शब्द शिरले. [वरील कलमातील काही विधाने विवाद्य आहेत. शक ४०० च्या सुमारास नष्ट झाला तो अपभ्रंश नव्हे, तर प्राकृत भाषा. किंबहुना अपभ्रंशाला जन्म देऊन त्या सुमारास प्राकृत लुप्त झाली. तसेच मराठीचा जन्मकाळही शक ४०० इतका मागे जाऊ शकत नाही. ज्या चिकुर्डे व मंगळवेढे ताम्रपटांच्या आधारे राजवाडे तो मागे नेऊ पहातात ते बनावट आहेत.]

## ५. व्यंजनें.

[व्यंजनांचे वरील वर्गीकरण सदोष आहे. उदा., 'ह्' हा महाप्राण असून त्याचा किंवा विसर्गाचा समावेश कंठ्य व्यंजनांत करणे योग्य नाही. तसेच, च्-वर्गातील इतर दंत्यतालव्यांप्रमाणे 'ञ्' – ला अस्तित्वच नाही. 'र्' आणि 'व्' हे अर्धस्वर आहेत. यापेक्षा पुढील प्रकारचे वर्गीकरण अधिक युक्त होईल :–

**कंठ्य :** क्, ख्, ग्, घ्.
**तालव्य :** च्, छ्, ज्, झ्.
**दंत्यतालव्य :** च़्, छ़्, ज़्, झ़्.
**मूर्धन्य :** ट्, ठ्, ड्, ढ्.
**दंत्य :** त्, थ्, द्, ध्.
**ओष्ठ्य :** प्, फ्, ब्, भ्.
**नासिक्य :** ङ्, ण्, न्, म्.
**अर्धस्वर :** य्, व्.
**द्रव :** र्, ल्.
**ऊष्मे :** श्, ष्, स्.
**महाप्राण :** ह्.]

**कंठ्य :** – क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह :.
**तालव्य :**– च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श्.
**दंत्यतालव्य :**– च़्, छ़्, ज़, झ़्, ञ़्.
**मूर्धन्य :**– ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्.
**दंत्य :**– त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स्
**ओष्ठ्य :** – प्, फ्, ब्, भ्, म्.
**दंत्यौष्ठ्य :** – व्.
**नासिक्य :**– (अनुस्वार) ं.

(१) एकंदर ४० व्यंजनें आहेत. मागील स्वराला द्विमात्रक करण्याचा धर्म त्यांच्या ठाईं असल्यानें, अनुस्वार व विसर्ग यांची गणना व्यंजनांत केली आहे. विसर्ग अपभ्रंशांत नाहीं; ज्ञानेश्वरींत आहे. [ज्ञानेश्वरींत विसर्ग आहे तो तत्सम शब्दांत आहे, तद्भव शब्दांत नाही.]

(२) दंत्यतालव्य व्यंजनें संस्कृतांत नाहींत; महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत आहेत. 'यः' बद्दल महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत 'जो' यतो त्याचा उच्चार तालव्य नसून दंत्यतालव्य आहे. वस्तुतः संस्कृतांतील तालव्य 'च' चा

उच्चार 'च्य' च्या जवळ जवळ असतो. मराठी पोथ्यांतून 'विचार' हा शब्द 'विच्यार' असा लिहिलेला फार आढळतो. 'ज्योतिस्' हा संस्कृत शब्द 'जोइस' असा महाराष्ट्रींत होतो. ह्मणजे 'ज' तील 'य' काढून टाकण्याकडे महाराष्ट्रीची प्रवृत्ति दिसते. ह्मणजे तालव्य ज अथवा ज्य यांचा दंत्यतालव्य ज करण्याकडे महाराष्ट्रीची प्रवृत्ति होती, असें ह्मणणें प्राप्त होतें. ही प्रवृत्ति मराठीनें उचललेली आहे. [वरील प्रवृत्ती मराठीत निरपवाद तर नाहीच; उलट या संबंधात काही स्थूल नियमही आहेत. तत्सम शब्दात मूळचा तालव्य उच्चार कायम असला तरी त्यातही 'चोर' किंवा 'राजा' यासारखे अपवाद दिसतातच. तद्भव शब्दांतही मूळचा तालव्य उच्चार निरपवाद रीत्या कायम राहतो असा केवळ 'इ' या स्वरापूर्वी (उदा., चि, जिणें, झिजणे इ०). 'ए' पूर्वीचा तालव्य उच्चार निरपवाद नाही; कारण 'माझेनि' किंवा 'तुझेनि' यासारख्या रूपांत दंत्यतालव्य आहे. अ, उ आणि ओ या स्वरांच्या पूर्वी मात्र तालव्य येत नाही.]

(३) 'ळ' हा वर्ण आर्यभाषेंत [आर्यभाषेत म्हणजे वैदिक संस्कृतात असे राजवाड्यांचे म्हणणे असेल तर वैदिक 'ळ' हा 'ड्' चा पर्याय आहे. (उदा; अग्निमीडे- किंवा अग्निमीळे- पुरोहितम्, ऋग्वेद, १.१.१), त्याचा ल्-शी संबंध नाही.] आहे; संस्कृतांत नाहीं; प्राकृतांत व अपभ्रंशांत आहे; ज्ञानेश्वरींत नाहीं; तत्पश्चात्क मराठींत व तदितर तत्समकालीन लेखांत आहे. शक ११९५ तील पंढरपूर येथील चौऱ्यायशीच्या शिलालेखांत व शक ४१० तील मंगळवेढच्या शिलालेखांत [मंगळवेढ्याचा ताम्रपट आहे, शिलालेख नाही; व तोही बनावट, अर्थात अविश्वसनीय आहे.] आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, संस्कृत उच्चारांचें अनुकरण करण्याकडे ज्ञानेश्वराचा व्यक्तिशः किंवा जातिशः किंवा प्रांतशः ओढा होता. एथून तेथून मजजवळील सगळ्या सबंद ज्ञानेश्वरींत 'ळ' हा वर्ण नाहीं. [ळ-चा अभाव ही ज्ञानेश्वरीच्या राजवाडेप्रतीची एक लकब इतकेच म्हणता येईल. कारण या प्रतीशी समान असणाऱ्या माडगावकर-प्रतीत ळ-कार आहे. तसाच तो यादवकालीन महानुभाव ग्रंथांतूनही नित्य दिसतो. 'लीळाचरित्रा' च्या तर तो नावातच आहे. या 'ळ' चे स्टेन कोनौ यांचे नियमन (JRAS. 1902) राजवाड्यांनी सार्वत्रिक नाही असे साधार सांगितले आहे. (राजवाडे-लेखसंग्रह, भा. ३, पृ. १९४-१९६).]

(४) ङ व ञ् हे नासिक्य ज्ञानेश्वरींतील प्राकृतिकोद्भव ऊर्फ अपभ्रंशोद्भव शब्दांत नाहींत; संस्कृतसम शब्दांत, अर्थात् विकल्पेकरून आहेत. [हे दोन नासिक्य तत्सम शब्दांत असले तरी ते परसवर्णाच्या रूपाने नसून अनुस्वाराच्या रूपाने आहेत (उदा; अंकुर, चंचल). त्यातही **ञ्** च्या उच्चाराची परिणती न् च्या उच्चारात झाली आहे. (उदा; पञ्च >पंच).]

(५) श् व ष् महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहींत; ज्ञानेश्वरींत आहेत.

(६) ज्ञानेश्वरींत दोन प्रकारचे वर्ण आहेत:— महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून आलेले वर्ण व ज्ञानेश्वरानें संस्कृतांतून घेतलेले वर्ण. ज्ञानेश्वरीच्या तद्भव भागांत प्रायः पहिला प्रकार आढळतो व तत्सम भागांत दुसरा प्रकार सांपडतो.

(७) येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं ज्ञानेश्वरींत दोन प्रकारचे शब्द आहेत:— तद्भव आणि तत्सम. तद्भव म्हणजे अपभ्रंशापासून अपभ्रंश होऊन निघालेले. तत्सम ह्मणजे संस्कृतसम असा येथें विशिष्ट अर्थ समजावा. तत्सम ह्मणजे अपभ्रंशसम किंवा महाराष्ट्रीसम असे हि दोन अर्थ होऊं शकतील; परंतु ते येथें उक्त नाहींत.

(८) ज्ञानेश्वरींत शेंकडा पंचवीस पासून तीस शब्द तत्सम येतात. शक ११२८ तील पाटण येथील शिलालेखांत शेंकडा पंधरा शब्द तत्सम येतात. शक १०५१ तील अभिलषितार्थचिंतामणींतल्या पदांत शेंकडा साहासष्ट शब्द तत्सम येतात. शक ६५८ तील चिकुर्डे [वरील दोन्ही ताम्रपट बनावट व म्हणून अविश्वसनीय आहेत. पण त्यामुळे राजवाड यांच्या मुख्य प्रमेयास बाधा येत नाही.] येथील ताम्रपटांत शेंकडा चौऱ्यायशी शब्द तत्सम येतात. आणि शक ४१० तील मंगळवेढे [वरील दोन्ही ताम्रपट बनावट व म्हणून अविश्वसनीय आहेत. पण त्यामुळे राजवाड यांच्या मुख्य प्रमेयास बाधा येत नाही.] येथील ताम्रपटांत शेंकडा दहा तत्सम येतात. ह्मणजे तत्सम शब्द अगदीं प्रारंभापासून मराठी

लेखांत येतात. अलीकडील शिष्ट लेखक व लोक तेवढे मराठींत संस्कृत शब्द फार योजतात व पूर्वीची ज्ञानेश्वरादि मंडळी कमी योजीत, असें ह्मणण्याला कांही विशेष आधार नाहीं. महाराष्ट्रीभाषेंतील गाथासप्तशति, सेतुबंध वगैरे ग्रंथांत संस्कृत शब्द किंवा तत्सम शब्द शेंकडा एखाददुसरा सांपडल्यास नकळे. ती च कथा अपभ्रंशासंबंधानें आहे. असें असून अपभ्रंशोत्पन्न मराठींत संस्कृतसम ऊर्फ तत्सम शब्द मूळापासून च कां बरें आढळतात? उत्तर:— पूर्व चालुक्यांच्या राशियतीचा प्रारंभ व मराठी भाषेचा प्रारंभ समकालीन आहे. [मराठी भाषेचा जन्मकाळ आठव्या शतकाच्या मागे जाऊ शकत नसल्याने राजवाडे यांचे वरील म्हणणे निराधार ठरते. शिवाय चालुक्यांची भाषा कानडी असावी.] चालुक्यांच्या अमदानींत संस्कृत भाषेला राजमान्यत्व, शिष्टमान्यत्व व विद्वन्मान्यत्व आलें होतें आणि महाराष्ट्री व अपभ्रंश लोपल्या होत्या. बौद्धधर्म व जैन धर्म यांचा पाडाव झाल्यामुळें प्राकृत भाषांचा हि पाडाव झाल्यासारखा च झाला. चालुक्यराजे सनातनधर्माभिमानी पडल्यानें संस्कृत भाषेला पुनरुत्तेजन मिळालें, व सामान्य लोकांच्या बोलण्यांतील जी मराठी भाषा तींत हि संस्कृत शब्दांचा कमजास्त प्रवेश झाला. लेखक किंवा वक्ता विद्वान नसला, तर कमी प्रवेश होई; व असला तर जास्त होई. विषय लौकिक कामधंद्याचा असला तर कमी स्पर्श होई; शास्त्रीय असला तर जास्त होई.

(९) संस्कृत ही शुद्ध व शिष्ट भाषा मानून, तींतील शब्दांतल्या वर्णांचा नाश किंवा फेरबदल होऊन जे नवीन अशिष्ट शब्द बनले त्यांना अपभ्रष्ट हें विशेषण लागूं लागलें. ह्या न्यायानें महाराष्ट्री संस्कृताचा अपभ्रंश, अपभ्रंश अथवा अवहट्टभासा महाराष्ट्रीचा अपभ्रंश व मराठी अवहट्टभासेचा अपभ्रंश समजण्याची चाल आहे. हें बोलणें संस्कृतदृष्टीनें झाले. प्राकृतदृष्टीनें सर्व विचार अगदी उलट होतो. संस्कृत शब्दांतील वर्णांचा नाश किंवा फेरबदल होऊन जे नवीन शब्द बनले ते संस्कृतेतर शब्द होत, असें हि उत्तरोत्तर बोलतां येईल. अपभ्रष्टभाषा या शब्दाऐवजीं सुलभोच्चारप्रवणभाषा अशी परिभाषा योजल्यास, हा वाद च मिटतो.

प्रथमान्हिक समाप्त

अनुक्रमणिका

# द्वितीयान्हिक

## ६. नामविभक्तिप्रत्ययेतिहास

ज्ञानेश्वरींत सर्व नामें (अर्थात् विशेषणें) स्वरान्त आहेत. अ, अँ, आ, इ, ई, उ, ऊ, ऐ, औ, हे ९ स्वर पुल्लिंगी नामांच्या अंतीं आढळतात. [हे विधान पूर्णपणे बरोबर नाही. कारण ज्ञानेश्वरीत अँकारान्त पुल्लिंगी नामे नाहीत, व राजवाडे यांनी न सांगितलेली ओकारान्त नामे आहेत (उदा., डोहो, नवलाओ, मेहो, इ.). त्यामुळे संख्या ९ च राहते.]

(१) स्वरान्तवत्वाचा धर्म मराठीनें अपभ्रंश व महाराष्ट्री भाषांपासून वंशपरंपरेनें घेतला.
(२) ज्ञानेश्वरींत द्विवचन नाहीं. हा हि धर्म मराठीनें अपभ्रंशापासून उचलला आहे.
(३) मराठींत आठ विभक्त्या आहेत. हा धर्म मराठीनें संस्कृतांतून, महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून घेतला आहे. चतुर्थी महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत क्वचित् आढळते.
(४) ऐ, औ, हे स्वर शब्दाच्या अंतीं महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत येत नाहींत; ज्ञानेश्वरींत येतात.

## ७. पुल्लिंगी नामें

अकारविल्ह्यानें पुल्लिंगी नामांच्या विभक्तींची रूपें देतों व त्यांचा इतिहास सांगतों.

### अकारान्त पुल्लिंगी नामांचें एकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | जुनें मराठी | नवें मराठी |
|---|---|---|---|---|
| मूळशब्द :— पुत्र | पुत्त | पुत्त | पूत | पूत |
| प्रथमा :— पुत्रस् | पुत्तो | पुत्तु | पूतु | पूत |
| द्वितीया :— पुत्रम् | पुत्तम् | पुत्तु | पूतु | पूत |
| तृतीया :— पुत्रेण | पुत्तेण | पुत्तेण-पुत्तें | पूतें-पूतेन | पुतानें |
| चतुर्थी :— पुत्राय | पुत्ताअ | | पूता-पूतासि- -तैं, थैं | पूतास-ला, तें |
| पंचमी :— पुत्रात् | पुत्ताउ, पुत्ताहिंतो, पुत्तात्तो | पुत्ताहु- हुँ | पूताहून-तून, -हूनि, - हनियाँ, -तूनि, तूनियाँ, पूतौनि, पूतौनु, पूताँतु | पूताहून-तून |
| षष्ठी :— पुत्रस्य | पुत्तस्स | पुत्तस्सु, पुत्तह | पूता | पूताचा-ची-चें; पूता |
| सप्तमी :— पुत्रे | पुत्तम्मि-पुत्ते | पुत्ति-पुत्ते-पुत्तें- | पूतीं, पूतें, पूताँतु | पूताँत-पूतीं |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संबोधन :– पुत्र | पुत्त-पुत्ता | पुत्तहिं<br>पुत्त-पुत्ते | पूता, पूत | पुता |

अकारान्त पुल्लिंगी एकवचनाचीं रूपें ज्ञानेश्वरींत येणेंप्रमाणें येतात :–

मूळशब्द :– गणेश, अनुग्रह, देव, संशय, दिअ, ठाय, राअ, ठाअ.

प्रथमा :– गणेशु, अनुग्रहो, देओ, संशयो, दिओ, ठाय, सूर्यु, विस्मो, आश्रो.

द्वितीया :– गणेशु, सौरसु, पूरु, परागु, ठाओ, अभिप्राओ, अंतराओ, विस्मो.

तृतीया :– ईश्वरें, राणेन, सेतुगुडेन (पंढरपूर) [तृतीयेची ही दोन रूपे पंढरपूर येथील चौऱ्यायशीच्या लेखातील आहेत. [३.११; ५.३१].]

चतुर्थी :– सागरा, ठाया, सूर्यातें, योगभ्रष्टासि.

पंचमी :– मेघाहूनि, मेघौनि, समुद्रौनि, समुद्रातु, मूडाहूनि.

षष्ठी :– नाभिकाराचा, उजलाचें, व्यासाची, देवा, कृष्णा, बोला, भीष्मा.

सप्तमी :– घटिँ, उदयीँ, ठाँइँ, संशइँ, वेळे (पु.), प्राप्ते (पु.), ग्रामांतु.

संबोधन:– विदग्धा, पार्था, कृष्णा, कृष्णें, विठ्ठले, गोविंदे. [कृष्णे, विठ्ठले, गोविंदे यांसारखी रूपे स्त्रीलिंगी ममत्ववाचक असून ती ज्ञानेश्वरीत येत नाहीत.]

शब्दयोगी :– विवेकावरि, अर्थातव, व्यापारालागौनि, क्षणवेन्हिं, अर्जुनेंसिँ, महेशेंसि, धर्मेंविण, कल्पांतुवेन्हीँ, वाढतेनसिँ, क्षणवांचौनि.

(१) **प्रथमा**:– अपभ्रंशांत नियमेंकरून अकारान्त पुल्लिंगी नामाचें एकवचन उकारान्त होतें. [हा उकार क्वचित् अनेकवचनांत हि दिसतो; उदा; "कृष्णु ऐसें बोलते जाले" [ज्ञा. ९.३३]] जुन्या ज्ञानेश्वरींत हि तो च प्रकार प्रायः आढळतो. फक्त, य् आणि व् हे दोन उष्मवर्ण व ह् हा महाप्राण ज्या शब्दांचा उपान्त्य असतो त्या शब्दांचें एकवचन ओकारान्त होतें; जसें, अनुग्रहो, देओ, संशयो, संजयो, कटाहो, विजयो. यान्त्य, वान्त्य किंवा हान्त्य शब्दांपासून मराठींत जीं मूळरूपें य, व किंवा ह यांचा लोप होऊन बनलीं त्यांचें एकवचन ओकारान्त नियमानें होतें:–

| | **संस्कृत** | **प्राकृत** | **अपभ्रंश** | **जुनें मराठी** |
|---|---|---|---|---|
| १. | विस्मय | विस्मअ | विस्मअ | विस्मा+उ=विस्मो |
| २. | आश्रय | आस्त्रअ | आस्त्रअ | आस्त्रा+उ=आस्त्रो-श्रो |
| ३. | देव | देउ | देउ | देअ+उ=देओ, देवो |
| ४. | दिवस | दिअस | दिअह | दिअ+उ=दिओ |

ह्या चारी स्थलीं वस्तुतः 'उ' प्रत्यय च लागलेला आहे, परंतु संधिकार्यानें 'ओ' दृश्यमान होतो.

हा एकववनी 'उ' प्रत्यय संस्कृत असू, प्राकृत ओ, अपभ्रंश उ, अशा परंपरेनें आला आहे, द्राविड भाषासंसर्गानें आलेला नाहीं. 'अस्' प्रत्ययाचा 'उ' प्रत्यय पणतू आहे. [या बाबतींत चिं. वि. वैद्यांचें मत भिन्न आहे. ते ह्मणतात, "ज्ञानेश्वराच्या काळींही बोलण्याच्या भाषेंत 'उ' प्रत्यय नाहींसा झाला होता. किंबहुना यापूर्वीही हा प्रत्यय बोलण्यांत नसावा." (निबंध आणि भाषणें, पृ. ११९).]

अनुक्रमणिका

हा ‘उ’ प्रत्यय दुसऱ्या एका उ पासून भिन्न आहे. घेउनु, कीरु, वगैरे शब्दांच्या शेवटीं जो उ येतो तो वैदिक व संस्कृत भाषांतील उ अव्ययाचा पणतू होय. [जुन्या मराठीत सर्वत्र आढळणाऱ्या उ—काराची वरील उपपत्ती स्वतंत्र असली तरी ती मान्य होण्यासारखी नाही. त्यापेक्षा अकारान्त पुल्लिंगी नामांच्या एकवचनाचा ‘उ’ हा प्रत्यय अतिदेशाने इतर शब्दांनाही लागला असे मानणे अधिक युक्त होईल.] किंमु, नु वगैरे संस्कृत शब्दांत जुडून व वैदिक भाषेंत स्वतंत्र प्रचार ह्या उ-अव्ययाचा होतो.

(२) **द्वितीया**:— प्रथमेप्रमाणें. अकारान्त पुल्लिंगी नामांच्या द्वितीयेच्या एकवचनाचें रूप संस्कृतांत ‘पुत्रम्’ व महाराष्ट्रींत ‘पुत्तम्’ असें होतें, परंतु अपभ्रंशांत पुत्तु असें च रहातें. तेव्हां प्रथमेप्रमाणें च द्वितीयेची रूपें बनविण्याची लकब मराठीनें अपभ्रंशापासून उचलली आहे, महाराष्ट्रीपासून किंवा संस्कृतापासून उचलली नाहीं. आणि असें च होणें अपरिहार्य होतें. अपभ्रंशानें ज्या ज्या पद्धती सुरू केल्या त्या मराठीनें चालू ठेविल्या.

(३) **तृतीया**:— महाराष्ट्री ‘पुत्तेण’ पासून अपभ्रंशानें पुत्तेण व पुत्तँ अशीं दोन रूपें बनविलीं. पुत्तेण—मधील ‘ण’ चा अनुनासिक बनवून पुत्तँ हें रूप साधलें. ह्यावरून असें दिसतें कीं, अपभ्रंश बोलणारे लोक कांही काल पुत्तेण् असा व्यंजनान्त उच्चार करीत असत. कालान्तरानें ‘ण्’ चा सहज च अनुनासिक बनला व पुत्तँ हें सानुनासिक रूप सिद्ध झालें. ह्या दोन रूपांवरून मराठींत ण-चा ‘न’ होऊन पूतेन व पूतँ अशीं दोन रूपें बनलीं. ज्ञानेश्वरींत मेघँ, ईश्वरँ, जाणतेन, पढियंतेन हीं रूपें येतात. पंढरपूर येथील चौऱ्यायशीच्या शिलालेखांत पंडितें, नायकें, गु (मु) द्रेन, राणेन, सेतुगुडेन अशीं दोन्ही प्रकारचीं रूपें आहेत. [वरिल रूपांपैकी जाणतेन, पढियंतेन, राणेन किंवा सेतुगुडेन या रूपांत मूळ प्रातिपदिके अनुक्रमे जाणता, पढियंता, राणा व सेतुगुडा याप्रमाणे आकारान्त आहेत. त्यामुळे राजवाड्यांचे विवेचन बरोबर असले तरी वरील रूपे त्याची उदाहरणे होऊ शकत नाहीत.]

ईश्वरँ या तृतीयेच्या रूपाला ‘सिँ’ हा प्रत्यय लागून ईश्वरँ सिँ रूप होतें. संस्कृत सम [यापेक्षा तृतीयेच्या ‘सिँ’ या प्रत्ययाचे व्युत्पादन सं. सहितम् पासून करणे अधिक युक्त आहे.] या शब्दाचें अपभ्रष्ट रूप सवँ असें होतें. सवँ-ची एकवचनी सप्तमी सविँ, सवँ अशी होतें. सविँ-चें मराठी रूप सइँ, व त्याचा अपभ्रंश सिँ.

(सं) ईश्वरेण समम् = (अप.) ईश्वरँ सविँ<br>
(म.) ईश्वरँ सिँ (ईश्वरासह).<br>
अर्जुनँ = अर्जुनानें; अर्जुनँ सिँ = अर्जुनासह.<br>
इंद्रियँ = इंद्रियानें; इंद्रियँ सिँ = इंद्रियासह.<br>
(जुनें मराठी) ईश्वरँ सिँ = (वर्तमान मराठी) ईश्वराशीं.

हा ‘सिँ’ प्रत्यय सह-पासून निघालेला नाहीं. कारण महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत सहमधील ह तसा च रहातो. परंतु सम-मधील म चा अपभ्रंशांत वँ होतो. सप्तमीच्या ‘सिँ’ या रूपाशीं इंद्रियँ या तृतीयेच्या रूपाचा संयोग होऊन हा तृतीया-सप्तमी योग झाला आहे. संस्कृतांत, महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत समम् शब्द तृतीया घेतो; सबब, सिँ शब्द मराठींत हि तृतीया घेतो.

ज्ञानेश्वरींत असतेनि, मेघाचेनि वगैरे इकारान्त तृतीयेच्या एकवचनाचीं रूपें येतात. ‘उ’ अव्ययाप्रमाणें ही ‘इ’ अव्यय आहे. ‘मेघाचेनि मुखें’, ‘पिंडाचेनि मिसें’ असे प्रयोग ज्ञानेश्वरींत आढळतात. ‘इ’ पादपूरणार्थी महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत योजतात. करुनु, करुनि ह्या जोडींतील दुसऱ्या शब्दांतील जी अंत्य

अनुक्रमणिका

‘इ’ ती मेघाचेनि ह्या रूपांतील इ-हून निराळी आहे. कारणें क्रियापद-विचारांत देणार आहें. [हा विचार पुढे परिच्छेद क्र. ६४ मध्ये आला आहे.]

(४) **चतुर्थी** :– प्राकृतांत चतुर्थी नाहीं, असा नियम वैय्याकरणांनीं केला आहे. परंतु, पिशेल आपल्या ग्रामाटिकांत पुत्ताअ (पु.), इत्थित्ताए, देवत्ताए (देवत्वाय), वगैरे एकवचनी चतुर्थीची रूपें देतो. त्यावरून असें ह्मणावें लागतें कीं, चाऱ्ही प्राकृतांतून, अर्थात् महाराष्ट्रींतून चतुर्थी अजीबात लुप्त झाली नव्हती. लुप्त झाली नव्हती, याला एक सबळ आधार आहे. जुन्या मराठींत ‘पूता’ असें जें रूप आहे त्याची वंशपरंपरा अन्यथा सोपपत्तिकत्वेंकरून दाखवितां येत नाहीं. महाराष्ट्रींत संस्कृत पुत्राय-पासून पुत्ताअ, अपभ्रंशांत महाराष्ट्री पुत्ताअ-पासून पुत्ता व अपभ्रंशांतील पुत्ता-पासून मराठी पूता, अशी परंपरा असली पाहिजे. पैकीं महाराष्ट्री पुत्ताअ हें रूप उपलब्ध आहे; अपभ्रंशांतील पुत्ता हें रूप उपलब्ध नाहीं. परंतु, तें अपभ्रंशांत क्वचित् प्रचारांत होतें, ह्यांत संशय नाहीं. चतुर्थीच्या स्थलीं षष्ठीच्या रूपांचा उपयोग करण्याचा प्रचार जसजसा प्राध्यान्येंकरून होऊं लागला, तसतशीं मूळ चतुर्थींची रूपें लोप पावत चाललीं, हें खरें आहे. तथापि चतुर्थी अजिबात लोप पावली नाहीं. तेव्हां, महाराष्ट्रींतील लुलप्सु चतुर्थीचे जें पुत्ताअ रूप त्यापासून अपभ्रंशद्वारा मराठींतील पूता हें चतुर्थीच्या एकवचनाचें रूप साधलें गेलें, हें स्पष्ट आहे. [प्राकृतांत चतुर्थी लुप्त नव्हती, तर लुलप्सु होती या वरील मताला आधार अपभ्रंश ग्रंथांतूनही मिळतो. त्यांत णरिंदहो (णायकुमार. १.८.१२), रायहो (णायकुमार. ३.१८.१९६), सायरगयहिं समिलहिं (सावयधम्म दोहा, २) अशी चतुर्थीची रूपे आढळतात.]

मराठींत आसपास असा एक शब्द आहे. पैकीं पास, पासिं, पासून हीं रूपें पार्श्व, पार्श्वे, पार्श्वात् ह्या रूपांपासून निघालीं; आणि आस, आसिं, आसून ही रूपें आर्श्व, आर्श्वे, आर्श्वात्आस, आसे, आसाहुँ, अशा परंपरेनें निघालीं. पूतासि-सिँ हें रूप चतुर्थीचें एकवचन पूता+सप्तमीचें एकवचन आसि-सिँ मिळून बनलें आहे. पूता+आसि-सिँ= पूतासि-सिँ.

पूतास असें अकारान्त रूप मजजवळील ज्ञानेश्वरींत किंवा चौऱ्यायशीच्या शिलालेखांत एक हि नाहीं, पुत्तस्स ह्या षष्ठीच्या एकवचनी रूपापासून जर मराठी पूतास रूप निघालें असतें, तर हें रूप ज्ञानेश्वरींत हटकून सांपडतें. शिवाय, षष्ठीच्या एकवचनी रूपापासून पूतासि हें रूप निघालें नाहीं, हें विधान करण्याला दुसरें एक प्रमाण आहे. पूताँसि असें चतुर्थीचें अनेकवचनी रूप जुन्या ज्ञानेश्वरींत सांपडतें. संस्कृत पुत्रस्य, महाराष्ट्री पुत्तस्स व अपभ्रंशांतील पुत्तस्सु ह्या षष्ठीच्या एकवचनी रूपांपासून जर मराठी पूतास हें रूप निघालें असतें, तर अनेकवचनी पूताँसि हें मराठी रूप संस्कृत-महाराष्ट्री-अपभ्रंश षष्ठीच्या अनेकवचनापासून निघावयास हवें होतें. परंतु, तसें तें निघालेलें नाहीं.

पूता+ ँ (अनेकवचनाता अनुनासिक)+ आसि-सिँ= पूताँसि अशी ह्या अनेकवचनी रूपाची पृथक्कृति आहे. पुत्राणाम्-पुत्ताणम् ह्या संस्कृत-अपभ्रष्ट षष्ठीच्या अनेकवचनी रूपापासून कोणत्या हि उपायानें पूताँसि हें रूप साधतां येत नाहीं. तस्मात्, पुत्रस्य, पुत्राणाम् ह्या षष्ठीच्या रूपांपासून मराठी चतुर्थीचीं रूपें निघालीं नाहींत.

पूते ँ सिँ हें रूप जसें तृतीया व सप्तमी ह्या दोन विभक्त्यांच्या संयोगानें बनलें आहे, तसेंच पूतासि-सि हें हि रूप चतुर्थी (पूता) व सप्तमी (आसि-सिँ) ह्यांच्या संयोगानें बनलें आहे. [असा दोन विभक्त्यांचा संयोग मानण्यापेक्षा (ब्लोकही तसा मानतात) जुन्या विभक्तिरूपांना नवीन प्रत्यय लागून ही रूपे सिद्ध झाली असे समजणे अधिक युक्त होईल. नामविभक्तीची ही मधली अवस्था असून मराठीतील नामाच्या ‘सामान्यरूपा’ चे बीज या अवस्थेत आहे. (पहा : शं. गो. तुळपुळे, “यादवकालीन मराठी भाषा” आ. दुसरी, १९७३ पृ. २३६-२३७).]

पूतँ सिँ (तृ. ए.) व पूतासि-सिँ (च. ए.) ह्या रूपांसंबंधानें बीम्सनें फार च घोटाळा केला आहे. हीं दोन्ही रूपें तो पूताशीँ-सीँ अशीं लिहितो, व पूतास+ई (तृतीया अनेकवचनाचा प्रत्यय) असा त्याचा विग्रह करतो. [बीम्सनें 'पूताशीँ-सीँ' असें उदाहरण च दिलेले नाही. त्यासाठीं त्यानें 'देव' हा शब्द घेतला आहे. मुख्य ह्मणजे, तो तृतीयेचे उभयवचनी प्रत्यय तृतीयेच्या अनेकवचनी रूपावरून व्युत्पादितो. ("Marathi has plural forms for all its methods of forming the instrumental."), बीम्स : MAL, भा. २, पृ. २७१-२७२.] परंतु जुनीं मराठी रूपें माहीत नसल्यामुळें ह्या असंबद्ध क्लृप्त्या त्यानें रचल्या आहेत, हें स्पष्ट आहे.

वर्तमानमराठींत 'ला' प्रत्यय लागून पूताला असें रूप अलीकडे दोन-अडीचशें वर्षे होतें. हा 'ला' प्रत्यय शिवाजीच्या व रामदासाच्या कालापर्यंत नव्हता. हा 'ला' फारसी 'रा' ह्या चतुर्थीच्या किंवा द्वितीयेच्या प्रत्ययापासून र-चा ल उच्चार करून घेतलेला आहे. बीम्स [Comp. Grm. Of MAL., Vol. II, p, 260.] वगैरे वैय्याकरण 'लाग' धातूपासून 'ला' निष्पन्न करतात. परंतु हा लाग-धातूत्पन्न 'ला' शिवाजी व रामदास ह्यांच्या अंतापर्यंत मराठींत मुळींच नव्हता, हें त्यांना माहीत नव्हतें. एतत्संबंधीं साग्र विवेचन मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेंत केलेलें आहे.

अकारान्त पुल्लिंगी नामांच्या चतुर्थीच्या एकवचनाचें एक तेँन्त्य रूप होतें; जसें, पूतातेँ. मजजवळील तीनशें वर्षांच्या सुमारच्या गुरुचरित्राच्या एका पोथींत गुरुथेँ, घराथेँ अशीं थेँ न्त्य रूपें येतात. मंगलोर येथें रोमन लिपींत छापलेल्या कोकणी-पैशाची ख्रिस्तपुराणांत हि हें थेँ न्त्य रूप येतें (इ. स. १६००). [राजवाडे यांनी 'विश्ववृत्त' मासिकात (इ. स. १९०८, क्र. ८) "स्टेफेन्सचें ख्रिस्तपुराण' हा लेख लिहिलेला असून त्यात त्याच्या भाषेचा उपहास करतांना त्याचे "अपभाषित्व, म्लेच्छत्व व अशिष्टोच्चारित्व" वर्णिले आहे. येथे 'पैशाची' ही त्या नावाची प्राकृत भाषा अभिप्रेत नसून गांवढळ लोकांची भाषा इतकाच त्या शब्दाचा अर्थ आहे. तसेच 'ख्रिस्तपुराण' इ. स. १६०० मधील नसून १६१४ मधील आहे.] मजजवळील ज्ञानेश्वरींत (शक १२१२ सुमारें) हे थेँ न्त्य रूप क्वचित् येतें. पंढरपूर येथील चौऱ्यायशीच्या शिलालेखांत (शक ११९५) "श्री विठ्ठलरावा अर्थे" अशीं पदें आलीं आहेत. [पंढरपूर लेखातील हा पाठ "श्रीविठलराया अर्थे" असा आहे (स्तंभ २, ओळ २२).] तात्पर्य, चतुर्थीचा 'तें' प्रत्यय अर्थे या संस्कृत शब्दापासून निघाला आहे.

(संस्कृत) अर्थे = (महाराष्ट्री) अत्थे= (अपभ्रंश) अथ्थे= (जुनाट मराठी) थे अगर थेँ = (जुनें मराठी) तेँ.

पूताते हा अनुनासिकान्त्य शब्द पूताते असा निरनुनासिक लिहिला व उच्चारला तरी सशास्त्र आहे. अणोऽप्रगृह्यस्यानुनासिकः ।८।४।५७, ह्या पाणिनीय सूत्रान्वयें संस्कृतांत बहुत स्वर विकल्पेंकरून सानुनासिक उच्चारीत. महाराष्ट्री, अपभ्रंश, ह्यांना हि हा च नियम लागू असे. मराठींत हि अनुनासिक विकल्पेंकरून उच्चारतात.

(५) **पंचमी** :– अपभ्रंशांतील पुत्ताहुँ ह्या सानुनासिक रूपावरून मराठी पूताहून हें रूप अनुनासिकाचा न बनून झालें आहे; व पुत्तातो- पुत्तातोँ ह्या महाराष्ट्री व अपभ्रष्ट रूपांवरून पुत्तातोन हें जुनें मराठी रूप साधलें गेलें आहे. पुत्तातु असें हि रूप पैशाचींत येतें. पूताहून ह्या रूपाच्या धर्तीवर तो-चा तू होऊन पूतातून हें रूप निष्पन्न झालें. 'इ' हें पादपूरक लागून पूताहूनि, पूतातोनि, पूतातूनि, हीं रूपें बनलीं. ह्या रूपांच्या शेवटीं क्वचित् दीर्घ ई येऊन-हुनी, -तुनी, -हूनी, -तूनी, अशीं रूपें होतात. ही दीर्घ ई सुद्धा पादपूरक च आहे.

अनुक्रमणिका

पूतातोनि ह्या रूपांतील तो-च्या धर्तीवर पूताहूनि ह्या रूपांतील हू-चा हो होऊन पूताहोनि असें रूप होतें. हो-चा ओ होऊन संधिकार्यानें पूतौनि असें रूप बनतें. ‘उ’ पादपूरक लागून पूतौनु असें हि रूप क्वचित् होतें. इयाँ हें पादपूरक लागून करौनियाँ-तील इयाँच्या धर्तीवर घरौनियाँ असें हि रूप आढळतें. ह्या इयाँ-चा छडा क्रियापदविचारांत करणें इष्ट आहे. [हा विचार पुढे परिच्छेद क्र. ६४ मध्ये केला आहे.]

महाराष्ट्रींतील पुत्तात्तो ह्या रूपावरून लुप्त अपभ्रंशद्वारा पूताँतु असें हि एक रूप ज्ञानेश्वरींत येतें. पूताँतु ह्या रूपांतील ता-वरील अनुनासिक परंपरादृष्ट्या आगंतुक आहे. मराठींत विकल्पानें वाटेल तो स्वर व ऊष्म सानुनासिक होतो, ही हि बाब लक्षांत ठेविली पाहिजे.

होऊन ह्या ऊन-प्रत्ययान्त धातुसाधितापासून हून प्रत्यय निघाला, अशी डॉक्टर भांडारकर [Wilson Philological Lectures, पृ. २५५-२५६.] यांची व्युत्पत्ति होती. परंतु ती महाराष्ट्री व अपभ्रंश भाषांची विस्तृत चिकित्सा व पृथक्कृति होण्यापूर्वीची, ह्मणजे वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची होती. शक ९०० पासून शक १२०० पर्यंतच्या कोणत्या हि शिलालेखांत किंवा ग्रंथांत पंचम्यर्थी होऊन हें धातुसाधित योजलेलें आढळत नाहीं. ह्मणजे परंपरादृष्ट्या व इतिहासदृष्ट्या हून हा प्रत्यय होऊन-पासून साधला जाणें अशक्य आहे. [राजवाड्यांनीं अन्यत्र होनि, हूनि हे प्रत्यय सं. पश्चपासून व्युत्पादिले आहेत. (चंद्रापासौनि= चंद्रस्य पश्चात्, संस्कृत ज्ञा. ९.२४, पृ. २२) तेथें ते ह्मणतात: “पासीं याची पार्श्व, आर्श्व वगैरे शब्दांपासून आजवर मी व्युत्पत्ति करीत होतों; परंतु पश्च शब्दापासून व्युत्पत्ति खरी.” या बाबतीत भांडारकरांचे व्युत्पादनच योग्य आहे. ते ह्मणतात :— “हून is the absolutive of हो and equivalent to होऊन, having become’, which yields an ablative sense more directly.” (WPL, p. 255). डॉ. कोलते यांनी ह्मटल्याप्रमाणे “होऊन हे धातुसाधित पंचम्यर्थी १२१२ पूर्वी शिलालेखादिकांत वापरलेले नसले तरी यादवकालीन ग्रंथांत ते विपुल प्रमाणात योजलेले आढळते.” उदा., “मी हाटवटीए होउनि आलां”- गो. चरित्र २७. (श्रीगोविंदप्रभुचरित्र, प्रस्तावना, पृ. ४४-४६). पण हा व्युत्पत्तिविषयक मतभेदाचा प्रश्न आहे.] परंपरा व इतिहास हे निरुक्तीचे दोन नेत्र होत. तद्व्यतिरिक्त ती आंधळी होय.

कोंकणांतील लोक ह-च्या ऐवजी स उच्चारून घरसून, मुंबईसून वगैरे अपभ्रष्ट रूपें करतात.

(६) **षष्ठी** :— (सं.) पुत्रस्य = (महा.) पुत्तस्य = (अप.) पुत्तह = (मरा.) पूता, अशा परंपरेनें मराठींत षष्ठीचें एकवचन आलें आहे.

हें शब्दें विण संवादिजे । इंद्रियाँ नेणताँ भोगिजे ।
**बोला** आदिँ झोंबिजे । प्रमेयासि ॥ अध्याय १, ओवी ५८ ॥
तेणें तें आवरिजे । **भीष्मा** तळिँ राहिजे ।
ह्मणे द्रोणातें परिसिजे । तुझीँ सकळीँ ॥ अध्याय १, ओवी १२३ ॥

ह्या दोन ओव्यांत बोला व भीष्मा हीं बोल व भीष्म ह्या दोन अकारान्त पुल्लिंगी नामांच्या षष्ठीच्या एकवचनाचीं रूपें आहेत. “पिशाच्या हातीं”, “रामा करीं” वगैरे प्रयोगांत पिशाच्या व रामा हीं दोन रूपें पिशाच्य व राम ह्या अकारान्त नपुंसक व पुल्लिंगी नामांच्या षष्ठीच्या एकवचनाचीं आहेत. हे प्रयोग अलुक्समासाचे समजणें अशास्त्र आहे. [ज्ञानेश्वरींतील अशा समासांची कांही उदाहरणें नमूद करून श्री. सहस्रबुद्धे यांनीं माडगांवकरांना सांपडलेल्या नव्या पोथीहून राजवाड्यांची पोथी अर्वाचीन आहे असें भासविण्याचा प्रयत्न केला होता. (‘विविधज्ञानविस्तार’, जानेवारी १९११). परंतु त्यांनी दिलेल्या उदाहरणांतील (उदा०, विजयावृत्ति, प्रणवापटिची, भेदाभाऊँ इ०) अनुक्रमें विजया, प्रणवा व भेदा ही रूपें षष्ठीच्या एकवचनाचीं आहेत व हे शब्द सामासिक नाहींत असें दाखवून राजवाड्यांनीं वरील शंकेचें निरसन केलें आहे. (राजवाडे-लेखसंग्रह, भा. ३, पृ. ३१).]

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| अत्र | अत्य | एत्थु-त्युँ | एथून |
| अत्रत्य | अत्थच्च | एत्युच्च-एत्थुँच्च | एथूनच, एथच, एथिच (सं.) |

येथें त्य-पासून च्च-च निघालेला आहे. (वररुचि ३-२७) [वररुचीचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे :— "त्यथ्यद्यां चछजाः ।" म्हणजे, त्य, थ्य आणि द्य यांऐवजी अनुक्रमे च, छ, ज असे आदेश होतात. जसें, नित्य-णिच्च; मिथ्या-मिच्छा; विद्या-विज्ञा.] हा त्य-पासून निघालेला च्च-च मराठींत विभक्तिरूपांना लावतात; जसें,

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| ग्राम+त्य | =गाम+च्च= | गावँ+च्च= | गावँच |
| ग्रामस्य+त्य | =ग्रामस्स+च्च= | गावँह+च्च= | गावँच |

येणेंप्रमाणें गावँच, पूताच, नाभिकाराच, उजलाच, व्यासाच, वगैरे चकारान्त मूळशब्द साधले जातात. वस्तुतः, त्य-पासून निघालेल्या ह्या च-ला षष्ठीचा अर्थ स्वार्थी नाहीं. षष्ठीच्या रूपाला जोडला जाऊन षष्ठीचें उसनें सामर्थ्य त्याच्या ठायीं भासमान होतें, इतकें च. खरें पाहिलें तर, संस्कृतांतील त्य-चा च स्वभाव ह्या मराठी च-चा आहे. ह्मणजे त्य-प्रमाणें च ह्या च-ला हि साती विभक्त्यांचे प्रत्यय लागतात. जसें :—

| | संस्कृत | | | मराठी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री. | न | पु. | स्त्री. | न. |
| प्र :— | अत्रस्यः, | अत्रत्या, | अत्रत्यम् | पूताचा, | पूताची, | पूताचें |
| द्वि. :— | अत्रत्यम् | अत्रत्याम्, | अत्रत्यम् | पूताचा, | पूताची, | पूताचें |
| तृ. :— | ०त्येन् | ० त्यया, | ० त्येन | ०चेन-०चें, ०चिया-आ, ० चेन-०चें<br>०चँसिं ० चियासिं ० चँसिं ० चेनसि<br>० चेनसि [मुळांत 'चेतसि' असें मुद्रणदोषयुक्त रूप आहे.] | | |
| च :— | ०त्यात, | ०त्यायै | ०त्याय. | ० चेया, ०चिये, ०चआ, ०चेया<br>०चेयातें, ० चियेतें, ०चआतें, ०चेयातें<br>० चेयासि, ०चियेसिं, ०चआसिं ० चेआसिं | | |
| पं :— | ०त्यात्, | ०त्यायाः | ०त्यात्, | ० चेयाहूनि-न, | चियाहूनि-न, | चेआहूनि-न |
| ष :— | ०त्यस्य, | ०त्यायाः, | ०त्यस्य, | ०चेया, ०चिया, | ०चआ, | ०चेया |
| स :— | ०त्ये, | ०त्यायाम्, | ०त्ये, | ०चेयाँ, ०चियाँ, | ०चेआँ, | ०चेयाँ |

अनुक्रमणिका

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सं :— | ०त्य, | ०त्ये, | ०त्य. | ०चा, | ०ची, | ०चा |

ह्मणजे षष्ठीच्या रूपांना लागून झालेले हे चान्त शब्द विशेषणें उर्फ नामें आहेत.

त्य-पासून निघालेला हा 'च', मूळशब्द, पंचमीचें रूप व सप्तमीचें रूप, ह्यांना जोडला जाऊन विशेषण नामें बनतात व त्यांना साती विभक्त्या तिन्ही लिंगीं होतात; जसें,

| विभक्तिरूप | चान्त विशेषण |
|---|---|
| मूळ शब्द:— गावँ (पु.) | गावँचा-ची-चेँ |
| पंचमी :— गावाँहून | गावाँहूनचा-ची-चेँ |
| सप्तमी:— गाविँ-वीँ | गाविँ चा-ची-चेँ, गावीँ चा-ची-चेँ |

प्रथमा, द्वितीया, तृतीया व चतुर्थी ह्या चार विभक्त्यांच्या रूपांना हा 'च' लागून विशेषणें होत नाहींत; कारण स्पष्ट आहे. [कारण या चार विभक्त्या विशेषणात्मक नाहीत.]

ह्या चान्त विशेषणांना व नामांना त्या त्या विभक्तीचें सामर्थ्य येतें; जसें,
पंचमी :— गावाँहूनचा निरोप = ग्रामाद् वार्ता
षष्ठी :— गावाँचा आकार = ग्रामस्य उत्पन्नम्
सप्तमी :—गाविँ चा गोंधळ = ग्रामेभवा अव्यवस्था
मूळरूप :— गावँचा गांवढा = ग्रामस्थो = ग्रामीण

ह्या चान्त विशेषणांना खरीखुरी षष्ठी समजून, होर्ल्न, बीम्स, भांडारकर वगैरे नामांकित वैय्याकरण फार बुचकळ्यांत पडले. कित्येक स्य-स्स पासून च-ची व्युत्पत्ति करीत. परंतु अपभ्रंशांत किंवा महाराष्ट्रींत किंवा संस्कृतांत स्य-स्स ह्यांची रूपें पुढील लिंगाप्रमाणें फिरत नाहींत, ही बाब त्यांच्या उपपत्तीच्या आड येई. कित्येक असें ह्मणत कीं, व्रज वगैरे उत्तर गौड प्राकृतिकोद्भव भाषांतील क-पासून हा 'च' झाला आहे! व्रज भाषेंत 'क' आल्यानंतर मराठी 'च' बनला, असा ह्या विधानाचा अर्थ होतो. परंतु हा मराठी 'च' शक ११२८ त कायम बनला होता. (भास्कराचार्यांचा शिलालेख, पाटण). [पाटणच्या शिलालेखात '**दामाचा** वीसोवा', '**वाणाची** लोटि', '**मढीचेन** माप', '**भूपाचें** सूंक' अशी चान्त विशेषणांची रूपे येतात.] ह्मणजे शक ११२८ च्या अगोदर दोनतीनशें वर्षें तो मराठींत आहे. सारांश, या क-च्या विरुद्ध नाना अडचणी दत्त ह्मणून पुढें उभ्या राहतात. असे नानाप्रकारचे गोते ह्या 'त्य-ज-च' [त्य-पासून जन्मलेला 'च.' राजवाडे सं. त्य>प्रा. च्च> मराठी च अशी व्युत्पत्ति मानतात.] नें वैय्याकरणांना दिलेले पाहिले, ह्मणजे मी मी ह्मणणाऱ्या नावाड्यांना वादळांत भिंगरीसारखे गरगर फिरविणाऱ्या एरियलची आठवण होते!

होर्ल्ननें तर ह्या त्य-ज-च ला [त्य-पासून जन्मलेला 'च.' राजवाडे सं. त्य>प्रा. च्च> मराठी च अशी व्युत्पत्ति मानतात.] अगदीं च झिडकारून दिलें आहे. तो ह्मणतो (Comp. Gram. p. 238) :— The Marathi चा is sometimes identified with the Sanskrit suffix त्य (Beames). This theory assumes, that an old suffix has in comparatively modern times changed into an affix; for the Marathi चा is not added to the base (as the Sanskrit suffix), but to the oblique form, i. e., to the old Genitive. Such a change would be altogether unique, without any analogy or evidence to support it.

अनुक्रमणिका

हीं वाक्यें लिहितांना होर्न्ले अनेक ठिकाणीं घसरला आहे : (१) संस्कृत त्य-पासून निघालेला मराठी प्रत्यय 'चा' नसून 'च' आहे. (२) चा प्रत्यय (होर्न्लेचा) मूळ शब्दाला लागत नाहीं. असें तो ह्मणतो. परंतु, घरचँ, गावँच, वगैरे स्थलीं लक्षावधि मूळशब्दांना ('base' of Hoernle) हा प्रत्यय लागतो, हें मीं स्पष्ट करून दाखविलें आहे. (३) इतिहास व परंपरा ह्यांचा दाखला ऊर्फ evidence होर्न्लेला माहीत नव्हता. तो मीं वर भरपूर दाखविला आहे. (४) आतां एक बाब राहिली, विभक्तीच्या रूपाला हा 'त्य' किंवा इतर कोणता हि सफिक्स् अफिक्सप्रमाणें, मराठींत, संस्कृतांत किंवा इतर कोणत्या हि गौड भाषेंत लागल्याची analogy ऊर्फ सदृशता होर्न्लेला हवी आहे. ती हि भरपूर दाखवितां येते. संस्कृत अत्र, तत्र, यत्र, हीं रूपें पूर्ववैदिककालचीं सप्तमीचीं आहेत. ह्यांना 'त्य' सफिक्स् अफिक्सप्रमाणें लागतो. मराठींत तर पूतें सिँ, पूतासिँ ह्या रूपांत तृतीयेच्या पूतें व चतुर्थीच्या पूता ह्या रूपांना सिँ व आसिँ हे प्रत्यय लागलेले मागें दाखविले च आहेत. तेव्हां सादृश्याचें प्रमाण व खेरीज स्वतः मराठीच्या लकबीचें प्रमाण, अशीं दोन अवांतर प्रमाणें हि उपलब्ध आहेत. तस्मात् मराठी 'च' संस्कृत त्य-पासून निघाला आहे, हें सिद्ध आहे.

बीम्स म्हणतो (Comp. Gram., Vol. II, p. 390) की, In old Marathi, this suffix (च) has a lengthened form चिया, चिये, चेनि; but this additional syllable is merely added to eke out the metre." च-चीं चिया, चिये, चेनि हीं रूपें वृत्तसुखार्थ बनविलेलीं नाहींत, हे वर दाखविलें च आहे. हव्या त्या सिद्धीला वाटतील तीं मनःकल्पित कारणें देण्यातं बीम्स व होर्न्ले ह्यांचा हातखंडा आहे !!! Philology ह्मणजे भाषेच्या शारीराचें शास्त्र होय. जुने मराठी ग्रंथ न शोधल्यामुळें त्या भाषेचें इंद्रियविज्ञान, शारीरज्ञान त्यांना पारखें झालें, आणि अनेक बाबींत खऱ्याला सोडून कुड्याला जाण्याचा पंथ त्यांनीं स्वीकारला.

ह्या च — चा पत्ता प्राकृतांत हि लागतो. तुह्मेच्चयं व अह्मेच्चयं अशीं रूपें युष्माकं व अस्माकं या षष्ठीच्या रूपांचीं महाराष्ट्रींत सांपडतात. तुह्मेच्चय-वरून तुमच व अह्मेच्चय-वरून आमच अशीं चान्त रूपें मराठींत होतात. तुह्मेच्चय व अह्मेच्चय हीं विशेषणें आहेत, त्याप्रमाणें तुमच व आमच हीं हि मराठींत विशेषणें आहेत. तुह्मकेर व अह्मकेर हीं महाराष्ट्रींत दुसरीं विशेषणें आहेत, त्यांवरून हिंदी केर, के, क हे षष्ठीचे प्रत्यय निघाले. आणि तुह्मेच्चय व अह्मेच्चय ह्यांतील च्च-वरून मराठी षष्ठीचा च (चा-ची-चें) हा प्रत्यय निघाला. बंगाली षष्ठीचा प्रत्यय 'एर' केर-पासून निघाला आहे. अपभ्रंशांत 'आर' प्रत्यय लागून तुह्मार, अह्मार, तुहार, महार, अशीं रूपें होतात. सारांश, कांहीं गोंड भाषांनीं केर-चा आश्रय केला आणि मराठीनें एच्चय, च्चय, च्च, च प्रत्ययाचा आश्रय केला. हा महाराष्ट्री 'च्च' त्य-पासून निघाला आहे हें वर दाखविलें च आहे. [मराठी षष्ठीच्या 'च' प्रत्ययाचे वरील व्युत्पादन ब्लोक यांच्या मताने 'कृत्रिम' आहे. (मभावि. § २०२). तसेच अलीकडे आल्फ्रेड मास्टर यांनी सुचविलेले (GOM§110) चि < प्रा. चेव, चेअ, चेय, चिअ< सं. चैव हे व्युत्पादनही मान्य होण्याजोगे नाही. त्यापेक्षा स्टेन कोनाउ यांच्या कल्पनेवरून ग्रियर्सन यांनी वैकल्पिक म्हणून दिलेली व ब्लोक यांनी उद्धृत केलेली उपपत्ती (मभावि.§ २०२) अधिक सयुक्तिक आहे. या उपपत्तीनुसार एका कृत्यार्थी धातुसाधितापासून वरील 'च' प्रत्ययाचे व्युत्पादन करता येईल. या धासा. विशेषणाचा उपयोग चान्त विशेषणाप्रमाणे केल्याची उदाहरणे आहेत. उदा., "राजकृत्यं (=राजाचे) उद्यानम्" (महावस्तु, संपा. सेनार, २·५४७). या 'कृत्य' वरून मराठी 'च' येणे अधिक शक्य आहे. याविषयीचे ग्रियर्सन यांचे ह्मणणे A. Kuhn's Zeitschrift, Vol. XXXVIII, pp. 486, 490 येथे पाहावयास मिळेल. त्यातील एक उतारा प्रस्तुत संपादकाने आपल्या "यादवकालीन मराठी भाषा" (आ. दुसरी, १९७३) या ग्रंथाच्या पृ. २४० वर दिला आहे.]

(७) **सप्तमी** :— (संस्कृत) पुत्रे, (महाराष्ट्री) पुत्तम्मि-पुत्ते, (अपभ्रंश) पुत्ति-पुत्ते-पुत्तें-पुत्तहिँ, अशा परंपरेनें पूतिँ, पूते, प्राप्ते, वेले, ठाइँ, दीइँ, [ज्ञानेश्वरींत 'दीं' असें सप्तमीचे एकवचनी रूप येतें (१८.११२१), 'दीइँ' असे येत नाही.] समइँ, वगैरे सप्तमीच्या एकवचनाचीं रूपें निघालीं आहेत.

त्य-पासून निघालेला 'च' प्रत्यय लागून पूतिँ च, ठाइँच, सवइँच, अशीं विशेषणें होतात. सप्तमीच्या रूपांना पंचमीचा 'हूनि' प्रत्यय लागतो ; जसें, घरिँ हूनि.

अनुक्रमणिका

(८) **संबोधन** :— महाराष्ट्री व अपभ्रंश रूपांवरून पूत, पूता हीं संबोधनाचीं रूपें साधिलीं जातात. अपभ्रंशांत पुत्ते असें एकारान्त संबोधनाचें जें रूप येतें त्याच्या धर्तीवर कृष्ण या शब्दाचें संबोधन कृष्णे असें जुन्या अभंगांतून सांपडतें. कृष्णे, विठ्ठले, विठे ही रूपें भक्तिदर्शक व प्रेमदर्शक समजतात; हीं स्त्रीलिंगाचीं रूपें नाहींत, हें स्पष्ट आहे. [हें विधान मान्य करणे कठिण आहे. कारण वरील उदाहरणांत मूळ प्रातिपदिकच पुल्लिंगाचें स्त्रीलिंगी केल्यानें त्याचीं हीं संबोधनाचीं रूपेंही स्त्रीलिंगीच मानणें भाग आहे.] कारण विठ्ठले ह्या संबोधनरूपाचा मूळ शब्द विठ्ठल असा आहे. गोविंदे असें रूप अभंगांतून आढळतें.

(९) (शब्दयोगी अव्ययाच्या मागें येणाऱ्या विभक्त्या) :—

मजजवळील ज्ञानेश्वरींत शब्दयोगी अव्ययांच्या मागें येणाऱ्या अकारान्त पुल्लिंगी नामांच्या विभक्त्या येणेंप्रमाणें च होतात:—

द्वितीया एकवचन :— कल्पान्तुवेऱ्हीं, मोक्षवाँचौनि, क्षणलग, गावँभरि, क्षणवरि.
तृ. ए. :— उपायेँ विण, धर्मँ हीन.
च. ए. :— पापावाँचौनि, व्यापारालागौनि, अर्थातव, अर्जुनाप्रति, स्वर्गालागिं.
ष. ए. [या सदरातील राजवाडे यांनी दिलेलीं उदाहरणे षष्ठी विभक्तीचीं कशी होऊ शकतात ते समजणें कठिण आहे.] :— रसाआँतु, नायकापासौनि, पाखाणामाझि, कानाकरविँ, द्रोणापासिँ.

कोणत्या हि शब्दयोगी अव्ययाच्या मागें प्रथमा, पंचमी, सप्तमी व संबोधन ह्या विभक्त्यांचीं रूपें येत नाहींत. सविँ-पासून निघालेला ‘सिँ’ तृतीयेचा व आर्श्वे-पासून निघालेला ‘आसिँ’ चतुर्थीचा जोड प्रत्यय झाल्यामुळे सिँ व असिँ-सि हीं दोन अव्ययें विभक्तिप्रत्ययांत गणलीं पाहिजेत.

वरील कोष्टकावरून दिसतें कीं, ज्याप्रमाणें संस्कृतांत शब्दयोगी अव्ययामागें नामांच्या निरनिराळ्या विभक्त्या येतात, त्याप्रमाणें च ज्ञानेश्वरकालीन मराठींत शब्दयोगी अव्ययामागें नामाच्या निरनिराळ्या विभक्त्या येतात. वांशिक स्वभाव तो हा च. [‘शब्दयोगी अव्ययाच्या मागें येणाऱ्या विभक्त्या’ या मथळ्याखालील राजवाडे यांचें सर्वच विवेचन अशास्त्रीय वाटतें. कारण शब्दयोगी अव्ययाच्या मागें नामाचें विभक्तिरूप नव्हे, तर त्याचें ‘सामान्यरूप’ येतें, व तें अमुक एका विभक्तीचें असें म्हणता येत नाहीं. त्यामुळें कोणत्याहि शब्दयोगी अव्ययाच्या मागें विशिष्ट विभक्त्यांचीं रूपें येत नाहींत या म्हणण्याला कांही अर्थ उरत नाहीं. तसेंच, तृतीया व चतुर्थी यांचे अनुक्रमें सिँ व आसि हे उघड प्रत्यय असताना त्यांना अव्ययें कसें म्हणतां येईल?]

वर्तमान मराठीनें शब्दयोगी अव्ययांपुरती ही निरनिराळ्या विभक्त्या करण्याची चाल अलीकडे दोन-अडीचशें वर्षे ह्मणजे रामदासानंतर मोडिली आहे. सध्या सर्व शब्दयोगी अव्ययांच्या मागें अकारान्त पुल्लिंगी नामाचें एक च आकारान्त रूप येतें. अनेकविधता मोडून एकविधता स्वीकारण्याचा जो व्यस्त [‘व्यस्त’ भाषा म्हणजे विश्लेषणात्मक किंवा Analytical भाषा; उदाहरणार्थ, इंग्रजी भाषा.] भाषांचा स्वभाव तो येथें अमलांत आला आहे. ह्या च एकविध आकारान्त रूपाला आधुनिक वैय्याकरण सामान्यरूप ह्मणतात. परंपरा माहीत नसल्यामुळें ह्या सामान्यरूपासंबंधानें बीम्स, होर्न्ले वगैरे पाश्चात्य वैय्याकरणांनीं बरें च अकांडतांडव केलें आहे. त्यासंबंधानें जें कांहीं लिहावयाचें तें पुल्लिंगी नामांच्या अनेकवचनाचा विचार झाल्यावर लिहिणें प्रशस्त होईल. [सामान्यरूपाविषयीचें राजवाडे यांचें विवेचन पुढे परिच्छेद क्र. ४-२१, २२ मध्ये थोडें व परिच्छेद क्र. ४२-२ मध्ये थोडें आलें आहे. त्यांचे निष्कर्ष दोन :— (१) ज्ञानेश्वर कालीन मराठीत सामान्यरूप नाहीं, व (२) वर्तमानकालीन मराठींतील सामान्यरूप ज्ञानेश्वरी मराठींतील विभक्तिरूपांवरून आलेलें आहे. यांचा विचार पुढे केला आहे.]

अनुक्रमणिका

(१०) चिकुर्डे येथील शक संवत् ६५८ तील विजयादित्य चालुक्याच्या मराठी ताम्रपटांत (‘विश्ववृत्त’ मासिक पुस्तक) [जानेवारी १९०७ (अंक १०).] अकारान्त पुल्लिंगी नामांच्या एकवचनाचीं खालील रूपें येतात [चिकुर्डे ताम्रपट हा बनावट असल्यामुळें त्यांतील शब्दरूपांचीं चिकित्सा करण्यांत कांही अर्थ नाहीं व त्यांचा आधार घेणेंही योग्य नाहीं. आज हा ताम्रपट कोणीही मान्य करीत नाहीं.]:—

प्रथमा :— सतानिकु, ग्राम, वोवलः, पुंज.
द्वितीया :— विजयं, कटकमेलिकार, सर्पयाग.
तृतीया :— पेवेन, ग्रामेन.
चतुर्थी :— मूलिका, राया, देवा, राणा, सौनारा, क्षेत्रजा, अनामिका.
पंचमी :— पाषाणत, उतरत, भ्यंतरत, ० असत, ० क्षयत.
षष्ठी :— देवा, ग्रामा.
सप्तमी :— दिसावरे, तदनंतरे, मस्तके, दिसावरी.

हीं रूपें अपभ्रंशांतील रूपांशीं ताडून पहातां दिसून येईल कीं, शक ६५८ त मराठी रूपें अपभ्रंशांतून आस्ते आस्ते निसटून पक्की मराठी बनत चाललीं होतीं. वैशद्यार्थ : (१) अपभ्रंशांत अकारान्त पुल्लिंगी नामांच्या प्रथमेचें एकवचन नियमानें उकारान्त असतें. ह्या शक ६५८ तील ताम्रपटांत ‘उ’ काढून टाकून, अकारान्त एकवचन करण्याकडे प्रवृत्ति दिसते. ही प्रवृत्ति ज्ञानेश्वरींत हि दिसून येते. (२) द्वितीयेचा हि ‘उ’ ह्या ताम्रपटांत काढून टाकला आहे. अपभ्रंशांत ‘उ’ नियमानें असतो. (३) ताम्रपटांत ‘इन’ प्रत्ययान्त तृतीयारूपें आहेत. हा ‘न’ वस्तुतः अनुनासिकासारखा उच्चारावयाचा आहे. (४) चतुर्थीचीं रूपें अपभ्रंशांतल्याप्रमाणें व ज्ञानेश्वरींतल्याप्रमाणें आकारान्त आहेत. (५) तस्-पासून निघालेल्या त्तो (पुत्तात्तो) प्रत्ययापासून ‘त’ प्रत्यय ताम्रपटांत योजला आहे. अपभ्रंशांत तस्-चा ‘तो’ होतो. (६) अपभ्रंशांत षष्ठी स्सुकारान्त किंवा हकारान्त असते. ह्या ताम्रपटांत ज्ञानेश्वरींतल्याप्रमाणें निव्वळ आकारान्त आहे. (७) अपभ्रंशांतल्याप्रमाणें व ज्ञानेश्वरींतल्याप्रमाणें येथें सप्तमी एकारान्त व ईकारान्त [इँकारान्त] आहे. अपभ्रंशांत इ-वर अनुनासिक नाहीं, ज्ञानेश्वरींत आहे; ह्या ताम्रपटांत ई दीर्घ असून तिच्यावर अनुनासिक नाहीं. म्हणजे, अपभ्रंश व ज्ञानेश्वरी ह्यांच्यामध्ये ह्या ताम्रपटांतील भाषेचें रूप पडतें.

## ८. अकारान्त पुल्लिंगी नामांचें द्विवचन

(११) ज्ञानेश्वरींत दहा पांच स्थलीं अकारान्त पुल्लिंगी नामांच्या द्विवचनाची रूपें येतात; जसें :—

म्हणौनि उदकी ॅ हान रसु । कॉं पवनी ॅ जो स्पर्शु ।
शशिसूँर्या जो प्रकाशु । तो मी चि जाण ॥

अध्याय ७, ओवी ३२ ॥

येथें शशिसूर्यां हें रूप सप्तमीच्या द्विवचनाचें आहे. कारण, सूर्य ह्या शब्दाचें सप्तमीच्या एकवचनाचें रूप सूर्यिं असें ज्ञानेश्वरींत होतें; व अनेकवचनी रूप सूर्यी ॅ असें होतें. ० सूर्यां असे रूप ह्या दोहोंपैकी नाहीं. “प्रभास्मि शशिसूर्ययोः” ह्या प्रतीकांतील सूर्ययोः हें सप्तमीचें द्विवचन आहे व त्याचे भाषान्तर ज्ञानदेवानें

अनुक्रमणिका

शशिसूयाँ असें द्विवचनी केलें हे. उदकीं, एवनीं, ह्या जशा एकवचनी सप्तम्या आहेत, तशी च शशिसूयाँ ही द्विवचनी सप्तमी आहे.

सारांश, द्विवचनाची आठवण, अंधुक आठवण, ज्ञानेश्वराच्या वेळीं होती. [हें म्हणणे बरोबर नाहीं. राजवाडे यांनीं दिलेले शशिसूयां हें द्विवचनाचें ज्ञानेश्वरींतील एकमेव उदाहरणही निरपवाद नाहीं; कारण इतर पोथ्यांतून या ठिकाणीं 'शशिसूर्यीं' असा पाठ मिळतो व तोच बरोबर दिसतो. चिकुर्डे-ताम्रपट बनावट असल्यानें त्यांतील उदाहरणें कुचकामी होत. उरतां उरलीं तत्कालीन महानुभावीय ग्रंथांतून येणारीं 'उपानौ' किंवा 'उपाहानौ' यासारखीं रूपें (उदा; लीळाचरित्र, एकाक ७०, ७१). हीं रूपें म्हणजे सं. उपानहौ या द्विवचनी रूपाचा अपभ्रंश असून तेवढ्यावरून तीं मराठी द्विवचनाचीं रूपें ठरत नाहींत. शिवाय, अशीं उदाहरणें उपानह, कर, चरण, चक्रवाक यांसारख्या द्वित्व किंवा जोडी अभिप्रेत असलेल्या शब्दांपुरतींच सांपडतात, हेंही ध्यानांत घेण्यासारखें आहे.)] चिकुर्डे येथील शक ६५८ तील मराठी ताम्रपटांत ग्रामौ, द्वौ, पाषाणौ, ग्रामा, अशीं द्विवचनाचीं रूपें आली आहेत. [चिकुर्डे ताम्रपट प्रमाण नसल्याने त्यातील उदाहरणे गैरलागू होत.] प्राकृतांत द्विवचन नाहीं, असें प्राकृत वैय्याकरण म्हणतात खरें; परंतु चिकुर्डे येथील ६५८ तील ताम्रपटावरून व ज्ञानेश्वरींतील शशिसूर्या ह्या रूपावरून प्राकृतिकोद्भव मराठी भाषेंत तें कांहीं काल होतें, ह्यांत बिलकूल संशय नाहीं. कोणता हि प्रचार आस्ते आस्ते लोप पावतो. प्राकृत वैय्याकरण द्विवचन अजीबात एकदम काढून टाकतात, तें जरा चमत्कारिक व आकस्मिक भासतें. शक ६५८ व शक १२१२ त जर मराठींत द्विवचन आढळतें तर महाराष्ट्री व महाराष्ट्री-अपभ्रंश बोलणारांत तें प्रचारांत असलें पाहिजे. प्राकृतांत चतुर्थी नाहीं, असा दडपेबाजीचा नियम प्राकृत वैय्याकरण देतात. परंतु चतुर्थीच्या एकवचनाचीं रूपें पिशेलनें दहावीस दिलीं आहेत. त्यावरून, एक तर, प्राकृत वैय्याकरणांची दृष्टि पाणिनीप्रमाणें सर्वकष नव्हती, असें म्हणावें लागतें ; किंवा द्विवचनाचा व चतुर्थीचा लोप करण्याची सुधारणा करण्याचें मनांत येऊन त्यांनीं हा नियम आपल्या व्याकरणांत घालून दिला असावा, असा पक्ष काढावा लागतो. [राजवाड्यांची वरील विचारसरणी सर्वथैव चुकली आहे असें मत व्यक्त करून चिं. वि. वैद्य यांनी प्राकृतांत चतुर्थी ही निराळी विभक्ती नाहीं ('चतुर्थ्याः षष्ठी') या वररुचीच्या मताचा पुरस्कार केला आहे. ते म्हणतात : "प्राचीन वैय्याकरण वररुचि याजला आधुनिक वैय्याकरणंमन्यांच्या पंक्तीला बसविणें-व तेंही राजवाड्यांनीं-हें उचित नाहीं, व धडधडीत विरोधी आहे." (निबंध आणि भाषणें, पृ. ११७).] हा दुसरा पक्ष काल्पनिक नाही. भाषा सुधारण्याचा आंव घालण्याचे वारें वैय्याकरणांना कधीं कधीं परभाषासंसर्गानें येतें. परवां, अनुनासिकावर हल्ला करण्याचा बूट आपल्या इकडील वैय्याकरणंमन्यांनीं [हे 'वैय्याकरणंमन्य' ह्मणजे बहुधा रा. भि. जोशी असावे. इ. स. १८९८ मध्ये का. ना. साने, रा. प. गोडबोले आणि शं. रा. हातवळणे यांनी मराठीच्या शुद्धलेखनात काही सुधारणा सुचविणारे एक पत्रक काढले. पुढे १९०४ साली हातवळण्यांचे 'मराठी भाषेची लेखनपद्धति' हे पुस्तकही प्रसिद्ध झाले. परंतु वरील तिघांपैकी कोणी वैय्याकरणी नव्हता. तसा पाठिंबा वरील 'मुनित्रया' ला रा. गो. भांडारकर आणि रा. भि. जोशी यांच्याकडून मिळाला. त्यामुळे व 'सुबन्त-तिङन्त विचारा'त राजवाड्यांनी रा. भि. जोशांचा जो उपहास केला आहे त्यावरून वरील उल्लेख त्यांचा असावा असे वाटते. (डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्या मराठी व्याकरणेतिहासावरील अप्रकाशित प्रबंधाच्या आधारे.)] काढलेला सर्वश्रुत च आहे.

## ९. अकारान्त पुल्लिंगी नामांचे अनेकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. :— पुत्राः | पुत्ता | पुत्त | पूत |
| द्वि. :—पुत्रान् | पुत्ते | पुत्ता-पुत्त | पूता, पूताँ |
| तृ. :—पुत्रैः | पुत्तेहि-हिं-हिँ | पुत्तहि-हिं-हिँप | पूतिं, पूतीँ |
| | | पुत्तेहि-हिं-हिँ | पूतीँ सि |
| च. :— पुत्रेभ्यः | | | पूताँ, पूताँसि-सिँ, पूताँते |
| पं. :— पुत्रेभ्यः | पुत्ताओ, | पुत्तहु | पूताँहून-नि-नियाँ |
| | पुत्ताउ, | | पूताँतोन-नि-नियाँ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | पुत्तात्तो | | पूतौनि-नियाँ, पूतौनु |
| ष. :— पुत्राणाम् | पुत्ताण-णं-णँ | पुत्ताहँ, पुत्तहँ, पुत्ताणं | पूताँ (चा-ची-चें) |
| स. :— पुत्रेषु | पुत्तेसु-सुं-सुँ | पुत्तहिँ, पुत्तेहिँ, पुत्तिहिँ | पूतीँ |
| सं. :— पुत्राः | पुत्ता, पुत्ताहो | पुत्तहोँ-हो | पूताँहो, पूतहो. |

मजजवळील ज्ञानेश्वरींत अकारान्त पुल्लिंगी नामांच्या एकवचनाचीं रूपें येणेंप्रमाणें येतात—

प्रथमा :— विशेष, भाव, गणेश, अभिप्राये, ठाये, राय.
द्वितीया :— विशेष, भाव, गणेश, अभिप्राये, ठाये, राये, भावाँ, रायाँ.
तृतीया :— पंडितीँ, देवीँ, भटिँ-टीँ, लोकपालिँ, सज्जनीँ, अभिप्राईँ, ठायीँ, रायीँ, गावीँ, देवीँ सीँ, पंडितिँ, देविँ.
चतुर्थी :— रसाँ, देवाँ, मेघाँसि, मेघाँतेँ, भूताँतें, रायाँ, ठायाँ.
पंचमी :— सनकादिकाँहूनि, मूडाँहूनि, मेघांतु, मेघांतूनि.
षष्ठी :— दोखाँची, पायाँ, दिआँ.
सप्तमी :— चरणीँ, तरंगीँ, बाहीँ, पायीँ, ठाइँ.
संबोधन :— बापा, प्राणिगणहो, जनहो, लोकहो, पूताँहो-होँ.
शब्दयोगी :— अर्थातँव, दोखाँवरि, रसाँलागौनि, कल्पवेन्हीँ, धर्मीँ हीन, देवीँ विण, अवयवाँमाझि.

(१२) प्रथमा :— अपभ्रंशांतील पुत्तपासून मराठी पूत. ज्ञानेश्वरींत ठाय, राय, वगैरे यकारान्त नामांची ठाये, राये, अशीं एकारान्त रूपें केवल दर्शनी एकारान्त आहेत. वस्तुतः तीं अकारान्त च आहेत. य-चा उच्चार 'ये' करण्याकडे जुन्या मराठीचा कल फार; जसें, होय बद्दल होये, जाय बद्दल जाये; तसें च ठाय बद्दल ठाये, व राय बद्दल राये.

(१३) द्वितीया :— पुत्ता ह्या रूपापासून अनुनासिकीकरणानें पूताँ असें रूप होतें. अनुनासिकीकरणाचें कारण पुढें दिलें आहे.

(१४) तृतीया :— अपभ्रंशांतील पुत्तहिँ-पासून पूतीँ. सिँ प्रत्यय लागून पूतीँ सिँ. पुत्तहिँ = पुत्त+ ँ + इँ = पुत्तँ + इँ = पूतिँ-तीँ.

(१५) चतुर्थी :— अपभ्रंशांतील चतुर्थीच्या अनेकवचनाचीं रूपें उपलब्ध नाहींत. चतुर्थीच्या एकवचनाचें जें 'पूता' रूप त्याच्यावर अनुनासिक देऊन, पूताँ हें रूप साधलें आहे.

(१६) पंचमी :— पुत्तहुँ = पुत्त + ँ + हुँ = पूताँहून — नि—नियाँ.
(महाराष्ट्री) पुत्तात्तो = पुत्ता + ँ + त्तो = पूताँतोन- नि-नियाँ, पूताँतून-नि-नियाँ.
(महाराष्ट्री) पुत्ताउ= पुत्ता + ँ + उ = पूतौन-नि-नियाँ.

(१७) षष्ठी :— पुत्तहँ = पुत्त + ँ + अँ = पूताँ.

अनुक्रमणिका

(१८) सप्तमी :— पुत्तिहिँ = पुत्ति + ँ + इँ = पूतिँ-तीँ.

(१९) संबोधन :— पुत्तहोँ = पुत्त + ँ + होँ = पूताँहोँ.
पुत्तहो = पुत्त + ँ + हो = पूताँहो.
पुत्तहो = पूतहो-होँ.

(२०) शब्दयोगी :— एकवचनाप्रमाणें च अनेकवचनांत शब्दयोगी अव्ययांच्या मागें निरनिराळ्या विभक्त्यांचीं रूपें येतात.

द्वितीया :— पूतवेऱ्हीँ, इ-इ. [इत्यादि, इत्यादि.]
तृतीया :— पूतीँ विण, इ-इ.
चतुर्थी :— पूताँतव, इ-इ.
षष्ठी [मागे (९) मध्येही राजवाडे यांनी 'पासिँ' हे षष्ठीचे शब्दयोगी अव्यय ह्मणून दिले आहे.] :— पूताँपासिँ, इ-इ.

(२१) येणेंप्रमाणें अकारान्त पुल्लिंगी नामांच्या अनेकवचनाचीं रूपें आहेत. पैकीं, प्रथमेच्या रूपांसंबंधानें विशेष कांहीं नमूद करण्यासारखें नाहीं. द्वितीयेपासून संबोधनाच्या रूपांसंबंधानें, मात्र, एक बाब विचारार्ह आहे. (द्वि.) पूताँ, (तृ.) पूतिँ-तीँ, (च.) पूताँ-सि-तैँ, (पं.) पूताँहून-नि-नियाँ, (ष.) पूताँ, (स.) पूतीँ, (सं.) पूताँहो, ह्या सहा विभक्त्यांच्या रूपांत अनुनासिक नियमानें आढळतो. ह्मणजे ह्या सहा विभक्त्यांत अनुनासिक हा अनेकवचनाचें चिन्ह आहे, असें ह्मणावें लागतें. हा अनुनासिक कोठून आला? ह्याची परंपरा काय? की, हा मराठीनें आगन्तुक आणिला?

अपभ्रंशांत तृतीया, षष्ठी, सप्तमी व संबोधन, ह्या चार अनेकवचनी विभक्तिप्रत्ययांचे अंत्य स्वर सानुनासिक आहेत; चतुर्थीचें अनेकवचनी रूप उपलब्ध नाहीं; आणि द्वितीया व पंचमी यांच्या प्रत्ययाचे अंत्य स्वर निरनुनासिक आहेत. हा पंचमीचा 'हु' व द्वितीयेचा 'आ' विकल्पाच्या नियमानें सानुनासिक असूं शकेल. परंतु हुँ-वरचा अनुनासिक मागील ता-वर कोणत्या हि नियमानें येऊं शकणार नाहीं. हा च प्रकार संबोधनाचा हि आहे. होँ-वरचा अनुनासिक मागील ता-वर कसा येणार?

महाराष्ट्रींत तृतीया, षष्ठी व सप्तमी, ह्या तीन अनेकवचनी विभक्तिप्रत्ययांचे अंत्य स्वर अपभ्रंशांतल्याप्रमाणें च सानुनासिक आहेत, आणि पंचमी व संबोधन ह्या दोन विभक्तिप्रत्ययांचे अंत्य स्वर सानुनासिक नाहींत. महाराष्ट्रींत चतुर्थीचें अनेकवचन एकवचनाप्रमाणें उपलब्ध नाहीं. पंचमी व संबोधन, ह्या विभक्त्यांच्या प्रत्ययाचे अंत्य स्वर विकल्पाच्या बलावर सानुनासिक होऊ शकतील. परंतु, दोन्ही प्रत्ययांतील (पुत्ताउ, पुत्ताहो) 'उ' व 'हो' ह्या अक्षरांमागील त्ता-वर अनुनासिक कोणत्या नियमानें येणार?

अपभ्रंशांत व महाराष्ट्रींत विकल्पाच्या सवलतीनें कोणता हि स्वर विकल्पानें सानुनासिक होऊं शकतो. परंतु मराठींतील तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी व संबोधन ह्या विभक्त्यांचें अनुक्रमें इँ, अँ, हून-तून, अँ, इँ. व हो, ह्या प्रत्ययांच्या मागील अनुक्रमें त्त, त, त्त-त्ता, त्त, त्ति व त्ता ह्या अक्षरांवर अनुनासिक आवश्यक असावा लागतो, वैकल्पिक असून चालत नाहीं. तेव्हां, मराठींतील ह्या अनेकवचनाच्या अनुनासिकाची परंपरा अपभ्रंश किवा महाराष्ट्री भाषांच्या द्वारा लागणें शक्य दिसत नाहीं.

अर्थात्, हा अनुनासिक आगंतुक, ह्मणजे प्राकृतेतर आर्य भाषांतून किंवा भाषांच्या संसर्गानें मराठींत आला असला पाहिजे.

पल्हवी व जुनें फारसी ह्या भाषांत 'आन्' प्रत्यय लागून अनेकवचन होतें; जसें मलिक्, मलिकान्. संस्कृतांत अकारान्त पुल्लिंगी नामांच्या द्वितीयेचें अनेकवचन 'आन्' प्रत्यय लागून होतें. तसें च षष्ठीचा अनेकवचनी 'आम्' प्रत्यय लागण्यापूर्वी, अजन्त पुल्लिंगी, नपुंसकलिंगी व स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन 'आन्' प्रत्यय लागून होतें; जसें, देवान् + आम्, कमलान्+ आम्, नदीन्+आम्, गुरून+आम्, पितृन् + आम्, विद्यान् + आम्, धीन् + आम्, इ. इ. ह्मणजे, 'आन्' हा संस्कृतांत अनेकवचनाचा एक प्रत्यय आहे व तो द्वितीया व षष्ठी ह्यांच्या प्रत्ययांच्या आधीं लागतो. पल्हवींत व फारशींत हि हा 'आन्' प्रत्यय द्वितीयेच्या अनेकवचनी प्रत्ययाच्या आधीं लागतो; जसें, शाहान् + रा. मराठींत हि द्वितीयेपासून संबोधनापर्यंतच्या अनेकवचनी प्रत्ययांच्या आधीं अनुनासिक लागतो. तेव्हां, आन् = आँ = ँ, अशा परंपरेनें मराठींत अनुनासिक अनेकवचनाचा एक प्रत्यय बनला आहे व तो द्वितीयेपासून सबोधनापर्यंतच्या अनेकवचनी विभक्तिप्रत्ययांच्या पूर्वी अंगांना लागतो. मराठींतील अनुनासिकाची परंपरा ही अशी आहे. [पुढें क्र. ४२ मध्यें "हा अनुनासिक फारसीचा संसर्ग होण्याच्या पूर्वी मराठींत आला. अर्थात् संस्कृतांतील षष्ठीच्या व द्वितीयेच्या 'आन्' पासून याची उत्पत्ति आहे यांत संशय नाहीं." अशी वरील परंपरेच्या विरुद्ध विधाने स्वतः राजवाड्यांनीच केली आहेत. याचा अर्थ त्यांच्या लिहिण्यात विसंगती आहे. शिवाय, अनेकवचनी अनुनासिक फारसींतील 'आन्' या प्रत्ययापासून आला हे त्यांचें पहिलें ह्मणणेंही कोणाला मान्य होण्यासारखे नाही. (पहा:— चिं. वि. वैद्यः निबंध आणि भाषणें, पृ. १२९).] हा अनुनासिक मराठींतल्या तिन्ही लिंगांच्या नामांच्या द्वितीयेपासून संबोधनापर्यंतच्या अनेकवचनी रूपांचें नियतचिन्ह आहे.

ह्या अनेकवचनविषयक अनुनासिकाचा छडा बीम्स किंवा होर्न्ले ह्या दोघांतून एकानें हि लाविला नाहीं; इतकें च नव्हे, तर हा प्रश्न च त्यांनीं काढला नाहीं. [ही टीका निराधार व म्हणून चुकीची आहे. बीम्सनें या अनुनासिकाचा छडा लावला आहे. तो लावतांना त्यानें म्हटलें आहे, "Precisely similar are the Marathi forms which are strictly analogous to the singular oblique forms of each class, only differing by the insertion of anuswara which eviently points back to the 'ण' of the Prakrit genitive." (A Comp. Grm. Of M. A. L., Vol. II . p. 221).] पाहिलें तर, मराठींतील विभक्तींकडे जो वरवर हि पाहील, त्याला हा अनुनासिक पदोपदीं भेटेल. तशांत, पहाणारा जर वैय्याकरण असेल, तर त्याच्या कटाक्षांत तो प्रथमदर्शनीं येईल, आणि त्याचें कुळगोत तो धुंडावयाला लागेल.

बीम्स व होर्न्ले या दोन्ही वैय्याकरणांनीं वचनप्रकरणीं बर च लिहिलें आहे. त्यांत वर्तमान मराठींतील सामान्य रूपानें त्यास फार छळलें. ज्ञानेश्वरकालीन मराठींत विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्ययें ह्यांच्या पूर्वी नामांचें सामान्यरूप होत नसे, हें वर केलेल्या पृथक्करणावरून सिद्ध च आहे. तथापि, स्पष्टतेकरितां ज्ञानेश्वरकालीन अकारान्त पुल्लिंगी नामांचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय येथें देतों आणि त्यांची तुलना वर्तमान मराठी प्रत्ययांशीं करतों.

**प्रत्यय**

| | जुनें मराठी | | नवें मराठी | |
|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
| १. | उ* | — | — | — |
| २. | उ* | ०-आँ | ०-आ | ०-आँ |
| ३. | इन-इँ-इँसिँ | इँ*- इँ*-इँसिँ | इं*-एँ*-आनँ*- | ई *- आँनी *- आँहीँ- |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आशीँ | आँशीँ |
| ४. | आ-आसि-आतैँ-थैँ | आँ-आँसि- आँतैँ-आँथैँ | आस-आला-आतैँ | आँस-आँला-आंतैँ-आँना |
| ५. | आहून-नि-नियाँ, | आँहून-नि-नियाँ, | | |
| | आतून-नि-नियाँ, | आँतून-नि-नियाँ. | | |
| | ओनि-नियाँ, | ओनि-नियाँ | आहून- | आँहून- |
| | आनु, आतु | आँतु | आँतून | आँतून |
| | आतोन-नि-नियाँ | आँतोन-नि-नियाँ | | |
| ६. | आ | आँ | आ | आँ |
| ७. | इ*-ए* | ˘ई* | ˘ई*-आँत | ˘ई*-आँत |
| ८. | आ—० | हो-आँहो-० | आ | आँनो-हो |
| शब्दयोगी अव्ययें | | शब्दयोगी अव्ययामागें निरनिराळ्या विभक्त्या येतात. | शब्दयोगी अव्ययामागें मूळ प्रातिपदिकाला (एकवचनी) आ व (अनेकवचनी ) आँ प्रत्यय लागतो. | |

* नक्षत्र ज्या प्रत्ययांवर आहे त्यांच्या आधीं प्रातिपदिकाच्या अंत्य स्वराचा, झणजे अ-चा लोप होतो. (राजवाडे).

(२२) प्रथमा :— नव्या मराठीनें एकवचनाचा उ-प्रत्यय सोडून दिला आहे.

चतुर्थी :— नव्या मराठींने आसि-आँसि ह्या प्रत्ययांतील इ-च्या ऐवजीं ‘अ’ ठेविला आहे. फारसी ‘रा’ प्रत्ययावरून ‘ला’ प्रत्यय घेतला आहे व ह्या ला-च्या मागें आसि प्रत्ययाच्या धर्तीवर ‘आ’ लावून, ‘आला’ असा प्रत्यय बनविला आहे. [मराठी ला < फारसी रा, या वरील व्युत्पादनाविषयी मागे तळटीपेंत लिहिलेच आहे. तसेच ‘आला’ असा प्रत्यय मानणे अशास्त्रीय आहे. ‘आ’ हा सामान्यरूपाचा होणारा विकार आहे.] अनेकवचनाचा अनुनासिक येऊन आँला, आँना, असे अनेकवचनी प्रत्यय साधले आहेत.

पंचमी :— आहून-आतून, आणि आँहून-आँतून हे दोन च प्रत्यय नव्या मराठीनें स्वीकारले आहेत.

षष्ठी :— जुन्या मराठीचे च प्रत्यय नव्या मराठीनें ठेविले आहेत. चकारान्त आँच-आच विशेषणें असल्यामुळें तीं षष्ठी प्रत्ययांत गणणें अशास्त्र आहे.

सप्तमी :— जुन्या मराठींतील ई-˘ई प्रत्यय नव्या मराठीनें तसे च स्वीकारून शिवाय, आत-आँत हे नवे प्रत्यय बनविले आहेत.

अनुक्रमणिका

संबोधन :– ‘आ’ व ‘हो’ हे प्रत्यय नव्या मराठीनें कायम ठेविले आहेत. आँहो प्रत्ययातील अनुनासिकाचा नकार बनवून आन्हो हे रूप प्रथम बनलें आणि नंतर न्हो-मधील महाप्राण काढून टाकून ‘नो’ असा प्रत्यय बनला.

नव्या मराठींत, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, व संबोधन ह्यांच्या एकवचनाच्या व अनेकवचनाच्या प्रत्ययांत फरक फक्त अनुनासिकाचा आहे. ह्या पांच विभक्त्यांचे जुने प्रत्यय सोडून दिले आणि नव्या प्रत्ययांकडे पाहिलें, तर असें दिसून येतें कीं, ह्या पांची विभक्त्यांचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय आ-नें सुरू होतात. अनेकवचनी आ-वर अनुनासिक असतो, एवढा च काय तो एकवचनी प्रत्यय व अनेकवचनी प्रत्यय यांजमध्यें भेद आहे.

नव्या मराठींत द्वितीया व तृतीया ह्या विभक्त्यांनीं हि हा च मार्ग स्वीकारून चतुर्थ्यादि पांच विभक्त्यांच्या प्रत्ययांचें अनुकरण केलें आहे. तें असें :– अपभ्रंशांतील पुत्तहिँ ह्या रूपावरून जुन्या मराठींत पूतीँ-तिँ अशीं तृतीयेचीं अनेकवचनी रूपें होतात. हीं रूपें जुन्या मराठींत अकारान्त पुल्लिंगी नामाचीं होतात. अकारान्त सर्वनामांच्या तृतीयेच्या अनेकवचनाचीं रूपें एहिँ प्रत्यय लागून होत. अपभ्रंशांत तृतीयेच्या अनेकवचनाचें पुत्तेहिँ असें एक रूप आहे. (सं.) पुत्रैः= (महा.) [येथें मुळांत मुद्रणदोष असून महाराष्ट्रींत पुत्तेहिँ असें रूप होतें.] पुत्रेहिँ =(अपभ्रंश) पुत्तेहिँ= (जुनें मराठी) पूतेहिँ. हें रूप, अकारान्त पुल्लिंगी नामाचें यद्यपि मजजवळील ज्ञानेश्वरींत नाहीं, तत्रापि शक १२०० त पूतेहिँ असें रूप भाषेंत प्रचलित होतें, ह्यांत संशय नाहीं. कारण, तृतीयेच्या अनेकवचनाचीं हीं हिँ कारान्त रूपें शक १२८९ तील नागांव येथील शिलालेखांत सांपडतात. [नागांव शिलालेखांत हिँ कारान्त रूपें नाहींत. काही इँ-ॅ ईकारान्त रूपे आहेत; उदा.,मथि प्रतिपाळावें (ओ. २७), **बाळगोपाळिं** घेतलें (ओ. १३) (तुळपुळे : प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ. २८८-२८९)] सर्वनामांना तर, हा तृतीयेच्या अनेकवचनाचा हिँ कारान्त प्रत्यय नियमानें लागतो. सारांश, पूतेहिँ हें रूप जुन्या मराठींत अपभ्रंशांतील पुत्तेहिँ ह्या रूपावरून आलेलें आहे. पूतेहिँ ह्या रूपांतील अनुनासिकाचा नकार बनवून आणि न् व ह ह्यांचा स्थलविपर्यास करून पूतेन्हि असें रूप साधलें आहे. महाप्राण काढून टाकून पूतेनि असें रूप बनलें. चतुर्थ्यादि सर्व विभक्त्यांचे प्रत्यय नव्या मराठींत आ-आदि आहेत. त्यांच्या अनुकरणानें पूतेनि ह्या रूपांतील ए-च्या ऐवजीं आ उच्चारला जाऊं लागला. कारण, सामान्य लोकांचा कल, प्रायः, एकविधतेकडे व सुलमोच्चाराकडे असतो. तात्पर्य, पूतानि असें रूप नव्या मराठींत बनलें. परंतु, एकविधतेंच्या दृष्टीनें ह्या रूपांत एक न्यूनता राहिली होती. इतर चतुर्थ्यादि विभक्त्यांच्या अनेकवचनी रूपांतील अनुनासिक ह्या पूतानि रूपांत नव्हता. तो हि देणें एकविधतेस्तव भाग पडलें. येणेंप्रमाणें, पूताँनि-निँ हें सानुनासिक रूप सिद्ध झालें. एवढ्यानें च, ह्या तृतीयेच्या अनेकवचनी रूपाचे खेळ आटोपले, असें नाहीं. (अनेकवचन) पूताँ + निँ, असे इतर विभक्त्यांप्रमाणें विभाग पाडून, तृतीया एकवचनार्थ पूता, असें रूप बनविलें; आणि नि-निँ ह्या अनेकवचनी प्रत्ययाचे एकवचनप्रत्ययरूप नें (मोत्यें, मोतीं) असें केलें. मिळून तृतीयेच्या एकवचनाचें पूतानँ हें रूप अवतीर्ण झालें. सारांश, नव्या मराठींत, तृतीयेच्या अनेकवचनी रूपावरून तृतीयेचें एकवचनी रूप साधलें गेलें आहे. [तृतीयेच्या ‘नें’ या प्रत्ययाची वरील व्युत्पत्ति अभिनव असली तरी सहज मान्य होण्यासारखी नाहीं. एक तर वैद्य ह्मणतात त्याप्रमाणें ती ‘क्लिष्ट व दूरान्वयी’ झाली आहे; व मुख्य ह्मणजे हा ‘नें’ प्रत्यय प्राचीन नसून सर्व अर्वाचीन भारतीय आर्य भाषांत तो अलीकडे उत्पन्न झालेला आहे. तसेंच मराठींत अनेकवचनी ‘नीं’ प्रत्यय असला तरी हिंदींत तो एकवचनाप्रमाणें ‘नें’ च आहे. त्यामुळें तृतीयेच्या अनेकवचनी रूपावरून तृतीयेचे एकवचनी रूप सिद्ध झाले हे राजवाडे यांचे म्हणणे आक्षेपार्ह ठरते. या प्रत्ययाच्या अधिक विवेचनासाठी ब्लोक यांचे ‘मराठी भाषेचा विकास,’ परिच्छेज २०१ पहा.)]

हा च प्रकार द्वितीयेच्या रूपासंबंधानें नव्या मराठींत झालेला आहे. अपभ्रंशांत पुत्ता असें द्वितीयेचें अनेकवचन आहे. त्यावरून जुन्या मराठींत पूताँ व नव्या मराठींत हि पूताँ असें रूप आलें. अनुनासिक हा जुन्या व नव्या मराठींत अनेकवचनाची नियतैक खूण आहे. ती द्वितीयेच्या अनेकवचनाचें ज पूताँ रूप त्यांत

अनुक्रमणिका

आहे. तेव्हां, अनुनासिक काढून टाकून निरनुनासिक जें पूता रूप तें द्वितीयेच्या एकवचनाचें रूप बनलें. वस्तुतः, महाराष्ट्रींत किंवा अपभ्रंशांत पुत्ता असें द्वितीयेच्या एकवचनाचें रूप नाहीं. द्वितीयेच्या एकवचनाचें पुत्तु असें उकारान्त एक च रूप आहे. एकविधता व अनुकरण ह्यांच्या नादानें द्वितीयेपासून संबोधनापर्यंतचे नव्या मराठींतील सर्व विभक्ति-प्रत्यय आ-आदि झाले आहेत. [विभक्तिप्रत्यय आ-आदि नाहींत, तर सामान्यरूप आ-अन्त, ह्मणजेच आकारान्त आहे.] चतुर्थीपासून संबोधनापर्यंतचे प्रत्यय आ-आदि होते च. त्यांच्या जोडीला द्वितीया व तृतीया ह्यांच्या प्रत्ययांना हि नव्या मराठीनें आणून सोडलें.

येणेप्रमाणें नव्या मराठींत द्वितीयादि सर्व विभक्त्यांच्या प्रत्ययांचा प्रारंभ एकवचनांत आ-नें व अनेकवचनांत आँ-नें होतो.

देव, ह्या अकारान्त पुल्लिंगी नामाला एकवचनी 'आ' जोडला ह्मणजे देवा असें रूप होतें. ह्या देवा व देवाँ रूपांना च दादोबा वगैरे आधुनिक वैय्याकरण सामान्यरूप ह्मणतात. हे आधुनिक वैय्याकरण एकवचनी व अनेकवचनी सामान्यरूपांचा प्रारंभ तृतीयेपासून करीत. तो चुकीचा होता. कारण, सामान्यरूपांचा प्रारंभ द्वितीयेच्या एकवचनापासून होतो, हें वर दाखविलें आहे. [राजवाडे यांचे वरील मत चिं. वि. वैद्य यांनाही मान्य नाही. कारण प्रथमा, द्वितीया व संबोधन या तीन विभक्ती एक प्रकारच्या (Strong किंवा Direct cases) असून सामान्यरूपाला प्रारंभ तृतीयेपासून होतो असेंच समजणें युक्त आहे.] द्वितीयेपासून संबोधनापर्यंतच्या विभक्तिप्रत्ययांच्या पूर्वी अकारान्त पुल्लिंगी नामांचें [केवळ अकारान्त पुल्लिंगी नामांचेच नाहीं, तर सर्व प्रकारच्या नामांचे.] जें एकवचनी व अनेकवचनी सर्वसाधारण रूप होतें त्याला सामान्यरूप ह्मणतात. ह्याला च यूरोपियन लोक Oblique form ["**Oblique case** : A collective term for all declensional cases other than the nominative and vocative." Pei and Gaynor: A Dictionary of Linguistics.] असें नांव देतात. ह्या सामान्यरूपाचें विवेचन तिन्ही लिंगी नामांच्या विभक्त्यांचा ऊहापोह संपल्यानंतर सामग्र्यानें करणें इष्ट आहे.

(२३) आतां, एकदोन बाबींचा उल्लेख करून आन्हिक संपवितों.

| **बाब पहिली** | :— नवें मराठी | जुने मराठी | संस्कृत |
|---|---|---|---|
| एकवचन | :— पुरुषानें केलेन | पुरुषें-केलेन | पुरुषेण कृतेन |
| अनेकवचन | :— पुरुषांनीं केलेनीं | पुरुषीँ केलेहीँ | पुरुषैः कृतैः |

त्यानें केलेन व त्यांनीं केलेनी, त्यानें ह्मंटलेन व त्यांनी ह्मंटलेनि, हे प्रयोग तेन कृतेन व तैः कृतैः, तेन भणितेन व तैः भणितैः, ह्या संस्कृत रूपांचीं भाषांतरें आहेत. हे प्रयोग कोकणांत व देशांत दोन्हीं स्थलीं योजतात.

तें काम त्यांनीं केलेनि आन मी निघालों = तत्कर्म कृतैस्तैः हन्त अहं निर्गतः
(त) तैः = तेहिँ = तेन्हि = तेयानि = त्यानि = त्यानीँ
(केल) कृतैः = केलेहिँ = केलेन्हि = केलेनिँ = केलेनीँ

आधुनिक वैय्याकरण केलेन व केलेनिं हीं रूपें चुकलेलीं क्रियापदें समजतात. परंतु तशी गोष्ट नसून हीं 'केल' ह्या विशेषणाचीं अनुक्रमें तृतीयेच्या एकवचनाचीं व अनेकवचनाचीं रूपें आहेत व सर्वथैव व्याकरणदृष्ट्या शुद्ध आहेत. वर दिलेले प्रयोग सतातृतीयेचे मासले आहेत.

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरींत पुरुषीँ गेलेयाँ, देवीँ अवतरलेयाँ, असे सतिसप्तमीचे प्रयोग येतात.

**बाब दुसरी** :— मालवण येथील तीन लेखांत बैसक व पुरुस ह्या अकारान्त पुल्लिंगी नामांच्या प्रथमेच्या अनेकवचनाचीं रूपें बैसके व पुरुसे अशीं आलीं आहेत. [मालवणचे शके १५८५ मधील हे तीन लेख राजवाड्यांनी प्रथम 'सरस्वती-मंदिर' या मासिकात प्रसिद्ध केले. पुढे ते त्यांच्या 'संकीर्ण निबंधां' (लेखसंग्रह, भाग २ रा) त समाविष्ट झाले. (पृ. २१३-२१८). त्यांतील वरील रूपांची उपपत्ति लावण्याकरितां त्यांनी 'मराठींतील नामविभक्त्यांचें समग्र वंशावलोकन व पृथक्करण' केलें (लेखसंग्रह, भा. २, पृ. १९२-२१२). मूळ लेखांतील (क्र. ३) ओळ अशी आहे :—

हे **ग्रामपुरुसे** समस्त **बैसके** बैसोनु केले." (ओ. १८)

यातील पुरुसे हें रूप तृतीयेचें (अपभ्रष्ट) व बैसके हें रूप 'बैसक' या स्त्री. नामाचें सप्तमीचें आहे. अर्थात् राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें हीं प्रथमेच्या अनेकवचनाचीं रूपें नाहींत व त्यामुळे त्यांच्या मुळाचा शोध घेण्यासाठीं बंगालीकडे धाव घेण्याचें कारण नाहीं.] महाराष्ट्री व महाराष्ट्रीअपभ्रंश ह्यांपासून निघालेल्या जुन्या व नव्या मराठींत अकारान्त पुल्लिंगी नामांच्या प्रथमेच्या एकवचनाचीं रूपे एकारान्त होत नाहींत. तेव्हां, ह्या जुन्या मालवणी रूपांचा माग दुसरीकडे पाहिला पाहिजे. बंगाली व ओढ्या भाषांत अकारान्त पुल्लिंगी नामांच्या प्रथमेच्या अनेकवचनाचीं अशीं एकारान्त रूपें होतात; जसें,

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| जन | जने |
| कुमार | कुमारे |

तेव्हां, बैसके व पुरुसे ह्या अनेकवचनी रूपांचा बंगाली एकारान्त अनेकवचनी रूपांशीं चांगला मेळ बसतो. शक १५८५ त एकारान्त अनेकवचन करणाऱ्या मालवण येथील लोकांचा पूर्वहिंदी, बंगाली व ओढ्या लोकांशीं कांही संबंध होता कीं काय?

## द्वितीयान्हिक समाप्त

अनुक्रमणिका

# तृतीयान्हिक

## १०. अँकारान्त पुल्लिंगी नामें

[अशा प्रकारच्या नामांचे अस्तित्व संशयित आहे. सं. ग्राम यांतील 'म' चे 'वँ' मध्ये रूपान्तर होऊन त्या 'वँ' मधील अनुनासिक पूर्वस्वरावर जात असल्याने 'गावँ' असें लेखन आढळत असलें तरी त्याचा उच्चार 'गाँव' असाच आहे. पण ही बाब शंकास्पद आहे.]

मकारान्त संस्कृत नामांपासून महाराष्ट्री, अपभ्रंश ह्या परंपरेनें अँकारान्त मराठी नामें आलीं आहेत. तीं अकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणें च चालतात. क्वचित् अनुनासिक विकल्पेंकरून देत नाहींत. उदाहरणार्थ:—

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मूळशब्द :— गावँ | |
| प्रथमा :— गावँ, गाओ, गाउ | गावँ |
| द्वितीया :— गावँ, गाओ, गाउ | गावँ |
| तृतीया :— गावेँ | गावीँ इ. इ. इ. |

## ११. आकारान्त पुल्लिंगी नामें

आकारान्त पुल्लिंगी नामें महाराष्ट्रींत किंवा अपभ्रंशांत नाहींत. संस्कृतांत आहेत; परंतु, त्यांचा मराठी आकारान्त पुल्लिंगी नामांशीं कांहींएक संबंध नाहीं. मराठींतील आकारान्त पुल्लिंगी नामें प्रायः मूळचीं अकारान्त विशेषणें असून, पुल्लिंगाचा 'आ' प्रत्यय लागून बनलेलीं आहेत. हा 'ओ' प्रत्यय संस्कृत एतत् व इदं सर्वनामांपासून महाराष्ट्रीद्वारा व अपभ्रंशद्वारा मराठींत आला आहे. [याशिवाय ही नामे अक (> प्रा. अअ > म. आ) हा अक्षरवृद्धीचा प्रत्यय लागूनही सिद्ध होतात. (उदा., सं. घोटक > प्रा. घोडअ > म. घोडा).] त्याचा खुलासा सर्वनामप्रकरणांत येईल. [षष्ठान्हिक, परिच्छेद २८, २९ पहा.] आकारान्त पुल्लिंगी नामांचीं रूपें महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नसल्यामुळें तुलनार्थ येथें, अर्थात्, देतां येत नाहींत.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मूळ शब्द :— डोला, जाणता. | |
| प्रथमा :— डोला, जाणता | डोले, जाणते |
| द्वितीया :— डोला, जाणता | डोले, जाणते |
| डोलेन, नि-निया-नियां | |
| तृतीया:— जाणतेन, नि-निया-नियां | डोलाँ, जाणताँ |
| चतुर्थी :— डोलेया, जाणतेया | डोलेयाँ, जाणतेयाँ |
| पंचमी :— डोलेयाहुनि, जाणतेयाहुनि | डोलेयाँहुनि, जाणतेयाँहुनि |
| षष्ठी:— डोलेया, जाणतेया | डोलेयाँ, जाणतेयाँ |
| सप्तमी :— डोलाँ, जाणताँ, आलेयाँ | डोलाँ, जाणताँ, आलाँ, बुडणाँ |

अनुक्रमणिका

बुडणेयाँ, पंधरावाँ

संबोधन:— डोलाहो, जाणताहो, जाणतेयाहो, विसाँवेया, सुहावेया — डोलेनाँ, जाणतेनाँ

चान्त विशेषण :— डोलेयाच, जाणतेयाच — डोलेयांच, जाणतेयांच

शब्दयोगी :— डोलेनविण, इ. इ. इ. — डोलाँविण, इ. इ. इ.

(१) मूळशब्द डोल, जाणत, दीपल, हाँ त, बुडण. पुल्लिंगी 'आ' प्रत्यय लागून डोला, जाणता, दीपला, हाँ ता, बुडणा.

(२) प्रथमा :— संस्कृत एतत् या सर्वनामापासून महाराष्ट्री-अपभ्रंशद्वारा प्रथमेचें एकवचन एह, हा, आ; व अनेकवचन एए, हे, ए.

जाणत + आ = जाणता
जाणत + ए= जाणते

✷ येथें अ + ए ह्यांचा संधि होताना अ-चा लोप होतो.

(३) द्वितीया :— प्रथमेप्रमाणें.

(४) तृतीया :— संस्कृत एतत् ह्या सर्वनामापासून महाराष्ट्री-अपभ्रंशद्वारा तृतीयेचें एकवचन एएण; अनेकवचन ✷ याँ, आँ.

जाणत + एन = जाणतेन
जाणत + आँ = जाणताँ
एएण = एण = एन (ण = न)
जाणतेन + सिँ = जाणतेनसिँ
जाणताँ + सिँ = जाणताँसिँ, डोलाँसिँ

(५) चतुर्थी :— एतत्पासून अपभ्रंशद्वारा एकवचन एया, अनेकवचन एयाँ.

जाणत + एया = जाणतेया
जाणत + एयाँ = जाणतेयाँ
जाणतेया + आसि = जाणतेयासि
जाणतेयाँ + आसि = जाणतेयाँसि

(६) पंचमी :— अपभ्रंशद्वारा एयाहुनि, एयाँहुनि.

जाणत + एयाहुनि = जाणतेयाहुनि

अनुक्रमणिका

जाणत + एयाँहुनि = जाणतेयाँहुनि

तूनि, तौनि, हुनि, हुनु, हुनिया, हुनियाँ, हौनि, हौनु, हीं निरनिराळीं रूपे आहेत, हें अकारान्त पुल्लिंगी नामांच्या प्रकरणांत सांगितलें च आहे.

(७) षष्ठी :— अपभ्रंशद्वारा एकवचनी एया; अनेकवचनी एयाँ.

जाणत + एया = जाणतेया
जाणत + एयाँ = जाणतेयाँ

(८) सप्तमी :— अपभ्रंशद्वारा एकवचनी एयाँ अथवा आँ; अनेकवचनीं आँ.

जाणत + एयाँ = जाणतेयाँ
अथवा
जाणत + आँ = जाणताँ
जाणत + आँ = जाणताँ
जाणत + इये = जाणतिये
जाणत + इयाँ = जाणतियाँ

(९) संबोधन :— स्पष्ट आहे.

(१०) चान्त विशेषण :— अपभ्रंशद्वारा एकवचन एयाच; अनेकवचन एयांच.

जाणत + एयाच = जाणतेयाच
जाणत + एयांच = जाणतेयांच.
च-ला पुन्हां तिन्ही लिंगी आ, इ, एँ प्रत्यय लागतात.

(११) शब्दयोगी :—

द्वि :— डोलावेन्हिँ, डोलावाँचौनि, डोलावरि, डोलेवेऱ्हीँ
तृ :— डोलेनविण, डोलाँविण
ष :— डोलाआँतु, डोलापासौनि, डोलाँतव, इ. इ. इ.

(१२) एकनाथी ऊर्फ मध्यमराठींत डोलेया ह्या रूपाचा डोलया असा अपभ्रंश झाला; आणि वर्तमानमराठींत डोळ्या असा झाला.

डोलेया = डोळ्या अथवा डोलया = डोळ्या
जाणतेया = जाणतया = जाणत्या
आलेया = आलया = आल्या

अनुक्रमणिका

तेयाचेया = तयाचया = त्याच्या, इ. इ. इ.

(१३) धाता, पिता, भोक्ता, कर्ता वगैरे शब्द संस्कृतांत ऋकारान्त होते, ते मराठींत आकारान्त झाले आहेत व ते आकारान्त पुल्लिंगी नामांप्रमाणें चालतात.

कर्त्तेयाचेया = कर्त्तयाचया = कर्त्याच्या

(१४) वेगाँ, पराँ, कृतकायाँ, भाटाँ, इत्यादि तृतीयेच्या अनेकवचनाचीं रूपें ज्ञानेश्वरींत आढळतात. ह्यांत वेग, पर, कृतकार्य, भाट, असे अकारान्त पुल्लिंगी मूळशब्द वस्तुतः आहेत. परंतु तृतीयेच्या अनेकवचनापुरते अतिदेशानें त्यांना वेगा, परा, कृतकार्या, भाटा असे आकारान्त पुल्लिंगी शब्द समजणें जरूर आहे. [राजवाड्यांचें हें ह्मणणें मोडकशास्त्र्यांना 'सर्वथा भ्रांत' वाटते. कारण 'प्रस्तुत आँकारान्त रूप केवळ अनेकवचनांतच आढळते असे नाही, तर एकवचनांतही आढळतें (उदा., "जेणें कृतकार्यां होइजे । " ज्ञा. १.२५) मोडकशास्त्री हीं रूपें तृतीयेचीं न मानतां प्रथमेचीं समजतात. तीं विशेषेंकरून भावे प्रयोगांत येतात ब त्यांतील पूरक सव्यय (नाम, सर्वनाम वा विशेषण) आँ-प्रत्ययान्त असतें. श्री. नेने यांनी मात्र राजवाडे-मताचा पाठपुरावा केला आहे. (भाइसंमं. त्रैमासिक, १५.१; १६.१).]

(१५) वर्तमानमरांठींत आकारान्त पुल्लिंगी नामांच्या रूपांत खालीलप्रमाणें मध्यमराठीद्वारा अपभ्रंश किंवा फेरबदल झाले आहेत :—

| | **ज्ञा.** | **म.** | **व.** |
|---|---|---|---|
| तृतीया एकवचन :— | डोलेन | डोळेन | डोळ्यानें |
| तृतीया अनेकवचन :— | डोलाँ | डोळेहिँ | डोळ्यानीँ |

तृतीयेच्या अनेकवचनावरून एकवचनाचें रूप एकविधतेस्तव बनले आहे.

चतुर्थी वगैरे :— डोलेया ह्या पदांतील 'ए' स्वर काढून टाकून व डोला ह्या पदांतील अंत्य 'आ' काढून टाकून वर्तमान मराठीनें डोळ्या असें रूप बनविलें. मध्य मराठींतील रूप डोलया असें होतें. डोळ्या हें सामान्यरूप एकविधतेस्तव सिद्ध करून विभक्तींचे प्रत्यय वर्तमानमराठी लावते.

## १२. इकारान्त पुल्लिंगी नामें

**एकवचन**

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | ज्ञानेश्वरी |
|---|---|---|---|
| मूळ शब्द :— अग्नि | अग्गिं | अग्गि | हरि, आगि |
| प्र :— अग्निस् | अग्गी | अग्गी | आगी, आगि, हरि-री. |
| द्वि:— अग्निम् | अग्गिं | अग्गिं | आगी-गि, हरि-री |
| तृ :— अग्निना | अग्गिणा | अग्गिण, अग्गिं | आगी, आगीसिँ, हरी, हरीसिँ. |
| च. :— अग्नये | — | — | आगी, आगीसि-सिँ-थैँ-तैँ<br>हरी, हरीसि-सिँ-थैँ-तैँ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| पं. :— अग्नेः | अग्गीहिंतो<br>अग्गित्तो | अग्गिहेँ | आगीहूनि-तूनि,<br>हरीहूनि-तूनि |
| ष. :— अग्नेः | अग्गिणो<br>अग्गिस्स | अग्गिहेँ | आगी, हरी |
| स. :— अग्नौ | अग्गिम्मि | अग्गिहिँ | आगी, हरी |
| सं. :— अग्ने | अग्गि-ग्गी | अग्गि-ग्गी | आगी हो, हरीहो |
| चान्त :— — | — | — | आगिच, हरिच |
| शब्दयोगी — | — | — | हरिवाँचौनि, हरीविण,<br>हरीआँतु |

**अनेकवचन**

| | | | |
|---|---|---|---|
| प्र. :— अग्नयः | अग्गी | अग्गी | आगी, हरी |
| द्वि. :— अग्नीन् | अग्गी | अग्गी | आगी, हरी |
| तृ. :— अग्निभिः | अग्गिहि-<br>हिं-हिँ | अग्निहि-<br>हिं-हिँ | आगीँ, हरीँ |
| च. :— अग्निभ्यः | — | — | आगीँ, हरीँ |
| पं. :— अग्निभ्यः | अग्गीहिंतो,<br>अग्गित्तो | अग्गिहुँ | आगीँ हूनि, हरीँ हूनि |
| ष. :— अग्निनां | अग्गिणा-<br>णां-णाँ | अग्गिहां-हुँ | आगीँ, हरीँ |
| स. :— अग्निषु | अग्गिसु-<br>सुं-सुँ | अग्गिहिँ | आगीँ, हरीँ |
| सं :— अग्नयः | अग्गी,<br>अग्गिणो | अग्गिहोँ | आगीनोँ, हरीनोँ |
| चान्त :— — | — | — | आगीँ च, हरीँ च |
| शब्दयोगी :— — | — | — | आगीँ विण, आगीँ तव, इ. इ. |

(१) वर्तमान मराठी हरीनेँ व हरीँ नीँ अशीं तृतीयेचीं रूपें करते.

(१) प्रथमा :— अपभ्रंशापासून.

(२) द्वितीया :— अपभ्रंशापासून. अनुस्वाराखेरीज.

(३) तृतीया :— एकवचन अनुस्वार काढून व दीर्घ करून; अनेकवचन हिँ-ची इँ करून.

(४) चतुर्थी :— महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहीं, मराठींत आहे. ह्यावरून असें अनुमान निघतें कीं महाराष्ट्रींत इकारान्त पुल्लिंगी नामांचीं चतुर्थीचीं रूपें एका कालीं असावीं.

(५) पंचमी :— अपभ्रंशापासून.

(६) षष्ठी :— अपभ्रंशापासून.

अनुक्रमणिका

(७) सप्तमी :— अपभ्रंशापासून.
(८) संबोधन :— अपभ्रंशापासून.

## १३. ईकारान्त पुल्लिंगी नामें

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्र. :— | विवेकी, विवेकिया | विवेकी, विवेकिये |
| द्वि. :— | विवेकी, विवेकिया | विवेकी, विवेकिये |
| तृ. :— | विवेकियँ-सिँ | विवेकीँ, विवेकियाँ-सिँ |
| च. :— | विवेकिया-सि-तेँ | विवेकियाँ-सि-तेँ |
| पं. :— | विवेकियाहुनि | विवेकियाँहुनि |
| ष. :— | विवेकिया | विवेकियाँ |
| स. :— | विवेकियाँ | विवेकियाँ |
| सं. :— | विवेकिया, लाघविया | विवेकीँ, विवेकियाँ-हो, विवेकियानोँ |
| चान्त. :— | विवेकियाच | विवेकियाँच |
| सब्दयोगी :— | विवेकियाविण | विवेकियाँविण |

(१) प्रथमा :— आ व ए प्रत्यय विकल्पानें लागतात.
विवेकी + आ = विवेकिया अथवा विवेकी
विवेकी + ए = विवेकिये अथवा विवेकी

(२) द्वितीया :— प्रथमेप्रमाणें.

(३) तृतीया :— विवेकी + एँ = विवेकियँ
विवेकी + आँ = विवेकियाँ अथवा विवेकीँ

(४) चतुर्थी :— विवेकी + आ = विवेकिया
विवेकी + आँ = विवेकियाँ

(५) पंचमी :— विवेकी + आहुनि = विवेकियाहुनि
विवेकी + आँहुनि = विवेकियाँहुनि

(६) षष्ठी :— विवेकी + आ = विवेकिया
विवेकी + आँ = विवेकियाँ

(७) सप्तमी :— विवेकी + आँ = विवेकियाँ

(८) संबोधन :— विवेकी + आहो = विवेकियाहो
विवेकी + आँहो = विवेकियाँहो, विवेकियानौं, विवेकीँ

(९) विवेकिया पदांतील इ-चा लोप करून विवेक्या असें सामान्य रूप वर्तमानमराठीनें बनवलें आणि विवेक्यानें, विवेक्याँनीँ अशीं तृतीयेचीं रूपें सिद्ध केलीं.

(१०) पाणक्या-पाणक्येः सैंपाक्या-सैंपाक्ये; अशीं रूपें वर्तमानमराठींत होतात; परंतु, विवेकी-विवेकी.

## १४. उकारान्त पुल्लिंगी नामें

### इकारान्त पुल्लिंगी नामांप्रमाणें चालतात.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्र. :— | गुरु | गुरू |
| द्वि. :— | गुरु | गूरू |
| तृ. :— | गुरू-सिँ | गुरूँ-सिँ |
| च. :— | गुरू-सि-तैँ | गुरूँ-सि-तैँ |
| पं. :— | गुरूहुनि | गुरूँहुनि |
| ष. :— | गुरु | गुरूँ |
| स. :— | गुरु | गुरूँ |
| सं. :— | गुरू, बंधू, बंधो; सिंधू, सिंधो; | गुरूँ |
| चान्त :— | गुरुच | गुरूँच |
| शब्दयोगी :— | गुरूविण, तव | गुरूँविण, तव |

(१) गुरूनें, गुरूँनीँ अशीं तृतीयेचीं रूपें वर्तमानमराठींत होतात.

## १५. ऊकारान्त पुल्लिंगी नामें

ईकारान्त पुल्लिंगी नामांप्रमाणें प्रायः चालतात.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्र. :— | विंचू, बहू ['बहू' हें विशेषण असल्याने येथे उदाहरण होऊ शकत नाहीं.] | विंचू, बहू |
| द्वि. :— | विंचू, बहू | विंचू, बहू |
| तृ. :— | विंचुवें, बहुवें-सिँ | विंचुविँ, बहुविँ, विंचुवाँ, बहुचाँ-सिँ |
| च. :— | विंचुवा, बहुवा-सि-तैँ | विंचुवाँ, बहुवाँ-सि-तैँ |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| पं. :— विंचुवाहुनि | विंचुवाँहुनि |
| ष. :— विंचुवा, बहुवा | विंचुवाँ, बहुवाँ |
| स. :— विंचुविँ, बहुविँ | विंचुविँ, बहुविँ |
| सं. :— विंचुवा हो | विंचुवाँ हो |
| चान्त :— विंचुवाच | विंचुवांच |
| शब्दयोगी:—विंचूवाँचौनि, | विंचुवाँविण, इ. इ. इ |

[विंचुवाँवांचौनि असे पाहिजे. बहुधा मुद्रणदोष असावा.] विंचुवैं विण

(१) कृपालू, दयालू, वगैरे नामें व विशेषणें ह्या च सदरांत पडतात.
(२) कृपाळूनैं, कृपाळूँ नीँ, विंचवानैं, विंचवाँनीँ, अशीं रूपें वर्तमान मराठींत होतात

## १६. ऐकारान्त व औकारान्त व पुल्लिंगी नामें

ऐकारान्त पुल्लिंगी नामें आणि औकारान्त नामें तीं ज्या पुल्लिंगी नामांचे अपभ्रंश असतात त्याप्रमाणें चालतात.

दलवई = दलवै — अनुभव = अनुभौ

आठव-उ = आठौ — मांडव = मांडौ

| | | |
|---|---|---|
| तृतीया :— | दलवैएँ, | दलवैँ ई-दलवीँ |
| चतुर्थी :— | दलवैया, | दलवैयाँ |

**तृतीयान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

# चतुर्थान्हिक

## १७. नपुसकलिंगी नामांचे अंत्य स्वर

१७. ज्ञानेश्वरींत नपुकलिंगी नामांच्या शेवटीं, अ, अँ, इ, ॅई, उँ व एँ हे सहा स्वर सांपडतात. अँकरान्त व इकारान्त नपुसकलिंगी नामें अकारान्त व ॅईकारान्त नामांप्रमाणें चालतात.

## १८. अकारान्त नपुसकलिंगी नामें

| | संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|---|
| प्र. | १. फलं | फलं | फलु | फल, फलु |
| द्वि. | १. फलानि | फलाइँ | फलइँ | फलेँ |

(१) बाकी रूपें पुल्लिंगाप्रमाणें.

(२) तृतीयेचीं बीजाँ (अनेकवचन), विश्वाँ, वांझाँ, अशीं पुल्लिंगांतल्याप्रमाणें रूपें सांपडतात.

(३) पंचमीचें दादरेंहुनि ['दादर' (= जिना; पायऱ्यांची वाट) हें नाम नपुंसकलिंगीच आहे असे त्याच्या उल्लेखावरून (ज्ञा. १२. ५५; ६. २७१) तरी निश्चितपणें म्हणता येत नाही. आज ते पुल्लिंगी वापरांत आहे.] असें रूप आढळतें.

(४) [येथें मूळ प्रतीत ४ हा आंकडा नजरचुकीनें गळला आहे व त्यामुळें पुढील आकडेही चुकीचे पडले आहेत.] सप्तमीचें चारुस्थला असें रूप आढळतें.

(५) वर्तमानकालवाचक धातुसाधितें अकारान्त असल्यास ह्या सदरांत पडतात :—

| | |
|---|---|
| वाजत-वाजतें; | अरडांत-अरडांतें; |
| खांखात-खांखातें; | निद्रित-निद्रितें |

(६) मिथुन, समाधान, कुशल, जन्म, मान, मनुष्यपण, बीज, साधारण, हे शब्द वरीलप्रमाणें चालतात.

## १९. ॅईकारान्त नपुंसकलिंगी नामें

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— पाणीँ | पाणियेँ |
| द्वि :— पाणीँ | पाणियेँ |
| तृ :— पाणियें-सिँ | पाणीँ-सिँ |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| च :—पाणिया-सि-ते | पाणियाँ-सि-तेँ |
| पं :—पाणियाहुनि | पाणियाँहुनु |
| ष :—पाणिया | पाणियाँ |
| स :— पाणीँ | पाणीँ |
| सं :—पाणियाहो | पाणियाँहो-नोँ |

(१) पाणीँ, मोतीँ, दहीँ हे शब्द पानीय, मौक्तिक, दधिक ह्या संस्कृत शब्दांपासून पाणिअ, मोत्तिअ, दहिअ अशा परंपरेनें आले आहेत. तेव्हां, अकारान्त नपुंसकनामांची क्रिय त्यांना लागू आहे.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— पाणिअ [(राजवाडे-टीप) किरकोळ माल विंकणारे लोक दहीअ, मोतीअ, पाणीअ, असे प्लुत उच्चार अद्याप हि करतात.] | पाणिएँ |
| तृ :— पाणिएँ | पाणिइँ |
| च :— पाणिया | पाणियाँ |
| स :— पाणिइँ | पाणिइँ |

(२) वारि शब्द पाणीँ शब्दाप्रमाणें चालतो. प्रथमेच्या एकवचनीं अनुनासिक मात्र नसतो.

(३) पाण्या असें सामान्यरूप करून पाण्यानेँ, पाण्याँनीँ अशीं तृतीयेचीं रूप वर्तमान मराठीनें केलीं.

## २०. उकारान्त नपुंसकलिंगी नामें

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र. :— गोरुँ | गोरुवेँ |
| द्वि. :—गोरुँ | गोरुवेँ |
| तृ. :—गोरुवेँ-सिँ | गोरुवीँ-सिँ |
| च. :—गोरुवा-सि-तेँ | गोरुवीँ-सि-तेँ |
| पं. :— गोरुवाहुनि | गोरुवाँहुनि |
| ष. :—गोरुवा | गोरुवाँ |
| स. :—गोरुविँ | गोरुविँ |
| सं. :—गोरुहो | गोरुँहो-नोँ |
| चान्त :—गोरुवाच | गोरुवाँच |

अनुक्रमणिका

(१) इकारान्त नपुंसक नामांच्या सारखा च या [राजवाडे नेहमी 'ह्या' असे दर्शक सर्वनामाचें रूप करतात. त्यामुळे वरील दोन ठिकाणी 'या' असे रूप लिहिण्यात हस्तदोष किंवा मुद्रणदोष असावा.] नामांचा स्वभाव आहे.

(२) वीरुँ, हातिरुँ, टिटिभुँ, पिंपरुँ, पाटाउँ, आवालुँ, कुंकुँ, वगैरे शब्द ह्या सदरांत पडतात.

(३) वस्तुतः गुर्वा, पिंपर्वा, आवाल्वा, टिटिभ्वा, असें सामान्यरूप वर्तमान मराठींत व्हावयाचें; परंतु, उच्चारसौकर्यार्थ गुरा, पिंपरा, आवाळा, असें होतें. कुंकुँ या शब्दा चें कुंक्व असें होतें. कारण, क्व-चा उच्चार शिष्ट मराठीला करतां येतो. अशिष्ट लोक कुंका असें च सामान्यरूप करतात.

## २१. ऍँकारान्त नपुंसकलिंगी नामें

संस्कृत एतत् व इदं सर्वनामांपासून अपभ्रंशद्वारा निघालेलें हें, ऍँ सर्वनामं लागून हीं विशेषणें ऊर्फ नामें झालीं आहेत. होणेँ (भवनं), वानावेँ (वर्णितव्यं), सोनेँ (सुवर्ण) आविसालेँ (आविसालयं) [ही व्युत्पत्ती बरोबर नाही. ज्ञानेश्वरीतील आविसालेँ हा शब्द सं. आमिषालय यापासून सिद्ध होतो.], आलेँ (आगतं), अहंतेचेँ (अहंतेच), हीं नपुंसक नामें अकारान्त मूळ शब्दांना नपुंसकचिन्ह जो ऍँ प्रत्यय तो लागून झालीं आहेत.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र. :— दिसणेँ | दिसणीँ |
| द्वि. :— दिसणेँ | दिसणीँ |
| तृ. :— दिसणेन-सिँ | दिसणीँ-सिँ |
| च. :— दिसणेया-सि-तेँ | दिसणेयाँ-सि-तेँ |
| पं. :— दिसणेयाहुनि | दिसणेयाँहुनि |
| ष. :— दिसणेया | दिसणेयाँ |
| स. :— दिसणेयाँ, दिसणाँ | दिसणाँ |
| आपणपाँ, केलाँ, पुढाँ | |
| सं. :— दिसणेँ हो | दिसणीँ हो |
| चान्त :— दिसणेयाच | दिसणेयाँच |

(१) प्रथमा :— दिसण + ऍँ = दिसणेँ
दिसण + ॅँई = दिसणीँ

(२) तृतीया :— दिसण + एन = दिसणेन
दिसण + ॅँई = दिसणीँ

(३) चतुर्थी :— दिसण + एया = दिसणेया
दिसण + एयाँ = दिसणेयाँ

(४) सप्तमी :— दिसण + आँ = दिसणाँ

अनुक्रमणिका

दिसण + एयाँ = दिसणेयाँ

(५) वस्तुतः पहातां हे ऍकारान्त शब्द अकारान्त च आहेत. चौदाव्या कलमांत जे अकारान्त शब्द सांगितले, ते प्रायः संस्कृतसम असतात; व ह्या सतराव्या कलमांतील शब्द तद्‌भव असतात. संस्कृतसम ‘दर्शन’ शब्द अकारान्त नुपंसक शब्दाप्रमाणें चालतो; व तद्‌भव ‘दिसण’ शब्द ऍकारान्त नपुंसक शब्दाप्रमाणें चालतो. दिसण, आल, सोन, वानाव, आविसाल, अहंतेच, हे शब्द वस्तुतः अकारान्त आहेत. अकारान्त नपुंसकलिंगी शब्दांचा हा दुसरा प्रकार समजणें प्रशस्त दिसतें. ह्या दुसऱ्या प्रकारांतील शब्द प्रायः विशेषणें असतात.

(६) ए काढून टाकून दिसण्या, आल्या, वानावया, अहंतेच्या, असें सामान्यरूप वर्तमानमराठी बनविते. अनेकवचनी सामान्यरूप अंत्य स्वरावर अनुनासिक देऊन होतें, हा सार्वत्रिक नियम.

**चतुर्थान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

## २२. आकारान्त स्त्रीलिंगी शब्द

### एकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| मूळशब्द :— माला | माला | माला | माला |
| प्र :— माला | माला | माला | माला |
| द्वि :— मालाम् | मालम् | मालम् | माला |
| तृ :— मालया | मालाअ | मालाअ | माला-सिँ- |
| च :— मालायै | मालाए | मालाए | माले-सि-तेँ |
| पं :— मालायाः | मालाहिंतो, मालत्तो | मालहे | मालातु, मालाहुनि |
| ष :— मालायाः | मालअ | मालहे | माला |
| स :— मालायां | मालाए, मालअ | मालहिँ | माला, माले |
| सं :— माले | माले | माले | माले |
| चान्त :— — | — | — | मालेच |
| शब्दयोगी :— — | — | — | मालाविण, मालेमाझि |

### अनेकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र :— मालाः | माला | माला | माला |
| द्वि :— मालाः | माला | माला | माला |
| तृ :— मालाभिः | मालाहिँ | मालाहिँ | मालीँ-सिँ |
| च :— मालाभ्यः | — | — | मालाँ-सि-तेँ |
| पं :— मालाभ्यः | मालाहिंतो | मालहु | मालाँहुनि, मालाँतु |
| ष :— मालानां | मालाणं | मालहु | मालाँ |
| स :— मालासु | मालासुँ | मालहु | मालाँ |
| सं :— मालाः | माला | माला | मालाँहो, मालाहो, मालानोँ |
| चान्त :— — | — | — | मालाँच |
| शब्दयोगी :— — | — | — | मालाँविण, मालाँतव |

अनुक्रमणिका

मालाँमाझि

(१) प्रजा, कला, वाचा, टिटिया, वगैरे शब्द ह्या सदरांत पडतात.

(२) भुज, भाष, आगलिक, हावँ, जाणीव, माय, वगैरे अकारान्त स्त्रीलिंगी शब्द मूळचे भुजा, भाषा, आगलिका, हावाँ, जाणीवा, माया असे होते; सबब प्रथमेच्या एकवचना खेरीज अन्यत्र ते माला शब्दाप्रमाणें चालतात. फक्त, प्रथमेचें एकवचन अकारान्त होतें.

(३) माले (एकवचन), मालाँ (अनेकवचन) अशीं सामान्यरूपें करून, मालेनें व मालाँनीं अशीं तृतीयेचीं रूपें वर्तमान मराठी बनविते.

## २३. इकारान्त स्त्रीलिंगी शब्द

| | संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|---|
| मूळ शब्द :— | बुद्धि | बुद्धि | बुद्धि | बुद्धि |
| प्र :— | १ बुद्धिः | १ बुद्धी | १ बुद्धी | १ बुद्धि — द्धी |
| | २ बुद्धयः | २ बुद्धी | २ बुद्धी | २ बुद्धी |
| द्वि :— | १ बुद्धिं | १ बुद्धिं | १ बुद्धिं | १ बुद्धि- द्धी |
| | २ बुद्धीः | २ बुद्धी | २ बुद्धी | २ बुद्धी |
| तृ :— | १ बुद्धया | १ बुद्धीइ | १ बुद्धीए, बुद्धी | १ बुद्धी-सिँ |
| | २ बुद्धिभिः | २ बुद्धीहिं | २ बुद्धीहिं | २ बुद्धीँ- ॅद्धि-सिँ |
| च :— | १ बुद्धयै | १ — | १ — | १ बुद्धीँ-सि-तेँ |
| | २ बुद्धिभ्यः | २ — | २ — | २ बुद्धीँ-सि-तेँ |
| पं :— | १ बुद्धयाः | १ बुद्धीइ | १ बुद्धीहुँ | १ बुद्धीहुनि |
| | २ बुद्धिभ्यः | २ बुद्धीसुंतो | २ बुद्धीहुं | २ बुद्धीँ हुनि |
| ष :— | १ बुद्धेः | १ बुद्धीइ | १ बुद्धिहे | १ बुद्धी |
| | २ बुद्धीनां | २ बुद्धीणं | २ बुद्धिहु | २ बुद्धीँ |
| स :— | १ बुद्धौ | १ बुद्धीइ | १ बुद्धिहिँ | १ बुद्धी-द्धिँ |
| | २ बुद्धिषु | २ बुद्धीसुं | २ बुद्धिहुँ-हिँ | २ बुद्धी |
| सं :— | १ बुद्धे | १ बुद्धी | १ बुद्धी | १ बुद्धी |
| | २ बुद्धयः | २ बुद्धी | २ बुद्धी | २ बुद्धीँ हो |
| चान्त :— | १ — | १ — | १ — | १ बुद्धिच |
| | २ — | २ — | २ — | २ बुद्धीँ च |
| शब्दयोगी :— | १ — | १ — | १ — | १ बुद्धीविना, बुद्धीतव |

| | | | |
|---|---|---|---|
| २ — | २ — | २ — | २ बुद्धीँ विना, बुद्धीँ तव |

(१) राति, निगुति, गोठि, आदिं, धणि, पाठि, स्तुति, योनि, वगैरे शब्द ह्या सदरांत पडतात.

(२) स्त्रि व लक्ष्मि शब्द जेव्हां ऱ्हस्वान्त असतात तेव्हां बुद्धि शब्दाप्रमाणें चालतात. [हे विधान बरोबर नाहीं; कारण ज्ञानेश्वरींत स्त्री व लक्ष्मी हे शब्द दीर्घान्तच असून ते पुढील परिच्छेदांत दिलेल्या 'देवकी' शब्दाप्रमाणे चालतात.]

(३) बुद्धी, बुद्धीँ, अशीं सामान्यरूपें वर्तमान मराठी करते व बुद्धीनें, बुद्धीँ नीँ अशी तृतीयेचीं रूपें होतात.

## २४. ईकारान्त स्त्रीलिंगी शब्द

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— देवकी | देवकिया |
| द्वि :— देवकी | देवकिया |
| तृ :— देवकिया-सिँ | देवकीँ, देवकिँ-सिँ |
| च :— देवकिये-सि-तेँ | देवकियाँ-सि-तेँ |
| पं :— देवकियाँतु, देवकियाहुनि | देवकियाँतु, देवकियाँहुनि |
| ष :— देवकिया, देवकिये | देवकियाँ |
| स :— देवकी, देवकिये | देवकीँ-किँ, देवकियाँ |
| सं :—देवकि-की, वर्तितिये, बाइये | देवकियाँहो |
| चान्त :— देवकियेच | देवकियाँच |
| शब्दयोगी :— देवकी सवेँ, देवकिया विण | देवकियाँ सवेँ, देवकियाँ विण |

(१) संस्कृत नदी व महाराष्ट्री नई शब्दाच्या रूपांवरून हीं रूपें आलीं आहेत.

(२) स्त्री व लक्ष्मी शब्द दीर्घान्त्य असतात तेव्हां देवकी शब्दाप्रमाणें चालतात.

(३) ज्ञानेश्वरींत इकारान्त स्त्रीलिंगी शब्दांचीं कांहीं रूपें ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांच्या रूपांप्रमाणें व ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांचीं कांहीं रूपें इकारान्त स्त्रीलिंगी शब्दांच्या प्रमाणें होतात. जसें, कवणी-कवणि, परी-परि, स्त्री-स्त्रि, आणिकी-आणिकि, दीठी-दीठि, इ. इ. इ.

(४) जाली, जूझती, गरुई, थोरी, वार्षी, सुखाची, मिळणी, श्री, मुंगी, पृथ्वी वगैरे शब्द असे चालतात.

(५) देवकी, देवक्या अशीं सामान्यरूपें करून देवकीनें, देवक्याँनीं अशीं तृतीयेचीं रूपें वर्तमान मराठी करते.

## २५. उकारान्त स्त्रीलिंगी शब्द

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— मातु | मातू |
| द्वि :— मातु | मातू |
| तृ :— मातू-सिँ | मातूँ-सिँ |
| च :— मातू-सि-तेँ | मातूँ-सि-तेँ |
| पं :— मातूहुनि | मातुँ हुनि |
| ष :— मातू | मातूँ |
| स :— मातू-तूँ | मातूँ |
| सं :— मातू | मातूँ हो |
| चान्त :— मातूच | मातूँ च |
| शब्दयोगी :— मातूविण | मातूँ विण |

## २६. ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्द

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— बहू | बहुवा |
| [बहू (सं. बहु) हें विशेषण असून ते विकारी नाहीं. राजवाडे यांना बहू < सं. वधू असे तर सुचवावयाचें नसेल? पण त्या अर्थी हा शब्द ज्ञानेश्वरींत नाहीं.] | |
| द्वि :— बहू | बहुवा |
| तृ :— बहुवा-सिँ | बहुवीँ-विँ-सिँ |
| च :— बहुवे-सि-तेँ | बहुवाँ-सि-तेँ |
| पं :— बहुवातु | बहुंवाँतु |
| ष :— बहुवा | बहुवाँ |
| स :— बहू | बहूँ |
| सं :— बहु-हू | बहुवाँहो |
| चान्त :— बहुवेच | बहुवाँच |
| शब्दयोगी :— बहुवा विण | बहुवाँ विण |

(१) भ्रू, सासू, उजू, कृपालू, वगैरे शब्द असे चालतात.

अनुक्रमणिका

(२) सासु [सासु किंवा सासा असा शब्द ज्ञानेश्वरींत नाहीं. राजवाडे कित्येकदा ज्ञानेश्वरीबाह्य उदाहरणे देतात त्याचे हे उदाहरण आहे.] शब्द ऱ्हस्वान्त असतो तेव्हां मातु शब्दाप्रमाणें चालतो; व सासु शब्द सासा असा आकारान्त असतांना आकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणें चालतो.

## २७. एकारान्त व ऐकारान्त स्त्रीलिंगी शब्द

से, सवे, झटे, जांभै, एकवंकै, चावटै वगैरे स्त्रीलिंगी शब्द इकारान्त व ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांप्रमाणें चालतात.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :– से, जांभै | से, जांभैया |
| तृ :– से-सिँ, जांभैया-सिँ | सैँ-सिँ, जांभैयाँ-सिँ |
| च :– से-सि-तैँ, जांभैये-सि-तैँ | सैँ-सि-तैँ जांभैयाँ-सि-तैँ |

## २८. (स्त्रीलिंगी नामांचे कांही विशिष्ट स्वरान्त)

(१) गावी = गाई, गाइ शब्द प्रथमेच्या एकवचनाखेरीज ईकारान्त व इकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणें चालतो.

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| प्र :– गाय, गाये | गाई, गाया (गाईया) |
| तृ :– गाई, गाया | गाँई |
| च :– गाई, गाये | गाँ ई, इ. इ. |

(२) हरिद्रा = हलद्दा, हलद्दी = हलदा, हलदी, हलदि.

हा शब्द आकारान्त, इकारान्त किंवा ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांप्रमाणें चालतो. आ किंवा ई प्रत्यय स्त्रीलिंगी अजातिवाचक शब्दांना महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत विकल्पानें लागतात. त्यामुळें बरे च स्त्रीलिंगी मराठी शब्द आकारान्त व ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांप्रमाणें विकल्पानें चालतात. हा च स्वभाव तरवार-तरवारी-तरवारा, वर्तणूक-वर्तणुकी-वर्तणुका, वगैरे वर्तमान मराठी स्त्रीलिंगी शब्दांत अनुकरणानें दिसून येतो.

(३) ओकारान्त व औकारान्त स्त्रीलिंगी शब्द ज्ञानेश्वरींत नाहींत. [हें म्हणणें तितकें बरोबर नाहीं. कारण ज्ञानेश्वरींत 'वरो' (= रोजची अन्नसामग्री) हें स्त्रीलिंगी नाम ओकारान्त आहे ("जैं बीं चि वरोसी वेंचे" ज्ञा. १.२५६). 'लीळाचरित्रा' तही हा शब्द आहे (पूर्वार्ध २६७, २८७).]

वप्त्रिका = बप्पिका = बाइका;
बाइका + आऊ = बाइकाऊ = बाइको = बायको = बायकाउ अथवा बायकाऊ.

अनुक्रमणिका

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— बायको (बाइकाऊ) | बायका (बाइकावा) |

हा शब्द उकारान्त व अकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणें कांहीं रूपांत चालतो.

बायको शब्द ज्ञानेश्वरींत नाहीं; बाई आहे व तो ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणें चालतो.

(४) भुज, भाष, हावँ, मुठ, चूल, वाव, वगैरे अकारान्त किंवा अँकारान्त स्त्रीलिंगी शब्द आकारान्त किंवा इकारान्त स्त्रीलिंगी शब्दांचे अपभ्रंश आहेत. ह्यांचीं प्रथमेचीं एकवचनी रूपें मात्र अकारान्त होतात. बाकी सर्व रूपें ज्या आकारान्त किंवा इकारान्त शब्दांपासून हे अकारान्त शब्द निघाले त्यांच्याप्रमाणें होतात.

भुज = भुजा; भाष =भाषा; मुठ = मुष्टि; चूल = चूलि; इ. इ. इ.

(५) युक्ति-युगती, भक्ति-भगती, पंक्ति-पांती अशीं द्वंद्वें ज्ञानेश्वरीच्या कालीं होतीं. युक्ति चें अनेकवचन युक्ती; परंतु युगती चें अनेकवचन युगतिया.

तद्वत्, भक्ति—भक्ती
भगती—भगतिया;
पंक्ति—पंक्ती
पांती—पांतिया
पंगती—पंगतिया;

असा द्वंद्वप्रकार तत्सम व तद्‌भव शब्दांचा ज्ञानेश्वरकालीं होता. हे दोन्ही प्रकार वर्तमानमराठींत मिश्र होऊन, तत्सम व तद्‌भव स्त्रीलिंगी इकारान्त व ईकारान्त शब्दांचीं दोन अनेकवचनें होतात.

भक्ति—भक्ती, भक्त्या
पंक्ति—पंक्ती, पंक्त्या
युक्ति—युक्ती, युक्त्या
पांती— पांती, पांत्या
युगती— युगती, युगत्या इ. इ. इ.

(६) देवी, नारी, सिंही, श्रीमती हे शब्द इकारान्त किवा ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांप्रमाणें विकल्पानें ज्ञानेश्वरकालीं चालत.

षष्ठी :— नारीँ माझारि अथवा नारियाँमाझारि अशीं दोन्ही रूपें होत. पैकीं पहिलें इकारान्त स्त्रीलिंगी शब्दांचें रूप वर्तमान मराठींत राहिलें आहे.

अनुक्रमणिका

(७) इ, ई व उ, ऊ हे स्त्रीलिंगी शब्दांचे अंत्य स्वर एकमेकांच्या स्थानीं बदललेले ज्ञानेश्वरींत हमेश सांपडतात. त्यामुळें इकारान्त स्त्रीलिंगी शब्द ईकारान्तासारखा व उकारान्त स्त्रीलिंगी शब्द उकारान्तासारखा चाललेला आढळतो. उलट हि प्रकार होतो.

(८) बीज= बीअ हा शब्द ज्ञानेश्वरींत अकारन्ति नपुंसक किंवा ॅईकारान्त किंवा इँकारान्त नपुंसक, ह्मणजे बिँ, बीँ असा आहे. तो वर्तमान मराठींत बी असा अंत्य स्वरावरून स्त्रीलिंगी होऊन त्याचें अनेकवचन बिया होतें; ज्ञानेश्वरींत बियें होत असे.

(९) वर्तमानमराठींत अंत्य स्वराचा लोप करण्याकडे प्रवृत्ति आहे. त्यामुळें, माला-माळ, बुद्धि-बुध, मातु-मात, असे अकारान्त स्त्रीलिंगी शब्द बनले आहेत. ही लोपप्रवृत्ति ज्ञानेश्वर, कालीं च सुरू झाली होती.

## २९. टीका (नामविभक्तिरूपांवरील)

(१) पुल्लिंगी शब्दांच्या अंत्यास अ, अँ, आ, इ, ई, उ, ऊ, ऐ, औ असे ९ स्वर येतात. स्त्रीलिंगी शब्दांच्या अंत्यास अ, अँ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ असे ९ स्वर येतात. आणि नपुंसकलिंगी शब्दांच्या अंत्यास अ, अँ, इ, इँ, उँ, एँ असे ६ स्वर येतात. पैकी ऐ व औ हे स्वर ज्यांच्या अंतीं आहेत ते शब्द इकारान्त, ईकारान्त, उकारान्त किंवा ऊकारान्त शब्दांप्रमाणें चालतात. ह्मणजे मराठी ह्या प्रकरणीं अपभ्रंशाला धरून आहे.

(२) सर्व विभक्तिप्रत्यय अपभ्रंशोत्पन्न आहेत.

(३) संस्कृत त्य पासून निघालेला ‘च’ हा प्रत्यय त्य-च्च-च अशा परंपरेने अपभ्रंशांतून आला आहे.

(४) अपभ्रंशाला सोडून निराळीं रूपें ज्ञानेश्वरी मराठीनें जीं केलीं तीं आकारान्त व ईकारान्त पुल्लिंगी शब्दांचीं आणि एँकारान्त नपुंसकलिंगी शब्दांचीं. कारण, आकारान्त पुल्लिंगी मूळशब्द अपभ्रंशांत नव्हते. तेव्हां त्यांना विभक्तिप्रत्यय नवीन शोधून काढावे लागले. त्या कामीं संस्कृत एतत् व इदं सर्वनामांचीं अपभ्रंशद्वारा निष्पन्न झालेलीं आ, ए इत्यादि रूपें ज्ञानेश्वरी मराठीला हाताशीं सांपडलीं. ईकारान्त पुल्लिंगी शब्दांच्या प्रथमेच्या व द्वितीयेच्या एकवचनाला व अनेकवचनाला हि हा च नियम विकल्पानें लागूं झाला. विकल्पानें लागू होण्यास कारण असें कीं इन् प्रत्ययोत्पन्न जी महाराष्ट्री व अपभ्रंश यांतील ‘ई’ तिचीं रूपें अगोदर होतीं च.

| संस्कृत | | महाराष्ट्री | | अपभ्रंश | | मराठी |
|---|---|---|---|---|---|---|
| हस्ती | = | हत्थी | = | हत्थि | = | हत्ती, हाती, हाथी |
| हस्तिनः | = | हत्थी | = | हत्थी | = | हत्ती, हाती, हाथी |

तेव्हां तीं ठेवून शिवाय, आ, ए प्रत्यय लावून विवेकिया, विवेकिये अशीं वैकल्पिक रूपें केलीं.

अनुक्रमणिका

ऍंकारान्त नपुंसकलिंगी शब्द अपभ्रंशांत नव्हते. तेव्हां एतत्सर्वनामोत्पन्न ‘ऍं’ सर्वनामाचीं रूपें लावून मराठीला त्यांचीं रूपें सिद्ध करणें भाग पडलें.

ज्ञानेश्वरकालीन मराठीनें हीं एतत्सर्वनामोत्पन्न व इदंसर्वनामोत्पन्न रूपें च संकटसमयीं प्रत्ययार्थ कां घेतलीं? तर सर्वनामोत्पन्न प्रत्यय घेण्याचा हा स्वभाव मराठीला संस्कृतापासून व आर्षभाषेपासून वंशपरंपरेनें मिळालेला आहे. संस्कृतांतील एकोनएक नामविभक्तिप्रत्यय आर्षपूर्व भाषेंतील सर्वनामांपासून निघालेले आहेत.

वर्तमान मराठींतील तृतीयेचे नैं-नीं प्रत्यय, चतुर्थीचा ला प्रत्यय व सप्तमीचा ँत प्रत्यय यासंबंधानें अकारान्त पुल्लिंगी शब्दांच्या प्रक्रियेंत ऊहापोह केला आहे.

तात्पर्य, ज्ञानेश्वरकालीन मराठींतील प्रायः सर्व विभक्तिप्रत्यय अपभ्रंशांतून अपभ्रष्ट होऊन आलेले आहेत.

**पंचमान्हिक समाप्त**

# षष्ठमान्हिक

[हस्तदोष आहे. षष्ठान्हिक असे पाहिजे.]

## ३०. सर्वनामें: मी

एकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. :— अहम् | अहम्मि, अम्मि, म्मि. | हउँ | मी, मीँ |
| द्वि. :— मा, माम् | अम्मि, मि | मइँ | मी, मीँ, मज |
| तृ. :— मया | मए, मइ | मइँ | मिया, मियाँ, म्या, मासिँ, मजसिँ, मज |
| च. :— मे, मह्यम् | — | — | मज, मासि, मातेँ मसि, मजसि |
| पं. :— मत् | मज्झत्तो, ममाहिंतो | मज्झु | मजहुनि |
| ष. :— मे, मम | मज्झ | मज्झु | मज |
| स. :— मयि | मइ, मि | मइँ, | मीँ, मज |
| चान्त :— — | *मेच्चअ | — | माझ |
| शब्दयोगी :— — | — | — | मजप्रति,-लागि, मियाँविना, मजतव, मजवाँचौनि, मीँ वाँचौनि, इ. इ. |

(१) येथें मराठीचीं रूपें महाराष्ट्रीशीं जुळतात, अपभ्रंशांशीं जुळत नाहींत. हेमचंद्रानें दिलेला अपभ्रंश महाराष्ट्रीचा अपभ्रंश दिसत नाहीं. महाराष्ट्रीचा अपभ्रंश निराळा असावा.

### मी
### अनेकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. :— वयम् | अह्मे | अह्मे, अह्मइँ | आह्मीँ, आह्मि |
| द्वि. :— अस्मान्, नः | अह्मे | अह्मे, अह्मइँ | आह्माँ |
| तृ. :— अस्माभिः | अह्माहिँ | अह्मेहिँ | आह्मीँ, आह्मि |
| च. :— अस्मभ्यं, नः | — | — | आह्माँ, आह्माँसि, आह्माँतेँ, आमतेँ |
| पं. :— अस्मत् | अह्मासुंतो | अह्महा | अह्माँहुनि |
| ष. :— अस्माकं, नः | अह्मं | अह्महँ | आह्माँ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| स. :— अस्मासु | अह्मेसु | अह्मासु | आह्मिं |
| चान्त :— — | अह्मेच्चअ | — | आमच |
| शब्दयोगी :— — | — | — | आह्माँ प्रति, आह्मींवाँचौनि, आह्माँ तव, इ. इ. |

(१) येथे मराठीचीं रूपें अपभ्रंशाशीं जुळतात व महाराष्ट्रीशीं तर कित्येक स्थळीं त्याहून जुळतात.

मजकरितां, मजहून ह्या रूपांच्या धर्तीवर वर्तमान मराठींत त्याजकरितां, ज्याजकरितां, याजकरितां, तिजकरितां, जिजकरितां, इजकरितां, इजहून, अशीं रूपें केवळ अनुकरणानें होतात.

## ३१. तूँ

### एकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. :— त्वम् | तुम् | तुहुँ | तूँ |
| द्वि. :— त्वाम्, त्वा | तुम् | तइँ, पइँ | तूँ, तुज |
| तृ. :— त्वया | तुमाइ | तइँ, पइँ | तुवाँ, तुआँ, तुजसिँ-सीँ-तुज, |
| च. :— तुभ्यम्, ते | — | — | तुज, तूज, तुँ सिँ-सीँ-सि, तुजसि, तूतेँ, तुहतेँ |
| पं. :— त्वत् | तुज्झ | तुज्झु, तउँ, तुध्र | तुजहुनि |
| ष. :— तव, ते | तुज्झ | तुज्झु | तुज |
| स. :— त्वयि | तुइ | तइँ, पइँ | तूँ, तुज |
| सं. :— — | — | — | तु |
| चान्त :— — | ‡तेच्चअ | — | तुझ |
| शब्दयोगी :— — | — | — | तुआँ विण, तुजतव, तूँ वांचौनि, तुजवाँचौनि, इ. |

### तूँ

### अनेकवचन

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र :— यूयम् | तुह्मे | तुह्मइँ | तुह्मीँ, तुह्मिं, तुह्मी, तुह्मि |

| | | | |
|---|---|---|---|
| द्वि :— युष्मान्, वः | तुह्मे | तुह्मइँ | तुह्मीँ, तुह्मिं, तुह्मी, तुह्मि |
| तृ :— युष्माभिः | तुह्मेहिं | तुह्मेहिँ | तुह्मीँ-सिँ |
| च :— युष्मभ्यं, वः | — | — | तुह्माँ-सि-तैँ, तुमतैँ |
| पं :— युष्मत् | तुह्मासुंतो | तुह्महँ | तुह्माँहुनि |
| ष :— युष्माकं, वः | तुह्म | तुह्महँ | तुह्माँ |
| स :— युष्मासु | तुह्मेसु | तुह्मासु | तुह्मिं |
| चान्त :— — | तुह्मेच्चअ | — | तुमच |
| शब्दयोगी :— | — | — | तुह्मीँ वांचौनि, तुह्माँवांचौनि, तुह्माँ तव, इ. इ. |

(१) कांहीं थोड्या बाबींत महाराष्ट्रीशीं जुळत नाहीं.

## ३२. अ व इ

इदम् ह्या संस्कृत सर्वनामाचीं अकारान्त व इकारान्त अंगें होतात. महाराष्ट्रींत, अपभ्रंशांत व मराठींत हि ही लकब राहिली आहे.

(१) पुल्लिंग

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्र :— | आ | ए |
| द्वि :— | आ | ए |
| तृ :— | एँ, इया, या, यया-सिँ | इहिँ, इहीँ, ँई-सिँ |
| च :— | इया, यया, या-सि-तैँ | इयाँ, याँ,ययाँ-सि-तैँ |
| पं :— | इया-, यया-, या-हुनि | इयाँ, ययाँ-याँ-, हुनि |
| ष :— | इया, यया, या | इयाँ, ययाँ, याँ |
| स :— | इँ, इये, ये, इए, इहिँ, इया | इँ, ययाँ, याँ, इहिँ |
| सं :— | ए, आ | एँहो, आँहो |
| चान्त :— | ययाच, याच, इयाच | ययाँच, याँच, इयाँच |
| शब्दयोगी :— | इया लागि, यया परौतैँ या प्रति, यया विण | ययाँ परौतैँ, याँ प्रति, इ. इ. |

अनुक्रमणिका

(२) स्त्रीलिंग

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र :— ए | इया, या |
| द्वि :— ए | इया, या |
| तृ :— इया, यिया, या-सिँ | इहिँ-सिँ |
| च :— इये, ये-सि-तेँ | इयाँ, याँ-सि-तेँ |
| स :— इया | इयाँ |
| चान्त :— इयेच | इयांच, यांच |
| सं :— ए | आँहो |

शब्दयोगी :— इये तव, इया विण, इ.

(३) नपुंसकलिंग

| | |
|---|---|
| प्र :— एँ | इयेँ, येँ, यियेँ |
| तृ :— एँ | इहिँ- हीँ |
| स :— इहीँ, इहिँ, इँ, इये | इयाँ, याँ |

(१) अपभ्रंशांत इदम् चें सप्तमीचें एकवचन ‘इथि’ असें होतें; त्यावरून मराठी ‘इथें’ हा शब्द निघाला आहे. एतत्ची सप्तमी ‘एत्थ’ होते; त्यावरून ‘एथें’ निघाला आहे. वर्तमान मराठींतील जेथें, जिथें; तेथें, तिथें; कोठें (कोध्र), कुठें (कुध्र); ह्या जोडींचा हि इतिहास असा च आहे. (अत्र) अथे, हथे, (तत्र) तथे, (यत्र) जथे, (कुत्र) कुथे, कुठे; हे शब्द एथें-इथें, तेथें-तिथें, कोठें-कुठें, ह्या जोड्यांहून अगदीं भिन्न आहेत, व ते वर्तमान कालीं महाराष्ट्रींतील अडाणी लोक योजतात. इदाणिँ (स. ए.) पासून दाणिँ (आतां). अतः (स. ए.) = अता = आताँ. अपभ्रंश एवँहिँ = एविँ, तेविँ, केविँ, जेविँ, हीं हि, सप्तमीचीं रूपें आहेत.

## ३३. ए

एतत् सर्वनामापासून महाराष्ट्री व अपभ्रंशद्वारा हें झालें आहे.

(१) पुल्लिंग एकवचन

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| प्र .:— एसो | एहो, एह | हा [राजवाडे अन्यत्र म्हणतात कीं “एतद्, इदम् व अदस् पासून तीन ह निघतात. पहिले दोन ह सन्निकृष्ट अर्थ दाखवितात व तिसरा ह विप्रकृष्ट अर्थ दाखवितो.”(ज्ञानेश्वरी, अ. ९ वा, ओ. १, पृ. १)] |
| द्वि. :— एअम् | एहु | हा |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| तृ. :— एएण | एएण | एणँ, येणें-सिँ |
| च. :— — | — | — |
| पं. :— एआहिंतो | एत्तहे | एयाहुनि, येयाहुनि |
| ष. :— एअस्स | एअहाँ | एया, येया |
| स. :— एत्थ, एअस्सिँ | एइँ | एहीँ, एथ, येहीँ, येथ |
| चान्त :— — | — | एयाच, येयाच |
| शब्दयोगी :— — | — | एणँ विण, हा वांचौनि, एया तव |

(१) पुल्लिंग अनेकवचन

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| प्र :— एए | एइ | हे |
| द्वि. :— एए | एइ | हे |
| तृ. :— एएहिँ | एएहिँ | एहिँ-हीँ, येहिँ-हीँ-सिँ |
| च. :— — | — | एआँ, एयाँ, येयाँ-सि-तेँ |
| पं. :— एएहिंतो | — | एयाँहुनि, येयाँहुनि |
| ष. :— एआण | एआण | एयाँ |
| स. :— एएसुँ | — | एहीँ, येहीँ |
| चान्त :— — | — | एयाँच, येयाँच |
| शब्दयोगी :— — | — | एहिँ विण, हे वांचौनि, एयाँ तव |

(२) स्त्रीलिंग एकवचन

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| प्र. :— एसा, एस | एह | हे |
| द्वि. :— एअम् | एहु | हे |
| तृ. :— एआए | — | एया, येया, एये |
| च. :— — | — | एये |
| पं. :— — | — | एयाहुनि |
| ष. :— — | — | एया |
| स. :— — | — | एये |
| चान्त :— — | — | एयेच |

अनुक्रमणिका

(२) स्त्रीलिंग अनेकवचन

| | | |
|---|---|---|
| प्र. :– एआओ | — | एया |
| तृ. :– एआहिँ | — | एहिँ |
| ष. :– एआण | — | एआँ, एयाँ |

(३) नपुंसकलिंग

| | | |
|---|---|---|
| प्र. :– १ एअम् | एहु | एँ, हेँ |
| २ एआइँ | — | *एँ, *हेँ |

बाकी रूपें पुल्लिंगाप्रमाणें.

(१) वर्तमान मराठींत या (स) व ह्या (स) असे दोन समहाप्राण व अमहाप्राण उच्चार येतात. पैकी यया-पासून 'या' झाला आहे, व एया-पासून 'ह्या' झालेला आहे. 'ए' सर्वनामाच्या प्रथमेच्या रूपांना महाप्राण घेण्याची लकब आहे च.

(२) येथें एक विशेष सांगण्यासारखा आहे. 'इ' व 'ए' ह्या सर्वनामांची रूपें ईकारान्त पुल्लिंगी शब्दांना, आकारान्त पुल्लिंगी शब्दांना व एँकारान्त नपुंसकलिंगी शब्दांना विभक्तिप्रत्यय ह्मणून लागतात. कधीं इ-चीं रूपें लागतात व कधीं ए-चीं रूपें लागतात. उदाहरणार्थ,

(अ) तैसें माझेया भक्तीविण (९·४३२). ह्या स्थलीं भक्ती हें पद भक्ति ह्या स्त्रीलिंगी शब्दाचें तृतीयेचें एकवचन आहे. भक्ति शब्दाचें विशेषण 'माझी'. 'माझी भक्ति' ह्या विशेषणविशेष्याची एकवचनी तृतीया तीन तऱ्हांनीं होईल. (१) माझिया भक्तीविण, (२) माझेया भक्तीविण, किंवा (३) माझेये भक्तीविण. पैकीं दुसरी तऱ्हा वरील उदाहरणांत आहे.

(आ) तेवि माझेये भक्तीविण (९·४२२). येथें तिसरी तऱ्हा आहे.

तें या नपुंसकलिंगी सर्वनामाचीं चान्त एकवचनी दोन रूपें होतात:– (१) तेयाच, (२) तियाच. पैकीं,

(इ) किं तियाचें पशुत्व वावो जालें (९.४३८) ह्या उदाहरणांत दुसरें रूप योजिलें आहे.

अनुक्रमणिका

(ई) 'आटतिये अलंकारीं'. (८.१७६). 'आटता अलंकार' ह्याचीं एकवचनी सप्तमीचीं तीन रूपें होतात :— (१) आटताँ अलंकारीं, (२) आटतेयाँ अलंकारीं, किंवा (३) आटतिये अलंकारीं. पैकीं तिसरें रूप वरील उदाहरणांत आढळतें.

इतरत्र हि हा च ऊह करावा.

## ३४. त

### (१) पुल्लिंग

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र :— | १ सो | सो | तो |
| | २ ते | ते | ते |
| द्वि :— | १ तं | तं | तो |
| | २ ते | ते | ते |
| तृ :— | १ तेण | तें | तेण, तेणँ-सिँ |
| | २ तेहिं | तेहिँ | तेहिँ, तेहीँ; तिहिँ-सिँ |
| च :— | १ — | — | तेया-सि-तँ, तेआ, तेहा, त्या |
| | २ — | — | तेयाँ, तेआँ, तेहाँ-सि-तँ, त्या |
| ष :— | १ तस्स | तस्सु, तह | तेया, तेआ, तेहा |
| | २ ताणं | ताणं | तेयाँ, तेआँ, तेहाँ |
| स :— | १ तम्मि | तहुँ, [येथें राजवाडे-प्रतींत 'तद्रु' आहे. तो मुद्रणदोष होय.] तहिँ, तत्थ | तेया, तिये, तेथ, तैं, तिया |
| | २ तेसु | तहिँ | तेयाँ |
| चान्त :— | — | — | तेयाच, तेआच, तेहाच. तेयाँच, तेआँच, तेहाँच |
| शब्दयोगी :— | — | — | ते वांचौनि, तेयाँ तव, तिहिँ-विण, तेया अवसरीं, तिया-अवसरीं, तिये अवसरीं |

(२) स्त्रीलिंग

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र :— | १ सा | सा | ते |
| | २ ताओ | ताॐ (ओ) | तिया |
| द्वि :— | १ तं | तं | ते |
| | २ ते | ते | तिया |
| तृ :— | १ तीए, तीअ | ताए | तिया-सिँ |
| | २ ताहिँ | ताहिँ | तिहिँ-सिँ |
| च :— | १ — | — | तिये-सि-तेँ |
| | २ — | — | तियाँ-सि-तेँ |
| ष :— | १ तिस्सा, तीए | तहे | तिये |
| | २ ताणं | ताण, ताहँ, तहँ | तियाँ |
| स :— | १ तीए, तीअ | तीए | तिये |
| | २ तासु | तहिँ | तियाँ |
| चान्त :— | — | — | तियेच, तियाँच |
| शब्दयोगी :— | — | — | ते वांचौनि, तिया विना, तिये साठिँ, तियाँ वांचौनि, तियाँ विना तियाँ साठिँ |

(३) नपुंसकलिंग

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र :— | १ तं | तं, तु | तेँ |
| | २ ते | ते | तियेँ, त्येँ, तेँ |
| तृ :— | — | — | तेन, तेण, तेणँ तिहिँ |

बाकी पुल्लिंगाप्रमाणें.

(अ) सप्तमीचीं तैँ व तेथ हीं कालवाचक व स्थलवाचक क्रियाविशेषणें ज्ञानेश्वरींत आहेत.

### ३५. ज

ज (जो, जी, जें) हें सर्वनाम त-प्रमाणें हुबेहुब चालतें.

## ३६. क (अपभ्रंश)

[हें व यापुढील दोन सर्वनामे राजवाडे अपभ्रंशातील समजतात.]

(१) नपुंसकलिंग

एकवचन

प्र. :– कँ
द्वि. :– कँ
तृ. :– कँ, केविँ, केवि
च. :– काँ
ष. :– काँ
स. :– कै, कइँ, कहिं, कहीँ, केहिँ
चान्त :– कँ च, कँ हाच

(१) अनेकवचन नाहीं; व स्त्रीलिंग व पुल्लिंग हि नाहीं.

## ३७. कवण (अपभ्रंश)

(१) ह्या शब्दाचीं कवण, कव्हण, कोण, कोण्ह, कोण्ही, कोणी अशीं रूपें सांपडतात. पैकीं शेवटल्या दोन खेरीज करून बाकीच्यांचीं रूपें पुल्लिंगी अकारान्त, स्त्रीलिंगी ईकारान्त व नपुंसकलिंगी ऍंकारान्त शब्दांप्रमाणें होतात.

कोण्ही व कोणी ह्यांचीं प्रथमेच्या एकवचनाचीं तिन्हीं लिंगी रूपें कोण्ही, कोण्हीँ, कोण्हि, कोण्हिँ, कोणी, कोणीँ कोणि, कोणिँ अशीं होतात. ह्यांना बाकीचीं रूपें नाहींत.

## ३८. काह (अपभ्रंश)

(१) (चतुर्थी एकवचन) काह्या, (षष्ठी एकवचन) काहा, (सप्तमी एकवचन) काहिँ, (चान्त) काहाच, एवढींच रूपें ज्ञानेश्वरींत सांपडतात.

(२) काहीँ, काहिँ, काँहिँ, काँहीँ, काइ, काई, काँइ, काँई, कायि, काये, काय. हा शब्द केवळ किंवा प्रश्नार्थक विशेषण आहे. हा तिन्ही लिंगांना सर्व विभक्तींत सर्व वचनीं लागतो. हा अव्यय नाहीं, कारण विशेषणांप्रमाणें नामांना हा लागतो. हा शब्द अपभ्रंशांतील काइ-पासून निघाला आहे.

(३) काइ एक, काहिँ एक, काइ येक, काँइ येक असा हि जोड होतो.

अनुक्रमणिका

## ३९. एक, इत्यादि

### (१) पुल्लिंग

एक, अनेक, अनेग, आणिक, आन, आनान, एकैक, अमुक, बहुतेक, ह्यांचीं पुल्लिंगीं प्रथमेच्या एकवचनीं अकारान्त किंवा एकारान्त रूपें होतात. जसें, एक-एके, इ. इ. प्रथमेच्या एकवचनीं अकारान्त किंवा उकारान्त रूपें होतात. जसें, एक-एकु. बाकीं रूपें अकारान्त पुल्लिंगाप्रमाणें.

### (२) स्त्रीलिंग

एकादि शब्दांचीं स्त्रीलिंगी अंगें एकि इत्यादि इकारान्त होतात. हे शब्द इकारान्त स्त्रीलिंगी शब्दांप्रमाणें चालतात.

### (३) नपुंसकलिंग

एकादि शब्द अकारान्त नपुंसकलिंगी शब्दांप्रमाणें चालतात.

## ४०. एर, सर्व, सकल

### पुल्लिंग

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र. :– एर, एरू, एरु | एर, एरै |
| सर्व | सर्व, सर्वै |
| सकल, सकलु | सकल. सकलै |
| एरएर | एरएरै |

बाकी रूपें अकारान्त पुल्लिंगी शब्दांच्याप्रमाणें.

(१) 'एर'चें स्त्रीलिंग एरि.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र. :– एरि, एरी | एरी |

(२) सर्व, सकल, हे शब्द तिन्हीं लिंगीं सारखे चालतात.

अनुक्रमणिका

## ४१. ऐस, कैस, जैस, तैस, इतक, इ.

(१) ऐस, ऐसैस, एवढ, एतुल, एतुक, एउत, एसण
(२) काइस, कैस, कैसैस, केवढ, केतुलं, केतुक, केउत, केसण, किउत
(३) जैस, जैसैस, जेवढ, जेतुल, जेतुक, जेउत, जेसण, जिउत
(४) तैस, तैसैस, तेवढ, तेतुल, तेतुक, तेउत, तेसण, तिउत
(५) इवढ, इतुल, इतुक, इउत, इसण, इउल

ह्या पांच वर्गांतील शब्दांचीं रूपें पुल्लिंगी आकारान्त, स्त्रीलिंगी ईकारान्त व नपुंसकलिंगी एँकारान्त शब्दांच्या प्रमाणें होतात. जसें, ऐसा, ऐसी, ऐसें इ. इ. इ.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | संस्कृत | अपभ्रंश | मराठी |
| | ईदृश | अइस | इस* |
| | कीदृश | कइस | कैस, काइस |
| | तादृश | तइस | तैस |
| | यादृश | जइस | जैस |
| | एतादृश | एआइस | ऐस, एस |
| | अन्यादृश | अण्णारिस (म.) | अनाइस (अनायासें), |
| | | अण्णाइस | अनारिस |
| | सदृश | सरिस | सरिस |
| | सदृक्ष | सरिख | सारिख |
| | | एत्तुल | एतुल |
| | | * इत्तुल | इतुल |
| | | जेत्तुल | जेतुल |
| | | तेत्तुल | तेतुल |
| | | केत्तुल | केतुल |
| | | एत्तिअ | एती-ति |
| | | इत्तिअ | इति-ती |
| | | तेत्तिक | तेती-ति |
| | | जेत्तिअ | जेती-ति |
| | | केत्तिअ | केती-ति |

(आ) वर्तमान मराठी

अनुक्रमणिका

एति + क = एतिक = एतुक (इ-चा उ होऊन)
इत्ति + क = इतिक = इतुक (इ-चा उ होऊन) = इतक
तेत्ति + क = तेतिक = तेतुक (इ-चा उ होऊन) = तितक
जेत्तिक + = जेतिक = जेतुक (इ-चा उ होऊन) = जितक
केत्ति + क = केतिक = केतुक (इ-चा उ होऊन) = कितक
एस + ण = एसण
तेस + ण = तेसण
जेस + ण = जेसण
केस + ण = केसण

| (इ) | संस्कृत | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| | इयत् | एवड | इवढ, इवल (ड = ल) |
| | एतावत् | एआवड | एवढ, एवल |
| | तावत् | तेवड | तेवढ, तिवल |
| | यावत् | जेवड | जेवढ, जिवल |
| | कियत् | केवड | केवढ, किवल |

(उ) इतुल = इउल = इवल ('तु' चा उ होऊन)
केतुक = केउअ = केउत ('अ' चा लोप व 'त' चें आधिक्य)

(ऊ) ल प्रत्यय लागून.
एवढाल, इतुलाल, इ. इ

## ४२. जेती, तेती, केती, एती

(१) जेती, तेती, केती, एती हीं सर्वनामें ईकारान्त पुल्लिंग व स्त्रीलिंग ह्यांसारखीं आणि ईकारान्त नपुंसक शब्दांसारखीं चालतात.

## ४३. संख्यावाचक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एकः—** | पु. प्र. ए. | एकु-एक; | अनेक० | एक-एके |
| | स्त्री. प्र. ए. | एकि-की; | अनेक० | एकी |
| | न. प्र. ए. | एक-एकु; | अनेक० | एक-एकँ |

नकार :— अनेक-अनेग (पु.)
अनेकी-अनेगी (स्त्री.)
अनेक-अनेग (न.)

अनुक्रमणिका

**द्वि :–**

**पुल्लिंग एकवचन**

प्र. द्वि. :– दोनि, दोन्ही, दोनी, दोन्हीँ, दोघै
तृ. च. ष. स. :– दोँ, दोहिँ, दोहीँ, दोहोँ
चान्त :– दोहीँ च

| | संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. द्वि :– | द्वौ | दोण्णि | दोनि |
| | द्वौ | बेण्णि, बिण्णि | बीणी |
| | द्वे | बे | बे |
| | द्विगुण | दुउण | दूण |
| | द्विधाकार | दोधार | दोधार (री निवडुंग, तरवार) |
| तृ. | :– द्वाभ्यां | दोहिं | दोहिं-हीँ |
| पं. | :–द्वाभ्यां | दोसुंतो | दोहीँ हुनि |
| ष. | :–द्वयोः | दोण्हं | दोहीँ, दोहोँ |

| **त्रि**:– महाराष्ट्री | मराठी |
|---|---|
| प्र. :– तिण्णि | तिनी. तिन्ही, तिन्हीँ, तीघ, तीघै |
| तृ. :– तिहिं | तिहिँ-हीँ |
| ष. :– तिण्हं | तिहिँ-हीँ |
| चान्त :– — | तिहिँ च |

| **चतुर्** | :– महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| प्र. | :– चत्तारि | चारि | च्यारी, चौघ, च्यान्ही |
| द्वि. | :– चउओ | — | चौ |
| तृ. | :– चउहिं | — | चौहिँ-हीँ |
| ष. | :– चउण्हं | — | चौहोँ, चौँ, चहूँ |
| चान्त | :– — | — | चौहीँ च |
| **पंचन्** | :– महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
| प्र. | :– पंच | — | पाँचै |
| तृ. | :– पंचहिँ | पंचहिँ | पांचीँ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ष. | :— पंचण्हं | पंचहँ | पांचीँ |
| षष् | :— महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
| प्र. | :— छा | छह | सा, साहै, साहीँ |
| तृ. | :— छहिं | — | साहिँ |
| ष. | :— छण्हं | — | साहीँ, साहाँ |
| चान्त | :— — | — | साहीँ च, साहाँच |
| सप्तन् | :— महाराष्ट्री | मराठी | |
| प्र. | :— सत्त | सात, सातै, सातें (न.) | |
| तृ. | :— सत्तहिँ | सातीँ | |
| ष. | :— सत्तण्हं | साताँ | |
| चान्त | :— — | साताँच | |
| अष्टन् | :— महाराष्ट्री | मराठी | |
| प्र. | :— अट्ठ | आठ, आठै | |
| तृ. | :— अट्ठहिँ | आठिं-ठीँ | |
| ष. | :— अट्ठण्हं | आठाँ | |
| चान्त | :— — | आठाँच | |
| **नवन्** | महाराष्ट्री | मराठी | |
| प्र. | :— नव | नौ, नव, नवै | |
| तृ. | :— नवहिं | नवीँ | |
| ष. | :—नवण्हं | नवाँ | |
| **दशन्** | महाराष्ट्री | मराठी | |
| प्र. | :— दह | दाहा, दाही | |
| तृ. | :— दहहिं | दाहीँ | |
| ष. | :—दहण्हं | दाहाँ | |

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| ११ | एआरह | एग्गारह | अकरा |
| १२ | बारह | बारह | बारा |
| १३ | तेरह | तेरह | तेरा |
| १४ | चोद्दह | चउद्दह | चौदा |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | *पण्णरह | पण्णरह | पन्हरा |
| १६ | सोळह | सोळा | सोला |
| १७ | *सत्तरह | *सत्तरह | सतरा |
| १८ | — | अट्ठरह | अठरा |
| १९ | — | एगूणविंसा | एकूणविस |
| २० | — | वीसइ | वीस, विसा (अशिष्ट) |
| २१ | एक्कवीसं | — | एकवीस |
| २२ | बावीसं | — | बावीस |
| २३ | तेवीसं | — | तेवीस |
| २४ | चउव्वीसं | — | चोवीस |
| २५ | पणवीसं | — | पंचवीस |
| ३० | तीसं | — | तीस |
| ३२ | बत्तीसं | — | बत्तीस |

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| ३५ पणतींस | | पसतीस |
| ४० चालींस | चाली | ०चाळ, चाळी, चाळीस (वर्तमान मराठी) |
| ५० पण्णासं, पण्णासा, पव्णा, ०पण्णं, ०वण्णं | | पन्नास |
| ५१ एकवण्णं | | एकावन |
| ५३ तेपण्णं | | त्रेपन्न |
| ६० सटिंठ | | साठि-ठ |
| ६१ एकसटिंठ | | एकसट |
| ७० सत्तरिं, ०हत्तरिं | | सत्तर, ०हत्तर |
| ८० असीइं | | ऐसी |
| ९० नउई | | नव्वद (नवदश, नवदह) ०नव |
| १०० १. सअ | | एकस, शंभर (स+भर) |
| २. सआइँ | | दोनि सैं = दोनशें |
| १००० सहस्स | | सहस्त्र ['हजार' हें संख्याविशेषण वास्तविक फारसी; पण राजवाड्यांनीं तें सं. सहस्त्र-पासून व्यु त्पादिलें आहे. (ज्ञा. अ. ९, ओ. ५८, पृ. ४२.)] |
| १००००० सतसहस्स | | सैं सहस्त्र, लक्ष, लाख |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १०००००००० कोडी | कोडी |

## ४४. क्रमवाचक

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| पढमिल्ल | पहिल | पहिल, एकसर |
| बिइज्ज<br>* दोसर | — | बीज<br>दुसर |
| तइअ<br>* तेसर<br>तिइज्ज | तिइज्ज | तीज<br>तिसर |
| चउत्थ | चउत्थ | चौथ |
| पंचम | — | पाँचव |
| छट्ठ * षषम | — | साव, साहाव |
| सत्तम | सत्तम | सातव |
| अट्ठम | अट्ठम | आठव |
| दसम | दहम | दहाव |
| एक्कारसम | — | अकराव |
| | | शंभराव |
| | | सहस्त्राव ['सहस्त्राव' पासून पुढील क्रमवाचके काल्पनिक आहेत.]<br>लक्षाव<br>कोडियाव<br>कोट्याव |

*वर्तमानकालीन मराठी

## ४५. अंशवाचक

| | संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|---|
| ¼ | पाद | पाअ | पाव, पावक (कृत्वा) ['पावक' इ. मापवाचक शब्द व 'पावकी' इ. पाढेवाचक शब्द यांतील 'क' प्रत्यय राजवाडे सं. कृत्वा-पासून व्युत्पादितात.] |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ½ | अर्ध | अड्ढ | आड, आडक (निमक) (कृत्वा) |
| | सार्ध | साड्ढ | साड, साडे० |
| ¾ | पादोन | पाअउण | पाऊण, पाऊणक (कृत्वा) |
| १¼ | सपाद | सवाअ | सवा, सवाक (कृत्वा) |
| १½ | द्व्यर्ध | दिवड्ढ | दीड, दिडाव (क्रमवाचक), दिडक (कृत्वा) |
| २½ | अर्धतृतीय | अड्ढाइज्ज | अडीच, अडिचाव, अडिचक (कृत्वा) |
| ३½ | अर्धचतुर्थ | अद्धुट्ठ | आउट, औट, औटाव, औटक (कृत्वा) |
| ५½ [मूळ प्रतीत ४½ असे छापण्यात मुद्रणदोष आहे.] | सार्धपंच | साड्ढपंच | साडपाँच, साडेपाँच |
| | एकार्ध | एक्काद्ध | एकाध (धा), एखाद (दा) व. म. [वर्तमानकालीन मराठी.] |
| १५० | — | — | दीडसैं |

## ४६. (१) (संकीर्ण संख्यावाचकें)

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| — | एक्कवारं | एकवार |
| — | एकवेलं | एकोल |
| एकदा | — | एकदा |
| द्विकृत्वा, द्विक | दुक्खुत्तो, दुक्कं (अर्धमागधी) | दुक, दुर्क (रेफ उसना) |
| त्रिकृत्वा, त्रिक | तिक्खुत्तो, तक्कं (अर्धमागधी) | तिक, तिर्क |
| बहुकृत्वा | बहुहुत्तं | बहूत |
| चतुष्क | चउक्क | चौक |

(२) [हा 'उजळणी' वरील संपूर्ण परिच्छेद उघडच ज्ञानेश्वरी-बाह्य आहे.] उजळणी (उज्ञवलनिका) = परवाचा (फारसी)

| | |
|---|---|
| एकः द्विकृत्वा द्वौ | = एके दुर्क दोन |
| एकः त्रिकृत्वा त्रयः. त्रीणि | =एके तिर्क तीन |
| एकः द्विगुणः द्वौ | =एके दूणे दोन |
| एकः त्रिगुणः त्रीणि | = एके तिणे तीन |
| एकः एकेन (गुणितः) एकः | =एक एकँ एक |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| दश एकेन दश | = दहा एकँ दहा |
| दश पंचभिः (गुणितः) पंचाशत् | = दहा पाँचीं पन्नास |
| दश नवभिः नवतिः | =दहा नवेँ नव्वद |
| दश दशभिः शतं | = दहा दाहीं शंभर |
| शतं शतानि दशसहस्त्रं | = शंभर शंभर दहा हजार ('हजार' फारसी) |

(३) संस्कृत तत्सम रूपें हि ज्ञानेश्वरींत सांपडतात;
जसें :— शत, एकादश, प्रथम, षोडस, इ. इ.

## ४७. आत्मन्

आत्मन् शब्दाचें महाराष्ट्रींत अप्प व अप्पण असे दोन अपभ्रंश होतात. त्यांवरून मराठींत आप व आपण असे अपभ्रंश आहेत.

पुल्लिंग

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| प्र. :— आपु, आपण | आप, आपण |
| तृ. :— आपेँ, आपणेँ | आपीँ, आपणीँ |
| च. :— आपा, आपणा | आपाँ, आपणाँ |
| स. :— आपिँ, आपणिँ | आपीँ, आपणीँ |
| चान्त :— आपाच, आपणाच | आपांच, आपणांच |
| स्त्रीलिंग | |
| प्र. :— आपि, आपी, आपणी, आपणि | आपी, आपणी |
| नपुंसकलिंग | |
| प्र. :— आपेँ, आपणेँ | आपीँ, आपणीँ |
| तृ. :— आपेन, आपेँ, आपणेन, आपणेँ | आपीँ, आपणीँ |
| स. :— आपाँ, आपणेयाँ, आपणाँ | आपाँ, आपणाँ |
| (भाववाचक) आपणपेँ | |
| प्र. :— आपणपेँ | आपणपीँ |
| स. :— आपणपाँ | आपणपाँ |
| चान्त :— आपणपेयाच | आपणपेयाँच |

(आवृत्तिवाचक)

आपाप-पी-पेँ

अनुक्रमणिका

आपैसा-सी-सैँ

आपुल

आपुला-ली-लैँ

## ४८. विशेषणविशेष्यविभक्ति

(१) विशेष्याची जी विभक्ति ती च विशेषणाची असते. [उदाहरणार्थ, 'उदारे प्रसिद्धे' (१२·१); 'पाणिलगें हंसें' (६·१७७); 'माह्येरें श्रीमंते' (९·३); इत्यादि. या विशेषणांना राजवाड्यांनी 'विशेष्यनिघ्न विशेषणें' म्हटले आहे.] संस्कृत, महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांचें च अनुकरण मराठी करते.

(२) क्वचित् विशेषण अविभक्तिक राहतें; जसें,

(अ) वाम चरणीँ (सप्तमी एकवचन)

(आ) मांट झाडी (प्रथमा एकवचन)

(इ) एरी कडे (चतुर्थी एकवचन स्त्रीलिंग)

(ई) कवणी कडे (चतुर्थी एकवचन स्त्रीलिंग)

(उ) परम गती (प्रथमा एकवचन)

(ऊ) मर्त्य लोक (चतुर्थी एकवचन)

(ऋ) जांत क्षणीं (सप्तमी एकवचन)

## ४९. वचन

एकवचनाचे व अनेकवचनाचे प्रत्यय ज्ञानेश्वरी मराठींत प्रायः अपभ्रंशद्वारा व क्वचित् महाराष्ट्रीद्वारा आले आहेत, हें मागील तपशिलावरून स्पष्ट आहे. आकारान्त पुल्लिंगी शब्द महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहींत. सबब मराठीनें एतत् व इदम् ह्या सर्वनामांपासून निघालेल्या ए व अ ह्या सर्वनामांच्या रूपांची मदत प्रत्ययार्थ घेतली आहे. ही गोष्ट होर्न्ले व बीम्स यांना माहीत नव्हती. त्यांना 'घोडा' या आकारान्त शब्दाचें अनेकवचन जें 'घोडे' ह्मणून होतें, त्यांतील 'ए' कसा आला तें कळेना. होर्न्ले म्हणतो,

"There can be no doubt, that these so called nom-plur-forms are elliptic phrases, [Elliptic phrase किंवा Ellipsis म्हणजे "The omission of a word or words considered essential for grammatical completeness, but not for the conveyance of the intended meaning." (व्याकरणदृष्ट्या आवश्यक, पण अर्थदृष्ट्या अनावश्यक अशा एक वा अनेक शब्दांचा लोप.) (Pai and Gaynor: A Dictionary of Linguistics.)] which must be filled up by supplying some collective noun like लोक, गन," (Hoernle : Grammar, p. 243)

अपभ्रंशांत 'घोडअहे गणु' असें षष्ठीचें एकवचन (अनेकवचन?) होतें, त्यावरून प्रथमेचें अनेकवचन 'घोडे' झालें, असें तो ह्मणतो (Hoernle: Grammar, p. 214). परंतु, हें सर्व गप्पाष्टक आहे, हें सांगावयास नको. बीम्सचा हि प्रकार होर्न्ले सारखा च झाला आहे. [बीम्सने नामांच्या अनेकवचनी रूपांची चर्चा केली आहे. ती करतांना त्याने (१) Uniform व (२) Multiform असे दोन प्रकार कल्पिले असून पहिल्यात हिंदी, पंजाबी, गुजराथी व बंगाली आणि दुसऱ्यात मराठी व सिंधी या भाषांचा समावेश केला आहे. परंतु बीम्सने होर्न्लप्रमाणे या अनेकवचनी रूपांना 'elliptic phrases' असें कोठेंही म्हटलेले नाही. (Comp. Grm. Of MAL, 2. 198-209).]

## ५०. सामान्यरूप (नामांचें)

वर्तमान मराठींत ज्याला सामान्यरूप ह्मणतात तें ज्ञानेश्वरी-मराठींतील विभक्तिरूपांवरून आलेलें आहे, होर्न्ले ह्मणतो त्याप्रमाणें इतर गौड भाषांतून वाटेल तेव्हां, वाटेल तसें घेतलेलें नाहीं. वर्तमान मराठींत अकारान्त पुल्लिंगी शब्दांचें सामान्य रूप ज्ञानेश्वरी-मराठींतील विभक्तिरूपांवरून कसें निघालें तें मागें सांगितलें आहे. बाकीच्या प्रकारांचा येथें निर्देश करतों. तृतीयेच्या 'नीं' व 'नें' प्रत्ययांची प्रक्रिया व तत्पूर्वी होणारे इतर विभक्तिसामान्यरूपसम शब्दांचें सामान्यरूप यांची मोड अकारान्त शब्दांच्या तृतीयेच्या रूपाप्रमाणें च आहे.

### पुल्लिंग

| ज्ञानेश्वरी रूप | एकनाथी रूप | वर्तमान मराठींतील सामान्यरूप |
|---|---|---|
| आकारान्तः- डोलेया—याँ | डोलया—याँ | डोळ्या, डोळ्याँ |
| इ :— हरि—री;—रीँ —रिँ | हरी—रीँ | हरी, हरीँ |
| ई :— विवेकिया—याँ | विवेकिया—याँ | विवेक्या, विवेक्याँ |
| उ :— गुरु—रू—रुँ—रूँ | गुरूँ—रूँ | गुरू, गुरूँ |
| ऊ :— बहू, बहुविँ | बहू, बहुविँ | बहू—बहुवा—बव्हा—बहवा; |
| | | बहूँ—बहुवाँ—बव्हाँ—बहवाँ |

### नपुंसकलिंग

| | | |
|---|---|---|
| अकारान्तः— पुल्लिंगाप्रमाणें | | |
| इ—इँ :— पाणिया—याँ | पाणिया—याँ | पाण्या—ण्याँ |
| उँ :— गोरुवा—वाँ | गोरुवा—वाँ | गुरा—राँ |
| कुंकुवा—वाँ | कुंकुवा—वाँ | कुंक्वा—क्वाँ |
| | | कुंका—काँ |
| एँ :— दिसणेया—याँ | दिसणेया—याँ | दिसण्या—ण्याँ |
| आलेया—याँ | आलया—याँ | आलया—ल्याँ |
| | आलिया—याँ | |

### स्त्रीलिंग

| | | |
|---|---|---|
| आ :— माला—ले, मालाँ | माले—लाँ | माले—लाँ |
| | | सासे—सासाँ |
| इः— बुद्धि—द्धी, बुद्धीँ | बुद्धी—द्धीँ | बुद्धी—बुद्धीँ |
| ईः— देवकी—किया, | देवकी—किया, | देवकी—देवक्याँ |
| देवकियाँ | देवकियाँ | मुंगी—मुंग्याँ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | स्त्री–स्त्रियाँ |
| | | स्त्रिये–स्त्रियाँ |
| उ:– धेनू–नूँ | धेनू–नूँ | धेनू–नूँ, सासू–सासूँ |
| ऊ:–बहू–बहूवे–बहुवा | — | बहुवे–वाँ |
| बहूँ–बहूविँ–बहुवाँ | — | सासुवे–सासुवाँ |

(अ) वर्तमान मराठी अकारान्त स्त्रीलिंगी शब्द आकारान्त किंवा इकारान्त शब्दांपासून निघाले असल्यास, (त्यांची) आकारान्त किंवा ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दांच्याप्रमाणें सामान्यरूपें होतात:—

कींव (कृपा) :– किवे–वाँ
मठ (मुष्टि) :– मुठी–मुठीँ
(आ) हळद वगैरे शब्द आकारान्त किंवा इकारान्त चालतात. (कलम २४).
हळद (हलद्दा, हलद्दी) :– हळदे–दाँ; हळदी–दीँ
फांक (फक्की, फक्किका) :– फाके–काँ; फाकी–कीँ
डाळ (द्विदला, द्विदला [पुनरुक्ती अनावश्यक. कदाचित हा शब्द 'द्विदली' असा असेल. तसें असल्यास मुद्रणदोष.]) :– डाळे–ळाँ; डाळी–ळीँ

(इ) कित्येक स्त्रीलिंगी शब्द इकारान्त किंवा ईकारान्त आणि उकारान्त किंवा ऊकारान्त असल्यामुळें, दोन्हींप्रमाणें चालतात:–
सासु:– सासू–सूँ
सासू:– सासवे–सासवाँ
सासा:– सासे–सासाँ
स्त्रि:– स्त्री–स्त्रीँ
स्त्री:– स्त्रिये–याँ

## ५१. सर्वनामांचें सामान्यरूप

| ज्ञानेश्वरी | एकनाथी | वर्तमान मराठी |
|---|---|---|
| अ, इ :– इया, यया, या, | या, इया | या (पु. न.), इ (स्त्री) |
| इये, ये, इ. इ. | | |
| इयाँ, ययाँ, याँ, इ. इ याँ, इयाँ | | याँ (पु. स्त्री. न.) |
| ए :– एआ, एया; | या, एया | ह्या (पु. न.), हि (स्त्री.) |
| एआँ, एयाँ | याँ, एयाँ | ह्याँ (पु. स्त्री. न.) |
| त :– तेया, तिये, तिया | तया, तये | त्या (पु. न.), ति (स्त्री.) |
| तेयाँ, तियाँ, इ. इ. | तयाँ, तियाँ | त्याँ (पु. स्त्री. न) |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| जैस :– जैसेन, जैसेया, इ. इ. | जैसया, जैसिया | जशा, जश्या |
| जैसेयाँ, जैसियाँ, इ. | जैसयाँ, जैसियाँ | जशाँ, जश्याँ |

याचप्रमाणें अशा, तशा, कशा इ. इ. इ.

सारांश, वर्तमान मराठींतील सामान्यरूप ज्ञानेश्वरी मराठींतील विभक्तिरूपांवरून निपजलें आहे. भाषेचा एकविधतेकडे कल आहे.

## ५२. अनेकवचनाचा अनुनासिक

अनेकवचनाचा अनुनासिक ज्ञानेश्वरकालीं होता. शक ११२८ तील चांगदेवाच्या पाटण येथील शिलालेखांत तो आहे. त्यावरून, हा अनुनासिक फारसीचा संसर्ग होण्याच्या पूर्वी मराठींत आला. अर्थात्, संस्कृतांतील षष्ठीच्या व द्वितीयेच्या आन्–पासून याची उत्पत्ति आहे यांत संशय नाहीं.

## ५३. लिंग

ज्ञानेश्वरींत खालील शब्दांचीं लिंगें महाराष्ट्रींतल्याप्रमाणें होतात, संस्कृतांतल्याप्रमाणें होत नाहींत.

| संस्कृत | महाराष्ट्री | ज्ञानेश्वरी | वर्तमान मराठी |
|---|---|---|---|
| प्रावृष् (स्त्री.) | पाउस (पु.) | पाऊस (पु.) | — |
| शरत् (स्त्री.) | सरअ (पु.) | | सरा (पु.) |
| | | | सराई (स्त्री.) |
| जन्मन् (न.) | जम्म (पु.) | जन्म (न.) | जन्म (पु.) |
| शिरस् (न.) | शिर (पु.) | शिर (न.) | शिर (पु. न.) |
| नयन (न.) | णअण (पु.) | — | नयन (पु.) |
| देह (पु.) | — | देह (न.) | — |
| गरिमन् (पु.) | गरिमा (स्त्री.) | गरिमा (स्त्री.) | — |
| | | गरिवँ | |
| महिमन् (पु.) | महिमा (स्त्री.) | महिमा (स्त्री.) | महिमा (स्त्री.) |
| अंजलि (पु.) | अंजली (स्त्री.) | अंजलि (स्त्री.) | अंजुळी (स्त्री.) |
| चौर्य (न.) | चोरिआ (स्त्री) | चोरी (स्त्री.) | |
| निधि (पु.) | निधि (स्त्री. पु.) | निधि (स्त्री. पु.) | |
| ग्रंथि (पु.) | गंठी (स्त्री.) | गांठि (स्त्री.) | |
| बाहु (पु.) | बाहा (स्त्री.) | बाहा (स्त्री.) | |
| | | आदि (स्त्री.) | |

अनुक्रमणिका

दुर्ग (न.)
स्नेह (न.)
वस्तु (स्त्री.)
रोमा (स्त्री.)
बली (स्त्री.)

राजत्वं (न.), राणिमा (स्त्री.), राणिव (स्त्री.) इ. इ. इ.
ह्या हि बाबींत मराठीचा स्वभाव महाराष्ट्री व अपभ्रंश यांच्याप्रमाणें आहे.

**षष्ठमान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

## सप्तमान्हिक

## क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास

### ५४. कर्तरि स्वार्थे

### वर्तमाने लट्

### परस्मैपदं अनिट्

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| उत्तमपुरुष | १. हसामि | हसउँ | हसैँ, हसोँ |
| | २. हसामो–मु | हसहुँ | हसोँ, हसूँ |
| मध्यमपुरुष | ३. हससि | हससि–हि | हससि |
| | ४. हसह | हसहु | हसा |
| प्रथमापुरुष | ५. हसइ | हसइ | हसे |
| | ६. हसंति | हसहिँ | हसति |

### परस्मैपदं अनिट्

१ :–जाणैँ, लाजैँ, नाचरैँ (नाचैँ?), भियैँ, पाहैँ, जुझैँ, बोलैँ, नेधैँ, ह्मणोँ, देखोँ
२ :–जाणोँ, नेणोँ, पूसोँ, पाहोँ, बोलोँ, नेघोँ.
३ :–जाणसि, सांघसि, पवसि, नोलखसि, परियससि, सूंसि, देँ सि, घेँ सि, होँ सि.
४ :–जाणा, सांघा. बोला.
५ :–देखे, ह्मणे, पडे, पवे, चढे, नेणे, दीसे, पावे, रुपे, हसै, सिवै, दे, घे, देइँ घेई, ह्मणो.
६ :–फूटति, भेटति, लगति, मिरवति, पवति, ठाकति, पींथि, जींथि, तराति, आहाति, नेँ घति, वीकेति, नव्हाति, साहाति. ठाँति, आथि, ह्मणथि, दीसथि, वींथि, लाहाँतिं, करँति, होँ ति.

कित्येक एकाक्षरी धातू प्रथमपुरुषीं अनेकवचनीं ति बद्दल थि घेतात.

कित्येक धातू प्रथमपुरुषीं अनेकवचनीं उपान्त्य अ चा आ किंवा ए करतात.

कित्येक धातू प्रथमपुरुषीं एकवचनीं ऐ हा अन्त्य स्वर ए बद्दल घेतात.

कित्येक धातू प्रथमपुरुषीं अनेकवचनीं उपान्त्य अ किंवा आ वर अनुनासिक ठेवतात. हा अनुनासिक संस्कृतांतील अनुस्वाराचा वंशज आहे.

### एकाक्षरी धातू

पी :– १ पिए, २. पिऑँ, ३. पीसि, ४. पिया, ५. पीए. ६. पींति–थि

अनुक्रमणिका

पा :– १ पाए, २. पावौँ, ३. पासि, ४. पा, ५. पाए, ६. पांति–थि

ए :– १ एई, ए, ऍं. २. एवौँ, ३. एसि, ४. एया, ५. एई, ए, ६. एंति–थि, यंति.

न + ए :– १ नैएँ–यैं, नएँ. २. नैएवौं, ३. नैयेसि, ४. नैया, ५. नैए, नये, नैये, नए, ६. नैयंति, नएंति, नयंति

न + दे :– १ नेंदी, २. नेंदों, ३. नेंदिसि, ४. नेदा, ५. नेंदी, ६. नेंदिति.

जे धातू प्रथमपुरुषाच्या अनेकवचनीं प्रत्ययापूर्वी इडागम घेतात, त्यांना येथें सेट् ह्मटलें आहे; जसें :–करिति.

जे इडागम घेत नाहींत ते अनिट्; जसें :–हसति.

जे विकल्पानें इडागम घेतात ते वेट्; जसें :–मानति, मानिति.

लट्मध्यें मराठीनें अपभ्रंशाला सोडून महाराष्ट्रींचें जास्त अनुकरण केलें आहे. लिङ्, लोट् व लङ् मध्यें हि महाराष्ट्रीचें च मराठीनें अनुकरण केलेलें आढळतें. ह्याचा अर्थ इतका च कीं हेमचंद्र ज्या अपभ्रंशाचें व्याकरण देतो त्याहून निराळा अपभ्रंश महाराष्ट्रांत होता. त्या निराळ्या अपभ्रंशापासून ज्ञानेश्वरी मराठी निष्पन्न झाली आहे. हा निराळा अपभ्रंश महाराष्ट्रीहून इतका थोडा भिन्न असावा कीं त्याला अपभ्रंश असें भिन्न नामाभिधान हि शोभत नाहीं. ही टीका कृदन्तांना हि लागते. सारांश, एकंदर पुरावा पहातां, ज्ञानेश्वरी मराठी किंचित् उच्चारांत फेरबदल झालेल्या अपभ्रंशापासून निघाली आहे, हेमचंद्राच्या अपभ्रंशापासून निघालेली नाहीं, असें विधान करण्याकडे प्रवृत्ति होते.

वर्तमान मराठींत हा लट् कवितेंत येतो; बोलण्यांत क्वचित् येतो.

स्वार्थे, कर्मणि, भावे, प्रयोजक व सन्नन्त हे सर्व धातुसंज्ञक आहेत, व ह्यांना लडादि होतात. तेव्हां धातूंची सिद्धि प्रथम देऊन नंतर लकार दिले पाहिजेत. परंतु, येथें प्रथम स्वार्थे लकार दिले आहेत व नंतर कर्मणि, भावे, प्रयोजक व सन्नन्त धातूंची सिद्धि कशी होते ती सांगितली आहे.

**परस्मैपदं सेट्**

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| उ. पु. | १. करिमि, करेमि | करिमि, करउँ | करीँ |
| | २. करेमो | करहुँ | करूँ |
| म. पु. | ३. करेसि | — | करिसि |
| | ४. करेह | — | करा |
| प्र. पु. | ५. करेइ | — | करी |
| | ६. करेंति | — | करिति |

**परस्मैपदं सेट्**

१ :– मानीँ, गीलीँ, स्रजीँ, धरीँ, संहारीँ

२ :– मानूँ, गीलूँ, स्रजूँ, धरूँ, संहारूँ

अनुक्रमणिका

३ :— मविसि, संडिसि, विचारिसि, मनिसि, चिंतिसि
५ :— दावी, उठी, घाली, नेंदी, अर्पी, त्यजी, फेडी, ग्रासी
६ :— लिहिति, सेविति, आप्लविति, निवडिति, रुणझुणिति, सुचीति, करीति

### आत्मनेपदं अनिट्

| महाराष्ट्री | मराठी |
|---|---|
| १. मण्णे, मणे (मन्ये) | मणे, ह्मणे |
| ५. लग्गए, अंदालए, झिज्जए, खिज्जए (क्षीयते) | लगे, लागे, अंदोले, झिजे, खिजे |
| ६. गज्जंते, शोभंते, वाजंते, युध्यन्ते [माहाराष्ट्री प्राकृतात 'युध्यन्ते' असें तत्सम रूप न राहतां ते 'जुज्झन्ते' असें होईल.] | गाजते, शोभते, वाजते, जुझते |

"तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें । **शोभते** भलीं (अ. १ ला) ॥ [इतर प्रतींतून 'शोभतीं' असा पाठ आहे.]

सेट् व अनिट् या दोन्ही वर्गात सकर्मक व अकर्मक धातू येतात. आत्मनेपदाचीं कांहीं रूपें ज्ञानेश्वराच्या कालीं होतीं. [ज्ञानेश्वरींतील आत्मनेपदाचीं रूपें हा मतभेदांचा विषय असून त्याची चर्चा प्रस्तुत आवृत्तीच्या प्रस्तावनेत केली आहे.]

### ५५. विधिलिङ्

[मराठींत विधिलिङ् नाहीं. तर 'इजे' प्रत्ययानें जीं कर्मणि रूपें होतात, त्यांनाच विध्यर्थ प्राप्त होतो. म्हणजे, रूप कर्मणीचें व अर्थ विधीचा असें मानावें लागतें. प्राकृतांतही विध्यर्थी रूपांचा पाया 'ज्ज' प्रत्ययान्त कर्मणिच आहे. (पहा : भांडारकर: WPL, पृ. २१५-२१६).]

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| १ नमेयं | णमेज्जा—ज्ज, णमेज्जामि | — | नमिजे |
| २ नमेम | णमेज्जाम | — | नमिजे |
| ३ नमेः | णमेज्जा, णमेज्जासि, णमेज्जासु | णमी णमिज्जसु | नमी, नमिजे, नमिजसु |
| ४ नमेत | णमेज्जाह | णमेज्जहु | नमिजे |
| ५ नमेत् | णमेज्जा—ज्जइ | णमेज्ज | नमिजे |
| ६ नमेरन् | णमेज्जा—ज्ज | — | नमिजे |

वर्तमान मराठींत विधिलिङ् चांगला राहिला आहे.

| वर्तमान मराठी | महाराष्ट्री |
|---|---|
| १ मी जाइनज्ञा, खाइनज्ञा, जेवेनज्ञा | जाज्ञा, खाज्ञा, जेमेज्ञा |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| २ आह्मी जाउँज्ञा, खाऊँज्ञा, जेवूँ ज्ञा | जाज्ञाम, खाज्ञाम, जेमेज्ञाम |
| ३ तूं जाज्ञा, खाज्ञा, जेवज्ञा | जाज्ञा, खाज्ञा, जेमेज्ञा |
| ४ तुह्मीं " " " | जाज्ञाह, खाज्ञाह, जेमेज्ञाह |
| ५. तो खाज्ञाइ, जाज्ञाइ, जेवज्ञाइ | जाज्ञइ, खाज्ञाइ, जेमेज्ञइ |
| ६. ते खाज्ञातील, जाज्ञातील, जेवज्ञातील | जाज्ञा, खाज्ञा, जेमेज्ञा |

अलीकडील दादोबादि मराठी वैय्याकरण विधिलिङ्चा हा 'ज्ञा' प्रत्यय 'जा' कल्पून सहाय क्रियापद समजत. मराठींत उच्चारांत सदा द्वित्त ज्ञा येतो, हें त्यांनीं लक्ष्यांत घेतलें नाहीं. वर्तमान मराठींत अनुकरणानें जाईन, जातील, अशीं रूपें 'जा' हा स्वतंत्र सहायधातु कल्पून होतात. त्यानें ही दादोबादिकांची दिशाभूल झाली. [दादोबांची दिशाभूल झालेली नाहीं. कारण वर्तमान मराठींत जुना विधिलिङ् राहिलेला नसून 'जा' हा सहाय धातुच आहे. त्याचा विधिलिङ्च्या माहाराष्ट्रीतील 'ज्ञा' प्रत्ययाशीं संबंध नाहीं. (चि. वि. वैद्य: निबंध आणि भाषणें, पृ. १३८).] ज्ञानेश्वरींत तिन्हीं पुरुषीं व दोन्ही वचनीं एक जेकारान्त च रूप आढळतें. फक्त मध्यमपुरुषाच्या एकवचनीं क्वचित् 'ज्ञसु' हा प्रत्यय आढळतो; किंवा 'ई' हा प्रत्यय आढळतो; जसे, करिजसु, दीजसु, करीँ, दें ई, धरीँ, ठेवीँ, विचारीँ, इ. इ. इ. (तूं) जाज्ञा, खाज्ञा ह्यांचे उच्चार खात्‌जा, जात्‌जा असे हि सध्यां करतात.

करिजे, जाणिजे, होइजे, हरिजे, पाहिजे, कथिजे, धरिजे, घेपिजे, राखिजे, जीविजे, निरखिजे, सेविजे, हाणिजे, गाइजे, वगैरे शेंकडों रूपें विधिलिङ्‌ाचीं ज्ञानेश्वरींत आहेत.

हा लिङ् बीम्स व होर्न्ले यांना ओळखतां आला नाहीं.

## ५६. आज्ञायां लोट्

[येथें न सांगितलेला 'लोट्'चा एक प्रकार राजवाड्यांनीं अन्यत्र दाखविला आहे. त्यांत लोट् चें सर्व पुरुषीं, वचनीं व लिंगी एकच रूप होते. जसें, "आगा कुलाचेया चोखटपणा न **लगा** । आभिजात्यें झनें **श्लाघा** । व्युत्पत्तीचा ही वाउगा । सोसु कां **वाहा** ॥ (ज्ञा. ९.४२७). तुळा : वर्तमान मराठींत : 'पचत नाहीं. तर कां खा?']

| महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|
| १. हसामु, हसमु | — | हसौं, हसूँ |
| २. हसामो, हसह्म, हसेह्म | हसाहुँ | हसौं |
| ३. हस, हससु, हसेहि | हसु, हससु, हसेहि | हसीँ, हस, हससु |
| ४. हसह | हसहु, हसेहु | हसा, हसाँ |
| ५. हसउ | हसउ | हसो |
| ६. हसंतु | हसंतु, हसहिँ | हसतु |

१. ह्मणौं, वानूँ, गणूँ, देखो
२. ह्मणौं, वानूँ, गणौं, देखौं
३. करीँ, जाण, कर, जाणैं, आइक, आइकै (आइकेइँ = आइकेहि), पाहे. उपसाहे, देख, जाणसु, देई, दे.

अनुक्रमणिका

४. देखाँ, अवधारा, आइकाँ, परियसाँ, करा, देयाँ, घेयाँ, नेयाँ.
५. जलो, फीटो, सूटो, असो, अवधारिजो, देओ, घेओ, जिओ, करो, करू.
६. देतुँ, करितु, असतु, मारितु, घेँ तु, एँतु, जीँ तु, पीँ तु—थु.
करसु, कीजसु वगैरे रूपें आत्मनेपदीं आहेत.

वर्तमान मराठींत (१) हसों, (२) हसों, (३) हस, (४) हसा, (५) हसो, (६) हसोत, अशीं रूपें होतात.

## ५७. अनद्यतनभूते लङ् (सेट् व अनिट्)

| संस्कृत | प्राकृत | मराठी |
|---|---|---|
| १. आसम्, अहसम् | आसिं | (असँ) असेँ, (हसँ) हसेँ, करीँ |
| २. आस्म अहसाम | आसीमो-आसीमु | असोँ, हसीँ, करूँ |
| ३. आसीस्, अहसस् | आसि, आसीस् | असस, हसस, करीस |
| ४. आस्थ, अहसत | — | असा—साँ, हसा—साँ, कराँ |
| ५. आसीत्, अहसत् | आसि | आत्मनेपद—असे, हसे, करी |
| | | परस्मैपद—असत, हसत, करीत |
| ६. आसन्, अहसन् | — | असत, हसत, करीत |

लङ् पुढे असतां, संस्कृतांत धातूंच्या मागें जो अडागम होतो, तो मराठींत होत नाहीं; प्राकृतांत हि क्वचित् होई. न होण्याकडे च प्राकृतांत प्रवृत्ति होती, ती मराठींने अनपवाद कायम केली. भूतार्थे विहितस्य प्रत्ययस्य स्थाने स्वरान्तात् ही, सी, हीअ इत्येत आदेशा भवन्ति; व्यंजनान्ताद्धातोः परस्य भूतार्थे विहितस्य प्रत्ययस्य स्थाने इअ आदेशो भवति। अडागमलोपो विकल्पेन भवति; यथाः--

अकार्षीत् = कासी, काही, काहीअ, अकासी
अस्थात् = ठासी, ठाही, ठाहीअ, अठासी
अग्रहीत् = गेण्हिअ
वैदिक लेट्मध्यें हि कधींकधीं अडागम होत नसे.

ह्या लङ्ला दादोबा रीतिभूत ह्मणे व तो मराठींतील जुन्या वर्तमानापासून, ह्मणजे लट्पासून निघाला, असें प्रतिपादी.

उदाहरणः—
तवं कृष्णु ह्मणे पांडुसुता। तो वैवस्वतु जैं होंता।
तैं आह्मीं नसों ऐसी चित्ता। प्रतीति तुज ॥ ४०॥

(अध्याय ४ था)

येथें ह्मणे (प्रथमपुरुष एकवचन) व नसों (उत्तमपुरुष अनेकवचन) अनद्यतनभूते लङ्§चें आहे.

तेथे तीन्ही लोक डंडलित । मेरुमंदार आंदोलत ।
समुद्रजल उसलत । आकाशवेन्ही ॥ १५५॥

(अध्याय १ ला)

येथें डंडलित, आंदोलन हीं लङ्§चीं प्रथमपुरुष अनेकवचनाचीं रूपें आहेत; व उसलत हें प्रथमपुरुषाचें एकवचन आहे.

[वरील दोन्ही ठिकाणी मुळात 'लुङ्' असे नजरचुकीने छापले आहे.]

१. अहसम् पासून मराठी (अ) हसँ. अन्त्य अँ चा एँ करण्याचा मराठीचा स्वभाव. तदनुरोधानें हसँ. हसँ असा उच्चार अशिष्ट अद्यापि करतात.

२. अहसामु पासून (अ) हसाउँ, हसौं.

३. अहसस् पासून (अ) हसस.

४. अहसह पासून (अ) हसा.

५. अहसत् पासून (अ) हसत किंवा (हसअ = हस = हसे) हसे. ('हस' उच्चार अशिष्ट लोक करतात.)

६. अहसन् पासून (अ) हसँत, हसत.

दादोबा, गोडबोले, बीम्स व होर्न्ले हे सर्व ह्या लङ्ला लट् समजत. परंतु असिस (लट्) व असस (लङ्) ह्यांतील भेदाचें कारण काय, हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं.

वर्तमान मराठींत (१) हसें, (२) हसों, (३) हसस, (४) हसा, (५) हसे, (६) हसत, अशीं रूपें होतात.

हा लङ् वर्तमान मराठींत फार योजतात. [राजवाडे यांचे लङ्विषयक वरील सर्वच विवेचन विवाद्य आहे. कारण मराठींत संस्कृतमधील 'लट्' वरून आलेला ऐतिहासिक वर्तमान (Historic Present) हा एकच काळ असून त्याच्या रूपांना संदर्भानुसार वर्तमान—भूत—भविष्य असे भिन्नार्थ प्राप्त होतात. लङ् पूर्वीच लुप्त झाला. मराठींत तो नाहीं. त्यामुळे त्याचा उल्लेख न करणारे दादोबादि वैयाकरण दोषार्ह ठरत नाहींत. (तुळपुळे : या. का. म. § १७०) वैद्यांना मात्र राजवाड्यांनीं दाखवून दिलेले लङ्चे अस्तित्त्व मान्य दिसतें. (निबंध आणि भाषणें, पृ. १३६-१३७).]

## ५८. लुङ्

लुङ्चा मागमूस मराठींत बिलकुल राहिलेला नाहीं. एक रूप मात्र राहिलें आहे. तें 'होत्था' हें होय. हें अर्धमागधींतील आहे. परंतु मराठींत ज्या अर्थी तें अद्याप आहे, त्या अर्थी महाराष्ट्रींत हि असावें.

अभूत् = अहोत्था = होत्था = होथा = होता = हाँ ता.

४७ व्या कलमांतील "तो वैवस्वतु जैं होंता" ह्या चरणांतील होंता हें रूप लुङ्चें आहे.

अनुक्रमणिका

भवत् पासून झालेलें जें वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण 'होंत' त्याच्या धर्तीवर ह्या लुङ् 'होंता' रूपाचीं तिन्हीं लिंगीं होंता, होंती, होंतें, अशीं रूपें अनुकरणानें ज्ञानेश्वरकालीं च झालीं. ह्मणजे ह्या रूपाच्या उगमाची आठवण ज्ञानेश्वरकालीं च बुजून कित्येक शतकें झालीं होंतीं. [लिंगवचनानुसार रूपें बदलत असतांना तीं धातुसाधिताचीं न मानतां 'लुङ्' चीं, म्हणजे एका आख्याताचीं, कशी मानतां येतील? अर्थात्, मराठींत लुङ्चा निरपवाद लोप झालेला आहे. वरील 'होंता' हें रूप लुङ्चें नाही.]

## ५९. लिट्

[मुळांत मथळा देण्याचें राहून गेले आहे.]

अनद्यतनपरोक्षभूते लिट् मराठींत नाहीं. महाराष्ट्रींत किंचित् होता; ह्मणजे एखाद्या धातूचें एखाददुसरें रूप होतें. तसें च मराठींत अस, आह धातूचें 'आहा' असें अनद्यतनभूते लिट्चें रूप आहे; जसें:—

"तो विश्वासें मारितां रिपु । निवटूनि घातला दर्पु ।
आणि जेयाचा **आहा** कंपु । तापसांसिं॥ १०५१ ॥ (अ. १८)
ह्मणजे, ज्यामुळें तापसांना कंप झाला.

| संस्कृत | मराठी |
|---|---|
| १. आस | |
| २. आसिम | |
| ३. आसिथ | |
| ४. आस | |
| ५. आस | आह (उच्चारदार्ढ्यार्थ आहा) |
| ६. आसुः | |

अनद्यतनपरोक्षभूते लिट् चें साऱ्या ज्ञानेश्वरींत हें एक च रूप आहे. हें रूप वर्तमान मराठींत नाहीं.

## ६०. प्रायोभते निष्ठान्तप्रयोग एव प्राकृते दृश्यते

[हा काळ (लुट्, किंवा First Future) प्राकृतकाळींच लुप्त झाला. अर्थात् मराठींत त्याची अपेक्षा नाहीं व तो अस्तित्वातही नाहीं. तो आहे असें म्हणण्यात मुख्य अडचण म्हणजे मराठींतील जुन्या भविष्यार्थी व नव्या संकेतार्थी रूपांना लिंगविकार होत असल्यानें तीं धातुसाधित विशेषणें मानावीं लागतात. त्यामुळें बीम्स व होर्न्ले यांनीं हा 'लुट्' ओळखण्याचा प्रश्न निर्माण होत नाहीं. कारण संस्कृतांतील प्रमाणें मराठींत दोन भविष्यकाळ नाहींत, एकच आहे. या बाबतींत चिं. वि. वैद्य राजवाड्यांशी सहमत दिसतात (निबंध—भाषणें, पृ. १३९). पण लृट्च्या बाबतींत मात्र त्यांना बीम्सची उपपत्ती अधिक ग्राह्य दिसते (सदर, पृ. १३९).]

महाराष्ट्रींत 'क्त' व 'क्तवतु' प्रत्यय लागून झालेलीं धातुसाधित विशेषणें भूतकालाचें बरें च काम करीत. तो च कित्ता मराठीनें—ह्मणजे महाराष्ट्रीच्या नातींनें-गिरविला आहे. लङ्च्या बरोबरीनें 'क्त' व 'क्तवतु' प्रत्यय लागून झालेलीं धातुसाधितें मराठींत भूतक्रियादर्शनार्थ योजतात. ह्या 'क्त' व 'क्तवतु' प्रत्ययांचा प्रपंच योग्य स्थलीं पुढें विस्तारानें केला आहे. (कलम ६० पहा.)

अनुक्रमणिका

## ६१. अनद्यतनभविष्यति लुट्§

| संस्कृत | मराठी |
|---|---|
| १. पूरयितास्मि | पुरविताहँ, पुरवितौँ (वर्तमान मराठी) |
| २. पूरयितास्मः | पुरविताहौँ, पुरवितौँ (व. म.) |
| ३. पूरयितासि | पुरविताहासि, पुरवितासि, पुरवितास (व. म.) |
| ४. पूरयितास्थ | पुरविताहाँ, पुरविताँ (व. म.) |
| ५. पूरयिता | पुरविता, पुरविता (व. म.) |
| ६. पूरयितारः | पुरविते, पुरविते–पुरवितेति (व म.) |

कंसांतील रूपें वर्तमान मराठींत भूतहेतुहेतुमद्भावे योजितात : जसें, ‘जर मी जातों तर तो येता.’

संस्कृतांत हा काळ संयुक्त आहे. पूरयितृ या नामाच्या प्रथमेच्या एकवचनाला अस् धातूच्या वर्तमानकालाचीं रूपें उत्तम व मध्यम पुरुषीं लावतात व प्रथम पुरुषीं लावीत नाहींत, आणि प्रथम पुरुषाच्या अनेकवचनीं नामाचें प्रथमेचें अनेकवचन योजतात. तो च प्रकार हुबेहुब मराठींत होतो. हा लुट् बीम्स व होर्न्ले यांना माहीत नाहीं. वर्तमान मराठी कवितेंत हें रूप योजतात; बोलण्यांत क्वचित् येतें.

## ६२. भविष्यति लृट् (अनिट्)

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| १. हसिष्यामि | हसेहिमि | हसैँ + ल = हसैन |
| २. हसिष्यामः | हसेहिमो | हसूँ + ल = हसूँ |
| ३. हसिष्यसि | हसेहिसि | हससि + ल = हससील |
| ४. हसिष्यथ | हसेहित्था, हसेहिह | हसा + ल = हसाल |
| ५. हसिष्यति | हसेहिइ | हसेइ + ल = हसैल |
| ६. हसिष्यंति | हसेहिंति | हसति + ल = हसतील |

## भविष्यति लृट् (सेट्)

| महाराष्ट्री | मराठी |
|---|---|
| १. करिस्सामि, करिहिमि | करीँ + ल = करीन |
| २. करिस्सामो-मु, करिहिमो | करूँ + ल = करूँ |
| ३. करिस्ससि, करिहिसि | करिसि + ल = करिसील |
| ४. करिस्सथ, करिहित्था | करा + ल = कराल |
| ५. करिस्सइ, करिहिइ | करी + ल = करील |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| ६. करिस्संति, करिहिंति | करिति + ल = करितील |

करिहिमि = करिइइँ = करीँ

करिहिमु = करिइउँ = कऱ्युँ = करूँ

करिहिसि = करिइसि = करिसि

करिहित्था = करिइहा = कऱ्या = करा

करिहिइ = करिइइ = करी

करिहिंति = करिइंति = करिंति = करिति

अशीं लृट्चीं [या सबंध परिच्छेदांत मूळ प्रतींत नजरचुकीनें 'लृट्' च्या ऐवजी 'लुट्' असे छापलें आहे.] महाराष्ट्रीपासून मराठींत रूपें निपजतात. तीं लट्च्या रूपांसारखीं च कानाला भासतात. तेव्हा लृट्रूपें व लट्रूपें ह्यांतील भेद दाखविण्याकरितां मराठीने लृट्च्या रूपांना स्वार्थे ल प्रत्यय ज्ञानेश्वरकालीं विकल्पानें लावला. विकल्पानें लावला असें ह्मणण्याचें कारण कीं, ल प्रत्ययाखेरीज साधीं लृट्चीं रूपें ज्ञानेश्वरींत सांपडतात. शक ११२८ तील पाटण येथील शिलालेखांत उघटे व वांहति हीं रूपें 'ल' प्रत्ययाखेरीज लृट्चीं आहेत. स्वार्थे ल लागतो, हें बीम्स व होर्न्ले यांना सोपपत्तिक सांगतां आलें नाहीं. [मराठींतील हा (एकमेव) भविष्यकाळ कांही अंशीं संस्कृत 'लृट्' चा वारस व कांही अंशीं वर्त०च्या रूपांना 'ल' प्रत्यय जोडून साधलेला काळ आहे. म्हणजेच, राजवाडे व बीम्स–होर्न्ले या दोघांच्याही म्हणण्यांत तथ्यांश आहे. या प्रश्नाचे सविस्तर विवेचन प्रस्तुत लेखकाच्या 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथांत आलें आहे. (§१७१) ]

वर्तमान मराठींत (१) हसेन, (२) हसूँ, (३) हसशील, (४) हसाल, (५) हसेल, (६) हसतील, अशीं रूपें होतात. हा लृट् वर्तमान मराठींत फार योजतात.

## ६३. हेतुहेतुमद्भावे लृङ्

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| १. अकरिष्यम् | करिस्सम् | करीँ + इल = करीन |
| २. अकरिष्याम | करिस्सामु | कऱ्यूँ = करूँ + इल = करूँ |
| ३. अकरिष्यस् | करिस्सस् | करिस + इल = करिसील |
| ४. अकरिष्यत | करिस्सह | कऱ्या = करा + ल = कराल |
| ५. अकरिष्यत् | करिस्सइ | करी + इल = करील |
| ६. अकरिष्यन् | करिस्सन्त | करित + इल = करितील |

भूतकालांतल्याप्रमाणें येथें हि अडागमाचा लोप झालेला आहे. लृट् चीं व लृङ् चीं रूपें सारखीं च दिसतात. इतकें च कीं अर्थात भेद आहे. यद्यहमिदमकरिष्यम् = जर मी हें करीन, ह्या वाक्यांत 'करीन' हें लृङ् चें रूप आहे. हा लृङ् बीम्स व होर्न्ले यांना माहीत नाहीं. [वैद्यांच्या मतेंही हा लृङ् मराठींत नाहीं. ते म्हणतात, "करिष्यामि याचा मराठींत मागमूस नाहीं, मग अकरिष्यम् याचा कोठून असेल?" (निबंध–भाषणें, पृ. १३९). शिवाय लृङ्चीं रूपें लृट्सारखी दिसतात हें राजवाड्यांनाही मान्य आहे. मग तीं लृङ्चींच आहेत असें मानण्यास आधार काय? सारांश, हा लकार मराठींत नाहीं.]

## ६४. आठ लकार

अनुक्रमणिका

येणेंप्रमाणें, (१) वर्तमाने लट्, (२) विधिलिङ्, (३) लोट्, (४) अनद्यतनभूते लङ्, (५) भूते लुङ्, (६) अनद्यतनभविष्यति लुट्, (७) भविष्यति लृट्, व (८) क्रियायाः अनिष्पत्तौ हेतुहेतुमद्भावे लृङ्, असे आठ [खरोखर तीनच (लट्, लुट् व लोट्).] लकार महाराष्ट्री द्वारा मराठींत उतरले आहेत. पैकीं भूते लुङ् चें होत्था = होंता एवढें एक च रूप राहिलें आहे. भविष्यति लृट् व लृङ्. यांचीं रूपें दिसण्यांत व बोलण्यांत एक च भासतात; परंतु त्यांचे उगम अगदीं निरनिराळे आहेत. वर्तमाने लट् मध्यें परस्मैपद व आत्मनेपद आहे. विधिलिङ् व लोट् यांत हि मध्यमपुरुषाच्या एकवचनीं आत्मनेपद आहे. वर्तमाने लट् आणि भविष्यति लृट् व लृङ् ह्यांत कित्येक धातू प्रत्ययांच्या पाठीमागें इडागम घेतात व कित्येक घेत नाहींत. इडागम घेणाऱ्या धातूंना सेट् व न घेणाऱ्यांना अनिट् ह्मटलें आहे. कित्येक धातू वेट्, ह्मणजे इडागम विकल्पानें घेणारे हि आहेत. जसें:—

तो करी — सेट्<br>तो उपकरे — अनिट् } वेट्

हा इडागम घेण्याचा व न घेण्याचा किंवा विकल्पानें घेण्याचा गुण मराठींने महाराष्ट्रीपासून घेतला आहे. महाराष्ट्रींत हस् चें हसेमि व कृ चें करिमि किंवा करेमि अशी रूपें कां होतात, तें उलगडण्याचें काम येथें अप्रस्तुत आहे.

(१) लट्, (२) लिट्, (३) लुट्, (४) लृट्, (५) लेट्, (६) लोट्, (७) लङ्, (८) लिङ्, (९) लुङ्, व (१०) लृङ्, असे मूळचे दहा लकार. पैकीं वैदिक लेट् संस्कृतांत लोप पावला होता. लिट् महाराष्ट्रींत बहुतेक लुप्त झाला होता; आणि लुङ् हि लोपत च होता. विधिलिङ् व आशीर्लिङ् महाराष्ट्रींत एक झाले होते. त्यामुळें (१) लट्, (२) लिङ्, (३) लोट्, (४) लङ्, (५) लुङ्, (६) लुट्, (७) लृट्, व (८) लृङ् असे आठ च लकार ज्ञानेश्वरी मराठीत दृष्टीस पडतात. [ज्ञानेश्वरी-मराठींत अवशिष्ट असलेले लकार आठ नसून तीनच आहेत व ते म्हणजे (१) लट्, (२) लुट् व (३) लोट्, हे मागें तळटीपांतून सांगितलेंच आहे. या प्रश्नाच्या अधिक विवेचनासाठी प्रस्तुत लेखकाचे 'यादवकालीन मराठी भाषा,' परिच्छेद §१६९ ते § १७२ पहावे.]

## ६५. कर्मणि व भावे : पहिला प्रकार

संस्कृतांत कर्मणि धातूंस य, इय प्रत्यय लागतात. तत्स्थानीं महाराष्ट्रींत प्रायः ज्ज, इज्ज आदेश होतो. त्याचा मराठींत ज आदेश होतो.

क्रिय = करिज्ज = करिज<br>गम्य = गमिज्ज = गमिज<br>क्रिय = किज्ज = कीज

करिज, गमिज, कीज ह्या कर्मणि धातूंना बहुतेक सर्व लकार होतात.

**कर्मणि गम्**

गम्य = गमिय = गमिज्ज = गमिज

अनुक्रमणिका

## लट्

| महाराष्ट्री | मराठी |
|---|---|
| १ गमिज्जामि | गमिजेँ |
| २ गमिज्जामु | गमिजोँ |
| ३ गमिज्जसि | गमिजसि |
| ४ गमिज्जह | गमिजा |
| ५ गमिज्जइ | गमिजे |
| ६ गमिज्जंति | गमिजति |

## विधिलिङ्

[क्रियापदांचीं कर्मणि रूपेंच विध्यर्थी वापरलीं जात असल्यानें कर्मणीचा आणखी विधिलिङ् हा प्रकार अशक्य आहे. (मागें ५५ व्या परिच्छेदाची तळटीप पहावी.)]

| | |
|---|---|
| १ गमिज्जेज्जा | गमिजे |
| ३ गमिज्जेज्जासु | गमिजसु |
| ६ गमिज्जेज्जा | गमिजे |

## लोट्

| | |
|---|---|
| १ गमिज्जामु | गमिजोँ |
| ५ गमिज्जउ | गमिजो |
| ६ गमिज्जंतु | गमिजतु |

## लृट्

| | |
|---|---|
| १ गमिज्जिहिमि | गमिजैन |
| ५ गमिज्जिहिइ | गमिजैल |
| ६ गमिज्जिहिंति | गमिजतील |

## कांहीं धातूंचीं कर्मणि रूपें

अनुक्रमणिका

१ हरिसिज्जइ = हरिषिजे

२ आरुव्विज्जइ = आरविजे

३ होईज्जइ = होइजे

४ अनुभविज्जइ = अनुभविजे

५ धरिज्जइ = धरिजे

६ जरिज्जइ = जरिजे

७ तरिज्जइ = तरिजे

८ हरिज्जइ = हरिजे

९ दिज्जइ = दीजे

१० रमिज्जइ = रमिजे

११ लहिज्जइ = लाहिजे

१२ च्छिविज्जइ = सिविजे (स्पृश्)

१३ बुझिज्जइ = बुझिजे

१४ ठाविज्जइ = ठेविजे

१५ गेण्हिज्जइ = घेइजे

१६ भणिज्जइ = ह्मणिजे

१७ करिज्जइ = करिजे

१८ जिइज्जइ = जीजे (जीव्)

१९ जिणिज्जइ = जीणिजे (जी)

२० भिज्जइ = भिजे

२१ जाणिज्जइ = जाणिजे, नेणिजे

वर्तमान कृदन्त :— गमिजत (ता — ती — तें)
भूत कृदन्त :— गमिजेल (ला — ली — लें)
भविष्य अव्ययी कृदन्त :— गमिजतां

वर्तमान गद्य मराठींत हीं रूपें नाहींत; लुप्त झालीं. जाणिजे, ह्मणिजे, ह्मणजे, वगैरे एखाद्दुसरें रूप राहिलें आहे. परंतु, वर्तमान पद्यांत हीं रूपें येतात.

ह्याचा अर्थ इतका च कीं, पद्यांत पांचसहाशें वर्षांपूर्वीचीं रूपें योजिलेलीं चालतात. ह्या दृष्टीनें पहातां, संस्कृत नाटकांत, महाराष्ट्री पद्यांत व सौरसेनी गद्यांत योजिलेली ज्या अर्थी आढळते, त्या अर्थी महाराष्ट्री सौरसेनीहून वृद्ध असावी, असें ह्मणणें भाग पडतें. ऐतिहासिक दृष्ट्या पहातां सौरसेनी महाराष्ट्रीहून प्राचीन आहे. प्रथमदर्शनीं हा विरोधसा भासतो खरा; परंतु, ह्याला उत्तर आहे; तें असें कीं, राजकीय दृष्ट्या महत्त्वाची व सर्वसामान्य भाषा कवितेंत योजून, सर्व देशांतील व प्रांतांतील श्रोत्यांना आपली कविता सारखी च कळावी, असा कालिदासादि कवींचा आशय असावा.

## ६६. कर्मणि व भावे : दुसरा प्रकार

महाराष्ट्रींत धातूला व्व किंवा व प्रत्यय लागून कर्मणि व भावे रूपें होतात. त्यांपासून मराठींत ‘व’ प्रत्यय लागून कर्मणि व भावे रूपें होतात. भावे रूपें प्रथमपुरुषीं एकवचनीं तेवढीं चालतात. हा गुण मराठीनें संस्कृतपासून घेतला आहे. मराठींत कर्ता प्रायः चर्तुर्थ्यन्त किंवा चकारान्ताच्या तृतीयान्त असतो.

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| भूयते | हुव्वइ | होववे |
| लूयते | लुव्वइ | लववे |
| परिश्रूयते | परिसुव्वइ | परिसवे |
| जीव्यते | जिव्वइ | जिववे |
| जीर्यते | जीरइ | जिरवे |
| तीर्यते | तीरए | तरवे |
| पूर्यते | पूरइ | पुरवे |
| रम्यते | रम्मइ | रमवे |
| गम्यते | गम्मइ | गमे |
| गृह्यते | घेप्पइ | घेंपे, घेववे |
| स्थीयते | ठीअइ | ठेववे |
| दृश्यते | दीसए | दीसे |
| लभ्यते | लब्भइ | लाभे |
| स्पृश्यते | सिप्पइ | सिंपे |
| क्रियते | कीरइ | करवे |
| ज्ञायते | णव्वइ | जाणवे, नेणवे |
| भण्यते | भण्णइ | ह्मणवे, ह्मणिपे |

मराठींत सर्व कर्मणि व भावे रूपें आत्मनेपदि व अनिट् असतात. सबब,

हुव्वइ = हुव्वए = हुव्वे = होववे

भण्णइ = भण्णए = भणवे

पाठीमागील वकारामुळें व अकारामुळें पुढील एकाराला वेकारादेश होतो.

## भावे लट् व लङ्

सकर्मक:— मातें, तूतें, तेयातें, माझेन, तूझेन, तेयाचेन तें काम करवे, करवे ना, किंवा न करवे.

मातें इ. इ. तीं कामें करवति, करवति ना, इ. इ.

अकर्मक:— मातें इ. इ. हसवे, हसवे ना, न हसवे.

## लट्

सकर्मक:— मातें काम करवैल

मातें कामें करवतील

अकर्मक:— मातें हसवैल

कृदन्त:— करवत, हसवत, इ. इ.

अनुक्रमणिका

करवल, हसवल, इ. इ.

घेपे, नोडवे, रिगवे, घलवे, नांगवे, पसरवे, वचवे, इत्यादि अनेक रूपें ज्ञानेश्वरींत आहेत. प्रयोजक, सन्नन्त, नामधातू वगैरेचीं भावे रूपें होतात.

प्रयोजक:— करवि— करविव
मारवि— मारिव
हसवि— हसविव

ज्ञानेश्वरींत ह्या भावे रूपांचा मूळचा अर्थ राहून शिवाय कित्येक स्थलीं शक्यार्थ हि प्रतीत होतो. वर्तमान मराठींत मूळचा अर्थ जाऊन केवळ शक्यार्थ च तेवढा राहिला आहे.

होर्न्ले ह्या भावे रूपांना प्रयोजक समजे. परंतु हीं प्रथमपुरुषीं च तेवढीं कां चालतात, तें त्यानें लक्ष्यांत घेतलें नाहीं.

कर्मणि :— क्रियते = करिज्जइ = करिजे
भावे :— क्रियते = किरइ = करवे
प्रयोजक :— करापयति = कारावेइ = करवी
तव्यत् :— कर्त्तव्य = करव्व = कराव (वा-वी-वें) (विशेषण)

प्रथमपुरुषीं एकवचनी भावे रूप सदा एकारान्त असतें, व प्रयोजक रूप ईकारान्त असतें.

हा भावे वर्तमान मराठींत बोलण्यांत फार येतो.

### प्रयोजक कर्मणि व भावे

{ आरोप्य = आरोपिज (आरोपिजे, आरोपिजो)
आरोप्य = आरोपव (आरोपवे)

{ कराप्य = करविज (करविजे)
कराप्य = करवव (करववे)

{ मान्य = मानिज (मानिजे)
मान्य = मानव (मानवे)

अनुक्रमणिका

## ६७. णिच् प्रयोजनायां (सेट्)

मराठींत प्रयोजक धातु बनविण्याचे खालील प्रकार आहेत:—

(१) धातूच्या उपधेस वृद्धि किंवा गुण होऊन प्रयोजक बनतें; जसें, फिट—फेड; फुट—फोड; भिड—भेट; दप—दाप; पड—पाड; भर—भार, सुट—सोड; मर—मार; मन—मान; लव—लाव; वच—वांच; उघडी—उघाडी; इ. इ.

संस्कृतांत णिचाचा अर्थ सर्व णिजन्त रूपांत असतो च असा नियम नाहीं. तो च प्रकार मराठींत होतो. दुसऱ्याकडून क्रिया करविण्याचा हेतु प्रयोजकसाधित धातूंत असतो. संस्कृत प्रयोजकसाधित धातु सिद्ध समजून त्यांची पुन्हा प्रयोजकरूपें मराठी बनविते; जसें,
फेड—फेडविणें; फोड—फोडविणें; इ. इ.

ह्या प्रयोजकसाधित धातूंचा मराठींत साध्या धातूंप्रमाणें उपयोग होतो. बाकी महाराष्ट्रींत हीं प्रयोजक रूपें होतीं; जसें,

**प्रथमपुरुष एकवचन**

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| *उद्घटापयति | उग्घाडइ | उघाडी |
| पातयति | पाडइ | पाडी |
| मारयति | मारइ | मारी |
| नाशयति | नासइ | नाशी |
| मानयति | माणइ | मानी |
| दर्पयति | दापइ | दापी |
| घटयति | घडेइ | घडी |

(२) संस्कृत आपय, महाराष्ट्री आव पासून मराठींत 'अव' आगम धातूला होऊन प्रयोजक धातु बनतो; जसें,

**प्रथमपुरुष एकवचन**

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| *हसापयति | हहावेइ | हसवी |
| *रमापयति | रमावेइ | रमवी |
| *करापयति | करावेइ | करवी |
| *घटापयति | घडावेइ | घडवी |
| *हारपयति | हारवइ | हारवी |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| *गमापयति | गमावेइ | गमावी, गमवी (घालवी) |
| उत्थापयति | उट्ठवेइ | उठवी |
| स्थापयति | ठवेइ | ठेवी, ठवी (अशिष्ट) |
| *हरिपयति | हीरवइ, हीरइ | हीरवी, हीरी |
| रोपयति | रोव्वेइ | रोवी |

(३) संस्कृत प मराठींत प रहातो; जसें,

| संस्कृत | मराठी |
|---|---|
| आरोपयति | आरोपी |
| अपलापयति | अपलापी |

(४) संस्कृत अय बद्दल मराठींत आल होतो; जसें,

| | |
|---|---|
| ग्राहयति | घाली (घेआली) |

प्रयोजना विवक्षित असतां, प्रयोजक धातु नियमानें सेट् असतात.

**प्रथमपुरुष एकवचन**

| | |
|---|---|
| | कर्त्तरि |
| लट् :— | हसवी |
| लिङ् :— | हसविजे, हसविज्ञा, हसवज्ञा |
| लोट् :— | हसवो |
| लङ् :— | हसवी |
| लृट् :— | हसवील |
| | कर्मणि |
| लट् :— | हसविजे |
| लोट् :— | हसविजो |
| लुट्:— | हसविजैल |

हा प्रयोजक वर्तमान मराठींत कायम आहे.

अनुक्रमणिका

## ६८. सन् प्रक्रिया

मराठींत इच्छार्थक धातू महाराष्ट्रीद्वारा आले आहेत:—

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
| --- | --- | --- |
| बुभुक्ष् | बुभुक्ख | बुभुक (णें) |
| चिकित्स् | चिइच्छ | चेच (णें) |
| पिपत्स् | | प्यास |
| निदिध्यास (?) | | ध्यास |
| इर्त्स | | ईर |
| रित्स् | | रेच |

इतर क्रियापदांप्रमाणें ह्यांचे लकार होतात. हे सन्नन्त धातू वर्तमान मराठींत आहेत.

## ६९. यङ् प्रक्रिया

पौनःपौन्यवाचक धातू मराठींत फार आहेत. ते अर्थात् महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून आलेले आहेत.

| महाराष्ट्री | मराठी |
| --- | --- |
| ढंढल्ल | ढेंढालणें |
| डंडल्ल | डंडळणें |
| ढंढुल्ल | धुंडालणें |
| जग्ग | जागणें |
| चंकम्म | चँकवणें |

भांभावणें, जगणें, गागजणें, केंकाटणें, बोंबलणें, गागणें, तुडुंबणें, तातडणें, चाचपणें, गांगरणें, फोफावणें, लोलवणें, रोरवणें, खोंकणें, वगैरे शेकडों धातू पौनःपौन्यवाचक आहेत.

हे धातू वर्तमान मराठींत आहेत.

## ७०. नामधातू

| महाराष्ट्री | मराठी |
| --- | --- |
| दुक्खामि | दुखँ |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| सुहामि | सुहेँ |
| धवलइ | ढवले |
| सुक्कहिँ | सुके |
| संझाअइ | सांझावेँ |
| सुहाअइ | सुहावे |

कलासणें, दमदमणें, कडकडणें, कुरकुरणें, किरकिरणें, खळखळणें, घुमघुमणें, थरथरणें, वेगावणें, एकावटणें, धगधगणें, फुरफुरणें, मिसमिसणें, सळसळणें, सिमसिमणें, सुळसुळणें, दुखदुखणें, वगैरे शेकडों धातू आहेत. परंतु, ह्यांचा विस्तारानें ऊहापोह करणें शब्दसिद्धीच्या प्रांतांतलें आहे. संस्कृतांत नामधातूंना सर्व लकार होतात. परंतु त्यांतल्या त्यांत प्रथमपुरुष एकवचन प्रायः आढळतें. त्या च धर्तीवर सांझावणें, कळमळणें, वगैरे नामधातूंचें प्रथमपुरुष एकवचन मराठींत योजतात.

वर्तमान मराठींत हे धातू शेकडों आहेत व होतात.

**सप्तमान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

# अष्टमान्हिक

## ७१. कृदन्तें

कृदन्तें दोन प्रकारचीं; व्ययी व अव्ययी. व्ययी कृदन्तें वर्तमान, भूत व भविष्य ह्या तीन काळीं होतात. अव्ययी कृदन्तें भूत व भविष्य या दोन काळीं होतात. कित्येक व्ययी कृदन्तें सार्वकालिक असतात.

## ७२. वर्तमान कृदन्तें

[येथें किंवा ‘सुबन्त प्रक्रियें’त न दिलेलें ‘णमुल्’ म्ह० वर्तमान० धातुसाधित रूप राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायांत दिलें आहे (‘परि तया फेना आंतु **पांतां**’ ९.६७). क्रियापदाच्या वर्त० साधिताला अम् किंवा अनां प्रत्यय लागून मराठीत णमुल् होतें असें ते म्हणतात (ज्ञा. ९ वा अध्याय, पृ. ४७)]

### कर्तरि परस्मपद अनिट्

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| भवत् | होन्त | हौँ त |
| सत् | सन्त | सॉँत |
| *असत् | *असन्त | असत |
| प्राप्नवत् | पावन्त | पावँत |
| भणत् | भणन्त | ह्मणत |
| ददत् | देन्त | दैँ त |

परस्मैपदांतील वर्तमान कृदन्तांना पुल्लिंगीं आ, स्त्रीलिंगीं ई व नपुंसकलिंगीं एँ आदेश होतात; व हे शब्द आकारान्त (पुल्लिंगी), ईकारान्त (स्त्रीलिंगीं) व ऍंकारान्त नपुंसकलिंगीं शब्दांप्रमाणें चालतात. क्वचित् अकारान्त नपुंसक शब्दाप्रमाणें चालतात; जसें, वर्त्तत—वर्त्ततें.

### कर्तरि आत्मनेपद

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| शिक्षमाण | सिखाण | सिहाण (णा, णी, णेँ ) |
| कृष्यमाण | किरस्साण | किरसाण (णा, णीं, णेँ ) |
| जीवमान | जीवाण | जीवाण (णा, णी, णेँ ) |

क्रेयमाण = किराण, जानान = जाण, इ. इ.

अनुक्रमणिका

### कर्तरि परस्मैपद सेट्

करीत, मानीत, धरीत, घालीत, लिहीत, वगैरे सेट् क्रियापदांची वर्तमान कृदन्तें ‘इत’ आगम होऊन होतात. आ, ई, एँ हे प्रत्यय पुं-स्त्री-नपुंसकलिंगीं अनुक्रमें लागतात; जसें; कुर्वत्-करिन्त-करीत. ईकार महाराष्ट्रींतून आला आहे.

### र्मणि वर्तमान कृदन्तें

होइजत, असिजत, ह्मणिजत, पाविजत, करिजत, इत्यादि.

### प्रयोजक वर्तमान कृदन्तें

हसवित, ह्मणवित, करवित, इ. इ. इ.

### भावे वर्तमान कृदन्तें

हसवत, ह्मणवत, करवत, इत्यादि.
हीं वर्तमान कृदन्तें वर्तमान मराठींत जशीचीं तशीं आहेत.

## ७३. भूत कृदन्तें

परोक्षानद्यतन भूताचीं कृदन्तें मराठींत नाहींत. कारण परोक्षानद्यतन भूत मराठींत नाहीं व महाराष्ट्रींत बहुतेक नाहीं च.

सामान्य भूतकालार्थक कृदन्तें संस्कृतांत क्त (त) व क्तवतु (तवत्) हे दोन निष्ठाप्रत्यय धातूला लागून होतात. पैकीं क्तवतु प्रत्यय कर्तरि होतो आणि क्त प्रत्यय कर्मणि व भावे होतो. तो च प्रकार मराठींत होतो. इतकें च कीं मराठी, महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांत भूतकृदन्तांना जे आदेश होतात, त्यांवर आपली इमारत रचते. कधीं महाराष्ट्रींतील रूपें जशीचीं तशीं च घेते व कधीं महाराष्ट्रींतील रूपांच्या शेवटला अ गाळते. परंतु सदा निष्ठाप्रत्ययांन किंवा त्यांच्या महाराष्ट्रींतील रूपांना ‘ल’ हा स्वार्थी प्रत्यय जोडते. [या स्वार्थी ‘ल’ प्रत्ययाचें अधिक विवेचन राजवाडे यांनी अन्यत्र केलें आहे. (पहा : विश्ववृत्त १९०७, अं. १) तेथें भ विष्यार्थी ल व भूतार्थी ल यांमधील भेद स्पष्ट करतांना ते म्हणतात:– “हा स्वार्थी ‘ल’ प्रत्यय विशेषणाला लागला म्हणजे तो लिंगा प्रमाणें फिरतो; परंतु खऱ्या खऱ्या क्रियापदांच्या रूपांना लागला म्हणजे सहजच फिरत नाहीं. कारण विधिलिङाचीं रूपें कांहीं विशेषणें नाहींत. तेव्हां भविष्यकालीन ‘ल’ प्रत्यय भूतकालीन स्वार्थी ‘ल’ प्रत्ययाहून निराळा नाहीं. (राजवाडे लेखसंग्रह, भा. ३, पृ. २०८).]

### अनिट्

(१)

जेथें महाराष्ट्रींतील अंत्य कायम रहातो

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| तप्त | तत्त | तात + ल = तातल |
| खात | खत्त | खातल |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| गुफित | गुत्थ | गुथल |
| त्रुटित | तुट्ट | तुटल |
| पतित | पड्ड | पडल |
| कृष्ट | कड्ढ | काढल |
| खात | खण्ण | खाणल, खणल |
| सिक्त | सित्त | सीतल |

(२)
जेथें महाराष्ट्रींतील अ चा लोप होतो

| | | |
|---|---|---|
| जात | जाअ | जाअल = जाहल = जाल (जाअ + ल) |
| आगत | आअअ | आल |
| कृत | किअ | केल (किअ + ल = क्यल = केल) |
| नीत | णिअ | नेल (णिअ + ल) |
| मृत | मिअ | मेल (मिअ + ल) |
| स्नात | न्हाअ | न्हाल |
| स्थित | ट्ठिअ | ठेल |

(३)
जेथें संस्कृतांतील त रहातो

| | | |
|---|---|---|
| गृहीत | गेण्हिअ | घेतल |
| उपात्त | पात्त | पातल |
| आत्त | आत्त | आतल |
| हित | हिअ | हितल |
| जित | जिअ | जिंतल |
| भूत | होअ | भूतल (ला-ली-लें) |
| उदित | उदिअ | उदैल (उदिअ + ल) |
| | | [हें उदाहरण 'त' राहिल्याचे होऊ शकत नाहीं.] |

**सेट्**

(१) जेथें महाराष्ट्रींतील अंत्य अ विकल्पानें कायम रहातो.

अनुक्रमणिका

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
| --- | --- | --- |
| कारापित | कराविअ | करवियल, करविल |
| विज्ञापित | विण्णविअ | विनवियल, विनविल |
| मानित | माणिअ | मानियल, मानिल |
| लिखित | लिहिअ | लिहियल, लिहिल |
| अर्पित | अप्पिअ | अर्पियल, अर्पिल |

करवियल इत्यादि रूपें ज्ञानेश्वरीच्या तीनशें वर्षे पूर्वीचीं आहेत.

(२) जेथें संस्कृतांतील अंत्य त विकल्पानें कायम रहातो

| | | |
| --- | --- | --- |
| भणित | भणिअ | ह्मणितल, ह्मणियल (काव्य) |
| संख्यापित | संघविअ | सांघितल, सांघियल (काव्य) |
| हारित | हारिअ | हारितल, हारियल (काव्य) |
| ज्ञात | — | जाणितल, जाणियल |

ह्मणितल = ह्मणतल = ह्मंटल असे रूप वर्तमान मराठींत झालें आहे. ('ह्मंतल' अशिष्ट)

(३) जेथें महाराष्ट्रींतील अंत्य अ कायमचा गेला आहे

| | | |
| --- | --- | --- |
| बंधित | बांधिय | बांधिल (बांधियल) |
| रक्षित | रक्खिअ | राखिल (राखिअल) |
| उत्तारित | उतारिअ | उतारिल |
| | उतरिअ | उतरिल |
| योजित | जोड्डिअ | जोडिल |
| विहित | विहिअ | विहिल |

(४) कित्येक रूपें महाराष्ट्रींतील किंवा संस्कृतांतील रूपांना ल प्रत्यय लागून बनलीं आहेत. त्यांत तकार किंवा अकार दिसत नाहीं, त्यामुळें सकृद्दर्शनीं तीं विचित्र वाटतात इतकें च.

| संस्कृत | महाराष्ट्री—अपभ्रंश | मराठी |
| --- | --- | --- |
| दा :— दत्त | दिन्न | दिन्नल, दिन्हल, दिधल, दिल (वर्तमान) |
| धाव् :— धावित | धाविण्ण | धाविन्नल |
| भण् :— भणित | भणिण्ण | ह्मणिन्नल |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| उड्डी :— उड्डीन | — | उडिन्नल, उडल (वर्त.) |
| श :— शीर्ण | सिण्ण | सिनल |
| ε | | |
| स्त :— स्तीर्ण | तण्ण | ताणल |
| ε | | |
| मी :— मीन | — | मिनल |
| पच् :— पक्क | पक्क, पिक्क | पिकल, पाकल (प्रयोजक), |
| | | पिकेल (पिकविल = पिकइल) |
| भिद् :— भिन्न | — | भिनल |
| फण् :— फांट | — | फाँटल |
| अव् :— ऊत | — | उतल |
| उत्पद् :— उत्पन्न | उप्पण्ण | उपनल |
| नी :— नीत | — | नीणिल |
| युध् :— युद्ध | — | जुझिन्नल |

(५) कित्येक धातू ल प्रत्ययाच्या आधीं उच्चारसौकर्यार्थ आ लावतात.

| | | |
|---|---|---|
| भी | बिह् | बिहाल, भियाल, भ्याल |
| निरी | निगा, रिगा | निगाल, रिगाल |
| बुड् | — | बुडाल |
| भण् | — | ह्मणाल (वर्तमान) |
| जी | — | जीआल |
| पा | — | पिआल |
| ज | — | जिराल |
| ε | | |
| वी | — | विआल |

वी—वीत—वीअ पासून, पाहिलें तर, विअल, वियल असें रूप व्हावें. परंतु उच्चारदार्ढ्यार्थ अ ची वृद्धी करून विआल असें रूप बनलें आहे.

वरील रूपांवरून दिसून येईल कीं अनिट् धातूंच्या रूपांच्या ल प्रत्ययामार्गे इ नसते व सेट् घातूंच्या रूपांच्या ल प्रत्ययामागे इ असते. इकारयुक्त रूपें नियमानें सकर्मक धातूंचीं आहेत. तेव्हां असा नियम पडला कीं सकर्मक धातूंचीं निष्ठारूपे इकारयुक्त करावयाचीं व अकर्मक धातूंचीं निष्ठारूपें इकारविरहित करावयाचीं; जसें,

अनुक्रमणिका

| अकर्मक | सकर्मक |
|---|---|
| बांधल | बांधिल |
| जोडल | जोडिल |
| विशेषल | विशेषिल |
| विकरल | केल |
| आकलल | आकलिल |

येथें त्रुटित-तुट्ट-तुटल प्रमाणें जोड्ड, विशेष्ष, विकर्र, आकल्ल अशीं निष्ठारूपें अकर्मक धातूंचीं कल्पून व्यवहार केलेला आहे. त्यामुळें केवळ धातूला च 'ल' प्रत्यय जोडल्याचा भास होतो. हीं सर्व कृदन्तें कर्मणि व भावे होतात.

क्वचित् स्वराघातार्थ द्वित्त ल्ल ज्ञानेश्वरींत आढळतो; जसें, पाहल्ला.

हीं भूतकृदन्तें वर्तमान मराठींत कवितेंत जशींचीं तशीं आहेत. धाविन्नल वगैरे रूपें वर्तमान मराठींत बोलण्यांत व गद्यांत सध्या नाहींत.

**कर्मणि भूतकृदन्तें**

कर्मणि जकारान्त रूप घेऊन व त्याला सेट् समजून इकार लावतात व नंतर ल (तल = अल = ल) प्रत्यय लावतात.

अनुभविज + इ + ल = अनुभविजेल (ला-ली-लें)
दीज + इ + ल = दीजेल (ला-ली-लें)
जुझ + इ + ल = जुझेल (ला-ली-लें)
तुदाहि वर्गातील धातूंस कर्तरि व कर्मणि य आगम होतो, तेव्हां
युध्यते (कर्तरि) = जुज्झए = जुझल (ला-ली- लें)
युध्यते (कर्मणि) = जुज्झए = जुझेल (ला-ली- लें)

पिकल—पिकेल; उपजल—उपजेल; दिसल—दिसेल; लोपल—लोपेल; वगैरे कर्तरि व कर्मणि रूपें होतात.

वर्तमान मराठींत कवितेंत हीं रूपें क्वचित् आढळतात; बोलण्यांत नाहींत.

**प्रयोजक कृदन्तें**

करवियल = करविल (ला-ली-लें)
पांगुलवियल = पांगुलैल (ला-ली-लें)
निरोपियल = निरोपिल (ला-ली-लें)

अनुक्रमणिका

आभारवियल = आभारैल (ला-ली-लें)
शिक्ष्यापियल = शिक्षापिल (ला-ली-लें)

### कर्मणि

करविजेल (ला-ली-लें); निरोपिजेल (ला-ली-लें) इ. इ. इ.

### भावे भूत कृदन्तें

करव—करवल (ला-ली-लें); हसव—हसवल (ला-ली-लें)

### प्रयोजक भावे

करविव—करविवल (ला-ली-लें); हसविव—हसविवल (ला-ली-लें)
हीं सदा प्रथमपुरुषीं चालतात.

### प्रयोग

हीं, कृदन्तें मराठींत कर्मणि व भावे योजतात; ह्मणजे प्रथमपुरुषाच्या एकवचनीं व अनेकवचनीं योजतात. कर्ता सदा तृतीयान्त असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| च्याँ; तुवाँ, तेणें, तिया<br>आह्मीं, तुह्मीं, तेहीं, तिहीं | } | = | { काम केलें, कामें केलीं<br>स्त्री केली; स्त्रिया केलिया<br>खांबु केला, खांब केले |

वर्तमान मराठींत ह्या कृदन्त विशेषणांची सता तृतीया व सति सप्तमी किंवा सते चतुर्थी होते :—

## ७४. सता तृतीया, सति सप्तमी व सते चतुर्थी

[यांचीं ज्ञानेश्वरींतील उदाहरणे :— (सता तृतीया) सेंदे द्रुति राहे **कापुरें । वेचलेनि** हि ॥ (१८·४२०); (सति सप्तमी) जैसें **प्रगटलेयां गभस्ती** । अशेषही मार्ग दीसति । (२·२६१). मोडकशास्त्र्यांच्या मतें स्वयंवर्ती (Absolute) सप्तमी ज्ञानेश्वरींत नाहीं; मराठींतील स्वयंवर्ती तृतीयेचा संस्कृतांतील सप्तमीशीं घोटाळा होऊन ती आली. श्री. नेने मात्र राजवाड्यांच्या प्रमाणें या दोन्ही स्वयंवर्ती विभक्ती मानतात. त्यासाठीं त्यांनीं प्राकृत—अपभ्रंशांतून सति सप्तमीचीं उदाहरणेंही दिलीं आहेत (भा इ सं मं. त्रै. १५·१; १६·१). युरोपीय वैयाकरणांपैकी कोणीही अशा प्रकारच्या रचनेचा विचार केलेला नाहीं. तो प्रथम राजवाड्यांनीं केला. पण त्यांचें वरील सर्वच विवेचन संस्कृतमूल आहे.]

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| त्यानें काम केलेन | त्यानीं काम केलेनीं |
| त्यानें कामें केलींन | त्यानीं कामें केलींनीं |
| त्यानें स्त्री केलीन | त्यानीं स्त्री केलीनीं |
| त्यानें स्त्रिया केल्यान | त्यानीं स्त्रिया केल्यानीं |
| त्यानें खांब केलान | त्यानीं खांब केलानीं |
| त्यानें खांब केलेन | त्यानीं खांब केलेनीं |

अनुक्रमणिका

### सति सप्तमी*

(ज्ञानेश्वरी मराठी) कामें, काम केलेयां, केलियां = कामें, काम केल्यां (वर्तमान मराठी).

### सते चतुर्थी

कामें, काम केलेया, केलिया = कामें, काम केल्या, केल्यास (व. म.)

हीं कृदन्तें कर्मणि असल्यामुळें कर्म पुं—स्त्री—नपुंसक असेल त्याप्रमाणें एकवचनी व अनेकवचनी आ—ए, ई—इया, एँ—ईं, हे प्रत्यय लागतात.

केला—केले; केली—केलिया; केलें—केलीं.

प्राकृतांत प्रयोजक कर्मणि कृदन्ताचीं दोन रूपें होतात, त्यावरून मराठींत हि दोन होतात.

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| कारित | कारिअ, कराविअ | करिवल (कारिअल), करविल (करवियल) |
| हासित | हासिअ, हसाविअ | हसिवल (हासिअल), हसविल (हसवियल) |
| शोषित | सोसिअ, सोसविअ | शोषिवल, शोषविल |
| तोषित | तोसिअ, तोसविअ | तोषिवल, तोषविल |

### ७५. कर्त्तरि क्तवतु

क्तवतु प्रत्यय कर्त्तरि होतो.

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| कृतवान् | किअवां | किअ + ल + आँ = किअलाँ = केलाँ [उदा., 'मी बोलिलाँ' (ज्ञा. २.५२). उत्तरकालीन प्रतींतून हेंच रूप 'बोलिलों' असें आढळतें.] |

### पुल्लिंग

१. अहं स्नानं कृतवान् अस्मि = मीं स्नान केलाँ
२. वयं स्नानं कृतवन्तः स्मः = आह्मीं स्नान केलाँ
३. त्वं स्नानं कृतवान् असि = तूं स्नान केलाँसि, केलासि
४. यूयं स्नानं कृतवन्तः स्थ = तुह्मीं स्नान केलाँ, केला
५. स स्नानं कृतवान् अस्ति = तो स्नान केला

अनुक्रमणिका

६. ते स्नानं कृतवन्तः सन्ति = ते स्नान केले

अकारान्त पुल्लिंगी शब्दाप्रमाणें च आँकारान्त पुल्लिंगी शब्दाचें प्रथमेचे अनेकवचन एकारान्त होतें : केलाँ–केले.

मीं स्नान केलाँ, हा प्रयोग सध्यां अशिष्ट लोकांत ऐकूं येतो ; शिष्ट लोकांत नाहीं.

## स्त्रीलिंगी

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| कृतवती | किअवह | किअ + ल + अइ = केल–<br>अइ = केल + ई + अइ = केलीए = केल्ये |

१. अहं स्नानं कृतवती अस्मि = मीं स्नान केलीए
२. वयं स्नानं कृतवत्यः स्मः = आह्मीं स्नान केलाँ
३. त्वं स्नानं कृतवती असि = तूं स्नान केलीएसि
४. यूयं स्नानं कृतवत्यः स्थ = तुह्मीं स्नान केल्या, केलिया
५. सा स्नानं कृतवती अस्ति = ती स्नान केली
६. ताः स्नानं कृतवत्यः सन्ति = त्या स्नान केलिया

मराठींत स्वार्थे ल प्रत्यय लागून क्त व क्तवतु ह्यांचीं रूपें महाराष्ट्रीद्वारा कशीं उत्पन्न होतात, हें बीम्स व होर्न्ले यांना बिलकुल समजलें नाहीं.

वर्तमान मराठींत ‘मी स्नान केलाँ’ हा प्रयोग नाहीं व केलासि बद्दल केलास होतें.

## ७६. भविष्य कृदन्तें : कर्तरि

(१) होष्यमाण हें एक च भविष्य कृदन्त महाराष्ट्रींतून मराठींत आलें आहे.

(२) कर्तृ, भोक्तृ, यातृ वगैरे शब्दांतील तृ प्रत्ययाच्या ऐवजीं णृ–णार प्रत्यय लागून एक भविष्य कृदन्त मराठींत होतें. भर्तृ ह्या शब्दाचें अपभ्रंशद्वारा भत्तार, भातार, भर्तार, असें रूप मराठींत होतें. त च्या ऐवजीं ण करून भरणार असें रूप मराठींत होते. हीं णार प्रत्ययान्त रूपें विशेषणें असतात तेव्हां त्यांना पं-स्त्री-नपुंसकलिंगीं आ. ई. एँ हे प्रत्यय अनुक्रमें लागतात. जेव्हां विशेषणें नसतात, तेव्हां अनद्यतनभविष्यति लुट् प्रमाणें ह्याचा प्रयोग होतो. संस्कृतांत लुट् मध्यें तृ चें प्रथमेचें एकवचन प्रथमपुरुषाच्या अनेकवचनाव्यतिरिक्त सर्व लिंगीं, सर्व पुरुषीं व सर्व वचनीं योजतात. त्याप्रमाणें च मराठींत तर ‘णार’ सर्वत्र योजतात; जसें,

अनुक्रमणिका

## लुट्

| संस्कृत | मराठी |
|---|---|
| १. कर्त्ता अस्मि | करणार |
| २. कर्त्ता स्मः | करणार |
| ३. कर्त्ता असि | करणार |
| ४. कर्त्ता स्थ | करणार |
| ५. कर्त्ता | करणार |
| ६. कर्त्तारः | करणार |

वाटल तर मराठींत ‘आह’ ह्या क्रियापदाचीं वर्तमान काळाचीं रूपें जोडतात. परंतु न जोडलीं असतां चालतें. ह्मणजे लुट्चे सर्व गुण ह्या ‘णार’ मध्यें आहेत. तेव्हां तें संस्कृत लुट्चें वंशज आहे ह्यांत संशय नाहीं.

तृ चा अपभ्रंश ता होऊन ‘पुरविता’ असें हि रूप होतें व त्याला हि लुट् चे सर्व गुण असलेले दिसतात. तेव्हां, ता आणि णार अशीं दोन रूपें मराठींत अनद्यतनभूते लुट् चीं विद्यमान आहेत. पैकीं णार हें रूप ज्ञानेश्वरांच्या अभंगांत येतें. हा णार प्रत्यय मराठींनें कोठून आणिला किंवा नवा स्वयंस्फूर्तीनें बनविला, तें सांगतां येत नाहीं. बहुशः हा ज्ञानेश्वरीहून हि जुना आहे. ह्या लुट् चा पत्ता बीम्स व होर्न्ले यांना लागलेला नाहीं. हा भविष्य वर्तमानमराठींत फार योजतात.

### ७७. भविष्य कृदन्तें : कर्मणि व भावे

संस्कृतांत तव्यत् (तव्य), अनीयर् (अनीय), यत् (य), क्यप् (य), ण्यत् (य), आणि केलिमर (एलिम), असे प्रत्यय ह्या कर्मणि व भावेकृदन्ताचे आहेत. क्वचित् कर्तरि प्रयोग होतात.

**(सं.) तव्य = (महा०) अव्व = (म०) आव**

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| कर्तव्य | करिअव्व | कराव |
| हसितव्य | हसिअव्व | हसाव |
| भवितव्य | होइअव्व | होआव |

अपभ्रंशांत इएव्वउँ, एव्वउँ, एवा असे प्रत्यय असून, त्यांचें अनुकरण मराठी करीत नाहीं ; महाराष्ट्रीचें अनुकरण करते.

विशेषणें असल्यामुळें ह्यांना पुं—स्त्री—नपुंसकीं आ, ई, एँ हे प्रत्यय अनुक्रमें लागतात

अनुक्रमणिका

## कर्मणि

त्यानें काम करावें
त्यानीं काम करावें
त्यानें कामें करावीं
त्यांनी खांब तासावा
त्यानीं खांब तासावे
त्यानें भुई उकरावी
त्यानीं भुया उकराविया—व्या

## भावे

| | |
|---|---|
| त्यानें<br>तिनें<br>हिण<br>त्यानीं | जगावें, मरावें, रहावें, हसावें इ. इ.<br>बसावें, रडावें, पडावें, लवंडावें.<br>देयावें, घेआवें, सुआवें, गावें, यावें, जावें. |

## कर्तरि

तो दूध प्यावा, असें मी इच्छितों
ती लुगडें नेसावी, असें तो ह्मणतो इ. इ. इ.

ह्या कृदन्ताचा नामाप्रमाणें उपयोग होतो :— करावें लागे, सांगावें फावे, करावें होय, नाही. हे भविष्य कृदन्त वर्तमानमराठींत फार योजतात.

## (संस्कृत) अनीय = (मराठी) अणिय = णँ

| | |
|---|---|
| दर्शनीय | दसणिय, देखण (णा-णी-णें) |
| कर्शनीय | कसणिय |
| शिक्षणीय | सिहाणिय |

दसणिया, कसणिया, सिहाणिया, वगैरे संबोधनात्मक प्रयोग नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या अभंगांत यतात.

करणीय= करणें; वल्हणीय = बोलणें; मरणीय = मरणें वगैरे रूपें ह्या प्रत्ययाचीं मराठींत आहेत. इदं कर्म मे करणीयमस्ति = हें काम मला करणें आहे. हा ल्युट् (अन) प्रत्ययासारखा च भासतो, परंतु त्याहून भिन्न आहे. हा सकर्मक असल्यास कर्म घेतो; ल्युट् घेत नाहीं.

हें कृदन्त वर्तमान मराठींत फार योजतात.

अनुक्रमणिका

### य = ज

'य' पासून निघालेलीं जकारान्त कृदन्तें सध्या मराठींत नामें झालीं आहेत व कृदन्तत्वाची त्यांची ओळख बुझाली आहे.

| संस्कृत | प्राकृत | मराठी |
|---|---|---|
| पेय | पेज्ज | पेज (स्त्री.) |
| शय्य | सेज्ज | सेज (स्त्री.) |
| खाद्य | खाज्ज | खाजें |
| माद्य | माज्ज | माज |
| कार्य | कज्ज | काज (ज्ञानेश्वरींत प्रश्नार्थक) |
| वाह्य | वोज्झ | वोझें |
| मेय | मेज्ज | मेज (मोजण्याचें) |
| आर्य | अज्ज | अजा |
| वाद्ययंत्र | वज्जयंत्र | वाजंत्रें |
| वंध्य | वांज्झ | वांझ |
| गुह्य | गुज्झ | गूज |
| भोज्य | भोज्ज | भोजें |

## ७८. अव्ययी कृदन्तें : भूतार्थी

अव्ययी कृदन्तें भूतार्थी किंवा भविष्यार्थी असतात.

### भूतार्थी

क्त्वा (त्वा), ल्यप् (य) व णमुल् (अम्) हे प्रत्यय लागून संस्कृतांत भूतार्थी अव्ययी कृदन्तें होतात.

**(सं.) त्वा = (महा.) ऊण = (म.) ऊन, ऊनि, उनि**

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| जी :— जित्वा | जेऊण | जिणून |
| भू :— भूत्वा | होऊण, होअऊण | होऊन |
| हस् :— हसित्वा | हसिऊण | हसून |
| दृश् :— दृष्ट्वा | दट्ठूण | दाटून |
| पा :— पीत्वा | पीऊण | पिऊन |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| दर्शय् :– दर्शयित्वा | दाऊण | दावून |
| गृह् :– गृहीत्वा | घेत्तूण | घेऊन |

अपभ्रंशांत करेवि, पांलेवि वगैरे इकारान्त अव्ययें होतात, त्यांच्या धर्तीवर ऊन प्रत्ययान्त अव्ययाला ज्ञानेश्वरींत इकार हमेश लागतो :– जिणूनि, हसूनि, इ. इ. केवळ अकारान्त ऊन प्रत्ययान्त अव्यय ज्ञानेश्वरींत नाहीं.

अपभ्रंशांत प्पिणु, पिणु, विणु असे उकारन्त प्रत्यय ह्या अव्ययाचे आहेत. त्यांच्या धर्तीवर ज्ञानेश्वरींत हि वारंवार ह्या अव्ययाला उकार पादपूरक लागतो :– करुनु, घेउनु, हसुनु, इ. इ.

केवळ य प्रत्यय लागून ज्ञानेश्वरींत भूतार्थी अव्ययी कृदन्तें होत नाहींत. मागधींत होतात. त्यांपैकीं कित्येकांत इया हा प्रत्यय लागतो; जसें, पेहिया, सॉंपेहिया, समुपेहिया, अणुपालिया. संप्रेक्ष्य = सॉंपेहिय = सॉंपेहिया.

क्ष्य = क्षिय. य = इय. इय+आ = इया. अशा परंपरेनें हा 'या' प्रत्ययोत्पन्न इया प्रत्यय झाला आहे. त्याचा उपयोग ज्ञानेश्वरींत ऊन प्रत्ययाला पादपूरक ह्मणून होतो. हें इया पादपूरक अंतीं अनुनासिक घेऊन इयॉं असें रूप नियमानें धारण करतें.

घेऊन + इयॉं = घेऊनियॉं
ह्मणून + इयॉं = ह्मणूनियॉं

सारांश, त्वा प्रत्ययापासून झालेला ऊन व य प्रत्ययापासून झालेला इया असे दोन्ही प्रत्यय ज्ञानेश्वरी मराठींत एकामागून एक एकदम लागतात व दोन्ही चालींचा बोज एकदम राखतात.

एका 'कर' धातूच्या भूतार्थीं अव्ययी कृदन्तांचीं रूपें इतकीं होतात:–

करून, करुन, करूनि, करुनि, करूनु, करुनु, करूनियॉं, करुनियॉं, करूनी, करुनी; पैकीं करून, करुन हीं रूपें ज्ञानेश्वरींत नाहींत; वर्तमान मराठींत आहेत. इ ज्ञानेश्वरांनंतर सुटली.

प्रयोजक साधित धातूंचीं रूपें, ह्मणौनि, ह्मणवून; करौनि, करवून; हसौनि, हसवून; नागौनि, विकासौनि अशीं होतात व त्यांच्या शेवटीं इ, उ व इयॉं हीं पादपूरकें लागतात.

नोहुनि, नेंदुनि, वगैरे अकरणरूपें होतात.

धातूच्या मागें उपसर्ग असतां य प्रत्यय भूतार्थी अव्ययी कृदन्त होण्यास संस्कृतांत जरूर असतो. त्याचा मागमूस मराठींत कांहीं शब्दांत राहिला आहे.

झट्कृत्य = झडकरिअ = झडकरि = झडकर (वर्तमान मराठी)
झाकृत्य = झाकरिअ = झाकरि = झांकर( वर्तमान मराठी)

अनुक्रमणिका

घोकृत्य = घोकरिअ = घोकरि = घोकर (वर्तमान मरीठी)

**क्त्वा** = **त्ता** = **ताँ** [राजवाड्यांच्या मतें हीं भूत० कृदन्तें त्यांनीं अन्यत्र (ज्ञा. अध्याय ९, पृ. ४७) दिलेल्या वर्त० वाचक ‘णमुल्’ रूपांहून भिन्न आहेत. पण या दोहींच्या अंतीं ‘ताँ’ येत असल्यानें तीं बाह्यतः सारखीं दिसतात. (मागें ६० व्या परिच्छेदांतील तळटीप पहा.)]

अर्धमागधींत क्ता चा अपभ्रंश त्ता होऊन हें कृदन्त होतें; जसें,

वंदित्वा = वंदित्ता
गंत्वा = गंत्ता
नीत्वा = नेत्ता

ज्ञानेश्वरींत धातूच्या पुढें ताँ प्रत्यय लागून भूतार्थी अव्ययी कृदन्त होतें; जसें,

वंदित्वा = वंदिताँ
यात्वा = जाताँ
नीत्वा = नेताँ
कृत्वा = करिताँ
युद्ध्वा = जुझताँ

उदाहरण,

“कां कामना हि न करितां । अवसांत घडे पांडुसुता ।
परि वायकांड न जुझतां । लागे जैसें ॥ १०३॥
गुल नेणतां तोंडीं । घातला दे चि गोडी ॥ १०४॥

(अध्याय १८ वा)

हे रूप वर्तमान मराठींत फार येतें.

**क्त्वा** = **त्ताणं** = **तानाँ**

अर्धमागधींत क्त्वा चा त्ताणं अपभ्रंश होतो.

भूत्वा = भवित्ताणं
कृत्वा = करेत्ताणं

त्या च धर्तीवर मराठींत क्त्वा, त्ताणं, तानाँ अशा परंपरेनें आलेला तानाँ प्रत्यय धातूंना लागून भूतार्थी अव्ययी कृदन्तें होतात.

भूत्वा = होतानाँ
यात्वा = जातानाँ
नीत्वा = नोतानाँ इ. इ.
हें रूप वर्तमान मराठींत अति येतें.

अनुक्रमणिका

## ७९. भविष्य अव्ययी कृदन्त
## तुम् = उम् = उँ, ऊँ

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| जेतुं | जिणिउं | जिणूँ |
| गृहीतुं | घेत्तुं | घेउँ |
| रमितुं | रमिउं | रमूँ |
| मर्तुं | मरिउँ | मरूँ |
| ज्ञापयितुं | जाणावेउं | जाणवूँ |
| निर्मापयितुं | णिम्मावेउं | निर्मवूँ |
| निर्मातुं | णिम्माउं | निँ र्मू |
| कर्तुं | काअउं | करूँ |

जिणोँ, घेओँ, रमोँ, जाणवोँ, करोँ अशीं हि रूपें सांपडतात.
करुँ, मरुँ, अशीं ऱ्हस्व रूपें हि होतात. हें कृदन्त वर्तमान मराठींत अति येतें.

## ८०. संयुक्त क्रियापदें

व्ययी कृदन्ताच्या पुढें अस् व भू वगैरे धातूंच्या रूपांची जोड देऊन संयुक्त क्रियापदें होतात. तेव्हां प्रथम अस् व भू ह्या धातूंचे लकार देतों.

### अस्

लट् :— १ असेँ, २ असूँ, असोँ, ३ अससि, ४ असा—साँ, ५ असे, अथि, ६ असँति, असति, आथि.
विधिलिङ् :— असिजे, असज्जा.
लोट् :— १ असेँ-सूँ, २ असोँ, ३ अस, ४ असा—साँ, ५ असो, ६ असतु.
लङ् :— १ असेँ, २ असोँ, ३ अससं, ४ असा—साँ, ५ असे, ६ असत.
लुट् :— असता, असणार.
लृट् :— १ असैन, २ असूँ, ३ असतील, ४ असाल, ५ असैल ६ असतील.
कर्मणि :— असिजे, असिजो, असिजैल, असिजत, असिजेलें.
प्रयोजक :— असविणें.
व्ययी कृदन्त :— असत (ता-ती-तैं), साँत (साँता-ती-तें), आथिल (ला-ली-लें)
असल (ला-ली-लें), (लाँ-ल्यैँ-लैँ), असाव (वा-वी-वें)
अव्ययी कृदन्त :— असूनि, असताँ, असूनियाँ, असूँ.
भावे, शक्यार्थक :— असवे.

अनुक्रमणिका

## नस्

वरच्या प्रमाणें

**आह्** [याशिवाय सं. आभा या धातूपासून झालेलें 'आहा' हें भिन्न क्रियापद राजवाडे मानतात. ('भूताभासु आहे'-सं. भूताभासः **आभाति**. ज्ञानेश्वरी ९ वा अध्याय, ओ. ७८ टीका).] (अस् चें हकारान्त रूप)

लट् :– १ आहेँ, २ आंहोँ, ३ आहासि, आहेसि, ४ आहा–हाँ, ५ आहे, ६ आहाति. इतर लकार नाहींत.

१ नास्मि = नाहिँ-हीँ

५ नास्ति = नाथि = नाहिँ –हीँ

६ नसन्ति = नाथि = नाहिँ –हीँ

ज्ञानेश्वरींत 'नाहीं' ह्या शब्दाचा क्रियाविशेषणाप्रमाणें हि उपयोग होतो.

'नाहींत' हा शब्द ज्ञानेश्वरींत नाहीं, आधुनिक आहे. "दोन्ही नाहीं" असा अनेकवचनी प्रयोग अध्याय २ ओवी १०४ येथें आला आहे. हा क्रियाविशेषण नाहिँ-हीँ 'नापि' –पासून निघालेला आहे.

## भू

[हें सहाय क्रियापद क्वचित् तसें न राहतां तत्पूर्वशब्दाशीं जोड होऊन अखंड क्रियापद होतें असें राजवाडे म्हणतात ; उदा., अखंडहो < सं. अखंडीभू (ज्ञानेश्वरी ९.२२५, टीका)]

लट् :–१ होइँ-ई, होएँ, यें. २ होऊँ-वाँ. ३ होसि. ४ होआ-वा, व्हा. ५ होइ-ई, होए-ये. ६ होँ ति (व्हाँति)

विधिलिङ् :– होज्ञा, होइजे.

लोट् :– १ होँ, होऊँ-वाँ. २ होऊँ-वाँ. ३ हो, होँ ई, ४ होआँ-वाँ, व्हाँ. ५ हो, होवो. ६ होँ तु.

लङ् :– १ होइँ-ईँ, होएँ-यें. २ होऊँ-वाँ. ३ होस. ४ होआ-वा, व्हा. ५ होइ-ई, होए-ये. ६ होँ त.

लुङ् :– (होत्था) होता (ता-ती-तें)

लुट् :– होता, होणार.

लृट् :– १ होईन. २ होऊँ. ३ होँ सील. ४ होआल. ५ होईल. ६ होँ तील

कर्मणि :– होईजे, होइजो, होइजैल, होइजत, होइजेलेँ

प्रयोजक :– होविणें

व्ययी कृदन्त :– होँ त (ता-ती-तें), भूतल (ला-ली-लेँ), होआव, व्हाव. हव (लाँ-ल्यैँ-लैँ), (वा-वी-वैँ)

अव्ययी कृदन्त :– होउनि, होनि–नु–नियां; होऊँ–होँ; होताँ.

भावे :– होववे.

## नभू

लट् :– १ नोहेँ, नव्हेँ. २ नहोँ, नोहोँ, नव्होँ, न्हवाँ. ३ नव्हसि, न्हवसि, नोहोँ सि ४ नोहाँ, नव्हाँ. ५ नोहे, न्हवे, नव्हे, नव्है. ६ नोहोँ ति, न्हवँति, न्हवति, नव्हाति, नव्हँति.

लोट् :– १ नोहोँ. २ नोहोँ. ३ नोहोँ. ४ नोहाँ, नव्हाँ. ५. नोहो, नहो. ६ , नोव्होँ तु, नव्हँतु, नवतु, इ. इ.

कर्मणि :– न्हविजे, न्हविजत, इ. इ.

अनुक्रमणिका

व्ययी कृदन्त :— नहों त—नव्हत (ता-ती-तें), न होआव-नव्हाव (वा-वी-वें)
अव्ययी कृदन्त :— नोहोनि, नव्हताँ, नोहोनियाँ, नोहूँ.

## ८१. वर्तमान कृदन्ताचीं संयुक्त रूपें

### कर्तरि अस्

### पुल्लिंगी अकारान्त

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| १. मी करितु आहेँ | आह्मीं करित आहों |
| २. तूं करितु आहेसि | तुह्मीं करित आहा |
| ३. तो करितु आहे | ते करित आहाति—आथि, करिताति (करितात) |

कंसांतील रूपें वर्तमान मराठींतील आहेत.

| | |
|---|---|
| १. करितु असेँ, करितुसेँ | करितसों, करित असों |
| २. करितु अससि, करितुसि | करितसा, करित असा |
| ३. करितु असे, करितुसे | करित असति-आथि, करिताति |

### पुलिंगी आकारान्त

| | |
|---|---|
| १. करिता असेँ, आहेँ | करिते असों, आहों |
| २. करिता असि, आहेसि | करिते आहा, असा |
| ३. करिता असे, आहे | करिते आथि, करितेति (करित्याति, वर्तमान अशिष्ट) |

### स्त्रीलिंगी ईकारान्त

| | |
|---|---|
| १. करिती आहेँ, असेँ | करितिया आहों, असों |
| २. करिती आहेसि, अससि | करितिया आहा-असा (करिता) |
| ३. करिती आहे, असे | करितिया आथि (करित्याति, करिताति, करतात) |

### नपुंसक ऍंकारान्त

| | |
|---|---|
| १. करितेँ आहेँ, असेँ (करितेँ) | करितीँ आहों, असों (करितों) |
| २. करितेँ आहेसि, अससि (करितेँ स) | करितीँ आहाँ, असा (करिता) |
| ३. करितेँ आहे, असे (करितसे) | करितीँ आथि, करिताति (करतात) |

### कर्मणि

| | |
|---|---|
| ३. करिजत आहे, असे, करिजतसे | करिजत आथि, करिजताति |

### प्रयोजक

| | |
|---|---|
| ३. करावा आहे, असे | करावे आथिं, करावेति, वोळगावेति इ. इ. |
| करावी आहे | कराविया आथि |
| करावेँ आहे | करावीँ आथि |

अनुक्रमणिका

**प्रयोजक कर्मणि**

३. करविजत आहे – असे, करविजतसे, करविजताहे.
३. करविजत आहाति – आथि, करविजताति.

**भावे**

३. करवत आहे–असे, करवतसे, करवताहे
३. करवत आथि, करवताति

अस् चीं, भूतकालीन व भविष्यकालीन रूपें वर्तमान कृदन्तांना वर प्रमाणें लागतात :–करीत, करिता, करिती, करितें असे, असैल, इ. इ.

वर्तमान मराठींत तो, ती, तें करीत आहे, असें नुसतें 'करीत' रूप येतें.

ज्ञानेश्वरींत अकारान्त पुल्लिंगी वर्तमान कृदन्ताचीं अशीं हि रूपें येतात–

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| १. मी करितु | आह्मी करित |
| २. तूं करितु | तुह्मी करित |
| ३. तो करितु | ते करित |

अपभ्रंशांत वट्ट हा धातु लट् मध्यें असा चालतो :–

| | |
|---|---|
| १. वट्टउँ | वट्टहुँ |
| २. वट्टसि | वट्टह |

ह्मणजे उत्तमपुरुषाचे उँ व हुँ प्रत्यय व मध्यमपुरुषाचे सि व ह प्रत्यय अपभ्रंशांत आहेत. ते घेऊन वर्तमान मराठी येणेंप्रमाणें रूपें करते :–

**पुल्लिंग**

१. करितु + उँ = करितोँ
२. करितु + हुँ = करितोँ
३. करितु + सि = करितोसि–स
४. करित + ह = करिता
५. करितु = करितो
६. करित + आथि = करिताथि = करिताति = करितात.

अनुक्रमणिका

**स्त्रीलिंग**

१. करिती + ँ = करितीएँ = करित्यँ = करितँ
२. करितिया + हुँ = करितियाँ = करित्याँ = करिताँ
३. करिती + सि = करितीस
४. करितिया + ह = करित्या = करिता
५. करिती = करितीए = करित्ये = करिते
६. करितिया + आथि = करितियाथि = करित्याथि = करित्यात = करितात.

**नपुंसक**

१. करितँ
२. करितीँ + हुँ = करित्युँ = करिताँ
३. करितँ + सि = करितँ स
४. करितीँ + ह = करिता
५. करितँ
६. करितीँ, करतात.
लट् च्या ऐवजीं हा संयुक्त प्रकार वर्तमान मराठींत प्रचलित आहे.

**भू कर्तरि**
**वर्तमान—भूत—भविष्य**

१. मी करितु, करिता, करिती, करितँ होईँ—एँ, होईन, इ. इ. इ. अस् प्रमाणें.

**भूत**

१ { मी करीत हौँ ताँ
मी करिती हौँ तीएँ
मी करित हौँ तँ }

३ { राजा हौँ ता
राणी हौँ ती
माकड हौँ तँ }

'होता' (लुङ्) [मराठींत लुङ् नाहीं हें पूर्वी सांगितलेच आहे. पण 'होता' हें त्याचें एकमेव अवशिष्ट रूप राजवाडे मानतात.] भूतकालाचें प्रथमपुरुषाचें एकवचन आहे. राजा होता, राणी होती, ह्या वाक्यांत होता, होती, हे भूतकाळ आहेत; वर्तमानकाळ नाहीं. हौँ ता-ती-तँ हीं वर्तमान कृदन्तें हि आहेत. परंतु त्यांपासून वरील वाक्यांतील होता, होती, हीं भिन्न आहेत. मूळ (लुङ्) होता = अभूत्. अनुकरणानें वर्तमान कृदन्ताप्रमाणें लिंगप्रत्यय मराठींने ह्या लुङ्च्या रूपाला लावले.

अनुक्रमणिका

## ८२. भूत व्ययी कृदन्ताचीं संयुक्त रूपें

### कर्मणि

१. त्यानें केलें, केला, केली
२. त्यानें केलें आहे, केला आहे, केली आहे
३. त्यानें केलें असे, केला असे, केली असे
४. त्यानें केलें होतें, केला होता, केली होती

### भावे

१. मला जालेँ, जालें आहे, जालें असे, जालें होतें, इ. इ. लङ्च्या-बरोबरीनें वर्तमान मराठींत हीं रूपें प्रचलित आहेत. अथवा, खरें पहातां, लङ् पेक्षा ह्यांचा च प्रयोग वर्तमान मराठींत फार होतो.

### कर्तरि

६१ व्या कलमांत भूत व्ययी कर्तरि कृदन्ताची व्युत्पत्ति दिली आहे. येथें प्रकार देतों :—

(१)

१. मीं केलाँ + उँ = केलों
२. आह्मीं केलाँ + हुँ = केलों
३. तूँ केलाँ + सि = केलाँसि
४. तुह्मी केलाँ + ह = केलाँ
५. तो केला = केला
६. ते केले आथि = केलेति, आणिलेति

(२)

मी केलाँ आहे, आह्मी केले आहों, तुह्मीं केले आहा

(३)

मी केलाँ असे

(४)

मी केलाँ होँ तोँ, इ. इ. इ.
वर्तमान मराठींत (३) केलास, (६) केलेत, अशीं रूपें होतात.

### संयुक्त कृदन्त विशेषणें

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| होँ त साँता | होँ त साँती | होँ त साँतेँ |

अनुक्रमणिका

जाला साँता　　　　　जाली साँतीं　　　　　जालैं साँतैं

वर्तमान मराठींत ‘होत्साता’ एवढें एक च संयुक्त कृदन्त विशेषण राहिलें आहे.

### ८३. इतर सहायधातू

**(१) जाल** [हा धातू नसून भूत. धातुसाधित विशेषण आहे.]

(जन्) जात = जाअ+ल = जाअल, जाहल, जाल (ला-ली-लें). हे रूप वर्तमान कृदन्तांना लागतें :—

तो बोलता जाला.
ती बोलती जाली.
तें बोलतें जालें.

**(२) या = जा**

जा ह्या धातूचीं रूपें वर्तमान, भूत व भविष्य कृदन्तांना लागतात :—
तो हों तु जाए
तो धरिला जाई
तो धरूँ जाई
तो धरूनि जाई

**(३) ई = ए**

ए धातूचीं रूपें भविष्य कृदन्तांना लागतात :—
घेऊनि ये
घेऊँ ये
घेवों नैए

(४)

बैस, दे, घे, राह, आवड, पाह, सर, लाग, सक, शक, लाभ, लाह, ल्हा, टाक, ठाक, घाल, ह्मण वगैरे धातूंचीं रूपें भविष्य कृदन्तांना अकरण व सकरण लागतात:—

हों दे, होऊँ देइँ, उरों नें दी; करूनि घे; होउनि राहिला; करूँ आवडे; शोचूँ पाहसि; हों पाँतसे; सांडूँ पाँती; उतरों सरला; देवों लागें; करूँ सके; देवों शकसि; कोपों लाभे; पव्हों न ल्हाँति; करूनि टाकिजे; करूँ ह्मणे इ. इ. इ.

पाह हें रूप महाराष्ट्रींतून पांच धातूंपासून निष्पन्न होतें:—
(दृश्) पश् = पह. (प्रयोजक) पाह; त्याचें कर्मणि ‘पाहिजे’.
प्रकाश् = पआह = पाह
प्रार्थ् = पाह (अपभ्रंश) = पा

अनुक्रमणिका

प्राप् = पाव, (कर्मणि) पाविजे = पाइजे = पाहिजे
प्रार्ह् = पाह

पश् धातूत्पन्न कर्मणि 'पाहिजे' देखिजे ह्या अर्थी योजतात. पश् = पह = पाह (प्रयोजक). तस्य रूपं अधुना पश्यसि = तेयाचें रूप आतां पाहे (ज्ञा. १८.३९९).

प्रकाश् धातूत्पन्न पाह धातू येणेंप्रमाणें योजतात :—
सूर्यो पाहे = सूर्य प्रकाशे
दिवो पाहे = दिवस प्रकाशे
सूर्ये पाहिजे = सूर्येण प्रकाश्यते.

प्रार्थ् धातूत्पन्न पा येणेंप्रमाणें योजतात:—
देऊं पाए = देण्यास प्रार्थितो, इच्छितो.
हों पांतसे = होण्यास इच्छितो.
मिया तें पाहिजे = मया तत्प्रार्थ्यते.

प्राप् धातूत्पन्न पाहिजे येणेंप्रमाणें योजतात :—
मला तें पाहिजे = तन्मे प्राप्यते
प्रार्ह् धातूत्पन्न पाह येणेंप्रमाणें योजतात :--
त्वं कर्तुं अर्हसि = तूं करूं पाहसि
त्वया कृतं अहर्यते = तुवां केलें पाहिजे.
हे पांची प्रकार ज्ञानेश्वरींत आढळतात.

### (५) गम्

वर्तमान मराठींत ह्या धातूची भूतार्थी कृदन्तें वर्तमान, भूत व भविष्य कृदन्तांना लागतात. (१) मी येऊन गेलों. (२) मी येत गेलों. (३) मी मारिला गेलों.

आहे, असे, असैन, ह्यांचे आणीक जोड दिले तरी खपतात.

हे सर्व सहाय्य धातू वर्तमान मराठींत प्रचलित आहेत.

## ८४. कांहीं धातूंचीं एकटींदुकटीं रूपें

व्हल् (चलने) ह्या धातूचें कर्मणि 'भले' हें एक च रूप ज्ञानेश्वरींत सांपडतें व तें तैं, तो , ती, तैसा, तैसें, तैसी ह्या सर्वनामाच्या रूपांशीं जोडलेलें आढळतें :—

भले तें, भले तैसा, इ. इ.
आवड् धातू भल्प्रमाणें च वागतो.

अनुक्रमणिका

## ८५. अकरणरूप

धातूंच्या मागें न किंवा पुढें ना किंवा मागेंपुढें नाहिँ-हीँ हे निषेधार्थक शब्द लागून अकरणरूपें होतात. नव हा शब्द मागें लागतो.

न लगे = लागे ना = नाहिं लागे, लागे नाहीं, नव लगे.
न लगति = लागति ना = नाहिँ लागति, लागति नाहिँ, नव लागति
नापि = नाभि = नाहि. अनुनासिक आगंतुक आहे.
नैव = नव.

नैव गंतव्यं = नव जावें. ['नव जावें' ही शब्दतोड बरोबर नाही. 'न वजावें' असे पाहिजे. (सं. व्रज्>वजणे)]
नोहोनि, नोको, नको, नँ घे, नँ दे, नुबुझे, नेणिजे, नाकले, इ. इ. इ.
(महाराष्ट्री) नकुण (लोट्) = नकु = नको (नकुरु, मा कुरु)
जाऊँ नको = यांतुं (वैदिक द्वितीया एकवचन) मा कुरु.
तेंहि नको = तदपि मा कुरु.

नको हें क्रियाविशेषण असतें तेव्हां तें नुकम् ह्या संस्कृत निपातापासून निघालें आहे, असें समजावें.

मूळ धातूचा किंवा त्याच्या रूपाचा आद्य स्वर नकार घेतो.
न+होउनि = नोहोनि. न+को = नोको
न+बुझे = नुबुझे. न+अकले = नाकले
हे सर्व प्रकार मराठींत कवितेंत व गद्यांत प्रचलित आहेत.

## ८६. कांहीं मराठी धातू

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| हस् | हस | हस ए |
| कृ | कर | कर ई |
| जी | जअ | जी ए |
| जी | जिण | जिण ए |
| संचि | संचि | साँच ए |
| सू | सव | सू ए |
| प्रसु | पसव | पसव ए |
| प्रस्नु | पण्हअ | पान्ह ए |
| आरु | आरव | आरव ए |
| नी | णे, णअ | ने ई |

| | | |
|---|---|---|
| आनी | आण | आण ई |
| परिणी | परिण | पर्ण ई |
| उड्डी | उड्ड | उड ए |
| दा | दे | दे ई |
| भू | हो, हव | हो ई, हव ए |
| अनुभू | अनुभव | अनुभव ई |
| धृ | धर | धर ए, ई |
| वृ | वर | वर ई, ए |
| स | सर | सर ए |
| हृ | हर | हर ए |
| तृ | तर | तर ए |
| जृ | जर | जर ए |
| अवसृ | ओसर | ओसर ए |
| प्रसृ | पसर | पसर ए, ई |
| मृ | मर | मर ए |
| उत्तृ | उत्तर | उत्तर ए |
| उत्कृ | उक्कर | उरक ए, ई |
| उत्कृ | उक्किर | उकर ई |
| स्मृ | सर | सर, स्मर ए |
| विस्मृ | विसर | विसर ए |
| गै | गा | गा ए |
| निद्रा | निद्दा | नीद ए |
| जीव् | जिअ | जी ए |
| आरुह् | आरुह | आरोह ए |
| धू | धाव | धु ए |
| (जि) घ्रा | आइग्घ | चघल ए, ई |
| पा | पीअ | पी ए |
| स्था | ठा | ठा ए |
| उत्था | उट्ठ | उठ इ |
| दंश् | डस | डस ए |
| खाद् | खा | खाद, खा ए, ई |
| आलिंप् | अल्लिव | आलिव, आलव ए, ई |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| मुच् | मुंच | मोच ई |
| स्पृश् | फुस्, फास् | पुस ई, फाँस ए, ई |
| कृष् | करिस | करिष ए |
| वर्ष् | वरिस | वरिष ए |
| हर्ष् | हरिस-ख | हरिष, हरिख ए |
| आत्रुट् | आतुड | आतुड ए |
| त्रुट्यति | तुट्ट, तोड | तुट ए, तोड ई |
| मील् | मेल, मिल्ल | मिल ए, मेल ए |
| उन्मील् | उम्मिल | उमल ए |
| स्फुट् | फुट्ट | फुट ए |
| धा | धा | धा ए |
| जायते (जन्) | जाअ | जा ए |
| मा | माअ | मा ए |
| वा | वाअ | वा ए |
| निर्मा | णिम्मा | निम ए |
| निर्वा | णिव्वा | निव ए |
| प्रतिभा | पडिहाअ | पढिअ ए |
| प्रतिभास् | पडिहास | पडिहास ए |
| स्ना | ण्हा | न्हा ए |
| नृत् | णच्च | नाच ए |
| युध् | जुज्झ | जुझ ए |
| मन् | मण्ण | मण ए, ह्मण ए |
| कुप् | कुप्प | कोप ए |
| नश् | णस्स, णास | नश, नाश ए |
| रुष् | रुस | रुस ए |
| दुष् | दुस | दुष ए,दोष ए |
| पश् | पास | पाह ए |
| क्रुश् | कोक्क | कोक ए |
| चल् | चल्ल, चल | चल ए, चाल ए |
| परिचल | पअल्ल | पल ए |
| जेम् | जेम | जेव ए |
| रुच् | रुच्च | रुच ए |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| लग् | लग्ग | लग, लाग ए |
| वच् | – | वच ए |
| विश्रम् | वीसम | विसंव ए [मुळ प्रतींत 'विसंघ ए' असे आहे. अर्थात् मुद्रणदोष.] |
| गण् | गण | गण ई |
| वेष्ट् | वेढ | वेढ ई |
| प्रकाश् | पअआस | पाह ए |
| प्रार्थ्यते | पाह | पाहिजे (कर्मणि) |
| संख्या | संघ | सांघ ए |
| आविकर्ण् | आइकण्ण | आइक ए |
| इ | ए | ए, ई (एइजे, कर्मणि) |
| उदि | उदे | उदे ई (उदैजे, कर्मणि) |
| स्वस् | सस | सास ए |
| उच्छ्वस् | ऊसस | उसस ए |
| संधा | संढ | सांड, संड ए, ई |
| भी | बिह | भी, बिह ए |
| चि | चिण | चिण ई |
| परिश्रु | परिसुण | परिस ए |
| प्राप् | पाव, पाअ | पाव ए, पा ए |
| व्याप् | वाव | वाव ए |
| तक्ष् | तच्च | टाँच ई |
| शक् | सक | सक ए |
| स्तृ | ठर | ठर ए |
| छिद् | छिंद | छिंद ए, छिद ए |
| भंज् | भंज् | भांज ए |
| भुज् | भुंज | भुंज ए |
| युज् | जुज्ज | जुग ए |
| प्रयुज् | पउंज | पुंज ए |
| ज्ञा | जाण | जाण ए, ई |
| नज्ञा | णआण | नेण ए, ई |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| विक्री | विक्किण | विक ए, ई |
| ग्रंथ् | गंठ | गांठ ई |
| ग्रह् | गेण्ह | घे ई |
| भण् | भण | ह्मण ए |
| चमत्कृ | — | चमकव (प्रयो.) ई |

## ८७. ज्ञानेश्वरीच्या आठव्या अध्यायांतील मराठी धातू

महाराष्ट्रींतून मराठींत धातू कसे उतरले तें वरील यादीवरून स्पष्ट आहे. ज्ञानेश्वरीच्या आठव्या अध्यायांतील मराठी धातू कोणत्या संस्कृत धातूंपासून निघाले, त्याची यादी पहिल्या ओवीपासून शेवटल्या ओवीपर्यंत देतों :—

| | |
|---|---|
| ह्मणितलें (भण्) | आइका (आविकर्ण्) |
| अवधारिलें (अवधारि) | जाला (जन्) |
| पूसिलें (प्रच्छ्) | कोंदलें (कुन्द्) |
| निरोपिजो (निरूपि) | पावें (प्राप्) |
| सांघां (संख्या) | गालूनि (गल्) |
| परियसें (परिश्रु) | घेतलें (गृह्) |
| बोलां (वल्ह्) | हालवलें (हल्) |
| भरे (भृ) | निमणें (निमा) |
| जाणिजसि (ज्ञा) | उठीति (उत्था) |
| देखां (दृश्) | फूटे (स्फुट्) |
| पवडला (प्रवृत्) | मोडौनि (मुडि खंडने) |
| होये (भू) | पाहिजे (प्रकाश्) |
| ओसणतां (अवसद्) | प्रसवति (प्रसू) |
| वचे (वच्) | वाढे (वृध्) |
| आलें (आगम्) | सांचला (संचि) |
| आहे (अस्) | रचे (रच्) |
| ओलगति (अवलग्) | पातां (पश्) |
| ओगरूनि (अवगृ) | दीसति (दृश्) |
| निगे (निर्गा) | करुं (कृ) |
| लागे (लग्) | नैये (इ) |
| दे ( (दा) | विये (वी) |

अनुक्रमणिका

निफजवी (निष्पादि)
आणीति (आनी)
मिळौनियां (मीळ्)
अधिकरूनि (अधिकृ)
भ्रंशे (भ्रंश्)
भोगिजे (भुज्)
उपार्जलें (उपार्ज्)
सीणें (शृ)
आलविजे (आलिंप्)
उपशमी (उपशम्)
मैलें (मा)
झांकलें (झष् संवरणें)
मानवें (मन्)
फीटे (स्फिट्)
तूटे (त्रुट्)
आटे (अट् गतौ)
ठेविली (स्थापि)
भेदली (भिद्)
गमेली (गम्)
नेले (नी)
सांधिलें (संधा)
धरुनि (धृ)
दाविजतसे (दृश्)
शोधूनि (शुध्)
पूजिजति (पूज्)
तोषविजे (तुष्)
अर्पे (अर्प)
उरे (उर्वर)
पातलें (प्राप्त)
परिहसतु (परिश्रु)
धाइजे (धी)
समातसे (संमा)

संवरूनि (संवृ)
जळों (ज्वल्)
पडिलीं (पत्)
धूतली (धू)
रूलै (रूढ, महाराष्ट्री)
उतली (व्ये)
बुडाला (बुड्ड, महाराष्ट्री
= बुन्द् निशामने)
सांडिलें (संधा)
उबातेन (उष्माय्)
विसकुसे (विकुस्)
मेकलीति (मेख, नामधातू)
आदललेया (आदल्)
पलतां (परिचल्)
चूकवावेया (चुक्क, महाराष्ट्री)
ठाके (स्था)
भले (व्हल्)
जागतां (जागृ)
भीजे (भिद्)
जीतेन (जीव्)
आठवे (आस्तु)
स्मरावें (स्मृ)
भावावें (भ्राव्)
घालावें (ग्रह्)
वर्ततु (वृत्)
अभ्यासूनि (अभ्यास्)
कोप (कुप्)
टाकी (टक्)
लावि (लू)
मीनले (मिल्)
चले (चल्)
नीमणें (निमा)

अनुक्रमणिका

जिए (जीव्)
भिए (भी)
चरे (चर्)
सिरे (श्रि)
थिरावले (स्थिराय)
बैसोनि (उपविश्)
सूनि (सू)
संभ्रमे (संभ्रम्)
आकललेनि (आकल्)
मांडतु (मंड्)
फुडें (स्फुट्)
उमाणलें (उन्मा)
उलंडुनि (उल्लंड्)
बुचुकलले (बुध् (बुज्झ) +कल्)
घडे (घट्)
कलासति (खिल, नामधातू)
कोंडलें (कुड् वैकल्ये)
राहलेयां (रह्)
विलसे (विलस्)
सरे (सृ)
पूरे (पृ)
त्यजी (त्यज्)
उघडलेयां (उद्घट्)
निरुंधी (निरुध्)
सेविला (व्से)
वाउनि (वह्)
भेटणें (भिड्)
गिवसित (गवेष्)
अचिंतें (चित्)
वरिपडिला (उपरिपत्)

एकावटणें (एक, नामधातू)
लिंगटले (लग्, नामधातू)
उपासिति (उपास्)
वाखाणावा (व्याख्या)
साहावे (सह्)
उपाइली (उत्पद्)
झाडूनि (झट्)
निवडूनि (निवट्)
अव्हेरुनु (अवधीर्)
आवडे (आवृत्)
वाढतें (वृध्)
दुभतें (दुह्)
उसिटा (उच्छिष्)
सांसिनले (संसद्) [राजवाड्यांनींच अन्यत्र हा धातू पाणिनीय धातुपाठांतील 'सिन्व्' या धातूपासून व्युत्पादिला आहे व त्यावरून 'पाणिनीय धातुपाठांतील धातू काल्पनिक नाहींत' असा निष्कर्ष काढला आहे. (ज्ञानेश्वरी, अ. ९, ओ. ४, पृ. ६).]
ओललें (आवल्)
दूखे (दुःख्)
चेइलेया (चित्)
सिंपती (स्पृश्)
लोटती (लट्)
जिरति (जृ)
सूचत (सूच्)
नश् (नश्)
पूसे (स्पृश्)
संपडे (संपत्)
विसंचे (विसंचि)
उपजे (उत्पद्)
ठके (टक्)
पौढलेयां (प्रहुड् प्रावरणे)
ओलखावे (अवलक्ष्)
रिगत (निर्गा)
शके (शक्)

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| भ्रमुनि (भ्रम्) | पारिखावे (परीक्ष्) |
| अनुभवलेया (अनुभू) | जूंतलेयाँ (युज्) |
| आते (अत् बंघने) | प्रतिभासे (प्रतिभास्) |
| विझौनि (विध्मै) | आप्लवे (आप्लु) |
| उदितें (उद्यम्) | पेलुनि (प्रेर्) |
| थरे (स्त्) | गाजति (गर्ज्) |
| सांभालावें (संभाल्) | डावली (द्रावीयस = डावीय |
| लाहुनि (लभ्) | = डावा, नामधातू) |
| गवली (गवेष्) | पीकलें (पच्) |
| दाटे (दट्) | जोडलें (युज्) |
| टाकी (टक्) | वीटे (विट्) |
| वोडवति (अवकर्ष्) | आंवगणें (वग् गतौ) |
| बहुडे (प्रहुड्) | अनुमानिति (अनुमन्) |
| वसता (वस्) | आरूढति (आरुह्) |

वरील दोन्ही याद्यांवरून दिसतें कीं ज्ञानेश्वरींतील बहुतेक सर्व धातू संस्कृतांतून साक्षात् किंवा महाराष्ट्रीद्वारा आले आहेत. अठरा हि अध्यायांत हा च प्रकार आहे.

**अष्टमान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

# नवमान्हिक

## ८८. तद्धितप्रक्रिया

संस्कृतांतील सर्व तद्धित प्रत्यय स्वता किंवा महाराष्ट्रीद्वारा अथवा अपभ्रंशद्वारा प्रतिनिधिरूपानें ज्ञानेश्वरींत येतात. त्यांचा सामग्र्यानें विचार आदेशप्रक्रियेंत करणार आहे. येथें पांच चार प्रत्ययांचा च तेवढा निर्देश करतों.

**(त्यप्) त्य = च्च = च**

हा प्रत्यय संस्कृतांत अमा, इह, क्व, तसिल् —प्रत्ययान्त व त्रल्—प्रत्ययान्त अव्ययांपुढें होतो. तसिल्प्रत्ययान्त व त्रल्प्रत्ययान्त अव्ययें पंचम्यर्थी व सप्तम्यर्थी आहेत, तेव्हां मराठींत, शब्दांच्या पंचमीला व सप्तमीला हा प्रत्यय लागून, शिवाय अनुकरणानें प्रथमेला व षष्ठीला लागतो.

| संस्कृत | मराठी |
|---|---|
| इहत्य | इँच |
| तत्रत्य | तेथच |
| अत्रत्य | एथच |
| ततस्त्य | तेथूनच |
| यतस्त्य | जेथूनच |
| यत्रत्य | जेथच |
| कुत्रत्य | कोठच |
| नित्य | निच्च [प्राकृत रूप 'णिच्च' पाहिजे.]<br>नीच इ. इ. इ. |

मराठींत प्रथमा, पंचमी, षष्ठी व सप्तमी ह्यांच्या रूपानें हा प्रत्यय येणेंप्रमाणें लागतो :—
प्रथमा:— घर—घरच, गांवच, रामच, नदीच, रमाच, सुंदरच
पंचमी:— घराहूनच, गांवाहूनच, नदीहूनच, सुंदराहूनच
षष्ठी:— घराच, गांवाच, रामाच, नदीच, रमेच, सुंदराच
सप्तमी:— घरिँ च, रामिँ च, नदीँ च, रामिँ च, सुंदरिँ च.

नामांच्या व अर्थात् विशेषणांच्या प्रथमा, पंचमी, षष्ठी व सप्तमीप्रमाणें च क्रियाविशेषणांच्याहि सप्तमीखेरीज विभक्ती ह्या त्य = च प्रत्ययामागें होतात :—

| | |
|---|---|
| प्रथमा (कल्पित) | तेथच |
| पंचमी | तेथूनच |
| सप्तमी | तेथिँ च |

अनुक्रमणिका

हा त्यज [त्य-ज म्हणजे ‘त्य’ पासून झालेला.] प्रत्यय सर्व नामांना लागतो. पैकीं वर्तमान व भूत व भविष्य व्ययी कृदन्तांना येणेंप्रमाणें लागतो.

व. कृ. करता—करतेयाच (चा, ची, चें), करत्याच (व. म.)
करती—करितियेच (चा, ची, चें), करतीच (व. म.)
करतें—करतेयाच (चा, ची, चें), करत्याच (व. म.)
भू. कृ. केल—केलेयाच (चा, ची, चें), केल्याच (व. म.)
केली—केलियेच (चा, ची, चें), केलीच (व. म.)
केलें—केलेयाच (चा, चो, चें), केल्याच (व. म.)
भ. कृ. कराव—करावेयाच (चा, ची, चें) करावयाच (व. म.)
करावी—करावियेच (चा, ची, चें), करावियेच (व. म.!)
करावें—करावेयाच (चा, ची, चें), करावयाच (व. म.)
भ. कृ. करण—करणेयाचे (चा, ची, चें), करण्याच (व. म.)

ह्या चान्त नामांना व विशेषणांना सर्व विभक्तिप्रत्यय लागतात :—

करतेयाचेन, करतेयाचेया, करतियाचिया, करतेयाचिये, करतियेचेन, करतियेचेया, करतियेचिया, करतेयाचिये इ. इ. इ.

**त्व = त्तण = प्पण = पण**

वैदिक त्वन = संस्कृत त्व = महाराष्ट्री प्पण = मराठी पण.

| संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| दलपतित्व | दलवइत्तण | दलवइप्पण | दलवैपण |
| सादृश्यं | सरिसत्तण | सरिसप्पण | सरिसेपण |
| कोमलत्व | कोँ वलत्तण | कोवलप्पण | कोवलेपण |
| दासीत्व | दासिसण | दासिप्पण | दासीपण |
| मदीयत्व | मज्झत्तण | मज्झप्पण | माझेपण |

मराठींत ‘पण’ प्रत्ययाच्या मागें कित्येक पुल्लिंगी शब्दांना एकारादेश विकल्पानें होंतो, व नपुंसकलिंगी शब्दांना प्राचुर्यानें होतो.

आत्मन् ह्या शब्दाचें भाववाचक ‘आपणपें’ होतें.
आत्मन्+ आत्मन् = आत्मात्मन् = (भाव.) आत्मात्म्यं.
संस्कृत त्म्य = महाराष्ट्री प्य; जसें, माहात्म्यं = माहाप्यं (महाराष्ट्री)
तसें, आत्मात्म्यं....आप्पणाप्यं (महाराष्ट्री) = आपणापैँ = आपणपैँ (मराठी)

अनुक्रमणिका

वार्द्धक्यं (वृद्धात्म्यं) = वृद्धाप्यं (महाराष्ट्री) = वृद्धाप्य (मराठी) [याच धर्तीवर राजवाडे अधिक (सं. आधिक्यम्) हे भाववाचक नाम मानतात. ते म्हणतात—"विशेषण अधिक व भाववाचक नाम अधिक या दोन्ही शब्दांचीं रूपें ज्ञानेश्वरकालीन मराठींत सारखीं च दिसतात. परंतु सूक्ष्म अभ्यासानें त्यांचें भिन्नत्व ओळखतां येतें. (उदा; "अहो तान्हेयांची लागे झटे । तरि तेणें अधिकें चि पान्हा फुटे ।" ज्ञा. ९, १८ टीका)]

'पण' ह्या प्रत्ययाला पुल्लिंगी आ प्रत्यय लागून 'पणा' होतो :-- दळवैपणा, माझेपणा, इ. इ.

'पण' हा प्रत्यय ज्ञानेश्वरींत तत्ता, [तत्—त्व, किंवा तें-पण (भाववाचकत्व)] भाव ह्या अर्थी नामाप्रमाणें योजिलेला आढळतो.

### (तल्) ता = ई = ऐ

बहुचकै, सदर्थै, चक्रवर्त्तै, निश्चिंतै, चावटै, एकवंकै, ग्राहकै वगैरे भाववाचक नामें ज्ञानेश्वरींत सापडतात.

ग्राहकता = ग्राहकई (आ च्याबद्दल मराठींत स्त्रीलिंगी ई प्रत्यय नियत आहे) = ग्राहकै = गिऱ्हाइकी.
संस्कृतांत (तल्) ता प्रत्यय भाव, धर्म किंवा समुदाय दाखवितो.
चक्रवर्त्तै, चक्रवर्त्ती ह्मणजे चक्रवर्त्तिपण, चक्रवर्त्तिता.

गुरुता = गरुवती ह्या भाववाचक शब्दांत ता बद्दल ईकारान्त ती ज्ञानेश्वरींत आहे. ह्या ती ची ई मराठींत झाली.

ग्राहकता = ग्राहकती = ग्राहकई = ग्राहकै = गिऱ्हाइकी.

पीनता ह्या शब्दाचें पीणआ असें महाराष्ट्रींत रूप होतें; परंतु त्याचा स्वीकार मराठीनें केलेला दिसत नाहीं.

गरिवँ, लघिवँ, हावँ, मैत्र, वैराग, धीरुं, वीरुं, साहाज, कोंवलिक वगैरे भाववाचक शब्दांचा विचार आदेशप्रक्रियेंत येईल.

### ८९. स्वार्थे ल

मतुबर्थक (लच्) ल प्रत्यय (फेन = फेनल) संस्कृतांत आहे. तो महाराष्ट्रींत व मराठींत स्वार्थक झाला आहे. स्वार्थक ह्मणजे मूळ अर्थात फेर न करणारा. जसें :—

(संस्कृत) अंध = (महाराष्ट्री) अंधल = (मराठी) अंधल (ला-ली-लें)
(संस्कृत) एक = (अपभ्रंश) एकल = (मराठी) एकल (ला-ली-लें)

अनुक्रमणिका

ह्या ल प्रत्ययाची व्याप्ति मराठींत इतकी विलक्षण आहे कीं महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्यापासून भिन्नत्वेंकरून ओळखण्यास मराठीची ही एक च एक नियत खूण आहे. हा प्रत्यय मराठींत व ज्ञानेश्वरींत (१) क्रियापदें, (२) कृदन्तें, (३) नामें, (४) सर्वनामें, (५) विशेषणें, (६) क्रियाविशेषणें, व (७) निपात, ह्या साऱ्यांना लागतो. ह्मणजे मराठींतील शब्दोदधीच्या सर्व शाखा ह्या प्रत्ययानें व्यापिल्या आहेत. संस्कृतांत व महाराष्ट्रींत हा प्रत्यय नामांना व विशेषणांना तेवढा लागे. मराठीनें संस्कृतापासून व महाराष्ट्रीपासून हा धर्म घेऊन, शिवाय इतर अवशिष्ट शब्दवर्गांना हा धर्म लावण्याची लकब ज्ञानेश्वरांच्या पूर्वी तीनशें वर्षांपासून नवीन स्वतः निर्माण केली आहे.

### (१) क्रियापदांना ल प्रत्यय

भविष्यति लृट्च्या व लृङ्च्या सर्व रूपांना ल प्रत्यय कसा लागतो तें ५२ व्या कलमांत दाखविलें आहे.

### (२) कृदन्तांना ल प्रत्यय

कर्मणि क्त व कर्त्तरि क्तवतु ह्या दोन्हीं कृदन्तांना ल प्रत्यय कसा लागतो तें ६० व ६१ ह्या दोन कलमांत दाखविलें आहे. [हें ६१ व्या कलमातच दाखविलें आहे. कलमांना क्रमांक देण्यात मूळ प्रतींत घोटाळा झालेला आहे.] हा ल प्रत्यय शक ९०५ तील चामुंडरायाच्या शिलालेखांत, ह्मणजे शक १०१० पासून शक १०९४ पर्यंत असलेल्या हेमचंद्राच्या पूर्वी विद्यमान होता. हेमचंद्र ज्या अपभ्रंशाचें (प्राकृताचा तर उल्लेख करावयाला च नको) व्याकरण देतो तो अपभ्रंश निदान महाराष्ट्रांत तरी त्याच्या कालीं विद्यमान नव्हता, हें सिद्ध करण्यास एवढी एक च बाब पुरे आहे. कृदन्तांना ल प्रत्यय लागल्याचें हेमचंद्र एक हि सूत्र देत नाहीं. बाकी त्याच्या पूर्वीपासून तो मराठींत होता, हें शक ९०५ तील शिलालेखावरून स्पष्ट आहे.

### (३) नामांना ल प्रत्यय

| | |
|---|---|
| विष्णु = विठ्ठु = विष्ठुल = विठ्ठल | काकु = काउ = काउला |
| कृष्ण = कन्ह = कान्हुल | राजा = राउ = राउल |
| गोविंद = गोंदु = गोंदुल | पादुका = पाउ = पाउल |
| दादु = दादुला | छाया = साअ = सावली |
| बाबु = बाबुल | |

### (४) विशेषणांना ल प्रत्यय

चांग = चांगल (ला-ली-लें)
पीत = पीअ = पिवल (ला-ली-लें)
श्याम = सांव = सांवल (ला-ली-लें) इ. इ. इ.

### (५) क्रियाविशेषणांना ल प्रत्यय

अनुक्रमणिका

जेव्ह+ल = जेव्हल = जेव्हलिँ (सप्तमी)
तेव्ह+ल = तेव्हल = तेव्हलिँ (सप्तमी)
केव्ह+ल = केव्हल = केव्हलिँ (सप्तमी)
एव्ह+ल = एव्हल = एव्हलिँ (सप्तमी)

(६) सर्वनामांना ल प्रत्यय

इव+ल = इवल; तिवल; जिवल; किवल

(७) निपात

[मुळांत या आंकड्यांतील + व = या खुणा नजरचुकीनें विपर्यस्त पडल्या आहेत.]

अम् (थोडेंसें)+ल = अमळ (अमळ इकडे ये)
द्राक् = ड्राक = टाक+ ल = टाकलँ (घाईनें). सद्रागागतः = तो टाकलँ आला.
अत्र+ल = एथल
तत्र+ल = तेथल

**भतुबर्थक (इलच्) इल प्रत्यय**

संस्कृत इल = महाराष्ट्री इल्ल = मराठी इल

| संस्कृत | महाराष्ट्री अर्धमागधी | अपभ्रंश | मराठी | |
|---|---|---|---|---|
| प्रथम | पढमिल्ल | पहिल | पहिल | (ला-ली-लें) |
| उपरि | उवरिल्ल | — | वरिल | (ला-ली-लें) |
| पुरस् | पुरिल्ल | — | पुढिल, पुढेल | (ला-ली-लें) |
| पूर्व | — | — | पुर्विल | (ला-ली-लें) |
| दक्षिण | दक्खिणिल्ल | — | दक्षिणिल | (ला-ली-लें) |
| बहिस् | बाहिरिल्ल | — | बाहिरिल | (ला-ली-लें) |
| आदि | आदिल्ल | — | आदिल | (ला-ली-लें) |
| मध्य | मज्झिल्ल | — | माझिल | |

वरिल, पढिल, बाहिरिल वगैरे ज्ञानेश्वरकालीन शब्द वर्तमान मराठींत वरल, पुढल, बाहेरल असे उच्चारतात. त्यामुळें वर्तमान मराठींत नुसता ल प्रत्यय लागलासें दिसतें. पंरतु हा ल ज्ञानेश्वरकालीन इल प्रत्ययाचा अपभ्रंश आहे.

आल, आलु वगैरे प्रत्ययांचा विचार आदेशप्रक्रियेंत होईल.

अनुक्रमणिका

**(मतुप्) भत्, वत्**

हे प्रत्यय महाराष्ट्रींत व ज्ञानेश्वरींत वन्त व मन्त होतात व अकारान्त पुल्लिंगी व नपुंसकलिंगी शब्दाप्रमाणें व आकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणें चालतात.

| संस्कृत | महाराष्ट्री | मराठी |
|---|---|---|
| भक्तिमत् | भक्तिवन्त | भक्तिवन्त किंवा मन्त |
| धनवत् | धनमन्त | धनवन्त |
| हनुमत् | हणुमन्त | हणमन्त |
| गुणवत् | गुणमन्त | गुणवन्त |

**(प्राकृत) इम = इवँ**

घोटिवँ, गाळीवँ, भरिवँ वगैरे तद्धितांचा विचार आदशप्रक्रियेंत करणें प्रशस्त आहे.

**(तसि) तः = ता–ताँ**

अतः = आताँ
उभयतः = उभयता–ताँ
स्वभावतः = स्वभावता–ताँ
स्वतः = स्वता–ताँ

**इल्ल = एल**

वर्तमान मराठींत एल प्रत्यय निष्ठाप्रत्ययान्त भूतकृदन्तांना लागतो.
गेल+एल = गेलेल (ला-ली-लें)
मेल+एल = मेलेल, इ. इ. इ.

ह्मणितल, ह्मणिअल, ह्मणियल, ह्मणाल, ह्मतंल, ह्मटलँ ह्या रूपांत संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश, ज्ञानेश्वरी मराठी, एकनाथी मराठी व वर्तमान मराठी ह्यांचें प्रतिबिंब दिसतें.

## ९०. कृत्प्रत्यय
### आ–ई–इर

हे कृत्प्रत्यय धातूंना लागून मराठींत नामें होतात :–

लपी, थपी, सांडी, विखुरी, पाडी, तोडी, मोडी.
यावा, जावा, निगा, चाबा, लाजिर, हसिर, नाचिर, इ. इ. इ. [हे शब्द ज्ञानेश्वरींत लपीथपी (१४.९), सांडीविखुरी (९.३९), यावाजावा (१४.३३७) याप्रमाणें सामासिक स्वरूपांत येतात.]

अनुक्रमणिका

बाकी जे अनेक कृत्प्रत्यय ज्ञानेश्वरींत आढळतात त्यांचा विचार आदेशप्रक्रियेंत करणें सोईचें आहे.

जे शब्द पदार्थवाची नव्हत ते निपात अथवा अव्यय. [अव्ययाची वरील व्याख्या कितपत बरोबर आहे?] ते दोन प्रकारचे :—विकृत आणि अविकृत. ज्यांना विभक्तिकार्य होतें ते विकृत; होत नाहीं ते अविकृत. संस्कृतांतून जसेचे तसे जें आले ते तत्सम; अपभ्रंश होऊन आले ते तद्भव. कित्येक निपात क्रियेचीं विशेषणें असतात. कित्येक शब्दांचा किंवा वाक्यांचा अन्वय करतात. कित्येक उद्गारवाचक असतात; व कित्येक केवळ पादपूरक असतात. हे प्रकार अशास्त्रतेस्तव संस्कृत व्याकरणांत नाहींत. येथें लौकिकार्थानें दिले आहेत.

## ९२. पादपूरक निपात

| | संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | ज्ञानेश्वरी | वर्तमान मराठी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | चित् | चिअ | — | चि, ची | च |
| (२) | अपि | भि | — | हि, हिँ, ही, हीँ | हि |
| (३) | त्वै | प्पइ | — | पैँ | पैँ पाँ |
| (४) | किम् | — | — | काँ | कां |
| (५) | उ | — | उ | उ (घेउनु) | |
| (६) | इ | — | इ | इ (घेउनि) | इ |
| (७) | — | इयां (मागधी) | — | इयां | इयां |
| (८) | किल | किर | — | किरु, कीरु, कीर, कीं | की |
| (९) | किन्नु | किणो | — | — | किनी, कनी |
| (१०) | हन्त | -- | — | हान | आन्, आणि, न्, नी, तो आन् तसा बोलेल? ब्राह्मण नि दारू पीईल? अशा प्रकारची व्यवस्था आणि सरकारनें केली ! |
| (११) | तावत् | — | तवँ | तवँ | तवँ, तों, तर (तअ बद्दल) |
| (१२) | तर्हि | — | — | — | तर |

## ९३. उद्गारवाची

| | संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|---|
| १. | जय | — | — | जय |
| २. | आर्य | अज्ज | — | जी |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | ॐ | — | — | ॐ |
| ४. | नमो | णमु | — | नमो |
| ५. | अंग | — | — | अगा, आगा, हांगा, गा |
| ६. | हंहो | — | — | हाँहो |
| ७. | हे | — | — | हे |
| ८. | अहो | — | — | अहो, आहो |
| ९. | रे | — | — | रे |
| १०. | अरे | — | — | अरे, अरेरे |
| ११. | ए. | — | — | ए |
| १२. | अये | — | अइ | अयि (संभावनायाम्) |
| १३. | रै | — | — | रया |
| १४. | बत | — | — | बा, पाँ |
| १५. | ओ | — | — | ओ, वो |
| १६. | अवे | — | — | अवो |
| १७. | धिक् | — | — | धिक्-ग्, धिगि (इ पादपूरक) |
| १८. | हंहो जय | — | — | हाँ जी |
| १९. | ओ किम् | — | — | हो काँ |
| २०. | वप्तर् | बप्पु | — | बापु |
| २१. | वप्त्री | बप्पी | — | बाई |
| २२. | हा धिक् हा धिक् च भागिनेंय } | हध्धी हध्धी च बाहिणेअ } | — | हात् तिच्या बहिन! |
| २३. | हा धिक् हा धिक् च | हद्धि | | हात् तिच्या |
| २४. | ऱ्हीच्छ (लज्ज्ञायां) | — | — | इश्श् |
| २५. | हालिक | — | — | हल्या |
| २६. | गर्दभ | — | — | गाढव |
| २७. | — | — | धू | धूत् |
| २८. | — | — | हुं | हुँ |
| २९. | — | — | आम | यावँ, यँव (निमंत्रणे, आश्चर्ये) |
| ३०. | — | — | तं | त (वाक्योपन्यासे) |
| ३१. | — | — | नु | न् (काम करतो न्) |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२. | — | — | ऊ | ऊँ (गर्हायाम्) |
| ३३. | — | — | वले | व्हले, भले (निर्धारणे) |
| ३४. | — | — | मामि | माइ, मामि (आमंत्रणे) |
| ३५. | — | — | मणे | मणे, ह्मणे (विमर्शे) |
| ३६. | — | — | जेण, तेण | जेत्ते, जेहेत्ते (लक्षणे) |
| ३७. | — | — | जणु | जणु(इवार्थे) |
| ३८. | अह | — | — | अहा |

## ९४. उभयान्वयी

कित्येक अन्वयी निपात शब्दाशब्दांचा अन्वय करितात; कित्येक शब्दांचा व क्रियापदांचा अन्वय करितात; कित्येक गौण व मुख्य वाक्यांचा अन्वय करितात आणि कित्येक स्वतंत्र वाक्यांचा अन्वय करितात.

| | संस्कृत | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|---|
| १. | इदानीम् | इदाणिं (सौरसेनी इदंची सप्तमी | दाणिँ | दाणि-णिँ-णी-णीँ |
| २. | — | — | इथि | इथेँ |
| ३. | — | — | जिथि | जिथेँ |
| ४. | — | — | तिथि | तिथेँ |
| ५. | — | — | कुध्र | कुठेँ |
| ६. | — | — | एत्थ | एथि, एथ, एथेँ, येथेँ, येथ |
| ७. | — | — | तेथ | तेथि, तेथ, तेथेँ |
| ८. | — | — | जेत्थ | जेथ, जेथें, जेथि |
| ९. | — | — | कोध्र | कोठेँ |
| १०. | अत्र | अत्थ | — | अथे, हथे |
| ११. | तत्र | तत्थ | — | तत्थ, *तथे |
| १२. | यत्र | जत्थ | — | जत्थ, *जथे |
| १३. | *कत्र | कत्थ | — | कठे |
| १४. | कुत्र | कुत्थ | — | कुथे |
| १५. | अतः | अता | — | आताँ |
| १६. | एवमपि | — | एवँइ-हिँ | एविँ, येविँ |
| १७. | कथमपि | — | केवँइ | केविँ |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | तथापि | — | तेवँइ | तेविँ |
| १९. | यथापि | — | जेवँइ | जेविँ |
| २०. | इतरथापि | — | एरवँइ | एरविँ-एऱ्हविँ यऱ्हविँ-येऱ्हविँ |
| २१. | यावत् | — | यावँ | जवँ, (जोँ) |
| २२. | तावत् | — | तावँ | तवँ, (तोँ) |
| २३. | इयत् | — | *इवँ | *इवँ |
| २४. | एतावत् | — | — | एवँ |
| २५. | कियत् | — | — | *केवँ |
| २६. | इयत् वारम् | *एद्दहवा | — | एधवाँ |
| २७. | कियत् वारम | *केद्दहवा | — | केधवाँ |
| २८. | यावत् वारम् | *जेद्दहवा | — | जेधवाँ |
| २९. | तावत् वारम् | *तेद्दहवा | — | तेधवाॅ |

३०. एधवाँ = एहवाँ = एव्हाँ

३१. तेधवाँ = तेहवाँ = एव्हाँ

३२. जेधवाँ = जेहवाँ = जेव्हाँ

३३. केधवाँ = केहवाँ = केव्हाँ

३४. एव्ह+ल = एव्हल = एव्हलिँ (सप्तमी)

३५. तेव्ह+ल = तेव्हल = तेव्हलिँ (सप्तमी)

३६. जेव्ह+ल = जेव्हल = जेव्हलिँ (सप्तमी)

३७. केव्ह+ल = केव्हल = केव्हलिँ (सप्तमी)

३८. कैसें, कैसेनि, कैसाँ, काइसेनि, काइसाँ, काइसैँ (कासया, काश्या, काशा)

३९. जैसें, जैसेनि, जैसाँ

४०. तैसें, तैसेनि, तैसाँ

४१. ऐसें, एसेनि, ऐसाँ

४२. जैँ (ज ची सप्तमी)

४३. तैँ (त ची सप्तमी)

४४. कैँ (क ची सप्तमी)

४५. नकैँ, नकहिँ (क ची सप्तमी)

४६. काहि-हिँ-ही-हीँ (काह ची सप्तमी)

४७. काइ-ई-य-यी-ये-ई-इँ, ईँ

४८. काँ (कैँ = काइँ = काँय = काँअ = काँ)

४९. तेथौनि, तेथुनि, तेथौनियाँ, तेथूनियाँ, तेथुनु

५०. जेथौनि इ. इ.

५१. कोठौनि इ. इ.

५२. येथौनि, एथौनि इ. इ. इ.

५३. (यर्हि) जर्व्हिं, जर्व्हीं, जर्व्हैं (यर्हि अपि), जरि, जर

५४. (तर्हि) तर्व्हिं, तर्व्हीं, तर्व्हैं (तर्हि अपि), तरि, तर

५५. (एतर्हि) एरि, एर्व्हीं इ.इ.

५६. यर्व्हविं तर्व्हिं

५७. ना (न)

५८. ना तरि, ना तर्व्हिं

५९. ना यर्व्हविँ तर्व्हिं

६०. जवँ जवँ—तवँ तवँ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६१. | न, नह [राजवाडे-व्युत्पादन : सं. नञ् (ज्ञाने. अ. ९वा, ओ. ५२ टीका).] | — | — | न, ना [एक 'ना' या अव्ययांत दोन्ही Neither-nor हें अर्थ व्यक्त होतात हें राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायांतील पुढील ओव्यांवरील टीकेंत दाखविलें आहे :— "करी ना करवी" (९.१२६); "नियमी ना निवारी" (९.१२७); "घेपे ना दीजे" (९.१७४).] |
| ६२. | नुकम् | — | — | नको |
| ६३. | नाम | नावँ | — | नाँ (येतोस नाँ?) |
| ६४. | नह-नह | — | — | ना-ना |
| ६५. | नान्यथा | — | ण अण्णह | नाना (तसेंच) |
| ६६. | अपि | भि | — | हि-ही-हिँ-हीँ-ईं-इँ |
| ६७. | किं (वा) | — | — | किँ, कीँ (अथवा), काँ (किंआ = क्याँ = काँ) |
| ६८. | पुनः | — | पुणु | पुणु, पण |
| ६९. | यत् | ज्ज | ज्ज | जें, जैं |
| ७०. | माङ् (निषेध) | — | — | मा, मंग (अशिष्ट), मग (विधि). तो आला; मग, मी गेलों = तो आला; नाहीं, मी गेलों = तो आला; नंतर, मी गेलों. |
| ७१. | अनंतर | — | — | नंतर, नंतरि |
| ७२. | अम् | — | — | अमळ (अम + ल) (वर्तमान) |
| ७३. | सपदि | सअइँ | — | सइँ-ईं |
| ७४. | मध्य | मज्झ | — | माझि-जि (सप्तमी) |
| ७५. | मध्यगृहे | मज्झअरम्मि | — | माझारि-रिँ |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७६. | उपरि | वरि | — | उपरि, वरि, वर, वरौनि, वरौनियाँ इ. इ. |
| ७७. | साहज्येन | — | — | साहाजेँ, साहाज |
| ७८. | नापि | — | — | नाहि-हिँ-हीँ-हीं, नहि |
| ७९. | बहिस् | बाहिर | — | बाहिर, बाहिरी, बाहिरौनि, |
| ८०. | अभ्यन्तरा | भितरा | — | भितरा |
| ८१. | नाम एकं | — | — | नावँ एक, नावेक [याचें व्युत्पादन राजवाडे पुढीलप्रमाणें करतात :—नव्यकम् (अव्यय) = नव्यानें (नावेक); नव्यनव्यकम् = नावांनावां (नव्यानव्यानें)-ज्ञाने. अ. ९ वा, ओ. ७१ टीका.] |
| ८२. | एकवेलम् | — | — | एकोल, येकोल |
| ८३. | सपदि ह | — | — | सइँघ = सैँ घ |
| ८४. | आदौ | — | — | आदिँ-धिँ-दी [ज्ञाने. ९.७९ मध्यें ("ते चि कल्पिती प्रकृति पुरे। आणि भूताभासु आदिं चि सरे") राजवाडे हें 'तमभावदर्शक अव्यय' मानतात. व्युत्पत्ति : आदिं < सं. आदौ-तमां शीर्यते (ज्ञा. ९.७९ टीका).] |
| ८५. | झट् | — | — | झडकरि, झाकरि |
| ८६. | *भणित्वा | — | — | ह्मणौनि, ह्मणुनि, ह्मणुनु इ. इ. |
| ८७. | परंतु | — | — | परंतु, परि [राजवाडे व्युत्पादन : परि = परं अपि = परं भि = परं हि = परं इ = परिँ —परि. पर = परं (ज्ञाने. अ. ९ वा, ओ. २ टीका).] (सप्तमी) |
| ८८. | अद्यापि | अज्झुइँ | — | अझुइँ, अझुही, अझुइँ, आझुँ (अजून, वर्तमान) |
| ८९. | नकिर् | — | — | नकिरे, नाहीं किर (अशिष्ट), नाहीं कीं (शिष्ट) |
| ९०. | सहसा | — | — | सहसा |
| ९१. | बलें | — | — | बलें |
| ९२. | दूरे | — | — | दूरिँ, दूरौनि-नियां |
| ९३. | पुरस् | पुढ | पुढ | पुढेँ, पुढाँ, पुढौनि, पुढाराँ, पुढौतें, पुडुतें, पुडुतीँ (सप्तमी) |
| ९४. | मार्ग | मग्ग | — | [मागाँ व माघौतें हीं रूपें राजवाडे अनुक्रमें (सं.) मा + अग्रं व मा+अग्रभूत यांपासून व्युत्पादितात. त्यांच्या मतें अग्रें = आगाँ, म्हणजे पुढें, व त्याच्या उलट मागाँ. मराठींत आगें-मागें असें म्हणतातच. (ज्ञानेश्वरी, अ. ९. ओ. ६८, १०० वरील टीका).] मागें, मागाँ, मागौनि, माघाराँ, माघुती-माघौती-तें-ता. |
| ९५. | अन्त | — | — | आँतु, आँतौनि, आँतौत (विशेषण) |
| ९६. | कदापि | कइँभि | — | कधीं |

## अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९७. | — | — | वहिल्ल | वहिलें-ला-ली |
| ९८. | सर्वदा | — | — | — |
| ९९. | सदा | — | — | — |
| १००. | किम् | — | कँ | काय, काज |
| १०१. | नैव | — | — | नव |
| १०२. | सुधा (उगीच, निष्फळ) | — | — | सुद्धां (तो सुद्धां आला = तो विनाकारण आला = तो देखील नको असतां उगीच आला) |
| १०३. | समम् | — | — | सवेँ, समेँ |
| १०४. | साम्येन | — | — | सवियाँ, सावियाँ |
| १०५. | एकसर | — | एक्कसरिअँ | एकसरेँ |
| १०६. | नियमेन | — | णेम | नेहमीँ |
| १०७. | तत्काल | *तात्काल | तालॉँ | तात्काल |
| १०८. | कल्य | कल्ल | — | काल |
| १०९. | अद्ये | अज्जि | — | आजि, (आज) |
| ११०. | उदये | — | — | उदयाँ, (उद्या) |
| १११. | परेद्यु | — | — | परवाँ [परेद्यु>परवाँ = उद्याच्या परवां; पूर्वेद्यु>परवाँ = कालच्या परवां (राजवाडे)] |
| ११२. | तदितरेद्यु | — | — | तेरवाँ |
| ११३. | इतरेद्यु | — | — | एरवाँ |
| ११४. | पूर्वेद्यु | — | — | (पुरवाँ) परवाँ [परेद्यु>परवाँ = उद्याच्या परवां; पूर्वेद्यु>परवाँ = कालच्या परवां (राजवाडे)] |
| ११५. | प्रभात | — | — | पहाट |
| ११६. | दिवा | दिअ | — | दिआ, दिहा |
| ११७. | द्विप्रहर | दुप्पहर | — | दुपार |
| ११८. | संध्या | — | — | सांझ-ज |
| ११९. | उषसि<br>औषसे | — | — | औषीँ-षी-शी<br>अवशीं-सीं |
| १२०. | अर्वाक्, आरात् | — | — | अरौतें |
| १२१. | प्राक्, परात्* | — | — | परौतें |
| १२२. | सनात् | — | — | झनें, झणीँ |
| १२३. | सांप्रतं, सांप्रत्यम् | — | — | सॉँपेँ, सांपेचें |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२४. | इतरवेलायाम् | — | — | एरवेळीं |
| १२५. | अन्यत् | अण्णिअ | — | आणि |
| १२६. | भ्राम्यत् | — | — | भवंत (ता, ती, तें) |
| १२७. | मुखर | मोहर | — | मोहर, (मोऱ्ह) |
| १२८. | संमुखर | — | — | सँमोहर, सामोर |
| १२९. | खात | खाअ | — | खाल (खाअ+ल), खालाँ, खालौनि इ. इ. |
| १३०. | वारयित्वा | — | — | वारून-नि इ. इ. |
| १३१. | वचित्वा | — | — | वांचूनि इ. इ. |
| १३२. | लगित्वा | — | — | लाग, लागौनियाँ, इ. इ. |
| १३३. | विना | — | — | विण, वीण, विना |
| १३४. | प्रति | — | — | प्रति |
| १३५. | अडित्वा | — | — | अडौनि, इ. इ. |
| १३६. | स्तव | तव | — | तव, स्तव |
| १३७. | कारणेन | — | — | कारणेँ |
| १३८. | कट | — | — | कड, कडेँ, कडाँ, कडौनि |
| १३९. | पार्श्व | — | — | पासि-सिँ, पासौनि, पासाव |
| १४०. | कृते | — | — | करिताँ |
| १४१. | सार्धम् (सद्यीम् वैदिक) | सड्ढिम | — | साठिँ (स्य अर्थे पासून हा शब्द आला नाहीं) |
| १४२. | यम | — | — | जवल-लिं (सप्तमी) |
| १४३. | पर्यंत | | | वेन्हिँ, वेरि (सप्तमी) |
| १४४. | भर | | | भर, भरि (सप्तमी) |
| १४५. | हीन | | | हीन |
| १४६. | क्षेम | खेवँ | | खेऊँ (देखतखेऊँ) |

[* हीं रूपें (तत्थ, जत्थ) अपभ्रंशांतील आहेत; मराठी नाहींत.]

वांचौनि हें अव्यय वाक्यांना हि जोडतें; जसें,

“वारा आभाल चि फेंडी । वांचौनि सूर्यातें न घडी ॥ १२२५ ॥ (अध्याय १८ वा)

अनुक्रमणिका

## ९५. (आणखी कांहीं निपात)

तव हें शब्दयोगी अव्यय तवँ, तव या क्रियाविशेषणाहून निराळें आहे. होर्न्ले साठिँ हें अव्यय (त) स्यार्थे पासून व्युत्पादितो. परंतु, तसा प्रकार नाही. कारण, 'तेया साठिं' या स्थलीं तेया हें षष्ठीचें रूप असून शिवाय स्यार्थे ह्यांतील स्य हि षष्ठीचा प्रत्यय आहे. ह्मणजें षष्ठीच्या स्य ला आणिक एक स्य लागल्यासारखा होतो. तस्य = तस्स = तहो = तेया अशी परंपरा आहे.

रामस्य = रामस्स = रामह = रामा
रामा + स्यार्थे = स्सात्थें = साठिँ

असें होऊं लागेल. सबब स्यार्थे पासून साठिँ निघालें नाहीं.

सध्रीं हें वेदांत व सार्धम् हें संस्कृतांत अव्यय आहे. त्यापासून साठिँ निघालें असें मानणें च उचित आहे.

अव्ययांची परंपरा आदेशप्रक्रियेंत येणार असल्यामुळें, महाराष्ट्रींतील व अपभ्रंशांतील रूपें येथें क्वचित् दिलीं आहेत.

अधिँ, पैकीं, वारि वगैरे रूपें अध (अधस्), पैक (समुदाय), वार (घाव) वगैरे शब्दांच्या सप्तम्या असल्यामुळें येथें दिलीं नाहींत.

'झनें' नकारार्थी असतें तेव्हा तें 'सनात् न' या दोन अव्ययांपासून निघालेलें असतें.

सनात् (निरंतर)
न सनात्, किंवा सनात् न (निरंतर नाहीं, निश्चयानें नाहीं)

झनें ह्या अव्ययाचे अर्थ ज्ञानेश्वरींत दोन च आहेत :—निश्चयानें आहे किंवा निश्चयानें नाहीं, ह्या अर्थी. [**झनें** किंवा **झणीं** हें अव्यय ज्ञानेश्वरींत नेहमीं नकारार्थीच येतें. त्याचीं होकारार्थी उदाहरणें राजवाड्यांनी दिलीं असतीं तर बरें होतें.]

अधस् ह्या शब्दाचें महाराष्ट्रींत हेट्ठ असें रूप होतें. त्यावरून मराठी हेँ ट.

अपभ्रंशांत करेवि असें भूतार्थी अव्ययी कृदन्त आहे, त्यापासून करवि-विं हा निपात ज्ञानेश्वरींत झाला आहे. तेया करविं = त्याच्या करून. 'र' चा 'ड' होऊन त्याच्याकडून.

चतुर्थीचा ते—तेँ प्रत्यय वस्तुतः निपात आहे व तो अर्थे ह्या रूपापासून निघाला आहे. 'थ' चा 'त' मराठींत इतर स्थलीं हि झालेला आहे; उदाहरणार्थ,

करित+आथि = करिताथि = करितातिं; होत्था = होता.

अनुक्रमणिका

चतुर्थीचा सि-सिँ प्रत्यय हि निपाताचा च शेष आहे. पासिँ = वासिँ = आसिँ = सिँ. मग [झनें किंवा **झणीं** हें अव्यय ज्ञानेश्वरींत नेहमीं नकारार्थीच येतें. त्याची होकारार्थी उदाहरणें राजवाड्यांनी दिलीं असतीं तर बरें होतें.] 'आर्श्वं' हा कल्पित शब्द हि कल्पावयाला नको.

वर्तमान मराठींतील चतुर्थीचा ला प्रत्यय लागौनि ह्या निपाताचा अवशेष धरल्यास, त्याचा हि निर्देश येथें करणें उचित आहे. हा 'ला' प्रत्यय रामदास व शिवाजी ह्यांच्यानंतर प्रचलित झाला. त्याच्यावर फारसी द्वितीयेचा व चतुर्थीचा प्रत्यय जो 'रा' त्याचा अनुकरणात्मक संस्कार घडला, यांत संशय नाहीं. [या 'ला' प्रत्ययाचा फारसी 'रा' शीं संबंध नसून तो सं. √लग् धातूत्पन्न असल्याचे मागे म्हटलेंच आहे.]

## ९६. विशेषणविशेष्य

ज्ञानेश्वरींत बहुतेक सर्व विशेषणें विशेष्यनिघ्न आहेत. ह्मणजे विशेष्याचें जें लिंग, वचन व विभक्ति असेल तें च विशेषणाचें असतें. अविकृत विशेषण क्वचित् आढळतें. तेथें तें विशेष्याशीं समस्त आहे, असें समजावें. अविकृत विशेषणें प्रायः तत्सम व क्वचित् तद्भव असतात. तरतमभाव प्रत्यय ज्ञानेश्वरींत नाहींत. पंचमीनें व सप्तमीनें तारतम्य दाखविलें जातें. [उदाहरणार्थ, "जें सकळ गुह्यां गोसावी । **पवित्रां** राओ॥ " (ज्ञा. ९.४७). परंतु यापेक्षां चान्त षष्ठीचा उपयोग अधिक दिसतो; "धर्माचें निजधाम । तेविंचि उत्तमाचें उत्तम ।" (ज्ञा. ९.४८). पण त्याहिपेक्षां परिस, परौत, पसि, पासाव, पासौनि व हूनि हीं शब्दयोगी अव्ययें वापरून तरतमवाचक भाव अधिक व्यक्त होतो; उदा., गुरुसेवेपरौता मार्गु (१३.४४४); चंद्रापासौनि निववितें (९.२४); रंभेहुनि बरविया (१८.९२४); इ.] संस्कृत तरतमभाववाचक विशेषणें मराठींत तद्भावाने येऊन सामान्य विशेषणें झालीं आहेत. लघीयान् = लहान; नवतर = नवथर; पापिष्ठ = पापिट (ल). तारतम्यभावाचा गुण मराठीनें महाराष्ट्रीपासून घेतला आहे. संस्कृतांत हि तरतमप्रत्ययावांचून नुसत्या पंचमीनें तरतमभाव दाखविल्याचीं उदाहरणें आहेत.

## ९७. संधि

महाराष्ट्रीप्रमाणें च मराठींत हलन्त [येथे मुळात नजरचुकीनें 'अजन्त' असें पडलें आहे. पण राजवाड्यांना 'हलन्त' अभिप्रेत आहे हें उघड आहे. (अजन्त = स्वरान्त; हलन्त = हकारान्त, व्यंजनान्त)] शब्द नाहींत. तेव्हां हलसंधि मराठींत नाहींत. स्वतंत्र शब्दांतील आद्यन्त स्वरांचे संधि महाराष्ट्रीप्रमाणें च मराठींत विकल्पानें होतात. ईं(हि) ह्या अव्ययाचा मागील शब्दाच्या अन्त्य स्वराशीं क्वचित् संधि होतो.

भलतें+ईं = भलतैं

एयां कौरवां भलतैं जालें ॥१८१॥ अध्याय २ रा ॥

समासांत अच्संधि [दोन स्वरांचा संधि; स्वरसंधि.] विकल्पानें होतो.

(१) उदोअस्तूंचा किंवा उदयास्तांचा
(२) देहअहंतेचें किंवा देहाहंतेचें
(३) प्रियउपकारु किंवा प्रियोपकारु
(४) दीनउदो किँवा दिनोदय
(५) संसारअडवीं किंवा संसाटवीं
(६) फलअभिलाखी किंवा फलाभिलाषी

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरींत प्रातिपदिकाला किंवा पदाला विभक्तिप्रत्यय लागतांना कोठें अच्संधि होतात व कोठें होत नाहींत, त्यासंबंधानें साद्यन्त विचार आदेशप्रक्रियेनंतर करणें योग्य होईल.

## ९८. समास

वैदिककालापासून आर्यांचें बोलणें दोन प्रकारचें असलेलें आढळतें; (१) विभक्तीनें विकृत शब्दांची योजना करून व (२) अविकृत शब्द जसेचे तसे च ठेऊन. पैकी दुसऱ्या बोलण्याला सामासिक बोलणें ह्मणतात. ह्या भाषेंत एक अधिकृत शब्द दुसऱ्या आवंकृत शब्दाच्या पुढें किंवा मागें बोलून विभक्तीचा अध्याहार केलेला असतो. शेवटीं अस् किंवा नास् धातूचीं रूपें योजतात.

समस्त व्यस्त

गृह द्वार प्रवेशः = गृहस्य द्वारि प्रवेशः अस्ति

कृत गृह द्वार प्रवेशः अयम् = गृहस्य द्वारि प्रवेशः अनेन कृतः अस्ति

अर्वाचीन व नैय्यायिक संस्कृतांत ह्या समस्त भाषेचा प्रचार अति आढळतो.

व्यस्त बोलणें हि मूळचें समस्त च होतें.

गृह स्य द्वार् इ प्रवेश स् अन् एन कृ त स् अस् ति.

अशा निरनिराळ्या शब्दांचा समास करून ही भाषा झाली आहे. तात्पर्य, मूळचें बोलणें समस्त, ह्मणजें अविकृत शब्दांनीं च आर्य चालवीत, असे दिसतें. सशास्त्र विचार करणारे जे नैय्यायिक त्यांनीं हा मूळचा प्रकार स्वीकारिलेला दिसतो.

मराठींत हि संस्कृतांतल्या प्रमाणें अत्यल्प प्रमाणावर समस्त बोलणें आहे.

| | | |
|---|---|---|
| द्वंद्व = तनुमनजीवें | हसतखेंळत } | खादतमोदता |
| बहुव्रीही = दोवाडसिंग गाईं | बसताउठता } | |
| तत्पुरुष = तलहात | बोलबाल (बोलला) | वाचं वाचं |
| कर्मधारय = ज्ञानडोला | | |
| अव्ययीभाव = हातलग | | |

इत्यादि बहुतेक सर्व प्रकारचे समास ज्ञानेश्वरींत आढळतात.

## ९९. उपसर्ग

तद्भव धातूंना उपसर्ग लावण्याची चाल ज्ञानेश्वरी मराठींत नाहीं. गतिसंज्ञक अव्ययें मराठी स्वतंत्रपणें धातूंना लावीत नाहीं. संस्कृत सगतिक धातू मराठींत तद्भावानें आले आहेत.

अनुभविजे (अनु)

सांठणें (सम्)

पडिभासणें (प्रति)

अनुक्रमणिका

उडणें (उत्)
निगे (निर्)
ओलंबणें (अव) इ. इ.

## १००. प्रयोग

संस्कृतांतल्या प्रमाणें ज्ञानेश्वरींत कर्तरि, कर्मणि व भावे असे तीन प्रयोग आहेत. त्यांचीं उदाहरणें नवव्या अध्यायांतील देतों. [उदाहरणांपुढील कंसात दिलेले ओव्यांचे आकड मुळात नाहींत. अभ्यासकांच्या सोयीसाठी ते संपादकानें मुळांत पाहून घातले आहेत.] कारकप्रक्रिया मध्यकालीन भ्रष्ट संस्कृतांतील किंवा महाराष्ट्रींतील आहे असें समजावें.

(१) अवधान देइजे (कर्मणि विधिलिङ्) अवधानं दीयेत। (१)
(२) प्रतिज्ञोत्तर आइकाँ (कर्तरि सकर्मक लोट् [मुळांत 'लट्' असें आहे ती नजरचूक असावी. कारण रूप आज्ञार्थी, म्ह. लोट्चें आहे.)] प्रतिज्ञोत्तरं आविकर्णयत। (१)
(३) न बोलें (कर्तरि अकर्मक लट्) न वल्हामि। (२)
(४) मले सांसिनले (कर्तरि क्तवति कृदन्त) मालाः संसिद्धवन्तः। (४)
(५) माउली बालक रिझवी (णिचि कर्तरि) माता बालकं अर्जयति (६)
(६) पढियो हो (कर्तरि लोट्) प्रेम भवतु। (७)
(७) (आह्मीं) सलगी करित आहों (कर्तरि लट् + वर्तमान सकर्मक कृदन्त) संलग्नतां कुर्वन्तः स्मः। (७)
(८) सारस्वतें पढों सिकिजे (कर्मणि लट् + भविष्य कृदन्त) सारस्वतेन पठितुं शिक्ष्यते। (८)
(९) परिमळें काइ तुरुंबावें (कर्मणिं तव्यति भविष्य कृदन्त) किं परिमलेन तर्पितव्यम्। (११)
(१०) (मी) ह्मणों (कर्तरि लट् अपभ्रंश ऊँ प्रत्यय) अहं भणामि (१२)
(११) विचारिजो (भावे लोट्) विचार्यताम् (१२)
(१२) बोलु स्वीकराल (कर्तरि लृट् सकर्मक) वचनं स्वीकरिष्यथ। (१४)
(१३) तुह्मीं संतोषिजे (कर्तरि विधिलिङ्) यूयं संतुष्येत। (१६)
(१४) तुह्मीं घेतले आहा (कर्तरि क्तवति + लट्) यूयं गृहीतवन्तः स्थ। (१७)
(१५) हें जाणावलें (णिचि क्त) इदं ज्ञापितम्। (१९)
(१६) (मी) बोलिलां (कर्तरि क्तवति उत्तमपुरुष एकवचन) अहं उक्तवान्। (१९)
(१७) चांदणें [राजवाडे- ज्ञानेश्वरींत 'चांदिणें' असा पाठ आहे.] पिकविजत आहे (कर्मणि णिचि वर्तमान कृदन्त + लट् (आह) चंद्रिमा पाच्यमाणः अस्ति। (२०)
(१८) पाणीं थिंजवावें [रा. ज्ञानेश्वरींत 'वोथिजवावें' असा पाठ आहे.] न लगे (णिचि तव्यति + लट्) पानीयं अवोत्स्तारयितव्यं न लगति। (२१)
(१९) (मी) लाजिलों (कर्तरि क्तवति + अपभ्रंश ऊँ लट्) अहं लज्जितवान्। (२१)
(२०) शब्दब्रह्म निदिजे (कर्तरि विधिलिङ्) ब्रह्मं निद्रेत् (२२)
(२१) शब्दु मावललेयां (मावलला ह्या आकारान्त शब्दाची सप्तमी) शब्दे मापिते (२२)
(२२) (मियां) पढियंतेयां होआवें (कर्मणि तव्यति. पढियंत + वत् = पढियंतेयां) मया प्रियवत् भवितव्यम्। (२३)
(२३) अर्थु वाट पाहे (पश् –पह् सकर्मक कर्तरि लट् अनिट्) अर्थो मार्गं पश्यति। (२७)

अनुक्रमणिका

(२४) अभिप्राॐ अभिप्रायातें विये (सकर्मक कर्तरि लट्. अभिप्रायार्थें = अभिप्रायातें) अभिप्रायः अभिप्रायं प्रतिवेति । (२७)

(२५) आमुतें गोडां करावें (कर्मणि तव्यति. गोड + वत् गोडां) युष्माभिः अस्मान्प्रति गुडवत् कर्तव्यम् । (३०)

(२६) बीज तुज सांघिजैल (कर्मणि लृङ्) बीजं ते संख्यापिष्यते । (३४)

(२७) कापडाची होंति काय पेटी (कर्तरि लुङ्) पेटिका अभूत् । (७५)

(२८) आर्डि दीसति (कर्मणि लट्) दर्यः दृश्यन्ते । ; भूतें गमति (कर्मणि लट्) भूतानि अधिगम्यन्ते । (८०)

(२९) भूतजात मातें भावी (णिचि लट्. मातें चतुर्थीचा अर्थ कर्म) भूतजातं मां भावयति । (८४)

(३०) उपपत्ती तुज सांघितलिया (कर्मणि सकर्मक) मया उपपत्तयः ते संख्यापिताः । (६८)

(३१) कोंम निगताति (कर्तरि सकर्मक + कृदन्त) नवपल्लवाः निर्यन्तः सन्ति । (७३)

(३२) दूधातें विख ह्मणति (कर्तरि सकर्मक लट्) दुग्धं विषं मन्यन्ते । (१४१)

(३३) मातें मानुष मानीति (कर्तरि सकर्मक लट्) मां मानुषं मानयन्ति । (१४१)

(३४) यया अभिप्राया विसरसि (कर्तरि लट्) इमं अभिप्रायं विस्मरसि । (१४२)

(३५) स्थूलदृष्टी देखिजे मातें (भावे लट्) मां प्रति स्थूलदृष्ट्या दृश्यते । (१४३)

(३६) अमृतें अमरां न्हविजे [या विशिष्ट भावे प्रयोगातील ‘अमराँ’ हें रूप राजवाडे व नेने तृतीयान्त, तर मोडकशास्त्री प्रथमान्त मानतात. या वादाचा उल्लेख प्रस्तावनेत ‘भाषेच्या जुनेपणाचीं कांही गमकें’ या शीर्षकाखाली पृ. २१ वर केला आहे.] (भावे लट्) अमृतेन अमरवत् न भूयते । (१४३)

(३७) सिंहें कुहां घातलें (भावे भूत कृदन्त) सिंहेन कूपे हतम् । (१४८)

(३८) सांउली न पांतां (भावे भविष्य कृदन्त) छायां न दृष्ट्वा (१४८)

(३९) कोण्हीयेकु कांजी पिआला (कर्तरि क्तवत्) कोऽपि कांजिकां पीतवान् अस्ति । (१५०)

(४०) घेपे ना दीजे (भावे लट्) गृह्यते न दीयते । (१७४)

(४१) इयें वायाणीं असतु (कर्तरि लोट् अकर्मक) इमानि व्यर्थाणि सन्तु । (१८५)

(४२) आपुलें उत्तमत्व नाठवे (भावे लट्) आत्मायं उत्तमत्वं न आस्तूयते । (२२२)

(४३) काइ पुरे ह्मणवे (भावे लट्) अलं इति कथं भण्यते । (२२९)

(४४) ऐसें एकत्वें मानवे । विश्व तेया (भावे लट्) तस्मै विश्वं मान्यते । (२४६)

(४५) कोणें कैं उपासिला नोहें (क्तवति कर्तरि + आह कर्तरि) केन कदा अहं उपासितवान् नास्मि । (२६१)

(४६) आकाशें वसावें, वायू नसावें, पावकें दाहावें, जलें वर्षावें = आकाशेन वास्तव्यं, वायुना नास्तव्यं, पावकेन दग्धव्यं, जलेन वर्षितव्यम् । (२८०)

(४७) जे आपण चि होत (कर्तरि लङ्) ये स्वयं अभवन् । (३०४)

(४८) मातें चि जेणें पाविजे (भावे लट्) मां प्रति येन प्राप्यते तत्पुण्यम् । (३१३)

(४९) मी न पविजे (कर्मणि लट्) अहं न प्राप्ये । (३१६)

(५०) जें आथिलेपण मिरवी (णिचि लट्) यत् संपन्नतां मंडयति । (३६४)

(५१) जेणें पेटी निक्षेपिली (कर्मणि क्त) येन पेटिका निक्षिप्ता । (४२०)

(५२) तेणें मातें स्मरिलें (भावे क्त) तेन मामुद्दिश्य स्मृतम् । (४३८)

(५३) जे जन्मले (कर्मणि क्त) ते जन्म प्राप्तवन्तः । (४३९)

(५४) जिहिं मी ओलावा केला (कर्मणि क्त) यैरहं आश्रयः (आर्द्रस्थानं) कृतः । (४४४)

(५५) कोण कोणा पाहतसें जाणवे ना (भावे लट्) कः कं पश्यति न ज्ञायते । (१८·१५८०)

## अनुक्रमणिका

(५६) परि तेया हि हें क्षेत्र नेणवे चि (भावे लट्) परं तस्यापि एतत् क्षेत्रं न ज्ञायते। (१३·६९)

**वर्तमान मराठी**

| ज्ञानेश्वरी मराठी | वर्तमान मराठी |
|---|---|
| (सकर्मक कर्तरि) रामु गाये मारितु | रामा गाय मारितो |
| (अकर्मक कर्तरि) रामु गाईतें मारितु | रामा गाईस मारितो |
| (कर्मणि) रामें गाये मारिली | रामानें गाय मारिली |
| (भावे) रामें गाईतें मारिलें | रामानें गाईस मारिलें |

पंतोजी मुलास मारितो व पंतोजी मूल मारितो ह्या दोन वाक्यांत अर्थभेद आहे. दुसऱ्यांत मारितो ह्मणजे जीव घेतो आणि पहिल्यांत मारितो ह्मणजे छड्या, काठ्या, बुक्के, चपराका मारितो. [हे वाक्य मुळात नजरजुकीने उलटे छापले गेले आहे. म्हणजे 'पहिल्यांत' व 'दु सऱ्यांत' या शब्दांची उलटापालट झाली आहे.] रामा गाय मारितो ह्मणजे ठार करितो आणि रामा गाईस मारितो ह्मणजे काठी, तरवार, इत्यादींनीं प्रहार करितो.

पहिलें क्रियापद सकर्मक आहे व दुसरें अकर्मक आहे. रामानें गाईस मारिली, हें वाक्य ऐतिहासिक दृष्ट्या अशुद्ध आहे. श्रेष्ठ ग्रंथकारांच्या प्रचारांत आल्यास शुद्ध मानून कसा तरी निर्वाह करावा लागेल. मराठींत भावे क्रियापद चतुर्थीप्रत्ययान्त नामाच्या लिंगाप्रमाणें चालतें, असा नियम करावा लागेल. हा सर्व घोंटाळा दादोबानें केला आहे. त्यानें स, ला, तें हे चतुर्थीचे प्रत्यय द्वितीयेचे कल्पिले. तसे कल्पिण्यास ऐतिहासिक आधार कांहीं एक नाहीं.

| संस्कृत | ज्ञानेश्वरी | वर्तमान मराठी |
|---|---|---|
| मह्यं, मे पानीयं रोचते | मज, मातें पाणीं रुचे | मातें, मला, पाणीं रुचतें |

येथे मातें, मला ह्या चतुर्थ्या आहेत, 'सि' व 'तें' हे चतुर्थीचे प्रत्यय ज्ञानेश्वरकालीं होते. त्यांचा अर्थ कधीं कर्म असे, कधीं संप्रसारण असे. वर्तमान मराठींत हि तो च प्रकार आहे. स, ला, तें हे द्वितीयेचे प्रत्यय मानणें अनैतिहासिक आहे. दादोबानें आपलें व्याकरण इंग्रजी व्याकरणावरून रचिलें आहे. संस्कृत, महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या व्याकरणावरून च मराठी व्याकरण रचिलें पाहिजे. इंग्रजी डेली प्रेयर्‌मधील प्रयोग संध्येंतील न्यासांना लावण्यासारखें च दादोबाचें कृत्य होतें. पाणिनीसारखा सूर्य सोडून, इंग्रजी कंदील घेतल्यामुळें दादोबा जागोजागीं उपहसनीय झाला आहे.

होणें नाहीं (भवनीयं नास्ति) व होआवें नाहीं (भवितव्यं नास्ति) असे प्रयोग ज्ञानेश्वरींत येतात. येथें होणें व होआवें ही भविष्य कृदन्त नामें आहेत. हीं ऍंकारान्त नपुंसक शब्दांप्रमाणें चालतात. होणेया, होआवेया, इ. इ. इ.

**नवमान्हिक समाप्त**

अनुक्रमणिका

# (समारोप)

येणेंप्रमाणें (१) वर्णेतिहास, (२) शब्दविभक्तिप्रत्ययेतिहास, (३) क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास व (४) निपातेतिहास, असे चार भाग येथपर्यंत संपले. [वरील विवेचनांतून वाक्यरचनेचा विचार, प्रयोगविचाराचा अपवाद केल्यास, सुटला आहे.] त्यांत ज्ञानेश्वरी मराठी भाषेचा सांगाडा ज्या शिरांनीं व स्नायूंनीं व धमन्यांनीं व मांसपेशींनीं ताणून धरिला व आच्छादिला आहे, त्यांचा मागमूस व पूर्वस्वरूप अपभ्रंशांत, महाराष्ट्रींत व संस्कृतांत कसें होतें तें दाखविलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं ज्ञानेश्वरी मराठीपर्यंत सर्व बाबींची परंपरा अव्याहत लागली आहे. कित्येक वैदिक बाबी संस्कृतांत गळाल्या; कित्येक संस्कृत बाबी महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहींशा झाल्या व कित्येक महाराष्ट्री बाबी ज्ञानेश्वरी मराठींत लुप्त झाल्या. परंतु कोणत्या बाबी कोठें लुप्त झाल्या, हें आतां नक्की कळलें. शंकेला जागा राहिली नाहीं. वर्ण, शब्द, धातू व निपात ह्यांतली अशी एक हि प्रधान बाब राहिली नाहीं कीं जिचें मूळ दाखविलें गेलें नाहीं. [वरील विधान अतिव्याप्त आहे. कारण प्रस्तुत व्याकरणांत शब्दांचीं मूळें दाखविलेलीं नाहींत. या बाबीचा विचार च येथें केलेला नाहीं.] तसें च, हेमचंद्र ज्या अपभ्रंशाचें व्याकरण देतो, त्याहून निराळ्या अपभ्रंशापासून [हा 'निराळा' अपभ्रंश म्हणजे 'जैन माहाराष्ट्री' या नावाने ओळखला जाणारा अपभ्रंश होय हे प्रस्तुत लेखकानें आपल्या 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथांत दाखविलें आहे. (पृ. २९-६७).] मराठी निघाली, असें ह्मणण्याकडे प्रवृत्ति होते. इतकें च नव्हे, तर मराठी ज्या अपभ्रंशापासून निघाली तो अपभ्रंश महाराष्ट्रीहून फारसा भिन्न नसावा, असें हि ह्मणणें प्रशस्त वाटतें. गोडबोले, होर्न्ले, बीम्स वगैरे वैय्याकरणांनी ज्या शेंकडो बाबींची परंपरा दाखविली नव्हती किंवा चुकीची दाखविली होती, ती येथें पायाशुद्ध दाखविली आहे.

७८ कलमापर्यंत संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश व मराठी रूपें जीं दिलीं त्यांवरून आदेश प्रक्रिया सिद्ध व्हावयाची आहे. [आधी रूपविचार किंवा व्याकरण व नंतर आदेशप्रक्रिया हा क्रम येथे उलटा झाला. वास्तविक पहाता रूपविचार आदेशप्रक्रियेच्या पायावर उभा केला पाहिजे. आधीं Phonology, व त्याच्या आधारावर Morphology, असा नियम आहे.] परंतु, प्रातिपदिक व धातू महाराष्ट्रींतून व अपभ्रंशांतून कोणत्या रूपानें आले, तें अद्याप विवेचिलें नाहीं. सबब आदेशप्रक्रिया येथें इतक्यांत देतां येत नाहीं. ज्ञानेश्वरींतील एकोन एक शब्द व धातू अपभ्रंशांतून किंवा महाराष्ट्रींतून किंवा संस्कृतांतून कसे आले तें दाखविल्यावर, मग आदेशप्रक्रियेचे सामान्य व विशेष नियम देणें सोईचें होईल. ह्या खटाटोपाला पांचचारशें अष्टपत्री पृष्ठें लागावीं, असा अदमास आहे. करतां, आदेशप्रकरणाचें विवेचन एखाद्या स्वतंत्र पुस्तकांत च करणें भाग आहे. होर्न्ले, बीम्स, भांडारकर, स्टेन कोनौ व ग्रीयरसन यांनीं आदेशप्रकरणावर जें कांहीं लिहिलें आहे त्याचा विचार तेथें केला जाईल.

**संपूर्ण**

अनुक्रमणिका

# विषयसूचि

अकरणरूप

अच्युतराय ( –चा लेख)

अनुनासिक

अनेकवचनी अनुनासिक

अपभ्रंश

अपभ्रंश (अवंतिज)

अपभ्रंश (हेमचंद्राचा)

अपभ्रंश –भेद

अपरान्त

‘अभिलषितार्थचिंतामणि’ (सोमेश्वरकृत)

‘अभिज्ञानशाकुंतल’

अंशवाचक शब्द

अशोक मौर्य ( –चे लेख)

अश्वघोष

‘अष्टाध्यायी’ (पाणिनि –कृत)

असुर लोक

असुर्या देश

आख्यात विभक्ति (पुरुषांची नांवें)

आठल्ये, कृ. ना.

आत्मनेपद

आदेशेतिहास

आन्री, मोझे व्हिक्टोर

ऑब्लिक् केस्

‘आर्ते द लिंग्वा कानारी’

इच्छार्थक धातू

उद्‌गारवाची निपात

उद्योतनसूरी

उपसर्ग

उभयान्वयी निपात

‘ऋषि’ काव्य

अनुक्रमणिका

एकाक्षरी धातू
एरियल ('टेंपेस्ट' मधील)
एलिप्टिक फ्रेजेस्, एलिप्सिस् व टीप, (टी.)
कच्चायनो (वैयाकरण)
कनिष्क
कर्तरि स्वार्थे
कर्मणि व भावे
कागद (लेखनसाहित्य)
काण्वायन (राजवंश)
कातंत्रव्याकरण
कात्यायन
कालकृत भाषाभेद
कालिदास ('सेतुबंध' कार)
किरिस्तानी अपभ्रंश
कीकट देश
कुंटे, म. मो.
कुमार हकु / सकु
'कुवलयमाला'
कृत्प्रत्यय
कृदन्तें
—अव्ययी भविष्य
—अव्ययी भूत
—कर्मणि भूत
—प्रयोजक
—प्रयोजक कर्मणि
—प्रयोजक भावे
—भविष्य कर्तरि
—भविष्य कर्मणि व भावे
— भावे भूत
—भूत
—वर्तमान
कृष्णयजुर्वेदसंहिता

केतकर, श्री. व्यं.
कोंकणी –पिशाची
‘कोकशास्त्र’ (मराठी)
कोनाउ, स्टेन
कोलते, वि. भि.
कोळ, कोळी (लोक)
क्रमवाचक विशेषणें
क्रियाविभक्तिप्रत्ययेतिहास
‘क्रिस्तपुराण’
‘गाथासप्तशती’
गुणाढ्य
गुणे, पां. दा.
‘गुरुचरित्र’ पोथी
गोडबोले, कृष्णशास्त्री
गोडबोले, रा. प.
गोंड भाषा
गोंडोफेरीस (Gondophares)
गोतमबुद्ध –भाषा
ग्रिम, जेकब
ग्रियरसन, जॉर्ज
च (प्रत्यय)
चंगदेव
चतुर्थी विभक्ति
चामुंडराय
–चा लेख
चालुक्यांची भाषा
चिकुर्डे –ताम्रपट
चिद्धन (भक्तिकथासारामृत)
चिपळोणकर, वि. गो.
चोखामेळ्याचा शिलालेख
छांदस भाषा
जनार्दनस्वामी

अनुक्रमणिका

जयदेव
जयंतपाळ (होयसळ)
जातिकृत भाषाभेद
जुने मराठी लेख (यादी)
जैन धर्मग्रंथ
जैन माहाराष्ट्री
जोगळेकर, गं. ना.
जोग, विष्णुबोवा
जोशी, रा. भि.
ट्रंप (सिंधीचे व्याकरणकार)
तत्सम शब्द
तद्धितप्रक्रिया
तरतमभाव व टीप
तर्खडकर, दादोबा पांडुरंग (‘दादोबा’ पहा)
तुळपुळे, शं. गो. (टी.), (टी.)
तेलंग, का. त्र्यं.
तैत्तिरीय संहिता
दड्ड (द्वितीय, गुर्जरनृप)
दंडक –अरण्य
दंडकारण्य
दरद (Dards)
दंत्यतालव्य व्यंजने
दादोबा
दामले, मो. के.
दासोपंत : पदें व गीता
दुर्गादेवीदुष्काळवर्णन
देव (व्याख्या)
‘देशीनाममाला’
द्विवचन
नागांवें शिलालेख
नाणेघाट –पांडवलेणें
नामधातू

अनुक्रमणिका

नामविभक्ति
 — — चीं नावे
 — —प्रत्ययेतिहास
 — —रूपांवरील टीका
नासिक्य वर्ण
निपात
‘निरुक्त’ (यास्क)
निरुक्ताचार्य
निरुक्ति
निळोबा —गाथा
नेने, ह. ना. (टी.)
पंढरपूर —चौऱ्यायशीचा लेख
पतंजलि
‘पंचतंत्र’
‘पंचवार्तिक’
‘परशुरामोपदेश’
परस्मैपद
परळ शिलालेख
परिभाषा
पल्हवी (भाषा)
पळसदेव शिलालेख (टी.),
पांगारकर, ल. रा.
पाह व गेनॉर (Pai and Gaynor (टी.))
पाटण शिलालेख (टी.)
पाटणकर, परशुरामपंत
पाटांगण (बीड)
पाणिनि
पाणिनीय ‘ल’ कार
पाणिनीय व्याकरण
पादपूरक निपात
‘पाली’ भाषा
 — —चा मूळप्रदेश

अनुक्रमणिका

— —ची परंपरा
— —बौद्धधर्मीयांची
— —व पाणिनीय भाषा
— —व युरोपियन पंडित
— —शब्दाची व्युत्पत्ति
पावगी, नाना
पिशेल, हर्मान
पीटरसन्
पुरभई भाषा
पुल्लिंगी नामें
पूर्ववैदिक भाषा
‘पृथ्विराजरासउ’ काव्य
पेशावर (व्युत्पत्ति)
पैठण
पैशाची
— — चा अपभ्रंश
— —चे भेद
पौनःपौन्यवाचक धातू
प्रवरसेन
प्रयोग
प्रयोजक धातू
‘प्रसन्नराघव’
प्राकृत भाषा
— —चा जन्मकाळ
प्राकृतिकोद्‌भव भाषा
प्रांतकृत भाषाभेद
फाटक, न. र.
फारसी भाषा
फारसीचा परिणाम (टी.)
फारसी शब्द
फॉल्के (Foulke)
फिलॉलजी (व्याखा)

फोनॉलजी (टी.)
फोनीम् (Phoneme) (टी).
फोनेटिक्स (टी.)
बॉप्प, फ्रान्झ
‘बायबलपुराण’
बीम्स, जे.
‘बृहत्कथा’
ब्रह्मावर्त प्रदेश
ब्लूमफील्ड (टी.)
ब्लोक्, झुल् (टी.)
‘भक्तकथासारामृत’ (चिद् घनकृत)
भगवद्गीता –पाठभेद
भागवत, राजारामशास्त्री
भागवती बोली
भांडारकर, रा. गो. (टी.)
भारदे, शि. ए.
भावे लट् व लङ्
भावे (ज्ञानेश्वरीचे अर्थकार)
भाषाभेद
भिडे, बा. अ.
भिंगारकर, श्री. र.
भीष्माचार्य (पं.)
मंगळवेढे ताम्रपट
मंगळवेढे शिलालेख (?)
मठ शिलालेख
मथुरानाथ गोसावी
‘मनुस्मृति’
मराठी
– –आणि इंग्रजी
--आणि फारसी
--खानदेशी
--गंगेरी

--गोमांतकी
— —चा इतिहास
— —चा किरिस्तानी अपभ्रंश
— —चा जन्मकाळ
— —चा मानभावी अपभ्रंश
— — चा मूलारंभ
— — ची उत्पत्ति
— — छंद
-- तील अनुनासिक
-- नागर
-- पिशाच भाषा
-- फारसी लेख
— — भाषेचा इतिहास
— —‘ल’ प्रत्यय
— —वाङ्मयाचा इतिहास
— — शिष्ट व अशिष्ट
— —सारस्वताचा इतिहास
मल्लिनाथ
महाभारत
महाराष्ट्राची वसाहत
महाराष्ट्री
महाराष्ट्री अपभ्रंश
‘महावस्तु’ १३८ (टी.)
महिष्मत् देश
मॉएस (Maues)
मागधी
मागधी अपभ्रंश
माडगावकर रा. वि,
मानभावी अपभ्रंश
‘मानसोल्लास’
मार्कंडेय
मालवण लेख

‘मालविकाग्निमित्र’

मास्टर, आल्फ्रेड

मिरज किल्ला ताम्रपट

मुकुंद, मुकुंदराज

मुकुंदराज प्रत –लेखन

‘मुग्धावबोधमौक्तिक’ (गुजराथी)

‘मुहूर्तमार्तंड’

‘मेघदूत’

मोडक, गो. कृ.

मोलोकिअन्स

यास्क

रांगडी बोली (उज्जनी)

‘राजतरंगिणी’

राजवाडे, वि. का.

– –आग्रह आणि दुराग्रह

– –गुणदोषविवेचन’

--देशभक्तीचा बाणा

– –भाषाशैली

राजवाडे ज्ञानेश्वरी

राप्सन

ऱ्हीस डेव्हिड

लकार (आठ)

लङ्

लट् (वर्तमाने)

‘ल’ प्रत्यय (स्वार्थे)

लिंगकृत भाषाभेद

लिंगविचार

लिट्

लीळाचरित्र

लुङ्

लुट्

लोट् (आज्ञायाम्)

अनुक्रमणिका

वचन

वररुचि

वर्णेतिहास

वाई ताम्रपट

वाङ्मय –व्याख्या

‘वायुपुराण’

वक्रमसंवत्

विक्रमादित्य

विक्रमादित्य सत्याश्रयाचा ताम्रपट

‘विक्रमोर्वशी’

विद्याधर (मुकुंदराज –शिष्य)

विधिलिंङ्

वशेषण –विशेष्य

वश्वनाथ देवनुरकर

विष्णुशास्त्री (चिपळूणकर)

विसर्ग

वुइल्सन् फिलॉलॉजिकल लेक्चर्स (भांडारकर)

वेट् धातू

वेबर (भागवतीचें व्याकरण)

वैद्य, चिं. वि.

व्यंजन –वर्गीकरण

व्यस्त भाषा

व्याकरण

– –ऐतिहासिक

– –तौलनिक

– –व्याख्या

– –साधें

व्हानसंग

व्हेरिओरम एडिशन

व्होनोनिस

शकसंवत्

शतपथश्रुति

शबरस्वामी
शर्ववर्म
शहाबाजगढी शिलालेख
शातवाहन राजवंश
‘शास्त्रीय मराठी व्याकरण’ (दामले)
शिवाजी
शुंग / सुंग (राजवट)
शेषे, कृष्णाजीपंत
श्रवणबेळगोळ लेख
श्रीगोविंदप्रभुचरित्र
संकीर्ण संख्यावाचकें
संख्यावाचक शब्द
सच्चिदानंद बाबा
सता तृतीया
सति सप्तमी
सते चतुर्थी
संधि
समास
समुद्रगुप्ताचा जयस्तंभ
संयुक्त कृदन्त विशेषणे
संयुक्त क्रियापदे
सर्वनामें
सहस्रबुद्धे, शं. व.
सहायधातू (इतर)
साक्यमुनि बुद्ध
साखरे, नानाबुवा
सातवाहन
——शातकर्णी
——सिमुख
——हाल
‘साती ग्रंथ’ (महानुभावांचे)
साने, का. ना. (टी.)

अनुक्रमणिका

सामान्यरूप (टी.)
— —चा अभाव
— —नामांचें
— —सर्वनामांचें
सीमुख (शातवाहन)
सी —यू —की
‘सुबिन्तवचार’ (राजवाडे)
सूर्यज्योतिषी
सेट् धातू
‘सेतुबंध’
सोनगीर किल्ला शेलालेख
सोमेश्वर
सौरसेनी
सौरसेनी अपभ्रंश
स्टीफन्स (फा.)
स्वर
— —इतिहास
— —वर्गीकरण
हरिहर शिलालेख
हातबळणे, शं. रा.
हुल्ट्झ
हेमचंद्र
होर्न्ले
होळकर घराणे
ळ्
क्षत्रप
क्षत्रपति
ज्ञानदेव
— —खानदेशी भाषेतील अभंग
— —ची टीकापद्धति
ज्ञानेश्वरी
— —एकनाथी प्रत आणि क्षेपक

अनुक्रमणिका

— —ओवीसंख्या
— —च्या प्रती
— —उद्बोधनाथी
— —एकनाथी
— —कुंटे
— —चिद्घन
— —निळोबा
— —बंकट
— —भराडी
— —भारद्वाजी
— —माडगावकरी (मुद्रित)
—-मालवणी
— —मुकुंदराजी
— —सोनारी
— —तील गणेशरूपक
— —तील क्षेपक ओव्या
— —पोथीचे आद्यन्त
— —पोथीचा कालनिर्णय
— —पोथीची लेखनशुद्धि इ.
— —पोथीचें वर्णन
— —पीथीची भाषा
— —मुकुंदराजी —माडगावकरी प्रतींची
पाठतुलना

अनुक्रमणिका

# शब्दसूचि

**(महत्वाचे शब्द सूचींत दिले आहेत. संक्षेपांचा खुलासा :- अ = अव्यय; टी = टीपा; तप्र = तद्धितप्रत्यय; धा = धातु; प्र = प्रत्यय; भूषासा = भूतकालवाचक धातुसाधित; सर्व = सर्वनाम)**


अ (सर्व)

अइल

अखंड हो-णें

अनाइस (सर्व)

अनारिस (सर्व)

अनुभवणें

अनुभौ

अपरान्त

अमराँ

असणें

असौनि

आगलिक

आगली

आगि

आठउ/व

आत्मन्

आप/आपण (सर्व)

आपणणें

आपणपेया

आरोगण/णें

आवालुँ

आविसालें

आसपास

आह

‘आहा’

आहाति

इ (सर्व)

इतक (सर्व)


अनुक्रमणिका

इतुल (सर्व)
इल (मतुबर्थक)
इवँ (तप्र.)
इवढ (सर्व)
उजळणी
उडणें
ए (सर्व)
ए (धा)
एक इ. (सर्व)
एकवंके
एती (सर्व.)
एतुल (सर्व.)
एर (सर्व.)
एल (तप्र.)
एवढ (सर्व.)
ऐ (तप्र.)
ऐस (सर्व)
‘ओइचिलें’
ओलंबणें
क (सर्व.)
कत्त्वान
करणें
कवण
काज
काह
कीं
कुंकुँ
कृत
कृतकार्यां
केती (सर्व.)
केतुक (सर्व.)
केतुल (सर्व.)

केवढ (सर्व.)

केवि

कैस (सर्व.)

क्तवतु (प्र.)

गम (धा.)

गाइ/ई

गाय

गावँ

गुरु

गोरूँ

ग्राहकै

‘घराप’

च (तप्र)

चावटै

छत्रपति

छाया

ज (सर्व.)

जय

जाणता

जाणीव

‘जात्याती’

जांभै

जाला (भूधासा.)

जूझती

जे/जें (अ.)

जेती (सर्व.)

जेतुल (सर्व.)

जेवढ (सर्व.)

जैस (सर्व.)

झटे

झनें (नकारार्थी) व टीपा

टिटिभुँ

अनुक्रमणिका

टिट्रिया
टेव
डावलणें
डोल
त (सर्व.)
ता/ताँ (तप्र.)
तव
तूँ (सर्व.)
तेजी
तेती (सर्व.)
तेतुल (सर्व.)
तेवढ (सर्व.)
तैस (सर्व.)
दंडक-अरण्य
दंडा/डंडा
दलवै
दादर
दिङ्नाग
दिन्नवा
दिसणें
देव
देवकी
न ए
नको
न दे
नमणें
नमो
न होणें
नाँ
नागराँ
नाथि
नावांनावां

अनुक्रमणिका

नाह/ही
निगणें
निशाण
निश्चिंतै
नें (तृ. प्र.)
नोको
पंगती
पडिभासणें
पण (तप्र.)
पद्यबंध
पन्नास
परवाँ
पा
पाटाउ
पाणी
पांती
पाली
पावक/कीं
पाहणें (पंचमूल धातु)
पिंपरुँ
पी धा.)
पुरविणें
पूत
पोतास
फल
बहुचकै
बहू
बाइको
बाई
‘बाणवारि’
बीं
बुद्धि

अनुक्रमणिका

भल ( व्हल्)
भलतै
भाष
भुज
मत्-वत्
महारठी
मागां/माघौतें
मांडौ
मातु
माय
माला
मी (सर्व.)
मूड
मोहरें
युगती
रासौभा
रेखा
‘ल’ (प्र.) (टी.)
‘ल’ (स्वार्थे) (टी.)
‘ला’ (प्र.)
‘ला’ (चतुर्थी प्र.)
वखार
वजणें
वरो
वसैठ
वस्तु
वांचौनि
विणावणी
विंचू
विवेकी
वीरूँ
वृत्

वेदप्रतिपाद्य
‘व्यासादिकांचिय’
शक
शक्त
‘शशिसूयाँ’
सकल (सर्व.)
‘सत्तर्कवादु’
सत्तिअ
सत्रप
सदथैं
सरिस (सर्व.)
सर्व (सर्व.)
सवे
सांडणें
साठिं
सात = साक
सारिख
सासु
सि/सिं (चतुर्थी प्र.)
सिहाणें
‘सुखाडलें’
सुंग (राजवंश)
सुरवाड
से
स्वप्न
‘स्वसंवेद्या’
हजार
हरि
हंसणें
हातिरुँ
हावँ
हिंगु

अनुक्रमणिका

हेवा
होणें
होंत साँता-ती-तें
‘हौंगा’/‘होत्या’
क्षत्रप
क्षत्रपति

अनुक्रमणिका

## मंडळाची प्रकाशने

(१) **धर्मरहस्य**

(द्वितीयावृत्ती) लेखक श्री. के. ल. दप्तरी, पृष्ठे १६ + २०८, किंमत रु. १६-००

(२) **आसरा**

लेखक श्री. वि. भा. उजगरे, पृष्ठे १६ + १६९, किंमत रु. ११-००

(३) **हुतात्मा दामोदर हरी चापेकर यांचे आत्मवृत्त**

संपादक श्री. वि. गो. खोबरेकर, पृष्ठे ११५, किंमत रु. ३-००

(४) Letters & Correspondence of Pandita Ramabai

संपादक – प्रा. अ. भि. शहा, पृष्ठे ४६१, किंमत रु. ३५-००

(५) **दलित साहित्य : एक अभ्यास**

संपादक – श्री. अर्जुन डांगळे, पृष्ठे २८६, किंमत रु. २८-००

(६) **सेनापती बापट समग्र वाङ्मय**

लेखक कै. पां. म. बापट, पृष्ठे ५०६, किंमत रु. ५६-००

(७) **लिळा चरित्र**

संपादक – डॉ. वि. भि. कोलते, पृष्ठे ५५ + ९३५, किंमत रु. ३०-००

(८) **जातक कथा, भाग १, २ व ३**

कै. धर्मानंद कोसंबी, पृष्ठे ३२० + १७, किंमत रु. २१-००

(९) **पंचोपाख्यान**

संपादक – डॉ. वि. भि. कोलते, पृष्ठे ७० + २७०, किंमत रु. ३१-००

अनुक्रमणिका